प्राचीन गीत मंजुषा

संपादक

ना. ग. जोशी

पहिली आवृत्ती १९८९
© १९८९, सिंधू जोशी

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

किंमत एकशे चाळीस रुपये

प्रकाशक
सिंधू जोशी
जयप्रभा, खेड गल्ली
प्रभादेवी, मुंबई
४०० ०२५

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

वितरक
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

याजसाठीं केला होता अट्टाहास।
शेवटींचा दिस गोड व्हावा॥
आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा।
खुंटलिया धांवा तृष्णेचिया॥

॥ प्रकाशकीय निवेदन ॥

प्रस्तुत 'प्राचीन गीतमंजूषा' डॉ० ना० ग० जोशी यांनी संकलित-संपादित केली त्याला दहा वर्षे उलटून गेली. दरम्यान १९८६ मध्ये डॉ० जोशी दिवंगत झाले. त्यांच्या हयातीत हे संकलन प्रसिद्ध होण्याचा योग नव्हता.

अलीकडे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या संकलनाच्या प्रकाशनासाठी आंशिक अनुदान दिले; डॉ० जोशी संपादित 'प्राचीन गीतभांडारा'चे प्रकाशक श्री० श्री० पु० भागवत यांनी 'मौज प्रकाशन गृहा'तर्फे ही 'मंजूषा' वितरित करण्याची जबाबदारी स्वीकारली, आणि श्री० राम पटवर्धन यांनी मुद्रणप्रत तयार करण्यापासून मुद्रिते तपासण्यापर्यंतचे सर्व काम परिश्रमपूर्वक व साक्षेपाने पार पाडले; त्यामुळे 'मंजूषे'चे प्रकाशन हाती घेण्याचे धैर्य मला झाले. मौज मुद्रणालयाने नेहमीच्या आत्मीयतेने आणि चोखंदळपणे ग्रंथाच्या छपाईचे काम पार पाडले. मी या सर्वांची आभारी आहे.

प्रस्तुत संकलनाच्या हस्तलिखितावर अखेरचा हात फिरवणे डॉ० जोशी यांना प्रकृति-अस्वास्थ्यामुळे शक्य झाले नव्हते. त्यामुळे या पुस्तकात काही संदिग्ध स्थळे राहून गेली आहेत. आता त्यांचा उलगडा शक्यतेपलिकडचा आहे. वाचकांनी या त्रुटींकडे क्षमादृष्टीने पाहावे अशी विनंती आहे.

'फोडिले भांडार। धन्याचाचि माल। मी तंव हमाल। भारवाही॥'' याच भावनेने डॉ० जोशी यांचे हे संकलन वाचकांपुढे ठेवीत आहे.

सिंधु जोशी

॥ मनोगत ॥

'प्राचीन गीतभांडार' सन १९५९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यावेळी त्याविषयी बरेचसे अनुकूल व चिकित्सक अभिप्राय व प्रदीर्घ समीक्षणे आली होती. अजूनही 'भांडारा'ची रसिकप्रियता कमी झालेली नाही असे आढळून येत आहे.

पण या रसिकमान्यतेच्या प्रमाणात त्या संकलनाला ग्राहकमान्यता मात्र लाभली नाही. त्यामुळे या 'प्राचीन गीतमंजूषे'च्या प्रकाशनासाठी सरकारी मंडळाकडे साहाय्य मागावे लागले.

'प्राचीन गीतभांडारा'साठी गीते – म्हणजेच भावकाव्यात्म स्फुट कवने – निवडताना, भजनी मंडळे व भक्तिगीतसंग्रह यांतली बहुरूढ अशी बरीच कवने हेतुपूर्वक बाजूला ठेवली होती. 'मंजूषे'मध्ये ती बहुतेक सर्व आलेली आहेत. पण त्याशिवाय अनेक जुन्या संतकवींच्या रचनेतली कूटगीते, भारुडे, उपरोधात्मक कवने यांसारख्या विविध व वैचित्र्यपूर्ण नमुन्यांची पदे व गीते या 'मंजूषे'त साक्षेपाने आणि आवर्जून, समाविष्ट केली आहेत. आणखी नवीन उपलब्ध कृतींचा अंतर्भावही येथे केलेला आहे, त्यामुळे अनेक अपरिचित जुन्या मराठी गीतांचा व त्यांच्या कवींचा परिचय होतो. अशा कवनांत जैन, महानुभावी, लिंगायती, महंमदी व ईसाई कृती सहज नजरेत भरतील. त्याशिवाय वारकरी व रामदासी पंथांतली तशीच शाहिरी व लौकिक गीते 'मंजूषे'त नव्याने आलेली आहेत; त्यातली कित्येक गीते वाचकांना नवी वाटतील. रचनाप्रकारांची यादीही सूचीबरोबर दिली आहे.

आधीच्या 'भांडारा'च्या वेळेप्रमाणेच यावेळीही काव्यांचा संग्रह करण्यात अनेकांचे साहाय्य झाले आहे. प्रा० डॉ० स० गं० मालशे यांनी अनेक कवने लिहून पाठवली व काही दुर्मिळ भजनी गीतसंग्रह उपलब्ध करून दिले. प्रा० डॉ० सु० रा० चुनेकर हे मुंबईत असताना त्यांनी कित्येक पदांचा शोध घेऊन ती माझ्याकडे पाठविली. प्रा० पं० वि० रा० आठवले यांनीही, ते 'आकाशवाणी'त असताना, काही पदे व गौळणी यांच्या संहिता मिळवून दिल्या. प्रेमाबाईच्या एका पदासाठी अनेक मित्रांनी पत्रे लिहून साहाय्य केले. त्यात अनेकजण गोमंतकवासी होते. प्रा० डॉ० मोरजे यांनी कराडच्या वर्णनाचे फार जुने कवन उपलब्ध करून दिले व इतरही कवने लिहून पाठविली. 'भांडारा'त महानुभाव कवींची काही स्फुट काव्ये दिली होती ती डॉ० वि० भि० कोलते यांच्या साहाय्याने दिली होती. त्यांनीच नंतर श्री दत्तराज महंतांनी प्रसिद्ध केलेला महानुभावी पंथातली प्रचलित मूर्तिवर्णने, आरत्या वगैरेंचा संग्रह मिळण्यासाठी मार्गदर्शन केले. बडोद्याच्या सौ० शालिनीबाई जावडेकर यांच्यामुळे संत बहिणाबाईची काही अप्रकाशित काव्ये आणि वेणाबाईच्या काही रचना उपलब्ध झाल्या. तसेच बडोदेनिवासी रघुपतिमहाराजांची माहिती व काही कवने श्री० शरदकुमार कानेटकर यांनी मिळवून दिली. या सर्व मंडळींचा

मी अत्यंत आभारी आहे. इतरही अनेकांची मदत झाली. अशा मंडळीत बडोद्यातले काही तरुण लेखक-कलावंत आहेत. विशेषतः श्री० दीपक कन्नल, श्री० श्रीराम खांडेकर, सौ० रोहिणी खांडेकर, श्री० घोलप यांच्याबरोबर झालेल्या विचारविनिमयामुळे मला माझ्या दृष्टिबिंदूबद्दल विश्वास वाटू लागला. त्यांचेही आभार.

बडोदे

ना० ग० जोशी

॥ अनुक्रमणिका ॥

कवींचा अनुक्रम	दहा
प्रास्ताविक लेख	तेरा
गीते	१
टिपा	३३५
परिशिष्टे	
१. पहिल्या ओळींची सूची	३९४
२. रचनाप्रकार-विश्लेषण	४०१
३. संदर्भ-ग्रंथांची यादी	४०३

॥ कवींचा अनुक्रम ॥

कवि	पृष्ठ	कवि	पृष्ठ
१ गोरक्षनाथ	१	२९ वत्सरा	६१
२ गहिनीनाथ	२	३० धोंगडा	६२
३ महानुभाव कवि (अज्ञात)	३	३१ कान्हो पाठक	६३
४ म्हाइंभट	५	३२ चांगा केशवदास	६४
५ महदंबा	६	३३ बहिरा पिसा	६५
६ दामोदर पंडित	७	३४ भागु	६६
७ केशिराज	८	३५ चोखामेळा	६७
८ नारोबास बहाळिये	१०	३६ सोयराबाई	६९
९ कृष्णभट काळे	११	३७ निर्मळा	७०
१० नाइकबाई	१३	३८ कान्होपात्रा	७१
११ निवृत्तिनाथ	१५	३९ दामाजीपंत	७२
१२ ज्ञानेश्वर	१७	४० सुजात	७३
१३ मुक्ताबाई	२७	४१ नयचंद्र	७४
१४ चांगदेव	३०	४२ नामा पाठक	७५
१५ विसोबा खेचर	३१	४३ एकनाथ	७६
१६ नामदेव	३२	४४ जनी जनार्दन	९७
१७ जनाबाई	४६	४५ रामा जनार्दन	९८
१८ गोंदा	५०	४६ विठा रेणुकानंदन	९९
१९ महादा	५१	४७ त्र्यंबक	१००
२० विठा	५२	४८ कृष्णदास मुद्गल	१०१
२१ आऊबाई	५३	४९ फादर स्टीफन्स	१०२
२२ लिंबाई	५४	५० फादर मान्युएल ज्याकिस द नोरोंज	१०३
२३ सेना न्हावी	५५	५१ मुक्तेश्वर	१०५
२४ गोरा कुंभार	५६	५२ मेघराज	१०७
२५ सांवता माळी	५७	५३ कामराजु	११०
२६ जगमित्र नागा	५८	५४ ब्रह्मगुणदास	११३
२७ नरहरि सोनार	५९	५५ गुणकीर्ति	११४
२८ जोगा परमानंद	६०		

कवि	पृष्ठ	कवि	पृष्ठ
५६ मन्मथ शिवलिंग	११५	९० रुक्मांगद	१८५
५७ चिमणा पंडित	११९	९१ कृष्णदयार्णव	१८६
५८ तुकाराम	१२०	९२ गुप्तनाथ (गंगाबाई)	१८८
५९ कान्होबा	१३०	९३ उद्बोधनाथ	१८९
६० बहिणाबाई	१३१	९४ शिवदिनकेसरी	१९०
६१ निळोबा	१३३	९५ मध्वमुनीश्वर	१९३
६२ प्रेमाबाई	१३५	९६ नरहरि तुकाविप्र	१९५
६३ शेख महंमद	१३६	९७ उद्धवलिंग	१९६
६४ मृत्युंजयस्वामी (मुंतोजी)	१३८	९८ अमृतराय	१९७
६५ अलमखान	१३९	९९ शंकर	२०२
६६ सय्यद महंमद	१४०	१०० जिनसागर	२०३
६७ शेख सलीमहंमद	१४१	१०१ कवीन्द्र सेवक	२०५
६८ लतीफशाह	१४२	१०२ श्रीधर	२०७
६९ शहा हुसेन	१४३	१०३ देवीदास	२०८
७० शेख सुलतान	१४४	१०४ महीपतिनाथ	२११
७१ गरीब अबदुल	१४५	१०५ गोपाळनाथ	२१८
७२ माणकोजी बोधले	१४६	१०६ देवनाथ	२१९
७३ रामदास	१४७	१०७ सोहिरोबानाथ	२२१
७४ रंगनाथस्वामी	१६०	१०८ जोतिराम	२२२
७५ केशवस्वामी	१६४	१०९ संतुदास	२२४
७६ दिनकरस्वामी	१६६	११० विठ्ठल केरीकर	२५५
७७ शिवरामस्वामी	१६७	१११ रामानंद	२२६
७८ वेणाबाई	१६८	११२ मोरोपंत	२२७
७९ अंबाबाई	१७०	११३ कोकिळ	२२९
८० गिरिधर	१७१	११४ दयाराम	२३०
८१ वामन पंडित	१७२	११५ गोविंद वणीकर	२३३
८२ विठ्ठल बीडकर	१७४	११६ गोविंद (मुक्तिनाथ-शिष्य)	२३५
८३ अनंतकवि	१७६	११७ गंगानाथ	२३६
८४ रंगबोधस्वामी	१७८	११८ महीपतिबुवा	२३७
८५ अद्वयबोधस्वामी	१७९	११९ काशीकवि	२३९
८६ अनंतबोध	१८१	१२० रामजोशी	२४२
८७ राधाबाई	१८२	१२१ अनंतफंदी	२४५
८८ उद्धवचिद्घन	१८३	१२२ प्रभाकर	२४९
८९ ब्रह्मानंद	१८४	१२३ सगनभाऊ	२५२

कवि	पृष्ठ	कवि	पृष्ठ
१२४ परशुराम	२५५	१४६ रघुपति	२९४
१२५ धोंडी बापू	२५९	१४७ सीताराम	२९६
१२६ वीरक्षेत्री शाहीर	२६२	१४८ जीवनतनय	२९७
१२७ बहेरू	२६५	१४९ धोंडी गुंडी	२९८
१२८ श्यामसुंदर	२६६	१५० बालकवि	२९९
१२९ गुरुदास	२६७	१५१ मुकुंदात्मज	३००
१३० राजाराम प्रासादी	२६९	१५२ नारायणबोवा	३०१
१३१ कृष्णदास जयराज	२७०	१५३ खाकनाथ	३०३
१३२ कृष्णकवि	२७५	१५४ आत्मारामबुवा	३०४
१३३ गोविंद महानुभाव	२७८	१५५ कृष्णभट बांदकर	३०५
१३४ वाकुवर्धन	२८०	१५६ वासुदेवानंदस्वामी	३०७
१३५ मुरारी	२८२	१५७ विष्णुदासबुवा	३०८
१३६ आबाकुमार	२८३	१५८ व्यंकटसुत	३१०
१३७ मीनाक्षी अम्मा	२८४	१५९ बलवंत	३११
१३८ नगाजी	२८५	१६० चांगादास	३१२
१३९ नगनाथ	२८६	१६१ नागो कन्हेर-सोनू हरचंद	३१३
१४० विठोबाअण्णा	२८७	१६२ पड्डे बापूराव	३१५
१४१ माधव	२८९	१६३ कांहीं अनाम कवि	३१७
१४२ माणिकप्रभु	२९०	**पुरवणी**	
१४३ बल्लव	२९१		
१४४ चिन्मय	२९२	१६४ एकनाथ (?)	३३२
१४५ कृष्णकिंकर	२९३	१६५ तुकाराम (?)	३३२

मध्ययुगीन मराठी काव्य : एक (वेगळे) विश्लेषण

"तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव ।"

सर्वच मानवी क्रियांप्रमाणे काव्यरचनेच्या क्रियेमध्येही भरती-ओहोटी, चढउतार, बहर-गळती यांचे कालखंड असतात. भारतातील प्रांतिक भाषांतल्या काव्याला मध्यकाळात अशीच भरती, चढ, उतार ही आली होती. या मध्यकाळाच्या अगोदर संस्कृत-प्राकृतांच्या काळातसुद्धा अशीच एक लाट आली होती. अशा तऱ्हेच्या भरतीच्या लाटेत प्रस्थापित चाकोरीत न बसणारे 'काहीतरी'ही निर्माण होते. त्यासाठी चाकोरी रुंदावावी लागते, किंवा एखादा वेगळा खण व कप्पा त्या नव्या 'काहीतरी'साठी बनवावा लागतो. भारतीय काव्यशास्त्रातल्या प्राणभूत अशा रससिद्धान्ताला धक्का देणाऱ्या नव्या काव्यगत हालचाली प्राचीन काळीही झाल्या. पण रसव्यवस्थेला त्यामुळे त्यावेळी तरी शह बसला नाही. कोंडी झाली खरी, पण ती तर्ककौशल्याने फोडली गेली. रसांचे वर्गीकरण तेच टिकले, फक्त काही नवे रस त्यात समाविष्ट केले गेले आणि काम भागवले गेले. जेथे 'रस' परिपूर्णरीत्या चपखल बसला नाही तेथे 'रसाभास' या वर्गाची सोय केली. बौद्ध व जैन मतांच्या प्रभावाखाली व त्याचा प्रतिकार म्हणून निर्माण झालेल्या शांकर मताच्या आधिपत्याखाली जी काव्यनिर्मिती होत होती तिच्यात असे काही वेगळेपण आढळले; त्यानंतर रामानुजमताच्या प्रभावाने जे संस्कृत वा 'देशी' साहित्य निर्माण झाले त्यातही आणखी नवे वेगळेपण प्रत्ययाला आले.

इ०स० एकोणिसाव्या शतकान्ती एक अगदी पृथक् लाट आली. आता इसवी सनाच्या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जे साहित्य भारतात लिहिले-रचले जात आहे त्यात तर अगदीच वेगळा थाट दिसत आहे. पण त्यातल्याही मुख्य भावोर्मींना रसांच्या चौकटीत बसवायचे प्रयत्न झालेले आहेत व चालूही आहेत. पण त्यात पुरेसे यश येत नाहीसे दिसते. या 'नव'काव्यात 'रस' तर नाहीच, पण 'रसाभास'ही नाही असा जुनेरा आग्रह! — म्हणून ते काव्य 'न्हवं'च! 'ह'कार वाढवून नकारघंटा वाजविण्याचा सिलसिलाच फक्त 'रस'प्रद!

रसव्यवस्था व बदलती परिस्थिती

काव्य हे रसात्मकच असले पाहिजे, हा विचार भरताच्या नाट्यशास्त्रापासून म्हणजे खिस्तपूर्व काळापासून दृढमूल झालेला आहे. पण परिस्थितीमध्ये होणारे बदल हेरून किंवा विश्लेषून आवश्यक तो बदल रसाच्या चौकटीत बसेल अशा प्रकारे करावयाची दृष्टीही प्राचीन काव्यशास्त्रात होती. भरताच्या मताप्रमाणे मुख्य रस आठच होते. त्यापूर्वीच्या काळी फक्त चार रस होते व भरताच्या काळापर्यंत त्यात आणखी चार रस मिळाले.

'रामायणा'त आढळणारी रसांची संख्या वाढाव्याचीच आहे. बहुधा शांतिप्रवण उपनिषत्काल आणि बुद्धजिनांच्या निवृत्तिप्रधान धर्मांचा काळ यात रति-हर्ष-उत्साहादी मनोवृत्तींबरोबरच निर्वेदाची मनोवृत्तीही सर्वसाधारण झाली. 'महाभारता'मध्ये शांतिपर्व आले ते शंकराचार्यांच्या संन्यासमतामुळे आलेले नसून, बहुतेक, औपनिषद काळ व बौद्ध-जैनमतांचा काळ यांतल्या मनोमंथनामुळे आलेले असावे. संसाराची आसक्ती सुटून मनाच्या सर्व वृत्ती समधात होणे म्हणजे 'निर्वेद', – जाण, वेदना यांच्या पलीकडची मनोवृत्ती. या निर्वेद-भावाचेच चोदना-चर्वणांनी फलित होणारे रसरूप 'शांत' हे होय. आठ रसांचा उल्लेख प्रथम केल्यानंतर – 'अष्ट नाट्ये रसाः स्मृताः' असे नमूद केल्या-नंतर – 'शान्तोऽपि नवमो रसः' असा उल्लेख काव्यशास्त्राच्या ग्रंथांत येऊ लागला.

या 'शांत' रसाला रसपदवी देण्यामध्ये एक तऱ्हेची तर्कापत्ती होती. निर्वेद हा जेव्हा परिपूर्ण किंवा केवल (absolute) असेल तेव्हा 'वेद' म्हणजे वेदना-भावच नसेल. कारण कोणतीच वेदनावृत्ती नसणे म्हणजेच निर्वेद. असे असूनही सर्व प्राचीन काव्यशास्त्रज्ञांनी शांत 'रस' स्वीकारला! कारण निर्वेद या मनोदशेची सिद्धी नव्हे, तर ती मनोदशा प्राप्त करून घ्यायची मनाची धडपड ही सर्वसाधारण झालेली होती; साहित्यात तिचे पडसाद घुमत होते. याचा अर्थ असा होतो की 'शांता'चा (स्थायी) भाव 'निर्वेदकल्प' मनोभाव होय; निर्वेदोन्मुख मनोवृत्ती होय. पण साहित्यशास्त्रज्ञ हेही वैयाकरणांप्रमाणेच प्रयोगशरण असल्यामुळे त्यांनी 'स्थितस्य गतिः चिंतनीया' या व्यवहाराच्या अधीन राहून 'निर्वेदप्रायत्व' हेच 'निर्वेदत्व' गृहीत धरलेले दिसते. दुसऱ्या दृष्टीने पाहता या रसप्रक्रियेत फक्त पन्नास टक्के व्यापारच आढळतो. दोन व्यष्टींच्या परस्परसंमुखत्वातून संपूर्ण म्हणजे शंभर टक्के रस सिद्ध व्हायचा अशी प्रक्रिया आहे, तेथे फक्त एक व्यष्टी तेवढी कार्यरत आणि दुसरी व्यष्टी – जी व्यष्टीच नव्हे तर समष्टी आहे – मात्र ज्ञान-वेदनातीत अक्रियाबद्ध परमतत्त्व! येथे अन्योन्य व्यवहारच अशक्य. तेव्हा हा निर्वेदमूलक 'शांत' रस पूर्ण रस न होता रसाभास मात्र होतो. असे असूनही काव्यशास्त्रज्ञांनी त्याला पूर्ण रसाची प्रतिष्ठा दिली याचे कारण निवृत्तिपर अध्यात्माची त्या काळी झालेली सार्वत्रिक स्वीकृती हे होय.

यानंतरच्या कालखंडात म्हणजे इ०स०च्या सोळाव्या शतकाच्या काळापर्यंत केव्हातरी 'वत्सल' हा दहावा रस काव्यशास्त्रज्ञांनी स्वीकारला. या रसाच्या स्वीकृतीमागची पार्श्वभूमी नीटशी हाती येत नाही. कदाचित आर्ष व अभिजात संस्कृत महाकाव्यांत मातापिता व बालक यांच्यामधील भावबंधाची उत्कट शब्दचित्रे पाहून मानवमनातल्या वात्सल्यभावाची कलात्मक उत्कट जाणीव काव्यशास्त्रज्ञांना झाली असावी. कदाचित् 'भागवता'च्या मननामुळे यशोदा-कृष्णांच्या मधील 'मायलेक' हे नाते शास्त्रकारांना अतीव उत्कटतेने जाणवले असेल. कौसल्या-राम, पार्वती-गणेश, अनसूया-दत्त या मायलेकांच्या जोड्याही पुराणांच्या प्रादुर्भावामुळे त्यांच्यापुढे असतील. कसेही असो, 'वत्सला'ला रसपदवी प्राप्त होऊन काव्यातले रस दहा झाले व काव्यशास्त्रग्रंथांत तशी नोंद झाली.

पुढे ज्या एका नव्या रसाची भर पडली त्याला मात्र संस्कृत साहित्यशास्त्रात निरपवादपणे मान्यता मिळाली नाही. रामानुजाचार्यांपासून रामानंदाच्या द्वारे उत्तर

भारतात व भक्त पुंडलिकाने कानडा विठ्ठल भीमातीरी आणल्यावर त्याच्या द्वारे पश्चिम व दक्षिण भारतात देशी भाषांतून जे अपरंपार देवभक्तीचे साहित्य निर्माण झाले त्यात एक अपूर्व अनुभूती प्रकट झाली होती. संस्कृताच्या प्रभावकाळात हे घडले असते तर संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी भक्तिरस केव्हाच आत्मसात केला असता. पण हे भक्तिप्रधान साहित्य इ० स० तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात, चौदाव्या-पंधराव्या शतकापासून पूर्वोत्तर भारतात व पंधराव्या शतकापासून राजस्थान-गुजरात प्रदेशात निर्माण झाले आणि ते 'देशी' भाषांत निर्माण झाले. हा वेळपर्यंत संस्कृत साहित्यशास्त्र दृढ व अपरिवर्तनीय बनले होते. वल्लभाचार्यांमुळे व त्यांच्यानंतर त्यांच्या पीठाधिपतींमुळे वैष्णवभक्तीचा प्रसार समग्र पूर्व, पश्चिम व उत्तर भारतात झाला आणि बंगालमध्ये तर चैतन्यसंप्रदायामुळे शिव-शक्तींना तोडीस तोड अशी राधाकृष्णभक्ती सर्वंकष ठरली. या संप्रदायातल्या मधुराभक्तीच्या आचार्यांनी भक्तिभावाला रसाची पदवी प्राप्त करून दिली. या बाबतीत रूपगोस्वामी सामान्यतः व मधुसूदनसरस्वती हे विशेषतः प्रभावी ठरले.

प्रभुप्रेमाचा भाव त्या काळात सर्वच भारतीय प्रदेशांत प्रस्थापित झालेला होता. त्यामुळे त्यांनी 'देवताविषयक रती' असे त्याचे 'स्थायी' रूप प्रतिपादून देव व भक्त यांतील या प्रेमभावाला मानवीय रतिमूलक शृंगाराशी समांतर अशी पदवी व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. येथे पूर्णरूप रसत्व यायला ज्या दोन व्यष्टी आहेत त्या मानवदेहधारी देव व मानवीय भक्त आहेत. भक्तीच्या या उधाणाच्या क्षणी देवताविषयक रती ही अनेक स्थळी मानव-देव-विषयक रती बनलेली होती. आत्यंतिक राधाभावाची विकृती होत होती व पुष्टिमार्गाला भोगासक्तीने ग्रासले होते. त्यामुळे देव-भक्तामधील प्रेमाला दोन प्रेमिकांमधील रतिभावाचीच कळा आली होती. असा हा अकरावा रस इ०स० सोळाव्या शतकात 'भक्तिरस' म्हणून साहित्यशास्त्रात आला.

यानंतर साहित्यात आलेली नवी लाट अगदी वेगळी होती. पश्चिमेकडील सामाजिक व साहित्यिक प्रवाहांचा व विचारांचा स्रोत म्हणजे भारतातल्या मध्ययुगीन प्रजेला मिळालेला एक धक्काच होता. अनेक नवीन जाणिवा, अनेक नवे वाङ्मयप्रकार यांचा भारतीयांच्या पुरातन तत्त्वज्ञानात व साहित्यविचारात मागमूस आढळत नव्हता. शेक्सपीअरच्या ट्रॅजेडीचे वेगळे विश्व आणि रोमँटिक काव्याचा विस्मयकारक आविष्कार यांना जुन्या रसव्यवस्थेत बसवणे अशक्य वाटत होते आणि खरे म्हणजे त्या तऱ्हेचा प्रयत्न कोणी फारसा निष्ठेने केलाच नाही. पुढे देशी भाषांत त्या प्रकारचे साहित्य निर्माण होऊ लागल्यावर जुनी रसनिष्ठ परिभाषा मागे पडली.

पश्चिमेतही जुन्या काळी रसिकसापेक्ष काव्यविचारच होता. पण तिकडे कविसापेक्ष काव्यविचाराने त्याला दूर सारले. आपल्याकडे त्याला खो बसला तो एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या भागातल्या नव्या क्रांतिकारक विचारसरणीमुळे होय. राष्ट्रकल्पने-बरोबर देशभक्ती आली. लोकसत्तेच्या कल्पनेमुळे स्वतंत्रता, समता, बंधुता यांची नवी जाणीव इकडे आली. साहित्यातले वेगवेगळे प्रकार देशी भाषांत गर्दी करू लागले. छोटी-मोठी गीते, सौंदर्यलक्षी कविता, स्त्रीदाक्षिण्याची अभिव्यक्ती, निसर्गाच्या विविध छटांचे कवितामय चित्रण, नाट्यमय प्रसंगांवरची नाट्योक्ती-नाट्यगीते, प्रादेशिक

अस्मितांचे भावांकुर आणि एकंदर भावविश्वाच्या एकेका व्यक्तिमनावर उमटलेल्या प्रतिसादांचे काव्यात्मक निष्पंद या सगळ्यांनी देशी साहित्यात ठाण मांडले. यातल्या एकतर्फी प्रेमभावनेला जुने पंडित 'शृंगारिक रसाभास' म्हणून संबोधू लागले, पण बाकीच्या सर्वच अनुभूतींची अशी वासलात ते लावू शकले नाहीत. आधुनिकांनी तर रसाची परिभाषाच सोडली. स्फूर्ती व आविष्कार यांची कविमनसापेक्ष चर्चा सुरू झाली. आज आपण प्राचीन काव्यातले 'भावगीत'-तत्त्व शोधायची कोशीस करतो. असे असले तरी काव्याकडे पाहायचा दृष्टिकोण 'भाव'-दर्शीच राहिला — निदान प्राधान्याने तरी तो तसा होता.

पुढे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात तर या सुडौल, नीटस भावगीतकल्पनेलाच हादरा देणारे बदल काव्यरचनेच्या क्षेत्रात झाले. या अत्याधुनिक साहित्यिक जाणिवेने काव्यकल्पनेतल्या — पाश्चात्य व भारतीय दोन्ही काव्यकल्पनांतल्या — अनेक गोष्टींना अर्धचंद्र दिला. काव्यकला ही इतर कलांच्या संदर्भात कल्पून तिला सौंदर्यशास्त्राची परिकक्षा दिली गेली. जुन्या भारतीय साहित्यशास्त्रात अशी व्यापक सौंदर्यशास्त्रीय बैठक ललितकलांच्या चर्चेत आलेली नव्हती व ललितकलांचा परस्परसंबंध विचारात घेतलेला नव्हता. अलंकार व संकेत यांच्याहून वेगळी प्रतिमासृष्टी काव्यात आविष्कार पावू लागली, प्रतीकेसुद्धा व्यापक सामाजिक-साहित्यिक संदर्भ घेऊन साहित्यात येऊ लागली. "मुख्यार्थ (वाच्यार्थ) हा व्यक्त झाला पाहिजे, म्हणजेच 'मुख्यार्थबाध' हा दोष टाळलाच पाहिजे" ही प्राचीन रसशास्त्रातली अट कविलोक धुडकावू लागले. भौतिक-सामाजिक आसमंतातील वर्तनविषयक ('बिहेवियरिअल') धूसरपणा व व्यक्तिजीवनातील बौद्धिक-भावनिक संमिश्रपणा हे साहित्यात येताना धूसर-संमिश्र शैलीचा आश्रय बिनदिक्कत घेऊ लागले. काव्यादी साहित्यप्रकारांतल्या शैलीत व लयबंधात आमूलाग्र बदल झाला. नवकाव्य, नवनाट्य, नवकथा आणि त्यांच्या अनुषंगाने आलेली नवसमीक्षा यांचे स्थान पक्के स्थिर झाले.

रसव्यवस्था कोलमडते आहे याची जाणीव असणाऱ्या काही साहित्यचिंतकांनी रससंख्येत आणखी भर घालून कार्यभाग उरकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मुक्तछंदाचे प्रवर्तन करून नवयुगाचे स्वागत करणाऱ्या कवि अनिलांनी (आ० रा० देशपांडे यांनी) 'प्रक्षोभ' रसाची रसपरिभाषेतून संपूर्ण मांडणी केली. आचार्य जावडेकरांनी 'क्रांति'रस प्रतिपादिला, पण रसपरिभाषेत त्याची साद्यंत स्थापना केली नाही. हे मराठीतले प्रयत्न. हिंदी, बंगाली, गुजराती भाषांतील साहित्यकारांनी व साहित्यशास्त्रकारांनी रसांचा पुनर्विचार केला. एकंदरीने त्यांनाही रसांची जुनी-नवी व्यवस्था स्वीकारार्ह वाटलेली दिसत नाही. असे असले तरी प्राचीन भारतीय साहित्यविचाराचा पाश्चात्य साहित्यसिद्धान्ताशी मुकाबला झाल्यामुळे तौलनिक साहित्यविचार अस्तित्वात आला; साहित्यचर्चेतल्या, संवित्, स्फोट, चर्वणा, स्फूर्ती यांसारख्या संकल्पना — लौकिक व वरवरच्या कल्पना नव्हेत — आकर्षकचं वाटल्या. त्यातल्या 'अलौकिकत्वा'सारख्या संकल्पना तर्काच्या बौद्धिक-भौतिक पातळीवर आणून नव्या संदर्भात त्यांची तपासणी आधुनिकांनी सर्वच प्रादेशिक भाषांत सुरू केली.

रससिद्धान्ताचे प्राचीन प्रतिस्पर्धी

आजच्या काळातही जे रसव्यवस्थेला चिकटून आहेत त्यांचाही या रससिद्धान्तामागील 'अलौकिक' म्हणजे भौतिकातीत गृहीतकृत्यांना फारसा पाठिंबा नाहीच. आधुनिक मनोविज्ञानाच्या मनोवृत्तिविषयक निर्णयांच्या प्रकाशातच रस-भावांची पुनःस्थापना करण्याकडे त्यांचा कल असतो. तसे असणे स्वाभाविकही आहे. पण या रससिद्धान्ताला प्राचीन काळातच दोन समर्थ प्रतिस्पर्धी निर्माण झाले. त्यांचा काही 'अलौकिका'वर अविश्वास नव्हता, पण भाषिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या साहित्यकलेचा हा भाषिक संदर्भ गौण न मानता त्यालाच प्रधान स्थान देण्याचे धैर्य त्यांनी दाखविले. आजच्या साहित्यसमीक्षेत समग्र ललितकला व त्यांची माध्यमे-द्रव्ये विचारात घेऊन मग शब्द-द्रव्याच्या (जुनी परिभाषा : 'पदरचना') वैशिष्ट्याचा विचार स्वरमाध्यम (संगीत), रंगद्रव्य (चित्रकला), माती-मेण-दगड एवढेच नव्हे तर धातूंचे माध्यम (शिल्प-मूर्तिकला) यांच्या तुलनेने, सापेक्षपणे केला जातो. रससिद्धान्ताच्या मुळाशी जी 'स्थायी'भावाची संकल्पना आहे ती अगदी शारीर-मानसाची बाब मानूनही काही प्राचीनांनी तिचे सर्वंकषत्व नाकारले. आधुनिक प्रयोगवादी साहित्यिक व समीक्षकही 'काव्य म्हणजे सर्वतः भावकाव्य' असे मानायचे नाकारतात. रसांचे साचे न मानणारे कित्येक आधुनिकही कलांमध्ये भावतत्त्वाचे अधिराज्य स्वीकारतात (स्वतः मी 'प्राचीन गीतभांडारा'ची प्रस्तावना याच भूमिकेवरून लिहिली; पण आता मी त्या काव्याची व्याप्ती भावतत्त्वाहूनही पलीकडे नेऊ पाहत आहे!)

याचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणून प्रा० रा० श्री० जोग यांची 'अभिनव काव्य-प्रकाशा'मधली भूमिका दर्शविता येईल. काव्यातील 'उक्ती'ची रीत हे ''काव्याचे मुख्य तत्त्व आहे अशा प्रकारचे मत (प्राचीन काळी) बरेच रूढ होते हे उघड आहे'' असा स्वच्छ उल्लेख करून (पृ० ९, नवी आवृत्ती, १९६६) ते पुढे असा निष्कर्ष काढतात की, हा ''काव्याचा आत्मा नव्हे असेच मत पुढे ग्राह्य मानण्यात आले'' (पृ० १०, कित्ता). नंतर ते 'अलिकडील परिभाषे'त आपली प्रतिक्रिया नमूद करतात : या उक्ति-रीतींचा ''संबंध केवळ 'कसे सांगितले आहे' याच्याशी येतो, म्हणजे बाह्य सजावटीशी येतो. ते काव्याचे आत्मतत्त्व होत नाही.'' (पृ० ११, कित्ता). परंतु अर्वाचीन भाषाशास्त्राने शब्दार्थामधील शब्दाचे मौलिक स्थान व त्यानुसार भाषामाध्यमातून निर्माण होणाऱ्या कलांमध्ये शब्दद्रव्याचा सम्यक् व्यापार यांचे उत्तम उद्‌बोधन केलेले आहे.

माझ्या या प्रास्ताविक लेखात मला त्या दृष्टीने विचार मांडावयाचा नाही. फक्त एवढेच सुचवायचे आहे की शरीर-आत्म्याच्या दृष्टान्त-अनुमानाने उक्ति-रीति-शैलीला शरीरसजावट ठरवून भावतत्त्वाला निर्लेप आत्मा म्हणून स्वीकारण्यात शास्त्रीय सत्याला न्याय मिळत नाही. मध्यकालीन मराठी काव्याच्या संदर्भात मी या 'कसे सांगितले आहे'चेही महत्त्व विचारवंतांच्या फिरून नजरेस आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्राचीनांच्या काव्यमीमांसेतील रसेतर सिद्धान्त किंवा मते मुख्यतः पुढीलप्रमाणे आहेत :

(१) **वक्रोक्ती :** कुंतल (कुंतक) या काव्यशास्त्रकाराने आपल्या 'वक्रोक्तिजीवित' ग्रंथात याचे विवरण केले आहे. त्याच्या मताप्रमाणे 'वक्रोक्तिरेव वैदग्ध्यभङ्गीभणितिः उच्यते'

(उन्मेष १, श्लोक ११). त्यापूर्वी भामहाने 'काव्यालंकार' ग्रंथात लिहिले की अतिशयोक्ती ही अलंकारात असते आणि ती सरलोक्ती न राहता वक्रोक्ती असते; व तिच्यामुळेच अर्थ शोभून दिसतो. "सैषा सर्वत्र वक्रोक्तिः अनयार्थो विभाव्यते!" (परिच्छेद २, श्लोक ८५).

या वक्रोक्तिमीमांसेत उक्तीची व्याप्ती अलंकारांपुरतीच मर्यादित ठेवल्यामुळे रसभाव-ध्वनिवादी भामह-कुंतलांना डावलून रससिद्धान्ताचा जोराने पुरस्कार करू शकले. पण खरोखर काव्य किंवा समग्र साहित्यकला यातला शब्दव्यापार हा सहेतुक असतो. तो केवळ व्यवहारी भाषेतला नैसर्गिक देवघेवीच्या कार्यातला व्यापार नसतो. या अर्थाने काव्योक्ती ही नेहमीच वक्रोक्ती असते आणि वेगवेगळ्या तऱ्हेने ही भाषा बुद्ध्याच वाकवून उपयोगात आणल्याने वेगवेगळ्या अर्थच्छटा त्यात उमटू शकतात. कलेतला समग्र वाग्व्यवहार वक्र असतो एवढेच नव्हे तर तो तसा वक्र असण्यानेच काव्यार्थ व्यक्त होऊ शकतो. या अर्थाने वक्रोक्ती हे काव्याचे जीवित किंवा प्राणतत्त्वच मानावे लागते – नुसते कलेवर नव्हे!

खरोखर कालिदासाने म्हटल्याप्रमाणे वागर्थ ही दोन्ही इतकी एकजीव – 'संपृक्त' – झालेली असतात की त्यांचे पृथक्रीत्या अस्तित्व मानणे केवळ अशक्य आहे. ('रघुवंश', सर्ग १ श्लोक १); ती आदिपुरुष व आदिशक्ती यांप्रमाणे अविभाज्य आहेत. आणि रसभावांचे सूचन शब्दार्थावर निर्भर असल्यामुळे काव्यव्यापारात शब्दांच्या विनियोगाला केवळ महत्त्वाचेच नव्हे तर अनन्य स्थान आहे.

(२) रीती : वामन या काव्यशास्त्रज्ञाने 'रीति'-सिद्धान्त प्रस्थापित केला. कालानुक्रमाने वामन हा कुंतलाच्याही अगोदरचा; व त्याने भामहाच्या काव्यालंकारसूत्रावर 'वृत्ती' लिहिताना आपला हा सिद्धान्त स्पष्ट केला. त्याच्या मते काव्याची 'रीती' – रचना-पद्धती – हाच काव्याचा आत्मा होय, व विशिष्ट तऱ्हेची (म्हणजे अतिशयोक्त किंवा वक्र अशी) पदरचना (म्हणजेच शब्दरचना) हीच ती काव्यात्मरूप 'रीती' होय. ("रीतिरात्मा काव्यस्य। विशिष्टा पदरचना रीतिः॥" – 'काव्यालंकारसूत्रवृत्ति', अधिकरण १, अध्याय २, सूत्रे ६-७). वर दिलेले स्पष्टीकरण येथेही लागू पडते व त्यामुळे शब्दार्थांचे अनन्यसाधारण कार्य स्पष्ट होते.

रसभाववादी मीमांसक काव्यात व्यक्त होणारे भाव शब्दार्थांहून भिन्न मानतात. पण खरोखर आविष्काराच्या प्रक्रियेत असा पृथक्पणा केव्हा राहू शकेल? पूर्ण आविष्कृत आशयाचे काव्य आपण प्रथम वाचतो तेव्हा भाव अव्यक्त असतो; शब्दार्थ मनात ठसले म्हणजे भावही मनात ठसतो. मग आपण मनात उमटलेल्या समग्र ठशातून 'भाव' वेगळा काढू पाहतो, व तसा वेगळा भाव कल्पून काव्याचा प्राण मानतो. पण शरीरापासून मन खरोखर वेगळे काढता येत नाही; मग मनोभाव पृथक् करणे सुतराम् अशक्य. आपण जे करतो ते एवढेच की आपल्याला समजावे म्हणून त्यांना लेबले लावतो, वर्गांच्या कप्प्यांत त्यांना बसवतो, त्यांची उत्कटता मोजून पाहतो, त्यांत तरतम बघतो, खालीवर स्तर दर्शवितो. पण ज्या मनाच्या भावांचे हे पृथक्करण असते ते मन काही कप्प्याकप्प्यांचे नसते, स्तरांचे नसते, तर ते समग्र असते व बहुधा संमिश्र असते आणि ते शरीरापासून वेगळे

काढता येत नसते.

(३) **जगन्नाथमत :** पंडित जगन्नाथाने 'रसगंगाधर' या ग्रंथात ''रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्'' (आनन १, परिच्छेद २) अशा तऱ्हेची काव्याची व्याख्या दिलेली आहे. त्यावरून त्याला शब्दाचे केवढे महत्त्व वाटत होते ते सहज कळून येते. एका अर्थी पूर्वीच्या अतिशयोक्ति-वक्रोक्तिमीमांसेचाच हा आणखी एक पर्याय होय.

रसभावमीमांसेला प्रतिद्वंद्वी अशा ज्या मुख्य प्राचीन (मध्ययुगीन) काव्यमीमांसा वर दिल्या त्यांत शब्दाची 'स्फोट'-रूप मीमांसा गृहीत धरलेली आहेच. 'स्फोट' या प्राचीन संकल्पनेचा अर्थ 'गृहीत, अमूर्त असे भाषागत शब्दाचे मूळ रूप' असा होता. म्हणजेच हे एक शब्दांमागचे अमूर्त चैतन्य आहे, ज्यामुळे नादमय शब्दरूपाला अर्थाची जोड मिळते. आपण शब्द व्यवहारभाषेतही वापरतो व तेथेही 'स्फोट'-क्रिया पार्श्वभूमीला असतेच. अशा या सचेतन (सार्थ) शब्दांची चमत्कृतिमय विविध शब्दसंहतींत मांडणी केली की भाषेतले 'अलंकार' तयार होतात, तिची एकंदर शैलीही त्यावर निर्भर असते. म्हणून रसध्वनिवादी शास्त्रकार याला बाह्य साधन म्हणून संबोधून हातावेगळे करतात.

भारतीय व पाश्चिमात्य – दोन्हीही विचारसरणींत शब्दांना सूचितार्थापासून विलग करून गौण लेखण्याकडे मीमांसकांचा कल आहे. रसभाव आणि 'लिरिकल' मूल्य यांनाच त्या मीमांसांत प्राधान्य आहे. पण 'शब्दार्थ' या संकल्पनेचा भाषिक ध्वनिविचार (फोनेटिक्स) व अर्थविचार (सेमँटिक्स) यांच्याशी संबंध हा रक्तसंबंधच म्हणावा इतका सेंद्रिय आहे. व्यवहारभाषा व साहित्यिक भाषा यांत त्यांचा अविभाज्य संदर्भ असतो. त्याची स्थूल कल्पना आल्यावर मगच भाषेतली 'बोलीतील लय-गती' समजू शकते. सर्व कलासर्जनात या गति-लयीचाच विन्यास असतो असे आधुनिक कलामीमांसक मानतात. विविध तऱ्हांनी व्यक्त होऊन कलात्मक सर्जन शक्य करणारी ही मौलिक लय किंवा 'रिदम्' काव्यासह सर्व साहित्यप्रकारांत असते. एवढेच नव्हे तर व्यवहाराच्या भाषेतही ती अस्फुट रूपात असते व प्रसंगी स्फुट रूपातही प्रतीत होते.

भाषा : व्यवहारसाधन व कलामाध्यम

माणूस आपल्या शारीरिक व मानसिक प्रतिक्रिया व्यक्त करू लागला तो प्रथम एक स्वकीय गरज म्हणून की दुसऱ्याला काही निवेदन करण्यासाठी एक साधन म्हणून, या प्रश्नाचे उत्तर मिळणे फार कठीण आहे. तरी पण दुसऱ्या व्यक्तीला आपल्या मनातली गोष्ट कळावी म्हणून त्याने भाषेचे संकेत हळूहळू पक्के केले हे मत जवळजवळ सर्वमान्य झालेले आहे. मात्र मानसिक प्रतिक्रियांचे प्रकटीकरण त्याने मनावरचा ताण कमी करण्यासाठी म्हणून, उद्गारांच्या साह्याने केलेच नसेल असे नाही. जेव्हा परस्परव्यवहाराचे साधन म्हणून मानव भाषांचा उपयोग करतो तेव्हा दुसऱ्याला जास्तीत जास्त सहज आपला अर्थ कळेल अशा तऱ्हेने तो त्या वापरतो. शब्दांचा वाच्यार्थ हा येथे मुख्य असतो व तोच प्राथमिक अर्थ असतो. म्हणून प्राथमिक शब्दार्थाला वाच्यार्थाबरोबर मुख्यार्थही म्हणतात. बोलणाऱ्याच्या 'मुखा'तून शब्दसंहती निघाली म्हणजे प्रथम वाच्य अर्थ प्रतीत होतो म्हणून तो 'मुख्य' अर्थ होय. पण व्यवहारी भाषेतसुद्धा माणूस स्वरांना झोके देतो, कमीजास्त ताण

देतो, काही ठिकाणी भारही देतो. अशा अनेक 'काकु'-स्थानांनी सांगायचा 'अर्थ' अधिक 'गम्य' होईल अशी त्याची खात्री असते; तसा त्याचा अनुभव असतो.

असे असूनही ही व्यवहारातली भाषाशैली, शब्दसंहतीची रचना शक्यतो स्वाभाविक ठेवून साधलेली असते. भाषेच्या 'सिंटॅक्स'मध्ये ती सहेतुक ढवळाढवळ करीत नाही. त्यामुळे या भाषेतली 'बोली व लय' तिची उच्चारणरीती व श्वासोच्छ्वासाच्या गरजा यांनी सिद्ध होत असते. पण अशी एक 'बोलीची लय' असते हे मात्र खरे. अगदी अनभ्यस्त, प्राथमिक अवस्थेतला वाचक छापलेले पुस्तक वाचताना वाक्ये अगदी एकसुरी प्रवाहाने वाचतो. पण तीच भाषा तो स्वतः बोलत असताना अल्प विराम, उच्च-नीच आवाज, काही जागी अधिक भार-आघाताने उच्चार, लघुप्रयास व तीव्र-दीर्घप्रयास उच्चारण या सर्व लकबींचा सहज विनियोग करतो. यातूनच सहज बोलीतली लय निर्माण झालेली असते. पण अशा तऱ्हेने बोलणे हेच त्या भाषेतले स्वाभाविक बोलणे असते. देवघेवीच्या व रागालोभाच्या, निवेदनाच्या व प्रश्नोत्तरांच्या भाषेत हीच शैली असते.

या तऱ्हेच्या लयीतली भार-आघात स्थाने काही भाषांत बोलणाऱ्याच्या गरजेनुसार येतात; अमूक अक्षरावर वा स्वरावर उच्चाराघात आलाच पाहिजे, न आल्यास किंवा वेगळ्या ठिकाणी आल्यास वाच्यार्थातच अर्थहानी किंवा अर्थभेद होईल अशी अवस्था तेथे नसते. पण काही भाषांत उच्चारभार (emphasis) व उच्चाराघात (accent-stress) अर्थाशी जोडलेला असतो, म्हणून त्या भाषांत त्या भाराघातांना फार महत्त्व आहे. वैदिक भाषेत असे त्रिस्वर आहेत. उदात्त, स्वरित, अनुदात्त उच्चारस्थाने वैदिक भाषेत प्राणभूत आहेत. प्रत्येक स्वरस्थान बिनचूक उच्चारणाऱ्या वेदपाठकाला स्वर्ग मिळाल्याचे सुख होते, अशा तऱ्हेची प्राचीन उक्ती प्रसिद्धच आहे. इंग्रजी भाषा ज्या वर्गातली आहे त्या अँग्लो-सॅक्सन भाषांत स्वर किंवा अक्षरावयव (syllable) साघात किंवा निराघात असतात, असे ढोबळपणाने म्हणता येईल व अशा भाषांतले स्वराघात-स्वरभार 'शब्दार्थपरिमाणे'च (phonemes) असतात. वक्तृत्व, नाट्यभाषण, पद्यरचना यांत यांचा विनियोग विशेष हेतूने केला जातो. याउलट लॅटिनमधून आलेल्या भाषांत असे स्वरभार नियतोच्चार म्हणून येत नाहीत.

या दोन भाषावर्गांत हा भेद असला तरी इतर अनेक उच्चारगत वैशिष्ट्ये व लकबी सर्व भाषांत सामान्यतः असतातच. व्यवहारभाषेत त्या असतात व साहित्यिक भाषेतही त्यांचा अन्वर्थक विनियोग करता येतो. विशेषतः शब्दनिष्ठ भार (word-stress) व शब्दबंधगत आघात (phrase-accent) दोहोंतही असू शकतात. भार-आघात यांतही अंशाअंशाचा फरक होऊन 'प्रमुख', 'गौण', 'सम' (तृतीय) व 'पुसट' असे त्याचे प्रकार संभवतात. नादतीव्रत्वाच्यासुद्धा उच्चतर, उच्चतम, नीचतर, नीचतम अशा चार पायऱ्या असू शकतात. काही प्रकारचे अक्षरलोप – ॲपोकोप, ॲफेरीसिस, सिंकोप, सायनेरिसिस, सायनिझेसिस, वगैरे – आपल्याही भाषांत असतात. 'शब्द सोडलेला' – 'शब्द मोडलेला' धडा असतो तसेच स्वर सोडलेला, व्यंजन लोपलेला शब्दसमूहही असतो व तो भाषिक उच्चारणाचाच एक भाग असतो. या सर्व गोष्टी व्यवहारभाषेत जवळजवळ स्वाभाविकपणे येतात. साहित्यिक भाषेत त्यांची हेतुपूर्वक योजना करून अधिक चांगली,

अधिक परिणामकारक निर्मिती साधता येते. व्यवहारभाषेतलेच हे सर्व विशेष, तिचा नेहमीचा शब्दक्रम (syntax) हवा तसा वळवून, वापरल्याने कलेचे माध्यम होऊ शकणारी भाषाशैली तयार होते.

कलामाध्यमे : सापेक्ष विचार

मानवशरीरातल्या संवेदनशक्ती ललितकलांमध्ये माध्यमे म्हणून कार्यरत असतात. दृक्-संवेदना हे चित्रकलेचे माध्यम व रंग हे तिचे द्रव्य. श्रवण-संवेदना हे संगीताचे माध्यम व स्वर हे त्याचे साधन. स्पर्श मुख्यत्वे व दृक् गौणत्वे मूर्ति-शिल्पाचे माध्यम व माती-मेण-दगड-धातू असे घन पदार्थ हे त्याचे द्रव्य. साहित्यकलेचे स्वरूप या कलांच्या मानाने संमिश्र व अप्रत्यक्ष माध्यमाचे आहे. तिचे माध्यम वाणी किंवा भाषा हे आहे व शब्द हे द्रव्य आहे, साधन आहे. वाणी किंवा भाषा या माध्यमाचा संबंध सरळपणे शरीरसंवेदनांशी नसून तो प्रथम नादाच्या दृष्टीने श्रवणाशी येऊन तेथून मेंदूच्या नादकेंद्राशी जोडला जातो व त्यानंतर शब्दयोजनेतल्या नादसंहतीचे अर्थसंकेत मेंदूच्या आणखी दुसऱ्या केंद्राशी जोडले जाऊन वाक्यार्थाची जुळवणी होते. या तुलनेतून ध्वनित होते ते हे की माध्यमाची योजना ही चित्र-शिल्प-संगीतात प्रधानस्थानी असते. वाणीमय माध्यमाच्या नियोजनातूनच साहित्यकला आकार धारण करते. या दृष्टीनेही माध्यमरूप वाणी किंवा भाषासुद्धा साहित्यविचारात प्रमुख स्थानी आहे. तिला दुय्यम दर्जा देण्यास, कप्प्या-कप्प्यांनी विचार करण्याची समीक्षकांची परंपरागत सवयच कारण आहे.

कलाकृती ही माध्यम व द्रव्य-साधन यांच्या एकजीव रसायनामधून निर्माण होते व म्हणून ती जरी पृथक् भासली तरी हे घटक त्यात सदैव अनुस्यूत असतातच. शब्दांचे ध्वननसामर्थ्य म्हणजे संस्कृत साहित्यशास्त्रातील 'ध्वनि'-शक्ती केवळ रसध्वनीचीच नसते. आकारबंधाचे सौंदर्यही तेवढेच महत्त्वाचे असते व ते या ध्वनि-सूचनेने व्यक्त होऊ शकते. आशय व आकार ही दोन्ही साहित्यकलेतही अविच्छेद्य आहेत. आकारावाचून आशय संभवत नाही, पण आशय-प्राधान्यावाचूनही आकार हा कलात्मकतेचा स्पर्श दाखवू शकतो. म्हणूनच समीक्षकांनी आकारनिष्ठा ही आशयनिष्ठेहून कमी समजण्याचे कारण नाही. आकारबंधाला धरून केलेली समीक्षा ही केवळ 'फॉर्मल' समीक्षा आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष करण्यात आपण एका फार मोठ्या कलात्मक 'न्याय्य' आनंदाला डावलण्याचे पाप करीत असतो.

अर्थात आकारबंधाला कलात्मक रूप येण्यास आशयाचा मागोवा घ्यावाच लागतो; पण तो आशय नेहमीच रस-भावरूप असेल असे नाही. पाश्चात्य निसर्गप्रेमी रोमँटिक कवींच्या काव्यात, अत्याधुनिक प्रयोगवादी कवींच्या रचनांत आशयभाव असतो तो अनेकदा रसभाव नसतो. एवढेच नव्हे तर मध्ययुगीन काव्यातसुद्धा काही कवने अशी आढळतात की जी या साचेबंद रस-कप्प्यांत मारून-मुटकूनच बसवावी लागतात. पंडित जगन्नाथाने अनेक सालंकृत मुक्तके (स्फुट सुभाषितवजा श्लोक) संस्कृतात लिहिली व त्यांना काव्य म्हणून मान्यता देणे समीक्षकांना भाग पडले. मग त्यांनी शक्कल काढली 'अधम' काव्याच्या कप्प्याची. काहीही नाव दिले वा नावे ठेवली तरी जगन्नाथाच्या या 'रमणीयार्थ-

प्रतिपादक' शब्दापुढे रसिकांची मान झुकली तर खरीच. अशा अनेक काव्यांत रसध्वनी नसला तरी ध्वनि-सूचन असतेच. त्यात 'रमणीयार्थप्रतिपादक शब्द' असतात एवढेच नव्हे तर त्यात 'वैदग्ध्यभङ्गीभणिति'सुद्धा असते. मग काव्यात्मरूप 'विशिष्ट पदरचना'युक्त 'रीती' त्यात असते हे वेगळे सांगावयास नकोच.

याहीपेक्षा अगदी वेगळ्या स्तरातल्या काही मध्ययुगीन कवनांतही असा प्रकार आढळतो. अशी कवने सर्वच देशी भाषांतल्या मध्ययुगीन काव्यसाहित्यात आहेत; तेव्हा ती मध्ययुगीन मराठी काव्यभांडारातही आहेत हे ओघानेच आले. 'प्राचीन गीतभांडार' या संग्रहात अशी काही कवने आहेत. त्यावेळी माझ्या नजरेपुढेही आशयातील भावोर्मि-तत्त्वाचे ठळक स्वरूप होते व त्यामुळे मी स्वतः मध्ययुगीन मराठीतली थोड्या वेगळ्या रचनाबंधाची ही कवने फक्त नमुन्यापुरती दिली आणि 'प्राचीन मराठी कविता' या प्रास्ताविक लेखात प्राधान्याने मध्यकालीन मराठी स्फुट कवनातले भावतत्त्व विशद केले. अर्थात त्यातली प्रतिमासृष्टी प्रामुख्याने आकारबंधाचे प्राणभूत अंग म्हणून मराठीतील रसिक वाचकांच्या व सौंदर्यप्रेमी समीक्षकांच्या नजरेस आणण्यावरही भर दिलाच. पण तसे करताना काही विशिष्ट आकृतिबंधांच्या काव्याचा परामर्श घेणे अवश्य होते ते झाले नाही. आता या 'प्राचीन गीतमंजूषे'मध्ये मध्ययुगीन मराठीतली अशी वेगळ्या आशयाची, आकारबंधाची गीते-कवने शक्य तेवढी समाविष्ट केली आहेत. अर्थातच रसभावनिष्ठ कप्प्यात चपखलपणे बसणारी कवने त्यात बहुसंख्य आहेत व 'भावकाव्ये' म्हणून असणारे त्यांचे महत्त्व कदापि कमी होणारे नाही हे निर्विवाद.

मध्ययुगीन मराठी कविता : काही वेगळे बंध

ही शृंगापत्ती अधिक स्पष्ट करण्यासाठी इंग्रजी साहित्यात घडलेली एक ताजी घटना येथे नमूद करणे आवश्यक आहे. 'प्राचीन गीत भांडारा'च्या संपादन-संग्रहणाच्या वेळीच मला जे अस्फुटपणे जाणवले होते ते स्फुटपणे मांडण्याची गरज त्या घटनेमुळे तीव्रतेने लक्षात आली.

'दि ऑक्स्फर्ड बुक ऑफ इंग्लिश व्हर्स; १२५० ते १९००' या उत्कृष्ट काव्यसंग्रहाचे संपादन प्रो० आर्थर क्विलर-कूच (Q) यांनी सन १९०० साली केले. या संग्रहाची नवी आवृत्ती काढायचे काम हेलन गार्डनर यांच्याकडे आले. पण प्रत्यक्षात त्यांचा संग्रह केवळ मूळच्या संग्रहाची सुधारित आवृत्ती न राहता एक नवा संग्रह म्हणूनच तयार झाला. याचे कारण हे की, प्रो० क्विलर कूच यांनी केवळ भावकाव्ये व विरोधाभासी सुभाषिते (Epigrams) यांच्या निवडीवर, त्यांच्या काळातील काव्यसमीक्षेच्या अनुरोधाने, भर दिला. त्यामुळे पोप कवीची कविता जवळजवळ बाद झाली; ड्रायडन, बायरन, टेनिसन व ब्राउनिंग यांची फक्त भावगीतात्मक काव्ये तेवढी निवडली गेली; आणि परंपरेने चालत आलेल्या औपरोधिक, व्यंगोक्तिपूर्ण, राजकीय, पत्रात्मक व नीतिबोधपर-सुभाषितात्मक कविता पार दुर्लक्षिल्या गेल्या. पण इंग्लंडमधील काव्यकल्पना सन १९०० नंतर फारच व्यापक झालेली असल्यामुळे आणि कवी व त्यांची वैयक्तिक (सुटी-फुटकळ) काव्ये यांबाबतची धारणा बदललेली असल्यामुळे पूर्वीच्या संग्रहात न आलेली 'यूलिसिस', 'माय

लास्ट डचेस' व 'डोव्हर बीच' यांसारखी (अनुक्रमे टेनिसन, ब्राउनिंग, अर्नोल्ड यांची) काव्ये नव्या संग्रहात न घालण्याचा विचारही कोणाला कसा येणार ? हेलन गार्डनर यांच्या अशा दृष्टीमुळे त्यांचा संग्रह 'दि न्यू ऑक्सफर्ड बुक ऑफ इंग्लिश व्हर्स' या नावाने नवा, वेगळा संग्रह म्हणून सन १९७२ साली प्रसिद्ध झाला. (हेलन गार्डनर बाईंनी आपल्या याबाबतच्या प्रतिक्रिया या संग्रहाच्या प्रस्तावनेत दुसऱ्या परिच्छेदात नमूद केल्या आहेत. हेलनबाई ऑक्सफर्ड विद्यापीठातच प्राध्यापक आहेत.)

'प्राचीन गीत भांडारा'तील काव्यांचा संग्रह करताना काही कूटगीते, काही वर्णनपर गीते अपवादात्मक रीतीने निवडलेली होती. पण तरीही त्यासारख्या अनेक कृती संग्रहाबाहेर राहिल्या होत्या. त्यात अनेक मनोरम कूटगीते, भारुडे-सोंगगीते, उपरोधकाव्ये, सृष्टिवर्णनपर गीते, राजकीय-सामाजिक स्थितिदर्शक कवने, पौराणिक-दंतकथात्मक कथाकाव्ये, पत्रात्मक 'प्रकरणे', 'किल्ल्या'सारखी रूपके, कथनपर काव्ये इत्यादी काव्यप्रकार आहेत. यांपैकी बहुतेक सर्व महत्त्वाची कूटगीते, काही निवडक भारुडे, 'प्रकरणे', आणि विशेषतः रामदासांच्या स्फुट रचनांतली बहुधा नजरेआड होणारी नादरंगांच्या संवेदनांची कवने प्रस्तुत 'मंजूषे'त साक्षेपाने समाविष्ट केली आहेत. अर्थात बहुतेक सर्व लोकप्रिय व रसाळ भजनी पदे, अभंग, आरत्या-स्तोत्रादिक कवने यांची संख्या या संकलनातही सर्वाधिक आहे हे स्पष्ट आहे. हा भागही प्राचीन-मध्यकालीन जाणिवा-संवेदनांचा कानोसा घेणारा आहे व त्यात भक्तिपर रचनांचा वाटा फारच मोठा असल्यामुळे असे होणे स्वाभाविक आहे. पण या भावकाव्यात्म रचना वगळता ज्या अन्य रचना समाविष्ट केल्या आहेत त्यांचे नियमन वा गुणग्रहण त्यांना रसांच्या साचेबंद व्यवस्थेत मारून-मुटकून बसवून करू जाणे म्हणजे त्यांच्यातल्या काव्यसौंदर्याकडे पाठ फिरविणे होईल. शिवाय ती काव्ये 'अधम' कोटीत ढकलून कार्यभाग साधण्यानेही हेच करंटेपण पदरी पडणार. कारण या रचना त्यातील सूचित वा वर्णित भावार्थावरच फक्त निर्भर नाहीत, त्यांचे रचनाबंधही लक्षणीय आहेत.

खरोखर सर्वच तऱ्हेच्या कवितेला आकारबंधाच्या संदर्भापलीकडे नेऊन केवळ रसभावाच्या साच्यात ठोकून बसवण्याचे कारण नाही. आधुनिक काळच्या काव्यांच्या समीक्षणात ही रसपरिभाषा बहुधा दुर्लक्षिली जाते. पण जुन्या काव्याच्या समीक्षणाच्या वेळी पुन्हा रसपरिभाषेचा आसरा घेतला जातो. त्याचे एक कारण हे आहे की त्याकाळी 'रसात्मक वाक्य ते काव्य' ही काव्यकल्पना प्रबळ होती; भक्तीला रसाचे स्थान शास्त्राने देण्यापूर्वीच संतकवींनी व त्यांच्या संनिष्ठ श्रोत्यांनी तिला रसपदवीप्रत नेले होते. इ०स०च्या सोळाव्या शतकातही उत्कट भक्तीच्या रंगात सर्वथैव रंगून गेलेल्या भक्त-पंडितांनीच भक्तिरसाचे विवेचन व मंडन केले व काव्यशास्त्रात त्याला नव्या अकराव्या रसाचे स्थान प्राप्त करून दिले. पण असे असले तरी इसवी सनाच्या विसाव्या शतकाच्या अंत्य चरणातल्या साहित्यसमीक्षेने अवश्य तेथे तरी रसबाह्य काव्याकडे व आकारबंधाच्या वैशिष्ट्यपूर्णतेकडे लक्ष देऊन प्राचीन-मध्यकालीन काव्यांचे समीक्षण करणे क्रमप्राप्त आहे.

इ०स०च्या तेराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत मराठी

काव्यातली प्रधान भावच्छटा भक्तीची होती. तिला जोडून भक्तिकाव्यात श्रृंगार आला आणि गोपीगीतांतील विराण्या व कृष्णगीतांतील यशोदाकृष्ण गीते यांतला अनुक्रमे विप्रलंभ व वत्सल हे रसभाव वगळले तर त्यात दैवताला मानवी भावभंग अर्पून किंवा आरोपून मानवभक्ताने त्याच्याशी श्रृंगारच केला. अगदी अभिसारिका नायिका व तिच्यामुळे सूचित अशा परपुरुषसंगाच्या घटनाही त्यात आल्या. फक्त 'पर' पदावर श्लेष करून देवाचे अलौकिकत्व ध्वनित केले जाई आणि मग 'देवताविषयक रती' हा तिथला स्थायी ठरवून तेथील रसाला भक्ती हे नाव देत. अनौरस संततीला दत्तक म्हणून घेऊन सोज्ज्वळ बनविण्यासारखाच हा प्रकार. अनौरस (अजन्मा, अयोनिसंभव) अशा देवतेला आधी नरदेह द्यावयाचा, त्याच्याशी (मानसिक?) संग करायचा आणि मग त्याचे स्पष्टीकरण म्हणून मानवदेही देवतेला पुन्हा दैवी पद देऊन अवैध श्रृंगाराला भक्तीचे रूप देऊन 'वैध' बनवायचा! यातली विरोधाभासाची गंमत सोडली तरी भक्तिरसाच्या बैठकीतली मौलिक विसंगती त्यामुळे समर्थन पावत नाही.

वेदकाळातल्या सूक्ष्मदर्शी ऋषींनी निसर्गाच्या विविध रूपांत दैवते पाहिली. पौराणिक काळातल्या कवींनी दैवी रूपात वर्णिलेल्या देवांना मध्ययुगीन भक्तांनी मानवीच बनविले; अंशावतारी-पूर्णावतारी देव मानवीय मनोविकारांनी पछाडले गेल्यासारखे दाखविले! आत्यंतिक कोटीतली शक्तिपूजा व राधाभक्ती यांच्या संप्रदायात उद्भवलेल्या अनाचारां-वर जणू या भक्तिरसस्थापनेने सफेद्याचा हातच फिरला! कदाचित अशा तऱ्हेच्या प्रतिक्रियेमुळेच कर्मठ पंडितांनी भक्तिरसाला काव्यमीमांसेत स्थान द्यायला का-कू केले असावे. 'पर'तत्त्वस्पर्शाचा हा एक अत्यंत स्थूल प्रकार असला तरी त्यामुळे काव्यात रंगत आली, फुलोरा फुलला, मुग्ध-विप्रलंभ (व क्वचित संभोग) 'भक्ती'च्या आर्त-उत्कट छटा (श्रृंगाराच्या बदल्यात का होईना) रसिक वाचकांना व श्रोत्यांना लाभल्या, हा साहित्याचा मोठाच लाभ होय.

पण अधिक उच्च तात्त्विक बैठकीवरून भक्तकवींनी पर-तत्त्वस्पर्शाची काव्ये निर्माण केली. ज्ञानेश्वरीसारख्या विवेचनपर ग्रंथात उपमा-दृष्टांतादी साधनांच्या द्वारे परतत्त्वाचे 'अनुमान' केलेले असते. पण ज्ञानेश्वरादींनीच अत्यंत विलोभनीय अशा प्रतीक-प्रतिमांची योजना करून काव्यमय रीत्या हा परतत्त्वबोध केलेला आहे. 'प्राचीन गीतभांडारा'त अशा आविष्कारांच्या भक्तिगीतांवर विशेष भर दिलेला होता. ज्ञानदेवांचे 'मोगरा फुलला' हे गीत तर अशा गीततत्त्वाचे 'अणोरणीयान् महतो महीयान्' रूपच होय. निवृत्तिनाथांनी सहज सरळ शैलीत "बिंबीं बिंब एक बिंबलें सम्यक। आपण तिन्ही लोक एक्या रूपें।।" असे प्रथम सांगून मग म्हटले की, "तो कृष्णरूप ठसा गोपाळां लाभला" व निळ्या अंबरातले नीळवर्ण तेज गोपाळांनी 'सहज'-पणे बिंबाकारे हेरले; हा नीळवर्ण परिपाठ (व्यापकतत्त्व) त्या नंदाचिया घरा कृष्णरूपाने आला.

या निळ्या-काळ्या वर्णाचे अप्रूप निवृत्ति-ज्ञानेश्वरांबरोबरच त्यांच्या प्रभावळीतल्या सर्व कवींना होते. नामदेवांच्या 'खेळिया'त साजणीसह सर्वच कृष्णवर्ण होते. रात्र काळी, घागर काळी, कांचोळी काळी, कास कसली तीही काळी, मग तीच सूचकपणे म्हणते, 'मी काळी', कृष्णरूप झाले आहे. चांगदेवांना आनंदवनात भ्रमर झुंकार करताना दिसला, पण

तो 'नाम नाही रूप नाही' असा होता; त्याचा शब्द निमाला, पण रुंझी तेवढी प्रत्ययाला येत राहिली-अस्फुट, अमूर्त, नादरूप. चांगदेव दुसऱ्या एका अभंगात ''निरंजनवनीं केशव फुलला। डोंगर शोभला ब्रह्मगिरी'' असे रूपक योजून अरूप-अव्यक्ताचे उद्‌बोधन सरूप-साकार प्रतीकांच्या योजनेने करतात. नरहरि सोनार 'सूर्य असे गगनीं' या अभंगात सूर्य-मेघ-बिंब या उपमानांनी परमतत्त्वाचे मंडण करतात व पुढे सरळ सांगतात, ''आत्मा अनुभवीं पाहतां। देव दिसे हो तत्त्वता।।'' अशा आडपडद्यातून अनादी, अनंत, अविनाशी, अनाकलनीय, निर्गुण, निराकार, निरंतर अशा परब्रह्म तत्त्वाचे निगमन संतांनी-तत्त्ववेत्त्यांनी केले. (ही सर्व स्थळे 'प्राचीन गीतभांडारा'मध्ये आलेली आहेत.)

पण या व इतर भक्तकवींनी काही कूटगीतात्मक रचनांच्या द्वारेही हे 'अनिवेद्य' तत्त्व निवेदन करण्याचा प्रयास केलेला आहे. या कूटगीतांपैकी दोन गीते 'प्राचीन गीतभांडारा'त नमुन्यादाखल दिलेली आहेत. : (१) 'मुंगी उडाली आकाशीं' ही मुक्ताबाईची कूटात्मक अभंगरचना (क्र० ३३); (२) 'नवल वर्तलें, नवल वर्तलें' (क्र० ६३) हे जनाबाईचे पद. या रचनांमध्ये असलेला भावार्थ अमूर्त 'भावा'चा आहे, देहांतर्गत रसभावाचा नाही.

जुन्या कूटात्मक गीतांतील काव्यात्म तत्त्व

या मध्ययुगीन मराठी काव्यांत प्रत्यक्ष रसभावाचा स्थायी नसताही अप्रत्यक्ष (व मारून मुटकून) परम सत्याशी संबंध सांगणारी जी काव्ये आहेत, त्यात कूटेतर काव्येही आहेत. नीतिधर्माचा उपदेश सरळसोट पद्धतीने करणारी काव्ये, भोवतालच्या सृष्टीचे दृश्य वर्णीत असताही त्यात शेवटी देव दाखविणारी कवने, या दृश्य सृष्टीप्रमाणेच नादसंवदनेला सुखद वाटणारी वर्णने करतानाही नादब्रह्माचा साक्षात्कार अनुभवणारी गीते, फुलांचा गंध व मृत्तिकेचा स्पर्श यांची सुखद संवेदना व्यक्तवीत असता गंधमय-स्पर्शात्मक अनुभूतीच्या द्वारे अव्यक्त सर्वव्यापी ब्रह्म पाहिल्याचा आनंद प्रकट होतो या भावनेने निर्माण झालेली काव्ये खूप आहेत. शिवाय सरळसरळ वेदांताचा युक्तिवाद आश्रयाला घेऊन ब्रह्मतत्त्व विशद करतो असा विश्वास, अशी श्रद्धा दर्शविणारी स्फुट रचना अमाप आहे. अशा सरळ 'तत्त्व'वर्णनपर एकशे चार रचनांत निदान पन्नास-एक अभंग व वीस-एक गीते तरी आहेत. याशिवाय सरूप-साकार परमेश्वराचे वर्णन तर बहुतेक सर्व भक्तिकाव्यांत असते. पण या सर्वांपेक्षा विरोध-विसंगतीच्या आधाराने कूटप्रश्न किंवा कूट विधाने दर्शविणारी काव्ये विशेष लक्ष वेधणारी आहेत. सोंगे किंवा इतर उपमाने यांच्या साहाय्यानेही परतत्त्व सूचित करणारी काव्ये आहेतच व तीही लक्षणीय आहेत.

पण काव्यात निर्गुणाचे सूचन होत नसेल तर ते काव्यच निर्गुण मानणे, किंवा सगुण-निर्गुण देवत्वाचा (किंवा मानवीय भावांचाही) सरळपणे ध्वनी गवसत नसेल तर ते काव्य अधम काव्य लेखणे, हे नेहमी योग्यच ठरेल असे नाही. जर आकारबंधात रम्यत्व असेल, मांडणीत कौशल्य असेल, किंवा पदरचना सूचक असेल, तर तेथे ध्वनित काव्य असण्याचा फार संभव असतो. सगळेच ध्वनी रसध्वनी नसतात आणि रसभावसूचक ध्वनी नसेल तर तेथे श्रेष्ठ काव्यच नाही असे समजण्याने आपण आकारसौंदर्याकडे दुर्लक्ष करतो.

'स्फोट' या कल्पित 'आदर्श' शब्दाचे स्फुट रूप शब्दमयच असते. तो 'स्फोट' काही अशब्द निर्गुणाचा किंवा शरीरातीत रसभावाचा नसतो. या स्फुट शब्दाचा किंवा नादाचा शारीर-संवेदनांशी संबंध असतो, त्यांच्या प्रतिसादांनुसार त्या नादाला सार्थत्व किंवा अन्वर्थकत्व येत असते. अशा नादांना असलेल्या सार्थत्वाला आजचे भाषाशास्त्र संकेतजन्य सार्थत्व मानते. हा शब्द-संकेतांचा समन्वय अन्योन्याश्रयी असतो व म्हणूनच शब्दांच्या या मौलिक सामर्थ्याचे भान असणे काव्याच्या प्रतीतीला अवश्य असते. ज्या काव्यात रसभाव वा परतत्त्वस्पर्श नाही असे वाटते तेथे – ती काव्ये संतांनी लिहिली असली तरी – देवरती असलीच पाहिजे असे मानण्याचे कारण नाही व ती ओढून-ताणून, मारून-मुटकून त्यात बसवण्याचेही कारण नाही; त्यावाचूनही रचनेत सुंदर काव्य असू शकते.

कूटप्रश्नात्मक काव्याची गरज त्या काळी रूढ असलेल्या विश्वोत्पत्तीच्या, विश्वकारणाच्या उपपत्तीमुळे निर्माण झाली. उपनिषद्-साहित्यातले विश्वदर्शन ज्या विस्मयकारक बौद्धिक प्रतीतीतून झाले तिच्यामागे अणुवादाची मीमांसा होती. कणादापासून आइन्स्टाइनपर्यंतच्या विचारवंतांना अणु-परमाणूंच्या शक्तीचे भान झाले. कणादाचा अणू म्हणजे आजचा अणू (atom) नसेलही कदाचित; म्हणजे त्यामागील संकल्पनेत फरक असेल. पण प्राचीन उपनिषत्कालातला प्रज्ञावंत जेव्हा म्हणतो की या सृष्ट-भौतिक विश्वामागील वा विश्वामधील चैतन्य ''अणोरणीयान् महतो महीयान्'' आहे, (कठोपनिषद्, २-२०) तेव्हाच त्याने अणूचे सामर्थ्य सूचित केलेले आहे. अनंत सूर्यमाला व विश्वद्वीपे यांच्या मागचे सूक्ष्म भौतिक तत्त्व अणू किंवा त्याचे घटक विविध विद्युत्-अणू-परमाणू होत हेच जणू त्याने याद्वारे सुचविले. पुढच्या वेदांताने याच मूलभूत संकल्पनेचा माग काढला. गीतेत कृष्ण भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूपदर्शन घडविल्याचे वर्णन आहे आणि 'भागवता'तही बालकृष्णाने यशोदेला विश्वरूपदर्शन घडविल्याचे प्रसंग आहेत. गीतेत तर 'ऊर्ध्वमूलं अधःशाखं' अशा अश्वत्थाचे प्रचंड रूपक ''ऊर्ध्वमूलोऽवावशाखः अश्वत्थः सनातनः'' (कठोपनिषद्, ६-१) या कल्पनेच्या अनुवादरूपाने आले आहे. अलीकडच्या काळातील अणुस्फोटांची छायाचित्रे पाहिली की अशा काहीतरी विस्मयकारक अगम्य अनुभूतीचा दाखला पटतो.

जुन्या संतांच्या पुढे उपनिषदे होती, गीता हा तर त्यांचा महद्ग्रंथ होता, आणि भागवतातल्या कृष्णलीलांचे अपार कौतुकही त्यांना होते. परम विस्मयदायी कल्पनकांचा स्वामी ज्ञानदेव याच परंपरेत वाढलेला होता. त्यामुळे 'इवलेसे रोप' विस्तारून 'गगनावेरी वेलु गेला' असे जेव्हा तो म्हणतो तेव्हा ह्याच संकल्पना कार्यरत होत्या. त्याचेच दुसरे कल्पित आहे 'तुझिये निढळीं कोटि चंद्र प्रकाशे' हे. यात विश्वरूपाचेच दर्शन आहे. आणि याच ज्ञानदेवांनी 'घनु वाजे घुणघुणा' म्हणून अस्वस्थ झालेल्या गोपीच्या तोंडून कृष्णाचा धावाही केलेला आहे. अंतर्बाह्य कृष्णरूप झालेल्या गोपींशी ज्ञानराजाचे मनोमन तादात्म्य झाले, कारण गोपींप्रमाणेच ''बापरखुमादेवीवरें.. मज ऐसें केलें''. ज्या कोणाला वाटत असेल की ज्ञानेश्वरी सांगणाऱ्या महान गंभीर मनाला 'पैल तो गे काऊ कोकताहे' यासारखे काही (क्षुद्र!) स्फुरणेच शक्य नाही, त्यांच्या समजशक्तीच्या मर्यादा त्यामुळे कळतात; ज्ञानेश्वराच्या गाढ विश्वधारणेच्या नव्हेत!

ज्ञानदेवांनी आपल्या एका रूपकगर्भ 'खेळिया' गीतात सांगून टाकले आहे :

अकल्पित द्रुम आजि संयोगें घडलें।
अपार आपणातें विसरलें गे माय ।।
महुरलें महुरलें मन माझें मोहरलें।
भक्तिफळासि कैसें आलें गे माय ।।
देठींहुनी सुटलें पुढतिं जीवनासि आलें।
बापरखुमादेवीवर विठ्ठलें ऐसें केलें गे माय ।।

('प्राचीन गीतमंजूषा' पृ० २३)

जे आदितत्त्व 'आपण स्वतः अपार आहोत' हे विसरून मोहरले, त्यालाच भक्तिरूपी फळ धरले व ते पिकून देठापासून निसटले व अनंत बीजांच्या द्वारे त्याने समग्र जीवन व्यापले. ज्ञानदेवांची स्वतःची चित्तवृत्तीही अपार निर्गुणाकडून सगुणाकडे 'संयोगे' (योगायोगाने) वळली आणि मग ते चित्त कसे अगदी हरखून गेले, नि 'महुरलें महुरलें' म्हणून 'युरेका युरेका'सारखे उद्‌गारत नाचू लागले! ज्ञानदेवांसारख्यांची मने वेगळ्या पातळीवर काम करीत असतात; त्या पातळीचा मागोवा घेणे फार कठीण असते. या सगुण-साकार देवरूपाशी हितगुज करणारे मन, ''कृष्णा हाल कां रे, कृष्णा डोल कां रे। घडिये घडिये गुज बोल कां रे'' म्हणत हुरहुरणारे मन गोपीभावाने देवभेटीसाठी तळमळतही असते आणि द्रष्ट्‌ऋभावाने तेच मन म्हणते :

शब्देंविण संवादु, दुजेविण अनुवादु, हें तंव कैसेनि घडे।

('प्राचीन गीतमंजूषा' पृ० १७)

सुंदर सुरेख ओतिलें, परब्रह्मतेज फांकलें,
तें व्योमीं व्योम सामावलें, नयनीं वो माये!

('प्राचीन गीतमंजूषा' पृ० १७)

आणि त्याच प्रबुद्ध मनाने आपल्या रसिक ज्ञात्या श्रोत्या-वाचकांना कोड्याच्या भाषेत बोलून अगदी धारेवर धरल्यासारखे केले आहे :

कांट्याच्या आणीवर वसति तीन गांव,
दोन ओसाड एक वसेचि ना।

आणि या उखाण्यांच्या माळकेतून वाचकाला घुमवीत ते मन म्हणते :

ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव
सद्‌गुरुवांचुनि फळेचि ना ।।

('प्राचीन गीतमंजूषा'' पृ० २६)

किंवा असे सुचविते की

विरळा जाणे पोहते खुणे, केला मायेसि उवावो हो।

वडाच्या पानीं एक उभविलें देऊळ आधिं कळस मग पाया हो ॥

(सकल संत गाथा, ज्ञा० ७५७)

पण हा ज्ञानी कवी या कोड्यांची उत्तरे देत बसत नाही. तो श्रोत्याला सांगतो की हे ज्ञान म्हणजे खरे प्रतीतीचे ज्ञान, गुरुमुखावाचून किंवा दैवी कृपेवाचून मिळत नसते; म्हणून, बाबा रे, ज्ञानी होण्यासाठी सद्गुरूला शरण जा, विठ्ठलाला आत्मनिवेदन कर. म्हणजे ती गुरुमाऊली वा तो 'कानडा विठ्ठल' तुझ्या हृदयीचा भाव जाणून 'सौरस' अनुभव आणून देईल आणि मग एकदम 'भीतरीं पालटु' होईल. ('प्राचीन गीतमंजूषा' पृ० १७) पुढच्या कूटात्मक गीतात आट्यापाट्याच्या खेळासारख्या खेळाचे रूपक आधाराला घेऊन ज्ञानदेवांनी कोडे टाकले आहे :

आलाडु आडु, पालाडु आडु, मध्यें वाहे पाणी ॥

('प्राचीन गीतमंजूषा' पृ० २५)

या गीतात दोन्ही बाजूंना बांध व मध्ये पाणी आहे; कोणा सीतादेवीराणीच्या साठी हा रामखेळ असावा ! (ही शीतळादेवी तर नसेल ?) तिन्ही संधी (म्हणजे तिन्ही सांजा) खेळ मांडला आहे व सुखद चांदण्यात बरेच खेळाडू खेळताहेत, पण एक मन मात्र खरे देखीत आहे ! जो कोंडीतून सुटेल त्याच्यासाठी खिरीचे भांडे आहे. त्यावेळी :

खेळतां खेळतां नवल पाहे देखणा खिर खाये ।

आपणाला गुह्य सापडले हे तो 'कोणा न सांगे' -- कोणाला सांगत नाही. भोग्याला (भोज्याला -- सीतादेवीला ?) शिवून तो डायीकडे (डावीकडे) उतरतो व कोंडीतून मुक्त होतो. या कूटगीतात विरोधोक्ती वा विसंगतिदर्शन नसून रूपकाश्रय आहे. अर्थ तर निवृत्तिपर वेदांताच्या मंडणाचा आहे हे स्पष्टच दिसते -- ही मायेची कोंडी आहे, संसाराची भुलभुलावणी आहे; वासनांचा चक्रव्यूह आहे. (ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ यांच्या काही प्रसिद्ध कूटगीतांचे परीक्षण या दृष्टीने उद्बोधक व्हावे.)

सर्व कूटगीतकार याविषयी एकेका संज्ञेने कल्पना देतात. 'चिंचेच्या पानीं' या पदाच्या ज्ञानदेवीय संहितेत 'विपरीत कोडे' आहे; मुक्ताबाईने 'मुंगी उडावी आकाशीं' या अभंगात याला 'थोर नवलाव' म्हटले आहे, नामदेवांच्या एका कूट खेळियागीताचा प्रारंभच आहे : ''नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया''! आणि त्यांच्या 'मुंगी व्याली शिंगी झाली' या कूटगीतात म्हटले आहे : ''आम्ही लटिकेनं बोलूं, वर्तमान खोटें'' किंवा 'आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें' जनाबाई तर बेहोष होऊनच पुकारते : ''नवल वर्तलें, नवल वर्तलें !'' नाथांनी स्वतः याला ''नाथाच्या (देवाच्या) घरची उलटी खूण'' म्हणून वर्णिले आहे; तो 'मार्ग उलटा' आहे असेही ते पुढे म्हणतात.

असे संतांनी का सांगावे ? आकर्षक मुखडा तयार करून पद रंगवण्याची ती एक केवळ क्लृप्ती आहे काय ? वेदांताची परिभाषा लोकांच्या कानी त्यावेळी सतत पडत असे. त्याचे विवरण करताना, जी परिभाषा वापरली जाई ती त्यांना कळत असलीच पाहिजे. पण ते सर्वच विवरण मुळातच बुद्धीच्या व संवेदनेच्या पलीकडे असलेल्या व म्हणून

स्वाभाविकपणे अनाकलनीय वाटणाऱ्या सद्वस्तूचे होते. केवळ 'स्वानुभूत्येकमान' असे ते सत्य होते. या सत्याप्रत जायचा मार्गही 'गुह्य' होता व ते सत्यही 'रहस्य'-मय होते. तेव्हा अशा 'गुह्य रहस्या'चे गानमय प्रकटीकरण करताना कवी 'अशक्य ते शक्य झाले' अशा थाटाची, गणितातल्या 'रिडक्शो ॲड अब्सर्डम्'च्या कोटीतली प्रतीके-रूपके वापरून आपले कठीण कार्य आकर्षक व वेधकपणे पार पाडतात. या कठीण समस्यावजा रहस्याकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे काम कोड्याची नि उखाण्याची लौकिक रीत वापरून त्यांनी साधले. पण अगदी ज्ञानियांच्या राजापासून लोककवी दास चांगापर्यंतचे सर्व कूटकवनकर्ते ते रहस्य शब्दांनी उलगडून दाखविण्याचा मात्र प्रयत्न करीत नाहीत — ते करणे अशक्य आहे हे त्यांना प्रतीतीनेच पटलेले आहे. कारण ब्रह्मसाक्षात्कार झाला तरी त्याची ती 'अनुभूती' क्षणकाल असते, जाणीव-नेणिवेच्या मधली ती संधिरेषा असते. तो अनुभव ज्याचा त्याला. शब्दांनी तो व्यक्तविणे असंभव. शिवाय स्वतःच्या सामर्थ्याची मर्यादाही संतांना उमगलेली असते.

म्हणून मग हे संतकवी ज्ञानी गुरूकडे बोट दाखवतात. ज्ञानदेव 'गुरुमहिमा' उल्लेखितात, नामा शिंपी ''सद्गुरुनाथानें दाखविलें'' असे म्हणतो, एकनाथ सांगतात, ''जो जाणे तो गुरूचा बेटा'', चांगा दास शाहीर म्हणतो की हे एक 'नवल' आहे आणि जो आपला कान धरून आपली 'हार' मानतो तो 'गुरूचा पुरा' चेला होय. शेख सुलतान साहेबनाथां(गोपाळनाथां)नी 'गुरुकिल्ली' दाखवल्याचे स्पष्टच सांगतो. ब्रह्मज्ञान हे अंतिम ज्ञान होय; ते शब्दांनी वर्णिता येत नाही, त्याला गुरुकृपा अवश्य असते व ते 'स्वानुभूती'चे ज्ञान संत-महात्म्यांना प्राप्त झालेले असते. अनेक मुमूक्षू साधकावस्थेतून सिद्धावस्थेत गेल्याची उदाहरणे त्या काळी लोकांच्या अवती-भोवती होती आणि लोकांना त्याबाबतीत संपूर्ण श्रद्धा होती. पण लोकांच्यापर्यंत हे ज्ञान पोचायला 'घटपटादी खटपट' — तार्किक प्रश्नोत्तरे, न्यायनिष्ठ अनुमाने, आप्तवचने, वेदवाक्ये यांची सयुक्तिक (की अयुक्तिक?) उपपत्ती — अकळ व कंटाळवाणी वाटते. अशा सर्वसामान्यांसाठी कूटे, रूपके यांच्या साहाय्याने ते ज्ञान 'सोपे' केले जाई!

पण असे हे 'सोपे' केलेले 'दर्शन'ही चांगलेच 'जड' असल्याचे आपणाला जाणवते. आजच्या विसाव्या शतकातल्या वाचकाच्या कानावरून ही ब्रह्मज्ञानाविषयीची काथ्याकूट जात नाही आणि यातली (कूट-रूपकांतली) अनेक प्रतीके व उपमाने त्यांच्या तशी परिचयाचीही नसतात. काही ठिकाणी शब्दसंहतींच्या मूळ अर्थाबद्दलही सकारण मतभेद असतात. पण तरीही ही गीते संतकवींनी लिहिली असल्यामुळे त्याबाबत एक प्रकारची उत्सुकता मात्र आजच्या वाचकालाही असते. म्हणूनच नमुन्यादाखल काही कूटगीतांचे विश्लेषण-समीक्षण करणे अगत्याचे आहे.

१. ज्ञानेश्वरांचे हे प्रसिद्ध कूटगीत भले मोठे आहे. त्यातला प्रारंभाचा भाग असा आहे :

कांट्याच्या अणिवर वसति तीन गांव
दोन ओसाड, एक वसेचि ना ॥ १ ॥
वसेचि ना तेथें आले तीन कुंभार
दोन थोटे एक घडीच ना ॥ २ ॥

या न घडवत्या कुंभाराने तीन मडकी घडवली, त्यात दोन कच्ची व एक न भाजलेले होते; न भाजलेल्या मडक्यात तीन 'मुगे' (तीन मुठी मूग की तीन मूगमुटकुळी) रांधू घातले, त्यात दोन हिरवे राहिले व एक शिजलाच नाही; न शिजलेला 'मुगा' तीन पाहुण्यांना वाढला तर दोन पाव्हणे रुसले नि एक जेवलाच नाही; न जेवणाऱ्याला तीन म्हशी दिल्या, त्यातल्या दोन वांझ व एक फळलीच नाही; न फळलेल्या म्हशीला तीन टोणगे झाले, त्यातले दोन मेले व एक वाचलाच नाही; न वाचलेल्या टोणग्याचे तीन रुपये आले, पैकी दोन खोटे, एक न चालणारा; न चालणाऱ्याला तपासायला तीन नाणेपारखी आले, पण दोन पारखी आंधळे व एकाला दिसतच नव्हते; दृष्टिहीन पारख्याला तीन बुक्क्या मारल्या पण त्यातल्या दोन हुकल्या नि एक लागलीच नाही – आणि असे हे अशक्य शक्य झाल्याची एवढी लांबलचक यादी दिल्यावर शेवटी कवी म्हणतो :

. . . ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव
सद्‌गुरुवांचुनि फळेचिना ।। ११ ।।

यातली सर्व उपमाने-प्रतीके गावोगावी दिसणारी आहेत; व्यवहारात अनेक लोक न घडणाऱ्या गोष्टी घडविण्याची जिद्द घेतात व मग फसतात. 'तीन' ही संख्याही नेहमीची व्यावहारिक आहे. त्रिवार उक्ती सत्यदर्शक; गोष्टीत शहाणे तीन; एकत्र जाणे अशुभ हे सांगताना येते 'ब्राह्मणत्रय'; शिवाय 'तीन' ही संख्या तंत्रविद्येत – जादुटोण्यात आणि पौराणिक कथाकीर्तनात आल्याने तिला एक तऱ्हेचे जादूचे वलय आलेले! ज्ञानदेवांनी या अनेक 'तिनां'चा उपयोग आपल्या गीतात केला आहे. पण मुळात 'एक' आहे व ते सूक्ष्म आहे. काट्याच्या अणीवरून त्याची काही कल्पना आली तर पाहा, म्हणून ज्ञानदेवांनी 'अणी' योजली – आणि 'अणोरणीयान्'शी नादाने व अर्थानेही संदर्भ जोडला; मग सगळे ढोबळ व्यवहारातले दाखले दिले. सर्व भौतिक-व्यावहारिक क्रिया परब्रह्माप्रत पोचण्यास असमर्थ आहेत; कितीही खटाटोप करा, पण तो सगळा व्यर्थ होय. म्हणून सद्‌गुरुरूपी वाटाड्या शोधा, असे ज्ञानियांचा राजा सांगतो! गुरुखूण, गुरुकिल्ली मिळाल्यावाचून या विश्वाचे कोडे उलगडणे कसे कठीण आहे, एवढे सुचवून ज्ञानदेव थांबतात. संवेदनाजन्य ज्ञानाची मर्यादा ते जाणतात व म्हणून त्यापुढचे ज्ञान 'साधने'ने मिळवण्याकडे वळवा असे ते सुचवतात व गुरूला शरण जाणे हा त्याचा उपाय आहे हेही सांगून टाकतात. 'आलाडु आडु०' या कूटगीतात तर ज्ञानदेव स्पष्टच सांगतात की या आट्यापाट्यांच्या खेळाचे रूपक योजून मी जे सांगत आहे (सुचवीत आहे) ते केवळ गुरुकृपेमुळे होय :

. . . भोगिया शिवोन उतरला डायीं।
ज्ञानदेव सांगे निवृत्तीच्या पायीं ।।

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० २५)

'निवृत्तीच्या पायीं' ('पायात' असा प्रयोगही रूढ आहे) म्हणजे निवृत्तीपाई – निवृत्तीनाथां-मुळे हे मी एवढे तरी सांगू शकत आहे!

गीताचा सम्यक् अर्थ शब्दशः लावणे अशक्यच आहे – व जे ज्ञानदेवांनी टाळले ते

आपण करू बघणे वेडेपणाचेही वाटेल! पण तरीही बुद्धी चाळवली गेल्यावर विचार येतातच! (ज्ञानेश्वरांना अभिप्रेत कार्य हेच असावे!) म्हणून थोडी धडपड करू या.

'कांट्याच्या अणी'ने गीताला प्रारंभ होतो. सूक्ष्मात् सूक्ष्मतर अशा सत्-वस्तूचे हे प्रतीक-उपमान. 'सत् एव इदम् अग्रे आसीत्।' त्याच्या अणुरूपाचा विस्तार तीन रूपांत पाहिला : पुरुष, प्रकृती, माया. हे कशासाठी ? त्याचे उत्तर पूर्वी उपनिषदांनी दिलेच आहे. (''स (आदिरूपः) ऐच्छत् बहुस्यां प्रजायेय।''.) पण मूळ ब्रह्माच्या तुलनेने ही सुटी त्रिरूपे अभावात्मकच! अणीवर तीन गावे, पण दोन ओसाड. पुरुष-प्रकृती स्वतः निर्मितीक्षम नाहीत, तिसरे गाव – माया – वसूनही न वसल्यासारखे, क्षणदृष्टनष्ट, क्षणभंगुर! या मायारूपी न वसणाऱ्या गावात तीन कुंभार आले. ब्रह्मा, विष्णू, शिव. त्यातले विष्णु-शिव थोटे म्हणजे निर्मिती न करणारे, रक्षण-संहरण करणारे. तिसरा जो ब्रह्मा तो निर्माता, पण त्यालाही शाश्वत विश्वनिर्मिती करणे अशक्य. या भंगुर निर्मात्या ब्रह्मदेवाने तीन 'लोकां'ची तीन मडकी घडविली – स्वर्ग, मृत्यू, पाताळ. पण त्यातली मृत्युलोक-पाताळ-लोक मडकी तर उघडउघड कच्ची, नश्वर आहेत, फक्त स्वर्गरूपी घट तेवढाच सापेक्षतः पक्का अमर, पण शेवटी तोही नाशिवंतच! अशा तऱ्हेच्या दहा माळका आहेत. सर्वात प्रथम शुद्ध निषेध-नकार, मग अस्तित्वाचा नकार. ही अनुमानमालिका दहाव्या मुक्कामा-वर आली आणि शेवटी 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायाचा-तर्काचा आश्रय घेऊन प्रकरण हातघाईवर आले, बुक्क्या मारण्यावर आले! पण या बुक्क्याही लागेनात – ''दोन चुकल्या, एक लागेचिना''! कारण हा आप्तवाक्याचा-वेदप्रामाण्याचा, बुक्क्यांचा, कोपाचा न्याय (अनुमान) ही फसतो. ''गार्गिमातिप्राक्षीः। मा ते मूर्धा व्यपप्तत्। अनतिप्रश्न्यां वै देवतां अतिपृच्छसि।'' असे याज्ञवल्क्य शेवटी म्हणतोच ना! (बृहदारण्यक, ३.६-१) हे केवळ 'आर्ग्युमेंटम् ॲड बॅक्युलम' होते – बुक्क्यांनी-ठोशांनी मुद्दा गळी उतरवणे होते! ते अर्थातच व्यर्थ ठरते. म्हणून शेवटी, तर्काचा मार्ग सोडून ज्ञानेच्छू साधकाने गुरूकडे जावे आणि गुह्यमार्गाचा मंत्र मिळवून ब्रह्मरहस्य अनुभवावे, असे ज्ञानी कवी ज्ञानदेव सांगत आहेत.

या गीताच्या रचनेत तसा साधेपणा आहे. 'खेळिया' धर्तीचे हे गीत आहे. काटखेळी, कापडखेळी, टिपरीखेळी हे फेर धरून या तऱ्हेची गाणी वेगवेगळ्या स्तरावरील लयीत म्हणतात. शब्दोच्चार जलद निसरडे आहेत, लघुप्रयास म्हणणी उघडउघड दिसते. या बाह्य लयीपेक्षाही अंतर्गत अप्रत्यक्ष लय लक्षणीये आहे. प्रत्येक चरणात 'तीन', 'दोन', 'एक' या शब्दांची आवृत्ती आहे. (याला अर्थात अंत्य प्रदीर्घ चरण अपवाद आहे.) त्यांचा आलेख काढला तर त्यांच्या जागा समांतर स्तरात असलेल्या आढळतील. अंत्य चरणासह सर्व चरणात 'ना' हे पद चरणान्ती येते व प्रथम-अंत्य चरण वगळून राहिलेल्या चरणांत प्रारंभाला त्र्यक्षरी शब्दानंतर तेच 'ना' हे पद येते. याचाही आलेख समांतर आढळेल. प्रथम 'कांट्याची अणी' येते व त्यानंतर गांव, कुंभार, मडकी, मुगे, पाहुणे, म्हशी, टोणगे, रुपये, पारखी, बुक्क्या व शेवटी गुरुकृपा अशी चरणात येणाऱ्या नवनव्या व्यष्टींची योजना आहे. त्यात सूक्ष्म अशी चढती कमान आहे. (त्यांचा अर्थ काही अंशाने मागे स्पष्ट केला आहे.) या समग्र गीतात 'ना'काराला ('न'काराला) प्राधान्य आहे. गुरुकृपेने मिळावयाचा

अनुभव होकारात्मक म्हणायचा तर तेथेही सकृद्दर्शनी 'ना'कार आहेत. हे गीत वाद्याच्या साथीत तालठेक्यात म्हणायचे असले तरी ते नुसते वाचले, गुणगुणले तरी त्याची गुंफण सुबद्ध आहे हे समजते. श्राव्य लय आडव्या ताण्यांची आहे. अप्रत्यक्ष तोल उभ्या ('ना', 'एक', 'दोन', 'तीन', 'ना' या शब्दांच्या स्थानांनी सुमूर्त होणाऱ्या) बाण्याची आहे. या ताण्याबाण्यांच्या विणीतून या गीतपटाचे उत्कृष्ट पोत उपलब्ध झाले आहे. यात सर्व काम शांत, तुलित, लयबद्ध गतीचे आहे. गीताच्या आशयाला प्रमाणाधिक ताण उपकारक होणारा नाही. त्यामुळे गीतातली वर्धमान तीव्रतेची पातळीही अति तीव्र न करता अंत्य चरणात ती गोलाईने आवरलेली आहे.

या गीतातला रस कोणता? मराठीतल्या सर्वश्रेष्ठ संत कवीने लिहिलेले हे गीत आहे. तो संतकवी भक्तश्रेष्ठही आहे. तरीही या गीतात भक्तिरस संपूर्णरीत्या दृश्य असा नाही. फक्त शांतरसाची उपलब्धी यात होते असे कोणी म्हणू शकेल. पण या गीतातही जीवन-प्रपंचजन्य निर्वेदभाव आहे असे मानणे कठीण आहे. इंग्रजी काव्यात सतराव्या शतकातल्या कवींनी जी 'एपिग्राम'वजा कविता 'मेटॅफिजिकल पॅरॉडॉक्स'वर उभारली, तशी काहीशी ही रचना आहे. 'तात्त्विक विरोधाभास' असलेली ही 'वक्रोक्ती' आहे. यातला आनंद आकारनिष्ठ आहे, तो अधिक बौद्धिक आहे व जवळजवळ नहिवत् प्रमाणात भावनिक आहे.

२. दुसरे नमुन्याचे कूटात्मक गीत नामदेवांचे आहे. तेही जुन्या काळापासून लोकप्रिय आहे. नामदेवगाथ्यात तीन पदे कूटात्मक आहेत. त्यापैकी 'राईएवढें पांखरूं' या पदात नाममुद्रा 'नामा शिंपी' अशी आहे. 'नव्हे तेंचि कैसें झालें' या पदात नाममुद्रा 'विष्णुदास-नामा' आहे व 'मुंगी व्याली शिंगी झाली' पदातही 'विष्णुदासनामा' आहे. पण ओवीबद्ध आख्याने मी स्वतः नामा विष्णुदास या एकनाथोत्तरकालीन कवीची मानतो आणि अभंग-पदे वगैरे 'नामा शिंपी'ची मानतो. त्यानेही आपले वर्णन विष्णुदास असे केलेले आहे. नमुना म्हणून घेतलेले पद 'मुंगी व्याली०' हे आहे.

या गीताची सुरुवातच वेधक झाली आहे – मुंगी व्याली आणि पोर कसे झाले तर शिंगाचे ढोर! आता व्यालेल्या गाईला दूध येते तसे मुंगीला किती असेल? तर त्याचे उत्तर : तिच्या दुधाने सतरा रांजण भरले आणि ते बारा हत्तींना प्यायला पुरले!

> मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती।
> सतरा रांजण भरून गेले, पेले (प्याले) बारा हत्ती ॥ १ ॥"

आणि ही काहीतरी लोणकढी थाप किंवा हे कपोलकल्पित आहे असे श्रोत्या-वाचकांना वाटेल अशा जाणिवेने नामदेव त्यांना म्हणताहेत :

> आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें ॥ ध्रु० ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ४५)

या पदातही वरवर लटके-खोटे वाटणारे दाखले आहेत पण अर्थातच त्यांचा एक वेगळा अर्थ अभिप्रेत आहे. नामदेवांच्या पदाची वीण ज्ञानदेवांच्या पदाहून वेगळी आहे.

नामदेवांनी रानातल्या प्राणिमात्रांचे दृष्टांत घेतले आहेत. हे सर्व प्राणी सर्वांच्या माहितीतले आहेत व त्यांची खाण्या-पिण्या-वागण्याची रीत लोकांच्या परिचयाची आहे. पण या दृष्टांताच्या आधीची ओळ आहे –

लटिकें गेलें फटकें, तेथें गाडग्याएवढे राळे।

हे लटके वाटणारे एकदा 'फटके' झाले, स्पष्ट झाले, म्हणजे पुढचे सर्व सरळ वाटेल. हे बाह्यतः 'लटके' वर्तमान ज्या 'फटका'त आहे, आवारात आहे, तेथे विलक्षण घटना घडत आहेत. तेथले राळे (सूक्ष्म, लहान प्राणी) गाडग्याएवढे मोठे; चिमणी उडता-उडता चरते नि तिचे डोळे वाडग्याएवढाले आहेत! या 'फटका'त शेळी घुसळण करते व मांजर लोणी काढते! आणि ताकाने भरलेल्या गोणी-पखाली घेऊन उंदिरमामा देशोदेशी चालले आहेत. कासव पाण्यात गाते, कोल्हा वनात नाचतो, आणि सावज (हरण?) घाबरण्याऐवजी हरखते, खोकड (तरस?) पुस्तक वाचते. कातणीच्या – कुंभारीण माशीच्या – घरी लग्न होते, तर तिथे सरडा कणिक तिंबवतो व बागूल निष्फळ (वंध्या) असूनही कण्या 'परणी'त आहे. पाखडीत आहे, घुबड मांडे भाजीत आहे; मग आवाराच्या आणखी वेगळ्या भागातले नवल नामदेव सांगतात :

बाभुळीचे खोडीं, माशाने केलें कोटें।
सशाने सिंह ग्रासला, बेडुक आले लोटें॥ ६ ॥

पण नामदेवांनी पदाचा शेवट मात्र ज्ञानदेवापेक्षा वेगळ्या थाटात केला आहे,

विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याती।
लटिकें म्हणतील त्यांचे पूर्वज नरका जाती॥ ७ ॥

याप्रमाणे या विविध प्राण्यांची 'ख्याती' ऐका असे म्हणून नामदेवांनी शापवाणी उच्चारून म्हटले आहे की या सर्व 'ख्याती'चा – वर्णनाचा गर्भितार्थ समजून न घेता जे उगाच म्हणतील की, हे सगळे लटके आहे, खोटे आहे, त्यांचे पूर्वज नरकाला जातील – वंशज ज्ञानी न निघाल्यामुळे पूर्वजांना नरकवास भोगावा लागेल. तेव्हा यातला गूढ अर्थ समजावून घ्या आणि कृतार्थ व्हा.

या पदातील दृष्टांतात 'अशक्य ते घडले' असे दर्शवून मनाला धक्का देण्याचा प्रयत्न आहे. यात एखादी 'उलटी खूण' पाहून अद्वैत-सिद्धांताच्या मंडणातल्या अनुमानांच्या – न्यायतर्काच्या – संदर्भात अर्थ सुचवायचा, ज्ञानदेवांच्या एवढाही सूचक-प्रयत्न दिसत नाही. केवळ 'अशक्य शक्य होते', बाह्यतः ते अशक्य वाटले तरी ते परमार्थाने असंभाव्य नसते, एवढाच मथितार्थ त्यातून घेणे शक्य आहे.

पण 'राईएवढें पाखरुं' या पदात नामदेवांनी वेदान्ती रूपक अधिक स्पष्ट केले आहे. हे पाखरू अतिसूक्ष्म, राईएवढे आहे व असे असून त्याने विराट विश्व व्यापले आहे :

राईएवढें पांखरुं, त्रिभुवनिं त्याचा फेरा रे।

त्या पाखराला बत्तीस मुखें आहेत, अकरा लोचन आहेत, खूपशा (फारा) चोची आहेत. असा त्या परमहंस पाखराचा व्याप –

पिंडीं आणि ब्रह्मांडीं म्हणती दशवे दारीं रे ॥ ४ ॥

सर्वत्र आहे. त्याचे रहस्य नाम्या शिंप्याला कोणी सांगितले?

त्याचियेनी अंगसंगें सद्‌गुरुनाथें दाखविलें रे।
त्याचियाची प्रसादें नाम्या शिंप्यानें गाइलें रे ॥ ५ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ४५)

नामदेवांच्या तिसऱ्या कूटमय पदात प्रारंभीच तेवढे विरोधाभासी कोडे आहे व पुढे पौराणिक दाखले आहेत:

नव्हें तेंचि कैसें झालें रे, खेळिया, नाहीं तेंचि दिसूं लागलें रे।
अरूप होतें ते रूपासी आलें जीवशिवनाम पावलें रे ॥ १ ॥
आपलीच आवडी धरून, खेळिया, आपआपणातें व्यालें रे।
जोपनाकारणें केली बायको, तिनें एवढें वाढविलें रे ॥ २ ॥

ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें जाणुनि खेळ खेळें रे ॥ ध्रु० ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ४३-४४)

नंतर एक द्विपदी सोडून पुढे कार्तिकेय, ब्रह्मा, हनुमान, गोपालकृष्ण, रामचंद्र व इतर खेळियांची वर्णने आहेत; ती लोकोक्तींनी भरलेली आहेत व आकर्षकही आहेत. क्र० ३ च्या द्विपदीत वर्णन आहे ते जरा वेगळे आहे:

ब्राह्मणाचें पोर एक खेळासि भ्यालें तें बारा वर्षें लपालें रे।
कांपत कांपत बाहेर आलें तें नागवेंचि पळून गेलें रे ॥ ३ ॥

हे वर्णन बालज्ञानदेवाचे असेल काय? की नचिकेताचे? ज्ञानेश्वरांनी तपश्चर्या केली व ते निर्लेप राहून समाधिस्थ झाले. पण ते भ्यालेले नव्हते. नचिकेताने पुनः पुनः मृत्यूचे रहस्य समजण्यासाठी तप आचरिले, पण तो अदृश्य झाल्याचे व भ्याल्याचे वर्णन उपनिषदात नाही. हा ब्रह्मजिज्ञासू ब्राह्मण शिशू शुकाचार्यही असेल. त्याने ब्रह्मलीलेचा खेळ ओळखला व तो 'खेळिया' झाला.

नामदेवाच्या गीतात आकारबंधाच्या तांत्रिक दृष्टीने लक्षणीय आहे ते त्याचे सरळपण. गीताचे आकर्षण त्यातला विरोध-विसंगतीचा आविष्कार हे आहे. गीताची लयही लोकगीताला धरून आहे, वातावरण व शैली ग्रामीण आहे. मुख्य हे की यात रसध्वनी नसूनही अर्थध्वनींच्यामुळे गीत वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण वाटते. या रचनेत गीतगुंजन सविशेष आहे, गूढगुंजनापेक्षाही! बाकी दोन गीतांतही रचनेचा सघनपणा (compactness), कुसरीची वीण-गुंफण ज्ञानदेवी गीताच्या तुलनेने कमी आहे. पण खेळिया गीताचा लयबद्ध, आंदोलित गतीचा जोरकसपणा, त्याच्या ओबडधोबडपणावर मात करतो.

३. एकनाथांचे 'चिंचेच्या पानावर देउळ' हे गीत तर अत्यंत प्रसिद्ध असे कूटगीतांचे प्रातिनिधिक गीत आहे. ज्ञानेश्वरांच्या नावावरही असे एक गीत आहे. त्यातले प्राथमिक कडवे सारखे आहे, पण ध्रुपदाच्या 'मेलापक' चरणात 'परियेसी'बद्दल 'प्रसिद्ध' असा शब्द आहे; पुढची कडवी वेगळी आहेत. त्यात "संतजना-महंतजना तेथिल गुज गोड रे।।" असे सांगून ज्ञानेश्वर म्हणतात: 'अनुभव अनुभवितां कदाचित सरे-पुरेल मनिंचे कोड रे.' पुढे ते असेही सांगतात: "विपरीत गे माय कोडियाची परी।" हे कोडे विपरीत असले तरी ते, 'गुरुगम्य' आहे व त्याची 'काहाणी विरळा सगुण' ऐकतो व मग गुरुकृपेच्या योगे 'सुखसोहळा' 'पाविजेतो'! या ज्ञानदेवीय पाठात 'अनुभव', 'सरे-पुरे', 'गे माय', 'गुरुगम्य काहाणी', 'सुखसोहळा' ही पदे खास ज्ञानेश्वरीय मुद्रेची आहेत. म्हणून तो प्रक्षिप्त न मानता प्राथमिक पाठ म्हणावा. एकनाथांचे गीत अधिक प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. त्यातला पाठ केवळ परिष्कृत न राहता एक वेगळी निर्मितीच झालेला आहे हे सहज कळून येते.

> चिंचेच्या पानावर देउळ रचिलें, आधीं कळस मग पाया रे।
> देवा पुजूं गेलों तंव देऊळ उडालें, परियेसीं सद्गुरुराया रे।। १।।
>
> परियेसीं सद्गुरुराया, खेळिया, परियेसीं सद्गुरुराया रे।। ध्रु०।।
>
> दोतोंडी हरिणी पाणियासी आली ती मुखेंविण पाणी प्याली रे।
> मृगजळ डोहीं पाषाणाची सांगड, वांझेचा पुत्र पोहोला रे।। २।।
>
> आंधळ्याने देखिलें, बहिऱ्याने ऐकिलें, पांगळ्याने पाठलाग केला रे।
> एका जनार्दनीं येकपणें विनवी अखंड रामनाम स्मरा रे।। ३।।
>
> ('प्राचीन गीतमंजूषा'. पृ० ८९)

संपूर्ण गीत सुबक आहे, लयबद्ध आहे. यात प्रथम मुखडाच विस्मयकारक विसंगतीचा आहे – तो ज्ञानेश्वरीय पाठातही तसा आहेच. शिवाय 'वडाच्या पानिं एक उभविलें देऊळ' अशा मुखड्याचेही एक ज्ञानेश्वरीय पद आढळते – (सकलसंत गाथा – ज्ञा० ७५७) पण ज्ञानेश्वरीय पदातले 'प्रसिद्ध' हे पद जाऊन 'परियेसी' हा शब्द 'ऐक'बद्दल आला आहे. तो शब्द चपखल बसलेला आहे, गोलाईचा आकार त्याला आहे. तेच ध्रुवपद होते, पालुपद होते, पुन्हापुन्हा ते म्हणायचे असते म्हणून. मग आणखी 'अशक्य शक्य' गोष्टींची गुंफण: दुतोंडी हरिणी मुखावाचून पाणी पिते! मृगजळ, त्याचा डोह, त्यात भोपळ्यांच्या सांगडीऐवजी धोंड्यांची सांगड, ती बांधून वांझेचा पुत्र पोहतो! आणि हे खोटे, अघटित वाटत असेल तर त्याला साक्षीदार आहेत आंधळा-बहिरा हे! आंधळ्याने ते (पोहोण्याचे कृत्य-पक्षी गुह्यार्थतत्त्व) पाहिले, त्याने सांगितले म्हणून बहिऱ्याने ते ऐकले आणि ते पाहून-ऐकून त्या मृगजळदृश्याचा पाठलाग पांगळ्याने घेतला! सगळेच अद्भुत, अतर्क्य. ते सगळेच 'अगम्य' वाटत असेल तर नाथ उपाय सांगतात: एकाग्र चित्ताने रामनामाचे रटन! या पदात गुरुनामाचा उल्लेख नाही, पण 'कृष्णा एक पांखरूं आहे' या गीतात (नामदेवांचे 'राईएवढें पांखरूं' आठवेल.) त्यांनी गुरू जनार्दनस्वामींच्या कृपेची नोंद केलेली आहे. एकनाथ म्हणतात: ते अगम्य दृश्य ('पांखरूं मुखावीण चारा खाये'

इत्यादींनी वर्णिलेले) मी 'जर्नादनाचे पायीं' पाहिले आहे. 'नाथाच्या घरची उलटीच खूण' या पदात नाथ म्हणतात की हा उलटा मार्ग – ही उलटी खूण जो सद्‌गुरूचा पुरा बेटा झालेला असेल तोच चेला समजू शकेल. ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ८८)

एकनाथांच्या 'चिंचेच्या पानावर' या गीतात केवळ 'अशक्य-शक्य' गोष्टींची यादी नाही. त्यात एक प्रकारची गतिमान क्रिया आहे. प्रथम विसंगतियुक्त विधाने : एक ध्रुपदाला जोडून चिंचेच्या पानावर देऊळ रचण्याच्या संदर्भातले; पुढे, दुसऱ्या कडव्यात, दुतोंडी हरिणीने पाणी मुखाविण पिणे व वांझेच्या पुत्राने पाषाणांची सांगड बांधून पोहणे ह्या संबंधातले दुहेरी विधान-पण 'मृगजळ-डोहीं' या पाणीनिदर्शक विसंगतिपूर्ण पदसंहतीच्याच संदर्भात. त्यानंतर या विसंगतिमय विधानांच्या सत्यतेबद्दल शंका न यावी म्हणून पुरावा – तोही विसंगतिमूलक गोष्टींचा म्हणजे आंधळ्याने पाहणे, बहिऱ्याने ऐकणे, पांगळ्याने पाठलाग करणे वगैरे असंभाव्य क्रियांचाच पुरावा. बस, त्यापुढे याबाबत काही नाही, केवळ रामनाम स्मरण्याचा उपदेश; मात्र तेथे 'येकपणे' (एकत्व चित्ती धरून) रामस्मरण करण्याचा आदेश आहे तो सूचक आहे. याप्रमाणे गतिमान क्रियांच्या परंपरेने – मग त्या अशक्यार्थी का असेनात – एक प्रकारची अंतर्लय प्राप्त होते. ही अंतर्लय गतिमान आहे व तिच्याबरोबर असंभाव्य-विरोधी भावाची किनारही तिला समांतर आहे. अशा या नादगति-अर्थगतींच्या द्वंद्व-प्रतिद्वंद्वाचा विन्यास असल्यामुळे आकारबंधाला एक प्रकारचा ताजेपणा, जिवंतपणा आलेला आहे. तरी या सर्व नादात्म सूचकतेने एखादा रसभाव प्रकट होत नाही, फारफार तर अद्‌भुत असे काही ऐकल्यामुळे आलेला विस्मय तेथे आहे असे म्हणता येईल. बाकी जो वेधकपणा आलेला आहे, जी पकड प्राप्त झालेली आहे, त्यांचे कारण विरोधाभासी व चमत्कृतिपूर्ण प्रतीक-उपमानांचा विनियोग हे आहे.

४. या तीन संतकवींच्या गीतांच्या विस्तृत परीक्षणानंतर मुक्ताबाई, जनाबाई, तुकाराम, बोधलेबुवा व रामदास यांच्या कूटगीतांकडेही वळावे. त्यांची पठडी तीच आहे.

(अ) मुक्ताबाईच्या प्रसिद्ध 'मुंगी उडाली आकाशीं' ('प्राचीन गीतभांडार', पृ० १८) या कूटात्मक अभंगात अघटित घटनाच आहेत. मुंगी उडून आकाशात जाते व सूर्याला गिळते, वांझेला पुत्र होतो, विंचू पाताळात जातो व त्याच्या पायी माथा ठेवून शेष त्याला वंदन करतो, माशी विते नि तिला घार होते (नामदेवगीतात मुंगी विते व तिला शिंगी होते) आणि हा सर्व 'थोर नवलाव' झालेला ऐकल्यावर सामान्य श्रोते चकित झाले, गोंधळले असले तरी पण तो 'देखोन मुक्ताई हांसली' ! गीताचा हा शेवट वेगळा आहे; अगदी स्त्रीसहज आहे ! ज्ञानदेव-नामदेव गुरूला शरण जा म्हणतील, न समजणारांना नरकाची भीती दाखवतील व तुकारामबुवासारखा राकट ग्रामीण तर ते न आकळणाऱ्या मूढांचा अगदी आईमाईवरून उद्धार करील ! पण मुक्ताबाई मात्र हासते, समजून हासते, स्वतःशी हासते. दुसऱ्यांना नव्हे ! हा जाणिवेचा आनंद आहे, प्रतीतीचा हर्ष आहे. या एका वेगळ्या स्पर्शाने मुक्ताबाईच्या कूटअभंगाला आगळा ओप मिळाला आहे.

(ब) जनाबाईचे कूटगीतही असेच आहे. त्याचा आरंभच मुळी हाकाऱ्याचा आहे : 'नवल वर्तलें, नवल वर्तलें'! आणि साधीभोळी जनी लगेच सांगून टाकते – 'नवल गुरूचे

पायीं'. मग पुढे अकल्प्य कल्पिते! कापूर जळाला तरी काजळी (भांड्यावर धरतात तशी) उरत नाही. साखर पेरून ऊस काढला जातो-विपरीत वर्तमान! डोहातले जीवन (पाणी) मरत असता मासोळी त्याला वाचवते! निबर-म्हातारी बायको, तर तिचा भ्रतार तान्हे बाळ-आणि सासरा तर अगदी भोळा-अडाणी. मग भोळ्या-भाबड्या जनीने सांगून टाकले की एवढ्याशा चिंगुल्या, पण मुळात अनाम-अरूप असलेल्या, परब्रह्म चक्रपाणीने सगळ्यांना मोहवून समग्र गोकुळ चोरले, त्यांचे मन संपूर्ण वेधून टाकले, तेथे क्षुद्र गरीब दासी जनीचा काय पाड – 'तेथे कैंची दासी जनी!' ('प्राचीन गीतभांडार', पृ० ३२)

(क) तुकारामाच्या एका 'कोड्या'च्या पदात अगदी वेगळीच रीत आहे. तुकोबा आपल्या श्रोत्यांनाच सवाल टाकताहेत. श्रोते आत्मसंतुष्टपणे, आपण ज्ञानी झालो अशा झोकात प्रतिवाद करीत असावेत म्हणून हा खडा सवाल: "पुसतसें – मी हें माझें ऐसें काई?" पण मी कोण व माझे म्हणजे कुणाचे याचे उत्तर, अर्थातच, श्रोत्यांना देता येत नाही. मग कुणबाऊ तुकोबांचे पित्त खवळते म्हणा किंवा वैताग येतो म्हणा, पण ते परखड भाषेत त्यांना म्हणतात: 'रुसूं नका' – अबोल राहू नका, विचार करा, आत दृष्टी करा आणि तरीही जो 'नुगवे' – (सजाण होत नसेल) – 'तो झवे आपुली आई'! या गालि-प्रदानाने फटकारल्यावर श्रोते सावध होतात, नम्र होतात, तेव्हा तुकोबा म्हणतात, बाबांनो, 'कोडें रे कोडें ऐका हें कोडें'! खरोखर यातले बरेचसे काही उघडे सत्य आहे, 'उगवुनि फार राहे', त्यासाठी दृष्टी साफ पाहिजे, म्हणजे मग कळेल – 'गुंफोनिया थोडें'; गुंतलेले सत्य फार थोडे आहे, गुंतागुंत फार नाही. मग तुकोबा मूळ गुह्य ज्ञान सांगतात; म्हणतात: 'सांगतों हें मूळ कांहीं, न धरावी खंती'! जन्मलेले जगते, मरणारे मरते, हे सर्व प्रारब्धा-हाती. 'ज्यालें जिवो, मेलें मरो, प्रारब्धाहातीं' – म्हणून बाबांनो एक खूणगाठ बांधून ठेवा:

तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं।
नये अंगावरी वायां येऊं देऊं कळी॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२६)

परंतु 'चाल माझ्या राघो' या गीतात मात्र तुकारामाने कोड्याचीच भाषा वापरली आहे. सुरुवातच अगम्य वाटावी – 'चाल माझ्या राघो। डोंगरीं दिवा लागो'! आपल्या जीवरूपी राघूला कवी म्हणतोय, आपल्या डोंगरकपारीतल्या घरात – विजनवासात – आत्मज्योती तेवो; घरदार केले आहे, ब्रह्मांड पसारा वाढवला आहे, पण तेथे 'वर' घरधनीच नाही, म्हणजे दृश्य रूपाने नाही. नंतर कूटोक्ती सुरू होते ' वरावाचूनच्या घरात पाच पोरे आहेत नि ती घरमालकिणीहून (आत्मचेतनेहून) 'थोरे' आहेत, बळावलेली आहेत. या पंच कर्मेंद्रियरूपी पोरांनी बावन्न केळी फन्ना केली. या मोठ्या घरवाल्याने मोठे दुकानही थाटले आहे (वाणी तुकोबाची घरची खूणगांठ!) आणि तेथे (आत्मचेतनारूपी) पट्टराणीच्या ऐवजी पाटाच्या (वासनारूप) बायकोनेच मोठा धांगडधिंगा चालवलेला आहे. दुकान मोठे खरे, पण पैसारुका खोटा, बनवाबनवीचा. पुढचे कूटरूपक एकदम सुटे पडते – जोगी (विरागी) हिजडा आहे, न-पुरुष आहे असे वाटते का? पण तो तर सोळा सहस्र स्त्रिया भोगणारा – सर्व सुखभोगांचा स्वामी आहे! आणि हे सर्व ज्ञान प्रतीतीने

व्हावे म्हणून बुवा सांगतात : 'विठ्ठल-विठ्ठल' हे नाव, हा 'सोपा' मंत्र जपा.

'आम्हा घरीं एक गाय दुभताहे' या पदातही कूटोक्ती आहे. या गीतात वर्णिलेली गाय मोठी अद्‌भुत आहे. तिला एवढा पान्हा आहे की ते सगळे दूध त्रिभुवनात मावत नाही. सात स्वर्ग, सात पाताळांत ती चरत फिरते. वासराच्या ओढीने जाते म्हणावी तर वासरूच नाही आणि कोणीही भलत्यासलत्याने भावुकपणे थोपटली, निगा ठेवली तर ती त्याच्याबरोबर जाते व त्याच्या भक्तिभावाचा भरिभार मोबदला देते. ही गायरूपी माय सर्वांना पान्हा देते; त्याने सनकादिकासारखेही परमसंतोष पावले, मग माझी ती भूक किती ? पण तुकोबांनी या पदात दुसऱ्याच कडव्यात उपमानभूत गोमातेचे मूळ रूप सांगून टाकले – 'वान ते सांवळी, नाम ते श्रीधरा।' रंगाने काळी सावळी (कृष्ण) आहे आणि तिचे नाव आहे 'श्रीधरा' – श्रेयस् धारण करणारी – देणारी जगज्जननी ! ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२७)

(ड) माणकोजी बोधले यांचे एक गीत या कूटगीत परंपरेतलेच आहे. 'सासूची सून एक पानिया गेली.' पहिल्या चरणात विरोधोक्ती नाही, पण पुढे दुसऱ्या चरणापासून विरोधाभास सुरू होतो. चिडलेली सून रागारागाने पाणियासी जाते – किंवा आत्मरंगात रंगून बेहोशीने जाते आणि साधारणपणे अशा व्यवधानात घागर फुटते व फुटकी घागर घेऊन सून परत घरी येते; पण येथे मात्र सुनेने पाणीच फोडले आणि घागर तशीच आणली ! बायलीने भ्रताराला मारले व ती भावाबरोबर (भाऊजीबरोबर ? ते त्या काळी वारंवार घडे !) निघून गेली ! बापाची बाईल पुत्रानेच पळवली. (पुत्राची सख्खी आई ? कारण तरुण सावत्र आईबरोबर तरण्या पोराने घर मांडणे त्या काळी तसे अपवादाचे नव्हते !) मग बोधलेबुवा सांगतात, "ऐक रे, खेळिया, नवल जालें। नाहीं ते डोळां देखिलें रे।" नामदेवांनी नाही का खेळियाला म्हटले, "नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया ?" लगेच बोधलेबुवा खूणगाठ मारतात : "खेळियांनो, बाबांनो, मला हे सगळे गुरुखुणेमुळे ओळखता आले आणि ते देखिल्यावर – प्रतीती आल्यावर – ते परब्रह्म दूर न राहता, अगदी जवळचे झाले :

> बोधला म्हणे गुरुखुण ओळखिलें।
> देखोनि जवळ जालें रे, खेळिये।

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १४६)

(इ) रामदासांनी अशी कूटात्मक गीते फारशी लिहिलेली दिसत नाहीत. अर्थात वेदान्ती परिभाषेतली रूपके त्यांच्या कवनांत आहेतच. नाही म्हणायला एक कूटात्मक अभंग उपलब्ध आहे – 'चित्त देऊनी ऐका रे। पोहणार पडिला धारे ॥' मनाचे जे 'मूळ', उगमस्थान, त्याकडे जीवन वाहते आहे – 'उफराटें.' सागराकडे नव्हे, तर उगमाकडे ! आणि शेवटी समर्थ सांगतात :

> उगमासी संगम जाला। रामदासीं शब्द निवाला॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १४७)

या कूटोक्तीतला पोहणारा समर्थांच्या अगदी ओळखीचा, दर पावसाळ्यात गंगा-गोदेच्या प्रचंड वेगाने धावत्या प्रवाहात, मध्य धारेला पडून (उडी-बुडी मारून) दूरवर काठाला लागणारा तो आहे; स्वतः हा 'नारायण'च 'समर्थ' होण्याच्या आधीच्या काळात, तसा पोहला असणार! पण या गीतातला 'पोहणार' मात्र खाली वाहत जात नाही, कारण पाण्याचा प्रवाह 'उफराटा' वाहतो आहे, उलटा उगमाकडे जात आहे. पोहणारा नेहमी संगमावेरी खाली जातो, येथे संगम वर उगमाजवळच आहे! पण याचे गुह्य दास सांगत नाहीत, गुरुखूणही उल्लेखीत नाहीत. खराखुरा मामला श्रोत्यापुढे ठेवतात – 'रामदासीं शब्द निवाला!' हे रहस्य उलगडून दाखवायला दासांजवळ शब्द नाहीत, ते निमाले जातात, मुके होतात! सगुण साकाराचे वर्णन दास अत्यंत समर्थपणे करतात : ''हेम अलंकारीं पिवळा-धमक असा सांवळा'' राम त्यांच्या गीतात अनेकदा दर्शन देतो, सावळे सुंदर असूनही रणकर्कश करशरचाप धारण करणारे कोदंडधारी रूप पदोपदी आढळते; भीमरूपी, महारुद्रसमान, सूर्यमंडळग्रासी, वज्रहनुमान त्यात सहजपणे वावरतो; – त्रिकाळ माळा ब्रह्मांडी लवथवत आहेत, तरीही कर्पूरगौर आहे असे 'धवळें शंकराचें ध्यान' दासांच्या परिचयाचे आहे; यांच्या वर्णनाच्या वेळी शब्द निवालेले नाहीत! पण निर्गुण, निराकार, निरालंब अशा परम सत्‌चे वर्णन शब्दांच्या, जाणिवेच्या, संविद्येच्या पलीकडचे आहे, म्हणून तेथे शब्द बापडे काय करणार? आत्मप्रतीतीच्या, समाधीच्या, 'ज्ञपूर्ती'च्या अवस्थेत ते जाणवते, पण त्या अवस्थेत ''शब्द निमाले, अश्रु पळाले।'' हे आधुनिक काळातल्या समर्थ कवीलाही – ज्ञानी कवीलाही – पटलेले आहे. म्हणूनच 'The rest is silence'! असे हॅम्लेटच्या तोंडून सर्वोत्तम द्रष्टा इंग्रज महकवी वदवतो आणि म्हणूनच उपनिषत्कालातले ऋषी 'शांतिः शांतिः शांतिः' असे 'शांतं ब्रह्म' वर्णिताना शेवटी म्हणतात!

मुक्ताबाई, जनाबाई, तुकाराम, माणकोजी बोधले, रामदास आणि इतर अनेक गीतकारांच्या कूटरचनेत विरोधोक्तीची भुलावण असते, वक्रोक्तीतून व्यक्त होणारे काव्य असते; तेथे तांत्रिक रसभाव मारून मुटकून बसवता येत नाहीत आणि तसे बसवण्याचे कारणही नाही.

कूटगीतांचे काव्यात्म दर्शन येथवर घडविल्यावर आता इतर रसभावातीत काव्यांचे दिग्दर्शन.

रूपके-भारुडे व उपरोधकाव्ये

एकनाथांच्या गाथ्यात अनेक तऱ्हेची रूपके आहेत. पण त्यातली कृतिप्रधान, दृश्य हावभावांची गीते येथे अभिप्रेत आहेत. या तऱ्हेच्या रूपकांत 'रूपकां'चा अर्थ फक्त रूपकालंकार नसून 'रूपक' म्हणजे नाट्य किंवा नाट्यातली सोंगे असाही अर्थ तेथे मानावा लागतो. त्याकाळी बहुरूपी-भोरपी अशी सोंगे आणीत. संतमडळींच्या कीर्तनात त्या भोरप्याला 'वासुदेव'रूप येई. हा बहुधा सूत्रधाराचे काम करणारा असावा. कारण चोखामेळ्याच्या 'वासुदेवा'ने या सोंग-संपादणीत कोणकोण प्रसाद मागायला आले आहेत त्याचे वर्णन केले आहे; त्यात जोशी, पंडित, भाट, गोंधळी, डफगाण, बहिरवजोगी,

बाळसंतोषी, बैरागी, फकीर, डाकुलता, कानफाड्या वगैरेंची नावे आहेत. स्वतः वासुदेव दिंडीगान आहे – गाणे म्हणताना दंडी (दिंडी) म्हणजे दांड्याची एकतारी वाजवीत तो येत असावा. (अलिकडच्या काळातही भोरपी, वासुदेव डमरू-डौर वाजवीत येताना खेड्यातून आढळतात.) नट-विट-चेट या त्रयीपैकी विटाचे – म्हणजे लोकरंजन करण्याचे – काम बहुधा हा भोरपी करी. 'मानसोल्लासा'त नाचणपोरीच्या फडातला (योषित् अंगणे') 'महाराष्ट्रो विटः कोऽपि' वर्णिलेला आहे तसाच याचा वेष सोंगाड्या-सारखा : डोक्यात टोपी ('टोपिका'), हातात छडी, मनगटात कडी असा तो 'विट' म्हणजे वासुदेव-भोरपी किंवा पुढचा सोंगाड्या यांचा पूर्वावतारच होय. या नट-नाट्य-सोंगांचा उल्लेख निवृत्तिनाथ-मुक्ताबाईंनी केला आहे. स्वतः एकनाथांनी दिंडीजागरण-दिंडीकीर्तन यांचा उल्लेख करून पुढे सूचकपणे 'नाट' हा ललितासारखा नाट्यात्म प्रकार उल्लेखिला आहे :

प्रथम नाटारंभीं आनंदकदंब। आरंभीं वंदियला ॥ ध्रु० ॥
जय आरंभ हेरंबा। परमानंदें रंगीं नाचे निज शोभा ॥ १ ॥

आणि याच संमिश्र 'अभंगा'त पुढे म्हटले आहे :

नाना अवतार वेषें दावीं तू गमकें।
रंगीं रंगमूर्ति नाचे निज सुखें ॥

(एकनाथ गाथा-४९)

नाटाचा उल्लेख येथे व पुढे तुकारामाच्या अभंगांत आहे; 'ललित' तुकाराम-कानोबा व रामदास यांच्या रचनेत आले आहे. तुकाराम श्री गजाननालाच प्रथम आवाहन करतात. रामदासांचे रंगमूर्ति गणरायाला आवाहन करणारे पद अत्यंत बोलके आहे आणि अनेक-वेळा नृत्यकार मराठी पद म्हणायचे असेल तेव्हा ते वर्णन नमनाला घेतात – अजूनही ! हा रंगमूर्ति हेरंब 'गमकें वेषें' नाना अवतार दाखवितो हा संदर्भ तर फारच अन्वर्थक आहे – दशावतारी वेषांचाच तो उल्लेख वाटतो. मुख्य म्हणजे नाना वेष म्हणजे सोंगे येथे उल्लेखिली आहेत हे विशेष होय. या 'नाटा'मध्ये एकनाथांनी रूपकांनी वर्णिलेली अनेक सोंगे दाखविली जात असणार. बहुधा ती-ती कवने दिंडीगान वासुदेव म्हणत असणार व सोंगे ते-ते हावभाव करीत मनोरंजन व अनुबोधन करीत असणार. 'खांबसूत्राची बाहुली' नाथांच्या अद्वैत प्रकरणात उल्लेखिलेली आहेच. ती किंवा 'सायखेडे' ह्यासारखाच हा प्रकार म्हणायचा. फक्त येथे बाहुल्यांऐवजी माणसे वेष (सोंगे) आणीत एवढेच. अशा तऱ्हेची सोंगे दाखवणे व लोकरंजन करणे हा या भोरप्यांचा व्यवसायच होता. नाथांनी फक्त या लौकिक नाट्याचा विनियोग लोकांना आध्यात्मिकतेकडे वळवण्यासाठी केला. ज्ञानदेव, नामदेव वगैरेंची रूपके आहेतच. तुकारामाच्या कवनात 'वासुदेव' आहे व त्याचे म्हणून दिलेले अभंग 'ललिता'चे आहेत. तुकारामाने 'बाह्यवेषधाऱ्यास उपदेश' करताना व्याजोक्तीचा जो उपयोग केला आहे त्याचा विचार पुढे करू. पण नाथांनी हा बाह्य वेष घातलेले वेषधारीच रंगसज्जेत आणले आणि त्यांच्या तोंडून अध्यात्म वदविले !

विविध रूपकांची सुमारे तीनशे कवने 'सकलसंतगाथ्या'तल्या नाथांच्या गाथ्यात आहेत. (क्र० ३६८९ ते ३९८६: यातले एक 'डौर' प्रकरण तर प्रदीर्घ आहे) त्यात अनेक वेदान्ती रूपके, कूटगीते आहेत. त्यापैकी 'चौघडा', 'रहाट', 'पाळणा' यांसारखी अचेतन वस्तूंवरची रूपके आहेत; 'पोपट', 'बैल', 'विंचू' अशी सचेतन वस्तूंवरची रूपके आहेत; 'हळदुली', 'लग्न', 'सासुरवास' हे कौटुंबिक-वैयक्तिक अनुभव तर 'शिमगा', 'होळी', 'जोगवा' यांसारखी गीते सामाजिक प्रसंग व रूढाचार यांवर आहेत. पण (१) 'बायला', 'दादला', 'भोंवरा', 'रोडगा' ('अंबा'-रूपक) यांत धक्के देणारी उलटापालट आहे, त्यामुळे ही रूपके जशी विशेष लक्षणीय-वैशिष्ट्यपूर्ण आहेत, तशी (२) भुत्या, वाघ्या, कोल्हाटीण, भटीण, कुंटीण, नकटी, सौरी, वैदीण, महार-महारीण वगैरे स्त्री सोंगे आणि वेसकर, फकीर, हापसी, दरवेशी, जोगी, वैदू वगैरे पुरुष सोंगेही विशेष लक्ष देण्यासारखी आहेत. (पुरुष सोंगांपैकी फकीर वगैरे हिंदुस्थानीत बोलतात ते योग्यच आहे.) सरळ रूपक-अलंकारातली कवने किल्ला, जमाखर्च, अर्ज, भूत ह्यांसारखी आहेत आणि कोडे, नवल, नवलाई यांसारखी कूटगीते आहेतच. नाथांच्या अद्वैत प्रकरणात जवळजवळ तीनशे कवने प्रतिपादनात्मक आहेत. (क्र० २२७६ ते २५७०, सकलसंतगाथा) नाट्यात्म व आलंकारिक अशा सर्व रूपकांचा तात्त्विक उलगडा त्यांच्यातून मिळतो. यापुढे काही भारुडे-रूपके-सोंगे यांकडे विश्लेषक दृष्टीतून पाहू या.

(अ) एकनाथांची रूपके-सोंगे

(१) दादला :

मोडकेंसें घर, तुटकेंसें छप्पर, देवाला देवघर नाही।
मला दादला नको ग बाई॥ ध्रु०॥
फाटकेंच लुगडें, तुटकीसी चोळी, शिवाया दोरा नाही॥...

दादला करायचा तो नीट घरदार, अन्नवस्त्र, किडूकमिडूक असावे म्हणून. हे सर्व असेल तर तो या संसाराचा राजा. पण येथे तर नश्वर-भंगुर देहरूपी खोपट्यात काहीच शाश्वती नाही. नव्हे, आत्मदेवतेला राहायला तुटक्याफुटक्या अडगळीमुळे जागाच नाही. फाटके लुगडे व तुटकी चोळी ही 'वासांसि जीर्णानि'' आहेत आणि ती नीट शिवून त्यांना चिरंतन शाश्वती देणारा ब्रह्मज्ञानाचा दोराच नसल्यामुळे जीवात्मारूपी नवरीला घरसंसार नकोसा झाला आहे. खाण्यापिण्याचे हाल, निजायला मोडका पलंग-म्हणजे आत्म्याची भूक भागवणारे किंवा त्याला आराम देणारे साधन नाही; या काम-विकाररूपी राजाच्या राज्यात अस्सल मोती, बावनकशी सोने नाही – ब्रह्मस्वादरूपी सर्वश्रेष्ठ वस्तूचा अभाव आहे. एवढे सांगून एकनाथ सरळच सांगतात की या आत्मनवरीला या भवातल्या शृंगाररसाची गोडी नाही, ती ब्रह्मरसातच लीन आहे :

एका जनार्दनी समरस झालें, तो रस येथें नाहीं॥ ५॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ८५)

हे रूपक दृश्य रूपक असेल काय ? कदाचित एखाद्या कापडखेळी कावडीधारीक स्त्री-यात्रेकरूच्या रूपाने हे साधले जातही असेल.

(२) भोवरा :

खेळे भोंवरा गे बाई भोंवरा। भोंवरा राधिकेचा नवरा॥ ध्रु० ॥
माझ्या भोवऱ्याची अरी। सप्तपाताळें त्यावरी।
फिरे गरगरां॥ १ ॥
भोंवरा बनला निर्गुणी। त्यावर चंद्रसूर्य दोनी।
जाळी शंकर गवरा॥ २ ॥
एका-जनार्दनीं खेळिया। भोंवरा खेळून पाहें चेलिया।
नाद देतो हरिहरा॥ ३ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ८५)

हे गाणे रूपक प्रकरणात नसून बालक्रीडेमधील खेळांतले 'भोंवरा' खेळाचे गीत आहे. भोवरा म्हणजे स्थिरचरासह सकल ब्रह्मांड. पण त्या प्रचंड भोवऱ्याची आरी खोल सप्तपाताळावर टेकलेली आहे. भोवरा मुळात 'निर्गुण' – म्हणजे त्रैगुण्यातीतातून जाळी-दोरीवाचून निर्मिलेला. त्यावर चंद्रसूर्य कोरलेले आहेत व त्याची जाळी (दोरी) 'गवरा' (असंस्कृतसा) शंकर आहे. या भोवऱ्याच्या खेळाचा नाद हरिहरांनाही सोडीत नाही, तेव्हा, गुरूच्या चेल्या, हा भोंवरा एकदा खेळून-फिरवून पाहा तरी, असे जनार्दनाचा चेला एकनाथ म्हणत आहे. यातही प्रत्यक्ष दृश्य अभिप्रेत आहे. पण राधिकेचा नवरा हा त्याचा चालक – तक्त्यावरचा – असावा. राधेचा नवरा अनया (ज्याचा 'भागवता'त उल्लेख नाही!) याला भोवरा खेळायला लावण्यातले स्वारस्य हेच की राधा ही आत्मशक्ती असूनही तिचा ऐहिक 'नवरा' कामविकारासक्त होऊन, तिच्या भोवती भिंगरी घालतो. पण तिचा परात्पर नृ-वरा (परमपुरुष) हा भोवऱ्याला लीलेने खेळवीत आहे असा अर्थ घेऊन रूपक स्पष्ट होते. शंकररूपी जाडीभरडी जाळी संपली की भोवऱ्याला मिळणारी गती संपलीच! अशा प्रकारे प्रथम आर, मग जाळी, शेवटी खेळाचा नाद!

(३) भवानीचा रोडगा :

सत्वर पाव गे मला। भवानीआई रोडगा वाहीन तुला॥ १ ॥
सासरा माझा गांवीं गेला तिकडेच खपवीं त्याला॥ २ ॥...

'मला दादला नको' म्हणून वैताग व्यक्तविणारी ही आत्मवधू. पण तिची ही एक वेगळीच मनोऽवस्था. ती पण प्रपंचाच्या निर्वेदाचीच. सासऱ्याचा, सासूचा, नणंदेचा, जावेचा जाच ही हिंदू कुटुंबातली न टळलेली बाब आहे. सासरा खाष्ट असावा. तसे स्पष्ट म्हटलेले नसले तरी 'तिकडेच खपवी' या शब्दांवरून सुनेचा उद्वेग स्पष्टच होतो. सासूने छळवाद मांडलेला आहे. नणंदेचा वरचष्मा आहे, तेव्हा तिच्या हट्टी लाडावलेल्या पोराला सांभाळणे या नववधूकडे येते! थोरल्या जाऊबाई तर बोलभांड, त्यांच्या जिभेला हाड नाही. संसारात अहंकार, माया, हट्टीपणा व मत्सर यामुळे मजाच राहिली नाही. विकारासक्ती टाकून

वैतागलेली (विरक्त) बाईल म्हणते :

दादला मारुन आहुती देईन मोकळि कर गे मला ॥ ६ ॥
एका जनार्दनीं सगळेंच जाउं दे, एकटीच राहूं दे मला ॥ ७ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ९१)

दसऱ्याला भवानीपुढे द्यायचा अजापुत्राचा बळी म्हणून विकारी दादल्याचीच आहुती देऊन आत्मसुंदरी संसारजाळ्यातून मोकळी होते!

या तिन्ही व अशा अनेक पद्यांत दर्शक-श्रावकाच्या मनाला भिडते, कुतूहल जागृत करते ती, लोकविलक्षण नसूनही नवलपरीची वाटणारी, विसंगती किंवा अनपेक्षितपणा यांवर उभारलेली रचनाशैली होय; शेवटच्या चरणातली एकाजनार्दनाची नीतिमय-भक्तिमय अतिशयोक्ती नव्हे! हा मथितार्थ बरोबर आहे की नाही याबद्दल रसिकांनी आपल्या मनाचा कौल प्रामाणिकपणे घ्यावा म्हणजे प्रस्तुत विवेचनातली तर्कप्रणाली सुसंगत व सयुक्तिक म्हणून त्यांना पटल्यावाचून राहणार नाही.

उरलेल्या रूपकांपैकी संन्यासी, भुत्या, भटीण, डंखीण, आंधळा, बहिरा, मुका, गारुडी, जोगी, भांड, फकीर ह्यांचा भावार्थ ती वाचताच कळण्यासारखा आहे. यातली काही हिंदुस्थानी भाषेत आहेत. केवळ नमुन्यासाठी तीन रूपके विचारात घेऊ.

(४) हळदुली :

हळदुली वाटुनी वाटिला पाटा।
अगुणाचा नोवरा हळदुली-उटा ॥ १ ॥
नागवा नवरा नागवी नवरी।
दोघें बैसलीं चराचरीं ॥ २ ॥
नागवा नवरा नवरी नेसला।
नागव्या नवरीनें नवरा वेढिला ॥ ३ ॥
सभामंडपीं दोघें ते दोघें।
एका जनार्दनी नाचती भोगें ॥ ४ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ८६)

वाटलेले हळद-उटणे लावून नवरानवरीने एकत्र न्हायच्या रिवाजाचे हे रूपक आहे. पिवळी वस्त्रे नेसून नवरानवरी आंघोळ करतात. त्यावेळी एकमेकाला पकडतात, चुळा फुंकतात. ही लौकिक रीत. सोंग म्हणून तक्त्यावर तसेच दाखवीत असतील. पण कथनकर्ता मात्र त्यावर मनाला धक्के देणारे श्लेषारोपण करतो. वाटूनवाटून हळदुली मऊ करताना पाटाही झिजला – अदृश्य झाला, रंगगंधांच्या संवेदनांची इंद्रिये संवेदातीत झाली. देखण्या गुणाच्या नवऱ्याला हळद-उटणे लावून साजिरा करायचा, पण येथे तर नवरदेव अगुणी-निर्गुणीच आहेत! हळदवलेली वस्त्रे त्यांनी नेसायची पण येथे नवरा-नवरी दोघेही विवस्त्र – सुंदर सुरेख वस्त्रांनी वेढली न जाणारी, निर्लेप, निरंजन, अनाच्छादित-अनाच्छेद्य आहेत! पाटावर बसून न्हायच्या ऐवजी ही चराचर व्यापून बसली आहेत! मग

नवऱ्याने नवरीला पकडली, कह्यात घेतली, आपल्या भोवती तिला परिधान केली; नवरीने नवऱ्यालाही असेच मिठाळून आपल्या अंगाने झाकून टाकले -- आणि हे सांगण्यासाठी नाथांनी शब्द अगदी साधे बोलीतले वापरले : नागवा नवरा-नागवी नवरी ! आणि नवरा तर नवरीच नेसला ! अगदी अत्याधुनिक काव्यातही प्रक्षोभक वाटावा असा शब्दप्रयोग ! पण अगदी समर्पक म्हणून उचित ! परमतत्त्वाने जीवात्म-कला नेसण्याची क्रिया व जीवात्मकलेने परम ब्रह्म वेढण्याची क्रिया परस्परपूरक आहेत. कोण कोणाशी एकरूप झाला हे सांगणे म्हणजे द्वैतभाव लादणे असल्यामुळे, घट फुटल्यावर घटातले आकाश घटाबाहेरच्याशी मिळून जाण्याची क्रिया दर्शविण्यासाठी हे रूपक आहे एवढेच. नवरानवरी मुळात एकरूप आहेत, केवळ बाह्य दृष्टिभ्रमामुळे ती भिन्नभिन्न वाटतात. यातली रचनारीती आघातक-आक्रमक आहे व त्यामुळेच गीत वेगळे उठून दिसणारे झाले. अर्थातच प्रत्यक्ष सोंगे विवस्त्र दाखविण्याएवढी अत्याधुनिक रंगसज्जा त्यावेळी रूढ होती असे कोणीही म्हणणार नाही. पण अवश्य तेव्हा अगदी उघडीबोडकी शब्दरूपे वापरायला संत कचरत नसत हे निश्चितच.

(५) बेटंकुळी :

ऐका बेटकुळीच्या महिमाना। सांगे सकळ लोकां-जना।
संतमहंताच्या खुणा। ऐका वाचून त्या।। १।।
टराव टराव टराव मृगवट जाण गा।। ध्रु०।।

(सकलसंतगाथा, १, ३९८१)

हे रूपक तसे सरळसाधे आहे. त्यात विसंगति-विरोध विशेष लक्षणीय नाही. 'टराव-टराव' हे बेडकाचे नादशब्द प्रत्यक्ष सोंगाचे द्योतक आहेत एवढेच. वरील चरणांच्या पुढे 'ग्राम' संज्ञा आहे. ती गानशास्त्रातली आहे. सुराची मूलस्थाने ती ग्रामे. या बेटकुळीच्या सुराची दोन ग्रामे आहेत -- दंभ व अहंकार. मृगवट म्हणजे मृगाच्या नक्षत्राचा काळ. त्यावेळी धुंद आवाजात बेटकुळी ओरडते. त्यापुढे बेटकुळीच्या सान रूपावरून सूक्ष्मातिसूक्ष्म (व महतात महत्तम) अशा सर्वव्यापी परमेश्वराचे ज्ञान होते – रविमंडळापासोन एकवीस स्वर्गांपर्यंत सर्व या सूक्ष्म चित्‌शक्तीचे गुणगान करतात. ते सूक्ष्मरूप दशावतारापूर्वीही कनवाळू होते, नम्र होते. कारण प्रत्यक्ष विष्णूनेच भृगूचा सन्मान केला; धर्मराजासाठी – भक्तासाठी ते सूक्ष्म ब्रह्म श्वानही झाले. सद्‌गुरूला शरण गेल्याने प्रासादिक वाणी लाभून त्याचे वर्णन करता येईल असे नाथ शेवटी सांगतात. या रूपकात प्रत्यक्ष सोंगाचे महत्त्व आहे. मुलींच्या फेरात जशी बसफुगडी असते व त्यातली दरेक गतिशील क्रिया जशी मन वेधून घेते तशीच ही उड्या मारीत टराव टराव करणारी बेटकुळीही वेधक वाटावी.

(६) डौर :

डौर हे रूपक प्रदीर्घ आहे – त्याची एकशे अठ्ठावीस कडवी आहेत. डौर म्हणजे डमरू आणि डौर वाजवणारा डौरकार. डमरू वाजवीत हा डौर दारादाराशी येतो, लोकांना ब्रह्मज्ञान सांगतो व तसे करताना डमरूतून वेगवेगळे नाद घुमवतो ! त्याचे मुख काळे असते – तो काळमुख असतो, डेऱ्यात राहतो. पण त्याचे मुख त्रिकाळज्ञान सांगत असते

व तो क्षणदृष्टनष्ट अशा मायिक डेऱ्यात असूनही त्याबाहेर संचरतो. म्हणून नाथ म्हणतात की हा डौर काय म्हणतो ते श्रवण करा :

ऐका गाये साधुसज्जन हो। महंत महाजन हो।
मननसील मुनिजन हो। योगी सज्ञान हो सावध ऐका।। १ ।। . . .
विनवी जनार्दनाचा एका। सेवितो तुमच्या चरणपियुखा।
उजळल्या निजात्मसुखा। डौर वाऊनिया देखा।
डौरकार पैं जाहले।। ३ ।।

या गाण्याचे अनेक परिच्छेद आहेत. दर परिच्छेदाच्या प्रारंभी 'डौरनाद' करावा अशी नाट्यसूचना आहेसे दिसते. डौराचा डुगडुग नाद करीत डौरकार जगात फिरतात.

ऐसी आम्हां डौरकाराची मती। काळमुखें जगीं भीक मागती।
त्यांच्या डौराची नादस्थिती। ऐका तुम्हांप्रती सांगेन।। २२ ।।

मग ही डौराची नादपरंपरा दाखविण्यासाठी डौरकार रंगपटावर सभोवार हिंडत असेल आणि 'डौरनाद' पुढीलप्रमाणे करीत असेल :

।। डौरनाद ।।
चुडमुक चुडमुक चुडमुक। दुकमुक दुकमुक दुकमुक।
कुसकुस कुसकुस कुसकुस। तळमळ तळमळ तळमळ।
खटपट खटपट खटपट। बुडबुड बुडबुड बुडबुड।
खळबळ खळबळ खळबळ। फुसफुस फुसफुस फुसफुस।
पटपट पटपट पटपट। भुंगभुंग भुंगभुंग भुंगभुंग।
ऐशा नादाच्या कोटी। मग शंखनादें डौर उटी।
हे नादाची मूळ गोष्टी। आता वेदांतपरिपाठी।
सादर परिसा।। २३ ।।

हे नादाचे चोवीस मूळ प्रकार – त्यात शंखाचा नाद मिसळला. त्यावरची वेदान्ती प्रतीके व प्रतिमाने पुढे नाथ वर्णन करतात. त्यात अनेक कथांचा संदर्भ आहे. शेवटी ते म्हणतात :

अनुहात डौराचा नाद। तेथे वेदांचे वेदानुवाद।
सिद्धांतबोध त्याचे शब्द। डेरा प्रसिद्ध अवतरला।। १२५ ।। . . .
एका जनार्दन म्हणे। ऐसीं डेरियाचीं लक्षणें।
डौरकार जालों याकारणें। डौर वाहूनि सांगणें। निजहितार्थ।। १२८ ।।
('प्राचीन गीतमंजूषा', पृ० ८७)

निजहितार्थ – निजात्मसुखार्थ डौर 'वाहूनि' म्हणजे वाजवून दाखविण्यास मी डौरकार झालो असे कवी म्हणतो. पण मुळात डौर वाजविणारे काही सगळेच वेदान्ती नव्हते. ते जेव्हा डमरू वाजवीत, तेव्हा निरनिराळ्या वादनक्लृप्त्यांनी ते वरील 'मूळ नाद' डमरूतून

काढीत. या 'डौर' रचनेत लयबद्ध बोलीची ओवीसदृश शैली आहे. साथीला दुसरे वाद्य नसणार; ठेक्याला मुळी त्यात स्थानच नाही. पण प्रत्येक परिच्छेदान्ती डौराचा एखादा नादप्रकार उमटत असावा. नाथांनी काही वरील चोवीसच्या चोवीस नादसंहतींचा व्यंजनेने अर्थ सांगण्याची खटपट केलेली नाही. त्यांनी या समग्र नादसामर्थ्याचे वर्णन पूर्वसूरींच्या मतानुसार केले आहे. या डौरकाराच्या सोंगाचे आकर्षण त्याच्या आरोहा-वरोहात्मक आंदोलननिर्भर लयबद्ध ललकारीत आणि त्याच्या डौराच्या तदनुकूल नादतरंगात आहे.

एकनाथांच्या कूटगीतांचा परामर्श यापूर्वीच्या काही परिच्छेदांत आलेलाच आहे. त्याची पुनरुक्ती येथे करायचे कारण नाही. यातल्या अनेक सोंगांत व रूपकांत उपरोधाच्या साहाय्याने दंभस्फोटही केलेला आहे. विशेषतः त्यांच्या 'उपदेश' प्रकरणातील 'कलिप्रभाव', 'वेषधाऱ्याच्या भावना' यांमध्ये त्यांनी या अनुरोधाने खूपच कडक टीका केलेली आहे आणि पुढे ब्राह्मण, वेदपाठक, संन्यासी, गुरू, संत कथेकरी, मानभाव फकीर वगैरेंच्या दांभिकपणावर कठोर कोरडे ओढले आहेत. पण अशा दंभस्फोटक कवनांचा उच्चांक गाठला तुकारामाच्या तद्विषयक अभंगरचनेने. त्यांतली शैलीं व वर्णनपद्धती इतकी क्षोभक आहे की ती कवने मराठीतले औपरोधिक व उपहासपर काव्याचे प्रतिमानच झाली आहेत.

(ब) तुकारामाची औपरोधिक कवने :

तुकारामाने वेषधाऱ्यास उपदेश, भक्तिस्तोम माजविणाऱ्यास उपदेश, खळदुर्जनास उपदेश अशा विषयांवर शेकडो अभंग लिहिले आहेत. त्यापैकी अनेक अभंगांत व्याजोक्ती, उपरोध व उपहास आहे. त्यांतला एकंदर भावार्थ लोकांस सन्मार्गाला लावण्यासाठी केलेल्या बोधाचा असला तरी ते अभंग लिहिण्याची रीती अतिशय वेधक आहे. अनेक कवनांत ग्रामीण वातावरण आहे, ग्रामीण लोकोक्ती आहेत व स्पष्टवक्तेपणा कमालीचा आहे. त्यातल्या ज्या काही रचना पुढे विश्लेषणासाठी निवडल्या आहेत त्या केवळ नमुन्यादाखल.

(१) मोलें घातलें रडाया। नाही आसूं नाहीं माया॥ १॥
तैसा भक्तिवाद काय। रंगबेगडीचा न्याय॥ २॥
वेठी धरिल्या दावी भाव। मागें पळायाचा पाव॥ ३॥
काजव्याच्या ज्योती। तुका म्हणे न लगे वाती॥ ४॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२३)

या अभंगात नुसत्या बाहेरच्या सोंगात राम नसतो, खरा अंतरीचा भाव पाहिजे हे जन-मनावर ठसविण्यासाठी वेगवेगळे दृष्टांत दिलेले आहेत. यातला पहिला दाखला तर आजतागायत रसरशीत राहिला आहे. दुसऱ्या दृष्टांतात भक्तीचा नुसता वितंडवाद म्हणजे केवळ बाह्य रंगसफेती आहे असे दर्शविले आहे. तिसऱ्यात वेठीला धरून ज्याच्याकडून काम करवून घ्यायचा प्रयत्न असतो, त्याचा काढता पाय असतो हे व्यावहारिक सत्य नमूद केलेले आहे. शेवटी काजव्याचे चमकणे काही वात पेटवायला उपयोगी नाही हे उदाहरण

म्हणून नमूद केले आहे. पण पहिले, गुजरातमधल्या रूढीचे उदाहरण, मोठे दृश्यच आहे. अनेक बाया छाती कुटीत 'हायहाय' करीत असतात पण त्यांचे डोळे काही ओलावत नाहीत ही व्यवहारज्ञानाची बाब तर फारच अन्वर्थक आहे. समग्र पद्य ही दृष्टांतांची माळका आहे. सूचित भावार्थाइतकीच ही रचनाशैलीही महत्त्वाची आहे.

(२) वाघें उपदेशिला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला॥ १॥
अंतीं मरसी तें न चुके। मजही मारितोसी भुकें॥ २॥. . .
गांठी पडली ठकाठका। त्याचें वर्म जाणे तुका॥ ६॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२४)

यात दोन ठकसेनांची गोष्ट उदाहरणार्थ घेतली आहे, पण भावार्थ स्पष्ट शब्दांत न सांगतां सूचित केला आहे. वाघ नि कोल्हा दोघेही लुच्चेगिरीत वस्ताद. दोघांनीही 'ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या' या वेदांताचा स्वार्थासाठी उपयोग केला. शरीर नाशवंत आहे, तर मरतामरता दुसऱ्याचे भले करावे ही यामागील कणवेची भावना! दोघेही भुकेलेले, दोघेही मांसभक्षक व दोघेही वावदूक-वादपटू. कहाणी तशी सर्वांच्या परिचयाची. पण तुकोबांनी तिचा उपयोग मार्मिकपणे केलेला आहे. येथेही रचनाशैलीचा परिणाम वाचकमनावर खूप खोल होत असला पाहिजे. या रचनेच्या अवीट गोडीचे तेही एक सबळ कारण आहे.

(३) आधीं होता वाघ्या। दैवयोगें झाला पाग्या।
त्याचा येळकोट राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ १॥
आधीं होता ग्रामजोशी। राज्यपद आलें त्याशी।
त्याचें पंचांग राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ २॥

तुकारामाच्या अशा पद्यांपैकी हे पद्य अतिशय प्रसिद्ध आहे. याचे 'मूळ स्वभाव जाईना' हे पालुपद तर मराठीतले चलनी नाणेच आहे. असे असले तरी हा अभंग सांप्रदायिक गाथ्यात समाविष्ट झालेला नाही हे खरे. तरीही ही रचना तुकारामाच्या शैलीची इतकी प्रातिनिधिक आहे की ती तुकोबांची नाही असे म्हणवतच नाही. यात दृष्टांतांची साखळी आहे. प्रथम, वाघ्या कुत्र्याचा पागेदार घोडा झाला तरी हाडे चघळण्याचा त्याचा स्वभाव जात नाही हे सांगितले, मग ग्रामजोशी राजपदावर आला तरी त्याला पंचांग सोडवत नाही हे दुसरे उदाहरण आले आहे; पुढे दासीची पट्टराणी झाली तरी तिचा बाहेर हिंडण्याचा स्वभाव बदलत नाही असा दाखला आहे; शेवटी —

आधीं होता संतसंग। तुका जाला पांडुरंग।
त्याचें भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ ४॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२४)

तुकाराम आपले स्वतःचे उदाहरण देऊन म्हणतात की मी जरी पांडुरंगमय झालो आहे व आणखी नामसंकीर्तन करायची गरज उरली नाही, तरी भगवद्भजन करणे हा माझा स्वभावच बनला आहे आणि म्हणून ती सवय आता सुटत नाही. अशा प्रकारे चार

दाखल्यांची ही माळा आहे. यातले पहिले तीन दृष्टांत निकृष्ट स्वभावांचे आहेत – एकंदर रोखच तसा दिसतो, त्यामानाने भजनाची सवय न पालटणे हे तत्कालीन नीतिकल्पनेप्रमाणे उत्तमच होय. तरीसुद्धा आविष्करणात या तारतम्यामुळे कमीपणा येत नाही. खरे म्हणजे असा मूल्यात्मक तरतमभाव आस्वादनाच्या वेळी आड येत नाही, उलट तुकारामाच्या देवभक्तीची त्यावेळच्या व्यावहारिकात टीकाच होत असल्यामुळे इतर 'स्वभावां'च्या जोडीलाच तो स्वतःच्या स्वभावाला बसवितो, पण ते वरवरचे, कारण आतले सत्य त्याचे त्याला अवगत असते. यापुढे दिलेल्या अभंगात हाच भावार्थ आहे.

(४) वांझेने दाविलें गऱ्हवार लक्षण।
चिरगुटें वालून, वाथयाला ॥ १ ॥
तेवीं शब्द झणीं करिती चावटी।
ज्ञान पोटासाठीं, विकूनियां ॥ २ ॥
बोलाचीच कढी बोलाचाचि भात।
जेवूनियां तृप्त, कोण झाला ॥ ३ ॥

ज्ञानी महंताचे सोंग आणून पोट जाळण्याचा उद्योग करणाऱ्या मंबाजीसदृश ढोंगी 'संतां'वर ही परखड टीका आहे. आपल्या तोंडच्या शब्दातून तसा काही 'चावटी'चा प्रकार न होवो ही तुकोबांची इच्छा. तिसरे कडवे मराठीत चलन पावलेली प्रसिद्ध म्हणवजा उक्तीच आहे. पुढे तुकोबा म्हणतात, की कागदावर नुसती 'साखर' अशी नामाक्षरे लिहिली तरी साखरेची गोडी त्यात कोठून येणार? म्हणून मोठेपण हे ढोंगी ठरण्याचा संभव असल्यामुळे मला ते नकोच आहे :

कागदीं लिहितां नामाची साखर।
चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥
तुका म्हणे जळो जळो ते महंती।
नाही लाज चित्तीं निसुगाला ॥ ५ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२५)

दुसऱ्या एका अभंगात तुकोबांनी 'वांझेच्या गरभारपणा'चा दृष्टांत विस्तृतपणे दिला आहे :

(५) चिरगुटें घालूनि वाढविलें पोट।
गऱ्हवार बोभाट, जनामध्यें ॥ १ ॥
लटिकेची डोहळे दाखवी प्रकार।
दूध स्तनीं, पोर पोटीं नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे अंतीं वांज तेचि खरी।
फजिती दुसरी, जनामध्यें ॥ ३ ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२५-१२६)

यात एकच दृष्टांत सलगपणे दिला आहे. वांझेने जरी वांझपणाचा डाग जावा म्हणून

गर्भारपणाचे सोंग केले तरी शेवटी वांझपण राहतेच आणि उलटी खोट्या सोंगामुळे 'दुसरी' फजिती होते ती वेगळीच, एवढे सांगून तुकोबा थांबले. ध्वनित आशय मागील, ''वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण'' यात स्पष्ट सांगितला, तर या अभंगात तो तसाच सूचित केला. पण त्या अभंगात आणखी दृष्टांत दिले आहेत, तर यात एकच उदाहरण विस्ताराने दिले आहे. लौकिक दृष्टीने 'वांझेने दाविलें' हा अभंग अधिक आकर्षक वाटत आला आहे, पण आविष्करणाच्या दृष्टीने दुसरा 'चिरगुटें घालूनि' हा अभंग अधिक कलात्मक म्हणावा लागतो. त्यातले सामाजिक शब्दचित्र अधिक चित्रालेखमय ('ग्राफिक') झालेले आहे.

(६) आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्यां भटां झाली धणी॥ १॥
अंतरीं पापाच्या कोडी। वरि (वरि) बोडी डोई दाढी॥ २॥

यातले सिंहस्थ पर्वातल्या धांदलीचे पार्श्वभूमीला असलेले दृश्य गमतीचे आहे — गुदगुल्या करणारे आहे. जुन्या परंपरेचे होणारे विडंबन त्यात उमटले आहे. अन्य क्षेत्री केलेले पाप तीर्थक्षेत्रातील पावन जलात स्नान केल्याने नष्ट होते ही व्यावहारिक खूणगाठ संस्कृत सुभाषितात गुंफलेली आहेच. पण नुसत्या स्नानापेक्षा मुंडनपूर्वक स्नान अधिकच पाप-नाशक! पण खरे वर्म पापवृत्ती हे आहे, हातून घडलेली पापे हे नव्हे. ती तर कायमच राहते. फक्त डोई-दाढी बोडल्याने केस जातील पण पापवृत्ती पालटल्याची निश्चिती नसतेच. म्हणून तुकोबा स्पष्टपणे म्हणतात :

बोडिलें तें निघालें। काय पालटलें सांग वहिलें॥ ३॥
पाप गेल्याची काय खूण। नाही पालटले अवगुण॥ ४॥

आणि शेवटी भक्तीच्या मूळपदावर येऊन सांगतात :

भक्तिभावेंविण। तुका म्हणे अवघा सीण॥ ५॥
('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२५)

तुकोबांचा मनोभाव येथे सरळपणे व्यक्त झालेला आहे. पण केवळ या नीतिबोधाच्या वाच्यार्थापेक्षाही तो व्यक्त करण्याची रीत वेधक आहे व तिच्यामुळेच रचना लक्षणीय होते.

तुकोबांच्या कूटात्मक व वेदांती रूपकांतले आविष्कारसामर्थ्य मागेच सातव्या कलमातील विवेचनात अंगुलिनिर्देशाने दाखविलेले आहे. त्या व येथल्या विवेचनात त्याची प्रतीतिकारी शलाकापरीक्षा झाली आहे.

तुकारामाच्या गाथ्यातही अनेक रचना नाट्यात्म रूपकांच्या व सोंगांच्या आहेत. त्यांच्याविषयी वेगळे काही सांगण्याचे कारण नाही; एकनाथाच्या नाट्यरूपकांबाबत जे लिहिले आहे तेच तुकारामाच्या व इतर संतांच्या तत्सम रचनांना पुरेपूर लागू पडते. तुकारामाच्या आविष्कारशैलीत एक प्रकारचा ग्राम्य फटकळपणा अनेक वेळा दिसतो. त्याच्या राकट व सरळ स्वभावधर्माचा तो द्योतक आहे. कूटगीते व औपरोधिक गीते यांत याचे अनेक दाखले आहेत. 'भले तरी देऊं ढुंगाची लंगोटी' असे तुकोबांनी म्हटले, पण

पोशाखी सुसंस्कृतांना त्यात असंस्कृत (ग्राम्य) रांगडेपणा वाटून त्यांनी त्यावर संस्कार करून 'भले तरी देऊं कासेची लंगोटी' असा शहरी पाठ घडवला. पण तसे करताना आपण कवीच्या मूळच्या आविष्कारपद्धतीत अनधिकृत ढवळाढवळ करतो, हे अशा संस्कारकांनी लक्षातच घेतलेले नसते. रामदासांच्या रचनांत अनेक रसवादी अभिजात समीक्षकांना शैलीचा ओबडधोबड देखावा दिसला! त्या 'शब्दसृष्टीच्या ईश्वरा'चे सुदैव एवढेच की अलीकडचा वाचक आणि समीक्षक हे आविष्कारातील तथाकथित प्रसादगुणावर व वैदर्भी रीतीवर प्रमाणाबाहेर भर देत नाहीत; कारण तसे करण्याने रामदासांच्या ज्वलंत व्यक्तित्वाने नटलेल्या त्यांच्या शैलीतले खरे मर्म उकलले जातच नाही. या दृष्टीने रामदासांच्या काही रचना विश्लेषणपूर्वक निरीक्षिण्यासारख्या आहेत.

चित्रगुणी निसर्गदर्शन व नादसंवेदनेचा आविष्कार :

जुन्या कवितेत एकंदरीने निसर्गचित्रणपर काव्याचे दुर्भिक्ष्यच आहे. निसर्ग केवळ मानवी वा दैवी विभूतींच्या महत्त्ववर्धनासाठी पार्श्वभूमीदाखल येतो आणि ठराविक संकेतांच्या साच्यातून त्याचा रूपाविष्कार होतो. वामन पंडितांच्या 'वनसुधा' प्रकरणात निसर्गसृष्टी थोडी वेगळ्या साच्यातली आहे; रामदासांच्या 'पृथ्वी तुला राघव नीरवीला' या हृदयंगम काव्यातही सृष्टी सचेतन किंवा मानवी आहे आणि ती पंचमहाभूतांच्या द्वारे सीता-रामांची पाठराखण करणारी आहे. ('प्राचीन गीतभांडार', पृ० ९७) पण राम-दासांच्या 'गिरीचे मस्तकीं गंगा' ही कविता शुद्ध निसर्गसंवेदनात्मकच आहे व तिचे विश्लेषणयुक्त परीक्षण 'प्राचीन गीतभांडारा'च्या प्रस्तावनेत आलेले आहे. प्रस्तुत संग्रहविभागात रामदासांचे दुसरे एक सृष्टिवर्णनपर काव्य दिले आहे. ते जरा वेगळे आहे.

(१) या संग्रहात समाविष्ट न केलेल्या पण सर्वपरिचित अशा, वामनपंडितांच्या 'वनसुधे'त गोपाळांच्या लीलांचे वर्णन आहे. या सर्व लीला कृष्णाच्या संदर्भातच आहेत. पण असे असूनही त्यांचे वर्णन सहजरम्य स्वभावोक्तीने केलेले आहे. सृष्टी ही कृष्णाच्या दर्शनाला उत्सुक आहेच. पण कृष्ण मात्र स्वतः बालगोपालांना रानावनात फेरफटका करून येण्यास सांगतो. मग गोपशिशू हे झाडेझुडपे, प्राणिमात्र यांच्याबरोबर क्रीडा करतात.

> म्हणे कृष्ण त्या बाळसंतां, पहा रे।
> अरे या स्थळीं सर्व संताप हारे।
> करी ठाव खेळाचिया संपदा हा।
> जया वाळवंटीं घडे संप दाहा।।

मग कृष्ण त्यांच्यामध्ये बसून वनभोजन करतो याचे वर्णन तर अनुपम आहे. कृष्णाला जाणीव आहे की सर्वांच्या नजरा आपल्यावर खिळल्या आहेत, म्हणून सर्वांना सारखेच दिसेल अशा तऱ्हेने त्याने बालगोपालांच्या पंक्ती रचल्या.

> हरिवदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या।
> म्हणुन बहुत पंक्ती मंडलाकार केल्या।।

आणि त्यानंतर आलेला श्लोक मराठीतील एक अप्रतिम शब्दांकित प्रतिमा आहे. अनेकदल कमळाच्या पाकळ्या रांगारांगांनी जडविलेल्या असतात व त्यांमध्ये परागकोश असतो. त्यांचे प्रतिमान करून एक मोहक चित्रांकन वामनपंडिताने शब्दांनी साधले आहे. हेमाडपंती देवळांच्या गाभाऱ्याभोवती शेकडो छटांची कमळे कोरलेली असत. ते मानकशिल्प (motif) होय.

असो कर्णिका अंबुजामाजि जेवीं
मुलांमध्यभागी वसे कृष्ण जेवी।
मुखीं ग्रास सप्रेम घालूनि, हातीं
दहीभात, हे देव लीला पहाती॥

या सर्व वर्णनात केंद्रस्थान कृष्णाला आहे; तेव्हा यात भक्तिरस आहेच. पण केवळ शब्दांनी आलेखिलेले एक दृश्य म्हणूनही या 'वनसुधा' प्रकरणाचे महत्त्व फार मोठे आहे.

(२) 'वर्षाकालीन वनश्री' अशा संपादकीय (ल० रा० पांगारकर) शीर्षकाचे रामदासांचे एक छोटेखानी काव्य आहे :

पसरले सरले गिरि साजरे।
सरवटें धुकटें भरितें भरे॥
बहुत वात झडांत झडाडितो।
वरतरू वरताचि कडाडितो॥

येथे वाऱ्याच्या सोसाट्यात 'वरतरू' म्हणजे प्रचंड वृक्ष कडाडून मोडत असल्याचे चित्रात्मक वर्णन आहे. जिकडे तिकडे पर्वतराजी पांगलेली आहे व त्यावर सरकते धुके पसरले आहे. अशा वेळी एकदम झंझावात सुटतो व झाड कोसळते ('गिरीचे मस्तकी०' कवितेतही झाडखंडे विदारली गेल्याचे वर्णन आहे) हे सरस रम्य स्थळ पाहून दासांचे मन लोभावले.

द्रुमलता रमता द्रुम मातलें।
सुख मनीं सुमनी मन रातलें॥ ४॥

आणि पुढच्या श्लोकातही हाच भाव आहे :

विमळ सुशिळ तें स्थळ पाहतां।
सुखविशेष घडे पळ राहतां॥ ५॥

अर्थात रामदासांना हे स्थळ इतके मोहविते तेव्हा तेथे देवाचे वास्तव्य असलेच पाहिजे असे तेही मानतात.

गमतसे वसती कमळापती॥ ४॥
वरदराज विराजतसे वनीं॥ ५॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५२)

असे असूनही त्यांना हे स्थळ आवडण्याचे कारण हे आहे, की ते वनांत भाग 'सुरस रम्य रसाळ' आहे. 'हरित रंग सुरंग' मोहक दिसतो आहे, 'परमसुंदर खग' बोलत आहेत, चहूकडे झरे झिरपत-झरत आहेत व त्यांचे पाणी अडवले जात नसल्याने जिकडेतिकडे वावरत आहे; नूतन पल्लवांनी तरू साजिरा दिसत आहे. अशा त्या वनांतरात दासांच्या संवेदना पालवल्या आणि त्यातून प्रतिसाद उमटू लागले म्हणून ते वनांतर रामदासांना सुखद वाटले. रसिकाच्या दृष्टीने हीच या रसाळ काव्याची खरी पावती आहे. वर्णन केवळ सांकेतिक न राहता ताजेतवाने बनले आहे याचे कारण हे की दासांचा हा निज अनुभव आहे, कोणाची उसनवारी नव्हे.

(३) या संदर्भात 'गिरीचे मस्तकी गंगा' या कवितेचा उल्लेख अत्यावश्यकच आहे. त्या गीतातली ध्वनिनिर्मिती अत्यंत सर्जनक्षम ठरली आहे. अर्थानुकारी ध्वनीमुळे निसर्ग-चित्राची मनावरची छाप अतिशय खोलवर उमटते. 'दराच तुटला मोठा, झाडखंडें परोपरी' या ओळीतले हे सामर्थ्य अपूर्व आहे. शिवाय अंत्य चरणातील 'कर्दमु'-मुळे मनाची 'साकडे पडल्या'ची अवस्थाही फार उत्कटपणे बिंबित झाली आहे. हे समग्र गीत पूर्वीच्या संकलनात येऊन गेलेले आहेच. ('प्राचीन गीतभांडार', पृ० ९८, ९९)

(ब) दृश्य-श्राव्य संवेदनांची गीते :

शब्दमय साहित्यात भाषिक बैठकीमुळे नादसंवेदना गृहीतच असते; तेथे वाच्यार्थ-दर्शनापुरती ती मर्यादित असते. पण नादांच्या कुशल मांडणीने व गुंफणीने साहित्यिक शब्दांचे प्रतिमासामर्थ्य विशेषच वाढते. रामदासांच्या कवितांतून अशी अनेक स्थळे निवडता येतात. पुढील कवनातच पाहा ना :

(१) वोळला रे रंग वोळला रे।
ताळमृदांगें भव्य कल्लोळला रे॥ ध्रु० ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५१)

या रचनेत ध्रुपदातच 'ओ'कार-'ळ'कार असलेले 'कल्लोळला' हे नादध्वनीचे द्योतक पद आल्यामुळे 'भव्य' शब्दाला पाठबळ मिळाले आहे. ही भजनाची धुमाळी धून आहे व ती पालुपदातच व्यंजक नादध्वनींनी सूचित केलेली आहे. पुढच्या कडव्यांना जोडून येणारे हे मूळपद समावेशकही झाले आहे – किंवा समन्वयात्मक म्हटल्यास अधिक समर्पक ठरेल.

(२) हवाया नळे बाण भांडीं अनंतें।
बळें सोडितां जाति आकाशपंथें॥
बती लागतां वेळ नाही उठाया।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५२)

या काव्यात सहा उपमाने-प्रतिमाने वापरून दासांनी काव्यस्फूर्तीचे वर्णन केले आहे. त्यांना हवी असलेली स्फूर्ती उत्प्रेक्षणशील आहे – कल्पनोड्डाण करणारी आहे. त्यांना प्रिय अशा जन्मजात झेप लाभलेल्या मारुतीचे उदाहरण त्यांनी अर्थातच घेतले आहे. ("उठे मारुती

वेळ नाही उडाया'') पण ते दुसऱ्या श्लोकात आले आहे. कारण अमूर्त स्फुरणलीलेचे प्रत्ययकारी सूचन करावयाचे तर त्यासाठी मारुतीच्या उड्डाणाचे उदाहरण प्रथम देण्यापेक्षा दृश्य प्रतिमान अधिक अन्वर्थक. त्यासाठी त्या काळातल्या आतषबाजीचे व लढाईतल्या साधनांचे उदाहरण, जे दासांना प्रत्यक्ष अवगतच होते, तेच दिले; आणि तसे करताना नादांचे अर्थपोषक सामर्थ्य त्यांनी उपयोगात आणले. ती 'हवाया नळे बाण भांडीं' ही तत्कालीन दारूकामातली साधने – हवेत उंच झेपावणारे नळे, सणसणत जाणारे बाण, धुडुम धूम आवाज करीत व आग ओकीत जाणारे तोफेचे गोळे त्यांना आठवले हे अगदी स्वाभाविक. लोकांना तर त्यांचे ज्ञान ताजेच झालेले होते, त्यामुळे साधारणीकरणही आयतेच तयार होते. त्यामुळे ही उपमाने समर्पक ठरली. पण अधिक सूक्ष्मपणे साधले ते हे की या उपमान-प्रतिमानांची नोंदणी करताना त्यांना ह, ळ, ब, भ यातला महाप्राण व त्याला जोडून ण, न या अनुनासिकांसह अनुस्वार फार साह्यकारी झालेले असणार. या शब्दसंहतीतल्या नादानेच काहीतरी स्फोटक घडत असल्याची संवेदना सहकंपित होते. पुढच्या पाच श्लोकांतही ध्वनियोजना आहेच. पण खास सार्थ असे तिचे नियोजन पहिल्याच श्लोकात प्रत्ययाला येते.

(३) 'रामाची भूपाळी' आणि 'शंकराची भूपाळी' या दोन भूपाळ्या परंपरेने 'पिवळी भूपाळी' व 'धवळी भूपाळी' अशा रंगदर्शक नावांनी संबोधल्या जातात. पहिल्या भूपाळीत रामाचा पितांबर व बाकीची आभूषणे पिवळ्या वर्णाची म्हणून 'पिवळा' हे विशेषण परत-परत येते. दुसऱ्या भूपाळीत शंकराचा आसमंत हिमाच्छादित आहे, नंदी शुभ्र आहे, चंद्रकोर धवल आहे, वस्त्रे श्वेत आहेत म्हणून तेथे 'धवळा' हे विशेषण पुन्हापुन्हा येते. पण एकंदरीत तसे रंगसंवेदनेचे खास वैशिष्ट्य एवढेच की रामाचे सर्वांग सावळे आहे आणि बाकी गोष्टी प्राधान्याने पिवळ्या आहेत आणि त्यामुळे दोन रंगांची विरोधी परस्परसंमुख मांडणी रामाच्या भूपाळीत आहे – विशेषतः सावळ्या रामांच्या देहाचा नीलवर्ण पार्श्वभूदाखल येऊन त्यावर पिवळा तपशील उठून दिसतो. शंकराच्या भूपाळीत इथून तिथून सर्व धवळे तेवढेच वर्णिले आहे. स्वतः शंकर कर्पूरगौर, पार्वती तर 'गौरी'च, बाकीचा आसमंत हिमधवल. फक्त धवळ्या देहयष्टीची नील कंठरेखा, पिंगट-तांबूस पंचानन सिंह आणि मागे पार्श्वभागी नीलवर्ण आकाशाची पृष्ठजवनिका (बॅक ड्रॉप) असा रंगविरोध व रंगमीलन कल्पनेने आपण ताडू शकतो, प्रत्यक्ष भूपाळीत मात्र केवळं 'धवळा' वर्णच सर्वत्र आहे. नमुन्यादाखल काही चरण पुढे देत आहे :

पिवळी भूपाळी :

> राम सर्वांगीं सांवळा। हेम अलंकार पीवळा।. . .
> पिवळा मंडप विस्तीर्ण। मध्ये पिवळें सिंहासन।
> श्रीराम सीता लक्षुमण। दास गुण गातसे
>
> ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५४-५५)

धवळी भूपाळी :

> धवळा सर्वांगें आपण। . . . धवळें गात्र धवळें वसन।. . .

धवळें कैलासभुवन। धवळें मध्यें सिंहासन।
धवळें शंकराचें ध्यान। दास चिंतन करीतसे॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५५)

एक गोष्ट मात्र खरी. देवदेवतांची वर्णने अनेक संतभक्तांनी केली आहेत व भावभक्तीच्या बाबतीत त्यात तारतम्य करणे न्याय्य होणार नाही. पण रामदासांच्या या भूपाळ्यांत रंगसंगतीची – रंगवैशिष्ट्याची जाणीव जशी स्फुट होते तशी अन्य कोणा कवीच्या काव्यात क्वचितच आढळते – ज्ञानदेव-नामदेवांसारख्यांच्या काही रचनांचा याला सन्मान्य अपवाद आहे.

(४) मारुतीचे स्तोत्र-आरती; शंकराची आरती :

(अ) मारुतिस्तोत्र : "भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती।" या स्तोत्रात प्रारंभी महाप्राणयुक्त 'भ' व त्याबरोबरचे अनुनासिकाक्षर 'म' आणि 'रुद्र'-'वज्र'-सारखे नादवाही शब्द वापरून दासांनी आपला आशय दर्शविला आहे. त्यानंतर मधूनमधून रौद्राला समान व विरोधी अशा शब्दसंहतींनी शक्ती व भक्ती यांचे समरूपत्व ध्वनित केलेले आहे. "लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा' अशा परंपरित यमकाने समधातत्व-समतोल-आला आहे. 'काळाग्नि'ने भीषणत्व कमीच वाटले म्हणून की काय त्याबरोबर 'काळरुद्राग्नि' हे पद आले, कारण केवळ अर्थदृष्ट्या ते एकटेच पुरेसे होते. द्रोणाचल खरा फार प्रचंड नव्हें, तरी त्या 'द्रोणु'ला जोडून 'मंदाद्री'-सारखा हे पद जोडले व पुढे अतिशय सूचक अशी क्रियाविशेषण-क्रियापदाची पदे 'क्रोधे उत्पाटिला' ही योजून भाव पुरा दर्शविला. 'आरक्त देखिलें डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा। वाढतां-वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा॥" हा श्लोक तर या स्तोत्ररूपी भव्य कमानीतला 'चावीचा प्रस्तर-पाषाण'च आहे. 'ब्रह्मांड' हे पद तीनचारदा, 'भ्रुकुटी', 'उड्डाण' अशी पदे जागोजाग एकेकदा वापरून प्रचंडपणाचा आशय ध्वनित केलाच; पण हे सर्व जणू एखादे जड-स्थिर चित्र होईल म्हणून 'अणुपासोनि ब्रह्मांडाएवढा' होत जाण्याची गतिशील क्रिया त्यात ओवून टाकली आणि मग या चावीवजा श्लोकात, प्रथम सूर्यमंडळ ग्रासण्याची व त्याहूनही 'वाढता-वाढता' अखेरीस समग्र अवकाशमय शून्यमंडळ भेदण्याचा विश्वव्यापी गतिक्रम प्रस्थापित केलेला आहे. हा तेरावा श्लोकच आशयदृष्ट्या महत्त्वाचा : पुढचे श्लोक (१४ ते १७) केवळ साध्य इष्टदेवतेच्या भजनकीर्तनाचे म्हणून आले आहेत एवढेच. ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५५-१५६)

(ब) मारुतीच्या 'सत्राणें उड्डाणें०' या आरतीत साध्य हेच आहे. जरी तिचा विस्तार लहान आहे तरी नादात्मक शब्दयोजना त्या प्रमाणात खूप आहे. यात 'डळमळ', 'दुमदुम', 'धगधग' असे क्रियार्थव्यंजक नादशब्द आहेत. 'कडाडिले' हा शब्द दोनदा मोक्यावरच ठेवला आहे. 'पडशब्द' हे बोलीतले पद अन्वर्थक आहे, त्याला पर्याय म्हणून आलेला नंतरच्या काळातला 'प्रतिशब्द' त्या मानाने भोज्याच वाटतो. पण एकंदरीत समर्थांनी ही आरती थोडक्यात आवरली हे बरेच केले असे मत अखेरीस होते. यातही प्रारंभाला सूचक असे 'सत्राणें (त्राणयुक्त) उड्डाणें हुंकार' ही पदे येऊन शेवटी ती गती 'कडाडिले पर्वत उड्डुगण उच्छेद' यात सामावली आहेत. प्रस्थापित देवतेची आरती अशीच

स्थितिदर्शक असणार व म्हणून ती जेवढी संक्षिप्त तेवढी कलात्मकता जास्त असे मानायला सबळ कारण आहे. ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५७)

(क) 'शंकराची आरती' रूढ शिवरुद्रसंकेतानुसार मारुतिगीताहूनही रौद्र-भीषण जाणवायास पाहिजे, पण प्रत्यक्षात शंकराच्या आरतीपेक्षाही शंकराच्या अवताराची – 'भीमरूपी महारुद्र' मारुतीची – आरतीच अधिक रौद्र-भीषण आशयाची झालेली आहे. शंकराच्या आरतीतही प्रारंभीच 'विक्राळ ब्रह्मांडमाळा' लवथवत असलेल्या आणि काळ्या विषकंठाने व ज्वाळा धगधगणाऱ्या तृतीय नेत्राने भयानक दिसणाऱ्या शंकराचेच आवाहन आहे; पण त्याला जोडून·लगेच 'लावण्यसुंदर' बाळा ज्याच्या मस्तकावर आहे व जेथून निर्मळ जळ झुळझुळा वाहत आहे अशा सौम्यशीतल शिवशंकराचे रूपही आले आहे आणि रामदासांचे उद्दिष्ट दैवत शांतदाह असा भोळा कर्पुरगौर शंकर आहे. रामनामाचा बीजमंत्र शतकोटी वेळा उच्चारून हलाहलदाह शांत झालेला असा तो "मनमोहन मुनिजनसुखकारी" नीलकंठ आहे. भीषणतेचे आवाहक विधान "ब्रह्मांडमाळा विक्राळा" लवथवती ! याला संमुख 'जळ निर्मळ झुळझुळा वाहे' या वाक्यपदाने विभीषिकेचा निरास व सोज्ज्वलतेची संस्थापना सुचविलेली आहे. पण एकंदरीत यातील शब्दसूत्रांची वीण काहीशी असमतोल झाल्याचे प्रत्ययास येते. धाग्यांची प्रत चांगली आहे, पण त्यांचे अनुसंधान थोडे विस्कळीत आहे व म्हणून या वस्त्राचे पोत विषम पातळीचे वाटते. अर्थात आरती गुणगुणताना त्यातले नादसंगीत सतत जाणवत राहते याबाबत शंकाच नाही. ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५६-१५७)

(५) त्र्यंबकधनुष्यभंग व तांडवनर्तन

(अ) जनकाने लावलेला पण रामाने स्वीकारला, तेव्हा राजा जनकाने त्र्यंबक-धनुष्य ओढीत आणले व जमिनीवर आडवे ठेवले. त्याला हात घालून ते धनुष्य उचलले. एवढ्या काही क्षणांच्या काळात कमीत कमी बावीस नादमय क्रिया त्या सभामंडपात व आसमंतात झाल्या. रामदासांनी आपल्या पद्धतीने ह्या वेगवेगळ्या नादमय क्रियांची प्रतीती सघन व्हावी म्हणून परंपरित नादशब्दांचा विनियोग केला आहे. इंग्रजीत ज्याला 'ऑनॉमेटोपीइआ' म्हणतात त्या अर्थसूचक नादयोजनेची ही उत्तर उदाहरणे आहेत. (१) धनुष्य ओढीत आणताना 'फरफरफर' आवाज झाला; (२) ते प्रचंड धनुष्य व रामचंद्राची सान मूर्ती पाहून "'हरहरहर', किती दुष्कर हा पण" असे उद्गार सर्व सभासदांच्या तोंडून निघाले; (३) रामाने धनुष्य 'वरवरवर' हळूहळू उचलले; (४) त्याला लागून असलेल्या बाणांचा घर्षणजन्य 'करकरकर' आवाज झाला; (५) रामाने प्रत्यंचा लावण्यासाठी त्र्यंबक वाकविले असता ते मोडले त्यावेळी, ते पिचले तेव्हा 'कडकडकडकड' नाद झाला; (६) ते तुटले तेव्हा 'तडतडतडतड' ध्वनि झाला; (७) आकाशात 'गडगडगडगड' असा गडगडाट झाला व (८) 'धडधडधडधड' अशी धडक सर्वांच्या हृदयात उठली; (९) रविरथाची 'भडभडभड' करीत चाकोरी चुकली नि (१०) तो 'घडघडत' भलत्या मार्गाला लागला; (११) अष्ट दिग्गज खचले तेव्हा त्यांच्या शृंखलांचा 'खडखडखडखड' असा नाद झाला; (१२) भूगोलासह स्वर्गमृत्युपाताळ ही सर्व 'दुमदुमदुमदुम' अशा नादाने दुमदुमली; (१३) 'धुमधुमधुम' अशा धुकट-धूसर आवाजामुळे विधीच्या कर्णांना टाळे बसले; (१४)

'हळहळहळहळ' असा हलकल्लोळ होऊन हरसीपंचक (?) डोलू लागले; (१५) 'धकधक-धकधक' अशा नादाने धरणीधरांनी आपला कंप व्यक्त केला; (१६) समुद्र उसळून 'खळखळखळखळ' असा पर्वतप्राय लाटांचा खळखळाट झाला; (१७) डोळ्यांपुढे 'चकचकचकचक' काजवे चमकून राक्षसगण झोपी गेले; (१८) 'थकथकथकथक' आवाज अवकाशात घुमून देव थक्क झाले व पुष्पवृष्टी करू लागले; (१९) सीतेच्या हातातली रत्नमाळ कंपन पावून 'लखलखलखलख' लकाकली; (२०) 'जयजयजयजय' असा जयजयकार वीरयोद्ध्यांनी केला; (२१) राज्यात व स्वर्गात 'धिमधिमधिमधिम' असा दुंदुभिरव दुमदुमला; (२२) तुताऱ्या-रणशृंगे यांचा ''तरतरतरतर' असा नाद तरळला; (२३) आणि अशा या दृश्याच्या नादतरंगात रंगून असा राम-दास वरवधू राम-सीतांच्या दास्यभक्तीत 'रसरसरसरस' समरस झाला.

रचनाशिल्पाच्या दृष्टीने या नादवैचित्र्याची समर्पकता किती ते सांगणे कठीण आहे. प्रथमदर्शनी तर या ध्वनिसंकुलतेमुळे श्रोत्याचे मन काव्यात्मतेबद्दल प्रतिकूल होते. पण रामदास या व्यक्तिमनाचे नादसंज्ञेचे असे विविधांगी प्रतिसाद पाहून आपणही थक्क होतोच. रामाने शिवधनुष्य ओढले आणि त्याबरोबरच सीतेचे तनमनही ओढले असे (हृद्य सहोक्तीचा उपयोग करून) रामदासांनी म्हटले ते श्रोतृमनालाही लागू पडते. ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १५३)

(ब) त्रिपुरारी शिवशंकर हा नृत्यकलेचा आद्यगुरू मानला जातो. 'नाट'दर्शनाच्या वेळी शंकराचे 'सोंग' घेतलेला नट कसे नृत्यविभ्रम करीत असेल ते रामदासांच्या 'रंगी नाचतो त्रिपुरारी' या गीतातून प्रकट होते. हे गीत प्रस्तुत मंजूषेत समाविष्ट केले नाही; पण त्याचा विचार या ठिकाणी प्रस्तुत ठरेल. त्यात रामदास वर्णन करतात की विश्वाधार असे श्रीशंकर तांडव करू लागले तेव्हा काही दृश्य व बरेचसे श्राव्य तरंगभंग मंडपात उमटले : (१) मस्तकावरील गंगामुखातून झुळझुळ जळ वाहत होते; (२) शिरोमुकुटातली रत्ने झळझळ झगमगू लागली; (३) कानातली कुंडले व भालावरील चंद्रकला लळलळलळलळ आंदोलित झाली; (४) पंचानन शंकराच्या पंचमुखातून जिव्हा सळसळ सळसळू लागल्या; (५) सर्प वळवळू लागले; (६) कंठात धरून ठेवलेले हलाहल हळहळ हलून हलकल्लोळ करू लागले; (७) कंठातल्या रुंडमलिका थबथबथबथब थबकू लागल्या, सरकायला लागल्या; (८) हस्त नृत्याच्या आवेशात चपचपचपचप आवाज करीत चपापू लागले; (९) खुडखुडीत व्याघ्रांबर-गजचर्म खडखड खडबडू लागले; (१०) चिताभस्म भडभड करीत उधळू लागले; (११) किंकणींचा किणकिण नाद व (घंटांचा) घणघणा आवाज झाला; (१२) पायातील वाकी-घुंगूर झणझणू लागले; (१३) धरणी दणदण वाजू लागली; (१४) ताल देणारी हातातली टिमकी-खंजरी-खणखणू लागली; (१५) हातातली कडी (वेत्रे ?) रुणझुणू लागली; (१६) भक्तप्रेक्षकांची वाणी गुणगुणत गुण वर्णू लागली; (१७) निर्वाणाची खूणच खुणखुणत उमटू लागली; (१८) मृदंग टिमटिम करीत होते; (१९) डिंमर-डमरू डिमडिमत होते; (२०) दुंदुभी धिमिधिमि वाजत होत्या; (२१) झल्लर-झांजा झिमिझिमी झणझणत होत्या; (२२) येवज (ऐवज)-दागिने घुमघुम घुमत होते; (२३) अंबर दुमदुमून गेले होते; (२४) नृत्यबोलपटू विद्याधर ततथैततथै धिकिट धिकिटधा असा

ताल येत होते; (२५) गरगरगरगर फिरणारा त्वरितगती भ्रमरही गमकेमुळे थकित होऊन, (२६) थरथरथर कापू लागला; (२७) सरसरसरसर सरकू लागला; (२८) धुरधुरधुरधुर धुरधुर लागला; (२९) परपरपरपर (अतीत) अशा शब्दांनी सुरवर त्याला वर्णू लागले; (३०) भक्तजनांनी 'हरहर शिवशंकर' असा नामघोष केला, आणि (३१) वरवर (उत्तमो-त्तम) असा वर दासांना मिळाला त्याची ही (३२) तरतरतरतर असा सत्वर दस्तुरखुद्द केलेली ही गानरूपी पावतीच आहे. ('समर्थ ग्रंथ भांडार', उत्तरार्ध, पृ० ५७८)

यातील नादांची कक्षा विशाल आहे. मागील गीतातले नादध्वनी बरेचसे मनोवृत्तिदर्शक होते. यातले बहुतेक नादस्वर भौतिक-वस्तुजन्य आहेत. तेथे अनपेक्षित घटनेमुळे भय, विस्मय, हर्ष यांचा संकुल परिणाम होता; येथे अपेक्षित योगामुळे भक्तिजनित समरूपतेचा व संवादाचा आविष्कार आहे. दोन्हीतील नाद, म्हणूनच, सार्थ ठरतात.

देशकालस्थितिदर्शक कवने

या तऱ्हेची कवने फारच थोडी आहेत व आहेत त्यांचाही कलात्मक दर्जा फारसा वरचा म्हणता येणार नाही. त्याकाळी एकंदर काव्य भक्तिपर होते. संसार असार आहे हे मुळी सैद्धांतिक तत्त्व बनले होते. त्यामुळे कौटुंबिक दुःखाप्रमाणेच सामाजिक हालअपेष्टा, संकटे यांकडेही उदासीनवृत्तीने कवी पाहत. रामदास हा मात्र एक असा कवी होता की त्याने देशकालवर्तमानाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया तीव्रपणे व्यक्त केल्या. यावनी राज्यामुळे झालेली लोकांची दयनीय स्थिती त्यांनी वर्णन केलेली आहे व ती दशा जाऊन आनंद-वनभुवनात स्वराज्य आल्यावर काय दिसेल याचे स्वप्नही त्यांनी पद्यात नमूद करून ठेवले आहे. ('प्राचीन गीतभांडार', पृ० ९९) त्यातल्या उत्कटतेच्या मानाने शिवदिनकेसरी, महीपतिनाथ, रामजोशी, कृष्णदास यांच्या सामाजिक आशयाच्या रचना साहित्यदृष्ट्या खालच्या प्रतीच्याच म्हणाव्या लागतात. तरी पण त्यांतले वैशिष्ट्य व वेगळेपण असा काव्यागतचा 'भाव' प्रस्थापित रसाहून भिन्न आहे, हे स्पष्ट असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव येथे व पुढे संग्रहात करणे अगत्याचे वाटते.

> (१) सोळा शतें चौऱ्याशींत झाली धुलधानी।
> दैतराज्य दुष्टबुद्धी नासिलें प्रधानांनीं॥ ध्रु०॥
>
> ('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १९२)

पानिपतच्या लढाईत भाऊ-नाना गेले आणि स्वराज्यास कोणी वाली राहिला नाही. माधवरावांना याच स्थितीशी मुकाबला करावा लागला. शके १६८२-८३ मध्ये भाऊ-नाना गेले. शके १६८४ मध्ये स्थिती पार बिघडली. स्वास्थ्य, शाश्वती काही राहिले नाही. शके १६८५ मध्ये आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक दुःखे पराकोटीला जाऊन सर्वत्र स्वराज्याची धुळधाण झाली. लुटारू-पेंढाऱ्यांनी सर्व लुटून मुलूख ओस पाडला आणि भग्न झालेल्या समाजजीवनात खिंडारे पडून त्यातून चोरापोरांना व दुष्टपाप्यांना भरतीच आली! जी काही थोडीफार 'ग्राम-अहंता' – गावाबद्दलची अस्मिता होती तीही विलयाला जाऊन द्वेषाची आग धुमसली. गोब्राह्मण, तीर्थक्षेत्रे यांची दैना झाली. विरक्त साधुसंत

'त्राहि त्राहि' म्हणून देवाचा धावा करू लागले व शिवदिननाथांनीही शेवटी परमेश्वराची करुणा भाकली! या लहानशा उताऱ्यातही भक्तकवीची आर्तता जाणवते.

(२) पाहतां पाहतां धर्म बुडाला अधर्म झाला चहूंकडे।
जिकडेतिकडे कली मातला कठिण काळ हा आला पुढें॥
('प्राचीन गीतमंजूषा', पृ० २१७)

महीपतिनाथ हे यानंतरच्या काळातले. एकंदर समाजात कसा कली संचारला होता त्याचे शब्दचित्र या कवनात त्यांनी रेखाटले आहे. सर्वत्र ढोंग माजले होते. नैतिक बंधने अत्यंत शिथिल झाली होती. सत्कर्म लोपून लोक दुष्कर्मात रत होते. बहुधा याच सुमारास नाचगाणे बहराला येऊन सभ्य समाजाला घाबरवून सोडीत होते – "नाचामधिं जन दंग", "विषयी गाणें चित्तीं" असे त्याचे वर्णन महीपतिनाथ करतात. पद फटक्याच्या पद्धतीचे व जोरदार आहे.

(३) उगा भ्रमसि वाउगा कशाला, युगांत खळ हा कली।
कली मातला सारा, धनदारा, इच्छि राज्यासहि हा कली॥

रामजोश्यांच्या दुष्काळाच्या लावणीचे हे ध्रुवपद आहे. मूळ लावणी खूप विस्तृत आहे. (या मंजूषेत तिचा समावेश केलेला नाही.) बारीक तपशील गच्च भरलेला आहे. ख़ास रामजोशीछाप रचनापद्धती या लावणीतही आहेच. अंतर्गत प्रासांचा विलास दर दोन ओळींनंतर येतोच येतो. सर्वत्र पसरलेल्या अंदाधुंदीचे यातले वर्णन डोळ्यांपुढे अगदी चित्र उभे करणारे आहे. प्रलयकाळच जणू येऊन ठेपला आहे असे वाटण्यासारखा 'जनक्षय' पेशवाईच्या अखेरीस महाराष्ट्रात चालू होता. काहीच सुरक्षित नव्हते, कशालाच किंमत नव्हती, कोठेही न्यायनीती राहिली नव्हती. दुर्बलांवर, स्त्रियांवर अत्याचार चालू होते. धीरवीर असा कोणी हंबीर असला तरी फकीर बनून भीक मागायची पाळी त्याच्यावरही आली होती. पठाण आठ दिवसांत तीनदा लुटायला धावत होते. हालहाल करून मारीत तेव्हा –

फांस गळ्यामधि बांस पाठिवर लोह हाडा लाविती।

आणि असे हे छळवादी म्लेंच्छ तर पुढे –

मांस विप्रलोकांचे तो कांचे वेचिति सांडस घेऊन हाती॥

शुद्ध सात्त्विक ब्राह्मणांचे कच्चे मांस सांडसाने तोडून त्याचे तुकडे वेचीत होते! यात काही अतिशयोक्ती असली तर ती एकंदर परिस्थिती पाहता क्षम्यच म्हणावी लागेल इतके हाल तेव्हा होत होते. मात्र ही भीषण अवस्था नैसर्गिक कोपामुळे मुळात आली हे खरेच! कविराय रामजोशी यांना इतर 'कृती' – लावण्या रचणे वगैरे – असूनही ते या लावणी-कडे आधी वळले व ही रचना पुरी केली.

(४) बाजिराव महाराज अर्जि ऐकतो बायकांची।

चल गडे जाऊं पुण्याशि हौस मोठि माझ्या मनची ॥ ध्रु० ॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० २७३)

कृष्णदास नावाच्या कवीने रावबाजीच्या रंगेल ख्यालाचे वर्णन या कवनात केले आहे. कृष्णदास जयराज नावाचा एक कवीही यावेळी होऊन गेला. बहुधा हे दोन्ही कवी एकच व्यक्ती असावेत. नाना फडणिसाने आपल्या आत्मचरित्रात राजपुरुषांना लहानपणापासूनच सुंदर स्त्रियांची कशी चटक लागे ते स्वानुभवावरून लिहिले आहे, त्यांच्याविषयी पुढेही आक्षेप चालू होते. रावबाजी तर कृष्णकन्हैयाच बनले होते! तसे वर्णन होनाजीसारख्या कवीने केले आहे! राजकाजात सुंदर स्त्रियांच्या प्रलोभनाचा उपयोग पौराणिक काळापासून चालत आलेला आहे तो आज-तागायत चालू आहे! पण त्याचे असे प्रत्ययकारी वर्णन कोणी क्वचितच करून ठेवले असेल. रावबाजीचा हा 'सुंदर दरबार' शुक्रवार पेठेत भरत असे. तिथे बसून बाजिराव महाराज या सुंदरींची हजेरी घेत असे आणि योग्यतेनुसार (?) मानपान करून त्यांची 'पैठवण'-पाठवणी-करीत असे. देखण्या स्त्रियांच्या बळावर कोट्यधीश बनलेले अनेक नवरे त्यावेळी पुण्यास होते. पहिल्या बाजिरावाने पराक्रम गाजवला आणि इष्काचा शौक केला. या दुसऱ्या बाजिरावाने नुसता इष्काचाच पराक्रम केला आणि स्वराज्यावर तिलांजली सोडून बिठूरला पलायन केले.

या तऱ्हेची सामाजिक आशयाची काव्ये फारशी लिहिली गेली नाहीत हे त्याकाळच्या काव्यविषयक जाणिवेचेही द्योतक आहे. भक्तिभाव प्रमुख होता; त्यामागून वीरवर्णने, मग आला शृंगाराचा बहर. त्यापुढे वैयक्तिक वा कौटुंबिक, सामाजिक वा देशविषयक अनुभवांच्या चित्रणाला महत्त्वच नव्हते. यामुळे जी थोडी काव्ये अशा तऱ्हेची आढळतात त्यांचे महत्त्व वाढते. या दृष्टीनेच वरील सामाजिक आशयाची काव्ये पाहायची आहेत.

प्राचीन – मध्ययुगीन काव्याची कक्षा

मराठीत ज्याला प्राचीन किंवा 'जुने' काव्य असे आपण म्हणतो ते हिंदुस्थानच्या दृष्टीने मध्ययुगातले काव्य होय आणि मध्ययुग संपून नवयुगात भारताने प्रवेश केला तोपर्यंत त्याची घाटणी तीच होती. गुजरातीत व राजस्थानीत इ०स०च्या पंधराव्या शतकापासून इ०स०च्या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जुने युगच होते व ते इ०स० विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकापर्यंत चालू राहिले. मराठीत इ०स० तेराव्या शतकापासूनचे मराठी काव्य उपलब्ध आहे. नवयुगाची 'तुतारी' इ०स०च्या एकोणिसाव्या शतकाच्या अंतभागात फुंकली गेली, तरी त्याचे जुने वळण इ०स०च्या विसाव्या शतकातील प्रारंभकाळातही चालू होते. हिंदीच्या जुन्या वाङ्मयाचा (काव्याचा) प्रारंभ इ०स० चौदाव्या-पंधराव्या शतकात दाखविता येतो, मात्र आधुनिक युगातली 'खडी बोली' घडून तिच्यात नवे साहित्य निर्माण होण्यास तिला इ०स० विसाव्या शतकाची पहिली एक-दोन दशके पाहावी लागली. बंगालीचे 'प्राचीन' युग इ०स० चौदाव्या शतकानंतर सुरू झाले तरी नवयुगाची चाहूल तेथे इ०स० एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या काही दशकांतच जाणवली. दक्षिण भारतातल्या तमिळ भाषेत साहित्य सुरू झाले इ०स०च्या प्रारंभीच्या काही शतकांत, पण नवयुगाचा श्रीगणेशा विसाव्या शतकाच्या प्रारंभालाच झाला. तेलुगु

व कन्नड काव्याला प्रारंभ उशिराच, इ०स०च्या नवव्या-दहाव्या शतकात झाला. मलयालमूचा उदय त्यानंतरचा. या सर्व भाषांत आधुनिक युगाचे प्रतिबिंब उमटू लागले तेही जरा उशिरानेच म्हणजे विसाव्या शतकात, नवप्रबोधनाची ललकारी मुंबई इलाखा (गुजरात-महाराष्ट्र) व बंगाल (अंग-वंग-कलिंगासह) या प्रदेशात चांगली प्रतिसाद देऊ लागल्यावर. मध्यकालीन प्रेरणांचे पडसाद नवयुगाच्या आरंभानंतरही काही काळ साहित्यात उमटत राहिले. या कारणास्तव 'प्राचीन' गीतांच्या (कवनांच्या) भांडारात इ०स० विसाव्या शतकाच्या सुरुवातीला लिहिल्या गेलेल्या जुन्या वळणाच्या विशिष्ट रचना समाविष्ट करणे अगत्याचे ठरते.

तेराव्या शतकापासून विसाव्या शतका(च्या प्रारंभा)पर्यंत चालू राहिलेल्या अशा या मराठी काव्यरचनेत प्राधान्याने भक्तिमय रसध्वनीची कविता होती हे तर उघडे सत्य आहे. 'पोवाडे-लावण्यां'तला वेगळेपणा तिच्यात बऱ्याच काळानंतर दिसू लागला; त्यात लावण्यांचा रचनाबंध अल्प प्रमाणात वेगळा राहिला, आशय-विषयात पृथक्‌पणा आला. पोवाड्यांचा प्रारंभीचा रचनाबंधही वेगळा होता – लघुचरणांच्या प्रवाही पद्यात त्यांचे 'चौक' गुंफलेले असत. पोवाड्यांचे गायनही वैशिष्ट्यपूर्ण होते – वाद्यसंगीताच्या ताला-सुरात ते सादर केले जात आणि ती साथ-संगीत त्यातल्या आवेशाला मारक ठरत नव्हती. हे पोवाडे शिवशाहीच्या अंतभागापासून पेशवाईच्या अंतकाळापर्यंत चालू होते. पण तेव्हा पोवाडेही तमाशाच्या फडात गेले; व तिथल्या साजसंगीतात त्यांचे स्वतंत्र वैशिष्ट्य फारच थोडे शिल्लक राहिले. पोवाडे सादर करण्याच्या प्रथेविषयीचे हे तारतम्य झाले. नुसत्या वाचनात पोवाड्यांचे वीर-करुणामय वातावरण अजूनही वैशिष्ट्यपूर्ण वाटते. लावणीने कथ्थकाचे नृत्यांग स्वीकारले, हावभाव-अभिनय (जो पोवाड्यात विशेष नसणारच तो) जास्तजास्त वाढत गेला. कीर्तनाच्या रंगातही तो ढंग शिरला, जसे कीर्तनातले अध्यात्म नावापुरते तरी लावणी परंपरेत राहिले!

या भक्तिगीतांच्या आणि लावण्यांच्या परंपरेचे सूत्र इ०स० विसाव्या शतकाच्या प्रारंभ-काळापर्यंत जिवंत राहिले – जुन्या थाटात जिवंत राहिले. म्हणून ही प्राचीन-मध्यकालीन काव्यपरंपरा इ०स० तेराव्या शतकापासून इ०स० विसाव्या शतकापर्यंत मानावयाची.

उपसंहार

आधुनिक सौंदर्यशास्त्र जसजसे विकसत गेले तसतशी समीक्षकांची कलेकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होत चालली, निवळत चालली. समग्र जीवनाचे जसे एकरूप दर्शन घ्यायचे त्याचप्रमाणे कलाकृतीकडेही एक समग्र निर्मिती म्हणून पाहायचे, अशी धारणा निश्चित बैठक घेऊ लागली. साध्य आणि साधन यांत अभेद मानावयाचा, कार्य आणि कारण ही एकरूप असतात असा निर्मितीचा कायदा स्वीकारायचा, हे विचारी समीक्षकांना पटू लागले. 'शरीरम् आद्यं खलु धर्मसाधनम्' असे तत्त्व सांगताना कवीने जणू एक अबाधित सिद्धांतच निर्देशिला : साध्य वस्तूच्या शोधात यश मिळाल्यावर साधनाला फेकून देऊ नका; साध्य हे साधनापेक्षा वेगळे, असंबद्ध आहे असे मानू नका; धर्मविचाराच्या साध्यतेसाठी शरीर हेच साधन आहे, हे समजून घेऊन शरीररूप साधनाला योग्य ते महत्त्व द्या. यात

सातत्याचा सिद्धांत अनुस्यूत आहे. पण 'संपृक्तौ वागर्थौ' यांना प्रत्यक्ष आदिपुरुष व आदिशक्ती यांच्या एकरूपतेचे उपमान करून महाकवीने तर फारच मोठे तत्त्व प्रस्थापित केले: 'अर्थ' हा 'शब्दा'हून भिन्न नाही; त्यांचे अद्वैत शाश्वत आहे; अर्थावाचून शब्द म्हणजे व्यर्थ आवाज, शब्दावाचून अर्थ हे असंभवनीय कपोलकल्पित. पुरुष-प्रकृती यांचे एकजीवपण 'वाक्-अर्थ' यांच्यासारखे 'संपृक्त' आहे, समरूप आहे; केवळ आपल्या बुद्धीला कळण्यासाठी आपण माणसांनी हे दोन तार्किक घटक कल्पिले आहेत, आणि हे दोन्ही घटक पूर्णपणे वेगवेगळे आहेत अशी धारणा त्यामुळे निर्माण झालेली आहे. ह्या वाक्-अर्थ म्हणजेच शब्द-अर्थ यांमधील तार्किक भेदाभेदामुळे फार घोटाळा केलेला आहे. शब्द-नाद हे केवळ एक उपादान-कारण मानले गेले, फक्त एक साधन, द्रव्य; ते केवळ 'इन्स्ट्रुमेन्टल' कारण आहे – निमित्तकारण आहे. अर्थ हे सत्य आहे! पण नादा-शब्दा-वाचून अर्थाचे अस्तित्व अनुमानायचे म्हणजे कोणती तरी 'अर्थ' नामक अशरीरी व्यष्टी गृहीत धरायची; प्लेटोच्या 'आयडिअल् फॉर्म'सारखी ती शाश्वत मानायची हा आध्यात्मिक वेदान्त कालिदासालाही माहीत होता, तरी त्याने 'वाक्-अर्थ' हे अभेद-रूप – संपृक्त आहेत म्हणून त्यांना शिव-पार्वतीच्या चिन्मय एकरूपत्वाचे उपमान मानले.

असा या संपृक्त वागर्थांचे विविध विलास साहित्यात असतात. शब्दार्थांच्या विशिष्ट मांडणीतून, विणणीतून, गुंफणीतून आकृतिबंध तयार होतो. तो तयार होतानाच आपला आशय घेऊन येतो – त्याच्यातच तो असतो, नव्हे, केवळ आकार लाभल्यामुळे तो स्फुट होतो. जुन्या तत्त्वज्ञानात – तर्कमीमांसेत – शब्दांच्या या स्वभावाचे वर्णन 'स्फोट'-शक्ती असे केलेले आहे. त्यामागे अध्यात्म होते, पण व्यक्त होण्यासाठी ते शब्दाला शरण जाते असा त्यातून ध्वन्यर्थ निघतो. आधुनिक नवीन भाषाशास्त्राच्या साहाय्याने आविष्कार-प्रक्रियेचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न 'स्ट्रक्चरॅलिझम'च्या पुरस्कर्त्यांनी चालविला आहे. अगदी अलिकडच्या काळात 'जीव' या कोड्याचे उत्तर डी० एन० ए० – आर० एन० ए० यांतल्या मूलभूत आम्लांच्या विशदीकरणामुळे बहुतेक मिळाल्यासारखे आहे. या सिद्धीमुळे 'जीव' ही काहीतरी अतिभौतिक व्यष्टी न राहता तो भौतिक-रासायनिक आम्लांचाच एक विशिष्ट पद्धतीचा विन्यास आहे हे कळून आले. कलेच्या प्रदेशातही आकृतिबंध आणि आशय यांत असेच अभिन्नत्व असले पाहिजे. शब्दमय आकारावाचून आशयाला अस्तित्व नाही; आशयावाचून शब्दमय आकार निष्फळ व व्यर्थ असा नाद राहील. तुकारामबुवांनी जणू हीच गोष्ट पुढील शब्दांत सांगितली आहे :

आम्हा-घरीं धन शब्दांचींच रत्नें।
शब्दांचींच शस्त्रें, यत्न करूं॥. . . .
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव।
शब्देंचि गौरव, पूजा करूं॥

('प्राचीन गीतमंजूषा', पृ० १२०)

म्हणून शब्द व आशय यांच्या संपृक्त मीलनात नामशब्द व ब्रह्म-सत् यांचे केवलाद्वैत जसे परस्परसापेक्ष आहे तसेच शब्दबंध व आशय यांचे अद्वैत सापेक्षच आहे. म्हणून शब्द व

आशय यांच्या संपृक्त मीलनानेच कलाकृती तयार होते. म्हणून कलाकृती हे एक समग्र दर्शन असते. साधन-माध्यम आणि आशय-विषय यांच्यात मूलतः अभेद आहे. एक दुसऱ्यावाचून अपूर्ण असते. ब्रह्मजिज्ञासेतील गूढवादी सूत्राचा उच्चार करून आपणाला कलामीमांसेतले रहस्यभूत सत्यही सांगता येते :

पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

— *बृहदारण्यकोपनिषत्*

प्राचीन गीतमंजूषा

गीते

। १ । गोरक्षनाथ

पाषाणाचीं देउळें (१)

पाषाणाची देउळें पाषाणाचा देवो। पाषाणाची पाउळी तेथ न फिटे संदेहो।
कैसें बोलों पंडितो देवो कवणे ठाईं। निजलिंग न्याहाळितां आम्हीतुम्ही नाहीं।।
गंगेचे उदकीं स्नान पै कीजे। बाहेर पाखाळितां भीतर केंवि भिजे।।
सजिवें तोडुनि वाहु निर्जिवें पुजिती। कर्मे करुनि प्राणी केंवि उद्धरिती।।
नेणिवेनि हें जग पडियेलें धांदा। आत्मलिंग कोई न बुझति अंधा।।
भणति गोरखराये सद्गुरु वाणी आम्ही। निजलिंग न्याहाळुनि संसारा दिल्हें पाणी।।

: २ : ग हि नी ना थ

आकाश तडतडीं मेरु हा कडाडी (२)

आकाश तडतडीं मेरु हा कडाडी। तरी आत्मसुखगोडी सांडूं नये।।
ऐसिया निर्धारीं जवळी आहे देव। न धरीं संदेह अरे मना।।
वायु जरी सुटे ब्रह्मांड हें आटे। तरी आत्मनिष्ठे भंगों नेदी।
गहिनी म्हणे येथें जीव काय ऐसा। ऐसी पूर्ण दशा आचरावी।।

दृष्टीचें जें आगर (३)

दृष्टीचें जें आगर शून्याचें जें सार। तेंचि दशमद्वार जाण बापा।।
शून्य निरशून्य त्याहिमाजी बीज। तयामाजी गुज गुरुवस्तू।।
जाणण्याचें मूळ अकुळाचें कूळ। अलभ्याचें स्थळ तया ठायीं।।
गोरक्षप्रसादें लाधलिया सुखा। गहिनीचिया द्वीपा तारूं आलें।।

। १ । महानुभाव कवि (अज्ञात)

वेगें रामयात्रे : गेला वो गुजरू (४)

वेगें रामयात्रें : गेला वो गुजरू :
अवस्था-संचारू : रानीयेसी ::

अवस्था-भ्रमित ; न संभाळी कांहीं :
गेला माये कहीं : प्राणनाथ ::

तेनेवीन मज : न गमे साजनी :
चक्रपाणी विन : जाळीत असे ::

तेनेवीन माये : जीवीता नाहीं उरी :
अवस्थेपरी : लोटीयलें ::

वीयोगपावक : न साहे साजनी :
चक्रपानीवीन : जळत असें ::

वीयोगीचा घावो : मज सले अंतरीं :
श्रीमंत गेला दुरी : सांडौनीया ::

सांडौनी गेला : दुर देसा माये :
न संगे कोन्ही सोये : श्रीमंताची ::

गुनाचा निदान : लावन्याचा रासी :
गेला ह्रषीकेसी : सांडौनीया ::

पाहातां चराचर : न दीसे साजनी :
न पुरे चीतनी : डोळेयाची ::

डोळेयाचेनी : न पुरेची देखा :
गेला माये सखा : सांडौनीया ::

माझें दैव उनें : मी रूसु कवना :
नव्हेची त्याच्या गुना : उतराई ::

मागतां आळंकार : मी नेदीच हे :
बोलतां लाज : नाही मज :: . . .

पात्र नव्हें बोला : वंचीला तयासी :
गेला हृसीकेसी : काढुनीया ::

जन्म गेले वाया : जाला निरधारू :
गेला माये गुजरू : सांडौनीया ::

रुसोनीया गेला : न बोलेची माये :
ते सलताती घए : रात्रदीस ::

सांडौनीया गेला : राजा चक्रपानी :
अवस्था माझां मनीं : रात्रदीस ::

अवस्थेचां भरीं : जीवीता नाहीं उरी :
मेळवा झडकरी : चक्रपानी ::

करीतां प्रतिकारू : जीवीता होए नासु :
मीळे हृसीकेसु : तैंची जीनें ::

जीनयाचां पक्षीं : एकची उपावो :
जैं मीळे रावो : यादवाचा ::

जयाची अवस्था तो पैं भेटला (५)

जयाची अवस्था तो पैं भेटला :
देवें मनोरथु पुरवीला आतां :
आतां न संडु माये या देवाचे चरण :
सकला मंगला (तोचि वो) कारण :
नागदेवाचा दातारु श्री सर्वेश्वरु :
शरणांगतां नुपेक्षी करुणाकरु :

मंगळनिधानु कृष्ण देवकिया बाळु (६)

मंगळनिधानु कृष्ण देवकिया बाळु :
मग न लावा वेळु : दोघीजणी जावों वोवाळुं : ध्रु० :

गोपीजनांसहित करिताए विनोदु :
वेखीनि राचो गोविंदु : पावे परमानंदु :
आर्तकरुणाकरु आम्हां देईल अवस्वरु :
नागदेवाचा दातारु : श्री सर्वेश्वरु मनोहरु :

:५: महदंबा

अमरगण गगनीं पाहाति आनंदें (७)

अमरगण गगनीं पाहाति आनंदें।
काळियादमन केलें रायें गोविंदें॥ ध्रु० ॥

भुजंग जीणौनि आले मुरारी।
ब्रीदावली पुढां पढती नागारी॥१॥

माहादाइसांचे स्वामी श्री सर्वेश्वरु।
तो पाहे वो सुंदरी परमेश्वरु॥२॥

आकृरा मंगळे, लवती पिंगळे (८)

आकृरा मंगळे, लवती पिंगळे।
श्रीकृष्ण संध्यावेळे, भेटतील॥

अकृरें घातली संचून गांठी।
आजि द्वारकेरायासी होईल भेटी॥

हातीं विडा बत्तीस पानांचा।
अकृर कान्हाचा निजभक्त॥

कृष्ण-मूळ तो अकृर निगाला।
द्वारका पातला, उछावेंसी॥

अति संभ्रमित अकृर भगत।
तो अवस्वर जानवीत, अंगाजवळी॥.....

।६। दामोदर पंडित

जैसे तरंग सागरा रे (९)

जैसे तरंग सागरा रे : उपजती लया जाती :
अकळ तें बुझे सीध संकेतीं : ब्रह्मादि पदें नासती :॥ ध्रु० ॥

जयाचेनि अनुभवें नाही निद्रा सपन :
तो सुरनाथ बुझलों : आतां न भजों आन कव्हण :

बीजीं उतपती : बीजींचि फळ : ऐसी हे भवरचना :
परतुवा न बुझेंति : मायामूळ कवण : कवणे होए छेदना :

आधें उपरी : बाहेज भीतरीं : पाहतां सचराचरीं :
एक तो आया-गमन निवारी : सकळहि जयाभीतरीं :

तमनासन एक दिनकरू : तैसा असे मारग पर :
नागदेव म्हणे दाता चक्रधर : तो एक वेदविदां आगोचर :

: ७ : केशिराज

सुखसंभोगीं वेल्हाळी (१०)

सुखसंभोगीं वेल्हाळी : कृष्ण-रकुमिणी बाळी :
करितां वीनोद-हासां-रळी :
बोलतां एकमेकां जाला वीतकरु :
श्रीरंग कोपले सये केला अव्हेरु :।। ध्रु० ।।

राउळ उदासीन मासीं : बोलवीतां न बोले आमसीं :
तंव बोलिली भीमकी : मी नेणेंचि ओ गोखी :
हांसलिये पापीण कवतिकीं :
हांसतां बोलतां सुखा अंतर पडीलें : गोविंद सखीए रुसले :

सजणी कोपला प्राणेश्वरु : सांघ आतां काय करुं :
जीवासी सीणु होये थोरु :
तुझांवीण क्षेणभरी : सुख नाहीं अंतरीं :
आकास पडिलें मजवरी :

मज एकी एकी घडी : जाए जुगाअेव्हडी :
कवणा सांधिजे सांकडी :
मी आपणेया आपण : जाहालिये आहाण :
पतिविण न वचति प्राण :

केति आवरुं मनातें : अव्हेरिलें प्राणनाथें :
ह्रदईं आठवे मागातें :
हे अनुभवाची खूण : अनुभवी जाणे :
जे होईल सुजाण सेहाणे :

कैवल्यप्रभु देइल भेटी : सुदीनू होइल सूटी :
सांघेन जीवींची ते आंसी गोठी :
तो सुख सुलभु सुहावा : कृपादृष्टी पाहे मातें :
मग जन्में न सोडी :

जेयासी जयाची आवडी : तेंचि जाणे तयाची गोडी
रसिकु श्रिघारी देइल बुडी :
रुपलें हो मानस काढितां नुपडे :
आणिक सुख नाहीं तयाचेनि पाडें :

मज लागलें प्रेमपिसें : जीवीत उद्धरे कैसें :
उपास धरिले परेसें :
यासि कवण उपावो : जेणें बुझावे यादवरावो :
सेमान्वीत पुरुसोत्तमु करीत लवलाहो :

मी अरबट अशिख वेडी : सवियांची साबडी :
मधुर दृष्टी नव्हे धोंगडी :
हें पुढील अकार्य नेणेंचि होइल ऐसें :
न करी डोळसा आतां पिसुनाचें हांसें :

मी आरज धापसी : बोलों नेणेंचि तुमसीं :
अपराधु झाला रिसीकेसी :
सकळही अनुचीत उपसाहावें मेघश्यामा :
प्रसन्न होइं, कीजो मजवरि क्षेमा :

ऐसे अपकार जीवपति : नाठवावे चीतीं :
परिसाइ माझी वीनती :
आठवीतां वेळोवेळां : पोळते चैतन्यकळा :
सुखदुख तुजपुढें सांगतें गोपाळा :

मोर धर्मालियें अनंता : कान्हा स्वामी जगन्नाथा :
निजील कैसी पाहासी आतां :
मी चरण किंकर तुझे अवधारीं श्रीपती :
मजवरि काइ कोपलेति :

:८: नारोबास बहाळिये

पहातेया पाहारा (११)

पहातेया पाहारा : विरहें अहो कातरा :
गवळणी गुसळण घालिती : सुस्वर शब्दीं गाती :
कान्हया, स्वर्गिंहुनि देव आइकती : ।। ध्रु० ।।

म्हणती सुहृदा सांगातिया : कैं भेटसी जीवासी माझिया :
श्रीमुख दावी आपुलें हो जी : तूं मथुरेच्या राजया :

एकवेळ चोरिया, उतरडी उतरिया : तैं आम्ही धरिलासी पापिणी :
विरु विसरीजो जी आमुचें : तूं कृपाळु कान्हया म्हणौनि :

जमुनेजळीं नाथिला कालिया : तैं हुंबरौनि प्राणासि रुसलीं :
तीयें गोधनें गोविंदा : नंज सुखासि बा मुकलीं :

गाई गोधनें बापुडीं वृंदावनें : सांडिलीं एमुनेचीं पुलिनें :
जाला संसार भारी : तुज एकल्या कान्ह्याविणें :

वेणुवदन त्रिभुवनमोहिया : अही जी पाशाणपाणी जें आंतलें :
बहाळेया नारायणा : स्वामी कृष्णया आमुले रातले :

। ९ । कृष्णभट काळे

पाळांती जंव नारी (१२)

पाळांती जंव नारी : श्री उद्धवदेव पसाइता :
शेणु एकु संभ्रमीता : आंगसीकें देखौनि ॥
कोमाइली मुखकमळें : अती वियोगदुःखानळें :
कृष्णालागीं उताविळें : गोपिवृंदें बोलती ॥ १ ॥

काह्या त्येजियेलें कृष्णें : प्रियोत्तमें म्हणति बाळा :
आतां काइसा पडिताळा : कृष्णा मेळवी उद्धवा ॥
नित्य स्मरों हें गोकुळ : बंध संवंगडे खिरारी :
आम्ही देवीकिया किंकरी : कहीं न विसरों गोविंदा :
सकळकळांविदा सुंदरी : रायां-रायांच्या कुमरी :
आमुतें सांडौनि मुरारी : त्यां प्रणीलं गोपाळ ॥ २ ॥

चंदन आणि हा चंद्र : निऱ्हां तावी कृष्णेवीन :
जंवजंव देखों वृंदावन : तंवतंव अधिका आठवे ॥
कृपादृष्टीचीं अवलोकनें : दुखिस्त जीवाकारणें :
तया प्रियाचें गाऱ्हाणें : आम्ही कवणा सांगावें ॥ ३ ॥

जयाचेनि बळें त्यजौनि कर्में : रास खेळों वृंदावनीं :
ते रात्रि आठवितां काइ सांघों व्येथा : हरैल कृष्णदर्शनीं ॥
जीवींचें आरत : कवणा सांघों दातारा :
काइ तूं नेणसी : सर्वज्ञ आर्तादानी उदारा ॥ ४ ॥

तो देवा कई मिळैल आम्हां : म्हणौनि थोरी अवस्था :
हें आणिकां नैये पै सांघतां : तुज भक्तावाचौनि ॥
मना वाचे सर्व तो होआवा : नित्य वेधलें माझें मन :
ठेविं ठेविं हें ब्रह्मज्ञान : कांइ सांघसि मुनिवर्या ॥ ५ ॥

अनिमीत बंधु आर्तादानी : कृष्णु जीवाचें जीवन :
विनती करावी यादवराया : आम्हां द्यावें सन्निधान ॥
हें जाणवी गोपाळा : जंव ये मागौता पडिताळा :
त्या आशावांचौनि जीविता : ना तरि त्यजौनि प्राणांतें ॥ ६ ॥

यैसी आइकौनियां विनती : उद्धव निगे वेगवतरें :
कृष्णवियोगें तातलीं : देखौनि सकळां कळेवरें ।।
म्हणे सभाग्य या बाळा : दैवें सकळां कैसा वेधु लागला :
अनुमोदित त्यांचा भावो : जीवीं धरूनियां देवो : मथुरापुरी पातला ।। ७ ।।

देखावेया कृष्णनाथा : तयाही थोरी अवस्था :
निमिष न वचे तयाविन : परि हे आज्ञा समर्था ।।
देवा-भक्ता होतां मीळणि : सकळ सुखें ठेंगणीं :
अंतरींचे प्रणयें अलोकिक : माये तें मी कैसें वाखाणिं ।। ८ ।।

दर्शनोत्कंठित चरणिं अनुरक्त : उद्धवु जवळि पातला :
सामर्थ्यांचा रासि आनंदें पूर्ण : कृष्ण डोळां देखिला ।।
नागदेवाचा दातारु : आळिंगौनि सर्वेश्वरु :
परमानंदें तो किंकरु : आपणपें विसरला ।।९ ।।

१० : नाइकबाई

एकी सांघे एकीप्रति (१३)

एकी सांघे एकीप्रति : आइक वो कृष्णाची वेधशक्ति :
तया रूपाची झळकली अभिव्यक्ति : त्या मनोवृत्ति भ्रमत असे॥
पै चमत्कारु मज अंतःकरणा : जेहीं अनुभवील कृष्णराणा :
त्यातें कैसें वाचे प्राणा : त्या तत्क्षेणा न निगतीची॥ १॥

विपरीत वेधलें माझें मन : सखी ये स्वप्नींचें दर्शन :
तै लागौनि दिस-गणन : जन्म मी यैसें गमीत असें॥
म्हणसी असे दृष्टीची प्रीति : अभिळासे असे अधिक रती :
तरि हा अर्थु न धरी चित्तीं : येणें तो जीवपति न पाविजे॥
म्हणसी पद पढिये निर्वाण : तरि हेंही नासंसी तुझीचि आन :
परि तुज वेधलें अंतःकरण : हें तुजवीण कवण जाणे॥ २॥

नाना तपें-व्रत-दानें : येम-नेम पुण्यसाधनें :
वेद-आगमें-श्रुति-पुराणें : तो कृष्ण काइसेनि न पविजे :
तयालागीं कवणा रीगों सरण : विनतीये धरूं कवणाचे चरण :
कवण राखैल संतप्त हे प्राण : तो कृष्णराणा मेळउनी॥ ३॥

विपरीत हें प्रेमाचें पिसें : वेधलीं नेणौनि कैसीं मानसें :
दुःप्राप्त जो सिद्धां सायासें : तया मी कैसें देखों इछीं॥
सेवा ना श्रद्धा भावो ना भक्ती : स्वांवणि नाहीं चित्तवृत्ती :
आता तो (मज) जीवपति : केंविं पाये॥ ४॥

यैसें पुण्य न देखों आन : जेणें देखिजति तयाचे चरण :
जरि तोचि कृपा करी आपण : तरि दर्शन लाहिजैल॥
हे कैं पुरती मनोरथ : जन्हीं जालें जीवा थोर आरत :
जें रूप अव्यक्त अनंत : (तें) प्रेमहीना मज प्राप्त केंवि होय॥ ५॥

प्रकृती लागलें हें पापीये मन : एकांतीं करूं म्हणे तयाचें ध्यान :
तंव हे दाखवी आनेंआन : तेणें माझें मन भ्रमताये॥
परि दृष्टी दिसताये एकी खूण : जें तोचि हा होये यादवराणा :
अति सुजाणा जाणविलें॥ ६॥

आतां असो तयें सकळै बोलणिं : माझी सखी तेचि निर्वाणी :
जिया जाणवीला श्री चक्रपाणी : तियेवीण आन कव्हणी न देखों वो ॥
आता नमो त्या यादवतिलका : मी दैवें हीन माजि-सकळिकां :
परि तुज आठवण जाली ज्या आणिका : त्यांतु घालौनि राखैं मज ॥ ७ ॥

आम्ही चकोर हरि चंद्रमा (१४)

आम्ही चकोर हरि चंद्रमा। आम्ही कळा तो पूर्णिमा॥ १॥
कैसा बाहिजु भीतरीं हरी। बिंबें बिंबला एकसूत्रीं॥ २॥
आम्ही देही तो आत्मा। आम्ही विदेही तो परमात्मा॥ ३॥
ऐक्यपणें सकळ वसे। द्वैतबुद्धि कांहीं न दिसे॥ ४॥
निवृत्ति चातक इच्छिताहे। हरिलागीं वरतें पाहे॥ ५॥

विश्वंभर मूर्ति विश्वाची पाळक (१५)

विश्वंभर मूर्ति विश्वाची पाळक।
वैकुंठव्यापक जीवशिव॥ १॥

तें रूप सुंदर नंदाघरीं वसे।
जनीं वनीं दिसे कृष्णरूप॥ २॥

निखळनिघोट नितंब परिपूर्ण।
आनंदपूर्ण घन गोपवेषें॥ ३॥

निवृत्ति परिकर वैकुंठ अपार।
भाग्य पारावार यशोदेचें॥ ४॥

गगनग्रास घोटीं ब्रह्मांड हें पोटीं (१६)

गगनग्रास घोटीं ब्रह्मांड हें पोटीं।
निमुनी शेवटीं, निरालंबी॥ १॥

तें ब्रह्म साबडें माजि लाडेंकोडें।
यशोदेमायेपुढें खेळतुसे॥ २॥

ब्रह्मांडाच्या कोटी तरंगता उठी।
आपआपासाठीं होत जात ॥ ३ ॥

निवृत्तीचें ध्यान यशोदेचें धन।
वासुदेव खूण, आम्हांमाजी ॥ ४ ॥

पांडुरंगकांती, दिव्य तेज झळकती (१७)

पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती रत्नकीळ फांकती प्रभा।
अगणित लावण्य तेज पुंजाळलें न वर्णवे तेथींची शोभा॥

कानडा हो विठ्ठल कर्नाटकु तेणें मज लावियेलें वेधीं।
खोळ बुंथी घेउनी खुणेचि पालवी आळविला सादु नेदी॥

शब्देंविण संवादु दुजेविण अनुवादु हें तंव कैसेनि गमे।
परेहि परौतें बोलणें खुंटलें वैखरी कैसेनि सांगे॥

पायां पडूं गेलें तंव पाऊलचि न दिसे उभाचि स्वयंभू असे।
समोर कीं पाठमोरा न कळे ठकचि पडिलें कैसें॥

रखुमादेवीवरु हृदयींचा जाणूनि अनुभवु सौरसु केला।
दृष्टींचां डोळां पाहूं गेलें तंव भीतरिं पालटु जाला॥

सुंदर सुरेख ओतिलें (१८)

सुंदर सुरेख ओतिलें, परब्रह्मतेज फांकलें
तें व्योमीं व्योम सामावलें, नयनीं वो माये॥

कमल-नयन सुमन फांकलें
तें परिमळाथिलें, मकरंदीं वो माये॥

संकोचला संसार, पारुषला व्यवहार
ब्रह्मानंद अपार, जाला वो माये॥

मधुर वेदवाणी, न पवे जयाचे गुणीं
ते ठाकविले निर्वाणीं, नेति नेति वो माये॥

या परतें बोलणें, न बोलणें होणें
तें म्यां आपुलें आंगवणें, केलें वो माये॥

ऐसिया तो ओठीं, लागलें तया पाठीं
रखुमादेवीवरीं भेटी, विठ्ठलीं वो माये ।।

एक तत्त्व नाम दृढ धरीं मना (१९)

एक तत्त्व नाम दृढ धरीं मना। हरिसी करुणा येइल तुझी ।।
तें नाम सोपारें रामकृष्णगोविंद। वाचेसी सद्गद जपे आधीं ।।
नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा। वायां आणिका पंथा जाशी झणीं ।।
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं। धरोनी श्रीहरीं जपे सदा ।।

अवघाची संसार सुखाचा करीन (२०)

अवघाची संसार सुखाचा करीन।
आनंदें भरीन तिन्ही लोक ।। १ ।।

जाईन गे माये तया पंढरपुरा।
भेटेन माहेरा आपुलिया ।। २ ।।

सर्व सुकृतांचें फळ मी लाहीन।
क्षेम मी देईन परब्रह्मीं ।। ३ ।।

बापरखुमादेवीवरा विठ्ठलाची भेटी।
आपुलिये संवसाटीं घेऊनि राहे ।। ४ ।।

रंगा येईं वो (२१)

रंगा येईं वो, रंगा येईं वो।
विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई ।। १ ।।

वैकुंठवासिनी वो जगत्रजननी वो।
तुझा वेधु माझे मनीं वो ।। २ ।।

कटी कर विराजित, मुगुटरत्नजडित।
पीतांबरु कसिला तैसा येई कां धांवत वो॥ ३ ॥

विश्वरूप विश्वंभरे कमळनयने कमळाकारे वो।
तुझें ध्यान लागो. बापरखुमादेवीवरे वो॥ ४॥

भवाब्धिसागरिं मांडिली टिपरी (२२)

भवाब्धिसागरिं मांडिली टिपरी परि अनुहात वाजे गजरु वो।
ताळकछंदें उमटति पद वरि टिपरे टिपरी गाजे वो॥ १॥

टिपरिया घाई गोपाळभाई घुळुघुळु पाईं नादु वाजे वो॥ ध्रु०॥

ताळकछंदें वेगू आल्हादें टिपरीनादें वाजति वो।
सांडुनि ओहं धरिलें सोहं तयासि टिपरें साधलि वो॥ २॥

औट हात भूमिका नीट तालछंदें टिपरी धरी वो।
विरळा जाणे एथिंचे खुणे टिपरें वाजे शिरीं वो॥ ३॥

एकटसंगें टिपरें वेगें ध्वनी गगनीं गाजे वो।
बापरखुमादेवीवर टिपरि वाजति घाई जालि टिपरियाजोगी वो॥ ४॥

कृष्णें वेधिली विरहिणी बोले (२३)

कृष्णें वेधिली विरहिणी बोले
चंद्रमा करितो उबारा गे माय।
न लवा चंदनु आंगीं न घाला विंजणवारा
हरिविणें शून्य शेजारु गे माय॥ १॥

माझे जीवीचें तुम्ही कां वो नेणां
माझा बळिया तो पंढरिराणा वो माय॥ २॥

नंदनंदनु घडिघडि आणा
तयाविणु न वाचति प्राणा वो माय॥ ३॥

बापरखुमादेवीवरु विठ्ठलु
गोविंदु अमृतपान गे माय ॥ ४ ॥

कासयाची चाड मज नाहीं (२४)

कासयाची चाड मज नाहीं वो साजणी
एकल्या निर्गुणीं वेधियेलें वो माये ॥ १ ॥

पवनवेगाचेनी अंतरलें तुम्हासी
आतां मागुती वो कैसी परतेन वो माये ॥ २ ॥

ध्यानधारणा तनु-मनु-करणें
ठेवियेलें ठेवणें गोपालचरणीं वो माये ॥ ३ ॥

ऐसें भुलवणीं भुलविलें नयनीं
रखुमादेवीवर-चिंतनीं वो माये ॥ ४ ॥

आजवरी होतें मी मोकाट (२५)

आजवरी होतें मी मोकाट
तंव डोळे फुकट मोडा तुम्ही ॥ १ ॥

समर्थाचे अंगीं पडलें अवचितीं
तुम्हाऐसीं किती चाळविलीं ॥ २ ॥

बापरखुमादेवीवरु विठ्ठलाची घरवात झालें
जन्मवरी एकांत करुनि ठेलें ॥ ३ ॥

चवाळ्याची सांगेन मातु (२६)

चवाळ्याची सांगेन मातु।
चवाळें पांघुरे पंढरीनाथु॥ १ ॥

गोधनें चारितां हरि पांघुरला।
मज चवाळ्याचा त्यागु पैं दिधला॥ २ ॥

बापरखुमादेवीवरु श्रीगुरु राणा।
चवाळें पांघुरवी निरंजना गे माय॥ ३ ॥

कान्होबा तुझी घोंगडी चांगली (२७)

कान्होबा तुझी घोंगडी चांगली
आम्हासी कां दिली वांगली॥ ध्रु० ॥

स्वगत सच्चिदानंदें मिळोनी
शुद्धसत्त्वगुण विणली रे।
षड्गुण गोंडे रत्नजडित तुज
शामसुंदरा शोभली रे॥ १ ॥

काम कर्म अविद्या त्रिगुण
पंचभूतांनी विणली रे।
रक्त रेत दुर्गंधी जंतु
नरक मुताने भरली रे॥ २ ॥

षड्विकार षड्वैरी मिळोनी
तापत्रयांनी विणली रे।
नवा ठायीं फाटुनि गेलि ती
त्वां आम्हासी दिधली रे॥ ३ ॥

ऋषिमुनि ध्यातां मुखीं नाम गातां
संदेहवृत्ती विरली रे।
बापरखुमादेवीवर विठ्ठले
त्वत्पदिं वृत्ति मुरली रे॥ ४ ॥

पहालें रे आजी पहालें रे (२८)

पहालें रे आजी पहालें रे। संतसंगें सुख आजी जहालें रे॥
आम्ही कापडी रे कापडी रे। विघ्नें पळती बारा वाटे बापुडीं रे॥
समता कावडी रे कावडी रे। माजीं नामामृत भरलें आवडी रे॥
येणें ना घडे रे जाणें ना घडे रे। तें रूप पाहतां कोंदाटलें चहुंकडे रे॥
नलगे दंडणें रे नलगे मुंडणें रे। नाम म्हणतां कर्माकर्म फिटलें रे॥
दुःख फिटलें रे दुःख मिटलें रे। बापरखुमादेवीवर विठ्ठलें रे॥

फुगडी फू बाइ फुगडी फू (२९)

फुगडी फू बाइ फुगडी फू। फुगडी फू फुगडी फू॥ ध्रु० ॥

एक-नाम मांडे बाई द्वैतनाम सांडे-तूं॥
निजब्रह्म तूं गे बाइ परब्रह्म तूं गे तूं॥

हरि आला रंगा बाई वैष्णवांच्या संगा गे॥
चित्तमळ धू गे बाई विषयावरि थू गे थू॥

ज्ञानदेव फुगडी बाई संसार उघडी गे॥

चातकाची तृषा मेघें पुरविली (३०)

चातकाची तृषा मेघें पुरविली। ब्रह्मस्तनीं पान्हाइली बाइये वो॥ १ ॥
निवृत्तीप्रसाद माझ्या मुखीं सूदला। प्रेमरसें धारा फुटल्या दोहीं पक्षीं॥ २ ॥
बाप श्रीगुरु तेणें मज अफाविलें। अवघें ब्रह्म दाविलें ज्ञानदेवा॥ ३ ॥

अकल्पित द्रुम आजि संयोगें घडलें (३१)

अकल्पित द्रुम आजि संयोगें घडलें,
अपार आपणातें विसरलें गे माय॥ १॥

महुरलें महुरलें मन माझें मोहरलें,
भक्तिफळासि कैसें आलें गे माय॥ २॥

देंठींहूनी सुटलें पुढतिं जीवनासि आलें,
बापरखुमादेवीवर विठ्ठलें ऐसें केलें गे माय॥ ३॥

आत्मरूपीं रूप रंगलें सहज (३२)

आत्मरूपीं रूप रंगलें सहज। रिगो निजगुज सतेजिलें॥ १॥
तेजबीज बिवड पेरिलें निवाडें। उगवलें चोखडें ब्रह्मरूप॥ २॥
शांतीची गोफण उडविला प्रपंच। धारण आहाच स्थिर केली॥ ३॥
वेटाळिलें धान्य खळेदान दिठीं। दिधलें शेवटीं भोक्तियासी॥ ४॥
देतें घेतें जीवें नुरेचि शेखीं। शिवमेव खोपी समरशीं॥ ५॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति उदारा। ऐसा एकसरा तुष्टलासी॥ ६॥

स्वर्ग जयाची साळोंखा (३३)

स्वर्ग जयाची साळोंखा। समुद्र पाळी पिंड देखा।
शेषासारिखी बैसका। जो आधार तिहीं लोकां॥ १॥

लिंग देखिलें देखिलें। त्रिभुवनीं विस्तारलें॥ ध्रु०॥

मेघधारीं तपन केलें। तारापुष्पीं वरी पूजिलें।
चंद्रफळ ज्या वाहिलें। वोवाळिलें रविदीपें॥ २॥

आत्मनैवेद्य समर्पिले। ब्रह्मानंदीं मग वंदिलें।
ज्योतिर्लिंग मग ध्याइलें। ज्ञानदेवें हृदयीं॥ ३॥

पद गातों मी नेणता (३४)

पद गातों मी नेणता।
शोधुनि पाहें ज्ञानवंता॥ ध्रु० ॥

एक बाळ पुरुष उगवला।
पश्चिम दिशेकडे गेला।
तो कोठोनी हो आला?॥ १ ॥

पाळणा असे टांगला।
साखळदंड नाहीं त्याला।
त्यामध्यें सगुण बाळ घातला॥ २ ॥

आकाशामध्यें नार जन्मली।
बापलेकांनीं भोगीली।
पांचांनीं ती वर्णिली॥ ३ ॥

ज्ञानदेव सांगे खूण।
निवृत्तीच्या कृपेंकरून।
ज्ञानेश्वराला॥ ४ ॥

आरेवरी आर रे पिंपळावरी पार रे (३५)

आरेवरी आर रे, पिंपळावरी पार रे, खालीं कुंभार वरी चाक भोवे॥ १ ॥
डंबडाळकें, उंबरासी वाळकें, पिंपळासि काकड्या लागल्या रे॥ २ ॥
पैल वरले माळीं, कोल्हा करड काढी, ससा वळीतो वेठी रे॥ ३ ॥
निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव म्हणे गुरुमहिमा अनुभववीण जाणती रे॥ ४ ॥

आलाडु आडु पालाडु आडु (३६)

आलाडु आडु पालाडु आडु मध्यें वाहे पाणी ।।
तिहीं संधि खेळु मांडिला सीतादेवी राणी ।।

सुखाति चांदणे रातीं बहुतें खेळति येकु देखों ।।

खेळतां खेळतां नवल पाहे देखणा खिर खाये ।।
सांपडे ते कोण्हा न संगे भोज्या शिवोन राहे ।।

भोगिया शिवोन उतरला डायीं ।।
ज्ञानदेव सांगे निवृत्तीच्या पायीं ।।

कांट्याच्या अणीवर वसति तीन गांव (३७)

कांट्याच्या अणीवर वसति तीन गांव
दोन ओसाड एक वसेचि ना ।। १ ।।

वसेचि ना तेथें आले तीन कुंभार
दोन थोटे एक घडीच ना ।। २ ।।

घडीच ना त्यानें घडलीं तीन मडकीं
दोन कच्चीं एक भाजेचि ना ।। ३ ।।

भाजेचि ना त्यांत रांधले तीन मुगे
दोन हिरवे एक शिजेचि ना ।। ४ ।।

शिजेचि ना त्यांत आले तीन पाहुणे
दोन रुसले एक जेविच ना ।। ५ ।।

जेविच ना त्याला दिल्या तीन म्हशी
दोन वांझ्या एक फळेचि ना ।। ६ ।।

फळेचि ना तिला झाले तीन टोणगे
दोन मेले एक वांचेचि ना ।। ७ ।।

वांचेचि ना त्याचे आले तीन रुपये
दोन खोटे एक चालेचि ना ।। ८ ।।

चालेचि ना तेथें आले तीन पारखी
दोन आंधळे एका दिसेचि ना ॥ ९ ॥

दिसेचि ना त्याला मारल्या तीन बुक्क्या
दोन हुकल्या एक लागेचि ना ॥ १० ॥

ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव
सद्गुरुवांचुनि कळेचि ना ॥ ११ ॥

११ : मुक्ताबाई

योगी पावन मनाचा (३८)

योगी पावन मनाचा। साहे अपराध जनाचा॥
विश्व रागें झालें वन्ही। संतीं सुखें व्हावें पाणी॥
शब्दब्रह्में झाले क्लेश। संतीं मानावा उपदेश॥
विश्वपट ब्रह्मदोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ १॥

सुखसागरीं वास झाला। उंचनीच काय त्याला॥
अहो आपण जैसें व्हावें। तैसें देवेंचि करावें॥
ऐसा नटनाट्य खेळ। स्थिर नाहीं एक वेळ॥
एकापासोनी अनेक झालें। त्यासी पाहिजे सांभाळिलें॥
शून्य साक्षित्वें समजावें। वेद ओंकाराच्या नावें॥
एकें उंचपण केलें। एक अभिमानें गेलें॥
इतुकें टाकुनि शान्ति धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ २॥

वरी भगवा झाला नामें। अंतरीं वश्य केला कामें॥
त्याला म्हणों नये साधू। जगीं विटंबना बाधू॥
आपआपणा शोधुनि घ्यावें। विवेक नांदे त्याच्या सवें॥
आशादंभ अवघे आवरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ३॥

संत तोचि जाणा जगीं। दया क्षमा ज्याचे अंगीं॥
लोभ अहंता नये मना। जगीं विरक्त तोचि जाणा॥
इहपरलोकीं सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखीं॥
मिथ्या कल्पना मागें सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ४॥

एक आपण साधु झाले। येर कोण वाया गेले॥
उठे विकार ब्रह्मीं मूळ। अवघें मायेचें गाबाळ॥
माया नुरे जेव्हां। विश्व ब्रह्म होइल तेव्हां॥
ऐसा उमज आदिअंतीं। मग सुखी व्हावें संतीं॥
चिंता क्रोध मागें सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ५॥

ब्रह्म जैसें तैशापरी। आम्हा वडील भूतें सारीं॥
हात आपुला आपणा लागे। त्याचा करूं नये खेद॥
जीभ दातांनी चाविली। कोणें बत्तिशी पाडिली॥
थोर दुखावलें मन। पुढें उदंड शाहाणे॥

चणे खावे लोखंडाचे। मग ब्रह्मपदीं नाचे॥
मन मारुनि उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ६॥

सुखसागर आपण व्हावें। जग बोधें निववावें॥
बोधा करूं नये अंतर। साधू नाहीं आपपर॥
जीव जिवासी पैं द्यावा। मग करूं नये हेवा॥
तरणोपाय चित्तीं धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ७॥

अहो क्रोधें यावें कोठें। अवघें आपण निघोटें॥
ऐसें कळलें उत्तम। जन तेचि जनार्दन॥
ब्रीद बांधिलें चरणीं। न ये दावितां करणी॥
वेळ क्रोधाचा उगवला। अवघा योग फोल झाला॥
ऐसी थोर दृष्टी धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ८॥

सांडी कल्पना उपाधी। तीच साधूला समाधी॥
वाद घालावा कवणाला। अवघा द्वैताचा हो घाला॥
पुढें उमजेना काय। उडत्याचे खालीं पाय॥
एक मन चेष्टा करी। भुतें बापुडीं शेजारीं॥
अवघी ईश्वराची करणी। काय तेथें केलें कोणीं॥
पुनः शुद्ध मार्ग धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ९॥

गिरिगव्हारें कशासाठी। रागें पुरविली पाठी॥
ऐसा नसावा संन्यासी। परमार्थाचा जो का द्वेषी॥
घर बांधिलें डोंगरीं। विषया हिंडे दारोदारीं॥
काय केला योगधर्म। नाहीं अंतरीं निष्काम॥
गंगाजळ हृदय करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ १०॥

शुद्ध ज्याचा भाव झाला। दुरी नाही देव त्याला॥
अवघीं साधनें हातवटी। मोलें मिळत नाहीं हाटीं॥
अहो आपण तैसें व्हावें। अवघें अनुमानोनी घ्यावें॥
ऐसें केलें सद्‌गुरुनाथें। बापरखुमादेवीकान्तें॥
तेथें कोणीं शिकवावें। सार साधुनियां घ्यावें॥
लडिवाळ मुक्ताबाई। जीव मुद्दल ठायींचे ठायीं॥
तुम्ही तरून विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥ ११॥

आधीं तूं मुक्तचि होतासि रे प्राणिया (३९)

आधीं तूं मुक्तचि होतासि रे प्राणिया
परी वासने पापिणिया नाडिलासी।
आधींचें आठवीं मग घेईं परी
हरिनाम जिव्हारीं मंत्रसार॥ १ ॥

आदिमध्य हरि ऊर्ध्व पैं वैकुंठ।
जाईल वासना हरि होईल प्रगट॥ ध्रु० ॥

एकतत्त्व धरीं हरिनाम गोड
येर तें काबाड विषय-ओठी।
नाम तें सांडवी वासना पापिणी
एक नारायणीं चाड धरी॥ २ ॥

मुक्ताई मुक्तलग सांडिली वासना
मुक्तामुक्ति राणा हरिपाठें।
नामाचेनि घोटें जळती पापराशी
न येसी गर्भवासीं अरे जना॥ ३ ॥

मी सद्‌गुरुची लेक (४०)

मी सद्‌गुरुची लेक। भाव एक॥ ध्रु० ॥

बाई मी निःसंग धांगडी। फेकिलीं प्रपंच लुगडीं।
नाकीं नाहीं नथ काडी। माझें नाव म्हणती आवडी।
जग भुलवीं ग॥ १ ॥

सद्‌गुरु माझा चंद्रमौळी। माझ्या काखेस देउनी झोळी।
मजला हिंडवी आळीआळी। जन म्हणती मज सुकाळी।
(होत) बहुसुख॥ २ ॥

गुरुने मज पाजिली भांग। मग घडला संतसंग।
गुरु गुह्य मजला सांगे। मारुनि हाक॥ ३ ॥

ऐसी म्हणे मुक्ताबाई। जा गे शरण गुरुचे पायीं।
पुन्हा जन्ममरण नाहीं। ऐसी भाक॥ ४ ॥

: १४ : चांगदेव

ब्रह्मांडगोलकीं पवनाच्या पालखीं (४१)

ब्रह्मांडगोलकीं पवनाच्या पालखीं।
अवधूत कवतुकीं पहुडलासे॥ १ ॥

बोलवी चांगया मुक्ताई माता।
ब्रह्मविद्ये परीये सुख देतां॥ २ ॥

डोळा लाउनी निजीं निजला निवांत।
स्वप्नीं वटेश्वर देखिला निवांत॥ ३ ॥

:१५: विसोबा खेचर

येथोनि तेथवरी धांवोनियां गेलों (४२)

येथोनि तेथवरी धांवोनियां गेलों।
कांही नाहीं तें पाहुनियां आलों॥

कोठें गेलों कोठें धांवोनी आलों।
कांही नाहीं तें पाहुनियां धालों॥

खेचर विसा म्हणे नामदेवा।
कांही तें तुम्ही मज दाखवा॥

: १६ : नामदेव

भेटीची आवडी उत्कंठित चित्त (४३)

भेटीची आवडी उत्कंठित चित्त।
न राहे निवांत, कवणे ठाईं॥

जया देखे तया पुसे हेचि मात।
कां मज पंढरिनाथ बोलविना॥

कृपेचा सागर, विठो लोभापर।
माझा कां विसर, पडिला त्यासी॥

माहेरींची आस दसरा-दिवाळी।
बाहे ठेवुनि निढळीं, वाट पाहें॥

सखे वारकरी पंढरीस जाती।
निरोप त्यां हातीं, पाठवीन॥

विटेसहित चरण देइन आलिंगन।
तेणें माझी तनु वोल्हावेल॥

निर्बुजला नामा कंठीं धरिला प्राण।
करितसें ध्यान, रात्रंदिवस॥

धांवूनी जाईन श्रीमुख पाहीन (४४)

धांवूनी जाईन श्रीमुख पाहीन।
इडापीडा घेईन। विठोबाची॥

तया सुखा दृष्टि लागेल वो झणीं।
मग मी साजणी। काय करूं॥

म्हणून माझें चित्त व्यापिलें उद्वेगें।
शिणलों उबगें। जन्मोजन्मीं॥

धरोनियां घालीं जीवाचें अंतरीं।
आंतोनी बाहेरी। जाऊं नेदी॥

वासना पापिणी करील पायरव
मग हा अनुभव। कोठें पाहूं॥

वृत्तीसहित करीन मनाचें सांडणें।
न विसंबें प्राणें। म्हणे नामा॥

नामयाचें प्रेम केशवचि जाणे (४५)

नामयाचें प्रेम केशवचि जाणे।
केशवासि राहणें। नाम्यापाशीं॥

केशव तो नामा नामा तो केशव।
प्रेमभक्तिभाव। मागतसे॥

विष्णुदास नामा उभा केशवद्वारीं।
प्रेमाची शिदोरी। मागतसे॥

जीव तूं प्राण तूं (४६)

जीव तूं प्राण तूं। आम्हा तूं गा विठ्ठला॥
जनक तूं जननी तूं। सोयरा तूं गा विठ्ठला॥
माझा गुरु तूं गुरुमंत्र तूं। सर्वस्व तूं माझें म्हणे नामा॥

बोलूं ऐसें बोलें (४७)

बोलूं ऐसें बोलें। जेणें बोलें विठ्ठल डोले॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं। वाचे विठ्ठलरखुमाई॥
नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं॥

परेहुनी परतें घर। तेथे नांदूं निरंतर॥
सर्व सत्ता आली हातां। नामयाचा खेचर दाता॥

आपुल्या सुखाचा देईन मी वांटा (४८)

आपुल्या सुखाचा देईन मी वांटा। जरी येसी वैकुंठा एक वेळ॥
आपुले निजपदीं तुज बैसवीन। उभा मी राहेन मागें पुढें॥
पीतांबर छाया करीन तुजवरी। जीवें क्षणभरी विसंबेंना॥
अंबऋषि प्रह्लाद रुक्मांगद। त्याहूनि निजपद देईन तुज॥
ऐसा धीर नाम्या होता माझ्या मनीं। परि तूं सर्वांहूनी उदासीन॥
नामा म्हणे केशवा नलगे माझ्या चित्तीं। मज आहे विश्रांती तुझ्या नामीं॥

मुळींच मी जाणें तुझा ठेंगेपणा (४९)

मुळींच मी जाणें तुझा ठेंगेपणा।
काय नारायणा। बोलसील॥

पुरे पुरे आतां तुमचे आचार।
मजशीं वेव्हार। घालूं नका॥

लालुचाईसाठीं मागे भाजीपाना।
लाज नारायणा। तुज नाहीं॥

नामा म्हणे काय सांगों तुझी कीर्ती।
वाऊगी फजीती। करूं तुज॥

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा (५०)

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा।
माझिया सकळां। हरिच्या दासां॥

कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं।
हे संतमंडळी। सुखी असो॥

अहंकाराचा वारा न लागो राजसां।
माझ्या विष्णुदासां। भाविकांसी॥

नामा म्हणे तयां असावें कल्याण।
ज्यांमुखीं निधान। पांडुरंग॥

अडखळूनी पडसी घालूं नको जोडा (५१)

अडखळूनी पडसी घालूं नको जोडा।
धांवत दुडदुडा येईं आतां १॥

बैसावयासाठीं घेऊं नको घोडा।
धांवत दुडदुडा येईं आतां॥ २॥

भोजना बैसलासी येथें घेईं विडा।
धांवत दुडदुडा येईं आतां॥ ३॥

बाहुबळें काढिला देवांचा जो खोडा।
धांवत दुडदुडा येईं आतां॥ ४॥

कृपाळू बहुत लक्ष्मीचा जोडा।
त्याला बाहतसे वेडा नामदेव॥५॥

गड्यांनो राजा कीं रे झाला (५२)

गड्यांनो राजा कीं रे झाला॥ कृष्ण सिंहासनीं बैसला॥ १॥

पांवा मोहरी घोंगडी। आम्ही खेळूं यमुनेथडीं॥
नाचा पाउला देहुडीं। कृष्ण आमुचा कीं रे गडी॥ २॥

खेळूं हुतूतू हुंबरी। थडक हाणों टिरीवरी॥
आतां चालिला दळभारी। आमचे यशोदेचा हरी॥ ३॥

कुस्ती खेळतां कासाविसी। शेंबुड खरकटें नाकासी॥
कडे घेऊं सावकाशी। आतां बहु भितों यासी॥ ४॥

आम्ही तुम्ही सर्वे जाऊं। गाई वळावया जाऊं॥
त्याचे मानेंत बुक्क्या देऊं। जवळी जावयासी भिऊं॥ ५॥

नामा म्हणे चला जाऊं। हात जोडोनि उभे राहूं॥
पायां पडून मागून घेऊं। जनिंवनिं तोचि कृष्ण ध्याऊं॥ ६॥

यशोदे घराकडे चाल, मला जेवूं घाल (५३)

यशोदे घराकडे चाल। मला जेवूं घाल॥ ध्रु० ॥

साध्या गव्हाची पोळी लाटीं। मला पुरणपोळी करुन दे मोठी।
नाही अडवीत गुळासाठीं। मला जेवूं घाल॥ १॥

तूप लावून भाकर करीं। वांगें भाजून भरीत करीं।
वर कांद्याची कोशिंबिरी। मला जेवूं घाल॥ २॥

आई ग खडीसाखरेचे खडे। लवकर मला करुन दे वडे।
बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे। मला जेवूं घाल॥ ३॥

आई लहानच घे गे उंडा। लवकर भाजून दे मांडा।
लांब गेल्या गाईंच्या झुंडा। मला जेवूं घाल॥ ४॥

आई मी खाईन शिळा घांटा। दह्याचा करुन दे मठ्ठा।
नाहीं माझ्या आंगीं ताठा। मला जेवूं घाल॥ ५॥

भाकर बरीच गोड झाली। भक्षून भूक हारपली।
यशोदेने कृपा केली। मला जेवूं घाल॥ ६॥

आई मी तुझा एकुलता एक। गाई राखितों नऊ लाख।
गाई राखून झिजलीं नखं। मला जेवूं घाल॥ ७॥

नामा विनवी केशवासी। गाई राखितों वनासी।
जाऊन सांगा यशोदेसी। मला जेवूं घाल॥ ८॥

कृष्णा तुला मी ताकीद करितें (५४)

कृष्णा तुला मी ताकीद करितें,
कोणाच्या घरिं कधिं जाऊं नको॥ ध्रु० ॥

गवळ्या-घरीं बोभाट उठला,
माठ दह्याचे फोडूं नको॥ १ ॥

रागीट तुझा पिता नंदजी,
मार तयाचा खाऊं नको॥ २ ॥

आली गवळण कपटी राधा,
तिच्या घरा तूं जाऊं नको॥ ३ ॥

पाळण्यांत घालुनि झोके देतें,
आतां मुळीं तूं रडूं नको॥ ४ ॥

वरज, वांकड्या, पेंद्या, सुदामा,
त्यांच्या डावामधें जाऊं नको॥ ५ ॥

नामा म्हणे पतितपावन,
त्याच्या नामा विसरुं नको॥ ६ ॥

कान्होबाची संगती ब्रह्मादिक इच्छिती (५५)

कान्होबाची संगती ब्रह्मादिक इच्छिती
धन्य आम्हां म्हणती आललल रे॥ ध्रु० ॥

अजगर मारीला वणवा तो गिळिला
गोवर्धन उचलला अबबब रे॥ १ ॥

मामा मारूं गेलासी आपटलें गजासी
मल्लयुद्ध खेळशी हुतुतुतु रे॥ २ ॥

पूतनेसी शोषिलें नारदासी मोहिलें
गणिकेसी तारिलें अहाहाहा रे॥ ३ ॥

गौळ्यांच्या घरीं जाशी दुग्धलोणी खादसी
त्यांच्या सुना भोगिसी छीछीछीछी रे ॥ ४ ॥

मुरली घेऊन सत्वरीं जाशी यमुनेतीरीं
वाजवीशी नानापरी रुण् झुण् रुण् झुण् रे ॥ ५ ॥

यमुनाडोहीं पोहतां काळिया तेथें होता
नाचतसे त्यांचे माथां थैथैथैथै रे ॥ ६ ॥

गोपी गेल्या स्नानाशी वस्त्र वृक्षीं ठेवीशी
नागव्या त्यांना नाचविशी अरेरेरेरे रे ॥ ७ ॥

सोळा सहस्त्र गोपींशीं कृष्णनाथा भोगीशी
ब्रह्मचारी म्हणविशी ळुळुळुळु रे ॥ ८ ॥

ऐसे तुझे पवाडे वर्णिताती वाडेंकोडें
विष्णुदासनामा म्हणे हुहुहुहु रे ॥ ९ ॥

मुक्ताफळ नथ नाकीं (५६)

मुक्ताफळ नथ नाकीं। चरणीं ल्याली वाळे वांकी।
पीतांबरें अंग झाकी। कृष्णम्मा माझी ॥

खांद्यावरी कांबळी। पायघोळ लांबली।
पांघरली धाबळी। कृष्णम्मा माझी ॥

गाईपाठीं लागली। पळतां नाहीं भागली।
मायबहिण चांगली। कृष्णम्मा माझी ॥

देहुडा पावलीं। उभी माझी माउली।
विश्रांतीची साउली। कृष्णम्मा माझी ॥

उभी नीट विटेवरी। शोभे भिंवरेचे तीरीं।
नामयाची कैवारी। कृष्णम्मा माझी ॥

अग्नी जाळी तरी न जळती पांडव (५७)

अग्नी जाळी तरी न जळती पांडव।
हृदयीं माधव धरिला म्हणोनी॥ १॥

अग्नी जाळी तरी न जळती गोपाळ।
हृदयीं देवबोल धरिला म्हणोनी॥ २॥

अग्नी जाळी तरी न जळे हनुमंत।
हृदयीं सीताकांत म्हणोनीयां॥ ३॥

अग्नी जाळी तरी न जळे प्रह्लाद।
हृदयीं गोविंद म्हणोनियां॥ ४॥

अग्नी जाळी तरी न जळे पैं सीता।
हृदयीं रघुनाथा धरिलें म्हणोनी॥ ६॥

लंकेसी उरलें बिभीषणाचें घर।
हृदयीं सीतावर धरिला म्हणोनी॥ ६॥

नामा म्हणे स्वामी स्मरावें गोविंदा।
चुके भवबाधा संसाराची॥ ७॥

अल्याड पल्याड पताकांचे भार (५८)

अल्याड पल्याड पताकांचे भार।
मध्यें मनोहर इंद्रायणी॥ १॥

पिवळ्या, पारव्या आणिक हिरव्या।
नीळवर्ण साऱ्या लखलखीत॥ २॥

जरी जरतारी झाल्या रानभरी।
विजा तयांवरी खेळताती॥ ३॥

सर्पाकार दंड तारांगणावाणी।
पताका तिकोनी दाटताती॥ ४॥

नामा म्हणे तेथें पताकांचे भार।
केव्हडें भाग्य थोर ज्ञानोबाचें॥ ५॥

उगमापासुनी गंगा सागरासी गेली (५९)

उगमापासुनी गंगा सागरासी गेली।
काय दोन जालीं उदकें त्यांचीं॥ १॥

तैसा ज्ञानदेव जाला अनुभव।
काय आम्हां देव दुरावला॥ २॥

सरिता सरोवराचे एके ठायीं झरे।
लहानथोर सारे स्वरूपीं माझ्या॥ ३॥

रुक्मादेवीवरें उगविलें गाबाळ।
संत कृपाळ डुल्लताती॥ ४॥

नामा म्हणे येणें मोहिलें चित्त।
राहिले तटस्थ चौघेजण॥ ५॥

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा (६०)

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा
मन माझें केशवा कां बा नेघे॥ १॥

सांग पंढरिराया काय करूं यासी
कां रूप ध्यानासी नये तुझें॥ २॥

कीर्तनीं बैसतां निद्रे नागविलें
मन माझें गुंतलें विषयसुखा॥ ३॥

हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति
न ये माझ्या चित्तीं नामा म्हणे॥ ४॥

देह जावो अथवा राहो (६१)

देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो॥ १॥
चरण न सोडीं सर्वथा। तुझी आण पंढरिनाथा॥ २॥
वदनीं तुझें मंगळ नाम। हृदयीं अखंडित प्रेम॥ ३॥
नामा म्हणे केशवराजा। केला नेम चालवीं माझा॥ ४॥

घालीन लोटांगण, वंदीन चरण (६२)

घालीन लोटांगण वंदीन चरण
डोळ्यांनी पाहीन रूप तुझें॥ १॥

प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन
भावें ओवाळिन म्हणे नामा॥ २॥

युगें अठ्ठावीस विटेवरी ऊभा (६३)

युगें अठ्ठावीस विटेवरी ऊभा।
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा॥
पुंडलिकाभेटीं परब्रह्म आलें गा।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा॥ १॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा।
रखुमाईवल्लभा, राहीच्या वल्लभा पावें जिवलगा॥ ध्रु०॥

तुलसीमाळा गळां कर ठेवून कटीं।
कासे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं॥
देव सुरवर नित्य येति भेटीं।
गरुड-हनुमंत पुढें उभे राहती॥ २॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
चंद्रभागेमाजीं स्नान जे करिती॥

दर्शन-हेळामात्रें तयां होय मुक्ती।
केशवासी नामदेव भावें ओवाळिती॥ ३ ॥

निवृत्ति म्हणे करितां समाधान (६४)

निवृत्ति म्हणे करितां समाधान।
कांहीं केल्या मन राहात नाहीं॥ १ ॥

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट।
ओघ बारा वाट मुरडताती॥ २ ॥

बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा।
तृण रानोमाळा पांगलेंसे॥ ३ ॥

हरिणीवीण खोपी पडियेली वोस।
दशदिशा पाडस भ्रमताती॥ ४ ॥

मायबापें आम्हां त्यागियेलें जेव्हां।
ऐसें संकट तेव्हां झालें नाहीं॥ ५ ॥

नामा म्हणे देवा पेटला हुताशन।
करा समाधान निवृत्तीचें॥ ६ ॥

देव-निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर (६५)

देव-निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर।
जातो ज्ञानेश्वर बैसावया॥ १ ॥

नदीचिया माशा घातलें माजवण।
तैसें जनवन कालवलें॥ २ ॥

दाही दिशा धुंद उदयास्तावीण।
तैसेंचि गगन कालवलें॥ ३ ॥

जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी।
पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली॥ ४ ॥

ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा।
पादपद्मीं ठेवा निरंतर॥ ५॥

तीन वेळ तेव्हां जोडिलें करकमळ।
झांकियेले डोळे ज्ञानदेवें॥ ६॥

भीममुद्रा डोळा निरंजन मैदान।
झाले ब्रह्म पूर्ण ज्ञानदेव॥ ७॥

नामा म्हणे आतां लोपला दिनकर।
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ॥ ८॥

मोतीयांचा चूरा फेंकिला अंबरीं (६६)

मोतीयांचा चूरा फेंकिला अंबरीं
विजुचीयापरी कीळ झालें॥ १॥

जरीपितांबरें नेसविलीं नभा
चैतन्याचा गाभा नीळबिंदु॥ २॥

तळीपरी परसें शून्याकार झालें
सर्पाचींही पिलें नाचूं लागे॥ ३॥

कडकडूनी वीज निमाली ठायींचे ठायीं
भेटली मुक्ताबाई गोरोबाला॥ ४॥

ज्ञानदेव म्हणे कैसी झाली भेट
ओळखिलें अविट आपुलेपण॥ ५॥

नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया (६७)

नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया, नाहीं तेंचि दिसूं लागलें रे।
अरूप होतें तें रूपासी आलें जीवशिव नाम पावलें रे॥ १॥

आपलीच आवडी धरून खेळिया, आपआपणातें व्यालें रे।
जोपनाकारणें केली बायको तिनें एवढें वाढविलें रे॥ २॥

ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें जाणुनि खेळ खेळें रे॥ ध्रु० ॥

ब्राह्मणाचें पोर एक खेळासि भ्यालें तें बारा वर्षे लपालें रे।
कांपत कांपत बाहेर आलें तें नागवेंचि पळून गेलें रे॥ ३ ॥

साहा तोंड्या एक शंभूचें बाळ त्याने बहुतचि बळ आथियलें रे।
खेळ खेळतां दगदगी व्यालें तें कपाट फोडुनि गेलें रे॥ ४ ॥

चहूं तोंड्याचा पोर एक नारयाहि जाण तो खेळियांमाजी आगळा रे।
कुचालि करुनि पोरें भांडवी आपण राहे वेगळा रे॥ ५ ॥

गंगा गौरि दोघी भांडवी संभ्यासी धाडिलें राना रे।
खेळ खेळे परि डायीं न सांपडे तो एक खेळिया शाहाणा रे॥ ६ ॥

खेळियामाजीं हनुम्या शहाणा ना पडे कामव्यसनीं रे।
कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा तेथें कैचें भांडण रे॥
रामागड्याची आवडी मोठी म्हणूनि लंके पेण रे॥ ७ ॥

यादवांचा पोर एक गोप्या भला तो बहुतचि खेळ खेळला रे।
लहानथोर अवघें मारिलीं खेळचि मोडूनी गेला रे॥ ८ ॥

ऐसे खेळिये कोट्यानकोटी गणित नाहीं त्याला रे।
विष्णुदास नामा म्हणे वडील हो पाहा देहीं शोधुनी रे॥ ९ ॥

राईयेवढें पांखरुं (६८)

राईयेवढें पांखरुं त्रिभुवनिं त्याचा फेरा रे॥
नर आणि नारी तया पांखराचा चारा रे॥
पिंडामध्यें आहे त्याचा शोध तुम्ही करा रे।
मेरुच्या शिखरीं त्या पांखराचा थारा रे॥ १ ॥

येऊनि संसारा याचा अनुभव तुम्ही करा रे।
चौऱ्यांशी लक्ष योनी चुकेल जन्माचा फेरा रे॥ ध्रु० ॥

अठ्ठावीस योजनें तया पांखराचा फेरा रे।
बत्तिसा मुखांनीं तें बा घेतसे चारा रे॥
अहं सभेमध्ये याचा शोध तुम्हि करा रे।
अकराही लोचन तया चोंची असती फारा रे॥ २ ॥

एकवीस स्वर्गांहुनी तया पांखराची उंची रे।
सातही पाताळांखालीं तया पांखराची नींची रे॥
नेत्रांतील बाहुली तया पांखराची निची रे।
उडालें पांखरूं सप्तही सागर घेऊन चोचीं रे॥ ३ ॥

ऐसें तें पांखरुं दादा आहे सृष्टीवरी रे।
मेरु आणि मांदार तया पांखराचे उदरीं रे॥
शिवाचें आसन दादा कवणिये परी रे।
पिंडीं आणि ब्रह्मांडीं म्हणती दशवे दारीं रे॥ ४ ॥

ऐसें तें पांखरुं गोरक्षरायें वळखिलें रे।
पिंडीं आणि ब्रह्मांडीं मछिंद्रनाथें देखियेलें रे ॥
त्याचियेनि अंगसंगें सद्गुरुनाथें दाखविलें रे।
त्याचियाचि प्रसादें नाम्या शिंप्यानें गाईलें रे॥ ५ ॥

मुंगी व्याली शिंगी झाली (६९)

मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती।
सतरा रांजण भरून गेले पेले बारा हत्ती॥ १ ॥

आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें॥ ध्रु० ॥

लटिकें गेलें फटकें तेथें गाडग्याएवढे राळे।
उडत चिमणी चरत चाले तिचे वाटीयेवढे डोळे॥ २ ॥

शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी।
उंदीर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी॥ ३ ॥

पाण्यांत कांसव गीत गाय वनांत कोल्हा नाचे।
सावज मनीं संतोषला खोकड पुस्तक वाचे॥ ४ ॥

कांतणीघरीं लग्न लागलें सरडा कणीक कांडी।
बागुल वंध्या कण्या (वंध्याकन्या?) परणी घुबड मांडे रांधी॥५॥

बाभुळीचे खोडीं माशाने केलें कोटें।
सशाने सिंह ग्रासला बेडुक आले लोटें॥ ६ ॥

विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याती।
लटिकें म्हणतील त्यांचे पूर्वज नरका जाती॥ ७ ॥

: १७ : जनाबाई

पदक विठ्ठलाचें गेलें (७०)

पदक विठ्ठलाचें गेलें। ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें॥ १॥
अगे शिंपियाचे जनी। नेलें पदक दे आणुनी॥ २॥
देवासमोर तुझें घर। तुझें येणें निरंतर॥ ३॥
म्यां नेलें नाहीं जाण। सख्या विठोबाची आण॥ ४॥
धोतर झाडूनी पाहती। पडलें पदक घेऊनी जाती॥ ५॥
जनीवरी आली चोरी। ब्राह्मण करी मारामारी॥ ६॥
धाविन्नले चाळिस गडी। जनीवरी पडे उडी॥ ७॥
दंडीं लाविल्या काढण्या। विठोबा धांव रे धांवण्या॥ ८॥
चंद्रभागे रोविला शूळ। जनाबाईस आलें मूळ॥ ९॥
हातीं टाळी वाजविती। मुखीं विठ्ठल बोलती॥ १०॥
विलंब लागला ते वेळीं। म्हणती जनीला द्या रे सुळीं॥ ११॥
ऐसा येळकोट केला। जनी म्हणे विठो मेला॥ १२॥
तंव सुळाचें झालें पाणी। धन्य म्हणे दासी जनी॥ १३॥

मांडियेला खेळ (७१)

मांडियेला खेळ। बुद्धि-रंगाचें बुद्धिबळ॥ १॥
कैसा शह झाला। प्यादा फर्जीसवें मेला॥ २॥
शह बाजी झाली। म्हणे जनी मात केली॥ ३॥

सुंदर माझें जातें गे (७२)

सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें।
ओंव्या गाऊं कौतुकें तूं ये रे बा विठ्ठला॥ १॥

जीवशिव दोन्ही खुंटे गे प्रपंचाचे नेटे गे।
लावुनि पांची बोटें गे तूं ये रे बा विठ्ठला॥ २॥

सासू आणि सासरा तिसरा।
ओंव्या गाऊं भ्रतारा तूं ये रे बा विठ्ठला ।। ३ ।।

बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी।
ओंव्या गाऊं बसूनि तूं ये रे बा विठ्ठला ।। ४ ।।

प्रपंच दळण दळिलें पीठ भरिलें।
सासूपुढें ठेविलें तूं ये रे बा विठ्ठला ।। ५ ।।

सत्त्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरिलें।
पाप तें उतूं गेलें तूं ये रे बा विठ्ठला ।। ६ ।।

जनीं जातें गाइल कीर्त राहिल।
थोडासा लाभ होइल तूं ये रे बा विठ्ठला ।। ७ ।।

विठो माझा लेंकुरवाळा (७३)

विठो माझा लेंकुरवाळा। संगें लेंकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी ।।
पुढें चाले ज्ञानेश्वर। मागें मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडीवरी। चोखा जीवा बरोबरी ।।
वंका (बंका) कडियेवरी। नामा करांगुळी धरी ।।
जनी म्हणे (बा) गोपाळा। करी भक्तांचा सोहळा ।।

विठ्या विठ्या विठ्या, मूळ मायेच्या कारट्या (७४)

विठ्या विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या ।। १ ।।
विठ्या तुझी रांड झाली। जन्मोजन्मीं चुडे ल्याली ।। २ ।।
विठ्या तुझें गेलें मढें। तुला पाहून काळ रडे ।। ३ ।।
माझ्या वेळीं कुठें गेला। जनी म्हणे विठ्ठल मेला ।। ४ ।।

काल पाहिला हरी यमुनेच्या तीरीं (७५)

काल पाहिला हरी, यमुनेच्या तीरीं।
कान्हा वाजवितो बांसरी॥ ध्रु० ॥

बारा तेरा गौळ्यांच्या नारी
जात व्हत्या यमुनेच्या तीरीं
कृष्णा (लपला) कळंबावरी
मारिला खडा, केला चुरा, चट फोडिल्यात घागरी।
कान्हा वाजवितो बांसरी॥ १ ॥

यश्वदा धुंडिति गोकुळनगरी
अवचित देखिला राधिकेच्या घरीं
राधिकेच्या घरीं, कृष्ण पलंगावरी, राधा झाली मनीं घाबरी।
कान्हा वाजवितो बांसरी॥ २ ॥

यश्वदा म्हने, बा श्रीहरी
नको छळूं तूं गोकुळनगरी
जनी म्हणे देवा, बरा केला कावा, तुमि असून ब्रह्मचारी।
कान्हा वाजवितो बांसरी॥ ३ ॥

राधे तुला पुसतो घोंगडिवाला (७६)

राधे तुला पुसतो घोंगडिवाला॥ ध्रु० ॥

जमवुनि पोरें गेला यमुनेच्या तीरीं,
वांटितो गोपाळकाला॥ १ ॥

रात्रीं माझ्या मंदिरिं येऊनि,
निरोप सांगुनि गेला॥ २ ॥

हातीं घेऊनियां वेणू,
नेसुनि पितांबर पिवळा॥ ३ ॥

जनी म्हणे विठू हा आला
गळां वैजयंतीमाळा॥ ४ ॥

खडतरलें आसन त्यावर झुडतरलें वसन (७७)

खडतरलें आसन, त्यावर झुडतरलें वसन।
तुज कैंचें रत्नसिंहासन रे विठोबा॥ १॥

काय करूं उपचार, भक्तिभावाचा लाचार।
तो तूं विश्वीं विश्वंभर सर्वसाक्षी रे विठोबा॥ २॥

मोडकीसी बाज, त्यावर वाकळाची शेज।
तुज सुकुमारासी नीज कैसी येईल रे विठोबा॥ ३॥

फुटकासा तुंबा, कैसा उदक पिशी बा।
ताट वाढुनि रुक्मिणीरंभा वाट पाहे रे विठोबा॥ ४॥

वाळलें चिळलें कुटकें, शिळें आणि तुटकें
मज दासी जनी-घरिंचें विटकें खासी रे विठोबा॥ ५॥

: १८ : गोंदा

सेज सिद्ध झाली, निजा श्रीधरा (७८)

सेज सिद्ध झाली, निजा श्रीधरा।
आज्ञा द्यावी लोकां जाती आपुल्या घरां॥ १ ॥

रात्र बहुत झाली देवा चला मंदिरा।
राहिरखुमाबाई वाट पाहाती सुंदरा॥ २ ॥

तुम्हा समोरास देवा झाली पंढरी।
विनटला चरणीं गोंदा उभा राहिला द्वारीं॥ ३ ॥

:१९: महादा

यादवांचे कुळीं झोंड जें जन्मलें (७९)

यादवांचे कुळीं झोंड जें जन्मलें।
नाहीं ऐसें केलें मागेंपुढें॥ १॥

देईं गा विठोबा आमुचें ठेवणें।
लोकांचें तूं ऋण नेदों पाहसी॥ २॥

आमुचे साधु आहेत सज्जन।
तुमचा जमान कोठें देवा॥ ३॥

नामयाचा महादा बळकट झाला।
विठोबा आणिला चौबारांत॥ ४॥

:२०: विठा

मांजराचे डोळे गेले (८०)

मांजराचे डोळे गेले। उंदिर धराया तळमळे।।
तैसा नव्हे रे संन्यास। धांवे विषयावरी हव्यास।।
वेश्या झाली पट्टराणी। स्मरिना पूर्वील करणी।।
सर्प प्रतिवर्ष पालटे। परि अहंकार न पालटे।।
पहिलें पोशिलें मर्कटा। कोणी शिकविल्या चेष्टा।।
म्हणे नामयाचा विठा। वज्र लागो या लल्लाटा।।

: २१ : आऊबाई

शून्य साकारलें साध्यांत दिसे (८१)

शून्य साकारलें साध्यांत दिसे।
आकार नासे तेथें शून्याकार दिसे॥ १॥

शून्य तें सार शून्य तें सार।
शून्यीं चराचर, सामावलें॥ २॥

नामयाची बहिण आऊबाई शून्यीं सामावली।
विठ्ठलीं राहिली चित्तवृत्ती॥ ३॥

: २२ : लिंबाई

तारीं मज आतां रखुमाईच्या कांता (८२)

तारीं मज आतां रखुमाईच्या कांता।
पंढरीच्या नाथा मायबापा ॥ १ ॥

अनाथाचा नाथ ऐकियेलें कानीं।
सनकादिक मुनी बोलताती ॥ २ ॥

त्यांचिया वचनाचा पावोनी विश्वास।
धरिली तुझी कास पांडुरंगा ॥ ३ ॥

नामयाची लेकी लिंबाई म्हणे देवा।
कृपाळू केशवा सांभाळावें ॥ ४ ॥

: २३ : सेना न्हावी

हंबरोनी येती, वत्सा धेनु पान्हा देती (८३)

हंबरोनी येती। वत्सा धेनु पान्हा देती॥ १॥
तुम्हीं करावा सांभाळ। माझा अवघा सकळ॥ २॥
विसरली भूक तहान। तुमचे देखिल्या चरण॥ ३॥
सेना म्हणे प्रेम भातुकें। द्यावें आतां हें कौतुकें॥ ४॥

आम्ही वारीक वारीक (८४)

आम्ही वारीक वारीक। करूं हजामत बारीक॥ १॥
विवेकदर्पण आयना दाऊं। वैराग्य चिमटा हालउं॥ २॥
उदक शांती डोई घोळूं। अहंकाराची शेंडी पिळूं॥ ३॥
भावार्थाच्या बगला झाडूं। कामक्रोध नखें काढूं॥ ४॥
चौवर्णा देउनि हात। सेना राहिला निवांत॥ ५॥

गोपिका वेल्हाळा (८५)

गोपिका वेल्हाळा। अवघ्या मिळोनी सकळा।
चालिल्या यमुनाजळा। तंव सन्मुख देखिला सांवळा वो॥ १॥

राधा म्हणे बहुचाळक होसी। नसता आळ कां आम्हावरी घेसी।
त्वां देखिलें यशोदेसी। हा लबाड लटका हृषीकेशी वो॥ २॥

यशोदा म्हणे कवटाळिणी। नसती खोडी करितां देखुनी।
सांगतां गाऱ्हाणें येउनी। गुणातीत हा चक्रपाणी वो॥ ३॥

राधा म्हणे यशोदा सुंदरी। चोरटा शिंदळ तुझा मुरारी।
आम्हा ठाऊक अंतरीं। हा न करी तें (करी) काय सांगुं वो॥ ४॥

हा ब्रह्मांडनायक। येणें मोहिले तिन्ही लोक।
सेना म्हणे यदुनायक। कर्मातीत परिपूर्ण वो॥ ५॥

:२४: गोरा कुंभार

निर्गुण रूपडें सगुणाचे बुंथीं (८६)

निर्गुण रूपडें सगुणाचे बुंथीं।
विठ्ठल निवृत्ति, प्रवृत्ति दिसे॥ १॥

एक पुंडलीक जाणे तेथील पंथ।
तुम्हां आम्हां चित्त भाग्ययोगें॥ २॥

सभाग्य विरळे नामापाठीं गेले।
अभागी ते ठेले, मौन्यरूप॥ ३॥

म्हणे गोरा कुंभार नामया भोगितां।
उरल्या उचितां सेवूं सुखें॥ ४॥

देवा तुझा मी कुंभार (८७)

देवा तुझा मी कुंभार। नासीं पापाचे डोंगर॥
ऐशा संतप्तें हो जाती। घडे साधूची संगती॥
पूर्ण कृपा भगवंताची। गोरा कुंभार मागे हेंचि॥

जोहरियाचे पुढें ठेवियलें रत्न (८८)

जोहरियाचे पुढें ठेवियलें रत्न। त्याचें मोल उणें होइल कैसें॥
तैसें थापटणें पारखीयाहातीं। आणिका न देती वायांवीण॥
प्रथम थापटणें निवृत्तीचे डोक्या। डेरा जाहला निका परब्रह्म॥
तेंची थापटणें ज्ञानदेवावर। आता कैचें कोरें नुरे येथें॥
तेंची थापटणें सोपानाच्या डोई। यांत लेश नाही कोरें कोठें॥
तेंची थापटणें मुक्ताबाईसी हाणी। अमृत संजीवनी भरलीसे॥
तेंची थापटणें नामदेवावर। चोळीत समोर रडूं लागे॥
गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई। शून्यभार नाहीं भाजियेला॥

:२५: सांवता माळी

आमुची माळियाची जात (८९)

आमुची माळियाची जात। शेत लावूं बागाईत॥ १॥
आम्हाहातीं मोटनाडा। पाणी जातें फूलझाडा॥ २॥
शांति-शेवंती फूलली। प्रेमजाईजुई व्याली॥ ३॥
सांवताने केला मळा। विठ्ठल देखियला डोळां॥ ४॥

पैल पाहा हो परब्रह्म भुललें (९०)

पैल पाहाहो परब्रह्म भुललें। जगदीश कां हो परतंत्र जाले॥
काय सुख केलें येणें नेणिजे। कोण भाग्य गौळियांचें वर्णिजे॥
आदिअंतू नाही जया व्यापका। माय उखळीं बांधिला देखा॥
सर्व सुखाचें सुख निर्मळ। कैसें दिसताहे श्रीमुख-कमळ॥
योगियां हृदयकमळींचें हें निधान। दृष्टी लागे झणीं उतरा निंबलोण॥
सांवत्याचा स्वामी परब्रह्म पुतळा। तनुमनाची कुरवंडी ओंवाळा॥

: २६ : जगमित्र नागा

महाप्रसाद ताटींचा (९१)

महाप्रसाद ताटींचा। विडा आपुले हातींचा॥ १॥
इतुकें झडकरी पाठवावें। नाहींतरी बळिया होउनी राहावें॥ २॥
चुवा चंदन केशराचा। झगा आपुले अंगींचा॥ ३॥
तीर्थ चरणींचें शीतळ। आणि कंठींची तुळसीमाळ॥ ४॥
विनवी जगमित्र नागा। जाउनी विठोबाला सांगा॥ ५॥

:२७: नरहरि सोनार

देवा तुझा मी सोनार (९२)

देवा तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार॥ १॥
देह बागेसरी जाणे। अंतरात्मा नाम सोनें॥ २॥
त्रिगुणाची करुनी मूस। आंत ओतिला ब्रह्मरस॥ ३॥
जीव शिव करुनी फुंकी। रात्रंदिवस ठोकाठोकी॥ ४॥
विवेक हातवडा घेऊन। कामक्रोध केला चूर्ण॥ ५॥
मनबुद्धीची कातरी। रामनाम सोनें चोरी॥ ६॥
ज्ञान ताजवा घेउन हातीं। दोन्ही अक्षरें जोखिती॥ ७॥
खांद्या वाहोनी पोतडी। उतरला पैलथडी॥ ८॥
नरहरि सोनार हरिचा दास। भजन करी रात्रंदिवस॥ ९॥

निगम हा वेल प्रकाशमान जाहला (९३)

निगम हा वेल प्रकाशमान जाहला। भक्तिफुलें त्याला शोभताती॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई। घनदाट पाहीं फळें आलीं॥
तयांचिया चरणीं सोनार नरहरी। झाडलोट करी तया द्वारीं॥

पाहतां पाहतां वेधलेंसे मन (९४)

पाहतां पाहतां वेधलेंसे मन। जाहलें तें उन्मन दृष्टीभरी।
आनंद आनंद नित्य परमानंद। ध्याती चरणारविंद शिवादिक॥
तोचि उभा हरि पंढरीनायक। पाहतां सम्यक सुख वाटे॥
सोनार नरहरि तयाचिया घरीं। झाडलोट करी जीवें भावें॥

:२८: जोगा परमानंद

वसोनि संतांघरीं हो (९५)

वसोनि संतांघरीं हो। घेतली गुरगुडी॥ ध्रु० ॥

आधीं ब्रह्मांड नारळ। मेरु सत्त्व तो अढळ॥
निर्मळ सत्रावीचें जळ। सोहं गुरगुडी॥ १ ॥

चिलमीं त्रिगुण त्रिविध। मीपण खडा तो अभेद।
तम तमाखू जाळून शुद्ध। वैराग्य पिंगळ धडधडी॥ २ ॥

सावधान लावूनियां नळी। मीपण झुरका विरळा गिळी।
जन्ममरणाची मुरकुंडी संभाळी। धूर विषयाचा सोडी॥ ३ ॥

लागला गुरुगोडीचा छंद। त्याला प्रसन्न परमानंद।
जोगा स्वामी तो अभंग। गुरुचरण न सोडी॥ ४ ॥

:२९: वत्सरा

शरीर विनटलें सेवे तुझे (९६)

शरीर विनटलें सेवे तुझे। ध्यानीं रंगलें मन माझें॥
शरीर विकलें चरणांसी। वाचा तुझीया नामासी॥
ऐकें पंढरपुरनिवासी। नयन तुझीया रूपासी॥
श्रवणीं कीर्तन गोविंदा। तुळघ्राण मकरंदा॥
परिचर्या दंडपाणि। देह घालीन लोटांगणीं॥
चरणीं जेउतें चालणें। तेउती भेटी नारायणें॥
वत्सरा झाला संतसंगीं। कांहींच नुरे यमालागीं॥

तुझिया पाउलां शरण (९७)

तुझिया पाउलां शरण। जें सर्व भावें भवभंजन॥ ध्रु०॥

जें बळीने यागीं पुजिलें। जें तिहीं लोकीं विस्तारलें॥
जें चतुराननें अर्घ्यें केलें। ध्वज वज्रांकुश॥ १॥

जें धाविन्नलें गजालागिं। यशोदा धरिलें वोसंगीं।
जें उमटलें शकटाअंगीं। बाळसूर्यापरी कोवळें॥ २॥

जें कमळें मनोहरें। अतिलावण्यें साजिरें।
जें धरिलें निरंतरें। हृदयकमळीं॥ ३॥

जें उमटलें गोवर्धनीं। अघासुराच्या वदनीं।
जें सेविलें गोपांगनीं। अगा नंदनंदना॥ ४॥

जें अहिल्याश्रममोचन। जें दंडकवनपावन।
जेथें रंगले मुनिजन। अगा राया रघुपती॥ ५॥

जें लवणासुर मुक्तिकर। आश्रम गंगेचें मनोहर।
जेथें रंगले योगीश्वर। सुरवरांसहित॥ ६॥

जें काळयाचे फडांवरी। ठेविलें होतें गा मुरारीं।
वत्सरा म्हणे गा श्रीहरी। क्षणभरी ना विसंबें॥ ७॥

: ३० : धोंगडा

गरुडटके ज्याचे भारी (९८)

गरुडटके ज्याचे भारी। कुंचे झळकती अंबरीं॥
पैल आले वारकरी। नामें गर्जती पंढरी॥
येक हुंबरु घालिती। येका हातीं चिपळिया॥
येका हातीं चिपळिया। येक वाता(हा)ती टाळिया॥
तया देखोनि पंढरीनाथ। मोहरे सामोरा धांवत येत॥
देवभक्तां जाल्या भेटी। धोंगडा लोळे वाळुवंटीं॥

: ३१ : कान्हो पाठक

गाये तो गाणु नाचे तो नाचणु (९९)

गाये तो गाणु नाचे तो नाचणु।
परिसे तो जाणु भेदवादी॥

नव्हे तो संतु योगी ना भक्तु।
जो लोकांतु डंबकरी॥

पढे तो पढता उपलवी भक्ता।
कवित्व करिता ख्यातीलागीं॥

पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें।
जंव जीव सात्त्विकें विनटेना॥

: ३२ : चांगा केशवदास

हातीं राख पायीं राख (१००)

हातीं राख पायीं राख। मातें राख विठ्ठला॥
येथें राख तेथें राख। मातें राख विठ्ठला॥
(चांगा) केशवदास पाईं राख। मातें राख विठ्ठला॥

: ३३ : बहिरा पिसा

वरिवरि हृदईं लिहिला राम (१०१)

वरिवरि हृदईं लिहिला राम। भीतरिं भरले क्रोध-काम ॥
ऐसें करूं नको विठ्ठला। माझे हृदईं राहें उगला ॥
वरिवरि वेष आश्रमाचा। भीतरिं धुमकसु इंद्रियांचा ॥
बहिरा म्हणे प्रसन्न गुरु। नाहींतरी वोस बाहेभीतरु ॥

: ३४ : भागु

मी रे अपराधी मोठी (१०२)

मी रे अपराधी मोठी। मज घालावें बा पोटीं॥
मी रे तान्हुलें अज्ञान। म्हणून कां देऊं नये स्तन॥
अवघ्या संतां तूं भेटसी। मी रे येकली परदेशी॥
भागु म्हणे विठो(बा)सी। मज धरावें पोटासी॥

आलों तुझ्या दर्शनासी (१०३)

आलों तुझ्या दर्शनासी। भेट द्यावी बा आम्हासी॥
सर्व संत हो राऊळीं। मी रे येकली तळमळी॥
करुणा आईक विठाई। मज बाळा भेट देई॥
देव आले हो बाहेरी। मज नेलें खांद्यावरी॥
भागु म्हणे भेट झाली। माझी चिंता ही हारली॥

: ३५ : चो खा मे ळा

कैंचा हा हाट कवणाची गोणी (१०४)

कैंचा हा हाट कवणाची गोणी।
वेगळाचि राहिला मालधणी ।। १ ।।

कवणाचा वाण विकितसे कवण।
अवघा पसारा ठेवी झाकोन ।। २ ।।

मावळला दिन झाकलासे हाट।
अवघा बोभाट वारलासे ।। ३ ।।

चोखा म्हणे माप भरियेलें सिगें।
आता कोणाचे पदरीं देऊं उगे ।। ४ ।।

बहु भुलवणा, बहु भुलवणा (१०५)

बहु भुलवणा बहु भुलवणा। पंढरींचा राणा मनीं ध्याऊं ।।
नकळे नकळे शेषादिकां भाव। वेदशास्त्र हांवभरी आलें ।।
भागलीं पुराणें पळती रानोरान। न कळे महिमान तुमचें देवा ।।
चोखा म्हणे सारीं दरुशनें वेडावलीं। तुमची तों चाली आहे ऐसी ।।

विठ्ठल विठ्ठल गजरीं (१०६)

विठ्ठल विठ्ठल गजरीं। अवघी दुमदुमली पंढरी ।। १ ।।
होतो हरिनामाचा गजर। दिंड्यापताकांचे भार ।।२ ।।
निवृत्ती ज्ञानदेव सोपान। अपार वैष्णव ते जाण ।। ३ ।।
हरिकीर्तनाची दाटी। तेथें चोखा घाली मिठी ।। ४ ।।

जोहार मायबाप जोहार (१०७)

जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार॥
बहु भुकेला जाहलों। तुमच्या उष्ट्यासाठीं आलों॥
बहु केली (उष्ट्याची) आस। तुमच्या दासाचा मी दास॥
चोखा म्हणे पाटी। आणिली तुमच्या उष्ट्यासाठीं॥

: ३६ : सोयराबाई

आमची तों दशा विपरीत झाली (१०८)

आमची तों दशा विपरीत झाली।
कोण आम्हां घाली पोटामध्ये॥ १॥

आमचें पालन करील बा कोण।
तुजविण जाण दुजें आतां॥ २॥

कळेल तें करा तुमचें उचित।
माझी तों नित निवेदिली॥ ३॥

सोयरा म्हणे माझा जीवप्राण तुम्ही।
आणिक तों आम्ही कोठें जावें॥ ४॥

पंढरीचे ब्राह्मणें चोख्यासी छळिलें (१०९)

पंढरीचे ब्राह्मणें चोख्यासी छळिलें। तयालागीं केलें नवल देवें॥
सकळ समुदाव चोखियाचे घरीं। ऋद्धि-सिद्धि द्वारीं तिष्ठताती॥
रंगमाळा सडे गुढिया तोरणें। आनंद कीर्तन वैष्णवांचें॥
असंख्य ब्राह्मण बैसल्या पंगती। विमानीं पाहती सुरवर॥
तो सुखसोहळा दिवाळी दसरा। वोवाळी सोयरा चोखीयासी॥

अवघा रंग एक झाला (११०)

अवघा रंग एक झाला। रंगीं रंगला श्रीरंग॥ १॥
मी-तूंपण गेलें वायां। पाहतां पंढरीच्या राया॥ २॥
नाहीं भेदाचें तें काम। पळोनी गेले क्रोध काम॥ ३॥
देहीं असुनी तूं विदेही। सदा समाधिस्थ राहीं॥ ४॥
पाहतें पाहणें गेलें दुरी। म्हणे चोखयाची महारी॥ ५॥

: ३७ : निर्मळा

चहूंकडे देवा दाटला वणवा (१११)

चहूंकडे देवा दाटला वणवा। कां न ये कणवा तुजलागीं॥
सांपडलें संधीं संसाराचे संगीं। सोडवीं लगबगीं मायबापा॥
बहु मज उबग आला असे देवा। धांवें तूं केशवा लवलाहीं॥
तुजवीण मज कोण गणगोत। तूंचि माझा हित-कर्ता देवा॥
निर्मळा म्हणोनी पायीं घाली मिठी। परतें न लोटीं मायबापा॥

: ३८ : का न्हो पा त्रा

जीवींचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई (११२)

जीवींचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई।
सांवळे डोळसे करुणा येऊं दे कांहीं॥

आला अपवाद यातीसंबंध पाहीं।
सांवळे डोळसे करुणा येऊं दे कांहीं॥

दीनोद्धार ऐसें वेदशास्त्रें गर्जति पाहीं।
सांवळे डोळसे करुणा येऊं दे कांहीं॥

शरण कान्होपात्रा तुजला वेळेवेळां पाहीं।
सांवळे डोळसे करुणा येऊं दे कांहीं॥

उदारा पांडुरंगा धांवें लवकरी (११३)

उदारा पांडुरंगा धांवें लवकरी। बुडतें दुराचारी डोहामध्यें॥
माझी लाज राखा येवोनि अनंता। निरवीं चरणीं आतां मन माझें॥
नको या उपाधी तोडा कृपानिधी। येवोनियां छेदीं कामक्रोध॥
कान्हुपात्रा म्हणे विठोबा जिवलगा। आलिंगनें दे गा सुखमात॥

: ३९ : दामाजीपंत

हरहर विठ्ठल जगदुद्धार (११४)

हरहर विठ्ठल जगदुद्धार। जाहला महार मजसाठीं॥ ध्रु०॥

धन्य बेदरिंचा पाच्छाय। त्याचा केला म्यां अन्याय।
धान्य लुटण्याचा उपाय। झाला अपाय मजलागीं॥ १॥

षड्गुणैश्वर्य श्री भगवान। सांडुनि देवपणाचा अभिमान।
पायिं घालुनि तुटकि वाहाण। नेसला जीर्ण लंगोटी॥ २॥

माथां बांधुनि चिंध्याभार। काळि कांबळी खांद्यावर।
मुखाने म्हणत असे जोहार। काळा दोर निजकंठीं॥ ३॥

ऐसें केलें कैसें देवा। माझ्या सुकृताचा ठेवा।
महार जालासी माधवा। लाविला वणवा मजसाठीं॥ ४॥

ज्याचें धन्य लुटिलें जाण। तो तरि घेता माझा प्राण।
दामा म्हणे गुणनिधान। झाला महार जगजेठी॥ ५॥

:४०: सुजात

हें तुज कसें दाऊं, कसें दाऊं (११५)

हें तुज कसें दाऊं, कसें दाऊं।
बोल कुठें मिलाऊं॥

स्वयंभ सदोदित गाभा।
प्रत्यक्ष द्रिष्टीमाजी उभा॥

पाहातां जिकडे तिकडे।
तरी तें वेदांसी साकडें॥

जें का गगनाहुनी विस्तरलें।
घनदाट कोंदाटलें॥

सद्गुरु रामलिंगाची वाणी।
सुज्यात हरली जिवपणकरणी॥

:४१: नयचंद्र

जरि पेखिला मस्तकावरी केशकलापु (११६)

जरि पेखिला मस्तकावरी केशकलापु।
तरि परिख्खता(ला) मयूरांचे पिच्छप्रतापु॥

जरि नयनविषयु केला वेणीदंडु।
तरि साक्षाज्जाला भ्रमरश्रेणीदंडु॥

जरि दृग्गोचरीं आला विशाल भालु।
तरि अर्द्धचंदमंडलु भइला उर्णायु जालु॥

भ्रूजुगल जाणु द्वैधीकृत कंदर्पचापु।
नयननिर्जितु जाला खंजनु निःप्रतापु॥

मुखमंडलु जाणुं शशांक देवनाचे मंडलु।

सर्वांगसुंदरता मूर्तिमंतु कामु।
कल्पद्रुम जैसे सर्वलोकआशाविश्रामु॥

:४२: नामा पाठक

जात होतें माधवें पाचारिलें वो (११७)

"जात होतें माधवें पाचारिलें वो।
पाचारितां मी थोर गर्वें गेलें वो॥
चित्रशाळेच्या खांबासी टेकलें वो।
तेथे आवचीतें त्या विंचुवें खादलें वो॥ १॥

विंचु उतरा करीतो पीडा फार वो।
मनगट धरुनी बैसला रुदना करूं वो॥
आती पाडें जीव जालासे विखारू वो।
वैद्य बोलावा बोलावा सारंगधरू वो"॥ २॥. . .

आवो अंग टाकिलें हें धरणीवरी लोळते वो।
सुटली वीरगुंठी तिचे केश मोकळे वो॥
चढतां प्रहरीं खादलें राजबाळें वो।
आला कलमु तिचे उदकें सिंपा डोळे वो॥ ३॥

आवो विंदान केलें यादवें धरिला कोप वो।
याचे वारीचा चढतो काळा सर्प वो॥
नाम निर्गुण थरारुनी सुटला कांप वो।
आणा चंदन तुम्ही द्या कांद्याचा लेप वो॥ ४॥

"धावा धावा मजवरी निर्वाण वो।
माया बहिणी तुम्ही सकळै अंतःकर्णी वो॥
जा बुझा, बुझा यादवराणा वो।
जें मागेल तें देइन वाचीं आण वो"॥ ५॥

विंचु उरतील (उतरील?) कवणें यशवंतें वो।
देवकीच्या बाळकें कृष्णनाथें वो॥
भाव करुनी ते भोगिली आनंतें वो।
पाठक नामा शरण जातसे उल्हासें वो॥ ६॥

: ४३ : एकनाथ

नित्य नवा कीर्तनीं कैसा (११८)

नित्य नवा कीर्तनीं कैसा वोढवला रंग।
श्रोता आणि वक्ता स्वयें जाला श्रीरंग।।

आल्हादें वैष्णव करिती नामाचा घोष।
हरिनाम गर्जतां गगनीं न माये हरुष।।

पदोपदीं कीर्तनीं निवताहे जन मन।
आवडी भुकेली तिनें गिळिलें गगन।।

एकाजनार्दनीं गातां हरीचें नाम।
निमालीं इंद्रियें विषय विसरलीं काम।।

आतां काय पुजूं देवा (११९)

आतां काय पुजूं देवा। माझी मज घडे सेवा।।
तोडूं गेलों तुळशीपान। तेथें पाहतां मधुसूदन।।
अन्नगंध धूप दीप। तेंही माझेंची स्वरूप।।
एकाजनार्दनीं पूजा। पूज्य पूजक नाहीं दुजा।।

निवांत श्रीमुख पहावें डोळेभरी (१२०)

निवांत श्रीमुख पहावें डोळेभरी।
तेणें नुरे अंतरीं। इच्छा कांहीं।।

चरणीं ते मिठी घालावें दंडवत।
तेणें पुरे आर्त। सर्व मनींचें।।

ध्यान तें दृष्टी भरूनि पहावें।
        आलिंगन द्यावें। वेळोवेळां॥

हृदयकमळीं पहावा तैसा ध्यावा।
        एकाजनार्दनीं विसावा। सहजची॥

संत आले वरले दिंडी (१२१)

संत आले वरले दिंडी। हातीं खुरक्या काखेंत मुंडी॥
पंढरपुरीं पडली होड। मुटक्यापरीस धांगड गोड॥
आली वैष्णवांची मांदी। मेलें डुकर बांधलें खांदीं॥
एकाजनार्दनीं अर्थ उलटा। जो जाणे तो गुरुचा बेटा॥

देऊळ बांधिलें कळस साधिले (१२२)

देऊळ बांधिलें कळस साधिले।
        स्थापन तें केलें। लिंगाप्रती॥
पाया जो खांदला मध्येंचि भंगला।
        शब्द मावळला। काय सांगों॥
वरल्या मंडपा मुंगीने धरिलें।
        त्रिभुवनीं व्यापिलें। मकुड्यानें॥
एकाजनार्दनीं मंडप उडाला।
        देवही बुडाला। देउळासहित॥

हुंडगी निघाली बाजारा (१२३)

हुंडगी निघाली बाजारा।
        बारिक माझा जुना॥ ध्रु० ॥

दारची गोंधण कां तोडा ना।
मज रहाट करुन कां द्या ना।
माझ्या रहाटाकडे कां पहा ना॥

तुमचा बैल कां मारा ना।
मज तांत करुन कां द्या ना।
माझ्या तांतीकडे कां पहा ना॥

तुमची तलवार कां मोडा ना।
मज चात करुन कां द्या ना।
माझ्या चातीकडे कां पहा ना॥

तुमचा टाळ कां मोडाना।
मज भिंगरी करुन कां द्या ना।
माझ्या भिंगरीकडे कां पहा ना॥

तुमचीं वस्त्रें का फाडा ना।
मज पिंजुन पिंजुन कां द्या ना।
माझ्या पिंजणाकडे कां पहा ना॥

पिंजून पिंजून केला पिळू।
नव इंद्रियां खेळू।
एकाजनार्दनीं पिळू॥

वेणुनादाचिया किळा (१२४)

वेणुनादाचिया किळा। पान्हा फुटला निराळा॥ १॥
आर्तभूत जीव तिन्ही। चातक निवाले जीवनीं॥ २॥
स्वानुभवाचे सरिते। जेवीं जीवना दाटे भरतें॥ ३॥
एका एक गर्जे घनीं। पूर आला जनार्दनीं॥ ४॥

नाचत पंढरीसी जाऊं रे खेळिया (१२५)

नाचत पंढरीसी जाऊं रे खेळिया क्षराक्षरातीत पाहूं रे।
टाळ मृदंग मेळवूनि मेळा गुरुवचनीं खेळ खेळा रे॥ ध्रु० ॥

जनींवनीं एक जनार्दन दाता त्यासी नमन करूं आतां रे।
मन उन्मन जयासि पाहतां त्याच्या चरणावरि माथा रे॥ १ ॥

भक्ति-वैराग्य कुंडलें श्रवणीं ज्ञानांकुश मुकुटमणी रे।
सप्रेम उटी आंगीं चंदनाची सत्त्वाची कास निर्वाणीं रे॥ २ ॥

अष्टभावें खेळिये खेळताति ठायीं घागऱ्या वाजती पायीं रे।
दाया क्षमा दोन्हि चवऱ्या ढाळिति शांति सत्रावी छाई रे॥ ३ ॥

वाद निमाला शब्द खुंटला त्रिभुवनिं आनंद झाला रे।
एकाजनार्दनीं शरण गेला तो एकपण विसरला रे॥ ४ ॥

तें मन निष्ठुर कां केलें (१२६)

तें मन निष्ठुर कां केलें। जें पूर्ण दयेने भरलें॥ ध्रु० ॥

गजेंद्राचे हांकेसरिसें, धांवुनियां आलें॥ १ ॥
प्रल्हादाच्या भावार्थासी, स्तंभीं गुरगुरलें॥ २ ॥
पांचाळीच्या करुणावचनें, कळवळुनी आलें॥ ३ ॥
एकाजनार्दनिं पूर्ण कृपेने, निशिदिनिं पदिं रमलें॥ ४ ॥

धांव रे धांव आतां दीनवत्सला रामा (१२७)

धांव रे धांव आतां दीनवत्सला रामा।
संसारसंगदोषीं नित्य गुंतलों कामा॥ ध्रु० ॥

तारुण्य-अभिमान देहीं भरला ताठा।
वैभव संपत्तीचा अंगीं फुटला फाटा॥ १ ॥

विषय सेवितां हें वय वेंचलें माझें॥
स्वहित आठवेना ध्यान चुकलों तुझें॥ २ ॥

विषय मोकलोनी शरण तुज मी आलों।
एकाजनार्दनीं दास तुझा मी झालों॥ ३ ॥

कृष्णा धांव रे लवकरी (१२८)

कृष्णा धांव रे लवकरी। संकट पडलें भारी॥
हरि तूं आमुचा कैवारी। आलें विघ्न निवारीं॥ १ ॥

पांडव असतां वनवासी। कळलें कौरवांसी॥
त्याने पाठविलें ऋषीसी। सत्त्व हरायासी॥ २ ॥

साठिसहस्र खंड्या अन्न। दुर्वासा भोजन॥
सत्त्व जातील घेऊन। अंतर पडतां जाण॥ ३ ॥

रात्र जाहली दोन प्रहर। आले ऋषेश्वर॥
भोजन मागती सत्वर। कैसा करूं विचार॥ ४ ॥

आज कां निष्ठुर जाहलासी। होइल बा गति कैसी॥
अनाथ मी देवा परदेशी। धांव तूं वेगेंसी॥ ५ ॥

आतां न लावी उशीर। अनर्थ करिल हा फार॥
एवढा करी उपकार। दे दर्शन सत्वर॥ ६ ॥

कंठ शोषला अनंता। प्राण जाईल आतां॥
पदर पसरतें अच्युता। पावें रुक्मिणि-कांता॥ ७ ॥

ऐकुनि बहिणीची करुणा। आला यादवराणा॥
द्रौपदि लोळत हरिचरणा। एकाजनार्दना॥ ८ ॥

यश्वदा म्हनती कृष्णाला (१२९)

यश्वदा म्हनती कृष्णाला
नको जाऊं बाहिर खेळायला ॥ ध्रु० ॥

आतां गौळणी येत्याल घराला
बघूं तुझा हात कशानी भरला ॥
चोरी करून तूं कुणाकडून आला
सावळ्या घननीळा मारीन मी तुजला ॥
बांधीन खांबाला ॥ नको ॥ १ ॥

आम्ही उभयतां निजलों होतों ।
दाढीवेणीची गाठ देतो ।
विटंबना हा आमुची करितो ।
कृष्णाला सोड, मोडीन खोड
बांधीन खांबाला ॥ २ ॥

आम्ही गरोदर होतों बाई
'पोटामधें' म्हणे 'सांगे काई ?'
हरी ब्रह्मचारी कसा तळ भरला
बांधीन खांबाला ॥ ३ ॥

कृष्ण म्हणे मी तुझा पती
सोडूनी (दे) संसाराची भ्रांती
कोस मैदान भाग वरच्याला
बांधीन खांबाला ॥ ४ ॥

यश्वदेनं कृष्ण पाहिला
एकाजनार्दनीं आनंद झाला
कोस मैदान भाग वरच्याला
बांधीन खांबाला ॥ ५ ॥

रडत माझें बाळ तान्हें (१३०)

रडत माझें बाळ तान्हें, समजावितां राहिना ॥ ध्रु० ॥

नानापरी समजावितें। मागितलें खाया देतें।
थोपटुनी निजवीतें। हालवितें पाळणा ॥ १ ॥

नानापरी घेतो छंद। रडतसे स्फुंद-स्फुंद।
नेत्रांतून बाहे निंद। याचा डोळा लागेना ॥ २ ॥

धांव घेतो, धरितो दम। सर्व आंगीं आला घाम।
एकाजनार्दनी प्रेम। यशोदेसी माईना ॥ ३ ॥

निळी कांचभूमी खेळे वनमाळी (१३१)

निळी कांचभूमी खेळे वनमाळी।
पाहिलें प्रतिबिंब, कृष्ण तया न्याहाळी ॥ १ ॥

रडूं घेतलें (तयाने) रडूं घेतलें।
समजावी यशोदा परी रडूं घेतलें ॥ २ ॥

दे मज खेळावया भानु, (दे मज भानु)।
आन नको कांहीं (मज) दुजा छंद मनु ॥ ३ ॥

एकाजनार्दनीं देव छंद धरी गा।
समजावी यशोदा परी न राहे उगा ॥ ४ ॥

मसि बोलुं नको गोविंदा (१३२)

मसि बोलुं नको गोविंदा, मजला आला तुझा राग ॥ ध्रु० ॥

तूं दहिंदुध चोरुन खासी। घट आवघे फोडुन देसी।
पदराला धरिसि कशाला, मजला आला तुझा राग ॥ १ ॥

तूं सोडुन दे कर माझे। मी नमितें करां(पदां ?)बुज तुझें।
तूं छलबल करिसि कशाला, मजला आला तुझा राग॥ २॥

किति हटकुं तुला कौंसारी। मुळिं लाज तुला न मुरारी।
कुब्जेचे गृहिं कां रमला, मजला आला तुझा राग॥ ३॥

धन्य धन्य यशोदेबाई। अवघ्या गौळणि लागति पायीं।
एकाजनार्दनीं रत झाला, मजला आला तुझा राग॥ ४॥

नको वाजवुं कान्हा मुरली (१३३)

नको वाजवुं कान्हा मुरली। तुझ्या मुरलिने सुधबुध हरली॥ १॥
घरीं करित होतें कामधंदा तेथेंच मी गडबडली॥ २॥
घागर घेउनि पाणियासी जातां डोइवर घागर पाझरली॥ ३॥
एकाजनार्दनीं पूर्ण कृपेनें राधा गौळण घाबरली॥ ४॥

पाणियासी कैसी आतां (१३४)

पाणियासी कैसी आतां एकली मी जाऊं॥ ध्रु०॥

कुंभ घेउनीयां शीरीं
जात होतें यमुनातीरीं
उभा हरि वाटेवरी काय त्यासी देऊं॥ १॥

मुरलि घेउनीयां करीं
वाजवितो तो श्रीहरी
नाद येतो कवण्या द्वारीं, काय त्यासि देऊं॥ २॥

जिकडे पाहें तिकडे हरी
हरीवीण दुजें नाहीं
एकाजनार्दनीं माझे आई कृष्ण कोठें पाहूं॥ ३॥

आल्या पांच गौळणी (१३५)

आल्या पांच गौळणी। पांच रंगांचे शृंगार करुनी॥ ध्रु०॥

पहिली गौळण रंग सफेत। जशी चंद्राची ज्योत॥
गगनीं चांदणी लखलखीत। ऐका तिची मात॥
मंथन करीत होती दारांत। धरुन कृष्णाचा हात॥
ऐशा आल्या पांच गौळणी॥ पांच रंगां०॥ १॥

दुसरी गौळण भाळी भोळी। रंग हळदीहून पिवळी॥
पिवळा पितांबर नेसून आली। आंगी बुट्टेदार चोळी॥
एक लहान तनु उमर कवळी। जशी चांफ्याची कळी॥
ऐशा आल्या पांच गौळणी॥ २॥

तिसरी गौळण रंग काळा। नेसून चंद्रकळा॥
काळें काजळ लेऊन डोळां। रंग तिचा सांवळा॥
काळी गरसोळी लेऊन गळां। आली राजस बाळा॥
ऐशा आल्या पांच गौळणी॥ ३॥

चवथी गौळण रंग लाल। लाल लालही लाल॥
कपाळीं कुंकुमचिरी लाल। भांगीं भरुन गुलाल॥
मुखीं विडा रंग लाल। जसें डाळिंबीचें फूल॥
ऐशा आल्या पांच गौळणी॥ ४॥

पांचवी गौळण हिरवा रंग। अवघ्या झाल्या दंग॥
हिरव्या कांकणाचा पद्मा रंग। जसें आरशींत जडलें भिंग॥
फुगडी खेळतां कृष्णासंगं। एकनाथ अभंग॥
ऐशा आल्या पांच गौळणी॥ ५॥

भिंगाचें भिंगुलें खांद्यावरी आंगुलें (१३६)

भिंगाचें भिंगुलें खांद्यावरी आंगुलें। नाचत तान्हुलें यशोदेचें॥ १॥
येती गौळणी करिती बुझावणी। लागती चरणीं कान्होबाच्या॥ २॥
गोविंद बाळिया वाजविती टाळिया। आमुचा कान्हया देवराव॥ ३॥
कडदोरा बिंदलीं वाघनखें साजिरीं। नाचत श्रीहरी यशोदेचा॥ ४॥
पायीं घागरिया वांक्या साजरिया। कानींच्या बाळिया ढाळ देती॥ ५॥
एकाजनार्दनीं एकत्व शरणं। जीवें निंबलोण उतरती॥ ६॥

खेळे भोंवरा गे बाई भोंवरा (१३७)

खेळे भोंवरा ग बाई भोंवरा। भोंवरा राधिकेचा नवरा॥ ध्रु०॥

माझ्या भोंवऱ्याची अरी। सप्त पाताळें त्यावरी।
फिरे गरगरां॥ राधिकेचा०॥ १॥

भोंवरा बनला निर्गुणी। त्यावर चंद्रसूर्य दोनी।
जाळी शंकर गवरा॥ राधिकेचा०॥ २॥

एकाजनार्दनीं खेळिया। भोंवरा खेळून पाहें चेलिया।
नाद देतो हरिहरा॥ राधिकेचा०॥ ३॥

मोडकेंसें घर तुटकेंसें छप्पर (१३८)

मोडकेंसें घर तुटकेंसें छप्पर, देवाला देवघर नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ ध्रु०॥

फाटकेंच लुगडें तुटकीसी चोळी, शिवाया दोरा नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ १॥

जोंधळ्याची भाकर आंबाड्याची भाजी, वर तेलाची धार नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ २॥

मोडका पलंग तुटकी नवार, नरम बिछाना नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ ३॥

सुरतीचें मोतीं गुळधाव सोनें, राज्यांत लेणें नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ ४॥

एका जनार्दनीं समरस झालें, तो रस येथें नाहीं।
मला दादला नको ग बाई॥ ५॥

सगुण गुणमाया, आली कोल्हाटिण खेळाया (१३९)

सगुण गुणमाया। आली कोल्हाटिण खेळाया॥ ध्रु० ॥

प्रपंचाचा रोविला वेळू। चहूं शून्यांचा मांडिला खेळू।
ब्रह्माविष्णु जयाचे बाळु। लागती पायां॥ १ ॥

आला गडे निर्गुणाचा कोल्हाटी। सोहं शब्दें ढोलगें पिटी।
चैतन्याची उघडून दृष्टी। चला जाऊं पाहाया॥ २ ॥

कोल्हाटीण मारिती ऐशी उडी। एकवीस स्वर्गांवरती माडी।
देखे द्वार-खिडकी उघडी। अगाध माया॥ ३ ॥

कोल्हाटीण बसली असे डोळां। जाणे गुरुपुत्र विरळा।
एकाजनार्दनीं लीळा। जाती वर्णाया॥ ४ ॥

हळदुली वाटुनी वाटिला पाटा (१४०)

हळदुली वाटुनी वाटिला पाटा।
अगुणाचा नोवरा हळदुली उटा॥ १ ॥

नागवा नवरा नागवी नोवरी।
दोघें बैसलीं चराचरीं॥ २ ॥

नागवा नवरा नवरी नेसला।
नागव्या नवरीनें नवरा वेढिला॥ ३ ॥

सभामंडपीं दोघें ते दोघें।
एकाजनार्दनीं नाचती भोगें॥ ४ ॥

ऐका गाये साधु-सज्जन हो (१४१)

ऐका गाये साधुसज्जन हो। महंत महाजन हो।
मननसील मुनिजन हो।
योगी सज्ञान हो। सावध ऐका॥ १ ॥...

विनवी जनार्दनाचा एका। सेवितो तुमच्या चरणपियुखा।
उजळल्या निजात्मसुखा। डौर वाऊनिया देखा।
डौरकार पै जाहले।। ३ ।।. . .

डौरकाराचे बोल। विचारिती खोलचि खोल।
ते आशेनें केले केवळ फोल। विश्वासाची वोल गेली।।
ते हे ऐका।। १८ ।।. . .

डौरनाद डुगडुग।
धरूनि प्रतिष्ठेचें बंड। बोल बोलतां प्रचंड।
आशा वाढविती वितंड। तेव्हाच त्याचें काळें तोंड।
ऐसे काळतोंडे उदंड। जगीं फिरती।। २१ ।।

ऐसी आम्हां डौरकारांची मती। काळमुखें जगीं भीक मागती।
त्यांच्या डौराची नादस्थिती। ऐका तुम्हांप्रती सांगेन।। २२ ।।

डौरनाद।।
चुडमुक चुडमुक चुडमुक। दुकमुक दुकमुक दुकमुक।।
कुसकुस कुसकुस कुसकुस। तळमळ तळमळ तळमळ।।
खटपट खटपट खटपट। बुडबुड बुडबुड बुडबुड।।
खळबळ खळबळ खळबळ। फुसफुस फुसफुस फुसफुस।।
पटपट पटपट पटपट। भुंगभुंग भुंगभुंग भुंगभुंग।।

ऐशा नादाच्या कोटी। मग शंखनादें डौर उटी।
हे नादाची मूळ गोष्टी। आता वेदान्तपरिपाठी। सादर ऐका।। २३ ।।. . .

अनुहात डौराचा नाद। तेथे वेदांचे वेदानुवाद।
सिद्धांतबोध त्याचे शब्द। डेरा प्रसिद्ध अवतरला ।। १२५ ।।. . .

या डेरियाबाहेर जो निघाला। तोचि दादुल्याचा दादुला।
डेरियाआंत जो अडकला। तो तो गेला अधःपाता ।। १२६ ।।. . .

एकाजनार्दन म्हणे। ऐसीं डेरियाचीं लक्षणें।
डौरकार जालों याकारणें। डौर वाहूनी सांगणें, निजहितार्थ।। १२८ ।।

कृष्णा एक पांखरूं आहे (१४२)

कृष्णा एक पांखरूं आहे। तें मुखावीण चारा खाय रे।।
डोळे नाहीं तरी तें पाहे। वाचेविण स्वयें गाय रे।। १ ।।

सख्या त्याचें नांव कान्होबा। कृष्ण म्हणती सर्व रे।
त्याचें वास्तव्य कोठें आहे। पर नाहीं परी तें उडे रे।। २ ।।

तिहीं लोकीं हिंडतें। त्रिभुवन त्याला थोडें रे।
त्याचे नखांत आकाश बुडे। तें सन्मुख चहुंकडे रे।। ३ ।।

अहो त्याला मायबाप दोन्ही नाही रे।
एकपणें (तयां-)विण पहाती जनार्दनाचे पायीं रे।। ४ ।।

नाथाच्या घरची उलटी(च) खूण (१४३)

नाथाच्या घरची उलटी(च) खूण।
पाण्याला मोठी लागली तहान।। १ ।।

आंत घागर बाहीर पाणी।
पाण्याला पाणी आलें मिळोनी।। २ ।।

अजि म्यां एक नवल देखिलें।
वळचणीचें पाणी आढ्या लागलें।। ३ ।।

शेतकऱ्यानें शेत पेरीलें।
राखणदाराला तेणें गिळिलें।। ४ ।।

हांडी खादली भात टाकिला।
बकऱ्यापुढें देव कापिला।। ५ ।।

एकाजनार्दनीं मार्ग उलटा।
जो जाणे तो गुरूचा बेटा।। ६ ।।

चिंचेच्या पानावर देउळ रचिलें (१४४)

चिंचेच्या पानावर देउळ रचिलें
आधीं कळस मग पाया रे ॥
देवा पुजूं गेलों तंव देऊळ उडालें
परियेसीं सद्गुरुराया रे ॥ १ ॥

परियेसीं सद्गुरुराया खेळिया, परियेसीं सद्गुरुराया रे ॥ ध्रु० ॥

दोतोंडी हरिणी पाणियासी आली
ती मुखेंवीण पाणी प्याली रे ॥
मृगजळ डोहीं पाषाणाची सांगड
वांझेचा पुत्र पोहोला रे ॥ २ ॥

आंधळ्यानें देखिलें बहिऱ्यानें ऐकिलें
पांगळ्यानें पाठलाग केला रे ॥
एकाजनार्दनीं येकपणें विनवी
अखंड रामनाम स्मरा रे ॥ ३ ॥

सहस्रदीपें दीप कैसी प्रकाशली प्रभा (१४५)

सहस्रदीपें दीप कैसी प्रकाशली प्रभा।
उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा ॥ १ ॥

काकड आरती माझ्या कृष्ण सभागीया।
चराचर मोहरलें तुझी मूर्ति पाहाया ॥ २ ॥

कोंदलेंसे तेज प्रभा जालीसे एक।
नित्य नवा आनंद वोवाळितां श्रीमुख ॥ ३ ॥

आरती करितां तेज प्रकाशलें नयनीं।
तेणें तेजें मिनला एका एकीं जनार्दनीं ॥ ४ ॥

सुवेळ सुदिन तुझा गोंधळ मांडिला वो (१४६)

सुवेळ सुदिन तुझा गोंधळ मांडिला वो।
ज्ञानवैराग्याचा वरती फुलवरा बांधिला वो॥
चंद्रसूर्य दोन्ही यांचा पोत पाजळिला वो।
घालुनि सिंहासन वरुतें घट स्थापियेला वो॥ १॥

उदो बोला उदो सद्‌गुरुमाउलीचा वो॥ ध्रु०॥

प्रवृत्ती-निवृत्तीचें घालुनि शुद्धासन वो।
ध्येय ध्याता ध्यान प्रक्षाळिले चरण वो॥
काया वाचा मनें एकविध केलें अर्चन वो।
द्वैत अद्वैत भावें दिलें आचमन वो॥ २॥

भक्ति वैराग्य ज्ञान यांहीं पुजियली अंबा वो।
सद्रूप चिद्रूप पाहुनी प्रसन्न जगदंबा वो॥
एकाजनार्दनीं शरण मूळकदंबा वो।
त्राहे त्राहे अंबे तुझा दास आहे उभा वो॥ ३॥

अनादि निर्गुण प्रगटली भवानी (१४७)

अनादि निर्गुण प्रगटली भवानी।
मोह महिषासुर मर्दनालागुनी॥
त्रिविध तापाची कराया झाडणी।
भक्तांलागोनी पावसी निर्वाणीं॥ १॥

आईचा जोगवा जोगवा मागेन।
द्वैत सारुनी माळ मी घालीन॥
हातीं बोधाचा झेंडा मी घेईन।
भेदरहित वारीसी जाईन॥ २॥

नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा।
करुनी पोटीं मागेन ज्ञानपुत्रा॥
धरीन सद्‌भाव अंतरींच्या मित्रा।
दंभसंसार सांडीन कुपात्रा॥ ३॥

पूर्णबोधाची घेईन परडी।
आशा तृष्णेच्या पाडीन दरडी॥
मनोविकार करीन कुर्वंडी।
अद्भुतरसाची भरीन दुरडी॥ ४॥

आतां साजणी झालें मी निःसंग।
विकल्प नवऱ्याचा सोडियला संग॥
कामक्रोध हे झोडीयले मांग।
केला मोकळा मारग सुरंग॥ ५॥

ऐसा जोगवा मागुनी ठेवीला।
जाउनी महाद्वारीं नवस फेडिला॥
एकपणें जनार्दन देखिला।
जन्ममरणाचा फेरा चुकविला॥ ६॥

सत्वर पाव गे मला भवानीआई (१४८)

सत्वर पाव गे मला, भवानीआई रोडगा वाहीन तुला॥ १॥
सासरा माझा गांवीं गेला तिकडेच खपवीं त्याला॥ २॥
सासू माझी जाच करती लवकर निर्दाळीं तिला॥ ३॥
जाऊ माझी फडफड बोलती बोडकी कर ग तिला॥ ४॥
नणंदेचें पोर किरकिर करतें खरूज होऊं दे त्याला॥ ५॥
दादला मारुन आहुती देईन मोकळी कर ग मला॥ ६॥
एकाजनार्दनीं सगळेंच जाऊं दे एकटीच राहूं दे मला॥७॥

नमो आदिमाया भगवती... बया दार उघड (१४९)

नमो आदिमाया भगवती। अनादिसिद्ध मूळ प्रकृति॥
महालक्ष्मी त्रिजगतीं। बया दार उघड दार उघड॥ १॥

हरिहर तुझें ध्यान करिती। चंद्रसूर्य कानीं तळपती॥
गगनाचे प्रावर्ण रुळती। ते तारांगणें भांगी भरिलें मोतीं॥ २॥

नवखंड पृथ्वी तुझी चोळी। सप्तपाताळीं पाउलें गेलीं॥
एकवीस स्वर्ग मुगुटीं झळाळी। बया दार उघड दार उघड॥ ३॥

अलक्षपूर भवानी दार उघड बया॥
माहूरलक्ष्मी दार उघड बया॥
कोल्हापूरलक्ष्मी दार उघड बया॥
तैलंगलक्ष्मी दार उघड बया॥
तुळजापूरलक्ष्मी दार उघड बया॥
पाताळलक्ष्मी दार उघड बया॥
कानाडलक्ष्मी दार उघड बया॥
अष्टभुजा लक्ष्मी दार उघड बया॥
पंढरपूरनिवासिनी दार उघड बया॥
उदो उदो उदो उदो॥ ४॥

चारी पुरुषार्थ गोंधळी। सनकादिक तेथे संबळी॥
तेहतीस कोटी भूतावळी। अठ्यांयशी सहस्त्र ऋषिमंडळी॥
दिवट्या पाजळोनी तिष्ठती। बया दार उघड दार उघड॥ ५॥

वेताळ फेताळ खंकाळ। मेसको मारको मैराळ॥
जानाई जोखाई क्षेत्रपाळ। म्हैषासुर दैत्य मातला सबळ॥
अबबब पीडा गेली, अंबे। बया दार उघड दार उघड॥ ६॥

मच्छाई बया दार उघड।
कच्छाई बया दार उघड।
वऱ्हाई बया दार उघड।
नरसाई बया दार उघड।
वामनाई बया दार उघड।
परसाई बया दार उघड।
रामाई बया दार उघड।
कृष्णाई बया दार उघड।
बोधाई बया दार उघड।
कलंकाई बया दार उघड।
महालक्ष्मी बया दार उघड।
उदो उदो उदो ऐसा शब्द गाजतो।
कामक्रोध दैत्यावर कोरडा कडाडा वाजतो।
ज्ञानपोत पाजळतों। बोध परडी हातीं घेतों॥
प्रेमाचा पाउड पुढें ठेवितों। अहं शंखासूर बळी देतों॥ बया॥ ७॥

हिरण्याक्ष-हिरण्यकशिपु कोंबडे पिळी।
बळीसी घालून पाताळीं।
सहस्त्रअर्जुनासी हातोफळी।
सागर बांधोनियां शिळीं। करी लंकेची होळी।
रावण कुंभकर्ण मातले बळी। तेथें तूं खेळसी शिरांची चेंडूफळी॥ ८॥

शरण आला तुज बिभीषण। तयासी राज्यीं अक्षई स्थापून।
प्रल्हाद उपमन्यु ध्रुवांसी भातुकें देऊन।
बुझाविसी कवतुकें बया दार उघड॥ ९॥

आणिक एक अंबे नवलपरी। तुझी यात्रा कलियुगामाझारी॥
अविंगल दृश्य परोपरी। निंब नारळ घेऊनि करीं॥
हळदी कुंकुम अर्पिती-बया दार उघड॥ १०॥

वाहन तुझें सिंह केसरी। मोकळे केश त्रिशूळ शंख करीं।
शिशुपाळ वक्रदंत दोन्ही बकरीं। आहुती घेसी जगदंबे॥ ११॥

तेथून पुढें दसरा आला। अठरा दिवस घट मांडिला॥
कौरव पांडव सैन्यमेळ मिळाला। तेथें शोभसी विराजमान हो दुर्गे॥ १२॥

जयजयाजी मूळपीठेंद्रभवानी। पांडवकुळींची कुलस्वामिनी॥
अर्जुनरथीं साकार होउनी। वागदोर हातीं धरुनी।
रथ फिरविसि कवतुकें। बया दार उघड॥ १३॥

द्रौपदी बहिणीचेनि कैवारेंसी। होम करुनी कुरुक्षेत्रासी।
तुझें साहित्यें पूर्णाहुतीसी। तें तुजप्रति अर्पिलें हो जगदंबे॥ १४॥

रणवाद्यें भमूभम् दणूदण् कड्कड् वाजती।
तोची गोंधळ अंबे तुजप्रती। रणस्वाद घट स्थापिला मध्यवर्ती।
प्रथम धूप घटाप्रतीं। भीमसुत बभ्रु अर्पिला॥ बया॥ १५॥

ऐसा रणउत्सव मांडिला। उदो उदो ऐसा शब्द झाला।
तेव्हा अर्जुनभक्त झडपिला। संशयसूत्रें ते काळीं॥
महाशक्ति कृष्णाबाई। बया दार उघड॥ १६॥

संशयभूत असे कठिण। हरिहरब्रह्मासी नाटोपे जाण।
चारी वेद सहा शास्त्रें अठरा पुराण। अष्टांयशी सहस्त्र ऋषि शिणले जाण।
मग त्वां बोधखंडा हातीं घेऊन। शिर छेदिलें भुताचें॥ बया॥ १७॥

बया त्वां रणकुंड-जबडा पसरिला। आहुती घेसी दोन्ही दळां।
रथघोडेकुंजर-तुला। नारळ तुला अर्पिला॥ बया॥ १८॥

भीष्मद्रोण हीं कुळें। तीळ तांदुळ पायदळें।
आणिकही वीर भले भले। निंबें कापुनी टाकिलीं॥ बया॥ १९॥

रक्त वाहे भडभडा। तेंची तेलघृत जळे धडधडा।
कौरव पतंग पडती गाढा। दुर्योधन हा लक्ष्मी तुझा रेडा।
शेवटीं आहुति घेसी तयाची। बया दार उघड॥ २०॥

शिलंगण खेळसी नानापरी। कौरवकुळींचीं करुनी बोहरीं।
द्वारका लपवून समुद्रीं। यादवकुळ पाठविसी माहेरीं।
निजधामाकारणें। बया दार उघड॥ २१॥

पुढें जंबुद्वीपाभीतरीं। अंबे तुझी न वर्णवे थोरी।
खेळ खेळसी वैष्णवांमाझारीं। पुंडलिक दिवटा महाभारी।
पोत पाजळुनी करीं। ओवाळिसी महामाया॥ बया॥ २२॥

मग जगदंबा प्रसन्न झाली। भक्तीचीं कवाडें उघडीं केली।
शंखचक्रांकित शोभली। रूपसुंदर सांवळी।
कोटी चंद्रसूर्यप्रभावळी। बया दार उघड॥ २३॥

एकाजनार्दनीं माउली। करी कृपेची साउली।
भक्तजयाकारणें। बया दार उघड॥ २४॥

धुमधुम बार उडविला (१५०)

धुमधुम बार उडविला। ऐसा गलीम कोण आला॥
त्यानें किल्ल्यासी वेढा दिला। तो आवाज ऐकिला॥ १॥

राजा पुसे प्रधानाला। कां रे कशाचा आवाज झाला॥
वेढा फौजेचा पडला। कैसा वांचवीन जिवित्वाला॥ २॥

फौजेचा आकार पाहिला। तोफा जडल्या रे किल्ल्याला॥
या रयतींत फितूर झाला। माझा संगती मिळाला त्याला॥ ३॥

आता कैंचा राहिला किल्ला। या किल्ल्याचा आधार केला॥
मुजुमदारानेंच फितुर केला। आतां आश्रय कोण जाणिला॥ ४॥

कोण वांचवील माझ्या प्राणाला। प्रधान विसंगीत होऊन पडला॥
मानकऱ्याचा पहिला अबुला। विश्वासाचा हुजऱ्या मेला॥ ५॥

कोण सांभाळिल या किल्ल्याला। किल्ल्याचा पहिलाच पाया पडला॥
खबर नाही पायदळाला। तोफेचा म्होरेस्वार गेला॥ ६॥

निदानीं आश्रा नाही किल्ल्याला। तोंडपुरचा दरवाजा पडला॥
धक्का लागला गांडियेसी। त्याने मार्गच अवघा मोडला॥
अंतकाळ आला राजाला॥ ७॥

तोफ लावून चाऱ्ही कोण। चाऱ्ही बुरूज गेले पडुन॥
धुगधुगीत राजाचें मन। मग कशास हो हैराण॥ ८॥

यम चोपदार नेत बांधोनी। सहस्त्र अंगा लावोनी॥
तप्त अर्गळा मुखीं घालून। तप्त भूमीवर चालवून॥ ९॥

सुळीं दिला राजा जाण। केलें कर्में झाडा देऊन॥
गेलें तसेंच उसनें देणें। राज्याच्या अंतीं नर्क जाण॥ १०॥

ऐसें बोलविती प्रजानन। शेवटीं राजा गेला निर्गुण॥
सावध म्हणे (एका)जनार्दन। झोका झाला॥ ११॥

धुतांच मोतीं जळीं हरपलें (१५१)

धुतांच मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणी।
चला पाहूं सहा चार अठराजणी॥ ध्रु०॥

प्रपंच धोंडा मृगजळपाणी आपटीत होतें चोळी।
विसरलें सूख घसरलें तळीं॥
सखे, मायेनें मोतीं दडविलें भवसिंधूच्या जळीं।
होति गडे भ्रांतिबहिण जवळी॥
तिणेंच मजला गोष्टी विनविल्या चित्त गेलें भुलोनी।
चला पाहूं सहा चार अठराजणी॥ १॥

आठजणींनी मोती दडविलें वर ठेविला धोंडा।
अशाच पाहाती अवघ्या रांडा॥
बारा सोळा तळीं उरल्या त्यांनीं धरिला दांडा।
ठाऊक सत्राविला झेंडा॥
त्यामध्यें मी गर्क झाल्यें एकलिच बाई वनीं।
चला पाहूं सहा चार अठराजणी॥ २॥

चवथीजणी सत्वर मिळोनी डोळीं अंजन घाला।
माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा॥
ज्ञानबोधाची लावुन दिवटी बरवी वात उजळा।
माझे मोत्याला सर्व कळा॥
प्रपंच पडदा फाडुनि गुरुपदिं लावा गे ठिकाणीं।
चला पाहूं सहा चार अठराजणी॥ ३ ॥

चौथीजणी मोक्ष नाइका, मला धरा हातीं।
उतरा सागर पैलपंथीं॥
या मोत्याच्या साठीं मजला जाणें आहे सती।
म्हणून मी येतें काकुळती॥
एकाजनार्दनीं चिन्मय मोतीं न मिळे गुरुवांचुनी।
चला जाऊं सहा चार अठराजणी॥ ४ ॥

त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाणा (१५२)

त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य-राणा॥
नेति नेति शब्द न ये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगि समाधि न ये ध्याना॥ १ ॥

जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरति ओवाळितां हरिसि भवचिंता॥ धृ० ॥

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त।
अभाग्यासी कैंची न कळे ही मात॥
पराहि परतलि तेथें कैंचा हा हेत।
जन्ममरणाचा पुरलासे अंत॥ २ ॥

दत्त येऊनियां उभा ठाकला।
भावें साष्टांगेंसी प्रणिपात केला॥
प्रसन्न होऊन आशीर्वाद दिधला।
जन्ममरणाचा फेरा चुकवीला॥ ३ ॥

दत्तदत्त ऐसें लागलें ध्यान।
हारपलें मन झालें उन्मन॥
मी-तूं-पणाची झाली बोळवण।
एकाजनार्दनीं श्रीदत्तध्यान॥ ४ ॥

१४४ : जनी जनार्दन

दयानिधि हे करुणालय राम (१५३)

दयानिधि हे करुणालय राम ॥ ध्रु० ॥

पतितपावन दीनजनावन गौतमपूरितकाम ॥
करिवरतारण नक्रविदारण मुनिजनमनविश्राम ॥
भवभयशोषण मुनिवरतोषण सुखदायक तव नाम ॥
जनी जनार्दन सदय दयाघन प्राप्त यशोनिजधाम ॥

:४५: रामा जनार्दन

आरती ज्ञानराजा (१५४)

आरती ज्ञानराजा, महाकैवल्यतेजा।
सेविती साधुसंत, मनु वेधिला माझा॥

लोपलें ज्ञान जगीं, हित नेणती कोणी।
अवतार पांडुरंग, नाम ठेविलें ज्ञानीं॥

कनकाचें ताट करीं, उभ्या गोपिका नारी।
नारद तुंबरू हो सामगायन करी॥

प्रगट गुह्य बोले, विश्व ब्रह्मचि झालें।
रामा जनार्दनीं, पायीं टकचि ठेलें॥

:४६: विठा रेणुकानंदन

उगवला दिनकरु विश्व देखे डोळां (१५५)

उगवला दिनकरु विश्व देखे डोळां।
न देखे आंधळा, तरी काय सूर्यु नव्हे?॥

वाजे गाजे ध्वनी विश्व ऐके कानीं।
न पडे बधिरा-श्रवणीं, तरी काय नादु नव्हे?॥

पंचमालापस्वरें गान करिती कोकिळा
नायके कावळा, तरि काय वसंतु नव्हे?॥

तैसा आदिपुरुषाचा दासु विठा रेणुकानंदन।
न मानिती दुर्जन, तरी काय साधु नव्हे?॥

:४७: त्र्यंबक

रामदर्शनासि चला लाभ हा भला (१५६)

रामदर्शनासि चला लाभ हा भला ॥ ध्रु० ॥

रामजन्म रामनवमि नक्षत्र पुनर्वसु।
समय मध्यान्ह दिवा अवतार जाहला ॥ १ ॥

दशरथासि दाशरथी पुत्र जन्मला।
त्रिभुवनांत जयजयकार जाहला ॥ २ ॥

भजकाचे कोटि अन्याय हा क्षमा करी।
उद्धरितां महाराज नाहिं भागला ॥ ३ ॥

शबरि कबरि बदरिफळें पदरिं घेउनी।
भावबळें भुलोनिया भक्षुं लागला ॥ ४ ॥

महाविष त्र्यंबकासि अमृत लाधला।
पार्वतीसी थोर आनंद जाहला ॥ ५ ॥

:४८: कृष्णदास मुद्गल

त्रिजटेप्रति जानकी म्हणे (१५७)

त्रिजटेप्रति जानकी म्हणे म्यां शिवना देखिला
रामलक्षेमन लंकेवरी वो चालिला ॥

अकरावा रुद्र त्यांहातें वनीं भेटला
तिघेही मिळुनी वाली वानर मारिला ॥

ऐके वो साजनी बुद्धिवंत योगिनी
आजि आत्माराम म्यां देखिला नयेनीं ॥

ऐकें वो साजनी थोर नवलावो जाला
राघव कुंभकर्णा दोघां संग्राम मांडला ॥

छेदिले करचरण त्यानें भूमिवरी पाडिला
शिरछेद करुनी मुक्तिपंथासी नेला ॥

ऐकें वो साजनी शिवनीयाचें लक्षण
बिभीषण बाइये रामा आलासे शरण ॥

निकुंबळे इंद्रजीत होम करी दारुण
संग्रामीं मारिला विजयि जाला लक्षेमण ॥

ऐकें वो साजनी थोर नवलाव चोज
दशशिरा वधूनी रामें सोडविलें मज ॥

सोडिले सुरवर आनंदें नाचती भोज
बिभीषणासी सखिये दिधलें लंकेचें राज्य ॥

ऐकें वो साजनी अर्धरात्रीं देखिलें
आजि या श्रीरामें मजला अयोधेसि नेलें ॥

देखिले रामचरण माझें मन निवालें
जानकीचें स्वप्न कृष्णसुद्गलें गाइलें ॥

:४९: फादर स्टीफन्स

आणि आदिपुरुष होता रचिला (१५८)

आणि आदिपुरुष होता रचिला। तो देवचारें ठकविला।
महादोषीं पडविला। मग काय जाहालें॥ ११५॥

तेया दोषासि करावेया संहारु। फुडां मी संसारीं येणारु।
ऐसी भाख देत होता सर्वेश्वरु। विश्वजनांतें॥ ११६॥

ते येणें देवें सांगतां। पात्रिआर्का आणि प्रोफेतां।
संसारु रचिला तेथोनि भक्तां। प्रगट केलें॥ ११७॥

येतुकें तेयां प्रोफेतांनी। पवित्र पुस्तकीं लिहुनी।
दाविलें प्रगट करुनी। जगत्र जनांतें॥ ११८॥

मग तो फुडारु पाळावेया। पाप दोषु निरसावेया।
देवनंदनु जल्मोनियां। संसारी झाला॥ ११९॥

तें सांगावेया कारणें आतां। प्रगट करावेया समस्तां।
थोरि उठिली उत्कंठा। माजां जीवीं॥ १२०॥

परमशास्त्र जगीं प्रगटावेया। बहुत जनां फळसिद्धी होवावेया।
भाषा बांधोनी मराठिया। कथा निरोपिली॥ १२१॥

जैसी हरळांमाजी रत्नकिळा। की रत्नांमाजीं हिरा निळा।
तैसी भाषांमाजी चोखळा। भाषा मराठी॥ १२२॥

जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी। की परिमळांमाजी कस्तुरी।
तैशी भाषांमाजी साजिरी। मराठिया॥ १२३॥

पखिआंमधें मयूरु। वृखियांमधें कल्पतरु।
भाषांमधें मानू थोरु। मराठियेसीं॥ १२४॥

तारांमधें बारा राशी। सप्त वारांमाजि रविशशी।
या दीपींचेआ भाषांमधें तैशी। बोली मराठिया॥ १२५॥

:५०: फादर मान्युएल ज्याकिस द नोरोंज

तेतीस वरुसां, भरोनी तिनी मास, (१५९)

तेतीस वरुसां, भरोनी तिनी मास, शुक्र(क)राच्या वारा :
चैत्रमासीं, पंचेविसावे दिवसीं, वर्तलें संसारा ६

सूर्यु आकासीं, होता गघनासी, दों प्रहराचेया भरा :
दापें कस्टउनी, क्रूस खांदीं घेउनी, पातला जेजू डोंगरा ७

तंव दूत येंती, क्रूस काडिती, पिवन मधु मिराचें :
देउनिया माहा कडु, लागले वोडूं, जेजूचें वस्त्र आंगींचें ८

जैसा शेळियेचा ताना, मातें सांडिलेया वना, सिंहाचा मेळावा येउनी :
विधारिती तेयाथें, पिसडुनी नेंते, आपण्यासवें वांटुनी ९

जेरबंदा साटांनी, काती विधारुनि, घाये जे होंते बहुत :
तेयावरी बैसलें, धगें कां सुकलें, वस्त्रासि दाटलें रक्त १०

शक्तीं वोडिलेयां, घाय विस्कटुनियां, वाहांती रौद्राचिया झरी :
वस्त्रासि लागुनी, काती गेली टांकुनी, जेजु नग्न शेरिरीं ११

मातेचे कुसिंचा, नग्न या भूवासा, आला तूं जल्मवेळीं :
आता बापाचेया काजा, नग्न सर्व पुरा, जासी तूं मरणकाळीं १२

नग्नु शेरीरीं, देखोनि सभेमाजारी, मान करिसी खालुती :
तरी आतां आकाशीं, उभारिल्या क्रुसीं, समेस्त तुज देखती १३

××× माझेया स्वामिया, तूं कस्टउनियां, विसाव घेइं फेडिं आस :
दुस्टांनीं तुज, आंतुरिली बाज, निद्रा करी सावकाश १५

जैसा द्राखेयांच्या घोंसा, भारें चिरढलेया आपैसा, वाहाती रोस मधुर :
तैसें मुखकमळ, सर्वांग जळाळ, वाहातें जाहालें रौद्र २५

दुखेस्ती माता, तेथें होती त्या वग्ता, धाउनि क्रुसासमोर :
पुत्राथें पाहुनी, आकाशीं देखुनि, गळविती जाहाली नेत्र २९

म्हणे ऐसे कस्ट, साहावेया दुर्घट, कां तूं आलासी बाळा :
स्वर्गसुखा सांडोनी, संसारुइ वर्जुनी, काय करिसी अंत्राळा ३०

तस्करांमाजारीं, होवावेया तेयां सरी, जोडिला तुज क्रुसिं :
मनुश्यकुळा, राखावेया बाळा, चोरु कां तूं दिससी ३१

जल्मकाळीं, भोडुवे अंत्राळीं, घेउनि आलासि :
मरणाचे अवस्वरीं, तस्करांमाजारी, बाळा तूं प्राणु देसी ३२

स्वर्गीं आनंदें, बापा स्पिरिता सांतामध्यें, वर्तसि तूं तारक :
नरा प्राणियांनि, चोरांमध्ये घालुनि, खेळविती तुज कवतिक ३३

गोधनासाळे, व्रुसभु गंर्धवें वोळखिलें, तुजें देवपण :
कलवारीच्या पर्वतीं, प्राणी नोळखती, प्राणाचिया जिवधना ३४

तंव स्वामिणी ते अवस्वरीं, सीणु करुनी पुत्रावरी, काय बोलत होती :
येती काळ माजी, प्रीति करुनी आजी, कैसा तूं विसरलासी ६४

नवमासवेरी, तुज सांभाळिला उधरीं, जल्मकाळीं तुज नेला :
नाजारे होउनी, बेलें हांकावेया गुणीं, प्राणु माझा श्रमला ६५

व्रुसबाचे घोटीं, जुझे सांगातीं, त्रुणेंवरी हिंवें कांपत :
सैतन भेदावेया, उचलुनी हृदया, संभाळिला तुज ६६

तेतिस वरुसां वेरी, सेवा केली बरवेपरी, भरवंसा धरुनियां :
दुर्बळिके गुणें, मांता रे प्राये जिणें, तुज बाळा सांबाळावेया ६८

काय मज फुडारु, कवण धीरुआधारु, कवणा आधिन करिसी :
दुस्टां देसी खेमां, तस्करां वैकुंठप्रेमा, मज कैसा न वोलसी ७१

ह्या अंतींच्या वेळां, येक उतर माझ्या बाळा, बोल माझेपासीं पुत्रा :
प्राणु वळवळे, कुडी तळमळे, गळती पाही नेत्रां ७२

: ५१ : मुक्तेश्वर

रघुवर मुक्तमनीं (१६०)

रघुवर मुक्तमनीं, प्रकटे रघुवर मुक्तमनीं ॥ ध्रु० ॥

मित्रान्वयनिधि कौसल्योदरशुक्तीकेंत जनी ॥ १ ॥
नगकन्याधव भूषण मिरवी हृत्पदकीं जडुनी ॥ २ ॥
मुक्तेश्वर करि बद्धां मुक्तचि मुक्तपणा हरुनी ॥ ३ ॥

पुरुष म्हणे, मज करकर न सोसवे (१६१)

पुरुष म्हणे "मज करकर न सोसवे, होइन अरण्यवासी।
देवाचेनि धर्मे मांडिला संसार मध्येंचि उठिली विवशी ॥
वित्त वेंचुनी या लोकांचीं लेंकुरें आणिलीं बहु सायासीं।
फाडुनि वस्त्रें, तोडुनि जानवें, होइन मी संन्यासी ॥
आतां संसार पुरे पुरे। आतां घरचार पुरे पुरे" ॥ १ ॥

सासु म्हणे, "सून तोंडाळ, भांडे", सून म्हणे, "उगि रांडे।
हाणोनिया लात पाडिन उताणी, मोडीन तुझीं हाडें" ॥
पुरुष आला तेणें घातला डोळा, निष्ठुर भांडण भांडे।
सासुर मारुनी शंखनाद करि, उबगोनि संसारचाडे ॥
"आता विष घेइन वो, बाई। जीव मी देइन गे ॥ २ ॥

घेइन विख, देइन प्राण, आग लागो ह्या जिणियासी।
मज मेलिया मागें बाइल होउनि, हेंचि नांदो कां यासी" ॥
सून म्हणे, "येईं शेजारिणीबाई! हस्तकिं धरिं हें तूं नाणें।
पसाऱ्याचें विख आणुनि देईं, फजितीचें काय जिणें ॥
बारिक तांदुळ सोलिव दाळिवरि हिंग जिरें मिरें धणे।
तूप निथळत घेइन पोटीं, मग कासिया वांचेन प्राणें" ॥ ३ ॥

सोजीच्या पोळ्या, साठिव साय, घृतशर्करेच्या मेळें।
वडे तेल वर, या आरवारी घारियावरि लोणियाचे गोळे ॥

पुरणपोळिया थिजल्या तूपें, सेवितां काळिज पोळे।
हें विख दारुण घेईन तरी उन्हांत बैसती बाळें॥ ४॥

आंबियाचे रसें घोळियले मांडे, घेतला न्याहार पोटीं।
उतारालागीं सोलिव केळें, गिळिलीं शंभर साठीं॥
दादुला आतां होईल पोरटा, घालुं मी कोणाचे ओटीं।
दुधाचें दुधाणें लावोनियां होटीं, काळकूट ऐसें घोटीं॥ ५॥

कोहळे भोपळे पडवळें दोडके कारलीं तळिलीं तूपें।
वृतांकें सुंदर सोलिव नानापरी बघारिलीं तप्त तूपें॥
चाकवतामाजी हिरवा हिंग, हें काय म्हणावें सोपें?॥
जावया प्राण फर्फरां घेतलें सासुचेनि संतापें॥ ६॥

सेवया सरोळे बोटवे देठवे दुधांत आळिल्या खिरी।
लोणकढें तूप, मेळ उन्ह उन्ह दूध, मेळविली रायपुरी॥
पुरणाची पोळी घातली ताटीं, त्यावरी सायेची वाटी।
अफू आणि तेल सोमल, हें ऐसें झोंबेल माझिये कंठीं॥ ७॥

भरितें, रोटी, तिळेल तेल, सोलिले पातिचे कांदे।
नपती आलें बेलें सालफळें दहींभातीचे मांदे॥
ढोकळे, धीरडीं, पापड, फेणिया, सेवितां काळीज भेदे।
दह्याची दुधाणी लावुनि होटीं गरळदाहा ऐसें घोटीं॥ ८॥

तीनतीनदां सात सातरी हें विख सेविन बाई"।
चालवेना ऐसा भरंवसा जाला, आळसें नुठवे कांहीं॥
दादुल्यासी म्हणे, "चुरीं का पाउलें, आंगाला भोरण्या देईं।
मज मेलिया मागें दारोदारीं हिंडसी, आहे तों लाहो घेईं"॥ ९॥

ऐसें हे विख सेवितां जीचें अंग सुजलें अरुवार।
घरांतुनि सये! बाहेर निघतां चालतां हादरे हें घर॥
टेंकावयालागीं मुसळ घेउनियां करि त्याचा चाराचूर।
लीलाविश्वंभरा हें विख देसिल तरि फुकाचें राखिन घर॥ १०॥

:५२: मेघराज

गोमटस्वामी उद्धरीं मजला (१६२)

गोमटस्वामी उद्धरीं मजला।
रंक मी शरण येतुसें तुजला॥ १॥

ऐसा तूं भुजबली प्रथम केवली।
गोमटा नांव साजे तुला।
हां रे बापा गोमटा नांव साजे तुला॥
प्रगटोनि बेलगुली इए पंचम कालीं।
चामुंडा राजा तां तारीला॥ गोमट॥ २॥

जिनभक्त मेघा म्हणे सफल तयाचें जिणें।
चरणीं रहिवासु केला।
हां रे बापा चरणीं रहिवासु केला॥
ऐसा तुं जयवंत त्रैलोकीं दैवत।
भक्त तां चरणीं ठेविला॥ ३॥

लेइने सजाइ सेज (१६३)

लेइने सजाइ सेज वालिये घाले
गुजरातिना संघ सहू कोई गीरनारि चाले
दक्षिणिचा पोहा पुढे येउनि मिलाला
येक थइने बेहू संघाति चालो॥ १॥

आवो मिलु सहेलि आपुन गिरनारि जइय
नेमनाथ पुजतां स्वर्गी देवता थये
पुजा दान करौनि पुण्य जोडुं वो सये
मनुष्याचा जन्मही तर मागुता न ये॥ ध्रु०॥

पोहोतो जुनोगड सहू कोइ सामग्री करे
संघ सहूने आगल किधा चढवा गिरनारे

दक्षिणिचा संघु जिमि रबला सिनगारे
डोंगर वेंघति आपुलालेनि भारें ॥ २ ॥

संघ घनो ने वाट थोडि उकल ना पडे
कहे गुजरि संघ हमारो आगलथी चढे
म्हने मरहटि आगे गुजरि तुज लागलें वेडे
आम्हांतें सांडुनी तुं कैसि वेंघसिल पुढें ॥ ३ ॥

वालु थारो बोलनो तु बोले करकसि
कासटवालिनो पेहेरे दिसे नाचन जैसि
आवो आवो गुजरि तुं राहे मेलिसि
नुसते रंगिले दांत कधीं विडा नेघसि ॥ ४ ॥

तुटके कान तुटकि चोलि आंग उघाडो
पामर वाइने लाज थोडि हासे हडहडो
नुसते बरवेपनू काइ वानिसि मजपुढें
हाति हाड रंगुनियां घालिसी चुडे ॥ ५ ॥

काले वाने थोडे साने धर्म न जाने
खावाने पेहरवा आखो दाहाडो वखाने
तुटके काप भोरटवाने जाडके नेसने
लांव जैसि तुतें आमचा लाक वो म्हने ॥ ६ ॥

कडे कछोटि जुठो बोले लोक मरहटा
खिर खांड मुकिने खाय बैंगन रोटा
वरषी वरषी दुकाल तुम्हा होइल देसवटा
कावो कावो गुजरि नुस्ता करसि ताठा ॥ ७ ॥

राति खाये अनगल न्हाय लोकनि आन वाहे
फाकट श्रावक कहीने धर्म कहि देव्हरे न जाये
घरोघरिं धर्म तुम्हां कोठें वो आहे
चरमाचा हिंग तुप तुमचा लोक वो खाये ॥ ८ ॥

तप जप पाखे फोकट धर्म कहावे लाजे
दान देइ न पुजा करे महिमा काजे
करसि बहू उपवास शिल नाहिं सहजे
कसि उने वो सो नि ते काइवो किजे ॥ ९ ॥

आरे आरे मरहटि आगल चढे श्यां माटे
वलगिने पाछे ता नि से तु न्हे

धरुन झोंटे देइन धका पडसि फुका खुपति गोटे
ठेलमेल करुन चढुण पुढले वाटे ॥ १० ॥

जो जो भया आगल चढवा आवी वलगि
मरहठी खिटुलीनो भागो जव राखि तुटि
सुरंग सेला चोलि बिरडें तुटलें नेटि
नासकिंचें मोतिं पडलें टिला मलवटि ॥ ११ ॥

घाघरियालो घाट फाटो कांचोलि तुटि
मादलियानो मोति तुटा पटोला फाटि
झोंबलि गुजरि केश कुरला मीठी
पडलिं मोतें तुटला हारु होता जो कंठीं ॥ १२ ॥

ते मानभाव मिलिने बेहूने चढता वारि
येक थइने सहू कोई चढिया गिरनारि
धजा पुजा करुन पुन्य जोडिलें भारि
मेघयाचा स्वामि नेमि बालब्रह्मचारि ॥ १३ ॥

:५३: कामराजु

त्रिलोकीं भवनिं राघो होई उदासु (१६४)

त्रिलोकीं भवनिं राघो होई उदासु।
लक्ष उचरासी झाडें करितां रहवासु॥
करम पारधि तुझा मांडिला पासु।
क्रोध मांजरा तुझा करैल नासु॥ १॥

आतमा चैतन्य राघो रामचंद्रा।
अउठ हाथ कुडी तुझा पांजरा॥
सप्त धात मेलौनी केला साजरा।
कर्मसूत्र धारि आपुण दृष्टिगोचरा॥ २॥

एकसें एकतालीस प्रकृत पारधि।
मायाजाल घालूनी बांधला बुधि॥
आझुनि कां न धरसी आपली सुधि।
मनुक्ष जनमीं राघवा पडसील बंधिं॥ ३॥

विख योवनिं नको जानुं राघवा।
कामिणी नयण वाणे तेंवी(वीं)धवा॥
प्रो(प्री)ती सेवली ऋणि करी राहावा।
पडसी मोहपंजरिं मग कवणें काढावा॥ ४॥

नव नाडि सोला सांधि बाहतरि कोठे।
तुझिया पांजरिं राघो नव दारोटे(ठे)॥
अष्ट दल कमल सोडौनी कोठें।
भंभावे लाझणी (लाझुनी) जाउं दाही वाटे॥ ५॥

प्रसन रसन घ्राण चक्षु श्रुती।
पांचे ठाइं जाती राघो तुझ(झा) मती॥
सोडै याचा स(सं)गु नको पडुं भरांति।
मन वचन काया राखै निरन्ती॥ ६॥

धरमे वीरी राखें राघो करै पांथरा।
त्रयोदश व्रत फलें चरैं पांचारा॥
राग द्वेख तया झणीं जाऊ डुंगरा।
मान अहंकार तुतें करती चुकारा॥ ७॥

तुझीय पंजरिं राघो त्रिम्हा बार।
झडप लावीजे खेमा पांचारा॥
क्रोध वैरी तुझ एइल मांजरा।
खेमा-खड्गें त्याचा संघा(हा)रू करा॥ ८॥

पंजरू घडितु भरले नव मास।
सूत्र धरितां तिनसैसाठ दिवस॥
अस्थि चर्म त्वचा रुधिर मांस।
मलमूत्र वीरपि (विरंची?) रचील रहीवास॥ ९॥

काला गोरा नीला पीलां नहे सांवला।
ब्रह्मादिकां नकले वरणां वेगला॥
पाहाता पाहाल तरी न दीसे डोलां।
अनाथ(हत?) ध्वनि राघो बोले सकलां॥ १०॥

आचार पवित्र राघो आहार पाणी।
सकले विकले देती तुजलागूनी॥
आगमु निर्गमु श्रता बोली-जे वाणी।
पांजरा-भीतरिं राही आपुले ध्यानीं॥ ११॥

त्रेपन क्रीया राघो करीजे।
परब सोला(ळा)रे भावनारंगें रंगीजे॥
जें मुख-दरिसण चारित्र जी-पदम सुरेख।
सिद्धांत सुमती कंठीं राखली रेख॥ १२॥

सप्त तत्त्व पढी राखो रात्रि दिन।
पढता गुणता राघो जाला सुजाण॥
स्वर्ग-लोकेहुन तुज एईल विमान।
प्रदीपी भवनिं राहीं सुखें-निधान॥ १३॥

आत्मा चैतन्य राघो गाथ(ठ?)ला परी।
अनंत गुणें राघो तुझी तुं सरी॥
जानता नेनता राघो कवीला परी।
'कामराजु' म्हणे राखो वेगें ऊधारी॥ १४॥

पहिलें नमन देवा जिनेश्वरा (१६५)

पहिलें नमन देवा जिनेश्वरा, नमन सार-जे गणधरा।। गा जी।।
नमन करिन जी निग्रंथ गुरा, कवित प्रसन होइजो दातारा।। १।।

गाइन धरमाचा विस्तारु, धर्म तरीजे संवसारू।। गा जी।।
धरमें पाविजे मुगति-दुवारू धर्म करिति तिहि लोकी उधा(द्धा)रू।। २।।

धरमें मनुक्ष गति लाहिजे उतिम कुल पावीजे।। गा जी।।
धरमें रूपवंत होइजे, धरमें आउक्ष संपूर्ण भोगीजे।। ३।।

धरमें होईज विद्यावंतु ग्यानी, आगमिं शास्त्र-पुराणीं।। गा जी।।
धरमें होई जगत्र मोहनी, धरमें कीरति विस्तरे मेदिनी।। ४।।

धरमें पाविजे बरवी नारी, गुणवंत सविचारु।। गा जी।।
धरमें पुत्र-कन्या बहुयरि, लक्षमी अलंकृत धरू।। ५।।

धरमें धवल (म)हल सात खणा, धरमें बत्तीस लक्षण।।गा जी।।
धरमें पालकी सुखासनें, जैसे देवाचीं विमानें।। ६।।

धरमें राज्यपद पावीजे, चक्रवर्ति होईजे।।गा जी।।
धरमें सर्व सुख भोगीजे, गज तुरंगम रथ लाहीजे।।७।।

धरमें स्वर्गलोका जाईजे, इंद्रपद पाविजे।।गा जी।
धरमें अभीष्ट फल पाविजे, अनुक्रमें सुगति साधीजे।।८।।

धरमु माताजी धरमु पिता, धरमु सहोदर बंधु।। गा जी।।
धरमु तिहीं लोकीं तारता, धरमु-विण जीव अंधु।। ९।।

ऐसें जाणुनी जीवा ध्रमु करी, सुखी होईजे संवसारीं।। गा जी।।
धरमु सोई-रा य(ध?)रुत्रीचा, जिवा धरमु हितकारी।। १०।।

संग्रामिं जुझतां धरमु रक्षण, पाणि बुडतां परोहण।। गा जी।।
अगनि जलतां धरमु जीवन, रोगु-दालिद्र-हरण।। ११।।

धरमु धरमु त्रणि तिलोकां, लोकां नाही विवेकु।। गा जी।।
हींसा-कर्म करती लोक, जीवदया-विण धरमु फोक।। १२।।

जीवदया-धरमु पालती, हिंसा पाप हालती।। गा जी।।
कामुराजु म्हणे धरमु करीति, तो जीव पावे मुगति।। १३।।

:५४: ब्रह्मगुणदास

देवा संसारसागरीं पडलुं दुरंधरीं (१६६)

देवा संसारसागरीं पडलुं दुरंधरीं।
पावलुं अघोरु गा दुःख थोरु॥

शरणु आलुं स्वामी तूं आइकें मुगती गामी।
विनंती करुं आम्ही, गा देवराया॥ ध्रु०॥

मी देईन गान्हानें जें दुःख दील्हें मनें।
इंद्रियें विडंबणें, गा थोरु केलें॥

काम-क्रोधु-मदु तो दुःखाचा जी कन्दु।
पाचा नाही बंधु, मी काई करुं॥

तें आपुलाल्या परी हें तुं गा विचारीं।
सुखदुःख संसारीं, मी कवणा सांघुं?॥

देवा सद्गुरुच्या परसादें शास्त्राचेणि भेदें।
ओलखिला आनंदें, गा जीनदेऊ॥

ब्रह्मगुणदासु ऐसें भने देवा दीधलें गान्हानें।
संसार तारनें, गा देईं मातें॥

:५५: गुणकीर्ति

संसारिंचा धंदा (१६७)

संसारिंचा धंदा आसा वो वाया हि गेला।
जन्म-जरा-मरण सीनलुं वो धंदा नव्हे भला॥

संसार-धंदा अवघड जीवा नव्हे हीतु।
लटकें मी माझें करितां, नष्ट जालें चित्त॥

क्रोध-मान-माया भ्रमलुं, नेणें देउधर्म।
पत्र अपत्र करोनियां वो जोडियलें पापकर्म॥

आलें सुख या जीवा वो भोगु न लगे कवणु।
चतुर्विध गतिमाही वो जालें भ्रमणु॥

सुखाचे सोयरे अवघीं वो जेव्हां पुरवी आसा।
निर्वाणीं नव्हती आपुलीं एह वचन साचा॥

धंदाने जगु भुलविला वो पडलें मायाजालीं।
दाहि दिसा माये सोसितु वो कांहीं फल (न आली)॥

धंदा कीजे परत्राचा जिणें टाके पैल पारु।
गुणकीर्ति मुनिवरु म्हणे वो तुम्हि तरा संसारु॥

:५६: मन्मथ शिवलिंग

धने धने ऐसी कराडे (हो) नगरी (१६८)

धने धने ऐसी कराडे (हो) नगरी।
तेथ सुकाळ वासुदेव राजे हो करी।
त्यानीं चार भुज्या भावच्या लावल्या भारी
त्यानीं अवघ्या भुलविल्या नगरच्या हो नारी।
आला धाउन मथुरेहून तेथ (हो) हरी
त्या सुकाळ राज्या संगे येउधे करी।
त्याचा पुत्र भद्र पटीं त्यानीं बसविला
ऐसा वैसंपाइनु सांगतो भारताला॥ ३॥

त्यानीं कृष्णातीरीं घातलं हो आसन
नाव पंढरिनाथ विठ्ठल पाऊन।
धने धने ऐसं कराड नगर म्हून
तेथ नांदत होता आनया ब्राह्मन।
त्याने आचरले धर्म फार पाळुन
त्याच्या वाड्यामधि येक विहिर आहे दारुन।
आंगाशीबी धोतर त्यानीं वाळवुन
ह्या गावावर त्या चवक्या हो बसवून।
कोन्हा येऊं दीना नरामानवाला
मोठा भारी विटा(ळ) होईल आम्हाला॥ ४॥

आसं पुन्ये त्याचं भारी (हो) होउन
तेथ नारदस्वामी ब्रह्मपुत्र येउन।
त्या बारवाचे काठीं उभा राहून
तेथे राजाचे हो आले दूत धाउन।
ते गेले माघारे नारदाला पाहून
मग दूत बोलती राजाला वचन।
आसं हो दूताचं वचेन अईकून
मग राजा दूताला बोलतो परतून।
'तुम्हि शेन गाइचें गोमूत्र घेऊन
त्या ब्राहमनाच्या अंगावर सिंपोन।
त्याला लावा चवकिचे बाहीर पिटऊन'

इतकं हे दूतांनीं वचन आईकून।
आले शेन गाइचं गोमूत्र घेऊन
त्या ब्राहमनाच्या आंगावर सिंपोन।
त्यो नारद चवकीचे बाहीर पिटवीला
ह्यो मजकूर कळला मग त्या भोवानीला॥ ५॥

ऐसी नारदाची वार्ता हो अइकोन
गांव अऊध नगर हाये तीचं (तिथुन)।
त्या कराड हो नगराला येऊन
त्या बारवाचें काठीं हो बैसून।
तेथे राजाचे हो दूत आले धाऊन
ते गेले माघारे मातेला पाहून।
मग दूत राजाला बोलती वचेन
'कोन नार सुंदर आली हाये' म्हून।
'त्या बारवाचे काठीं हो बैसून
तिचं रूप फारफार दिसत हाये लावन्य।
कपाळीं कुंकवाची चिरी (हो) लेहून
तिच्या मुखामधीं (हो) गेलं पान रंगून।
तीं अवघ्या पान्यामध्यीं हो थूकोन।
तिनं तांबडं लाल पानि टाकलं करुन।
डाव्या हातामंदी ताती(टी) हो घेऊन
दोन पान्यामंदी पाय तिनं सोडून'।
आसं दूत बोलती आनया ब्राह्मनाला।
मग राजा धाउनि हिरिचे काठीं आला॥ ६॥

मग राजा मातेला बोलतो वचेन
'तूं कोनाची ग? हितं आलिस कोठोन?।
आम्ही यातीचे ग आहोत ब्राह्मन
मोठा विटाळ अम्हाला नारी हो करून।
दुर दुर दुर दुर बेगी झडकर' म्हून
मग मूळ माया हो भोवानी उठोन।
ती चालली आपल्या (हो) मारगानं
मग राजा दुतासी बोलतो परतून
'धरा धरा आना र सुंदरि या घेऊन'
मग अनया ब्राह्मन राजा हो उठोन
त्या भोवानीचे पाठिस हो लागून;
मग दोघे जन त्या मूळपेठा जाउन

ह्याच्या डोईवर चेड्याची देउन
भेड्याचं सीर दिलं त्याच्या (हा)तात कापुन
त्याला आद्य माया हो बोलऽती वचेन
'पाहे पाहे आनया ब्राह्मना रं' म्हून
तेव्हा अनया हात जोडोनि उभा राहिला
त्या भोवानीच्या चरणाला (हो) लागला ॥ ७ ॥

आसा अनया ब्राह्मनाचा गर्व हारून
त्या कराड हो क्षेत्राला येऊन।
तेथ लक्ष्मी(-चा हो) आवतार घेउन
धने धने ऐसं कराड नगर म्हून ॥
तेथ नाइकु धनापा गेलं नामीं रंगून
गुरू कंबळेश्वर झाले त्याला प्रसन्न
आज्ञान महेश्वर बोले त्यासी वचन
मी तुमचें लेकरुं न्ह्या हो संभाळून
मज मतीमूढाचा घ्या परवता ऐकून
गुरु नागनाथ प्रसंन जाले त्याला
कवी मन्मथसीवलींग बारसींत रे गेला ॥ ८ ॥

सर्व साहित्य पूजेसी आणिलें (१६९)

सर्व साहित्य पूजेसी आणिलें, विभूती लावूं सांबाला ॥ १ ॥

आरती करूं शंकराला, पार्वती गिरिजारमणाला ॥ ध्रु० ॥

बेलपत्रें पुष्पें आणिलीं, हारतुरे घालूं सांबाला ॥ २ ॥
धूपदीप नैवेद्य अर्पिले, संतोष वाटे सांबाला ॥ ३ ॥
शंख वाजे संबळ वाजे, शिव शिव शिव बोला ॥ ४ ॥
मन्मथ म्हणे शिवलिंग, देह भाव (किं हो) हरला ॥ ५ ॥

प्यालों मी प्याला (१७०)

प्यालों मी प्याला, प्याला नामाचा। छंद लागला विठोबाचा॥
करुन चौरंग, चौरंग देहाचा। आत खुब जडाव रत्नांचा॥
चारी माचवे, माचवे चौकोनी। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥
झालें मी मग्न, मग्न हरिभजनीं। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥ १॥

तीनशेंसाठ, साठ तुकड्यांचा। चौरंग अमोल मोलाचा॥
दोर गुंफिला, गुंफिला सत्त्वाचा। आकार तिन्ही लोकांचा॥
चारी कमळें, कमळें विश्वमोहिनी। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥ २॥

लावुन दरवाजा, दरवाजा कारागीर। बत्तिस शिपाइ चौकिदार॥
आणि नवखिडक्या, खिडक्या चौफेर। मेरुशिखरीं दशमद्वार॥
तेंही (तैं) गुप्त, गुप्त दावोनी। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥ ३॥

गिलावा रोगण, रोगण हो करुनी। आंत तें सत्राविचें पाणी॥
रूप सुंदर, सुंदर नाना योनी। तेज फांकलें त्रिभूवनीं॥
वर शिवशक्ति, शक्ति स्थापोनी। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥ ४॥

ऐसा चौरंग, चौरंग बनवीला। कोंदणीं हिरा बैसवीला॥
शिवलिंग लोळे, लोळे गुरुचरणीं। केव्हांची विठ्ठलरुक्मिणी॥ ५॥

:५७: चिमणा पंडित

त्रिलोकांमाजिं पाहें हा जीव, खेलिया (१७१)

त्रिलोकांमाजिं पाहें हा जीव, खेलिया,
खेलतां लक्ष चउऱ्यासी रे॥
शुभाशुभ कांहिं करणि विचारि
यउनि नरदेहासी रे॥

खेलिया तोची खेले रे। साधुरंगाचिया मेले रे॥

स्याद्‌वाद मत करि वादवेवादु,
तोडर घागऱ्या पाहुं नादु रे।
आगम अध्यात्म दंडि रुमाल चवरे
बीरीद सोभे दया भेदु रे॥ खेलिया॰॥

हिंडतां फिरतां बहु श्रमलासी,
दृढ धरिं निज तत्त्वासी रे
येथेंचि तपजप करिं कांहिं साधन
साधिल्या साधक होसी रे॥ खेलिया॰॥

जो खेल खेलले जिनवर गणधर,
जाले मुगति निवासी रे।
चिमना म्हणे बा तोचि खेल खेले,
जाणें येणें नाहिं जन्मासी रे॥ खेलिया॰॥

:५८: तुकाराम

आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें (१७२)

आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें।
शब्दांचींच शस्त्रें, यत्न करूं॥

शब्दची आमुच्या जीवाचें जीवन।
शब्द वाटूं धन, जनलोकां॥

तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव।
शब्देंचि गौरव, पूजा करूं॥

वेद अनंत बोलिला (१७३)

वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाची शोधिला॥ १॥
विठोबासी शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें॥ २॥
सकळ शास्त्रांचा विचार। अंतीं इतुलाची निर्धार॥ ३॥
अठरा पुराणीं सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत॥ ४॥

तुझा देव तुजपाशीं (१७४)

तुझा देव तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी॥
पाहें पाहें उघडीं डोळा। ज्याचा देव त्याजवळां॥
देव पातीयाचे आंत। उघडा दिसतो धादांत॥
तुका म्हणे ऐसी मात। करुनि दाविल तोचि संत॥

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास (१७५)

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे॥ १॥
मेले जित असे निजोनियां जागे। जो जो जें जें मागे तें तें देऊं॥ २॥
भले तरी देऊं गांडीची लंगोटी। नाठाळाचे काठी देऊं माथां॥ ३॥
मायबापाहुनी बहु मायावंत। करूं घातपात शत्रूहुनी॥ ४॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें। विष तें बापुडें कडू किती॥ ५॥
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड। ज्याचें पुरे कोड त्याचे परी॥ ६॥

रात्री-दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग (१७६)

रात्री-दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग।
अंतर्बाह्य जग आणि मन॥ १॥

जीवाही अगोज पडती आघात।
येऊनियां नित्य नित्य वारु॥ २॥

तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें।
अवघियांचें काळें केलें तोंड॥ ३॥

वेडें वांकुडें गाईन (१७७)

वेडें वांकुडें गाईन। परी तुझाचि म्हणवीन॥ १॥
मज तारीं दिनानाथा। ब्रीद साच करीं आतां॥ २॥
केल्या अपराधाच्या राशी। म्हणऊनि आलों तुजपाशीं॥ ३॥
तुका म्हणे मज तारीं। सांडीं ब्रीद नाहीं तरी॥ ४॥

बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी (१७८)

बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी।
जाहालों हिंपुटी तुजवीण॥ १॥

तुजवीण सखे न वाटे मज कोणी।
वाटतें चरणीं घालूं मिठी॥ २॥

ओवाळावी काया चरणांवरोनी।
केव्हां चक्रपाणी भेटशील॥ ३॥

तुका म्हणे माझी पुरवीं आवडी।
वेगीं घालीं उडी नारायणा॥ ४॥

रूपीं जडले लोचन (१७९)

रूपीं जडले लोचन। पायीं स्थिरावलें मन॥ १॥
देहभाव हारपला। तुज पाहातां विठ्ठला॥ २॥
कळों न ये सुखदुःख। तहान हारपली भूक॥ ३॥
तुका म्हणे नव्हे परती। तुझ्या दर्शनें मागुती॥ ४॥

आनंदाचे डोहीं आनंदतरंग (१८०)

आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचें॥
काय सांगों झालें कांहींचिया बाहीं। पुढें चाली नाहीं आवडीनें॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा। तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा। अनुभव सरिसा मुखा आला॥

याजसाठीं केला होता अट्टाहास (१८१)

याजसाठीं केला होता अट्टाहास।
शेवटींचा दिस गोड व्हावा॥

आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा।
खुंटलिया धांवा तृष्णेचिया॥

कवतुक वाटे जालिया वेंचाचें।
नांव मंगळाचें तेणें गुणें॥

तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी।
आतां दिवस चारी खेळीमेळी॥

तारूं लागलें बंदरीं (१८२)

तारूं लागलें बंदरीं। चंद्रभागेचिये तीरीं॥ १॥
लुटा लुटा संतजन। अमुप हें राशी धन॥ २॥
जाला हरिनामाचा तारा। सीड लागलें फरारा॥ ३॥
तुका जवळीं हमाल। भार चालवी विठ्ठल॥ ४॥

मोलें घातलें रडाया (१८३)

मोलें घातलें रडाया। नाहीं आसूं नाहीं माया॥ १॥
तैसा भक्तिवाद काय। रंगबेगडीचा न्याय॥ २॥
वेठी धरिल्या दावी भाव। मागें पळायाचा पाव॥ ३॥
काजव्याच्या ज्योती। तुका म्हणे न लगे वाती॥ ४॥

वाघें उपदेशिला कोल्हा (१८४)

वाघें उपदेशिला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला॥ १॥
अंतीं मरसी तें न चुके। मजही मारितोसी भुकें॥ २॥
येरू म्हणे भला भला। निवाड तुझ्या तोंडें जाला॥ ३॥
देह तों जाणार जाणार। घडेल हा परउपकार॥ ४॥
येरू म्हणे मनीं। ऐसें जावें समजोनी॥ ५॥
गांठी पडली ठकाठका। त्याचें वर्म जाणे तुका॥ ६॥

गाढव शृंगारिलें कोडें (१८५)

गाढव शृंगारिलें कोडें। कांहीं केल्या नव्हे घोडें॥ १॥
त्याचें भुंकणें न राहे। स्वभावासी करील काये॥ २॥
श्वान शिबिके बैसविलें। भुंकतां न राहे उगलें॥ ३॥
तुका म्हणे स्वभावकर्म। कांहीं केल्या न सुटे धर्म॥ ४॥

आधीं होता वाघ्या (१८६)

आधीं होता वाघ्या। दैवयोगें झाला पाग्या॥
त्याचा येळकोट राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ १॥
आधीं होता ग्रामजोशी। राज्यपद आलें त्याशी॥
त्याचें पंचांग राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ २॥
आधीं होती दासी। पट्टराणी केलें तीसी॥
तिचें हिंडणें राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ ३॥
आधीं होता संतसंग। तुका जाला पांडुरंग॥
त्याचें भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना॥ ४॥

आली सिंहस्थ पर्वणी (१८७)

आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्यां भटां झाली धणी॥ १॥
अंतरीं पापाच्या कोडी। वरि (वरि) बोडी डोई दाढी॥ २॥
बोडिलें तें निघालें। काय पालटलें सांग वहिलें॥ ३॥
पाप गेल्याची काय खूण। नाही पालटले अवगुण॥ ४॥
भक्तिभावेंविण। तुका म्हणे अवघा सीण॥ ५॥

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण (१८८)

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण।
चिरगुटें वालून वाथयाला॥ १॥

तेंवीं शब्द ज्ञणीं करिती चावटी।
ज्ञान पोटासाठीं विकूनियां॥ २॥

बोलाचीच कढी बोलाचाचि भात।
जेवूनियां तृप्त कोण झाला॥ ३॥

कागदीं लिहितां नामाची साखर।
चाटितां मधुर गोडी नेदी॥ ४॥

तुका म्हणे जळो जळो ते महंती।
नाहीं लाज चित्तीं निसुगाला॥ ५॥

चिरगुटें घालूनि वाढविलें पोट (१८९)

चिरगुटें घालूनि वाढविलें पोट।
गऱ्हवार बोभाट, जनामध्यें॥ १॥

लटिकेची डोहळे दाखवी प्रकार।
दूध स्तनीं, पोर पोटीं नाही॥ २॥

तुका म्हणे अंतीं वांज तेचि खरी।
फजिती दुसरी, जनामध्यें॥ ३ ॥

पुसतसें सांगा मी हें (१९०)

पुसतसें सांगा मी हें माझें ऐसें काई।
रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई॥ १ ॥

कोडें रे कोडें ऐका हें कोडें।
उगवुनी फार राहे गुंफोनियां थोडें॥ २ ॥

सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती।
ज्यालें जिवो मेलें मरो प्रारब्धाहातीं॥ ३ ॥

तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं।
नये अंगावरी वायां येऊं देऊं कळी॥ ४ ॥

चाल माझ्या राघो। डोंगरीं दिवा लागो (१९१)

चाल माझ्या राघो। डोंगरीं दिवा लागो॥ ध्रु० ॥

घर केलें दार केलें घरीं नाहीं वरो।
सेजारणी पापिणीचीं पांच पोरें मरो॥ १ ॥

घरीं पांच पोरें तीं मजहुनि आहेत थोरें॥
पांचांच्या बळें खादलीं बावन केळें॥ २ ॥

घर केलें दार केलें दुकान केला मोठा।
पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोठा॥
दुकान केला मोठा, तर पदरीं रुका खोटा॥ ३ ॥

हिजडा म्हणसी जोगी, तर सोळा सहस्र भोगी॥
तुका म्हणे वेगीं। तर (विठ्ठल) म्हणा जगीं॥ ४ ॥

आम्हां घरीं एक गाय दुभताहे (१९२)

आम्हां घरीं एक गाय दुभताहे। पान्हा न समाये त्रिभुवनीं॥ १॥
वान ते सांवळी नाम ते श्रीधरा। चरे वसुंधरा चौदा भुवनें॥ २॥
वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय। कुर्वाळी तो लाहे भावभरणा॥ ३॥
चहूं धारीं क्षीर वोपली अमूप। धाले सनकादिक सिद्धमुनी॥ ४॥
तुका म्हणे माझी भूक तेथें काय। जोगविते माय तिन्ही लोक॥ ५॥

भीमातीरीं एक वसविलें नगर (१९३)

भीमातीरीं एक वसविलें नगर, त्याचें नांव पंढरपूर रे।
तेथील मोकाशी चारभुजा त्यासी बायका सोळा हजार रे॥ १॥

नाचत जाऊं त्याचे गांवा खेळया सुख देईल विसावा रे।
पुढें गेले ते विधांव (निधाय) झाले वर्णिति त्याची सीमा रे॥ २॥

बळी आगळा पाळी लोकपाळा रीघ नाहीं कळिकाळा रे।
पुंडलिकानें केली पाटिलकी तो झाला दुःखावेगळा रे॥ ३॥

दोनी चहाट भरली घनदाट अपार मिळाले वारकरी रे।
ना जाऊं म्हणती आम्ही वैकुंठी जेणें देखिली पंढरि रे॥४॥

संतसज्जनीं मांडलें दुकान ज्याला जें पाहिजे तें आहे रे।
भक्तिमुक्तिसाठीं कोणी न पाहाती तिजकडे रे॥ ५॥

बहुत दिवस होती मज आस अजि घडलें (न?) सायास रे।
तुका म्हणे होय तुमचेनि पुण्यें भेटूं तया पायापाशीं रे॥ ६॥

अनंत लीला रूप सांवळा (१९४)

अनंत लीला रूप सांवळा तो बाळ ब्रह्मचारी
पातकें लोळती चरणांवरी ॥ ध्रु० ॥

म्हणे येश्वदा बा गोविंदा नको जाऊं परद्वाराला।
कीं गवळण मुखरण जपली तुला ॥
एक होती गवळण घरची धनीन गेली होती बाहेरी।
जाऊन चढला माळ्यावरी ॥
वर पाहातो शिंकीं लोंबती हात चालविले चारी।
सर्व हाताने दहीं खाइ हरि ॥
खाऊन पिऊन दिले ढेंकर शिंकीं आणिलीं बाहेरी।
टाकिलीं शेजारणींचे द्वारीं ॥ १ ॥

होती एक गवळण घरची धनीन पाहों आली मंदिरीं।
दह्यादुधाच्या फोडिल्या हारी ॥
गेली पुसाया तियेपासीं शेजारणी द्वारीं।
माझी शिंकिं कां गे तुझे परद्वारीं ॥
त्या रांडेनें केलें भांडण आलि माझ्या अंगावरी।
दांत खाऊन गाल कुसकरी ॥ २ ॥

स्त्रीपुरुष निजले होते समया लावून चारी।
कृष्णदेव गेले पलंगावरी ॥
दाढीवेणिची गांठ मारिली त्या दोघांसमोरी।
आपण मग पळून आला बाहेरी ॥
दचकुन उठली वेणी गुंतली झालि गवळण घाबरी।
आतां माझी गांठ सोडा लौकरी ॥
त्या दोघांला गांठ सुटेना बोलाविला शेजारी।
त्यानें गडे ओढित आणिली द्वारीं ॥
अवघे नगरचे लोक मिळाले तमाशा पाहती सारीं।
गवळण गरगर गिरक्या मारी ॥
गवळी म्हणे अगे गवळणी दाढी तुटली सारी।
कीं गवळी वरवर दाढी धरी ॥ ३ ॥

घागर घेउन गेली पाण्याला यमुनेचे तीरीं।
कीं घागर फोडी डोईवरी ॥

गवळण म्हणे येश्वदामाते पाहीं तुझा श्रीहरि।
माझे सुनेस मारी मंदिरीं॥
येश्वदामाता झाली जागृत लावुन शुभ्र दोरी।
पाळणा हालविते लौकरी॥
रांगत रांगत गेला कोनारीं, देव होते देव्हारीं।
त्याणें गडे देव गिळले सारे॥
तुका म्हणे आडवावा श्रीहरि तो बाळ ब्रह्मचारी
पातकें लोळती चरणांवरी॥ ४॥

विरहतापें फुंदें छंद करीत जाती (१९५)

विरहतापें फुंदें छंद करीत जाती
हा गे तो गे सावधान सर्वेचि दुश्चित्ती॥
न संभाळुनि आंग लोटी पाहे भोंवतीं
वेगळीच पडों पाहे कुळाहुनी याती॥ १॥

खुंटलीसी झाली येथें अवघियांची गती
आपले-परावे कोण नेणें भोवतीं॥
त्यांच्या नांवें बोभे बोभे हा हो श्रीपती
नवलाव हा येरां वाटोनियां हांसती॥ २॥

बाहेरीच धांवें राना न धरीच घर
नाकळे बंधना झाला तेणें संचार॥
विसरूनी गेली सासुरें की माहेर
एक अवलोकी एका पडिला विसर॥ ३॥

तुका म्हणे तुम्ही अवघ्या रहा निश्चळा।
नये आतां येऊं येथें सर्वथा बळा॥
त्याच्या त्याच्या मुखें अवघियांचा निर्वाळा
बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा॥ ४॥

: ५९ : कान्होबा

मनुराजा एक देहपुरीं (१९६)

मनुराजा एक देहपुरीं। असे नांदतु त्यासी दोघी नारी।।
पुत्रपौत्र संपन्न भारी। तेणें कृपा केली आम्हांवरी गा।। १।।

म्हणऊनी आलों या देशा। होतों नाहीं तरी भुललों दिशा।।
दाता तोही मजला भेटला इच्छा। येउनि मारग दाविला सरिसा गा।। २।।

सवें घेउनि चौघेजण। आला कुमर सुलक्षण।।
कडे चुकवून कांटवण। ऐका आणिलीं तीं कोण कोण गा।। ३।।

पुढें भक्तिनें धरिलें हातीं। मागें ज्ञान वैराग्य धर्म येती।।
स्थिर केलीं जीं आचपळें होतीं। सिद्ध आणुनी लाविलीं पंथीं गा।। ४।।

केले उपकार सांगों काय। बाप न करी ऐसी माय।।
धर्मे त्याच्या हे देखियेले पाय। दिलें अभयदान अखय गा।। ५।।

होतों पीडित हिंडतां गांव। पोट न भरे न राहावया ठाव।।
तो येणें अवघा संदेह। म्हणे फेडिला तुकयाचा बांधव गा।। ६।।

१६० : बहिणाबाई

संतकृपा झाली (१९७)

संतकृपा झाली। इमारत फळा आली॥
ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया॥
नामा तयाचा किंकर। तेणें रचिलें तें आवार॥
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केलें वोजा॥

काजळकुंका भुलसी वेड्या (१९८)

काजळकुंका भुलसी वेड्या सौरियांच्या वेषा
मुळीं कामा पडिला चिरा म्हणोनि नाचों ऐशा॥

निलाजऱ्या जाय, बोलसी तूं काय
लटिक्यामागें हिंडोनि तुज हाता येतें काय॥

विषयाचा धुमस घेउनि हिंडसी आम्हांमागें
मुळींचा तो ठाव रिता विनोद कोणासंगें॥

बहेणि म्हणे सौरीपुढें झांकण तें काय
खरेंखोटें अवघें तुझें कळे अंतर्बाह्य॥

रांड तेची खरी मुखीं नाहीं हरी (१९९)

रांड तेची खरी मुखीं नाहीं हरी।
ते जाणावी निर्धारीं, जन्मरांड॥ १॥

टिळे टोपी माळा वरि नराचा आकार।
जाळावा विचार, ज्ञानेंवीण॥ २॥

बहिणा म्हणे ज्यासी नाहीं आत्मज्ञान।
तें जाणावें श्वान, जन्मा आलें।। ३ ।।

शुभ्र सिंधू वरती वरेला (२००)

शुभ्र सिंधू वरती वरेला लडीया वरी दाविति शोभा।
कर्ण विराजित सुंदर अद्भुत तेज उणें रविबिंबा।।

दुष्ट प्रसिद्ध नसे मन स्वस्ति कथा करि व्येस्त पाहात सभा।।
सांगत सर्व अपूर्व जनीं हरिकृष्ण कथा परि व्येर्थ उभा।।

टाळ मृदांगविणें धृपदें मग मेळविती धनमानप्रतिष्ठा।
हिंडति देशविदेश विशेषतः नाम विकूनि ते दाविति निष्ठा।।

मंत्र उपासन सांगति साधन नाटक तें ठकमान्य कनिष्ठा।।
बहिणी म्हणे असे संत नव्हेति रे सांगतसे निज सज्जन-इष्टां।।

: ६१ : निळोबा

द्वारकेची मूर्ति एकनाथाघरीं (२०१)

द्वारकेची मूर्ति एकनाथाघरीं।
धोत्रें गंगातीरीं धूत असे॥
श्रीखंड्या चंदन उगाळूनी करीं।
पाणी वाहे हरी कावडीनें॥
सेवेसी तत्पर उभा ठाईंचे ठाईं।
देवपूजेसमयीं तिष्ठतसे॥
निळा म्हणे देव राबे ज्याचे घरीं
दत्त चोपदारी करीतसे॥

सदाचा हा धाला सदाचा भुकेला (२०२)

सदाचा हा धाला सदाचा भुकेला।
सदाचा निजेला, जागा सदा॥ १॥

ऐसिये परिचा अंबुला साजणी।
वरिला सुवासिणी, सदाचि मी॥ २॥

सदाचा बोलिला सदाचा हा मुका।
सदाचा हा लटिका, खरा सदा॥ ३॥

सदाचा हा वेडा सदाचा हा कुडा।
सदाचा हा निर्भिडा, भीड सदा॥ ४॥

सदाचा हा दाता सदाचा हा मागता।
सदाचा हा रिता, भरला सदा॥ ५॥

निळा म्हणे जवळी ना, हा (सदा) दुरी।
सदा सर्वांतरीं, नसोनि वसे॥ ६॥

समान नीट दोहीं आंगें (२०३)

समान नीट दोहीं आंगें पोरा खेळें मुरदांगें।
नाहींतरी जासी वायां चुकवीतां आंगें॥

खेळ सख्या खेळा। लक्षूनि हरी डोळां॥ ध्रु०॥

सांडूनि मर्यादा जरि घालिसी पाउलें।
तरि होसि फजित पोरा मारितील मुलें॥

निळा म्हणे चिप चरणें धरूनियां निग।
न पडसी कोडियांत ध्यातां हा श्रीरंग॥

६२ : प्रेमाबाई

जाउनि सांगा श्रीहरिला (२०४)

जाउनि सांगा श्रीहरिला। एकदां भेट सुदामाला॥ ध्रु०॥

बालपणिंचा मित्र माझा। झाला द्वारकेचा राजा॥
रुक्मिणी त्याचि नीजभाजा। इतुक्यांसहित तो राजा॥
म्हणुन मी प्रार्थितसें तुजला। एकदा भेट सुदामाला॥ १॥

नंदाने भव केला कालां। मिळेना अन्न त्या बाळाला।
अतां कोण रक्षि कुटुंबाला। अजुन कां मरण येइना मजला॥ २॥

धांव पाव यादवराया। चालतां शिणली माझि काया।
अझुनि कशि येइना तुला माया। अतां मी जाउं कोण्या ठाया।
रुक्मिण बोले प्रेमाबाईला। एकदा भेट सुदाम्याला॥ ३॥

मुरलि तुझी गोड कान्हा (२०५)

मुरलि तुझी गोड कान्हा, मुरलि तुझी गोड॥ ध्रु०॥

यमुनेच्या तीरीं जासी। मुरलि कैसि वाजवीसी।
मुरलिनादें भुलविसी। गोपी झाल्या रोड रे॥ १॥

कदंबाच्या झाडाखालीं। पाणी वाहे भूमीवरी।
कालिया मोठा अवजड भारी। मोडिसी त्याची खोड रे॥ २॥

प्रेमाबाई म्हणे श्रीहरी। विनवितें नानापरी।
बुडालें मी संवसारीं। यांतुनि मजला सोड रे॥ ३॥

:६३: शेख महंमद

मागें शून्य पुढें शून्य (२०६)

मागें शून्य पुढें शून्य। तेथें कैंचें पापपुण्य॥ १॥
काळ कंठूं आनंदाचा। मुखीं घोष हरिनामाचा॥ २॥
जनीं वनीं अवघा देव। त्याविण दुजा नाही ठाव॥ ३॥
शेख महंमद सोहंबोध। हरला भेद झाला सिद्ध॥ ४॥

कांती सांडवला रे भुजंग (२०७)

कांती सांडवला रे भुजंग। परि न संडी विषयसंग॥
ऐसें नको मज देवा। तोडी अविद्येचा मावा॥
बक बैसलासे ध्यानीं। बात आवलोकितो मनीं॥
खारीक कोवळी वरिली। भीतरीं निवरी आतोळी॥
तैसें विंदावन पीवळें। तैसे नको मज सोव्हळे॥
वचन ऐकुन सद्‌गुरु आनंदले। शेख महंमदा जवळ केलें॥

पडताळुनी सुऱ्या पशु विदारिती (२०८)

पडताळुनी सुऱ्या पशु विदारिती।
रडें बोंबा मारिती कापितां बोट॥ १॥

मेल्या रांडा पोरें रडती परोपरी।
नेणती अविचारी परावें दुःख॥ २॥

अहिंसा विज्ञान दुःखीं सुख कळलें।
आत्मज्ञान फळलें, शेख महंमदा॥ ३॥

खुळखुळा देउनी बाळ रिझविलें (२०९)

खुळखुळा देउनी बाळ रिझविलें।
काहडून घेतलें मातेनें आपणा।। १ ।।

सोनें देतां बाळा घेतां खुळखुळा।
तें करी तळमळा अंग घाली।। २ ।।

तैसे ते जना निजगुज देती।
आज्ञानें सळिती प्रतिमा हिरतां।।३ ।।

शहाणें झाल्या बाळ टाकी खुळखुळा।
मागे द्रव्य-गोळ शेखमहंमदा।। ४ ।।

तैसें होणें साधुसंत सांगाती।
प्रतिमाभक्ति टाका खुळखुळा।। ५ ।।

:६४: मृत्युंजयस्वामी (मुंतोजी)

श्रीकृष्ण खिल्लारी गोधनें चारी (२१०)

श्रीकृष्ण खिल्लारी गोधनें चारी।
डोळस श्रीहरी, बरवा वो ॥ १ ॥

बहु काळें घोंगडें नभाचिया ऐसें।
गोपाळाच्या वेषें, पांघुरला वो ॥ २ ॥

विरिंची-धनगरें विणियलें करें।
तंतु चौपरें, घालुनिया ॥ ३ ॥

मृत्युंजय म्हणे विश्वरूप पांघुरलें।
तया नांव ठेविलें, घोंगडें रया ॥ ४ ॥

९५ : अलमखान

मन हा बहुरंगी, चाळक तिहीं जगीं (२११)

मन हा बहुरंगी। चाळक तिहीं जगीं॥ध्रु०॥
संकल्प विकल्प करी मन चेष्टवि विषयांलागीं॥
मन छळले सिद्ध संन्यासी नाथपंथी मुनी योगी॥
ब्रह्माविष्णुमहेश्वर नाचती मनासंगीं॥
मन आपणातें पर्तुनि पाहिलें मग जाला बैरागी॥
अलमखान म्हणे विनंति ऐक मना गुरुचरणीं लाग वेगीं॥

संतांची खूण संतचि जाणति (२१२)

संतांची खूण संतचि जाणति येरां न पडे ठावें रे।
वेडियांच्या जरि गांवा गेल्या ज्ञान कवणें सांगावें रे॥
आंधळ्यानें आंधळ्यास डोळा जो घातला तेथे कोणें तें पहावें रे।
पांगळांचा जरी मिळाला पोहा तेथे मार्ग कोणें लंघावा रे॥
मुकियाने जरी स्वप्नचि देखिलें तरि काय बोलीं बोलावें रे।
वांजेच्या पुत्राचा विवाह होतो आले चित्रींचे भूपाळ सर्व रे॥
अलमखान म्हणे तेथें कांहींच नाहीं तेंचि आपण व्हावें रे॥

:६६: सय्यद महंमद

तुझ्या वेणुवाच्या नादें (२१३)

तुझ्या वेणुवाच्या नादें मी भुललें रे कान्हा।
सारी रात्र वैरियाची आजि सगुणनिधाना॥

जैं त्वां वेणुवाचा नाद माझें मीपण विसरलें।
डेरा जैं फोडिलास सेजारिणीनें देखिलें।
चि(त्त?) ठाईंच चंचळ, मन गोविंदीं गुंतलें॥

सातशें गौळण्यांच्या मध्यें तूंचि येक बरी।
त्यास्तव दान मागों आलों आपण नंदाचा हरी॥

पाण्या मी येत होतें सखये गे साजणी।
याचें काय सांगूं, सखये, मज मोठा-मोठा म्हणुनी॥

मावेचा कान्हया आपण झालासे दानी।
विनवी सय्यद महंमद अखंड कृष्णचरणीं॥

१६७ : शेख सलीमहंमद

आम्ही जातीचे ब्राह्मण (२१४)

आम्ही जातीचे ब्राह्मण। आमचे सोयरे मुसलमान॥
स्नानसंध्या बोळविली। महारासी सोयरिक केली॥
शेख सलीमहंमद भला। सून टाकुनि सासुसी गेला॥
तिच्या पोटीं कन्या जाली। ते फिरून बाईल केली॥

: ६८ : लतीफशाह

आतां पूजा कोठें वाहूं (२१५)

आतां पूजा कोठें वाहूं। पाहतां देहींच जाला देवु॥ ध्रु०॥

भावें पूजन करितां। देही देव जाला तत्त्वतां॥ १॥
तोडूं गेलों तुळसीपान। तेथें अवघा मधुसूदन॥ २॥
अत्र गंध पुष्प धूप। अवघें विठ्ठलस्वरूप॥ ३॥
फळ तांबूल नैवेद्य। पाहतां अवघाचि गोविंद॥ ४॥
म्हणे लतीफ ब्रह्मज्ञानी। अवघा पाहतां चक्रपाणी॥ ५॥

:६९: शहा हुसेन

श्रीहरि माझा नंदाचे घरिं खेळतो (२१६)

श्रीहरि माझा नंदाचे घरिं खेळतो ॥ ध्रु० ॥

वत्सपुच्छ करिं धरुनि धावतो
चरणिं घागऱ्या घुळघुळ वाजति,
गळां सांखळी, डोईवर कुंची,
रूप सांवळें, सगुण चांगलें,
चिमणा बाळ तो माय पहातसे,
शब्द तोतरा 'अले, अले' म्हणतो ॥. . .

नाना परिच्या मौजा करिती,
इच्छा त्यांची पूर्ण मनांतिल करणें सर्वहि,
हरि व्यापक तो ॥

ब्रह्मादिक स्तविती ज्याला,
श्रुतीस न कळे, वेदां अगोचर,
बाळ होउनी द्वारीं रांगे,
माखणासाठी हात पसरितो,
येश्वेदेच्या स्तनासि झोंबे,
दूध तियेचें घटघट घोटी,
लुटुलुटु पळतो,
पटपट पडुनी गडबड लोळे,
सदनामध्ये रुदन करितसे ॥. . .

परि तो मुरारि कवतुक करितो,
दुखासि हरुनी सुखासि देतो,
शहा फकीर नाम स्मरतां परगट होतो,
कीर्ति जयाची शिवासि प्रियकर,
नारद गुण गातो ॥

: ७० : शेख सुलतान

मूर्ति येकली मीं देखिली (२१७)

मूर्ति येकली मीं देखिली।
मसुरेपरि रेखिली ॥ ध्रु० ॥

आरक्त-पीतवर्णी।
श्वेतरंगभरित कारणी ॥ १ ॥

कृष्णवर्ण सांवळी।
जे कां ब्रह्मांडातें गिळी ॥ २ ॥

साहेबनाथें गुरुकिल्ली।
शेख सुलताना दाखविली ॥ ३ ॥

:७१: गरीब अबदुल

रंगीत पाळना हौसेनं केला (२१८)

रंगीत पाळना हौसेनं केला। रेसमी दोऱ्या लाउनी त्याला ॥
माझा झुलनार निघुन गेला। आता हालउन बगुं कुनाला ॥ १ ॥

माझ्या बाळाची हौस मोठी। दागिना मोडुन केली पेटी ॥
माझा झुलनार निघुन गेला। आता हालउन बगुं कुनाला ॥ २ ॥

आंगडें-टोपडें आसगराला। पिंपळपान शोभे कपाळाला ॥
माझा लेनार निघुन गेला। आता हालउन बगुं कुनाला ॥ ३ ॥

आसगार माझा लहान होता। पौर्णिमेचा चंद्र दिसत होता ॥
माझा झुलनार निघुन गेला। आता हालउन बगुं कुनाला ॥ ४ ॥

पोक्त रिवायत गमाचि झाली। गरिब आबदुल याने केली ॥
राजे भास्कराची दया झाली। गरिब आबदुल याने केली ॥ ५ ॥

: ७२ : माणकोजी बोधले

सांगड बांधा रे भक्तीची (२१९)

सांगड बांधा रे, भक्तीची, रघुनाथनामाची ॥ ध्रु० ॥

संसार सागर, सागर, भरला जातो पूर ॥ १ ॥
प्रपंच भोंवरा, भोंवरा, फिरतसे गरगरा ॥ २ ॥
लाटा उसळती, विषयांच्या, बहुत प्रपंचाच्या ॥ ३ ॥
नरहरि बोधला, बोधिला, हरिनामीं रंगला ॥ ४ ॥

सासूची सून एक पानिया गेली (२२०)

सासूची सून एक पानिया गेली।
पाणी फोडुनि तिनें घागर आणली ॥ १ ॥

भ्रतार मारुन भावासवें गेली।
बापाची बाइल पुत्रें नेली ॥ २ ॥

ऐक रे खेळिया नवल जालें।
नाहीं तें डोळां देखिलें रे ॥ ३ ॥

बोधला म्हणे गुरुखुण ओळखिलें।
देखोनि जवळ जालें रे। खेळिये ॥ ४ ॥

पांडुरंगा कोठें जासी? (२२१)

पांडुरंगा कोठें जासी। ओढुन बांधीन गळ्यासी ॥ १ ॥
शेत आलें रे अंगासी। सारा-दोरा तूंचि देसी ॥ २ ॥
आम्ही जातों प्रवासासी। कांटे खडे तूं झाडिसी ॥ ३ ॥
बोधला म्हणे हृषीकेशी। तुझ्या पायाची मी दासी ॥ ४ ॥

: ७३ : रामदास

हरि माझे जीवींचें जीवन (२२२)

हरि माझे जीवींचें जीवन। हरि माझे मनींचें मोहन।
हरि माझें सर्व तनुमन। हरि वर देव पुरातन॥

हरि मज अंतरीं भरला। भरोनियां उदंड उरला।
सकळ देहधारकीं पुरला। सेखीं आपेंआपचि मुरला॥

आपणचि उंचनीच जाला। आपणचि तो भला शोभला॥
कितीएक वोळला क्षोभला। जगदंतरिं तो भला लाभला॥

तोचि एक गातो तो ऐकतो। वाजवितो तोचि तो नाचतो।
तिन्ही लोक कोण वर्तवितो। आपणांसि आपण स्तवितो॥

दास म्हणे हें एक नवल। खोल तरी खोलाहूनि खोल।
परोपरी बोलवितो बोल। तयावीण सर्व कांहीं फोल॥

चित्त देउनी ऐका रे (२२३)

चित्त देउनी ऐका रे।
पोहणार पडिला धारे॥
मन मुळाच्या शेवटें।
वाहे जीवन उफराटें॥
उगमासी संगम जाला।
रामदासीं शब्द निवाला॥

पूर्ण ब्रह्म होय गे (२२४)

पूर्ण ब्रह्म होय गे। वर्णूं मी आतां काय गे।
नंद ज्याचा बाप त्याची यशोदा ती माय गे॥

क्षीरसागरवासी गे। लक्ष्मी ज्याची दासी गे।
अर्जुनाचे घोडे धुतां लाज नाहीं त्यासी गे।।

अनाथाचा नाथ गे। त्याला कैसी जात गे।
चोखामेळ्यासंगें जेवी दहीदूधभात गे।।

नंदाचा जो नंद गे। सर्व सुखाचा कंद गे।
रामदास प्रेमें गाय नित्य ज्याचा छंद गे।।

अपराधी आहें मोठा, मारणें कृपेचा सोटा (२२५)

अपराधी आहें मोठा। मारणें कृपेचा सोटा।। ध्रु० ।।

स्वामिराय सुखाचे कंद। नेणुनि केला हा निजछंद।
तेणें पावलों हें बंद। झालों निंद्य सर्वस्वीं।। १ ।।

तारीं तारीं दत्तात्रया। वारीं माझ्या तापत्रया।
तुझे पाय काशीगया। आहे साच मजलागीं।। २ ।।

आतां अंत पाहसी काय। तूंचि माझा बापमाय।
रामदास तुझे पाय। वारंवार वंदितो।। ३ ।।

आतां तरि जाय जाय जाय (२२६)

आतां तरि जाय जाय जाय। धरिं सद्गुरुचे पाय।। ध्रु० ।।

संकल्प विकल्प सोडुनि राहें, दृढ धरुनी पाय पाय पाय।। १ ।।
नामस्मरण ज्यामुखिं नाहीं, त्याणें वांचुनि काय काय काय।।२ ।।
मानवतनु ही न ये मागुती, बरें विचारुनि पाह्य पाह्य पाह्य।। ३ ।।
आत्मानात्मविचार न करितां, व्यर्थ प्रसवली माय माय माय।। ४ ।।
सहस्त्र अन्याय जरि त्वां केले, कृपा करिल गुरुमाय माय माय।। ५ ।।
रामदास म्हणे नामस्मरणें, भिक्षा मागुनि खाय खाय खाय।। ६ ।।

वाजे पाऊल आपुलें (२२७)

वाजे पाऊल आपुलें। म्हणे मागें कोण आलें।।
कोण धांवतसे आड। पाहों जातां झालें झाड।।
भावीतसे अभ्यंतरीं। कोण चाले बरोबरी।।
शब्द पडसाद उठला। म्हणे कोणी रे बोलिला।।
रामी रामदास म्हणे। ऐसीं शंकेचीं लक्षणें।।

राज्य आलें रघुनाथाचें (२२८)

राज्य आलें रघुनाथाचें। भाग्य उदेलें भक्तांचें।। १ ।।
कल्पतरु चिंतामणी। कामधेनूची दुभणी।। २ ।।
परिस जहाले पाषाण। अंगीकार करी कोण।। ३ ।।
नाना रत्नांचे डोंगर। अमृताचें सरोवर।। ४ ।।
पृथ्वी अवघी स्वर्णमय। कोणीकडे न्यावें काय।। ५ ।।
ब्रह्मादिकांचे कैवारी। रामदासाचे अंतरीं।। ६ ।।

आम्ही काय कुणाचें खातों रे (२२९)

आम्ही काय कुणाचें खातों रे,
तो राम आम्हाला देतो रे।। ध्रु० ।।

बांधिले घुमट किल्ल्याचे तट,
तयाला फुटती पिंपळ-वट,
तेथें कोण लावितो मोट
बुडाला पाणी घालतो रे।। १ ।।

खडक फोडितां सजीव रोडकी,
पाहिली सर्वांनी बेडकी
सिंधु नसतां तियेचे मुखीं,
पाणी कोण घालितो रे।। २ ।।

पहा रे पहा मातेचिये स्तनीं,
चिंतितां रक्त-मांस-मलखाणी,
तिथें विमल दुग्ध घालोनी
(बाळासी) कोण पोसीतो रे ॥ ३ ॥

नसतां पाण्याचे बुडबुडे,
सदासर्वदा गगन कोरडें,
दास म्हणे जीवन चहुंकडे,
पाडुनि सडे, पीक उगवतो रे ॥ ४ ॥

किती पृथ्वीचें वजन (२३०)

किती पृथ्वीचें वजन। किती अंगोळ्या गगन।
सांग सिंधूचें जीवन। किती टांक ॥ १ ॥

किती आकाशींचा वारा। किती पर्जन्याच्या धारा।
तृण भूमीवरी चतुरा। संख्या सांग ॥ २ ॥

वायूसरसे उडती। सांग अणुरेणु किती।
लक्ष चौऱ्याशींची उत्पत्ती। संख्या सांग ॥ ३ ॥

अठराभार वनस्पती। भूमंडळीं पाणी किती।
पुष्पें फळें जाती किती। संख्या सांग ॥ ४ ॥

बीज वडीं आणि पिंपळीं। किती आहे भूमंडळीं।
सर्व धान्यांची मोकळी। संख्या सांग ॥ ५ ॥

सर्व सरितांची वाळू किती। सिंधूसागरीं वाळू किती।
हरखूं आहे किती। संख्या सांग ॥ ६ ॥

सांग माझें डफगाणें। कीं डफ ठेवीं शहाणपणें।
देहबुद्धीचें लक्षण। सोडवीन ॥ ७ ॥

ऐक जेंजें पुशिलें तुज। तेंतें आतां सांगें मज।
अनंत ब्रह्मांडें बेरीज। किती जाहली ॥ ८ ॥

रामदासाचा विनोद। सांडीं अहंतेचें बीज।
मग स्वरूपीं आनंद। सुखी राहें ॥ ९ ॥

कोण मी मज कळतचि नाहीं (२३१)

कोण मी मज कळतचि नाहीं।
सारासार विचार शोधुनि पाहीं॥ ध्रु० ॥

नारी म्हणों तरी नरचि भासे।
नर म्हणों तरी समूळ विनासे॥ १ ॥

स्थूल म्हणों तरी सूक्ष्मचि असे।
सूक्ष्म म्हणों तरी कांहीं न दिसे॥ २ ॥

दास म्हणों तरि रामचि आहे।
राम म्हणों तरि नाम न साहे॥ ३ ॥

ताळ वाजे मंदमंद (२३२)

ताळ वाजे मंद मंद। मुखीं हरिनाम छंद॥ १ ॥
फडके ताळी एके वेळे। घोषें नाचे हें आगळें॥ २ ॥
रंगीं हरिदास मातले। नामघोषें आनंदले॥ ३ ॥
उभे हरिदास रंगणीं। रामदास लोटांगणीं॥ ४ ॥

वोळला रे रंग वोळला रे (२३३)

वोळला रे रंग वोळला रे। ताळमृदांगें भव्य कल्लोळला रे॥ ध्रु० ॥

नाहीं बेतालाचा लेश। ताळबंधें सुंदर वेष।
कथेमध्यें तो जगदीश। भक्तालागीं तिष्ठतु॥ १ ॥

कीर्तीप्रतापाचें गाणें। भक्तालागीं श्लाघ्यवाणें।
नाना संमती पुराणें। वाग्विलास होतसे॥ २ ॥

जेथें कथा निरूपण। तेंचि उत्तम लक्षण।
रामदास सांगे खूण। गावे गुण विचारें॥ ३ ॥

हवाया नळे बाण भांडीं अनंतें (२३४)

हवाया नळे बाण भांडीं अनंतें। बळें सोडितां जाति आकाशपंथें।
बती लागतां वेळ नाही उठाया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

वरी पाहतां दृष्टि हे दूरि धांवे। तयाच्या सवें कल्पना हे उठावे।
उठे मारुती वेळ नाहीं उडाया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

फिरे वावरे वात सर्वांत जैसा। चळे नीवळेही कळे स्पष्ट तैसा।
धरीतां बळें संधि नाहीं धराया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

विवेकी विवंचूनियां लागवेगें। पळे सर्वही दृश्य सांडूनि मागें।
उपायेंचि तो जाय लंघूनि माया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

असावें तरी सर्व कांहीं असावें। नसावें तरी लेश तेंही नसावें।
परब्रह्म तें वीवराया वराया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

म्हणे दास रे वास भूतीं भुतांचा। तयाचे परी निर्गुणीं निर्गुणाचा।
विचारेंचि वीनासती अष्टकाया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥

पसरले सरले गिरि साजरे (२३५)

पसरले सरले गिरि साजरे। सरवटें धुकटें भरितें भरे।
बहुत वात झडांत झडाडितो। वर तरू वरताचि कडाडितो॥ १॥

झिरपती झरती झरती झरे। न धरितां धरतां निर वावरे।
बहुत पाभळ वोघ महीतळीं। नभकटें धुकटें कटपाभळी॥ २॥

सरस रम्य रसाळ वनांतरा। हरित रंग सुरंग दिसे बरा।
दिसतसे रमणीय वसुंधरा। नुतन पल्लव हा तरु साजिरा॥ ३॥

द्रुमलता समता द्रुण मातलें। सुख मनीं सुमनीं मन रातलें।
परमसुंदर ते खग बोलती। गमतसे दसती कमळापती॥ ४॥

विमळ सूशिळ तें स्थळ पाहतां। सुखविशेष घडे पळ राहतां।
वरदराज विराजतसे वनीं। विनटला नटला रत सज्जनीं॥ ५॥

फर फर फर फर वोढिति कुंजर (२३६)

फर फर फर फर वोढिति कुंजर, धनुष्य आणिलें भूपें।
हर हर हर हर अति पण दुष्कर, सुंदर रघुपतिरूपें।।
वर वर वर वर रघुपति वोढित, दशमुख संतापे।
कर कर कर कर शर करारे, थर थर थर थर भू कंपे।। १।।

रामें सज्जिलें वितंड परम चंड रामें उचलिलें त्र्यंबक।
कौशिक ऋषि पुलकांक।।
रामें ओढिलें शिवधनु। सीतेचें तनुमनु।
रामें भंगिलें भवचाप। असुरां सुटला कंप।। २।।

कड कड कड कड भग्न कडाडे, तड तड तड तड तडक फुटे।
गड गड गड गड गगन कडाडी, धड धड धड धड धडक उठे।।
भड भड भड भड रविरथ चुके, घडघडीत अव्हाटे।
खड खड खड खड खचित दिग्गज, चळित कुळाचळ कुटे।। ३।।

दुम दुम दुम दुम दुमित भूगोलें, स्वर्ग-मृत्यु-पाताळें।
धुम धुम धुम धुम धुकट कर्णीं, विधिस बैसलें टाळें।।
हळ हळ हळ हळ अति कल्लोळ हळ, हरसीपंचक डोले।
खळ खळ खळ खळ उचंबळत जळ, सिंधूसि मोहो आंदोळे।। ४।।

धक धक धक धक धकीत धरणीधरा बधिर झाले नयन।
चक चक चक चक चकित निशाचर, करविले दीर्घशयन।।
थक थक थक थक थकीत सुरवर, वरुषति पुष्पें तसे (वरून)।
लख लख लख लख रत्नमालिका, जनवकालिक लग्न।। ५।।

जय जय जय जय जयति रघुराज वीरा गर्जति जयकारें।
धिम धिम धिम धिम नृपदेव दुंदुभि, गगन गर्जलें गजरें।।
तर तर तर तर मंगळतुरें, विविध वाद्यें सुंदरें।
समरस रस रस दासा मानसीं, रामसीता वधूवरें।। ६।।

वेध लागला रामाचा, सुरवर-विश्रामाचा (२३७)

वेध लागला रामाचा, सुरवर-विश्रामाचा ॥ ध्रु० ॥

तेथें सुरवर नर किन्नर विद्याधर, गंधर्वांचा मेळा।
तेथें न्यूने कोकिळा, मंजुळकीळा, झुळकी रम्यरसाळा।
तेथें गायनकळा रंग आगळा, बाहे अमृतवेळा।
तो सुखसोहळा देखुन डोळां, लाचावे मनमेळा ॥ १ ॥

येकताल मृदांगें श्रुति-उपांगें, गाती नवरसरंगें।
एकरंग सुरंगें दाविति संगें, सप्तस्वरेंचि आंगें।
एक अनेक रागें आलापयोगें, बिकट ताल सुधांगें ॥ २ ॥

तेथें खण खण खण खण टाळ वाजती, झण झण झण झण यंत्रें।
तेथें दण दण दण दण मृदंग मंजुळ, तालबद्ध परतंत्रें।
तेथें चण चण चण चण शब्द बोलती, वाणी चपळ सत्पात्रें।
तेथें घण घण घण घण घंटा वाजती, आनुहातें शूळमंत्रें ॥ ३ ॥

तेथें झग झग झग झग झळकति रत्नें खचित बैसे शोभा।
तेथें धग धग धग धग तेज आगळें, लावण्याचा गाभा।
तेथें मग मग मग मग सुगंध परिमळ सत्यदयेति लोभा।
पवनतनुज दासांचें मंडण, निकट राहिला उभा ॥ ४ ॥

उठोनियां प्रातःकाळीं (२३८)

उठोनियां प्रातःकाळीं। मूर्ति चिंतावी सांवळी।
योगीयांचे मेळीं। हृदयकमळीं साजिरी ॥ ध्रु० ॥

राम सर्वांगीं सांवळा। हेम अलंकार पीवळा।
नाना रत्नाचिया कीळा। अलंकार शोभती ॥ १ ॥

पिवळा मुकुट किरीटी। पिवळें केशर लल्लाटीं।
पिवळ्या कुंडलांच्या थाटी। पिवळ्या कंठीं माळिका ॥ २ ॥

पिवळें पदक करभूषणें। बाहुवटीं वरि-कंकणें।
पिवळ्या मुद्रिकांचें लेणें। पिवळें करीं शरचाप ॥ ३ ॥

पिवळा कांसे पीतांबर। पिवळ्या ब्रीदाचा तोडर।
पिवळ्या घंटांचा गज्जर। पिवळ्या वांकी वाजती ॥ ४ ॥

पिवळा मंडप विस्तीर्ण। मध्यें पिवळें सिंहासन।
श्रीराम सीता लक्ष्मुमण। दास गुण गातसे ॥ ५ ॥

धवळे भोळे चक्रवर्ती (२३९)

धवळे भोळे चक्रवर्ती। धवळे अलंकार शोभती।
धवळें धाम उमापती। सदा चित्तीं चिंतावा ॥ ॥धृ० ॥

धवळ्या जटा गंगाजळ। धवळा मयंक निर्मळ।
धवळे कुंडलांचा लोळ। शंखमाळ लोंबती ॥ १ ॥

धवळी स्फटिकांची माळ। धवळे गळां उलथे व्याळ।
धवळें हातीं नर-कपाळ। धवळा त्रिशूळ शोभतसे ॥ २ ॥

धवळा सर्वांगें आपण। धवळें विभूतिचें लेपन।
धवळें गात्र धवळें वसन। धवळें वाहन नंदीचें ॥ ३ ॥

धवळें कैलासभुवन। धवळें मध्यें सिंहासन।
धवळें शंकराचें ध्यान। दास चिंतन करीतसे ॥ ४ ॥

भीमरूपी महारुद्रा (२४०)

भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती।
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥

महाबळी प्राणदाता सकळां ऊठवी बळें।
सौख्यकारी शोकहारी(हर्ता) धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥

दीननाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा।
पातालदेवताहंता भव्य सिंदूरलेपना ॥ ३ ॥

लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना।
पुण्यवंता पुण्यशीळा पावना परितोषका ॥ ४ ॥

ध्वजांगें उचली बाहो आवेशें लोटला पुढें।
काळाग्नि काळरुद्राग्नि देखतां कांपती भयें॥ ५॥

ब्रह्मांडें माइलीं नेणों आंवाळे दंतपंगती।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठिल्या बळें॥ ६॥

पुच्छ तें मुर्डिलें माथां किरीटी कुंडलें बरीं।
सुवर्ण कटि कांसोटि घंटा किंकिणि नागरा॥ ७॥

ठकारे पर्वताऐसा नेटका सडपातळू।
चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरि॥ ८॥

कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावे उत्तरेकडे।
मंदाद्रीसारखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें॥ ९॥

आणिला मागुतीं नेला आला गेला मनोगती।
मनासी टाकिलें मागें गतीसी तुळणा नसे॥ १०॥

अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे।
तयासी तुळणा कोठें? मेरुमंदार धाकुटे॥ ११॥

ब्रह्मांडाभोवते वेढे वज्रपुच्छें करूं शके।
तयासी तुळणा कैंची? ब्रह्मांडीं पाहतां नसे॥ १२॥

आरक्त देखिलें डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा।
वाढतां वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा॥ १३॥. . .

रामदासीं अग्रगण्यू कपिकुळासि मंडणू।
रामरूपीं अंतरात्मा दर्शनें दोष नासती॥ १७॥

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा (२४१)

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा।
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां॥ १॥

जयदेव जयदेव जय श्री शंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा॥ ध्रु०॥

कर्पुरगौर भोळा नयनीं विशाळा।
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा॥
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा॥ २ ॥

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें।
त्यामाजीं अवचित हळहळ जें उठलें॥
ते त्वां असुरपणें प्राशन केलें।
'नीलकंठ' नाम प्रसिद्ध झालें॥ ३ ॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनजिनसुखकारी॥
शतकोटीचें बीज वाचे उच्चारीं।
रघुकुळटिळक रामदासा-अंतरीं॥ ४ ॥

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं (२४२)

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं।
करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं॥
कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं।
सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी॥ १ ॥

जयदेव जयदेव जय श्रीहनुमंता।
तुमचेनि प्रसादें न भियें कृतांता॥ ध्रु० ॥

दुमदुमिलें पाताळ उठिला पडशब्द।
धगधगिला धरणीधर मानिला खेद॥
कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद।
रामीरामदासा शक्तीचा बोध॥ २ ॥

निश्चयाचा महामेरु (२४३)

निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारु।
अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी॥ १ ॥. . .

यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत नीतिवंत। जाणता राजा॥ ४॥. . .

देवधर्म गोब्राह्मण। करावया संरक्षण।
हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली॥ ८॥. . .

या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाही।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां॥ १०॥. . .

कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकांस धाक सुटले।
कित्येकांस आश्रय जाले। शिवकल्याण राजा॥ १२॥. . .

सर्वमंडळीं धर्ममूर्ति। सांगणें काय तुम्हांप्रती।
धर्मस्थापनेची कीर्ति। संभाळिली पाहिजे॥ १४॥

उदंड राजकारण तटलें। तेणें चित्त विभागिलें।
प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे॥ १५॥

अखंड सावधान असावें (२४४)

अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावें।
तजविजा करीत बसावें। एकांत स्थळीं॥ १॥. . .

पाटवणी तुंब निघेना। तरी मग पाणी चालेना।
तैसें सज्जनांच्या मना। कळलें पाहिजे॥ ४॥

जनाचा प्रवाह चालिला। म्हणजे कार्यभाग आटोपला।
जन ठायीं ठायीं तुंबला। म्हणजे खोटें॥ ५॥. . .

आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावें।
महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे॥ १५॥

लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणें॥ १६॥

शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें।
इहलोकीं परलोकीं राहावें। कीर्तिरूपें॥ १७॥

शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं॥ १८॥

शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाचें कैसें बोलणें।
शिवरायाची सलगी देणें। कैसें असे॥ १९॥

सकळ सुखांचा त्याग। करूनि साधिजे तो योग।
राज्यसाधनाची लगबग। कैसी असे॥ २०॥

त्याहूनि करावें विशेष। तरीच म्हणावें पुरुष।
याउपरि आतां विशेष। काय लिहावें॥ २१॥

: ७४ : रंगनाथस्वामी

ब्रह्म सनातन रे (२४५)

ब्रह्म सनातन रे, तो हा ब्रह्म सनातन रे॥ ध्रु० ॥

निगमागमनीतिशास्त्रविशारद, अवलीया तनु रे॥
विधि हर सुर नर वंदिति ज्यातें, पदरजपावन रे॥
पूर्ण रंग निजपालक तो रे, दुःखविनाश नुरे॥

भासे जगदाकार तरंग (२४६)

भासे जगदाकार तरंग॥ ध्रु० ॥

मायामृगजळ शाश्वत नसतां धांवति जेंवि कुरंग॥
पुत्रमित्र गणगोत्र सर्वही, गजरथधेनुतुरंग॥
दृग्भ्रमयोगें रज्जु न जाणे, भासे तीव्र भुजंग॥
पूर्णरंग निजरंगीं रंगुनि, होय सहज भवभंग॥

स्मरतां नित्य हरी (२४७)

स्मरतां नित्य हरी। मग ते माया काय करी॥ ध्रु० ॥

नामरूपात्मक सकलहि नाशक
निश्चय हा विवरीं॥ १॥

शांतिक्षमा परब्रह्मीं सादर
भवभ्रम न उरे उरीं॥ २॥

सहज पूर्ण निजरंगीं रंगुनी
सद्गुरुपाय धरीं॥ ३॥

आतां रामपायीं मना लाग वेगें (२४८)

आतां रामपायीं मना लाग वेगें।
सोशिले बहुत अन्याय मागें॥ ध्रु० ॥

जन्मजन्मांतरीं मास नव दाथरीं।
निरयसेजेवरी उदरकुहरीं।
घातलें अघपुरीं शिणविलें यापरी।
काय सांगूं तरी दुःखलहरी॥ १ ॥

न निघतां बाहेरिं जेविं वोढे सरी
जन्मद्वारीं करी अटक भारी।
उपजलीयावरी मूढवृत्ती धरी
रडत 'कोऽहं' स्वरीं देहधारी॥ २ ॥

बाळपणिं खेळतां विषय-उन्मादता
विषयलोलुप्यता चित्त होतें।
वृद्धपण आलिया गलिततनु झालिया
स्मरणपद गेलिया स्वहित रहातें॥ ३ ॥

श्वानसूकरखरा मार्जार-वानरा
कृमीकीटकधरा पापयोनी।
त्यांचिया ऊदरीं जन्मलों जेधवां
अभक्ष तें भक्षिलें न समजोनीं॥ ४ ॥

पुनरपी सांगणें हेंचि तुज मागणें
निशिदिनीं जागणें श्रीहरिभजनीं।
निगमागम बरें दाविती तें खरें
तेंचि तूं आचरें विषय त्यजुनी॥ ५ ॥

साधुदर्शन पाहा सतत भजनीं रहा
लाविसि जरि देह हा रामकाजीं।
रंगसी निजपदीं मोहमायानदी
आटली जाण, घे भाष माझी॥ ६ ॥

सये! कैं मनोरथ जगन्नाथ पुरवी (२४९)

सये! कैं मनोरथ जगन्नाथ पुरवी।
देवुनी अभय भवसिंधु तरवी।। ध्रु० ।।

लेश विश्रांतिचा प्राप्त नाही,
भवद्भ्रांति दिग्मंडळीं व्यर्थ फिरवी।।
शीण बहु वाटतो आठवीतां पुनर्-
जन्म-मरणावळी कोण सरवी।। १ ।।

साधुसंगें अभिप्राय षट्शास्त्रिंचा
शोधितां साधली युक्ति बरवी।।
भक्ति वीरक्ति भगवत्प्रबोधामृतें
मातली बुद्धि संकल्प नुरवी।। २ ।।

ब्रह्मसाम्राज्य स्वानंदयोगें असं-
भावना शांत निर्द्वंद्व करवी।।
रंगलानंतपूर्णा निजानंदजनि
सायुज्यप्राप्तिचें छत्र धरवी।। ३ ।।

बोल रे बोल कान्हा (२५०)

बोल रे बोल कान्हा। काय बोलसी निजनयना।। ध्रु० ।।

बोल बोलवीत कोण। बोल उद्भवला कोठून।
त्याचें एकान्तीं आहे कोण। त्याचा न कळे महिमान।। १ ।।

कृष्ण म्हणे अहो आई। मूळ शोधोनियां पाही।
निजमूळ पडतां ठायीं। चुकेल जन्ममरण।। २ ।।

निजरंगीं रंगतां तद्रूप। पाहतां सद्गुरु पूर्णस्वरूप।
(अनंत ब्रह्मसमीप)। आपेआप होइंजे।। ३ ।।

रुमझुम धुमधुम थिरिकिटि धिगधिग नाचाप्रति गणपती।
आधारचक्रें नाचुं लागले स्वानंदें नाचती॥ ध्रु० ॥

नाच नाच मोरेश्वर म्हणती ईश्वर-दाक्षायणी।
उत्तम गौतम गार्गी गालव वसिष्ठ बसले मुनी।
ऐशाऐशा अनसूयादिक ऋषिपत्न्या कामिनी॥
त्या नाच म्हणति सगळाल्या -- अहो मोरया।
देव नाचूं ते लागले – अहो मोरया।
नाचे ब्रह्मांड भ्रांतितें – अहो मोरया।
नाच नाचला देवचि झाला संतगुणीं गोंविती॥ १ ॥

कामसरिता नाचुं लागल्या, क्रोधादिक पर्वत।
मोहसिंधु तो नाचुं लागला अहंवृक्ष नाचत॥
शांतीधरणी नाचुं लागलीं ज्ञानागर नाचत।
वासनाउतरंडी नाचे भक्तिचूल नाचत॥
गुरुकृपा शिंकिं नाचती – अहो मोरया।
देव देव्हारें नाचती – अहो मोरया।
जारज अंडज स्वेदज उद्भिज वृक्ष पहाड नाचती॥ २ ॥

एकविस स्वर्गें नाचुं लागलीं नाचति रात्रंदिस।
सप्त पाताळ नाचुं लागले शेषादि वराह सकळिक॥
नाच संधिसी त्रिपुरासुर तो कपटी कीं मायिक।
त्रिपुरामध्यें शिरोनि बसला मनाभधें घातक॥
म्हणे पार्वती, पुरे मोरया – अहो मोरया।
घे उचलुनि कडे मोरया -- अहो मोरया।
जड लागे बाळ मोरया – अहो मोरया।
क्षितिवरि गणपति पार्वति उतरी, देव मनीं शोधती॥ ३ ॥

पाय झाडिला दैत्य मारिला, व्यासा सांगे विधी।
योजन बारा प्रेतपसारा त्र्यंबकक्षेत्रामधीं॥
नाचे भगवान चिंतामणी – अहो मोरया।
नाचे निजरंगीं रंगुनी – अहो मोरया।
नाचे सिंधुपुरीं (उसळुनी) – अहो मोरया।
म्हणुनि अहो मोरया अहो मोरया नाच ऐकती।
स्वानंदें निजानंदसुखपदीं अक्षयची रंगती॥ ४ ॥

: ७५ : केशवस्वामी

आली रे आली, आली गुरुमाउली (२५२)

आली रे आली, आली गुरुमाउली ॥ ध्रु० ॥

अतिवेगें धांवत आली, मजलागीं उडी घाली ॥ १ ॥
कृपेची करीत छाया, निववित माझी काया ॥ २ ॥
पुरवित जिविंची थाया, सद्‌गुरूमहंमाया ॥ ३ ॥
अमृताची वृष्टि झाली, सुखाची धणीच दिधली ॥ ४ ॥
प्रसन्न केशवीं झाली, आंगिंच जडोनि ठेली ॥ ५ ॥

तिचें वदनकमळ पहा डोळां (२५३)

तिचें वदनकमळ पहा डोळां। निंबलोण उतरा वेळोवेळां ॥ ध्रु० ॥

शुद्धभाव फरा त्याली वेगीं। स्नेहफूल लाविलें पूर्णभांगीं ॥
तेजप्राप्तीची राखडी नित्य घाली। निर्विकार जडित मूद त्याली ॥
श्रवणीं तानवडें त्याइली त्रिकाळीं। ज्ञान बिजवरा झळके कपाळीं ॥
नयनीं विज्ञान-अंजन शोभताहे। पाहे त्याचा त्रिविध ताप जाये ॥
मुक्त-भोतीं अखंड त्याली असे। वदनचंद्र प्रसन्न त्यानें भासे ॥
निजरंगें सुरंग पूर्ण भासे। तोची मुखीं तांबुल रंगलासे ॥
कंठीं सद्‌भक्ति मोहनमाळ साजे। हृदयीं आनंदपदक विराजे ॥
सहजक्षमा साजिरी सरी त्याली। गळां चिन्मय मंगळसूत्र घाली ॥
निष्ठा कंकणें बांधिलीं दोहीं हातीं। दया पाटल्या त्याइली दिनराती ॥
भक्ति चोळी त्यावरी मुक्त जाळी। लेउनीयां शोभे निवृत्तिबाळी ॥
शांति पीतांबराची सावकाश। अखंडित घातली निज कास ॥
केशवाची स्वामीण मूळमाता। सुख न समाये ब्रह्मांडीं रूप ध्यातां ॥

गुरुगोडी घेतली आम्ही (२५४)

गुरुगोडी घेतली आम्ही। नित्य बैसोनि मंगळधामीं॥ ध्रु० ॥

स्वात्मसुखाच्या नारळासी। धीरमेरु जोडिला त्यासी॥
भक्तिप्रेमाचें जीवन भरी। आंत वैराग्य भडभड करी॥
अकर्माचें चिलिम भरी। ज्ञान अग्नि ठेविला वरी॥
स्वानुभवाची नळी जोडी। कल्पनेचा धूर सोडी॥
द्वैत जाळुनी केली राख। केशवें गुरुगोडी घेतली देख॥

इतुकें दे मजला, दे मजला (२५५)

इतुकें दे मजला, दे मजला। मागतसें मी हरि तुजला॥ ध्रु० ॥

संतसमागम जोडी। माझें मीपण वाट सोडी॥
येती संत घरासी। भक्तीभावें पूजिन त्यांसी॥
भगवद्भजनीं लागो। तुझिये स्वरूपीं मन हे वागो॥
अक्षयवैभव देईं। अखंड केशव-सद्गुरुपायीं॥

: ७६ : दिनकरस्वामी

दाखवा दाखवा राम कैसा वो (२५६)

दाखवा दाखवा राम कैसा वो।
रामालागीं जीव जाला पिसा वो।। ध्रु० ।।

वैभवसंपत्ति काय रामेंविण।
कळाकौशल्य काय रामेंविण।।
विद्याविलास काय रामेंविण।
रामावांचुनि अवघा अनुमान।। १ ।।

भूषण दूषण ऐसें वाटताहे।
पुण्य रामेंवीण पाप भासताहे।।
दुर्घट संसार दीन दीसताहे।
रामावांचुनी येम जाचिताहे।। २ ।।

वय वेंचलें आतां काय करूं।
नाशलें आयुष्य त्याचा जाला केरू।।
वियोगें रामाच्या किती धीर धरूं।
भेटवा दिनकरस्वामी रघुवीरू।। ३ ।।

७७ : शि व रा म स्वा मी

संत दयाळ कसे (२५७)

संत दयाळ कसे। राजा रंक जयां सरिसे॥ ध्रु०॥

देउनि भेटी तोडिति माया। नेउनि दाविति निजपदठाया॥ १॥
श्रवणीं पाजुनि अमृतवाणी। नेउनि दाविति चिन्मयखाणी॥ २॥
शिवरामाचें अभिनव लेणें। लेवविलें मज पूर्ण कृपेनें॥ ३॥

गुरुवाक्याचे निजशेष चाखाया (२५८)

गुरुवाक्याचे निजशेष चाखाया, मांजर आजिं होऊं।
मी येऊ। मी येऊं। मी येऊं॥ मांजर आजिं होऊं॥ ध्रु०॥

सीर करिसी त्यासी तरी त्या घरीं न कळत तेथें जाऊं॥ १॥
गोडी लाचावली प्रेम निज पाया मागे-पुढें भोऊं॥ २॥
पूर्णगुरु शिवराम असोनि कां मी काळसुण्यासी भेऊं॥ ३॥

: ७८ : वेणाबाई

स्वामि चालावें निजमंदिरा (२५९)

स्वामि चालावें निजमंदिरा, हो राघवा, चालावें निजमंदिरा ॥
सुखशेजेसी रघुवीरा हो राघवा ॥ ध्रु० ॥

सकळांसी तांबूल सकळां पुष्पमाळा ।
भक्तांचा सोहळा पुरविला स्वामी ॥ १ ॥

भक्तजनपाळक ब्रह्मांडनायक ।
जय रविकुळटिळक स्तविती दास ॥ २ ॥

जाली वाढ राती अहो जी रघुपति ।
मार्ग सोडविती बंदीजन ॥ ३ ॥

जनक-आत्मजा अहो जी रघुराजा ।
तिष्ठतसे तुझा मार्ग लक्ष्मी ॥ ४ ॥

उठिले जगजीवन सिंहासनाहून ।
वेणीं निंबलोण उतरिलें ॥ ५ ॥

गुरु निःशब्दाचीं बीजें (२६०)

गुरु निःशब्दाचीं बीजें । आम्हां प्राप्त आत्मकाजें ॥ १ ॥
आम्ही अबोल अबोल । आबोलें बोलुं बोल ॥ २ ॥
आमुचि माया वांज झाली । वेर ब्रह्मीं लया गेली ॥ ३ ॥
शब्द आकाशीं निमाला । आत्माराम अवघा जाला ॥ ४ ॥
वेणीस्वामीयाच्या संगें । आम्ही राहों आत्मरंगें ॥ ५ ॥

कीटक-भृंगी न्यायें लागली धारणा (२६१)

कीटक-भृंगी न्यायें लागली धारणा।
तोचि एक जाणा, ब्रह्मनिष्ठ॥ १॥

यरवीं ते बोल बोला ये फुकाचे।
काय सांगायाचें याचें ज्ञान॥ २॥

चंद्रचकोरन्याय जईं होये ते प्राणा।
तोचि एक जाणा, ब्रह्मनिष्ठ॥ ३॥

वेणी म्हणे सिंधुलवणन्याय भेटी।
होये तेव्हां भेटी, ब्रह्मत्वाची॥ ४॥

आमुच्या वाटे नका जाऊं (२६२)

आमुच्या वाटे नका जाऊं। नये ते वाटे तुम्हां लाऊं॥ १॥

आम्ही पारिखे पारिखे। न हों लौकिकासारिखे॥ ध्रु०॥

अशी स्थिती जाली मोठी। पोटीं ब्रह्मांडाच्या कोटी॥ २॥
वेणी-स्वामी आत्माराम। तेंचि आमुचें परंधाम॥ ३॥

: ७९ : अंबाबाई

मी सद्‌गुरुघरची सैरि शोभत्यें बरी (२६३)

मी सद्‌गुरुघरची सैरि शोभत्यें बरी॥ ध्रु० ॥

बाइ मज गोल्हाटीं गे राहणें।
तेथुनी श्रीहाटीं मज पाहणें।
त्रिकुटशिखरीं येउनि जाणें। बोलतें बरी॥ १ ॥

बाइ मी त्रिगुणिं खेळ खेळत्यें।
चतुर्थ गुणिं मी साक्षी होत्यें।
सदा (कदा) मी येत्यें जात्यें। भय न अंतरीं॥ २ ॥

स्थूळ सूक्ष्म (द्विविध) कारण।
चौथा देह महाकारण।
स्थानें क्रीडायाचीं जाण। माजीं हे बरी॥ ३ ॥

आतां मी सर्वांसी ग्रासुनि।
मोहनींत क्रीडतें अनुदिनीं।
निःशंक वर्ततें हो जनीं। पाहः च्यातुरी॥ ४ ॥

रामदासाश्रय म्यां केला।
म्हणउनि विलास सर्वहि आला।
अंबि न विसरे गुरुपदाला। प्रतिज्ञा खरी॥ ५ ॥

:८०: गिरिधर

भक्तीं आकळिला, दयाघन (२६४)

भक्तीं आकळिला, दयाघन, भक्ती आकळिला ॥ ध्रु० ॥

पार्थरथीं सारथ्य करी जो, निजपद दे बळिला ॥ १ ॥
प्रऱ्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं, दानव निर्दळिला ॥ २ ॥
रुक्मिणिने एक्या तुळसिदळानें, गिरिधरप्रभु तुळिला ॥ ३ ॥

:८१: वामन पंडित

धिग् धिग् धिग् धिग् जिणें तुझें रे (२६५)

धिग् धिग् धिग् धिग् जिणें तुझें रे विन्मुख नामासी।
वन वन वन वन फिरुनि शिणलास आलास नरदेहासी॥ ध्रु० ॥

दो दिवसांचीं धन-सुत-दारा यांत नसे कांहीं।
लटकी काया ममता माया फसलांत डोही॥
आयुष्य सरलें पुण्य वेंचिलें संचिलें तुरुत देहीं।
अहो-रात्र तूं खटपट करिसी दिन-रजनी पाहीं॥
चाल॥ मार्ग विसरलास सद्गुरुचरणाचा।
बळकट धरिला प्रपंच तोषाचा।
राम म्हणतां कसी बसली वाचा।
सर्वपरि हा जाला बायलीचा।
झर झर झर झर चालली नरतनु स्वस्थ बैसलासी।
टाप टप टप टप वय सरलें पुढें काय करिसी॥ १॥

अमोल काया गेली तुझी रे उमज पडेना।
गर गर गर गर दिवस सरले सोय सांपडेना॥
सट्टा बट्टा, करिसी अहर्निशी घेपु देपु नाना।
अनेक चिंता ठेविसि मानसिं मजकुरासि जा ना।
चाल॥ कारभारादिक व्यसनें वाईट।
सांगतों तुला मीं बुडालासि स्पष्ट।
नर्क लिहिला कपाळीं सेवट।
दूत यमाचे गांजतात्ति धीट।
कर कर कर कर फांस घालुनि वोढिति जीवासी।
हर हर हर हर पुढें यातना कां रे व्यर्थ भोगिसी॥ २॥

शास्त्र पुराणें सोडुनि कीर्तन लागलासि कामा।
लुट लुट लुट लुट सदा धांवसि विसरलासि नामा॥
कुटुंब अज्ञा मनीं धरुनिया हृदयिं तिचा प्रेमा
कन्या पुत्र सुन कलत्र कोणाचे मामा॥
चाल॥ झटकन होईं सावध रे मूढा।
फटकन मरसिल कां होसिल वेडा।

अंतीं कामा नये तूज मूढा।
यमफांसा बळकट कडी कुलुप खोडा।
ऐसें ऐकुनी परम मानसीं हुर हुर कां करिसी।
कुर कुर कुर कुर केलि जरि त्वां चुकेना येमा कौसी(?)।। ३ ।।

प्रपंच करुनि होईं अलिप्त लाविं त्याचे अंगा।
करुनि अकर्ता होय झडकरि भजें पांडुरंगा।
टप टप टप टप विषय सांडुनी धरी सत्यसंगा।
धरिं धरिं धरिं धरिं हरी-पाय तूं करिसिल भवभंगा।।
चाल।। चरणीं निष्ठा असुं दे बळकट।
मग ते होईल साधी पायवाट।
दे सोडूनिया अवघी खटपट।
गुरुप्रसादें यमदूताचें झट।
वामन म्हणे असें प्राणिया फुरफुर कां करिसी।
धिग् धिग् धिग् धिग् जिणें तुझें रे विन्मुख नामासी।।
वनवन०।। झरझर०।। टपटप०।। ४ ।।

:८२: विठ्ठल बीडकर

लागला चटका, हा प्रपंच अवघा लटका (२६६)

लागला चटका। हा प्रपंच अवघा लटका॥ ध्रु० ॥

चटका लागला भिरेला। छळुनी वीष दिधलें तिजला।
निर्भय होउनियां मनाला। घेतला गुटका॥ १ ॥

चटका लागला कबिराला। छळूं संत आले घराला।
बायको विकून सावकाराला। मारिला फटका॥ २ ॥

चटका लागला जनीला। सोडुन दिधलें गणगोताला।
वेगळें होउन जन्ममरणाला। तोडिला तटका॥ ३ ॥

चटका लागला विठ्ठलाला। शरण ब्रह्मानंदपदाला।
विसर ना पडे दिवानिशीला। लव पळ घटिका॥ ४ ॥

जो जो जो जो रे, कुळभूषणा (२६७)

जो जो जो जो रे, कुळभूषणा, दशरथनंदना।
निद्रा करिं बाळा, मनमोहना, रामा लक्षुमणा॥ ध्रु० ॥

पाळणा लांबविला अयोध्येसी, दशरथाचे वंशीं।
पुत्र जन्मला, हृषिकेशी, कौशल्येचे कुशीं॥ १ ॥

रत्नजडित, पालख, झळके अमोलिक।
वरतीं पहुडले, कुळदीपक, त्रिभुवननायक॥ २ ॥

हालवि कौसल्या, सुंदरी, धरुन ज्ञानदोरी।
पुष्पें वर्षती, सुरवरीं, गर्जति जयजयकारीं॥ ३ ॥

विश्वव्यापका, रघुराया, निद्रा करिं बा सखया॥
तुजवर कुरवंडी, करूनियां, सांडिन आपुली काया॥ ४ ॥

येउनि वसिष्ठ, सत्वर, सांगे जन्मांतर।
राम परब्रह्म, साचार, सातवा अवतार॥ ५ ॥

याग रक्षुनियां, अवधारा, मारुनी निशाचरां।
जाशी सीतेचां, सैंवरा, उद्धरि गौतमदारा ॥ ६ ॥

पर्णिल जानकी, सुरूपा, भंगुनियां शिवचापा।
रावण लज्जित, महाकोपा, नव्हे पण हा सोपा ॥ ७ ॥

सिंधुजलडोहीं, अवलीळा, नामें तरती शिळा ॥
त्यावर उतरोनी, दयाळा, नेसी वानरमेळा ॥ ८ ॥

समूळ मर्दूनी, रावण, स्थापिल विभीषण।
देव सोडविल, संपूर्ण, आनंदेल त्रिभुवन ॥ ९ ॥

ऐसीं चरित्रें, अपार, करील मनोहर।
इतुकें ऐकुनी, उत्तर, हांसले रघुवीर ॥ १० ॥

राम भावाचा, भुकेला, भक्ताधीन जाहला।
दास विठ्ठलें, ऐकिला, पाळणा गाइला ॥ ११ ॥

: ८३ : अनंतकवि

मी झाडविणार गुरूचा (२६८)

मी झाडविणार गुरूचा दरबार त्याचा झाडीं।
कल्पनेचे बुडे कपट झाडुनियां काढीं॥ ध्रु० ॥

भाव झाडूं भक्ती पाढी अविद्या मूल फेडी।
कदीमखान्यामध्ये नफर चाकरी न सोडी॥ १ ॥

तीन तेरा पांच पंचक जात माझी रंगी।
टुकड्याच्या पाळीला मी नाहीं कधीं तंगी॥ २ ॥

उपमर्दराज देसायाची कीर्ति देशोदेशीं।
कधिं भेट बिगार नाहीं, माझा धाक काळोजीशीं॥ ३ ॥

मोठेमोठे सिद्ध साधू पढती पान पोथी।
कवी अनंत म्हणे माझा अर्थ प्राणनाथीं॥ ४ ॥

मनुजा राम भजावा रे (२६९)

मनुजा, राम भजावा रे। मूर्खा। गर्व त्यजावा रे॥ ध्रु० ॥

दौलत झेंडा तपतो हंडा खाशी उनउन मांडा।
मडक्यामध्यें पाणि तापतें रडती पोरें रांडा॥

धोतरजोडा कानिं चौकडा बसाया खासा घोडा।
यमराजाचें येइल बोलावणें पायीं पडेल खोडा॥

नेसुन साडी उंच माडी कानीं बाळी-बुगडी।
यमराजाचें येइल बोलावणें स्मशानिं काया उघडी॥

अनंतकवि म्हणे समजाउमजा वाया करितां गमजा।
यमराजाच्या येतिल फौजा करतिल पुरजा पुरजा॥

प्रभातकाळीं जननी यशोदा (२७०)

प्रभातकाळीं जननी यशोदा। उठीं म्हणे सत्वर बा मुकुंदा।
गोपाळ येती, तुजला बहाती। गोविंद दामोदर माधवेति॥

प्रकाश केला गगनीं रवीनें। गोपी दधी त्या घुसळी रवीनें।
त्या कंकणाचे बहु नाद येती। गोविंद दामोदर माधवेति॥

जाई त्वरेने सखया वनातें। मागून मी धाडिन भोजनातें।
गोपाळ हे सर्व तुला बहाती। गोविंद दामोदर माधवेति॥

करांबुजीं घेउनियां शुकाला। अभ्यास गोपी करिती तयाला।
रागस्वरें सुंदर बोलवीती। गोविंद दामोदर माधवेति॥

उठोनिया सुंदरि गोपदारा। काढीत वेगें श्रम केर सारा।
पादांबुजी पैंजण वाजताती। गोविंद दामोदर माधवेति॥

संमार्जनें शुद्ध करूनि बाळा। धरेवरी रेखिति रंगमाळा।
पायांमधे छुमूछुम वाजताती। गोविंद दामोदर माधवेति॥

गोदोहना बैसति गोपदारा। पात्रांतरीं वाजति क्षीरधारा।
तेणें स्वरें मंजुळ गीत गाती। गोविंद दामोदर माधवेति॥

उलूखलीं घालुनि तडुलांतें। गोपांगना कांडिति रम्य हस्तें।
आलापुनी सुंदर गीत गाती। गोविंद दामोदर माधवेति॥

वृदावनीं सुंदर वृक्ष आहे। श्रीकृष्णनामें ध्वनि गर्जताहे।
पक्षीकुळें यादवगीत गाती। गोविंद दामोदर माधवेति॥

गाईसवें जाउनि गोपमेळा। रानांत होतो मग कृष्णमेळा।
पाव्यांमधें सुंदर वाजवीती। गोविंद दामोदर माधवेति॥

श्रीकृष्ण श्रीकृष्ण मुखारविंदें। घेवोनिया नाचति नामछंदें।
ऐकोनि गाई बहु कान देती। गोविंद दामोदर माधवेति॥

गोविद! गोविंद! हरे! मुरारे। गोविंद! गोविंद! रथांगपाणे।
गोविंद! गोविंद! मुकुंदमूर्ती! गोविंद दामोदर माधवेति॥

: ८४ : रंगबोधस्वामी

रम्य मुरली मुरारी वाहतो (२७१)

रम्य मुरली मुरारी वाहतो ॥ ध्रु० ॥

त्या मुरलीनादें कामिणिवृंदें धामिणि छंदें गोपाळ वाहतो ॥ १ ॥
देवटापाईं वाहत ठाईं मोहित गाई गोपाळ वाहतो ॥ २ ॥
खगकुळ रे नेघति चोरे थकित मोहरे गोपाळ वाहतो ॥ ३ ॥
समीर विसरे व्योम संचारे समतिनि रे गोपाळ वाहतो ॥ ४ ॥
गभस्ति न चले हावभाव डोले शंभू विराले गोपाळ वाहतो ॥ ५ ॥
उरगेश्वर आतुरे गरुड सित्तिवैरे सुरवर तत्पर गोपाळ वाहतो ॥ ६ ॥
महासुखाब्धि सहजबोधी बहुरंगबोधि गोपाळ वाहतो ॥ ७ ॥

हरिमय सर्व जग मज गे (२७२)

हरिमय सर्व जग मज गे भासे हरिवेधु लागतां गे।
घरदार नाठवे गे हरिरूप परिपूर्ण दाटला गे॥ १ ॥

पुत्र-मित्र-शत्रु गे भ्रातृ-कळत्र हरिरूप गे।
यत्र तत्र हरि गे सर्वहि सर्वत्र हरिमय गे॥ २ ॥

अंगसंग रंगीं गे जळधितरंग जैसे कांही गे।
संगभंग जाला गे हरिवरी जंगमस्थावर गे॥ ३ ॥

सिंपी जैसी रौप्य गे तैसी भवसंपत्ती हरिवरि गे।
संपले असिपदं गे कांपत तत्पदत्वं पद गे॥ ४ ॥

बहळानंदबळें तें सुख न वर्णवे महिम गे।
सहजबोधी बरवें रंगासि महदानंद फावे गे॥५ ॥

: ८५ : अद्वयबोधस्वामी

आतां मी सांगों काय गे (२७३)

आतां मी सांगों काय गे।
मनिंचें जनिं सांगतां येत नाहिं गे॥
वर उपरि चाल गे। दुसरें नाहिं गे।
परतुनि पाहिं येकांतीं गुरुठाईं गे, सयेबाई॥ ध्रु० ॥

हांडगा हा पति माझा कैसा सये गे।
मागेंपुढें आखंड उभा राहे गे॥
च्यान्हि घरचीं धरुनी द्वारें राहि गे।
उतरंडीचें आवघें त्या ठावें आहें गे, सयेबाई॥ १ ॥

मायामारी माउसिसंगें जाय गे।
निष्कळंक आपण म्हणविताहे गे॥
त्याचे गुण मी जनिं बोलुं जाय गे – ।
तंव तो खरा, लटकि मीच होय गे, सयेबाई॥ २ ॥

च्यान्हि वाणी त्यासिच भला म्हणती गे।
दाहा लोक नेणति त्याची गती गे॥
मग मी उगली मिनली त्यासी रति गे।
अद्वयबोध श्रीगुरु रंग पति गे, सयेबाई॥ ३ ॥

नवल नवल मोठें (२७४)

नवल नवल मोठें, कैसें उफराटें।
विपरीत सुपरीत जेगनाथ भेटे॥ ध्रु० ॥

भ्रम पालटोनी ब्रह्म, ब्रह्म होय भ्रम।
नारी पालटोनी पुरुष, कामचि निष्काम॥ १ ॥

जीव पालटोनी सदाशीवपणा आला।
शिव पालटोनी आपण जीव होउनि ठेला॥ २ ॥

पालटलें जेग, आवघा अद्वय श्रीरंग।
सहज जेगनाथ भेटे, फिटे सकळ पांग।। ३ ।।

सखिये सांगेन जिविंची जिवनकळा (२७५)

सखिये सांगेन जिविंचि जिवनकळा।
ऐकतां तुंहि तैसिच होसी प्रेमळा।। ध्रु० ।।

दुचिति होतें मि साजणी मायेभुवनिं।
अनुपम्य पुरुष आला मजलागुनी।। १ ।।

त्यासि नांवरूप न दिसे कुळही नसे।
परपरता परदेशी तो वाटे मानसें।। २ ।।

पदरिं धरुनि वोढिलें परतें नेलें।
हात अंबरा घातले कांहिं न बोले।। ३ ।।

स्वस्थानिं स्तन धरूनि मज क्षेम दिल्हें।
सोहं-प्रधो(बो ?)ध मटमटा चुंबन केलें।। ४ ।।

सुरतसंभोगीं रातलें मीठीं नुरविलें।
सच्चित्सुखिं सर्वदा मन मोहिलें।। ५ ।।

आम्ही दोघं येकजलों एकांतीं (रतलों)।
मनगांठि सुटोनी गेली विश्वीं भरलें(लों)।। ६ ।।

भय-काळज्या निमाली, मायबहिणी।
कोणि न दिसे मजला, तयावांचुनी।। ७ ।।

देहगेह-भाव विसरल्यें त्या ब्रह्मानंदीं।
सफळ जाहलि हे काया श्रीगुरुपदीं।। ८ ।।

येरी म्हणे, उगलि राहिं, न संगें कवणा।
आला असेल अद्वयरंग पाहुणा।। ९ ।।

१८६ : अनंतबोध

ज्ञानपांवा मोहरी, वाजवितो आम्हां हरी (२७६)

ज्ञानपांवा मोहरी। वाजवितो आम्हां हरी।
मनोवृत्ति-गाई वरी। आल्या जवळी॥

विषयचार टाकिती। हरिवेधें वेधल्याती।
समागमें चालती। मूळ स्थाना॥

भावगोपाळांच्या मेळीं। मधें शोभे वनमाळी।
आशातृष्णादिक धुळी। उडत असे॥

आत्मस्थिती चालती। स्वानंदेंचि डोलती।
अनुभवें घालिताती। हमामा देखा॥

काला ब्रह्मानंदसुख। गोपाळां देतसे देख।
शिवाद्वयीं आप्ती चोख। अनंतबोधा॥

: ८७ : राधाबाई

मुक्तीचा तोडर भक्तीपाईं रुळे (२७७)

मुक्तीचा तोडर भक्तीपाईं रुळे।
भक्ताचे सोहळे। देव भोगी॥ १॥

देवा-भक्तां दोघां वुरी कांहीं नाहीं।
देव भक्तापाईं। लागतसे॥ २॥

सायोज्यादी सांदी जाहालीया बीदी।
भक्तांचीया मांदी। दाटलीया॥ ३॥

जेथ भक्त आहे तेथ देव माये।
विरूनियां जाये। मोकळली॥ ४॥

मुक्तीहुनी भक्ती अगळी मानली।
गोपाळं वाहिली। दोनी खांदीं॥ ५॥

आपुलं पोटीचं घालुनीयां पोटीं।
देव भक्ताकंठीं। माळ घाली॥ ६॥

आलें-गेलें सर्व संपादुनी धरी।
देव भक्ता करी। कुरवंडी॥ ७॥

भक्तीवीण देवा न कळे म्हणहुन।
देवच आपण। भक्त झाला॥ ८॥

अद्वये श्रीरंग देव-भक्त येक।
केला हा विवेक। माहादेवं॥ ९॥

राधा म्हणे देव जाला सुप्रसन्न।
काये होये न्युन। तया ठायां॥ १०॥

:८८: उद्धवचिद्धन

सख्या हरि चोरी चाल करूं (२७८)

सख्या हरि चोरी चाल करूं ।। ध्रु० ।।

पाळतिलें गृहिं पुष्कळ गोरस मिळोनि गोपि हरूं ।।
शिंक्यां दुधदहीं त्यां तळुनि भेदुं वदनीं धार धरूं ।।
उद्धवचिद्धन धांवुनि धनिवरि उरलें अंग भरूं ।।

: ८९ : ब्रह्मानंद

ब्रह्मपुरी पेठ तेथें चला जाऊं हाटा (२७९)

ब्रह्मपुरी पेठ तेथें चला जाऊं हाटा।
अभंग गांवें तिन्हीं द्वारा वाहताति वाटा॥

चारी बिदी आठ कोण केणें असे तेथें।
सौदा सुप्त करा वेगीं सद्गुरूचे हातें॥

कौल करार पूर्ण दिल्हा असे सहजानंद।
दान जकाती माफ केली, ब्रह्मीं ब्रह्मानंद॥

ब्रह्मानंद म्हणे आतां, हाणा हातोफळी।
नेघे त्याच्या तोंडावरी ती वाटेची धुळी॥

: ९० : रुक्मांगद

माझा जीवींचा सोयरा (२८०)

माझा जीवींचा सोयरा। कां बा जाहलासी बहिरा॥
माझे मनिंचें कां नेणसी। आळवितां हां न म्हणसी॥
पाहत्यांचा रे पाहणा। केविं जालासी तूं काणा॥
धांवत्यामाजी आगळा। निगुति जाहलासि पांगुळा॥
तुज आला कां कंटाळा। सांग संतांचा सोहळा॥
नाही दासांसीं तुज दावा। रुक्मांगदु न विसंबावा॥

हरि हा बहुसाल नाहीं देखिला गे (२८१)

हरि हा बहुसाल नाहीं देखिला गे, भाग्य माझें न्यून।
दुर्जनसंगति परमदारुण, भीतसे यालागिं मन॥ ध्रु०॥

येणें मार्गें येणें जाणें हरिचें निरंतरीं।
येथिल तृण पाषाण तरि करि मला लौकरी॥ १॥

बाइये उत्कट तप तुझें असे न धरीं मनीं विषाद।
चिदानंदघनीं रातली ऐसा येवो कां अपवाद॥ २॥

तुजहुनि नाहीं वेगळा हा, दृढ धरीं भावना।
रुक्मानंद म्हणे मायिक कान्हा, म्हणवी यशोदेचा तान्हा॥ ३॥

: ९१ : कृष्णदयार्णव

गोविंदा तूं जळ, मी तेथें कल्लोळ (२८२)

गोविंदा तूं जळ, मी तेथें कल्लोळ।
असों सर्वकाळ, ऐक्यसुखें॥ १॥

तूं बिंब मी तेज, तूं हेतु मी काज।
व्यापक तूं पूज्य, पूजक मी॥ २॥

अणूचा वियोग नसे तुम्हां आम्हां।
आजी मेघश्यामा, सांडूं नको॥ ३॥

तूं रस मी गोडी, तूं वृक्ष मी वाढी।
तूं शक्ति मी प्रौढी सामर्थ्याची॥ ४॥

दयार्णवस्वामी मी तुझा सेवक।
वियोगाचें दुःख, साहों नेणें॥ ५॥

चाड नसे मज आणिक कोणाची (२८३)

चाड नसे मज आणिक कोणाची।
एका गोविंदाची आस पाहें॥

तयाविण जीणें शून्य वाटे लोकीं।
कोण माझे पोखी(षी) मनोरथ॥

कोण जाणे माझे जीवींचा कळवळा।
कोण वेळवेळां, आळवील॥

दाही दिशा शून्य तुजवीण झाल्या।
चित्त कांहीं केल्या स्थिर नोहे॥

दयार्णवा तुझ्या छायेशीं वाढलों।
आजि वाटे झालों, परदेशी॥

हरि हा अपणचि जग झाला (२८४)

हरि हा अपणचि जग झाला, अपणचि जग झाला ॥ ध्रु० ॥

अपणचि देव भक्तहि होउनि पूजित अपणाला ॥ १ ॥
उत्तम अधम योनी जितक्या जिवरूपें भरला ॥ २ ॥
'सर्वं खलु इति', कृष्णदयार्णव श्रुति वदती त्याला ॥ ३ ॥

: ९२ : गुप्तनाथ (गंगाबाई)

माता पिता त्राता अरि पुत्र भ्राता (२८५)

माता पिता त्राता अरि पुत्र भ्राता। गुरूविण आतां नाही दुजा॥
पशुपक्षी याती गुरुरूप भासती। ऐसी ज्याची स्थिती तोचि जाणे॥
वृक्षवल्ली पाहीं अणुरेणु तेही। गुरुविण नाहीं रितें कोठें॥
ऐसा गुरुराज भज पूर्ण व्यापक। गुप्त बोले रंक-राज सम॥

१९३ : उद्‌बोधनाथ

कां मज लखलख दिसतें (२८६)

कां मज लखलख दिसतें। किंवा नयनीं बसतें।
सांगा स्वामी अरतें कीं तें आहे परतें॥ १॥

काय झालें डोळियां। न दिसे रूप ना छाया।
उलका परतवी ज्योती दाहि दिशा दाटलिया॥ २॥

ब्रह्मतेजाचे भडके। उठती नादाचे तडके।
तारा आदळती सिके, दिव्य तेजाचे सडके॥ ३॥

कैसें हास्य नाडळे। फिरति उफराटे डोळे।
कांही केल्या ना कळे, बळिच दिठी आदळे॥ ४॥

गुप्तगंगा नर कपाटिं। दैवत लाविलें दिठी।
सहजानंदाचे दाटीं, पडिले उद्‌बोध तुटी॥ ५॥

: ९४ : शिवदिनकेसरी

भाव धरा रे, आपुलासा देव करा रे (२८७)

भाव धरा रे, आपुलासा देव करा रे॥ ध्रु०॥

कोणी काय म्हणों यासाठीं। बळकट प्रेम असावें गांठीं।
निंदा स्तुतिवर लावुनि कांटी। मी-तूं हरा रे॥ १॥

सकाम साधन सर्वहि सांडा। निष्कामें मुळ भजनीं भांडा।
नाना कुतर्कवृतिसि दवडा। आलि जरा रे॥ २॥

मानवदेहीं साधा भक्ति। यासाठीं याची उत्पत्ति।
ऐसा विवेक जाणुनि चित्तीं। प्रभुसि वरा रे॥ ३॥

अर्पी सकळ प्रभूचे ठायीं। जगीं तयाविण न दिसे कांहीं।
शिवदिनिं निश्चय दुसरा नाहीं। भक्त खरा रे॥ ४॥

माझी देवपूजा देवपूजा (२८८)

माझी देवपूजा, देवपूजा। पाय तुझे गुरुराजा॥ ध्रु०॥

गुरुचरणाची माती। तेची माझी भागीरथी॥ १॥
गुरुचरणाचा बिंदू। तोचि माझा क्षीरसिंधू॥ २॥
गुरुचरणाचें ध्यान। तेंचि माझें संध्यास्नान॥ ३॥
शिवदिनकेसरिपायीं। सद्गुरुवांचोनि दैवत नाहीं॥ ४॥

बाइल पैशाची बा पैशाची (२८९)

बाइल पैशाची बा पैशाची, विरळागत पुरुषाची॥ ध्रु०॥

धनकनकांतर गांठी, त्याला समान सांगे गोष्टी॥ १॥
नेसवि साडी लुगडीं, त्यासी लावी लाडीगोडी॥ २॥

भ्रतार वेडा पीसा, त्यासी नित्य करी कर्कशा ॥ ३ ॥
शिवदिन गुरुचे पायीं, पैशावीण कांहींच नाहीं ॥ ४ ॥

इतुकें दे मजला, दे मजला, (२९०)

इतुकें दे मजला, दे मजला। मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥

संत-समागम-अर्चा। सारासार ज्ञानचर्चा ॥
भगवद्‌भजनीं जागो। मन हें तुझिया स्वरूपीं लागो ॥
असेंचि वैभव देईं। शिवदिनकेसरि गुरुचे पायीं ॥

विंचू झोंबला, साजणी (२९१)

विंचू झोंबला साजणी, धांवा लवकर कोणी ॥ ध्रु० ॥

विकळ होतसे, मन माझें, घेउनि भीपण-वोझें।
चढला उतरेना, अति वोझें, धनसंपत्तीचें माझें ॥ १ ॥

ठणका लागला, विषयाचा, शब्दचि बरळे वाचा।
टाहो फुटला, देहबुद्धिचा, संग षड्‌वैऱ्यांचा ॥ २ ॥

येती उतराया, बहुजणी, मंत्र फुंकिती कानीं ॥
तेणें उतरेना, निर्वाणीं, अधिक ठणका मनीं ॥ ३ ॥

गुणी आणा गे, लवकरी, पाणी ठेविल शिरीं।
कर्मदृष्टीच्या, जिव्हारीं, जीव शिवातित करी ॥ ४ ॥

पहाणें पहावें तों, अंतरीं, व्यापक चराचरीं।
विंचू उतरी तो, लवकरी, शिवदिनकेसरी ॥ ५ ॥

सोळा शतें चौऱ्यांशींत झाली धुलधानी (२९२)

सोळा शतें चौऱ्यांशींत झाली धुलधानी।
द्वैतराज्य दुष्टबुद्धी नासिलें प्रधा(नां)नीं॥ ध्रु०॥

ब्यांशी-त्र्यांशी गेले भाऊ नाना दोनी।
तैसी कोणी कोणाची मानिना निदानी॥

सारादाणा, जप्तीपट्टी द्रव्य गृहखाणी।
पंचाशिंत लुटालुट मांडिली तापत्रय दुःखांनीं॥

देशग्रामवस्ती ओस पाडिल्या पेंढाऱ्यांनी।
तस्कर पुस्कर पापी उदधी आणिले खिंडाऱ्यांनी॥

उरली सुरली ग्रामअहंता बुडविलि द्वेषांनी।
तीर्थें क्षेत्रें गाईब्राह्मणें फार कष्टलीं क्लेशांनीं।

भक्त विरक्त साधुसंत त्राहि बोलति वाणी।
शिवदिनकेसरि भगवंता तूं यासि पाव निर्वाणीं॥

१९५ : मध्वमुनीश्वर

लोभ हरीचा लटका गे बाई (२९३)

लोभ हरीचा लटका गे, बाई, लोभ हरीचा लटका ॥ ध्रु० ॥

अक्रुर आला घेउन गेला काळजाचा कुटका ॥ १ ॥
उद्धव शाहणा घेउनि आला कागदाचा कुटका ॥ २ ॥
कुब्जा दासी केली पटराणी कैशी होइल सुटका ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर स्वामि रमापति तोडुनि गेला तुटका ॥ ४ ॥

तो तुम्हि आणा झडकरि यदुवीर (२९४)

तो तुम्हि आणा झडकरि यदुवीर ॥ ध्रु० ॥

नेणों कांहीं का रुसला हो जाला फार उशीर ॥
हरिविरहें जीव तळमळ करितो कितितरि धरुं मी धीर ॥ १ ॥

हरिगुण ऐकुनी माझ्याऽऽ नयनां येतें नीर।
मध्वमुनीश्वर वरददयेविण चित्त न राहे स्थिर ॥ २ ॥

जात होतें मथुरेच्या हाटा (२९५)

जात होतें मथुरेच्या हाटा। तेथें आला यशोदेचा गाटा ॥
याचा यास नाहिं दिला वाटा। चोरिं पोरिं लुटिला दहिंमाठा ॥ १ ॥

कान्हो मोठा कपटि कानडा गे। गोकुळींचा गोवळ ठकडा गे ॥
घरिं नसतां लावितो झगडा गे। मध्यें होतो माझा रगडा गे ॥ २ ॥

अहंकार माझा घरधणी। पापरूपी सदा अवगुणी ॥
त्याची गोष्टी सांगों काय उणी। न मानि देवाधर्मालागुनी ॥ ३ ॥

गांव जळे हनुमंत निराळे गे। आपण कौतुक पाहे वेगळा गे॥
मध्वनाथस्वामि चांगला गे। कैसा मजभोंवता लगला गे॥ ४॥

तूं माझा यजमान रामा (२९६)

तूं माझा यजमान, रामा, तूं माझा यजमान॥ ध्रु०॥

जननीजठरीं रक्षियलें मज
पोसुनि पंचहि प्राण॥ १॥

बाहेर निघतां मातेचे स्तनिं
पय केलें निर्माण॥ २॥

ऐसें असतां या पोटाची
कां करुं चिंता जाण॥ ३॥

मध्वमुनीश्वर-स्वामि रमापति
धरिं माझा अभिमान॥ ४॥

निजलिस काय गे (२९७)

निजलिस काय गे! होय जागि. तमाखू खाय गे॥ ध्रु०॥

चंचिंत नाहिं तरि बटव्यांत पाहिं गे।
बटव्यांत नाहिं तरि गाडग्यांत पाहिं गे।
गाडग्यांत नाहिं तरि फडक्यांत पाहिं गे। निजलिस०॥

तमाखु आणुन करतेस काय गे।
माझे कोइंत चुनाच नाहिं गे।
रात्रीं मजला झोंपचि नाहिं गे। निजलिस०॥

पहांटेस उठून शेतांत जाइं गे।
वांयशी पदरीं घेउन येइं गे।
वांयशी मध्वनाथाला देइं गे। निजलिस०॥

१९६ : नरहरि तुकाविप्र

दिन सोनियाचा, धन्य उगवला (२९८)

दिन सोनियाचा। धन्य उगवला।
विठ्ठला चांगला। संतसंग॥ १॥

हरिसंकीर्तन। मंगलदायक।
नामकथासुख। विठ्ठलाई॥ २॥

त्रिभुवनपती। रंगणीं कीर्तन।
पतितपावन। भक्तसखा॥ ३॥

नरहरी तुका। सुदिन दिवाळी।
अभंग धुमाळी। विप्रहेते॥ ४॥

पति(त) मी देवा, तुमचे पदरीं (२९९)

पति(त) मी देवा। तुमचे पदरीं।
पडियेली हरी। जडमूढ॥

करा उभे कृपा-। -बळ देऊनीयां।
विठ्ठल सखया। दीनोद्धारा॥

सारें व्हावें सुख-। -धामा जिवलगा।
संगति श्रीरंगा। द्या प्रेमळ॥

नरहरी तुका-। -विप्र श्रीप्रसादें।
ठेवा संत वदे। आवडीने॥

: ९७ : उद्धवलिंग

पीतांबरधर विष्णु चर्मांबर ईशा (३००)

पीतांबरधर विष्णु चर्मांबर ईशा
गिरिजलधर करिवरकर संहर त्रिपुरेशा
शामतनु सुंदर जो, कर्पूरगौरेशा
गरुडध्वज जो पशुपति सुखनिधी सुर-ईशा ॥ १ ॥

जयदेव जयदेव हरिहर सर्वेशा
श्रीपति पार्वतिरमणा मुरहर पुरनाशा ॥ ध्रु० ॥

अंगीं चंदन चर्चित ज्या भस्मलेप
मधुदैत्य मारीला, मदना निक्षेप
मधुसूदन, मदनारी हरिसी भवताप
हरिहर नामें दोनी न कळे स्वरूप ॥ २ ॥

गोविंदा वनमाळी, शिव चंद्रमौळी
शंखसुदर्शन करीं डमरू त्रिशूळी
केशव माधव विष्णू ईश्वर तूं सकळी
उद्धवलिंग राहे तुझिया पदकमळीं ॥ ३ ॥

१९८ : अमृतराय

संतपदाची जोड दे रे हरि (३०१)

संतपदाची जोड दे रे हरि, संतपदाची जोड ॥ ध्रु० ॥

संतसमागमें आत्महिताचा, सुंदर उगवे मोड ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ, पुरविती जिविंचें कोड ॥ २ ॥
अमृत म्हणे रे, हरि, भक्तांचा, शेवट करिसी गोड ॥ ३ ॥

हरि मज कसा करिल भवपार (३०२)

हरि मज कसा करिल भवपार ॥ ध्रु० ॥

तनमनधन विषयावरि वळतें
भजनीं आळस फार ॥ १ ॥

स्वात्मबुद्धि विचारुनि पाहीं
कोणि न केला उपकार ॥ २ ॥

अमृत म्हणे तुम्हि भजा निरंतर
श्रीधरगुरुचे पाय ॥ ३ ॥

अशाश्वत संग्रह कोण करी (३०३)

अशाश्वत संग्रह कोण करी ॥ ध्रु० ॥

कोण करी परि सोपे माड्या वस्ति बरी विवरीं ॥
चिरगुट चिंध्या जोडुनि कंथा गोधडि हेचि बरी ॥

नित्य सवें जें देइल माधव भक्षूं तेंचि घरीं ॥
आत्मस्त्रीसुत परकीं होती ठेविति भूमीवरी ॥

नित्य मिळेल तें नित्यचि भक्षुनि चिंतिन देव हरी॥
सांडुनि सेवा कल्पतरूसम भिक्षा हेचि वरीं॥

त्रिविधजना त्याजुनी उपार्जन स्वस्थ बसेन घरीं॥
अमृत म्हणे मज भिक्षेचे डोहाळे उठति आशालहरी॥

होउनि गोसावी, गोसावी (३०४)

होउनि गोसावी, गोसावी; हरिकथाचि परिसावी॥

भिक्षा मागुनि निस्पृहतेनें अपुलिं कुटुंबें पोसावीं॥
मिळोत का खंबाळे, अथवा भगवींही नेसावीं॥

स्त्रीपुत्रादिक छळिती त्यांचीं वचनेंही सोसावीं॥
कुबुद्धि कोणी छळिती त्यांवरि अमृतवृष्टि वर्षावी॥

बा तुझा चालता काळ (३०५)

बा तुझा चालता काळ। खायाला मिळती सकळ॥ ध्रु०॥

हे कोण बायकोचे साले।
तुपावेगळा घांस न गिळे।
तांदुळ रांधियले मोकळे।
केलें बेंबीचें ऊखळ। खायाला मिळती सकळ॥ १॥

हे कोण बायकोचे मामे।
घरांत वागती रिकामे।
साखर शाल्योदन खाणें।
भोजनभाऊ केवळ। खायाला मिळती सकळ॥ २॥

बहिणी-सासू घरासि येती।
फराळाच्या पंक्ति बैसति।
नातीं कोरकोरुन काढिती।
सर्व मायेचा गोंधळ। खायाला मिळती सकळ॥ ३॥

अमृतराय म्हणे रे मूर्खा।
किती भुललासि मायेच्या सुखा।
अंतीं जासि एकटा नरका।
भज सद्‌गुरु दयाळ। खायाला मिळती सकळ॥ ४॥

भक्तांचिया काजासाठीं (३०६)

भक्तांचिया काजासाठीं, साधूंचिया प्रेमासाठीं
सोडिली मीं लाज रे ॥ ध्रु० ॥

दुर्योधनसदनीं गेलों।
विदुराच्या गृहीं आलों।
आवडिनें कण्या प्यालों।
जोंधळ्यांची पेज रे ॥ १ ॥

धुतों अर्जुनाचे घोडे,
सदा राहें मागें पुढें,
घालीं अंगणांत सडे,
बांधूनियां माज रे ॥ २ ॥

वेडीं गौळियांचीं पोरें,
त्यांचें ताक प्यालों बा रे,
खातां भिल्लिणीचीं बोरें,
उच्छिष्टाची चोज रे ॥ ३ ॥

पूर्णब्रह्म म्हणती मातें,
सर्वब्रह्म मीच त्यांतें,
ऐसीयासी जाणीव ते,
धरी अमृतराय रे ॥ ४ ॥

अजि म्यां ब्रह्म पाहिलें (३०७)

अजि म्यां ब्रह्म पाहिलें।
अगणित सुरगण वर्णित ज्यासी,
कटिकर नट समचरण विटेवरि, उभें राहिलें।। ध्रु०।।

एकनाथाच्या भक्तीसाठीं
धांवत आला तो जगजेठी
खांदीं कावड आवड मोठी, पाणी वाहिलें।। १।।

चोख्यासंगें ढोरें ओढितां,
शिणला नाहीं तो तत्त्वतां,
जनीसंगें दळितां कांडितां, गाणें गाइलें।। २।।

दामाजीची रसीद पटविली,
कान्होपात्रा ती उद्धरिली,
अमृतराय म्हणे ऐसी माउली, संकट वाहिलें।। ३।।

देव तो रे तो रे तो रे (३०८)

देव तो रे तो रे तो रे। पाहुनि मानस परतो रे।। ध्रु०।।

पार्थाचे अश्वाचे हातीं धरूनियां दोरे।
चंचल म्हणुनी त्यासी म्हणता 'हो रे हो रे हो रे'।। १।।

शिष्टाईस्तव घरासि येतां त्या न येति सामोरे।
मरण पावले कौरवांचे पोरे पोरे पोरे।। २।।

चरण सेवितां श्रीलक्ष्मीचे हात झाले गोरे।
तितें लेववी सोनियाचे दोरे दोरे दोरे।। ३।।

गुणगण लिहितां अमृतकविचे केश झाले भोरे।
बुद्धी न चले म्हणुनी कागद कोरे कोरे कोरे।। ४।।

मनमोहन मुरलीवाला, ह्रदयीं आला (३०९)

मनमोहन मुरलीवाला, ह्रदयीं आला ।। ध्रु० ।।

रुचली उंच घोंगडी त्याला,
आवड कोमल तुलसीमाला,
चारित वृंदावनिं वत्साला।
वाटे प्राणसखा हाचि चिमण्या व्रजबाळांला।। १ ।।

गोरस गोपवधूंचे प्याला,
ढेंकर देउनि उदरीं धाला,
चिन्हें शुभ्र दिसति अधराला।
त्याहुनि वरि कलगिंत सुकुमार सुमगुच्छांला।।२ ।।

पाहुनि वत्स व्रजवनितांला,
करतळिं ठेवित दहिंभाताला,
अंगुलिकांवरि शाकफळांला।
कांखे वेताटि हरि खोंवित जठरीं वंशाला।। ३ ।।

पाहुनि श्रीमद्भागवताला,
आशय पुसुनि बरा संताला,
भूतमात्रीं भगवंताला –
पाहतां अमृतेश्वर हरि अवघा एकचि झाला।। ४ ।।

गोविंद गाणें गाईच्या गोठणिं गातो (३१०)

गोविंद गाणें गाईच्या गोठणिं गातो।। ध्रु० ।।

रेखकुलिशअंकुशासहित, यवनिशाण चरणीं, कुशांत फिरतो,
विशाळ नयनीं, निशारमणसम खुशाल वदनीं,
दशा तरुण वय, घशांत पिकरव, दिशा उजळती, तशाच व्रजवधु,
सवें बहुतशा, पिशा गळितशा, सकाम विवशा,
तशांत हरि, आरशांत प्रतिसम, वसोनि विशोक-विग्रह
अशोक तरुतळिं किशोर यशोमती, आशाही मतिसुत तो।। गोविंद० ।।

:९९: शंकर

राम गोसावी कीं झाला (३११)

राम गोसावी कीं झाला। अवघे मिळोन पाहूं चला॥ ध्रु० ॥

सांडुनियां सोनियाची अंगी। सुंदर विभुत चर्चिली अंगीं।
जैसा भव्य पुरातन शरयुतिरीं बैसला। अवघे मिळोनी पाहूं चला॥ १॥

फेंकुनि दिला बादिला, बांधला चिरा। काढिला मोतियांचा तुरा।
फेंकुनि पिवळ्या पीतांबरा। वनीं वल्कलें नेसला॥ २॥

घरांत होऊनियां बेजार। काढी किनखापी विजार।
जैसी तुटकी पैजार। तैसें राज्य झुगारिलें॥ ३॥

उदास होउनि सुवर्णनगीं। संनिध सीता बैसली उगी।
भेटिस न लगे परवानगी। उघडें दर्शन चांगलें॥ ४॥

शंकर अमृतेश्वर भगवान। त्याचें आवडतें ध्यान।
आपुल्या जातीचें महिमान। ज्याला त्याला आवडे॥ ५॥

हाटकभाजनमध्ये कर्पुर वर दीप (३१२)

हाटकभाजनमध्ये कर्पुर वर दीप
दशदिशि उज्ज्वल ज्वाला अति भास्कर रूप।
छत्रत्रय सिंहासनिं त्रिभु(व)निंचा भूप
त्रिकाल वंदन करितो दुर करि भवताप॥ १॥

जयदेव जयदेव सिंहध्वज देवा।
सुरनरकिन्नर करिती तव पंकजसेवा॥
जयदेव जयदेव जय वीर जिनेशा।
उजळुनि कर्पुरदीप दुर करि भवपाशा॥ ध्रु०॥

योजन परिमित शोभित संवसृतीमाही
गंगाजल सम चामर सुरनिर्मित पाहीं।
हिंसक पशु वैर नेणति वैराग्यसम पाहीं
जिनवचनश्रवणाविन आणखिं मनिं नाहीं॥ २॥

दुष्कृतनाशन करुणासागर भववारिधितरणा।
शिवदायक मुनिनायक हाटक तनुचरणा।
अमृतमय शिवसदना वारिजदलनयना
अतिशययुत सुरग(ण)नुत मन्मथमदकदना॥ ३॥

चउदिशि युवतीमध्ये सुरनाटकशाला
थै थै थै थै नाचति निर्जरप्रिय बाला।
रुणुझुणु वाजति पायीं घागरिया माळा।
जय जिन जय जिन ऐसा उन्नत रव झाला॥ ४॥

केली दीपक लावुनि कलशस्थापना
प्रतिदिशि दिक्पतिपूजन पंचामृतन्हवना।
ढाळुनि गंधोदक ही आरति ओवाळिन चरणा
जिनसागर नित हृदयीं राहो नित भजना॥ ५॥

गप्पाटप्पा करितिल लोक (३१३)

गप्पाटप्पा करितिल लोक राहिल पुराण।
धदामंदा गेला जन हिंडीतील रानोमान॥

उगलाचि धरुन नेइल राजा मागे दान।
नेल्या गाई नेल्या म्हैसी नेलं धन कन॥

कोन्ही येके समई दादा वायू सुटल।
मोठेमोठे पर्वत दादा उडून जातील॥

अठराहि न्याति दादा येकठायिं जेवतिल।
कडूगोड श्रावक दादा मिसळ होईल॥

मेला गेला नाही दादा वचन ऐसें खोटें।
दोर सर्प झाला नाहीं, रिपु कोठं भेटे॥

मृगजळ चोखट तेथें पानी कईंच आटे।
जिनसागर जती म्हणे आम्हां ऐसें वाटे॥

१०१ : कवीन्द्र सेवक

देह मांसाचा पिंजरा (३१४)

देह मांसाचा पिंजरा। जीव-पक्षी आंत बरा॥ १॥
आयु कर्माण निर्माण। दोघे संयोजिले त्याने॥ २॥
खाया मिळतां संतोष। तुट होतां कासाविस॥ ३॥
वस्ती करी पुण्याधीन। सेखीं पावे तो मरण॥ ४॥
देह धरी सोडी फार। जीवा न कले हा पार॥ ५॥
मन पुसे जीवालागीं। कां रे जालासी कुसंगी॥ ६॥
जीव म्हणे रे प्रधाना। अंतरला तीर्थराना॥ ७॥
मन वदे रे फिरावें। हे तों तुझें तुला ठावें॥ ८॥
कवींद्रसेवका कोड। आलें चित्ता अवघड॥ ९॥

येका लोभासाठीं नाहीं तें करीती (३१५)

येका लोभासाठीं, नाहीं तें करीती।
ऐसा भगवंतीं कां रे नाहीं॥ १॥

उंच वेळूवरी, कोल्हाटिण जाये।
मरणाचें भय सोडी तेथें॥ २॥

कन्या-पुत्र पोसी, वाहे तृणकाष्ठ।
शरीराचे कष्ट सोपे मानी॥ ३॥

उपवासी बैसे कुळाचिये द्वारीं।
व्रतासी न करी एक रोज॥ ४॥

येतां दरिद्रासी आन्हवानी चाले।
जातां वसइले घालि जोडा॥ ५॥

राजियाचे सभे लववि मस्तक।
न जोडी हास्तक साधुजणा॥ ६॥

दुर्बळाच्या करी फार चेष्टा सुखी।
अरिहंत मुखीं न घे कधीं॥ ७॥

शीपायासी आशा दावितातित राजा।
शेत्रीयाचे जुंझा उडी घाली॥ ८॥

ऐसीया लोभानें करितां तपाला।
क्षणांत मोक्षाला जासी बापा॥ ९॥

अकारणीं कष्ट कां करीं तूं फुका।
कवींद्रसेवका फीर मागें॥ १०॥

तो हरि असतां कां करुं चिंता (३१६)

तो हरि असतां कां करुं चिंता ।। ध्रु० ।।

शुक कोणिं केले हिरवे रे। मोर विचित्र ते बरवे रे।
हंस धवल कोणा करवे रे। अत्याश्चर्यसा मिरवे रे ।। १ ।।

अन्न जिरे अणि गर्भ तो वाढे। अग्निवरी उदकाचीं झाडें।
पाहतां येक येकेक निवाडे। ख्याति असीच असंख्य पवाडे ।। २ ।।

आकाशा अवकाश जयाचा। परमाणूंतहि वास जयाचा।
अक्रिय, नित्य, सबाह्य दयेचा। निधि, श्रीधर, शुभगुण उदयाचा ।। ३ ।।

पूर्णब्रह्म होय रे (३१७)

पूर्णब्रह्म होय रे। वर्णूं आतां काय रे।
नंद ज्याचा तात जाणा यशोदा ते माय रे ।। ध्रु० ।।

ब्रह्मांडाच्या कोटी रे। सांठविलेल्या पोटीं रे।
यशोदा त्या घेऊनीयां पाजि दुधाची वाटी रे ।। १ ।।

ब्रह्म निर्विकार रे। नाहीं ज्या आकार रे।
गौळीयांचे घरीं तोची दीसतो साकार रे ।। २ ।।

क्षीरसिंधूवासी रे। लक्ष्मी ज्याची दासी रे।
अर्जुनाचीं घोडीं धूतां लाज नाहीं त्यासी रे ।। ३ ।।

पूर्ण ब्रह्मानंद रे। सर्वसुखाचा कंद रे।
श्रीधरस्वामीलागीं हाची लागलासे छंद रे ।। ४ ।।

:१०३: देवीदास

वाराणसी तीर्थ थोर (३१८)

वाराणसी तीर्थ थोर। तेथें लोक जाती फार॥
परी तेथें अधिक काये?। ऐसें विचारोनी पाहें॥
जेथें तेथें देव धोंडा। तो कां आपुले गांवीं सांडा?॥
येथें लोक तेथें लोक। अवघें एकची उदक॥
देवीदास म्हणे वेडें। तीर्था धांवे अवघ्यांपुढें॥

जयजयाजी व्यंकटरमणा (३१९)

जयजयाजी व्यंकटरमणा। दयासागरा परिपूर्णा।
परंज्योति प्रकाशगहना। करितों प्रार्थना श्रवण कीजे॥ ६॥

जननीपरी त्वां पाळिलें। पितयापरी त्वां सांभाळिलें।
सकळ संकटांपासूनि रक्षिलें। पूर्ण दिधलें प्रेमसुख॥ ७॥

आतां परिसावी विज्ञापना। कृपाळुवा लक्ष्मीरमणा।
मज घालोनी गर्भाधाना। अलोकिक रचना दाखविली॥ १०॥

तुज न जाणतां झालों कष्टी। आता दृढ तुझे पायीं घातली मिठी।
कृपाळुवा जगजेठी। अपराध पोटीं घालि माझे॥ ११॥

पुत्राचे सहस्त्र अपराध। माता काय मानी तयांचा खेद।
तेंवी तूं कृपाळु गोविंद। मायबाप मजलागीं॥ १३॥

उडदांमाजी काळेगोरे। काय निवडावे निवडणारें।
कुचलिया वृक्षाचीं फळें। मधुर कोठोनि असतील॥ १४॥

समर्थाचिये घरींचें श्वान। त्यासी सर्वहि देती मान।
तैसा तुझा म्हणवितां दीन। हा अपमान कवणाचा॥ १७॥

लक्ष्मी तुझे पायांतळी। आम्ही भिक्षेसि घालोनि झोळी।
येणें तुझी ब्रीदावली। कैशी राहील गोविंदा॥ १८॥

कुबेर तुझा भांडारी। आम्हां फिरविसी दारोदारीं।
यांत पुरुषार्थ मुरारी। काय तुजला पैं आला॥ १९॥

द्रौपदीसी वस्त्रें अनंता। देत होतासी भाग्यवंता।
आम्हालागीं कृपणता। कोठोनि आणिली गोविंदा॥ २०॥

अन्नासाठीं दाही दिशा। आम्हा फिरविसी जगदीशा।
कृपाळुवा परमपुरुषा। करुणा कैशी तुज न ये॥ २२॥

अंगीकारीं या शिरोमणी। तुज प्रार्थितों मधुरवचनीं।
अंगीकार केलिया झणीं। मज हातींच न सोडावें॥ २३॥

समुद्रें अंगिकारिला वडवानळ। तेणें अंतरीं होतसे विव्हळ।
ऐसें असोनि सर्वकाळ। अंतरीं सांठविला तयानें॥ २४॥

कूर्में पृथ्वीचा घेतला भार। तेणें सोडिला नाहीं बडिवार।
एवढा ब्रह्मांडगोळ थोर। त्याचा अंगिकार पैं केला॥ २५॥

शंकरें धरिलें हाळाहळा। तेणें नीळवर्ण झाला गळा।
परी त्यागिला नाहीं गोपाळा। भक्तवत्सला गोविंदा॥ २९॥

अठरा भार वनस्पतींची लेखणी। समुद्र भरला मषीकरूनी।
माझे अवगुण लिहितां धरणी। तरी लिहिले न जाती॥ ३१॥

ऐसा पतित मी खरा। परी तूं पतितपावन शार्ङ्गधरा।
तुवां अंगिकार केलिया गदाधरा। कोण गुणदोष गणील॥ ३२॥

नीच रतली रायासीं। तिसी कोण म्हणेल दासी।
लोह लागतां परिसासी। पूर्वस्थिती मग कैंची॥ ३३॥

गावींचे होते लेंडवोहळ। गंगेसी मिळतां गंगाजळ।
कागविष्ठेचे पिंपळ। तयांसी निंद्य कोण म्हणे॥ ३४॥

धांव पांव रे गोविंदा। हातीं घेवोनियां गदा।
करीं माझ्या कर्माचा चेंदा। सच्चिदानंदा श्रीहरि॥ ३७॥

ऐसी प्रार्थना करुनि देवीदास। अंतरीं सांठविला श्रीव्यंकटेश।
स्मरतां हृदयीं प्रगटला ईश। त्या सुखासी पार नाही॥ ५२॥

तें स्वरूप अत्यंत सुंदर। श्रोतीं श्रवण कीजे सादर।
सांवळी तनु सुकुमार। कुंकुमाकार पादपद्में॥ ५४॥

सुरेख सरळ अंगोळिका। नखें जैसी चंद्ररेखा।
घोटीव सुनीळ अपूर्व देखा। इंद्रनीळाचिये परी॥ ५५॥

चरणीं वाळे घागरिया। वांकी वरत्या गुजरिया।
सरळ सुंदर पोटरिया। कर्दळीस्तंभाचिये परी।। ५६ ।।

गुडघे मांडिया जानुस्थळ। कटितटीं किंकिणी विशाळ।
खालतें विश्वउत्पत्तिस्थळ। वरी झळाळी सोनसळा।। ५७ ।।

ऐसा तूं देवाधिदेव। गुणातीत वासुदेव।
माझिया भक्तीस्तव। सगुणरूप झालासी।। ७० ।।

जयजयाजी श्रुतिशास्त्रआगमा। जयजयाजी गुणातीत परब्रह्मा।
जयजयाजी हृदयवासिया रामा। जगदुद्धारा जगद्गुरू।। ७७ ।।

जयजयाजी पंकजाक्षा। जयजयाजी कमळाधीशा।
जयजयाजी पूर्णपरेशा। अव्यक्तव्यक्ता सुखमूर्ति।। ७८ ।।

जयजयाजी भक्तरक्षका। जयजयाजी वैकुंठनायका।
जयजयाजी जगत्पालका। भक्तांसी सखा तूं एक।। ७९ ।।

गजेंद्राचिया आकांतासी। कैसा पावला हृषीकेशी।
प्रल्हादाचिया भावार्थासी। स्तंभांतूनि प्रगटला।। ९७ ।।

व्रजासाठीं गोविंदा। गोवर्धन परमानंदा।
उचलोनियां स्वानंदकंदा। सुखी केलें तयेवेळीं।। ९८ ।।

वत्साचे परी भक्तांसी। मोहें पान्हावे धेनु जैसी।
मातेच्या स्नेहतुलनेसी। त्याचपरी घडलेंसे।। ९९ ।।

ऐसा तूं माझा दातार। भक्तासी घालिसी कृपेची पांखर।
हा तयाचा निर्धार। अनाथनाथ नाम तुझें।। १०० ।।

देवीदास विनवी श्रोतयां चतुरां। प्रार्थनाशतक श्रवण करा।
जावया मोक्षाचिया मंदिरा। कांहीं न लागती सायास।। १०६ ।।

:१०४: महीपतिनाथ

दोन प्रहर रात्र झाली (३२०)

दोन प्रहर रात्र झाली, ऋषि आले भोजना
निद्रिस्त आम्हि होतों त्याणिं केली गर्जना
धांवोनी धर्म येती करुं म्हणती पूजना
ऋषि स्नाना पाठवीले करुं कैशी योजना ।। १ ।।

केव्हांचा रे आळवीतें कां जागा होइना
बहु शिणले नेत्र माझे हरि कां हो येइना ।। ध्रु० ।।

दुर्वास ऋषि मुनि तो क्रोधें येइल
नसतांची अन्न पात्रीं तो शापा देइल
घाबरला जीव माझा ब्रिद तूझें जाइल
केव्हांचा रे आळवीतें कां जागा होइना
बहु शिणले नेत्र माझे हरि कां हो येइना ।। २ ।।

धांवोनी येइं वेगें हरि माझ्या भेटिशीं।
कैवारी बंधुराया आहे माझ्या पाठिशीं।
पाहतोशी काय आतां धरिं मजला पोटिशीं
केव्हांचा रे आळवीतें कां जागा होइना
वहु शिणले नेत्र माझे हरि कां हो येइना ।। ३ ।।

ऐकुनिया दीनवाणी भगिनीची आलासे
"मज सजणी सांग बाई संकट (तें) कायसें"
ऋषि तृप्त सर्व झाले महिपति हें गातसे
नरहरिचे दास होतां दुःख कोठें राहिना
केव्हांचा रे आळवीतें कां जागा होइना ।। ४ ।।

उठ चतुरा नाटकी हरि (३२१)

उठ चतुरा नाटकी हरि
रुणझुण रुणझुण वाजवि मुरली प्रातःसमयावरी ।। ध्रु० ।।

अरुणोदय गगनीं।
झगमग झगमग प्रकाश पडला उगवले तरणि॥
अनंत सर्वेश्वरा।
उठि उठि बा आजि अपरा मुखमार्जन तुम्हि तरि करा॥
गंगेचें स्नान तुम्हि करा।
दहिदुध मधुशर्करा।
भोजन करिं गिरिधरा।
टपटप टपटप धेनू सुटती प्रकाश फांके अंबरीं॥ १॥

गोपीनाथ उठले।
भंभंभंभं शंख वाजति तेहतीस कोटि देव आले॥
साधुसंत मिळाले,
हो देवभक्त एक झाले।
काय भाग्य वर्णितां गे बाई शेषादिक शिणले॥
अनंत यमुनातटिं।
पीतांबर हा कटीं।
हातीं पोवळ्यांच्या मनगटी॥
मुद्रिका मध्य बोटीं॥
छुम छुम छुम छुम नाचे कन्हैया गवळण विनंत्या करी॥२॥

ब्रह्माचा भुलवणा।
लुटुलुटुलुटुलुटु गाइ चारितो हरि हा वृंदावना॥
खुजाभुजा बोबडा।
निकट पडचिपडा।
ढेरपोट्या वांकडा।
पायांतून फेंगडा।
हा गोपाळांचा मेळा॥
छुम छुम छुम छुम नाचे कन्हैया गवळण आरत्या करी॥ ३॥

निशिदिनिं द्वारावती।
रुमझुम रुमझुम स्वर्गीहून देव पुष्पें हो वर्षती॥
नारद तुंबर गाती।
टाळमृदंग वाजती।
तेथें राधा दामोदर म्हणा॥
छुम छुम छुम छुम नाचे कन्हैया महिपति वंदन करी॥ ४॥

घडीघडीचे रंग करितो (३२२)

घडीघडीचे रंग करितो साजण बहु रंगी।
परपुरुष भोगिला परंतु डाग नाहीं अंगीं॥ ध्रु० ॥

बोधाच्या मदनांत सखे बाइ झालें मी वेडी।
चित्तचांदण्यामधें मी टाकीं हौसें पलंगडी॥
वैराग्य हें सुपारिपानें भरोनि तबकडी।
विवेकाचा चुना लावुनी बनविली विडी॥
तम-तमाकु जाळावयास जवळ गुरु-गोडी (गुरु-गुडी ?)।
सतरावीचें जीवन पाणी भरूनि तेचि घडी॥
लज्जा सर्व सोडुनि बाई निसंग घरनिघी॥ परपुरुष० ॥ १ ॥

क्रोध माझा भ्रतार त्यासी ठेउनी आलें घरीं।
मला लागली गोडी मीही हिंडतें परद्वारीं॥
आशा ग माझी सासु तीसी करुनी आलें चोरी।
मनीषा माझी नणंद मोठी राखण मजवरी॥
अहंकार हा सासरा मेला पूर्वीचा वैरी।
डंभ मान तो प्रपंच-दीर नलगे संसारीं॥
इतुक्याला हे हात जोडोनी राहिलें निजअंगीं॥ पर० ॥ २ ॥

भावासंगें पाहूं गेलें केवढें काळीज।
द्वैतभान गेलें सखे मला नाहि लाज॥
चतुर्दळ षट्दळ दशदळ पाहुनि वरि आहे काज।
द्वादशदळ षोडशदळ वर द्विदळाची मौज॥
इडापिंगळा सरस्वती या पुण्या बेरीज।
त्रिवेणीचा संगम तेथें आत्म्याचें राज्य॥
उन्मनीच्या द्वारीं अनुहत वाजविती पुंगी॥ पर० ॥ ३ ॥

सहस्रदळा वरुनी दशमद्वार उलंघोनी।
भक्ति माझी कुंटिण तिणें दाखविलें नयनीं॥
शुद्धमतीच्या बंगल्यामध्ये निद्रागत बहिणी।
दिव्यरूप ओळखावें ज्योती जळती त्या दोन्ही॥
अहं-सोहं सेवा करिती दोघी हंसिणी।
पति ग माझा साजण तोचि त्याचे अंगणीं॥
कविराज हे महिपति गाती नांव अभंगीं॥ पर० ॥ ४ ॥

अनुभवचोळी उंच अमोली सद्गुरुपाशी घेइन गे।
माझिच मी आंगभर लेइन गे।। ध्रु० ।।

गगनायेव्हडा वाणुन चोळखण तऱ्हेतऱ्हेचे बुट काढुन गे।
मधें भिंग बसिवलें जडून गे।
लालभडक रेशमी कांठ शोभती दीसती दुरून गे।
वर श्वेत पोत सुत भरून गे।
निळी सावळी बुटि वाटोळी पाहतां उगीच राहिन गे।
माझि मीच आंगभर लेइन गे।। १ ।।

नव रंगाचे नव तुकडे कसे शिवले पाहतां शिवण गडे।
सिवणार सुगर कधिं दृष्टि पडे।
अखंड दोरा भरला सारा येक दीसतो मागेंपुढें।
त्याचा पदर लावला कोणिकडे।
धुंडित जातां बिंब पाहिलें बुडून त्यांत जाइन गे।
माझि मीच आंगभर लेइन गे।। २ ।।

मसुरेएव्हडी वाटी भरली उडी टाकितां गेलें जवळ्।
तेथ दृष्टि पडलें येक मोठें नवल्।
पिंपळावरते पार बांधला सुंगिमुखीं गगनाचा कवळ्।
चोळि घालुनी प्रभा धवळ्।
बिरडें सुटलें बंद उपटले स्वरूपिं गांठ देइन गे।
माझि मीच आंगभर लेइन गे।। ३ ।।

गांठ सुटेना चित्त विटेना बळकट गेली बसून गे।
चोळि तटतटीत राहे कसून गे।
नरहरिनाथें कुंकु लावतां जन्ममरण गेलें पुसून गे।
चोळि घालुन नयनीं हसून गे।
महिपति-बाळा लागंल दृष्टी चोळिंत लपवुन नेइन गे।
माझि मीच आंगभर लेइन गे।। ४ ।।

अशांत समजा रे, गुरुखुण (३२४)

अशांत समजा रे, गुरुखुण अशांत समजा रे॥ ध्रु०॥

गोकर्णामधें समुद्र भरला,
तरु आकाशापोटिं उगवला,
शेळीने चरतां डोंगर गिळिला – मनांत उमजा रे॥ १॥

ताटांत वाटी पाण्यांत ज्योती,
सुपांत काजळ डबींत मोती,
धुंडी चिमणी लावुन वाती, – उघडिं दिसतिं बा रे॥ २॥

काटयाचे अणिवर गांवच वसला,
गाइच्या पाठिवर वाघोबा बसला,
नाव नदींत येक पाहुन हंसला, – हें आधिं उमगा रे॥ ३॥

खुणेनें खुण ही वळखुन घ्यावी,
गुप्त अंतरीं जतन करावी,
न कळे तरि गुरुलागिं पुसावी, – अनुभवीत जा रे॥ ४॥

नरहरिनाथें अघटित केलें,
महिपतिलागीं गुज कथियेलें,
प्रत्यक्ष(चि) ड्रोळां दाखविलें, – करि मन मौजा रे॥ ५॥

गुरुनें नवल केलें ग (३२५)

गुरुनें नवल केलें ग। माझें मीपण नेलें ग।
गुरुरुप माझ्या नयनीं भरलें, ब्रह्मचि होउनि गेलें ग॥ ध्रु०॥

नयन सांठवुन नयनांत। उभें मज केलें अंगणांत।
हळुच सांगे कानी, दुरुनी बोट दाखवी गगनांत॥ १॥

निळी चांदणी लखलखली। प्रभा लोचनीं झकझकली।
पहातां दृष्टी न पुरे माझी, पुढें ज्योती चकचकली॥ २॥

सुंदर सुनीळ नार ग। स्वरुप तिचें अरुवार ग।
मस्तकिं येक फूल फुललें, तेंहि सदा गरुवार ग॥ ३॥

फुलोन फुलली पूर्ण कळा। चिन्मय उगवे चंद्रकळा।
मुद्रा तंद्री लागुन गेली, अलक्षरुप झाला सगळा॥ ४॥

नरहरिनाथ श्रीगुरुराया। महीपति लागे तव पाया।
कर्ताहर्ता तूंचि स्वामी, अर्पण केली तुज काया॥ ५॥

सावध व्हा गडे हो नीट उमगा (३२६)

सावध व्हा गडे हो नीट उमगा शिमगा निघून जाइल कीं।
बसुन तमाशा पाहुं चला रे पहातां पहाट होइल कीं॥ ध्रु०॥

पांचपंचवीस पोरें यांची संगत सोडुन द्यावी कीं।
त्रिगुण मोळी बांधुन होळी औट पिठावर न्यावी कीं।
साक्षी माना तुर्या देवी सद्गुरु खुण ही दावी कीं।
सत्रावीचा लोट घोटुन लक्ष सुनीळा लावी कीं।
फटफटित चांदणें ज्योतिज्वाळा त्यांत भासा येइल कीं॥ १॥

नवरंगाचा येकच गोळा बहु आभाळा भासेल कीं।
चंद्रसूर्य देखणें गेलें पाहतां पाहणें नासेल कीं।
लपेल ढवळें दिसेल पिवळें कांही बांही असेल कीं।
त्यांत मिळावें तन्मय व्हावें साधनिं मन हें भावेल कीं।
गुरुची सेवा घडेल जेव्हां समाधि लागुन जाइल कीं॥ २॥

नरहरिनाथा स्वामि समर्था कधिं हें घडोन येइल कीं।
जन्ममरण या दुःखापासुनि सुटका कशि तरी होइल कीं।
महिपति किंकर अखंड भोगी स्वरुपसमाधिंत राहिल कीं।
हा सुखसोहळा आपुल्या डोळां आपणचि आपणा पाहिल कीं।
जनासि हंसतो, मनासि पुसतो कधिं सण शिमगा येइल कीं।
सद्गुरुनाथ कृपा करुनि मज माहेराप्रति नेइ(ल) कीं॥ ३॥

गुरुमाय मला नको चालउं गे (३२७)

गुरुमाय मला नको चालउं गे
नको चालउं गे, किति आळउं गे॥ ध्रु०॥

उचलुनि घडिये घे मज कडिये,
डोळियांत डोळा कालउं गे॥ १॥

कमळामधि की कमलिन पाहुं दे,
पातयांत पातें मेळउं गे॥ २॥

अवसेंत शिरुनी पुनवेंत जाउं दे,
चांदण्यांत चांदणें खेळउं गे॥ ३॥

नरहरि महिपति स्वरुपीं नेउनि
घरच्या घरा आंत बोलउं गे॥ ४॥

पाहतां पाहतां धर्म बुडाला (३२८)

पाहतां पाहतां धर्म बुडाला, अधर्म झाला चहूंकडे।
जिकडेतिकडे कली मातला, कठिण काळ हा आला पुढें॥ ध्रु० ॥

दात्यांचें घरिं दरिद्र आलें, कृपण धनाढ्य झाले कीं।
पापि चिरायू पुण्यशील ते अल्पायुष्या गेले कीं॥
सत्कर्माचा लोप जाहला, दुष्कर्मीं जन भुलले कीं।
स्वधर्म सांडुनि अधर्म वाटे, कैसें कलियुग आलें कीं॥ १॥

पुत्र पित्याचा द्वेष करितो, कांता पतिशीं मानीना।
मायलेकिंचें भांडण होतें, जीव सासुवर देति सुना॥
शिष्य गुरूचा प्राण घेतो, गुरु शिष्याकडे पाहीना।
बंधुबंधुशी वैर चाललें, भाउ बहिणिशीं बोलेना॥ २॥

सेवक स्वामिसि मारुं पाहतो, स्वामिसेवकां वैर पडे।
(पाहतां पाहतां धर्म बुडाला, अधर्म झाला चहूंकडे)॥
कीर्तनसमयीं निद्रा येई, नाचामधिं जन दंग पडे।
साधुसंतांसी दृष्टि पाहतां, कपाळासि तें पित्त चढे॥ ३॥

नामस्मरणीं वाचा बसली, विषयीं गाणें चित्तिं जडे।
नरहरिसद्गुरुभजनीं महिपति जडला हा मज समज पडे॥
हरिनामाचा गजर करितां कळीकाळ तो पायां पडे।
कडकड कडकड वाजवि टाळी, उगाच पाहतो तोंडाकडे॥ ४॥

: १०५ : गोपाळनाथ

वैद्यें गुण केला बा, गुण केला (३२९)

वैद्यें गुण केला बा, गुण केला। संशय अवघा हरला ॥ ध्रु० ॥

भवरोगाचा झाडा, आत्मप्रचीति देऊनि पुढां ॥ १ ॥
तळमळ जीवपणाची भारी, औषध देउनि केली दूरी ॥ २ ॥
शांतिसुखाचें पथ्य, मन मारुनि केलें हित ॥ ३ ॥
गोपाळनाथ म्हणे मी रोगी, सद्‌गुरु वैद्य मिळाला वेगीं ॥ ४ ॥

१०६ : देवनाथ

भाग्यहीन मी, देवकि वदली (३३०)

भाग्यहीन मी, देवकि वदली, विनवि(त) वसुदेवा।
निर्दय हृदयें नेतां उचलुनि कैसें हो देवा ॥ ध्रु० ॥

सहा मारिलीं बाळें कंसें, सातवें गळलें।
आठवा हा तुम्ही नेतसां मानस का चळलें ॥
घाबरला जिव निघों पाहतो करपद हे गळले।
जन्मांतरिंचें कोण पाप तें न कळे हें फळलें ॥ १ ॥

स्नेहभरें मीं स्नेहें नाहीं जावळ माखियलें।
पायांवरि मी घेउनि कुमार नाहीं न्हाणियलें ॥
नाहीं दिधली गुटी स्वहस्तें नाहीं पाजियलें।
कुळिंचें दैवत सटवी, तेंही नाहीं पूजियलें ॥ २ ॥

सबळ बलाइक गगनीं वळला वर्षत सुकाळीं।
घोर शार्वरी आजि भासते काळासम काळी ॥
सदय मृदु अति हृदय कठिण कां मातें दुःखानळीं।
लोटुनि नेतां चित्त द्रवेना शिशु हा ये काळीं ॥ ३ ॥

देवनाथ प्रभुची हे ऐशी अतिदुर्धर माया।
स्रवति लोचनीं जीवनबिंदु खेद करी माया ॥
कठीण केलें मन वसुदेवें गमली सीमा या।
मुक्त कपाटें झालीं घेउनि निघतां अमाया ॥ ४ ॥

तुझा मुखडा अजब हिरकणी (३३१)

तुझा मुखडा अजब हिरकणी, तेज दिनमणी, सखे गोरा रंग।
तुझें नटनागर रुप नयनिं पाहुनि आम्ही आषक झालों दंग ॥ ध्रु० ॥

तुझि तनू बहुत सकुमार, वर्णिती चार, साहा अठराजण।
ऐकोनि कीर्तिरव कानीं, न गमे दिनरजनी, उतावळें मन।

कधिं पाहिन डोळेभरी, भोगिन अंतरीं, जाळी विरहाग्न।
उपभोग, गमति मज रोग, न रुचे कांहीं वाटे विषम अन्न।
बहु वृत्ति उदासिन गडे, मला आवडे, सुतदाराधन।
अग श्वान मन जसें, तसें त्यजुनि राजसे, ग सेविलें वन।
अग विचार करुनि मानसीं, आलों तुजपासीं, धरुनि सत्संग।
माथां न धरीं आडवा पदर, उघड भर नजर, पाहुं दे अंग॥ तुझें० ॥ १॥

तूं कपटी लपविशी मुखडा, बहुत अग वेडा, माझा जीव।
अतिसदय हृदय मृदु तुझें कठिण मजविशीं, जालें येईना किंव॥
तव विरहबाण करि उठाग, विकळ बहु प्राण, दुःखी सदैव।
जाळी योगाग्नि हृत्कमळीं, कृपांजळीं, वर्षे दाहा नीवव॥
उदकाविण तळमळी, जशी मासळी, जाहलें तदैव।
गडे तुझ्या गळ्याची आण, विनवणी मान, विरह निववी ग॥
घरदार, त्यजुनि निर्धार, करुनि आधार, तुझा अव्यंग।
अनुसरलों अति आवडी, घातली उडी, जालों निःसंग॥ तुझें० ॥ २॥

तूं उपेक्षिल्या मग कसें, ऐक राजसे, जन्म वीफळ।
वाटतो मला होईल, स्वसुख जाइल, म्हणुनि हळहळ॥
चाल झटपट अति निकट सखे मग लंपट उतावेळ।
घाबरा जीव बावरा करीं त्वरा उशीर न लावीं एकपळ।
मन हृदयभुवनिं निजतेजें सुमनशेजेवरि निश्चळ।
धरोनि निजावें मनीं समाधिसुखशयनीं भोगूं अविकळ॥
स्वानंद पूर्ण अक्षयीं ज्या नाहीं सदा अभंग।
देवनाथ गुरुकृपारंग लुटतसे रावश्रीरंग॥ तुझें० ॥ ३॥

१०७ : सोहिरोबानाथ

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे (३३२)

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे॥ ध्रु०॥

संतसंगतीनें उमज। चिद्रूपासि पुरतें समज।
अनुभवावीण मान हालवूं नको रे॥ १॥

दोरिच्या सापा भिउनि भवा। भेटि नाही जिवा शिवा।
अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे॥ २॥

विवेकाची ठरेल ओल। ऐसे बोलावे कीं बोल।
आपुल्या मतें उगिच चिखल कालवूं नको रे॥ ३॥

सोहिरा म्हणे ज्ञानज्योति। तेथें कैचि दिवसराति।
तयाविणें नेत्रपातिं हालवूं नको रे॥ ४॥

आम्ही न हों हो पांचांतले (३३३)

आम्ही न हों हो पांचांतले, न हों पंचविसांतले
एवढ्यालाहि वळखोनिया वेगळे आम्हीं आंतले॥ ध्रु०॥

सत्त्व, रज, तम आम्ही, न हों त्रिगुणांतले
केवढाही प्रपंच केला तरी न हों आम्ही त्यांतले॥ १॥

आम्ही न हों हो मंत्रांतले, न हों हो तंत्रांतले
बहुत बोलुनि काय, आम्ही न हों मायेच्या यंत्रांतले॥ २॥

आम्ही न हों हो लक्षांतले, न हों हो पक्षांतले
सोहिरा म्हणे अनिर्वाच्य, आम्ही केवळ अलक्ष्यांतले॥ ३॥

: १०८ : जोतिराम

दिवाळखोर विठोबा (३३४)

दिवाळखोर विठोबा पंढरपुरीं तो सांपडला
पायगळा जो बांधुनि घेतो देतो धन त्याला ॥ ध्रु० ॥

धामणगांवाहुनि सगुणत्वीं व्यापारासी आला
नाम पालटी तरि सद्भक्तीं तयासि ओळखिला ॥
रज तम सत्त्व त्रिगुण, चोविस तिस पचतिस हा मेळा
धातु सप्त ब्रह्मांड पिंड स्वर्गादि सात ताळा ॥
करणी मम मायेचि म्हणोनी सांगे जन सकळां
अहंकार स्वरूपीं निर्मुनि झांकविला डोळा ॥
गुणमइ नाना रंग विषय बाजार आसा भरिला
सूत्र दोरिक ऐवज भुलवुनि भोळ्याचा हरिला ॥ १ ॥

मछ कुर्म आणि वराह नरहरि वामन रूप धरिलें
परशराम श्रीराम कृष्ण गोकुळांत अवतरले ॥
गोवळ गोपी मुलें गोधनें वेणुनादिं भरिलें
रुक्माबाई आण्णावयासि पंढरीस गेले ॥
प्रेमळ ग्रापिक बहुंना दरिद्र यास्तव बहु फिरलें
मात्रपितसेवें पुंडलिका पाहुनि स्थिर थरले ॥
विट झुगारिली मागें धरिली वर उभा राहिला
प्रेम सोडल्या धन घ्या ऐसा कृतनिश्चय केला ॥ २ ॥

पंढरपुरिं ऋण फिटे जगाचें मात प्रकट जाली
फाडी खत चहुंवर्णजन्मिंची भक्तिपोहच दिधली ॥
जामिन होउन पुंडलीक हबतेबंदी केली
आशाढिं कार्तिकीं वर्षा यावें बोलि असि ठरली ॥
पाय आमुचे डोई तुमची मिळवुनि गाठी दिली ॥
तोहि इमानी निजधन सांपडेल त्याला
लटिकें म्हणतां जिव्हा झडेल वेद गोहि याला ॥ ३ ॥

चतुर्युग ते चौकडि हजार चौकड्यांसि दिवस
अशा प्रकारें वर्षें विधिला जालीं पन्नास ॥
आणखि त्यावरि युगें वाढलीं हें आठाविस

उभा राहिला तेव्हां देतो धन ज्याचें त्यास ॥
बोधल्याचें न फिटे ऋण म्हणउनि राहे चाकरीस
टाळ वाजवी परंपरेला सुटका ना त्यास ॥
जोतिराम गुरुबोधाचा शिस्या पाटी ठाकला
संतजनांचे दृष्टी दिसतो अलक्ष इतरांला ॥ ४ ॥

:१०९: संतुदास

गुह्यस्थानीं प्रभा असक्त देखिली (३३५)

गुह्यस्थानीं प्रभा असक्त देखिली
    गणपतीनें केली वस्ती तेथें।।
स्वाधिष्ठानीं ब्रह्मा सांवळा सुंदर
    नाभिं विष्णु गोरें रूप पाहे।।
अनुहातचक्र निळकंठ भोळा
    प्रकाशली लीला कृष्णरूप।।
विशु(धु)चें ज्ञानस्वेतरूप पाहे
    लिंगदेव आहे तये स्थानीं।।
अग्निचक्र पित हंसदेव ज्ञानी
    अनुभव (मनीं ?) घेति त्याचा।।
संतुदास म्हणे शेडचक्राचें मुळ
    सद्‌गुरू निश्चळ ब्रह्मरंध्रु।।

आम्ही जातीचे कुणबट (३३६)

आम्ही जातीचे कुणबट।
    शेत अमुचें घनवठ।।

निशिदिनीं अहमी घरीं।
    शेत पिके नानापरी।।

नको राखाया जोखाया।
    रास येती आपुल्या ठाया।।

संतुदास कुणबठा।
    नाही खंड वाठातीठा।।

१११०: विठ्ठल केरीकर

निरत हो मंगीशपदीं मना (३३७)

निरत हो मंगीशपदीं मना। धरुनी सदृढ भावना।
श्रीधनादि भवसाधनीं रमतां विवश पथ त्यागिना॥ ध्रु० ॥

भजुनि वास कैलास त्यजुनियां कुशस्थळींच्या वना।
भक्त मुक्त करणें हें ज्याचे हृदयीं वासना॥ १ ॥

विरक्त परि अनुरक्त जाहला अंगनाश जीवना।
शिरीं सुरस शशिधर मांगीश पार्वती जगजीवना॥ २ ॥

भुजगहार आधार जो गिरीश सर्व क्षत्रभूवना।
तो महेश विठ्ठलीं कृपा करितां फळती कामना॥ ३ ॥

रमारंग हृदयसंग (३३८)

रमारंग हृदयसंग घडवी आजि गडे॥ ध्रु० ॥

चंद्रचंद्रिकाप्रकाश,
मलयमरुत् सावकाश।
सीत मंद कुसुमगंध वृंद वृक्ष चहुंहिकडे॥ १ ॥

मित्रकन्यकासुनीर,
मृदुल सैकतेयतीर।
काक कोकिला सुकूजितैक कलकलाट पडे॥ २ ॥

रम्य समय हा वसंत,
येती तीर्थार्थ संत।
त्यांत पावतां अनंत विठ्ठलासि लाभ घडे॥ ३ ॥

: १११ : रामानंद

उठा प्रातःकाळ जाला (३३९)

उठा प्रातःकाळ जाला। आत्माराम पाहूं चला।
हा समयो टळला। मग अंतरला श्रीराम॥ ध्रु० ॥

जीवशिव दोघेजण। भरत आणि शत्रूघन।
आला बंधु लक्षुमण। मन उन्मन होउनी॥ १ ॥

विवेक वसिष्ठ सद्गुरु। संत सज्ज्न कुळेश्वरु।
करिती नामाचा गजरु। हर्षनिर्भरु होउनिया॥ २ ॥

सात्त्विक सुमंत प्रधान। नगरवासी अवघेजन।
आला वायूचा नंदन। श्रीचरण पाहावया॥ ३ ॥

माता जानकी विघडली। होती प्रारब्धें लिहीली।
तिची देहबुद्धि जाळिली। आळंगिली श्रीरामें॥ ४ ॥

आज दिवाळीदसरा। पर्वकाळ आले घरा।
रामानंदाच्या दातारा। भेट लेकरा मज द्यावी॥ ५ ॥

११२ : मोरोपंत

ऐक बा रामराया (३४०)

ऐक बा रामराया, तुझ्या वंदितों पाया।
आवरीं आपुली हे विश्वमोहिनी माया॥ ध्रु० ॥

मी मूढ हीन दीन सर्वसत्क्रियाहीन।
तूं क्षमाशील देवा शुद्धचरितनिजाधीन॥ १ ॥

घडो घडो साधुसंग, नको विषयप्रसंग।
सप्रेम भक्ति द्यावी, सत्त्व वैराग्य अभंग॥ २ ॥

वाटतें, नित्य भावें, तुझे साधु-गुण गावे।
मन हें आवरेना, सांग काय म्यां करावें॥ ३ ॥

करितां संसारकाम, मुखीं असो तुझें नाम।
दयाघना भक्त मोर, याचा पुरविसी काम॥ ४ ॥

तुज्या चरणकमळीं (३४१)

तुज्या चरणकमळीं। होवू अळी हें मन॥
मग सुखें नरकवास। घडो यास निज दोषें॥
तुजे पायीं तुळसीवाणी। माजी वाणी शोभावी॥
भक्तमयूर-करुणा-घना। भरीं काना निजगुणें॥

घेउनि ये हरि मंदिरीं (३४२)

घेउनि ये हरि मंदिरीं। चैन नसे मज सुंदरी॥ ध्रु० ॥

विरहानळें मी व्याकुल झालें
भीष्म जसा शरपंजरीं॥ १ ॥

सुस्वर मुरलीवादन करितो
        मधुर वाजे खंजरी॥ २ ॥

सुरासुरांतें कोठुनि प्राप्ती
        तप करिती गिरिकंदरीं॥ ३ ॥

रामसुताचें मन भ्रमरापरि
        चरणिं रुळे जशि मंजरी॥ ४ ॥

हृदया बरें विचारीं (३४३)

हृदया बरें विचारीं। नाम स्मरें, न तापें॥ ध्रु० ॥

भगवान् अजामिळाला। नामें गजा मिळाला।
गणनातिगें गिळाला। नामप्रताप पापें॥ १ ॥

ज्याचे मनांत थारे। वधिले अराति सारे।
प्रभुच्या असें न बा रे। केलें रणांत चापें॥२ ॥

नामींच भाव राहो। दुष्कर्मपंक वाहो।
सौख्या मयूर लाहो। जें मोजवे न मापें॥ ३ ॥

११३ : कोकिळ

केला राम धणी, राम धणी (३४४)

केला राम धणी, राम धणी। अद्‌भुत ज्याची करणी ।। ध्रु० ।।

रामीं रतली वाणी। आता सुखास काय वाणी ।।
रामावांचुन कांहीं। आणिक साधन उरलें नाहीं ।।
कोकिळ-प्रभुसी ध्यातां। आलें सहजीं निजपद हाता ।।

: ११४ : दयाराम

पाहावें भाग्य नरसिंह मेहेताचें (३४५)

पाहावें भाग्य नरसिंह मेहेताचें, वल्लभदेवाचें ॥ ध्रु० ॥

जीर्णागडवासी विप्रजाती, नागराची ज्ञाती;
भेटीले भगवंत अद्‌भुत भांति, अखिल विश्व ख्याती;
रास पाहीला प्रत्यक्ष हरिचा, घेउनी दीपिकाबल प्रेमाचें ॥ १ ॥

एकदा कोणी आले तीर्थवासी, पुसलें विप्रासी,
येथे कोणी हुंडी करितो खासी, त्याणी केली हांसी;
जा तुम्ही लौकर भक्तराज(जा)कडे, मोठे कोटिक नगराचे ॥ २ ॥

आले तो (ते) गोष्टी ऐसी आईकुनी मंदिर पुसून,
केलें हरिभजन हरिचें दर्शन, बसले समजून;
न कळलें कापटय़ ब्राह्मणाचें; महा दुष्ट शत्रु संताचे ॥ ३ ॥

मेहेताजिस कळली समस्त गोष्ट, बोलले ते मिष्ट;
आलेत तुम्ही आमुचें भाग्य श्रेष्ठ, झाहालों संतुष्ट;
नका करुं चिंता आम्ही हुंडि लिहुन देतों, वर सामलशाचे ॥ ४ ॥

मोजुनि घेतले रुपये सतसात, अरपिले जगतात;
हुंडी त्यांना लिहुन दिली क्षणांत चालले ते प्रातः;
येउन द्वारकीं देवा पाहिलें, गोमतिमंजन मन क्रमवाचे ॥ ५ ॥

पुसलें मग नांव सामलस्हाचें मी तो हुंडी करांचा
सामल कोणि नाही सर्व नग्रांत, सर्व म्हणे वाचा;
ऐकुनि वचन निराश झाले, विकल बोलले, पत्र ठगाचें ॥ ६ ॥

वाणी होउनी परीब्रह्म आले, चौघांला मिळाले;
पुसलें, 'तुम्ही जुनागडाहुनी आली?' श्रीकृष्ण म्हणाले,
'हुंडि द्यावी पैके घ्यावे आम्ही सामळ गुमास्ते नरसइयाचे' ॥ ७ ॥

दिले रुपये सात शंभर,
त्यावर झाले मग अदृश्य विश्वंभर,
भक्तां सुखकर, यात्री आपुले दाम पाहिले, न कळलें चरित्र चतुर्भुजाचें ॥ ८ ॥

पुत्राचें लग्न कृष्णें करविलें, मौसाळा दिला;
वचनासाठीं पाउस पाठविला, पितुश्राद्ध केला;
दिली दक्षिणा मोहिर सोन्याची, विप्र तोषले, यश भक्ताचें ॥ ९ ॥

पुष्पांची दिधली माळ अविनाशी, पाहतां संन्यासी,
पाणी पाजिलें निशा वृजवासी, होऊनि स्त्री खासी;
मंडलीक आदि सारे हरविले, केलें सत्य वाक्य दासाचें ॥ १० ॥

मेहेताजीचे निंदक नागर फार, केला अपकार;
तेव्हां ते सगळे झाहले माहार, पाहा चमत्कार;
झक मारुनि जोडुनि आले कर, पडले पायीं निंदक हो त्यांचे ॥ ११ ॥

ऐसें कोट्यावधि केलें काम, मेहेताचें धाम;
झाले वशीभूत सुंदर श्याम; म्हणे जन दयाराम,
काय सांगूं भक्ति नरसिंहाची, सखिरूप प्रिय श्रीकृष्णाचें ॥ १२ ॥

श्रीरामकृष्ण गोविंदे (३४६)

श्रीरामकृष्ण गोविंदे, म्हणा मिळोनी वैष्णववृंदें ॥ ध्रु० ॥

केशव करुणालय सुखकंदे,
नगधर नटवर नंदननंदे,
माधव मुरारि परमानंदे,
बंसीधर वृंदावन चंद्रे,
श्री राधिकारमण गोपिकेश गुणनिधि गोकुलेश
गोपेंद्र गदाधर गरुडध्वज गोपार गुणाकर।
गोवल्लभ गोवरधनवल्लभ नंदलाल नागर नटनायक
ललित त्रिभंगी मनोहर मोहन,
मोदाकर मदनाभिसम अखिलेश्वर आनंदकंदे ॥ १ ॥

प्रभु परमेश्वर पूर्णानंदें,
पद्माप्रियतम पदारविंदे,
संसृती मात्र हरित दुखद्वंदे,
अज अक्षरातीत जग वंदे,
त्रिगुणातीत नित्य सर्वात्म सर्वज्ञ मग्न रतिरसज्ञ,
रसमय पूरणकाम श्रे(श्री)धामनाम रुचि आत्माराम,

अच्युत अद्वित अकलित अपार,
सिद्धांतसार परब्रह्म परात्पर,
पद्मनाभ परमहंस पुरुषोत्तम श्री बालमुकुंदे॥ २॥

शेष महेष रटति आनंदे,
सनक सनंदन सन स(त्सु)नंदे,
सतत प्रशंस सकलश्रुतिछंदे,
त्यासी सोडिला, ते मत्तिमंदे,
हरिनामाम(मो)घां सगळीं तीर्थें नेमवृ(व्र)त धर्म कर्मतपजाप यज्ञ अष्टांग,
योग अध्ययन ब्रह्मशुचिदान ज्ञान विज्ञान ध्यान,
ऐकिलें अवघें निगम(मि)चें,
वदनीं हा वर, दुसरा समुल पाप संताप भेटाया हरिभेटीचा उपाय नाहीं,
भाव कुभावे श्रीकृष्ण किरतनीं वांये जात नाहीं अतुलित प्रताप,
दयाराम म्हणे, त्यासाठी मज मनासि पडिला
कृष्णनामाच्या छंदे, म्हणा मिळोंनि वैष्णववृंदे
श्रीराम कृष्ण गोविंदे॥ ३॥

: ११५ : गोविंद वणीकर

असा धरि छंद (३४७)

असा धरि छंद। जाय तुटोनिया भवबंध॥ ध्रु० ॥

छंद लागला टिटवीला।
तिने समुद्र शोषिला (अटवीला)।
मैनावतिने कृतार्थ केला। गोपीचंद॥ १ ॥

दुधाचा सागर उपमन्यूला।
अढळ पदावरि तो ध्रुव बसला।
मार्कंडेयें यम हटवीला। झाला मंद॥ २ ॥

झाले तीन देह भरताला।
रावण रामरूप तो झाला।
गोपी चढल्या गोलोकाला। यशोदानंद॥ ३ ॥

आळिस भ्रमराचा अध्यास –।
होतां भ्रमरपणा ये तीस।
तैसा सोडुनि जीवपणास। भोगी आनंद॥ ४ ॥

छंदें असाध्यही साधीती।
नर ते नारायणही होती।
दीनजन हरी अपुला करिती। जो सुखकंद॥ ५ ॥

हरिविण कोणि न दिसे मजलागीं (३४८)

हरिविण कोणि न दिसे मजलागीं। बाई॥ ध्रु० ॥

आसनिं शयनिं मनिं कृष्ण हा भासे त्याविण न रुचे कांहीं॥
गमनागमनिं जनिं-वनिं हरि दिसतो तन्मय झालें पाहीं॥
गोविंदप्रभु निजरूप हें बरवें ठसलें माझे हृदयीं॥

विठाबाइ माय, माय पंढरीची (३४९)

विठाबाइ माय, माय पंढरीची, बहुत कनवाळु अंतरींची ॥ ध्रु० ॥

तरुण सांवळी, सांवळी अंगकांती, दोहिं पदतळीं अरुणदीप्ति।
दृष्टि पाहतां, पाहतां दिव्यमूर्ति, वेधली विश्वचित्तवृत्ती।
पितांबर कटीं, कटीं तयाभवतीं, वेलि सूपर्ण रत्नदीप्ति।
दिव्य मुद्रिका, मुद्रिका उभय करिंची, बहुत कनवाळु अंतरींची ॥ १ ॥

जन्मला विधी, विधी नाभिकमळीं, दोंदिल उदर वरी त्रिवळी।
कटीं कर उभी, उभि भक्तांजवळीं, सिंधुतनया हृदयीं धरिली।
मुक्त माळिका, माळिका त्यांत पोवळीं, भुजबंदांत रत्नें जडलीं।
माळ तुळसीच्या, तुळसीच्या मंजरीची, बहुत कनवाळु अंतरींची ॥ २ ॥

चुषुक हनुवटी, हनुवटी दृष्टि नाकीं, दुरुनि रुक्मिणिला अवलोकी।
वामभागीं हे, भागिं हे सखी भिमकी, हास्यवदनेंदु पाहे तंव कीं।
हरीच्या रूपा, रूपा कोण लेखी, भक्तभयसागर (हा) सोकी।
मूल यशोमती, यशोमतिच्या उदरींची, बहुत कनवाळु अंतरींची ॥ ३ ॥

मुगुट मस्तकीं, मस्तकीं दिव्य शोभा, मकरकुंडलें रत्न-आभा।
वदन साजिरें, साजिरें कोमल गाभा, पाहतां तया पद्मनाभा।
केशरी टिळा, टिळा गंध शोभा, विटेवरि गुरु नरहरि ऊभा।
मूर्ति गोविंद, हृत्पद्ममंदिरींची, बहुत कनवाळु अंतरींची ॥ ४ ॥

११६ : गोविंद (मुक्तिनाथशिष्य)

फार कासया बोलावें (३५०)

फार कासया बोलावें।
मूळ आपुलें शोधावें।।

मसुरेयेवढें बिंदुलें।
त्यांत त्रिभुवन साठलें।।

हरिहरांच्या मूर्ति।
बिंदुल्यांत होती जाती।।

त्यांत देखिला आणिक।
अनुगम्याहुनी बारिक।।

त्याचा पाहूं जातां अंत।
वेदशास्त्रही थकित।।

मूळ तत्त्व गोविंदातें।
बिंबविलें मुक्तिनाथें।।

: ११७ : गंगानाथ

तूं किती गैला, बिनसिंगाच्या बैला (३५१)

तूं किती गैला, बिनसिंगाच्या बैला
नरतनु भाजी केली ऐला पैला ॥ ध्रु० ॥

धिग धिग मूर्खा, तुज भ्रांतीचा बुर्खा
अंतरांत नाहीं चुर्का नेत्रीं धुर कां।
मेळउनी कुळ तुर्का अनेक(का ?)।
भांगेचा घेतो खुप झुरका।
गात्रें सयेला, बिनसिंगाच्या बैला ॥ नरतनु० ॥

सांगति संत, तुजपासीं भगवंत
त्याची तुला कसी नाहीं खंत ॥
जीवजंतासी पाळी अनंत
शरण जा तारिल कृपावंत ॥
भवभैला, सांभाळुन मुळ वयला ॥ नरतनु० ॥

जन्मुन मारील, त्या काळासी वारील
ऐसा सद्गुरुनाथ दुख हारील ॥
मन भारील, बिधसुकासी आकारील
गोपाळनाथ समर्थ उधारील।
बुद्धी फैली, गंगाराम जळीं तैला ॥ नरतनु० ॥

११९८ : महीपतिबुवा

वटपत्र गळे फिरतां आकाशीं (३५२)

वटपत्र गळे फिरतां आकाशीं
अपंगिता त्यासी कोणी नाहीं॥

तैसें झालें असे आमुच्या जीवा
न दिसे विसावा कवण्या ठायीं॥

मायेनें टाकिलें आक्रंदत तान्हें
न करी धावणें त्याचें कोणी॥

हरिणी पाडसा जाहलीसे तुटी
पारध्या फासाटीं पाडियेलीं॥

महीपति म्हणे तैसीच निरास
वाटे या जीवास पांडुरंगा॥

चित्तीं धरिली वासना (३५३)

चित्तीं धरिली वासना। सिद्धी न्यावी नारायणा॥
मी तों अपंग अनाथ। तुम्ही अनाथाचे नाथ॥
केला पण सिद्धी न्यावा। मज सांभाळावें देवा॥
महीपति निढळवाणा। याची येऊं द्या करुणा॥

उठा पांडुरंगा (३५४)

उठा पांडुरंगा प्रभातसमयो पातला
वैष्णवांचा मेळा गरुडपारीं दाटला॥

गरुडपारापासुनी महाद्वारापर्यंत
सुरवरांची मांदी उभी जोडुनियां हात ।।

शुकसनकादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटी
त्रिशूळ डमरु घेउनी हातीं उभा गिरजेचा पति ।।

कलियुगींचा भक्त नामा उभा कीर्तनीं
पाठीमागें उभी डोळे लावुनियां जनी ।।

प्रभात झालीसे साचार। अजुनी निजले शारंगधर।
बोले रखुमाई सुंदर। उठा लौकर श्रीहरि ।।

मुख प्रक्षाळावया उदका। घेउनि आलीसे राधिका।
पीतांबर यदुनायका। काढा मुखावरूनी ।।

स्नान करुनी भीमातीरीं। वैष्णव आले महाद्वारीं।
पूजा घेउनिया करीं। नरनारी तिष्ठत ।।

नारद तुंबर कीर्तन गाती। गरुड हनुमंत तिष्ठती।
पादुका घेउनियां हातीं। उभा महीपति सन्निध ।।

: ११९ : काशीकवि

भीमकबाळा म्हणे नृपाळा (३५५)

भीमकबाळा म्हणे नृपाळा, त्या शिशुपाळा मी न वरीं
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी ।। धृ० ।।

विदर्भराजा जनिता माझा त्याची भाजा शुद्धमती
तिचे वांचले पांच पुत्र ते पांच विषय जणुं अवतरती ।।
सखे! परिस त्यांपरिस लहान मी परि सकळांची आवडती
बाळपणीं यदुपाळकथेचा सुकाळ झाला दैवगती ।।
संत घराला संतत येती तेथें उसंत घे नृपती
मला पाहुनी बलानुजाचे गुण आलापुन कळवीती ।।
नित्य यथामति कथामृत पितां वृथा जाइना दिनराती
उपवर झाल्यें म्हणोनि नृपवर मायबाप वर विचारिती ।।
म्हणति अनन्या धन्या कन्या द्यावि हरीला स्वयंवरीं
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी ।। १ ।।

रुक्मी माझा वडील दादा अम्हां साजणांमधिं मोटा
शहाणा परंतु हरिचरितामृतरसांत न भिजे मणिगोटा ।।
मायबापही कांपत ज्याला, या परमार्थाचा तोटा
वाइट बाई! खोड तयाची आईबापांशीं उलटा ।।
तात बिचारा न ये विचारा त्या व्यभिचाराच्या वाटा
गोविंदाची तिनदां तिनदां निंदा करि तो खल खोटा ।।
भववैद्याला टाकुनि चैद्या द्या ह्या म्हणतो आडमुटा
गोंधळ निश्चय खूळ मांडिलें मूळ धाडिलें चैद्यभटा ।।
पांडवमहिले मग म्यां लिहिले श्लोक सात हे जयावरी
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी ।। २ ।।

सुदेवाख्य भूदेव धाडुनी वासुदेव मीं आणविला
इकडे मागध शाल्व घेउनी दमघोषाचा मुल आला ।।
वऱ्हाड सारें बराड त्याला बिराड सेना पराधिला
लग्नसराई, ऐकें बाई! घाई झाली भाइजिला ।।
हळद लावित्यें जणों हळाहळ हळहळ मोटी चित्ताला
बळें दटाविति, खळदमणाविण बळद वाटलें घर मजला ।।
महालिं नाहलिं काहलि जाहलि बाहलि नाहीं जीवाला

अकस्मात तों आधिज्वरहर मुनिवर येउनि पोहोंचला॥
प्रथम मुखश्री कळवी द्विज मग यदुपति आला, धीर धरीं
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी॥ ३ ॥

श्रीगुरुपायीं नमनें सुमनें (सुमनें) पूजा म्यां केली
चिंता गुरुपद चिंतामणि मम चिंता विलयाप्रति गेली॥
खगदमनाच्या आगमनानें आग मनांतिल विझवीली
धाकें खळबळ चट खळबळलें, उगेंच बळ, तोंडें सुकलीं॥
यादवदळबळ-जळनिधि तुंबळ सहबळभद्रहि बळशाली
पाठीं बाई! पाठोपाठीं गांठी लोभा ठिक पडली॥
जनक तसा मम जनक सुजनकवि भजन करित ये पदचाली
मोरासम सामोरा जाउनि तेणें पुजिला वनमाली॥
सति! यतिपतिगति स्मृतिनुतिनतिनें जो अतिपतिताप्रति तारी
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी॥ ४ ॥

कुळधर्मचि कुळदेविदर्शना हे नृपकन्या चालविली
असकरले खल तस्कर लस्कर माझ्याभंवती रखवाली॥
पूजि ते दिशीं खुशि मी झाल्यें हरिविशिं शिवसति नवसीली
प्रसन्न झाली गौरि, शौरिची नवरी होशिल कीं, वदली॥
माय नमुन मी घाय जाय जंव पाय पायरेतळिं घालीं
केले मूर्छित, मेले, गेले, उलथुन पडले किति खालीं॥
घेरि तयांला घेरित मी हरि हेरित हेरित बरि सुचली
लगबग लगबग भगवंतहि ये सगळी तगमग मग शमली॥
तमालनिल हे अमाल लवणीसमान घे मज रथावरी
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी॥ ५ ॥

रथांगपाणी जथापतीने रथांत बसवुनियां नेती
माग लाविती मार्ग काढिती मागध शाल्वहि चैद्यपति॥
बहु गजबजले हयगज सजले तजविजिं झुजले आटपिती
बडबड करिती, तडतड तोडिति, घडघड रथपति पिटाळिती॥
किति भट भटकिति, किति धट इटकिति कटकीं कटकट किति करिती
चटपटले मनिं झटपटले पर, पर लटपटले चट हटती॥
लटपट कांपति खटपट करिती वटवट रणिं पटपट मरती
अरिधरि हरि त्या हरिवरि करि परि अरि सरि करिती परि हरिती॥
विजयसख्याला जयजयकारें, मी तशि विजयी श्रीहरि वरी
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी॥ ६ ॥

पुढति पुढति मनिं कढति चढति रथिं लढती तरि हरिची बडती
धन्य बळाचे सागर भाउजि नागर-मुसळें रिपु मथिती ।।
मौजा पहातां मउ झालें मन फौजा माघारां फिरती
पण दादाचें बहुत कृपणपण, आपण हा पण करि कुमती ।।
दंडुन अरिला धुंडिन बंधू जाइन कौंडण्यपुराप्रती
गडबड पाहुन मी गडबडल्यें धडधड उर करि सांगुं किती ! ।।
विटंबिला मजसमक्ष भाऊ त्याला जाउनि सोडविती
मथिलें रिपुदळ जथिलें यश हें ग्रथिलें कथिलें यथामती ।।
काशिकवीची काशी मी परि दासी हरिचे पाय चुरीं
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी ।। ७ ।।

तारीं तारीं गुरुराया (३५६)

तारीं तारीं गुरुराया। गेला गेला जन्म वायां ।। ध्रु० ।।

केलें नाहीं शिवध्यान। नाहीं जपतप साधन।
केला साधूंचा अपमान। धरला मान नरकीं जाया ।। १ ।।

केलें नाहीं गंगास्नान। नाहीं गोदेचें दर्शन।
किंवा समुद्रा उधळण। यमुना कालिंदीस जाया ।। २ ।।

काय केलें पापाचरण। असे कोठें गेलें मरण।
जालों सर्वपरी दीन। दिलीं कन्यासुत यमराया ।। ३ ।।

घडलें नाहीं देवदर्शन। नाहीं फिरलों तीर्थाटन।
संसारीं गुंतलें मन। काशी दीन लागे पायां ।। ४ ।।

: १२० : राम जोशी

भज भज भवजलधिमाजि (३५७)

भज भज भवजलधिमाजि मनुजा शिवाला ।। ध्रु० ।।

धरिशिल दृढ चरणकमल। घडिभरि तरि करुनि विमल।
तरिच सकल पाप शमल। त्यज रे भवाला ।। १ ।।

सांडुनियां विषयवमन। झडकरि करिं षडरिदमन।
पुजिं मन हें करुनि सुमन। गिरिजाधवाला ।। २ ।।

सावध हो करिसि काय। शंकरगुरु बापमाय।
चिंतुनि कविराय पाय। हृदयीं निवाला ।। ३ ।।

भला जन्म हा तुला लाधला (३५८)

भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा
धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ।। ध्रु० ।।

चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी
जरा तरि समज धरीं अंतरीं
हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं
मठाची उठाठेव कां तरी
वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी
हरीचें नांव भवांबुधितरी
काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लाकडें
हीं काय भवाला दुर करतिल माकडें
बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा
हरीरस सांडुनि घेसी दुधा ।। १ ।।

जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळ काम कोपला
आंतुनि, बाहेर म्हणविशि भला
वित्त पाहतां पित्त येतसे चित्त पाहिजे मला
असें हरि म्हणतो नुमजे तुला
वर संभावित दांभिक अभ्यंतरिं नाहिंस बिंबला
बहिर्मुख नर नरका लाधला
तूं पोटासाठी करिं खटपट भलतिशी
परि भक्तिरसाविण हरि भेटल काय तुशीं
काय मौन धरुनियां गोमुखिला जाळिशी
स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा
न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥ २ ॥

टिळाटोपिवर शिळा पडो या बिळांत करिशी जपा
तथापि न होय हरिची कृपा
दर्भ मुष्टिच्या गर्भि धरुनियां निर्भर पशुच्या वपा
जाळिशी तिळा तांदुळा तुपा
दंडकमंडलुबंड माजविशि मुंड मुंडिशी तपा
न सार्थक लटक्या सान्या गपा
ही बारबार तलवार येइल काय पुन्हां ?
ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुणा ?
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा
सदा हरि कविरायावर फिदा ॥ ३ ॥

नरजन्मामधिं नरा करुनि घे (३५९)

नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी
तरिच सार्थक मानवकुडी ॥ ध्रु० ॥

बा चौन्यांशी लक्ष वेळ संसार पडला गळां
चिंतेचा पिकला मळा
दारधनाचा लोभ टाकुनी झटकर हो वेगळा
हा कसा उकलिशी पिळा
धनानिमित्तें जनापुढें तूं दाविसि नाना कळा
किति तुला मुलांचा लळा

तूं पडुं नको यांचे भरीं
तुझ्या हें खापर फुटतें शिरीं
तुला मी गोष्ट सांगतों खरी
आतां कर तांतडी, ही पुन्हा न ये बा घडी
तरिच सार्थक मानवकुडी ।। १ ।।

निपट बावळा या विषयाच्या मागें लागसि कसा
कां होसी बा धड पिसा
वयोधनाची किति चंचळगति कां धरिशी भरंवसा
हें सकळ मनाला पुसा
उदरासाठीं दुर्धनिकांच्या पुढें पसरिसी पसा
किति उगाळशिल कोळसा
हें तुला शिकविलें कुणीं ?
दयाळू नरनारायण धणी
अझुनि तरि करिं बा ही घोकणी
विषवल्लीची जडी, तूं म्हणशिल साखर खडी
तरिच सार्थक मानवकुडी ।। २ ।।

नवसकामना करुनि मनामधिं म्हणशिल पुरुषोत्तमा
दे संतत विपुला रमा
विषयवासना तुला तुटेना मानसि या संभ्रमा
काय पुढें बोलशिल अधमा
किती प्रपंचामधें फिरुनियां पावसि विफल श्रमा
कां न करिशी भजनोत्तमा
हें कसें तुला भावलें
करावीं अचळा दारामुलें
मिळेना पुढतीं हें बाहुलें
कविरायाची उडी, दाविल भवार्णवाची थडी
तरिच सार्थक मानवकुडी ।। ३ ।।

१२१ : अनंतफंदी

अक्रुरा, गोपि आक्रंदती (३६०)

अक्रुरा, गोपि आक्रंदती, हरीप्रति ठेवा
मथुरेशि नको नेउं पहा रे
मथुरेशि नको नेउं अमुचा प्राणविसांवा ।। ध्रु० ।।

येऊन गोकुळीं अवतरला दिनबंधु
तेपासुनि अवघे आनंदले गोपबंधु ।
त्रैलोक्यामाजी दुमदुमिला आनंदु
हें क्षीरसागरिंचें निधान ब्रह्मानंदु ।
हा भक्तांना कनवाळु गोकुळा बाई,
अक्रुरा याविना गोपि(सि) न दिसे कांहीं ।
मथुरेसि कसा नेतां समुद्रजांवई
या हरिवांचुनि आम्ही मृत्यु पावलों लवलाहीं ।
हा पुतनारी घननीळ हत्तिचा छावा
अमुचा प्राणविसांवा ।। १ ।।

मथुरेशि कंस कसा रिपु निर्मिला हरिचे साठीं
धाडिलें तुम्हातें आणावया जगजेठी ।
अक्रूर पण तुम्ही क्रूर भासतां पोटीं
निष्ठुर ह्या तुमच्या हृदयिं विषाच्या गोटी ।
आधीं समस्त गोपींचे प्राण वधावे
मग स्वस्तिक्षेम मथुरेशीं हरिला न्यावें ।
हरि गेल्यावर राहुन अम्हि काय करावें
म्हणुनी स्वहस्तें आम्हांसि मारुनि जावें ।
या मुरारिचा दचका प्राणाशिं नसावा
अमुचा प्राणविसांवा ।। २ ।।

अक्रूर म्हणे पुरुषोत्तम सर्वांठायीं
भरुनी उरलासे तुम्हांस ठावा नाहीं ।
हा जळीं काष्ठीं पाषाणीं शेषशायी
कंसालागिं हरी हा वधील एके घाईं ।
ही तुम्हास भासती याची लहान पराई
परि हा, प्रळयाग्नी कैक बांधिल पायी,

हा सर्वांचा देह असुनि विदेही।
गोपिहो तुम्हाला भ्रांत पडली एव्हां।
अमुचा प्राणविसांवा ।। ३ ।।

अक्रुरा तुम्हि इतुकें बोलिलां असत्य
कळलें ये समयीं तूं कंसाचा भृत्य।
वचनें ऐकुनि गोपिचित्तिं वनवास जाला
अक्रूरा काननीं कसें मोकलिलें गोपिकांला।
जननी मृत्तिका फाकि ती, प्रळय झाला
मालणी कैक प्राशिती विषाचा प्याला।
फंदि अनंत म्हणे हृदयीं हरि बसवा
अमुचा प्राणविसांवा ।। ४ ।।

लंडे गुंडे हिरसे तट्टू (३६१)

लंडे गुंडे हिरसे तट्टू यांची संगत धरूं नको
नरदेहासी येउन प्राण्या दुष्ट वासना धरूं नको ।। ध्रु० ।।

भंगीचंगी बटकी सटकी ह्यांच्या मेळ्यांत बसूं नको
बिकट वाट वहिवाट नसावी धोपटमार्गा सोडुं नको।
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको
चल, सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको।
परधन परनार पाहुनी चित्त भ्रमुं हें देउं नको
अंगिं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको।
नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेउं नको
भलीभलाई कर कांही पण अधर्म-मार्गीं शिरूं नको।
मायबापावर रुसूं नको
दूर एकला बसूं नको
व्यवहारामधिं फसूं नको
कधीं रिकामा असूं नको।
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ।। १ ।।

वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलुं नको
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनि हेवा झटूं नको।
मी मोठा शाहणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको
एकाहुन एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको।

हिमायतीच्या बळें गरिबगुरिबाला तूं गुरकावुं नको
दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको।
बहुत कर्जबाजारि होउनी बोज आपुला दवडुं नको
स्नेह्यासाठी पदरमोड कर, परंतु जामिन होउं नको।
विडा पैजेचा उचलुं नको,
उणी तराजू तोलुं नको,
गहाण कुणाचें डुबवुं नको,
असल्यावर भीक मागुं नको।
नसल्यावर, सांगणें कशाला, गांव तुझा, भीड धरूं नको॥ २॥

उगीच निंदास्तुती कुणाची स्वहितासाठी करूं नको
बरी खुशामत शहाण्याची ही, मूर्खाची ती मैत्रि नको।
कष्टाची बरि भाजिभाकरी तूपसाखरेचि चोरि नको
आल्या अतिथा मुठभर द्याया मागेंपुढतीं पाहुं नको।
दिली स्थिती देवानें तींतच मानीं सुख कधिं विटूं नको
असल्या गांठी धनसंचय कर, सत्कार्यी व्यय, हटूं नको।
आतां तुज ही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको
सत्कीर्ती-नौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको।
सुविचारा कांतरूं नको
सत्संगत अंतरूं नको
द्वैताला अनुसरूं नको
हरिभजना विस्मरूं नको।
गावयास अनंतफंदिचे फटके मागें सरूं नको॥ ३॥

धन्य तुझें लावण्य (३६२)

धन्य तुझें लावण्य प्रीतिचे बाण ग जैसे सणाणी
खरें सांगशिल, कधीं तृप्त होइल गे अमुचे मनानीं॥ ध्रु०॥

दोमजला पैठणचें पातळ लफ्फा घे टाचेची खबर
आधींच निबर जोबन त्यावर पितांबराची चोळी जबर।
लाल शालु जशि मशाल, घरची खुशाल दो पैशानें गबर
नाहीं कोणाची प्रभा उत्तमा तेव्हा तर्फडी मात जबर।
गांड्या गुडघ्या सरळ पोटऱ्या पायिं जोडवीं खणाणी
जसे घोड्याचे नाल वाजती अवाज कानीं दणाणी॥ १॥

फार चांगली तूं जर माहित कळलिस कानोकानाला
तर तुला भलताच उडविल चुना न लागेल पानाला।
कैक विलासी अहो-रात्रीं टपले देही-दानाला
टवकारुन तुजकडेच पाहतिल कळा लागतिल मनाला।
स्तनाला कधिं हस्त लावती आमची विनंती मानी
तूं थोराची लेक तुला अम्हि काय देयाचें दीनानीं॥ २॥

वडिलानूपडलीं जी काय दौलत लाखों ज्यांनी कमावली
तितुकी तुज अर्पिली परंतु कांहींच नाहीं जमावली।
असें चांगुलपण तुझें धन्य मातेच्या उदरीं समावली
अटोकाट शाहाणि युक्ति-युक्तीने पाहुन जमावली।
अतीरती कुल खप्पी झाले हिंडुं लागले वनांनीं
नयन तुझे पाहतां मृगानिंच तोंड खुपसलें तनानी॥ ३॥

कोट्यावधि तुज पैसा देऊं, तूं खा नारि तूप साखर
जशि चंद्राला दशी वहावी घ्या आमचि भाजि भाकर।
दोन्ही हस्तक तिसरें मस्तक जसे तुझ्या घरचे चाकर
इतुकें मनामधि समजुन उमजुन घाल अम्हांवरति पाखर।
अनंतफंदिचे छंद जसे कटिबंद जडन नवि झनानी
लांगे लुंगे कवि ना ठरती जशा भोरड्या मनानीं॥ ४॥

लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि (३६३)

लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती।
"आहे ठाउक पुरुषार्थ तुझा, तुज प्रिय असो पशुपती॥ ध्रु०॥

स्मशानवासी भुषणभयंकर पिंगट मुकुटीं जटा।
भाळिं चंद्र ज्या तीन नेत्र भस्माचा कपाळीं पटा॥
व्याघ्रांबर गजचर्मांबर परिधान शुद्ध कानफटा।
रुंडमाळ ती कंठिं कुंडलें भुजंग रुळती कटा॥
त्रिशूळ पाणीं त्रिपुंड्र भाळीं लोहकंकण मनगटा।
नंदिवहन सर्पाचा सदोदित करि कमरे लंगुटा॥
कसा आवडतो शंकर, गिरजे, सांग तुला मजप्रती।
लक्ष जन्मिंचें पातक म्हणउनि पडलिस ऐशा हातिं"॥ १॥

"भोळा माझा सांब, लक्षुमी, उगीच निंदू नका।
आदि अंत ना अगम्य सुख तें अलभ्य ब्रह्मादिकां॥
सोळा सहस्त्रशत एक मुख्य तुम्हि अष्टजणी नायिका।
कार्यवादु तो कृष्ण कसा करि पूर्ण मनोरथ सखा॥
वक्रदंत शिशुपाळ कीटकां कपटें मारुन बका।
प्रताप बहु वर्णितां, कशा भाळलांत गोरक्षका॥
जरासंधरिपुभयें वसविली जळांत द्वारावती।
तस्करा कसा श्वशूर जडला हा भीमक भूपती॥
मच्छकूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती।
जन्म गेला पाहा अशाखालिं" म्हणे लक्ष्मीला पार्वती॥ २॥

"भुतें पिशाचें यक्ष ब्रह्मराक्षस हे ज्याचे दूत।
श्वानें सभोंति मिळवुन संगें फिरे भिक्षा मागत॥
भूं भूं वाजवि शंख मुखाने चिताभस्म लावि नित।
शूर्पकर्ण षण्मूख जयाचे नवलपरीचे सुत॥
मना गमे तिथ निद्रा करितो जिवंत पहातां भुत।
हिमालयाचें थोर असें प्रारब्ध पाहुन विस्मित॥
धन्य तुझी पार्वती अशाची राखितेस चित्तवृत्ति।
दैवदशा भर्तार तामसी कठीण गे तव गती"॥ ३॥

"अनंत घेतो जन्म तुझा पति क्षीरसागरामधीं।
शेषावर निद्रिस्त, नाभिवर चार मुखांचा विधी॥
वहन विहंगम दिलें सुदर्शन कळुन शंकरें अधीं।
सुरासुरीं तुजसाठिं मंथिला पराक्रमें जळनिधी॥
इच्छा करितो प्राणिमात्र तूं चंचळ नाहिंस सुधी।
शंख सहोदर तुझा लक्ष्मी श्रीमंत झालिस कधीं॥
कृपानिधी हा सांब वसे अर्धांगिं मी त्याची सती।
लिळा तयाची विचित्र भासे विदीत सर्वांप्रती" ॥ ४ ॥

"तपसामर्थ्येंकरुन शिवाला भस्मासुरें जिंकिलें।
हरुनि तुला पार्वती त्वरेनें स्कंधावरि वाहिलें॥
लपूं लागला सांब तेव्हा मम पतीस पाचारिलें।
मोहिनिरुप प्रत्यक्ष धरुन त्या राक्षसास जाळिलें॥
गजेंद्र करितां धांवा नक्रासह त्या उद्धारिलें।
सुधन्व्यास तैलामधिं तळितां तैल थंड जाहलें॥
अशी घालितो उडी संकटीं पहा माझा श्रीपती।
कोमलांग राजीवनेत्र; नव्हे शिवासारखा जती" ॥ ५ ॥

"नको सांगुं बडिवार रिकामा लक्ष्मि नानापरी॥
नंदाचीं गोधनें चारितो कुंजवनाभीतरीं।
मुखांत घालुनि वेणु वाजवुनि मोहित करि सुंदरी।
गोपव्रजांचें उच्छिष्ट खातो नव्हे निर्मळ श्रीहरी॥
श्यामवर्ण सर्वांग खोवितो मयूरपिच्छें शिरीं।
नवनितचोरें कसें दैत्याचें मर्दन केलें तरी॥
लग्न लाविलें बसुन रिसाशीं कुब्जा होती दुती।
किती एकेक गुण सांगुं ऐकतां दुःखित होशिल चित्तीं" ॥ ६ ॥

"अनंत कोट ब्रह्मांड निर्मिता जगांत जगवेगळा।
चार वेद सहा शास्त्रें धुंडितां कुंठित झाल्या कळा॥
निराकार निर्गूण सगुण मी पाहुन पडलें गळां।
जन्मोजन्मिं हा असो पती मज घनश्याम सांवळा॥
परमसुशिल निष्कलंक वनिं उद्धरिलि अयोध्या शिळा।
नामस्मरणें शीतळ झाला सांबदेह ग सगळा॥
मुकुटमणी वैकुंठपीठ ज्या अमर सदा वंदिती।
प्राप्त व्हावे हे चरण म्हणून किति समाधिस्थ बैसती" ॥ ७ ॥

"ताडपत्र शृंगार म्हणुन म्यां छळिलें नित शंकरा।
प्रसन्न झाला महेश मज समजावी घेउनि करा॥
शृंगाराचे पर्वत पडले अमोल एकेक हिरा।
कुबेराचि संपदा पुरेना अहा रे विश्वेश्वरा"॥
एकरूप शिवविष्णू लक्ष्मी गौरी एक स्मरा।
लय लावुन एकाग्र भजावें मृत्युंजय श्रीधरा॥
लक्ष्मी पार्वतीचा ऐसा संवाद गोड हा खरा।
भक्तिपुरःसर पुजुनि करावें प्रसन्न नित हरिहरां॥
महादेव गुणि सांब हरीच्या चरणांबुजिं लोळती।
प्रभाकराच्या कवना गुणिजन हेत धरुनि धांवती॥ ८ ॥

: १२३ : सगनभाऊ

दक्षणच्या पेशव्याशीं घाला (३६४)

दक्षणच्या पेशव्याशीं घाला कधिं नव्हता आला ॥
गंगाधर शास्त्र्यावरून राज्याचा नाश झाला ॥ ध्रु० ॥

गंगाधरशास्त्री मारले पंढरपुरांत ।
चोरबातमी गेली इंग्रजांच्या घरांत ॥
तेथुनि रचिला कलंकी ऐका आश्चर्याची मात ।
त्र्यंबकजी डेंगळे हवालीं करुन झाले शांत ॥
दोन दिशीं वाद मिटला ठेविले ठाण्यांत ।
पुढें व्हायाचें – पळून गेले सहाव्या महिन्यांत ॥
इंग्रजांच्या पहाऱ्यांतुन असा कोण गेला ॥ दक्षणच्या० ॥ १ ॥

कोट किल्ले दिले ओलिला त्रिंबकजीसाठीं ।
एक महिन्याचा वायदा मसलत केली उफराटी ॥
वसई सुभा दिला रे देवा! आड केली ताटी ।
कसातरी जिव वाचो, पडल्या दुष्टांच्या गांठी ॥
बाबासाहेब गेले पंढरिला विठ्ठलाच्या भेटीं ।
उजवें फूल द्यावें आम्हा माहुलिच्या कांठीं ॥
गोविंदराव काळ्यानें मनसुबा पहा कैसा केला ॥ दक्षणच्या० ॥२ ॥

बापु गोखले मुळींच, ऐका, बेटावर गेले ।
बेट जाळून निघूनशानें खडकीवर आले ॥
दोघांचे मोर्चे भिडले आकाश कडकडलें ।
बापु गोखले जाउनशानें तोफेवर पडले ॥
टोपीवाल्याची फरडी झाली, लढाईपान पडला ।
लहान थोर जन रणभूमीशीं युद्धास आला ।
दोन्ही सैन्यांचा बहुतसा चेंदा तो झाला ॥ दक्षणच्या० ॥ ३ ॥

दोन पलटणी येऊन पुण्यावर गारपिरीं भरल्या ।
युक्तियुक्तिने उडवुन लावितां खडकीवर ठरल्या ॥
आश्विन महिना एकादशी तलवारी झडल्या ।
तेराव्या दिवसाचा समाचार ऐकुन घ्या दाखला ॥
सत्राशें एकूणचाळीस ईश्वरीनाम संवत्सराला ॥ दक्षणच्या० ॥ ४ ॥

लाख फौजेचा जमाव झाला श्रीमंतांपाशीं।
रणभूमीवर येउन पडल्या तोफांच्या राशी॥
अल्पिष्टनसाहेब स्मिथसाहेब आले रागाशीं।
सिंधुराच्या टेकडीवर दिल्या तोफांच्या राशी।
अल्पिष्टनसाहेबाचा हुकुम तो करडा झाला॥ दक्षणच्या०॥ ५॥

करनलसाहेब होते पलटणींत।
आले धावून खडकीच्या मैदानांत॥
लढाई करून बहुत केली मात रंजुक झडत।
पाचेचा हिरा दडेना वाटोवाटी चंद्र गगनांत॥
बापु गोखल्या सकळ सुरवर स्तविती रणांत।
तीन लाख फौज पळुन गेली, बापु गोखला राहिला रणांत॥
युद्ध केलें त्याने युद्ध केलें बहुत॥
बाबासाहेब विश्वास देऊन माहुलीस गेला।
बापु गोखला लढतां सवा प्रहर दिवस आला॥ दक्षणच्या०॥ ६॥

दळणासरसे किडे रगडले रडती नरनारी।
लेंकराला माय विसरली कसा ईश्वर तारी॥
आधीं गेले ते पार पडले पुण्याच्या पारीं।
पुण्यावरती चढले झेंडे केली वारासारी॥
जो येतो तो लढतो हातामधिं भाला घेऊनी।
सगनभाऊ म्हणे ऐशी ईश्वराची करणी॥
बिबिछन म्हणे चंद्रसूर्याशीं कलंक लागला॥ दक्षणाच्या०॥ ७॥

मी पिवळि पाकळी, पिवळा प्राणसखा (३६५)

मी पिवळि पाकळी पिवळा प्राणसखा चाफ्याची कळी॥ ध्रु०॥

पिवळें तेज कसें पिवळी कांती, प्रियकर माझा पती॥
पिवळे डागिने छब विलायती, पिवळेंच कंकण हातीं॥
पिवळे सूर्य तुम्ही मी प्रभा कीं ती, रायाच्या संगतीं॥
पिवळी बनुन आलें स्वामिजवळी॥ १॥

उतरून माडीवरून बसत मोहोर, नेत्राच्या समोर ॥
उभयतांच्या मनीं हिरवें वस्त्र, हिरवेंच जंगल सारं ॥
बाग बघा या उठा हात खांद्यावर, नाही कोणाचा पदर ॥
तुम्हि तारक माझे राजेंद्रकुळीं ॥ २ ॥

मला पिवळें पातळ बारिक गवती, पदरावर शेवंती ॥
पिवळि कांचोळी जडलीं मोतीं, गोटकिनाऱ्याभंवतीं ॥
पिवळी पुतळी बनून फिरती, भौती रायाच्या संगतीं ॥
बसा असें वाटतें आज्ञा पाळी ॥ ३ ॥

स्वामि-पायाचें सूख भोगितें, आनंदवृत्तिनें राहतें ॥
सख्याच्या झोंकावर ठुमकत येतें, नोकीवरी चालतें ॥
शरिरामधिं माझ्या गोड वाटतें, रोमरोमिं खुषि होते ॥
सगनभाऊ म्हणे आज्ञा पाळी, जशि राधा गोकुळीं ॥ ४ ॥

दुर्योधन दुर्बुद्धि पुसे (३६६)

दुर्योधन दुर्बद्धि पुसे नित करुन भिमाची रळी
द्रौपदिचे मंदिरीं खरें सांग आज कुणाची पाळी ॥ ध्रु० ॥

अटोकाट एकोत्तरशें कौरव करून बसले सभा
सभेशिं येता भिम, दुर्योधन उठून राहे उभा
सन्मानें शेजारीं बसवून म्हणे माझ्या दुर्लभा
खरें सांग आज द्रौपदि आहे कुणाची वल्लभा
शब्दशस्त्र शत्रुचे लागती जशा अहीच्या जिभा
क्रोध आवरुन भिम ना बोले ना चाले मनसुभा
सूक्ष्म झालें शरीर असूनियां प्रताप अंगीं बळी
द्रौपदिचे मंदिरीं खरें सांग आज कुणाची पाळी ॥ १ ॥

निजदासाचा सखा हरी तो गुज भीमाला पुसे
सूक्ष्म झालें शरीर उतरला चंद्र तुझा कां दिसे
वृकोदर म्हणे तूं कैवारी असतां न्यूना नसे
कैंकाळा शिक्षा लावीन इतर काय माणसें
बस्त मस्त हे कौरव उतले एकएक मनिं येतसे
रक्तपान वाटतें करावें तुझिच आण वाहतसें
सभेशी येतां दुष्ट दुरात्मा हृदयिं बाण लावितसे
द्रौपदिसेजीं पाळि कुणाची नित दुर्योधन पुसे
असें वर्म सांगतां तप्त होउनि बोले वनमाळी
तुझे हातानें अवघे संहरिन करीन रणरांगोळी ॥ २ ॥

पतिव्रता सति भानुमति आहे दुर्योधनाचि राणी
प्रीत पतीची बसावी कुडें कपट धरी (ती) मनीं
दुर्वासापुन तेल भारिलें ठेवियलें निजभुवनीं
लाव मस्तकीं वश (तो) होईल हरूशली बहु मनीं
तेल लावितां महिवर पडतां अपाय होइल हानी
आम्हिं केलें तें न मोडि ब्रह्मा संकटिं पडशी झणीं
तेल लावितां भूवर पडलें गेलें पाताळभुवनीं
शेषाचे मस्तकीं लागतां भुलला तो तत्क्षणीं
नित्य ठेवुनी दुर्योधनाला बांधुन पलंगा स्थळीं
भानुमतीला भोगुन जातो दुष्ट मनीं तरमळी ॥ ३ ॥

असें वर्म सांगून श्रीहरीनें उगविलें सांकडें
आज कुणाची पाळि म्हणतां करि उत्तर रोकडें
आज शेषाचि पाळि म्हणतां लवण जळामधिं पडे
जसें अभाळीं गगनीं विरले गंधर्वाचे हुडे
शेष जातसे भानुमतिस हें श्रुत झालें चहुंकडे
पृथ्वी कशावर ठेवित होता सांगुन बोला पुढें
नामीं विठ्ठल परशराम म्हणे मुळ शास्त्राचे धडे
रामकृष्ण गुणी रामा गातो सर्वांचें गणित झडे
शिकुन सिकोरे गाति नाचती चुलीभाणोशिवळीं
शाहिरामधीं एक सरेना नाच्याची मंडळी ।। ४ ।।

टुमदार कुणाची छान (३६७)

टुमदार कुणाची छान नवति भरज्वान पुसा रे आलि कुठून
स्वरुपाचे तुटती तारे कडारेकड विजवा पडतिल तुटून ।। ध्रु० ।।

छबिदार सुरत फांकडी बुंद राखडी जडुन वर खडे
गुंफिली वेणि नागिणी लडा र गालांवर दोहींकडे
पान खाऊन ओठ करि लाल अंगावर शाल झळकती चुडे
गजगति चाले हळूहळू उरिं ग जोबन उमटले हुडे
नव अटकर बांधा लहान
हरपलों पाहुन भुकतहान
कर अर्पण पंचीप्राण
रणीं ग जाऊं कटून ।। १ ।।

वय बारा-तेरांत ऐन आलि भरांत भुइ ग ठेंगणी
दंडीं बाजुबंद बाहुट्या सर पहुच्या हिरे जडले कंगणीं
गगनांत चांदणी ठळक मारिशी झळक उभि ग अंगणीं
किती नटुन थटुन मारिशील छनाछन नैनांच्या संगिणी
झालों घावाविण घायाळ
झोंबला विखारी व्याळ
जणुं टाहो करि कोयाळ
तूं न कळे घालशी माळ
कोणाला गे उठून ।। २ ।।

तो दूरदेश बंगाल मुलुख कंगाल सलासैल आलों करुन
नाहिं धनदौलतिला कमी आणिले उंट मालाचे भरुन
चाहिल तें माग या घडि देइन बिनघडी ताजवा धरुन
तुझे भारोभार देईन सखे खैरात करीन तुजवरून
असा हेत मनामधिं धरुन
राहिलों रुपाला भुलून
चार महिने तुजसाठिं ठरुन
मजा (सखे) दे पटून ॥ ३ ॥

घरिं चला राजअंबिरा गूणगंभिरा पाहिलें कसून
वचनाचा करावा मान करिन सन्मान पलंगीं बसून
विठू परशरामाचा नक्षा चहुंकडे दक्ष पहा जा पुसून
गातो रामकृष्ण रामाचें तोड मूळ वस्तादापासून
नवशिके ठाउके बेसूर
चाल बदलुन गाती टौर
घरोघरीं वाजविती डौर
जशि अक्षतिजेची गौर
काय तिशीं रे झटुन ॥ ४ ॥

नाजुक रुपडें दिपडें ठिकडें (३६८)

नाजुक रुपडें दिपडें ठिकडें जिकडे तिकडे अस्कारा
कराडची का कोल्हापुरची देखण्यांत बाकी तारा ॥ ध्रु० ॥

शहर पुण्याच्या भररस्त्यामधिं भरनवतीचा तवर नवा
चुडा लकाकित जडाव अगदीं कोंदण केलें मधीं रवा
तंग चोळिवर रंग कुसुंबी गोरे गाल जसा नरम खवा
उर पदराने झांकुन ठाकुन किती चालशी नटुन जिवा
तेडेमकोडे समलेवाले भले लोक झाले गर्द चुरा
बिनघावाविण घायाळ घुमति एक एक नामि मोहरा
केले कदून ॥ १ ॥

जोबन गहिरे नैन तारे जशि वीज ग गगनीं कडाडी
उदी शाल आंत साज भरजरी तंग काचोळी तडाडी
उभे थव्यावर थवे तुजसाठिं नवें पांखरुं फुलवाडी

सारे शहरमधिं पुकार पडली उभे सुभे माडोमाडीं
मोठमोठे सावकार धनाढ्य कोट्यवधि पैका गहिरा
नजर कराया उभे फांकडे हातिं घेउन पुतळ्या मोहरा
घे आधीं रोकड ॥ २ ॥

काजुम खावे माजुम मेवे हातिं पुडे बर्फी ताजी
शनवारांतुन झुकत चालली केली हौद्यावर जिनबाजी
मोठमोठे सरदार धारकरि दिले मोकलुन भलते जी
जिकीर सोडुन फकीर झाले जो तो रुपाला नावाजी
आदितवार सोमवार पेठेंतुन थेट निघाली करुन त्वरा
जशी चमकली नंगी समशेर अलम पाहती भिराभिरा
तुझ्याकडे ग ॥ ३ ॥

अक्कलकोटचे थेट राहणार चार खुट फिरलों शाही
भिजलों रिझलों पाहुन रुपाला तुजसारखी दुसरी नाहीं
आम्ही शर्थी गर्ति निर्मळा साक्षभूत ईश्वरशाही
कर कृष्णेचें स्नान दान हा अंगिं दोष सहसा नाहीं
विठु परशराम म्हणे स्वभुवना स्वस्थ जाय तूं अपुल्या घरा
रामकृष्ण गुणि रामा गातो एकनिष्ठ एकनेमि खरा
खूप खंबीर ॥ ४ ॥

१२५ : धोंडी बापू

सुंदरा म्हणे दिलभरा (३६९)

सुंदरा म्हणे दिलभरा राजअंबिरा हंसुन मसिं बोला जी
छैला शिरीं परदेश कुठुन तुम्हि आलां जी ॥ ध्रु० ॥

तुम्हि दिसतां उमेदवार थोर सरदार फार सुकुमार शिपाईबाणा जी
नांव गांव सांगा कां हो ओळख द्या ना जी
शिरिं पगडि कंगणीदार अंगावर ज्वाहार कुठिल राहणार कोण परगणा जी
तुमचा वारु बहुरंगी चतुर शाहाणा जी
कर खडचा पटयाचा जीन कलगि संगीन हातामधें आणीन राजस बाणा जी
(अहो) तुमचें रूप जसें हुरमुजी दाणा जी
डोईस बांधिला चिरा झळकतो हिरा तुऱ्याशेजारीं
शिरपेच कंठिं चौकडा पदक तळवटा गळामाझारीं
माणिक मोत्याचे हार अंगावर ज्वाहार झळके भारी
मुद्रिका पवित्रें करीं सख्याचे शिरिं शोभे आब्दागिरी
पाहुनिया चांगुलपणा, आहो बाई जी जी
मला सूर्य दिसतो उणा, आहो बाई जी जी
शालजोडी गोऱ्यापणा, आहो बाई जी जी
दंडित या मनमोहना, आहो बाई जी जी
हातिं रुमाल बारिक झुणा, आहो बाई जी जी
तिरकमान हातांत भाला जी
छैला शिरीं परदेश कुठुन तुम्हि आलां जी ॥ १ ॥

सुंदरा उमज अंतरीं बारवेतिरीं सांगसिल गोष्टी ग
तूं नटबाजिंदी दिसतीस (सखे) मोठी ग
वचनें जपुनियां टाक आबरु राख जरा नाहिं धाक तुझीया पाठीं ग
या परनारीची संगत महा खोटी ग
तूं दिसतीस लई थोराचि नव्या बहराचि सावकाराचि गोरि गोमटी
नाजुक रुपडें पिंक दिसते तुझ्या कंठीं ग
केली सोळा शृंगार गळ्यामधें हार पाडूं पोल्हार दहाही बोटीं ग
हातांत झळकती जडावाची अंगठी ग
डोईस मूदराखडी हले हलकडी दिसे फाकडी जसि मोहनाराणी
गळ्यामधें मोहनमाळ आणिक जवमाळ करी झळाळ तेज सुढाळ चंद्रावाणी

मनगटच्या गोठ पाटल्या हातिं दाटल्या गुंफुनि गाठल्या कुंडलें कानीं
बाजुबंद दंडावर लहान उंबर बारिक कंबर दिसे सिंहावाणी
ल्यालीस पातळ भरजरी, आगे नारी, जी जी
जरतारि चोळि अंजिरी, आगे नारी जी जी
वर कंठा ग नवपदरी, आगे नारी जी जी
दोन्हि जोबन चढले उरीं, आगे नारी जी जी
तूं परायाचि आस्तुरी, आगे नारी जी जी
जशि रंभा ग इंद्रपुरीं, आगे नारी जी जी
परनार विषाचा प्याला जी
या कर्मानें कैकाचा नाश जाहला जी ॥ २ ॥

अहो मुशाफरा चातुरा मनीं खरखरा नको धरूं कांही
खुरबान प्राण मी करीन तुमच्या पायीं
एकलीच घरची राणी आलां सांडुनी काय म्हणुनी बरी गत नाहीं
मंदिरांत आठवित आसल दिशा दाही
तुम्हिं राजबीज दीसतां कुठें राहतां मला भासतां थोर शीपाई
काय दुःख जाहलें सख्या रे तुझ्या हृदईं
काय वखत पडला शिरिं आलां बाहेरि एकले तरि कां बनांत फिरतां
सोडुनियां आपला देश घेतला भेष पालटुन वेष असें कां करितां
कुणि तुम्हां घातलें भरी मुलखावरी कि गिरिकंदरिं कां जाउन बसतां
कोण्या गोष्टीचा राग सख्या मज सांग धरुनि वैताग मनामधें झुरतां
तुम्हि चला हो माझे घरीं, आहो राव जी जी
रहा वरल्या माडीवरी, आहो राव जी जी
बसुं आपण पलंगावरी, आहो राव जी जी
करुं मौजा नानापरी, आहो राव जी जी
मी आहें इमानी खरी, आहो राव जी जी
तुम्हि उठा चला रंगमहालीं जी
चार दिवस राहून पाहत आलां माला जी ॥ ३ ॥

तूं नार फार सुकुमार चतुर अनिवार आहेस शहाणी ग
गडे ऐक सांगतों आम्हि आपली कहाणी ग
आम्हि भगवंताचे लाल सदा खुशियाल घरीं धनमाल भरल्या खाणी ग
जातीचे गौड ब्राह्मण हिंदुस्थानी ग
आमचे आमच्या देशांत हकमहकमांत चहूं मुलखांत आहेत गडे वाणी ग
बादशाहि देणगी दिली भगवंतांनीं ग
सनया त्रिकाळ चौघडे वाजती पुढे वेळसंधानीं ग
नौबदी घडियाळ ऐकतों (सदा) कानीं ग

दैवानुसार साजणी आलों या वनीं तुला कामिनी काय सांगावें
घरिं भार्या ग सुलक्षण देश दक्षण आलों टाकून ऐकुनी घ्यावें
मुलखांतील राजे येति खंडण्या देति वस्त्रें ग घेति वंदिती भावें
मोठा भरतो दरबार थोर कारभार आम्हि सांगणार नाहीं नावें
पसरून सुंदरा पदर म्हणे तेव्हां जी
शक्तिनुसार घ्या आदर लोभ ठेवा जी
ठेवितें तुम्हापुढें मिठाई मेवा जी
ठेविन स्नेहाचा आदर करीन सेवा जी
कवि धोंडीबापू म्हणे पहा नारिनें मुशाफर नेला
म्हणे मोरू नारीचा भाग्य उदय जाला जी ।। ४ ।।

: १२६ : वीरक्षेत्री शाहीर

ठुमकत चालती गोड किति बोलती (३७०)

ठुमकत चालती गोड किति बोलती दिसति वणिज जातिची।
नार गुरजर प्रांतींची ॥ ध्रु० ॥

वय कोमळ, लाहानी।
रुप आहे सुंदर तनु जिचि नादर फार चतुर पाहणी ॥
किति समजू शाहाणी।
गजगति चालणें मंजुळ बोलणें प्रत्यक्षचि मोहनी ॥
रागिण मीठी सोहिनी।
निवडक अशि नार, पाहणारे होति गार, गगनिं जशी रोहिणी ॥
गौरवर्ण कांतिची।
ठुमकत चालती गोड किति बोलती दिसति वणिज जातिची ॥ १ ॥

नाकिं कांटा सूरती।
कानामधिं लोळि ये, कुंचुकिस मोळि ये, शोभा दिसे पूरती ॥
गळा हांसळि शोभती।
करिं चुडा वर्खी, बाजुबंद बेरखी, दंडाचे वरती ॥
पायिं पैंजण रूळती।
घंगुरु सभोवती, सांकळ्याचे वरती, पायिं छुम छुम वाजती ॥
मनीषा खरि साथिची।
ठुमकत चालती, गोड किति बोलती, दिसति वणिक जातिची ॥ २ ॥

भक्ति फार देवाची।
सद्‍भावाने, दर्शन घेणें, शंका नसे कोणाची ॥
आरति नरसींजींची।
गोवर्धननाथजी, आणि बलदेवजी, रणछोड-त्रीकमजीची ॥
गरदि फार मंगळाची।
शृंगार आरती, राजभोगपुरती, उत्थापन कुचितची ॥
नसे शुद्ध नवतिची।
ठुमकत चालती, गोड किति बोलती, दिसति वणिक जातिची ॥ ३ ॥

बोली मज उमजेना।
मागंमागं फिरतों, विनवुन बोलतों, तिजलाही समजेना ॥

थोडेंबहुत समजलीं मना।
वेळ तिन्हिसांजची, नित्यक्रमाची, केलि बिसनिला खुणा॥
द्रव्याची भावना।
बिसनी येउनि, वेळ पाहुनी, उरकितसे कामना॥
नार वीर-क्षेत्रिंची।
ठुमकत चालती, गोड किति बोलती, दिसति वणिक जातिची॥ ४॥

छेलबटाऊ-मोहनाराणी (३७१)

छेलबटाऊ-मोहनाराणी जगप्रसिद्ध असती।
कर्म तरि पाहतां गेलि सति परपुरुषासंगती॥ ध्रु०॥

राणी ती मूळची फार रूपाची नादर असे।
चतुर सुगर अति, चंचळ चपळा, शानशोखिं राहतसे।
अमदाबादनगरा जाहेर खबरा कीर्ति लोपली नसे।
गृहस्वामिसी ठेवि उदासी, अधर्म मनिं वसतसे॥
येके दिवशीं स्वामि गृहासी नसतां, योग अनायासें।
दिल्लि शहरचा, छेलबटाउ साचा, रुसून येतसे॥
पनघट पाहुनि, स्थीर होउनी, छायेमधिं बसतसे।
अकस्मात आलि, राणी पाणिया, बटाउ न्याहाळीतसे।
एकमेकासी, पाहुनी खुशी झालि, संकेत दाविती।
घरीं आणिला, छपउन ठेविला, लपवुन माडीवरती॥ १॥

नाना रितिने विलास तीनें सारि रात्र भोगिला।
पंछी तरि रुप अद्‌भुत जोडा मोहनेसि साजला॥
लुब्ध रूपासि एकमेकांसी प्रेम अंतरीं ठसला।
विषयसुखांत रतीरंगांत दिवस दारिं चढियेला॥
निजस्वामिचा वेश देउनी वाटेस तिने लाविला।
बनिं केतकिच्या मोहनापतिने बटाउ तो देखिला।
निज वेशाची वोळख पटतां 'चोर' ठार मारिला।
मात तुर्त प्रकटतांचि कळलें घरिं राणी मोहनेला।
तुर्त निघाली बनिं त्या आली, खेद मनीं वाहती।
मजकरितां हा देहासि मुकला विवेक मग निश्चिती॥ २॥

राहिन आतां तरि जगवार्ता गुप्त नाहिं राहिली।
जिण्यापरिस तें मरण बरें म्हुन काष्ठें तिनें मिळविलीं।।
चिता रचोनी प्रेत घेउनी सहगमना पावली।
तीच आज कीर्त जग-विख्यात वार्ता चालत आली।।
प्रधानभार्या असाच पर्या मात ऐकिव वर्णिली।
निशिसमयासी गोसाव्यासी मढिंत येउन बोलली।।
आरति घेउनी, वोवाळुनी निकटवर्ति बैसली।
हळू युक्तीने भावभक्तिने गोष्ट तिने छेडली।।
ऋतुदानासी आपल्यापासी आलें असें बोले ती।
म्हणे गोसावी सवाष्ण स्त्रीसी भोग वर्ज सांगती।। ३ ।।

तुर्त निघाली गृहिं ती आली येकांत स्थानावरी।
निदरेंत असतां पती मारि ती, झालि गळ्यामधिं सुरी।।
ठार मारुनी धावत येउनि निवेदन ती करी।
ऐकुन अतीता रोमांच उठतां दूर हो लंडी परी।।
विधवा नारिसी स्पर्शायासी योग्य नसों आम्हि तरी।
खिन्न जाहली परत आली रडत आपुले घरीं।।
पती मारुनी दीर्घस्वरांनीं रुदना चेत्तीं भरी।
सहगमनाची झालि तयारी आवडावती आवरी।।
गौंडालागीं सखे तूं भोगी गोष्ट असतां बरी।
न ऐकतां ती पतिचे संगती सति गेली बावरी।।
त्या तर गेल्या कीर्ति राहिल्या केलें कर्म वर्णिती।
वीरक्षेत्री ऐकिव वार्ता रचिलि पद्यगती।। ४ ।।

१२७ : बहेरू

नष्ट नारायणा दुष्ट कर्म केलें (३७२)

नष्ट नारायणा। दुष्ट कर्म केलें। सिंधूंत बुडविलें। जहाज माझें।।
वैर साधूनियां। पुत्र माझा नेला। ध्वज हा मोडीला। परलोकींचा।।
दुःख तें भोगावें। किती हे दिवस। कधीं हें आयुष्य। सरेल माझें।।
अहा रे अद्रुष्ट। कैसी घेसी धाव। घातकी हा देव। कळों आला।।
मागेंपुढें तुवां। न केला विचार। कैसी आणिली धाड। आम्हावरी।।
बहेरू म्हणे देव। चांडाळ घातकी। काय आलें हातीं। सांग तुझ्या।।

करितों प्रार्थना, येतों लोटांगणीं (३७३)

करितों प्रार्थना। येतों लोटांगणीं। परिसा संतजनीं। विनंती माझी।।
निंदा अथवा स्तुती। तयाची करावी। वाचे न बोलावी। आणिकाची।।
परिस स्वभाव। लोहा आळिंगणें। पिटितांही सोनें। करी त्याचें।।
आम्ही तों पतित। स्वामी तों पावन। तारावया दीना। ब्रीद बांधी।।
आता ते(चि) नीत। नाहीं याचे घरीं। मागेंपुढें न विचारी। करि भलतेंसें।।
बोलियेलों आम्ही। दुःखाच्या संतापें। संतजनीं कोप। न धरीयाचा।।
बहेरु म्हणे यानें। गांजियलें मज। नव्हतें कांही काज। बोलायाचें।।

:१२८: श्यामसुंदर

मन माझें रामपदीं जडलें (३७४)

मन माझें रामपदीं जडलें ।। ध्रु० ।।

माशी मधासिं लुब्धुनि राहे, या न्यायें गमलें ।।१।।
कमळिणीशीं भ्रमर जैसे, सुगंधा भुलले ।। २ ।।
श्यामसुंदर जिवलग म्हणे, रामपदीं मन रमलें ।। ३ ।।

१२९ : गुरुदास

नटवर नट नागर अतिसुंदर (३७५)

नटवर नट नागर, अतिसुंदर, अधरिं धरुनि वाजवि पावा।
तो माधव बहुतचि बरवा ॥ ध्रु० ॥

ठेउन देहुडा पाये, उगडा उभा गे माये, पाहे दुरून अवलोकून।
कसी केली वाकडी मान ॥
सांवळी सुरत बरि, कवळि साजरी, तनु ज्याची श्यामवर्ण।
दोन्ही डोळे आकर्ण ॥
सुंदर त्रिमली पोट, पोवळ्यासारखे होट, मंदस्मित हास्यवदन।
पाहतां निवती नयन ॥
किरीट कुंडल वनमाळा हो।
कटीं शोभत असे मेखळा हो।
भाळीं केशरिचा टीळा हो ॥
पायिंचीं भूषणें वाकि बाळि पैंजन, खणखण गज चाले जेव्हां
रुणझुण वाजति तेव्हां ॥ १ ॥

वाजवि सुंदर मंद मधुर मुरली सप्तस्वर स्वानंदें।
तों नादें अंबर कोंदे ॥
करितां गायन डोले आपण डोलि थै थै नाचे प्रभु स्वानंदें।
हरि घागुरियाचे छंदें ॥
हाव भाव दाव धरुनि ताल थकथक तोडितो गोविंदें।
डोले शिव ब्रह्मानंदें ॥
झाले मनिं लज्जित गंधर्व हो।
म्हणती गायन अपूर्व हो ॥
हरिला सर्वांचा गर्व हो ॥
नकळे तयाचे गुण कळा तो सकळ कुळींचा गुणठेवा।
हरि विश्वाचा विसावा ॥ २ ॥

मदनमोहन घनश्याम सुंदर हरि हातीं घेवोनी काठी।
उभा कालिंदीतटीं ॥
पांघरुनि घोंगडी काळि बरी साजरी धांवत असे धेनुपाठीं।
पळती गाई आव्हाटीं।

वळुनी गाई साऱ्या बऱ्या आपण मग सांगे गोपाळां गोष्टी।
बाप माझा जगजेठी ॥

न कळे कीं ज्याचा महिमा।
पार आगमा निगमा।
शिणला चतुर्मुख ब्रह्मा।
तो भुलला भक्तिप्रेमा ॥

गुरुदास म्हणे न कळे माव तुझि धाव पाव उद्धरिं देवा।
येउं द्यावी माझी कणवा ॥ ३ ॥

दिवस आज धन्य आनंदाचा (३७६)

दिवस आज धन्य आनंदाचा। देव पाहिला पंढरीचा॥ ध्रु० ॥

भक्तवर पुंडलीक ज्याचा। महिमा मोठा आषाढीचा॥
काला पूर्णिमेचा । मिळे कीं मेळा संतांचा॥
करुनी प्रदक्षिणा नाचा। बोलती रामकृष्ण वाचा॥
जेथें लाग नसे अरिचा। देव पाहिला पंढरीचा॥ १ ॥

निकट ज्या रुक्मिणिसह राई। भक्ता जाउं नको, राहीं॥
म्हणतसे विश्वाची आई। विटेवरि उभी विठाबाई॥
प्रेमरस जाइल कीं काई। म्हणोनी खळगावर पाई॥
खोवला तकट पदर जरिचा। देव पाहिला पंढरीचा॥ २ ॥

म्हणति बुध हरिचरणीं लागा। वारकऱ्यांत नीट वागा॥
ईप्सित विठ्ठलासि मागा। प्रभूच्या कीर्तनांत जागा॥
क्षितिवरी नसे असी जागा। जेथें वाहे चंद्रभागा॥
दर्शनें लाभ घडे हरिचा। देव पाहिला पंढरीचा॥ ३ ॥

प्रेमें नामाचा दंगा। करुनिया दुष्कर भवबंधा॥
लावुनि तुळसिबुका अंगा। भेटा सदय पांडुरंगा॥
वरा या राजाराम संगा। प्रासादिक सादर प्रसंगा॥
हेतु मग पुरला अंतरिंचा। देव पाहिला पंढरीचा॥ ४ ॥

:१३१: कृष्णदास जयराज

अजि अजी अहीवर शयन (३७७)

अजि अजी अहीवर शयन, मधुर त्याचें गायन, पडेना चैन
जिवाला जैशी।
कुठें पाहुं साजणे कृष्ण, माझा हृषिकेशी।। ध्रु०।।

गेला पळत मुलासंगें मला नाहिं वळत
बाळ जगजेठी।
त्यांनी वनांत खेळ मांडिला भानुचे तटीं।।
चेंडूफळी खेळत वनमाळी संगतीं हाळी
युगल मोठें हाटी।
दो ठायिं गडी वाटले मुलें धाकुटीं।।
चेंडू हातीं घेऊनी श्रीपति, विरुद्ध गडि पाहती
कृष्ण हा कपटी।
कंदूक झोकला त्याने अडकला फाटिं।।
अहो फाटिं चेंडू अडकला।।
गोपांनीं कृष्ण वेढिला।।
डाव कधिं ना सोडुं तुजला।।
मग हरी विचारि अंतरीं कीं निर्वेश्चरी
करावें यमुनेसी।
कालियाचा गर्व हरूनि दावि भक्तांसी।। १।।

मग गडी करित ओढाओढी चेंडू आणे घडी
बोले बळिभद्र।
आतां कशास पाहतां स्वामी मागें-म्होरं।।
मग धटी कसुनिया कटी देव जगजेठी
गेले कळंबावर।
टकमकां पाहुं लागले गवळ्याचे पोर।।
वर उभा कर्दळिचा गाभा प्रकाश गेला नभा
मूर्ति गुलजार।
त्याचा ब्रह्मादिकांसी न कळे अंत ना पार।।
आहो पार हालवि डाहाळी।।
चेंडू पडला गेला पाताळीं।।

काळियाने घेउन करकमळीं ॥
मग झोकून उडी दिली फेकून गोप गेले सुकून
भ्याले मनाशीं।
आतां काय जाउन सांगावें याच्या आईबापाशीं ॥ २ ॥

मधुसुदन सुखाचें सदन बुडालें रतन
यमुनाजळीं।
अवघ्यांनी केला कोल्हाळ शंखनादाळीं ॥
सांगु चला याच्या आईबापां कृष्ण बुडाला
गेला पाताळीं।
अशि वार्ता जाऊन सांगितली नंदाजवळी ॥
नारिनर मिळुनि अपार वर्षला कहर
नंदराउळीं।
येश्वदा लोळे गडबडा मनीं तळमळी ॥
तळमळी कृष्ण मज दावा ॥
कुठें पाहू प्राणविसावा ॥
कुणितरी आणुन भेटवा ॥
असि रडत वाटेनें पडत मनीं चरफडत
गेली यमुनेसी।
कुठें तरी कृष्ण बुडाला पुसे गोपांसी ॥ ३ ॥

मुलें भिउन दाविती दुरुन इथंच बुडून
गेला विश्वंभर।
नंदानें केला आकांत बुडालें घर ॥
मग गोपि यमुनेवर कोपि चला ग अपी
अणु शारंगधर।
येश्वदा यमभगिनीला पसरती पदर ॥
दे ग बाळ नको मोडुं खेळ होय कृपाळ
सखे मजवर।
कवि तिच्या सुताला करितो नमस्कार ॥
पुत्राचें मज देइं दान ॥
घे पुण्य पदरीं बांधून ॥
दीपकाविण मंदिर शून्य ॥
हरिवीण गमत नाहीं क्षण काय वांचून
व्यर्थ जन्मासी
हिंसकाची भगिनी दया नाहीं तुज कैसी ॥ ४ ॥

कालियाच्या जाउन अंगणीं देव चक्रपाणि
उभा राहिला।
टकमका पाहती नागिणी ब्रह्मरूपाला।।
जा येथुन जिवाला फार जपुन चेंडू गेला गुंतुन
काळ कशाला।
तो जागृत होतां सगळाचि ग्रासिल तुजला।।
श्रीरंग मूर्ति अभंग होऊन निःसंग
चरण आपटिला।
थरथरा कांपली धरणी, जागा जाहला।।
अहो जाहला काळ विखार।।
गरगरा भवंडी नेत्र।।
करकरा चावी अधर।।
झालि झड चावि कडकड अंगासी वेढे
आवळि देवासी।
त्याने विश्वरूप धरियलें अनंतावेषी।। ५।।

शरिरास लागली कळ करित चुळबुळ उकलला पीळ
झाला हिंपुटी।
गरगरा भवंडून धरून दिला शेपुटीं।।
मुरलीची लाविली ध्वनी डोलवी फणी वैरभाव मनीं
विसरला कपटी।
लखदिशीं उडाला कृष्ण वगळला पुष्टि।।
नागिनी आल्या धाऊनि कर जोडूनी
पसरती ओटी।
द्या चुडेदान आम्हास देव जगजेठी।।
जगजेठि जाहले कृपाळ।।
आला शरण कालिया व्याळ।।
शिरीं हस्त ठेवि कृपाळ।।
नेतो वर नाकामध्ये दोर घालुन सत्वर
हाकित कालियासी।
चेंडू आणून देति पद्मिनी भगवंतापासी।। ६।।

उरगावर देव बैसला जळावर आला भरतं यमुनेला
अपरंपार।
गवळ्यांनीं पाहिला सर्प पळाले दूर।।
गोड याला कृष्ण लागला म्हणुन वर आला
खायाला पोर।

अवघ्याचा मनोरथ जाणे परमेश्वर ।।
भिऊं नका आलों मी सखा, सकळ गोपिका
पाहती न्हार ।
फिरा गड्यांनो आपुला डाव घ्या रे लवकर ।।
आला द्वारकेचा राणा ।।
यशोदा लाविती स्तना ।।
दरदरून फुटला पान्हा ।।
जाहला हरिख आले यदुनाइक जिवाला सुखदायक
भेट सकळांसी ।
जयराज म्हणे भगवंत तारि आम्हांसि ।।७ ।।

बाजिराव महाराज अर्जि ऐकतो (३७८)

बाजिराव महाराज अर्जि ऐकतो बायकांची ।। ध्रु० ।।

चल, गडे, जाऊं पुण्याशि हौस मोठि माझ्या मनची ।
या चैत्रमासीं आनंद करा हळदिकुंकु गौरीचं ।
नार गेलि ग वाड्यांत इने भेट घेतली खाशाची ।।
या नारिने जाउन कसा लाविला लाग ।
पति अमुचे घरिं बसले कांहीं रोजगार सांग ।
हा सर्वस्वीं देह केला अर्पण करुनि आण तुमची ।
बाजिराव महाराज अर्जि ऐकतो बायकांची ।। १ ।।

अर्जि करुनियां पतिची चाकरी केली हुजुरीची ।
दिलि एक अबदागीरी घोडि बसाया बरोबरिची ।।
भरजरि दिला पोषाख दिली शालजोडि कलाबतुची ।
कधिं नित्य जाई पालखी बसून
कधिं नित्य येई जरतार पितांबर नेसुन ।
दिले हातिं हातसर दोन दोर गुलजार
कानिंचं कर्णफुल पाचुचं हिरवंचार ।
नाकीयाची नथ जोडी उंच मोलाची ।
बाजिराव महाराज अर्जि ऐकतो बायकांची ।। २ ।।

श्रावणमासीं दाटि पुण्यामधें नागपंचमीची ।
शुक्रवारपेठेंत बसुनि हाजिरी घेतो बायकांची ।।
जशी जिची योग्यता पाहुनी पैठवण करि तिची ।

काळिसांवळी गोरीचा तोरा फार
उभे रस्त्याने चालले पहा जोडव्याचे ठणकार।
नारिच्या बळावर साधुनियां दरबार
कोटयान कोटी द्रव्य मिळविलें हें फार।
कृष्णदास म्हणे ऐशा स्त्रिया घरोघरीं असती
बाजिराव महाराज अर्जि ऐकतो बायकांची॥ ३ ॥

आरती भुवनसुंदराची (३७९)

आरती भुवनसुंदराची। इंदिरावरा मुकुंदाची॥ ध्रु० ॥

पद्मसम पादयुग्म रंगा। ओंवाळणी होती भृंगा॥
नखमणि स्रवताहे गंगा। जे कां त्रिविध तापभंगा॥
वर्तुल गुल्फ भ्राजमाने॥
किंकिणिी कुणित, नाद घणघणित, वांकिवर झुणित
नूपुरें झनन मंजिराची। झननन ध्वनी मंजिराची॥ १॥

पीतपट हाटक तप्तवर्णी। कांची नितंब सुस्थानीं॥
नाभिची अगाध हो करणी। विश्वजनकाची जे जननी॥
त्रिवलीललित उदरशोभा॥
कंबुगळां माळ विलंबित, झळाळ कौस्तुभ,
सरळ बाहु श्रीवत्स तरलमणि मरळ कंकणाची॥
प्रीति बहु जडित कंकणाची॥ २॥

इंदुसम आस्य कुंदरदना। अधरारुणार्क बिंबवदना।
पाहतां भ्रांति पडे मदना। सजलमेघाब्धि दैत्यदमना।
झळकत मकरकुंडलाभा॥
कुटिल कुंतलीं, मयुरपत्रावलि, यांनी वेष्टिलें,
तिलक भालिं केशरी झळाळित कृष्ण कस्तुरीची॥
अक्षता काळि कस्तुरीची॥ ३॥

कल्पद्रुमातळीं मूर्ती। सौदामिनी कोटि दीप्ती॥
गोपीगोपवलय भंवतीं। त्रिविष्टप पुष्पवृष्टि करिती॥
मंजुळ मधुर मुरलिनादें॥
चकित गंधर्व, चकित अप्सरा, सुरगिरिवरा,
धरा कर्पूर रतीनें प्रेमयुक्त साची॥
आरती ओवाळित साची॥ ४॥

वृंदावनींचे विहरणी। सखे गे कृष्ण-मायबहिणी॥
श्रमलों भवाब्धिचे फिरणीं। अतां मज ठाव देइं चरणीं॥
अहा हे पूर्ण पुण्यश्लोका॥
नमितों चरण शरण मी, करुणा येउं दे विषाणपाणि,

कृष्ण नेणतें बाळ आपलें राखिं लाज याची॥
दयानिधे राखिं लाज याची॥ ५॥

सुंदर सुस्वर मंजुळ मंजुळ (३८०)

सुंदर सुस्वर मंजुळ मंजुळ हरि वाजवि मुरली॥ ध्रु० ॥

माता जननी दहिदुधलोणी घेऊनियां करीं।
'मुरलीधर, दामोदर, श्रीधर', हरिसी पाचारी॥
न दिसे नंदन मुकुंद, पाहों आली बाहेरी।
यमुनेचें नीर वाहे स्थिरस्थिर हरि धेनू चारी॥
गया, गोमती, खती पिवळी।
गंगी भागी वाराणसी आगळी।
प्रवर, प्रयागा, कृष्णा पोवळी।
लांडी, पुंडी, मोरी, सांवळी॥
मधें वनमाळी चारितो धेनु हरि रे नदि यमुना भरली॥ १॥

यमुनेतीरीं तो श्रीहरि सर्व घेउन पेंधा।
बइज, वांकुडा, कुबडा, बानु, केशव आणि माधा॥
उद्धव, अक्रूर, गडी सुदामा सर्वहि गुण साधा।
लावण्याची लहरी बरवी आलि सुंदर राधा॥
सुंदर नादर राधा वदती।
दुधभात घेउनियां हातीं।
गोपाळांच्या बसल्या पंगती।
एकामेकां मुखीं ग्रास घालिती।
हरि-हर-ब्रह्मा दुर्लभ ऐसी, हरि रे, महायात्रा भरली॥ २॥

परमेश्वर परब्रह्म परात्पर खेळे यमुनेतटीं।
सहित लंगडे उभा देव्हडा मध्यें जगजेठी॥
सुरवर मुनिजन ईश्वर लीला पहावयासाठी।
गण-गंधर्व बसून विमानीं येती तळवटीं॥
गोपाळ म्हणति चक्रपाणि।
तृप्त जहालों सर्व भोजनीं।
तृषा लागली ऐसें म्हणोनी।
कर पात्राविण उपाय पाणी।
आज कालिंदि आहा वर्ज गड्या रे तिथें विवशी शिरली॥ ३॥

भक्त हरीचे गोपाळगण वचनाभय स्मरती।
वाजत होतें पाणी जेथें हुंबल तैं करती।
विवशीचें भय हरिनें दाविलें म्हणून पाहुं पुरती।
कंठीं उरला प्राण तरी ते मागें ना सरती।
जयजयजयजय मुरलिमोहना।
मुरलि वाजवुनि स्थिर केली यमुना।
जयजयजयजय गोपीरमणा।
अगाध करणी भक्तरक्षणा॥
कवि कृष्ण करि प्रार्थना हरि रे कास तुझी धरली॥ ४॥

: १३३ : गोविंद महानुभाव

सुरगणईशा मानववेशा (३८१)

सुरगणईशा मानववेशा मुनिजन श्रेयकारका।
क्षिप्त भवीं जडजंतव हेतु शांभव नटधारका ॥ ध्रु० ॥

सुरावंद्य चित्पति सुरेश्वर प्रकटित द्विज केतनीं।
तृप्तकाम तनु श्याम स्विकारी रुचिकास्थळ पट्टनी ॥
आरक्तवर्णी पदतळ कोमळ शुभदायक लक्षणी।
ध्वजरेषा पद्मांकुशभूषित शरणागत रक्षणी ॥
पदशाखा अति कोमळा, कोमळा।
नखदीप्ति परम उज्ज्वळा, उज्ज्वळा।
घोटीव टंक वर्तुळा, वर्तुळा।
उंच धुरा स्मरा निश्चळा, निश्चळा ॥
त्रिकोण गुल्पी गर्जत वांकी विलसत प्रभुनायका।
भरिव सरळ पोटऱ्या लक्षणी गुडघे गूढ आइका ॥ १ ॥

इंद्रनीळ सोलीव कर्दळी जानु सघन वोहरता।
गजमस्तक तुच्छती नितंबा उपमा नये साम्यता।
हतगर्वी मृगराज लाजला कमनिय कटि देखतां।
सपूरांबर वेष्टित रमावर रुपसुंदर शोभिता ॥
सौंदर्यदोंद गुणनिधी, गुणनिधी।
कीं पूर्ण वय न अंबुधी, अंबुधी।
त्रिवळीसीमा अवधि, अवधि।
निर्मळा निकट संनिधि, संनिधि।
सखोल नाभि आवर्त त्यावरी कूर्चावळि श्रेणिका।
हृदयगंभीरा तुल्य उपमा न दिसे मम अर्भका ॥ २ ॥

अवलंबित दोर्दंड लक्षणी हेम लज्जित हिंपुटी।
उभयराग निजसत्त्व काढुनी ओळगति करसंपुटीं ॥
करशाखा सकुमार सुरंगित नखें वर्तुळ तेजटीं।
कनकसांखळा कंठिभूषणें चारुखाड हनुवटी ॥
ऐश्वर्य भिसुर दावीत, दावीत।
द्वय अधर विद्रुमांकित, मांकित।

श्रीमुखीं विटक रंगित, रंगित।
पेपळा चपळ भासत, भासत।।
हास्यवदन द्विजतेज प्रकाशित सिकलावित मुक्तिका।
बावन तिळक उटी परिमळीं तृप्त करित नासिका।। ३ ।।

सुरेख नासिक वंश आकृति नयनीं मृग लज्जित।
लक्ष कृपाशर भ्रुकुटिधनुष्य प्रेरुनि भवविंधित।।
लंबश्रवण तेजोमय भाळीं रत्नतिलक मंडित।
पुष्टप्रांत समदीर्घ मुकुटीं श्याम कुरळ लंबित।।
वीरगुंठी भांग रेखिला, रेखिला।
परिमळीं सकळ भरियला, भरियला।
वर दिव्य फुटा शोभला, शोभला।
आसनीं प्रभु पूजिला, पूजिला।।
क्षुद्रमति वाक्पुष्प अर्चना स्वीकरि सुरतिलका।
त्राहित्राहि गोविंद बाळका अघमज्जित क्षुल्लका।। ४ ।।

:१३४: वाकुवर्धन

जळक्रीडा खेळे श्रीहरि (३८२)

जळक्रीडा खेळे श्रीहरि।
जुनाट नौका चरित्र ऐका त्या यमुनेभीतरीं॥ ध्रु०॥

हरि खेळत होता अंगणांत।
आल्या गोपिका कडे घेतला नेला अकस्मात॥
होती जुनाट नौका जेथ।
तिर यमुनेचा, दोर सोडिला जाउन बसले आंत॥
मध्यभागिं हरि शोभत।
जसा पुनवेचा चंद्र चांदण्या भोंवताल्या राजत॥
 दिला झोक नांव चालली।
 पहिल्या तिरास एकदा गेली।
 मध्यभागिं परतून आली॥
येश्वदेचा कृष्ण नाटकी विचित्र करणी करी।
 जळक्रीडा खेळे श्रीहरि॥ १॥

केला अस्तमान सूर्याला।
सुदर्शन मग आड दिधलें अंधकार पडियेला॥
शिळाधारि मेघ वर्षला।
कडकडकडकड वीज कडाडी पूर यमुनेसि आला॥
वायुनें डाव साधिला।
झाली गर्दी एकच लाटा थडकति नौकेला॥
 चंचळा चपळ सुंदरी।
 एकमेकांसी हांका मारी।
 वाचवा बाळ मुरारी॥
तळीं नौकेसी छिद्र पाडिलें जळ आलें भीतरीं।
 जळक्रीडा खेळे श्रीहरि॥ २॥

लघु चक्रवर्ति सुकुमार।
युक्ति सांगे सखयांसि कंचुक्या फेडुनि काढा चीर॥
एक म्हणति, गड्यांनों खरं।
नग्न झाल्या सुंदरी गोपी (कर ?) घेती हृदयावर॥

छिद्रासि लाविती चीर।
कांही केल्याने पाणि ऐकेना चढलें गुडघ्यावर॥
        कोण गत करावी कसी।
        जर कळेल यशोदेसी।
        तरि त्यजील ती प्राणांसी॥
बरं आसा द्या कृष्ण वाचवा उचलुन घ्या कडेवरी।
                                        जळक्रीडा खेळे श्रीहरि॥ ३॥

पाणि चढलें नाभिस्थाना।
खांद्यावरती कृष्ण घेउनी करिताती रुदना॥
कोण कसा देव पावेना।
कितिक देवता-देव प्रार्थिले तरि कांही होईना॥
रूप दावी चंचळ कान्हा।
हात जोडुनी प्रणम्य करिती अवघ्या गोपांगना॥
        पाणी उतरलें खरखर।
        वायु पर्जन्य केला दूर।
        वाकुवर्धन जोडी कर॥
सूर्य मोकळा केला, प्रकाश पडला अवघ्यांवरी।
                                        जळक्रीडा खेळे श्रीहरि॥ ४॥

:१३५: मुरारी

भुलविल्या सानुराग (३८३)

भुलविल्या सानुराग, म्हणती जावुं याच्या संगं।
वेध लाविला श्रीरंग॥ ध्रु० ॥

द्वापरचे चवथे चरणीं अवतरले चक्रपाणि।
क्रीडा केली गोवर्धनीं, गोपीसंगं॥ १ ॥

कौंसासुर मारी कैसा, विश्वासुर म्हणवी भाचा।
परि तो नेलासे कैलासा, मोक्षमार्ग॥ २ ॥

शत सोळाशें सहस्त्र संख्या, अष्ट नारी पट्ट मुख्या।
गौळणींसी नाही संख्या, नाना रंग॥ ३ ॥

उद्धवाचा प्रेमदाता अर्जुनासी सांगे गीता।
कौरवांसी निर्दाळितां, मोक्षमार्ग॥ ४ ॥

पूर्वजाचा वाईं देश, मुनि मयंकाचा शिष्य।
विनवी मुरारी डोळस, प्रेम लाग॥ ५ ॥

१३६ : आबाकुमार

भंवर मंचकीं सेज (३८४)

भंवर मंचकीं सेज फुलांची केली तुज सुंदरा॥
निज बा निज माझ्या चक्रधरा म्हालनीं निजकुमरा॥ ध्रु० ॥

भक्त ज्ञाना ये अवसरा मिन्नले, विनवित तुज गुर्जरा॥
परवराचें करुनि निरूपण श्रम आला तुज खरा॥
अहोरात्र तुज सकल जिवांची चिंता परमेश्वरा॥
तनमनधन कर्पूर लावुनी आरति करिति सुंदरा॥
आबाकुमार म्हणे कृपा करोनी प्रेम द्यावें किंकरा॥

: १३७ : मीनाक्षी अम्मा

कोणें गांजियलें सांग (३८५)

कोणें गांजियलें सांग कुवलयदलश्यामा ॥ ध्रु० ॥

मुक्ताहार एकावळि पडिला कां गुंता
वैजयंति विखुरलि कां सांग रमानाथा ॥

म्लान दिसे वदनचंद्र नेत्र दिसति लाल
कज्जलजल गळुनि मलिन दिसति तव कपोल ॥

कोण गडी उणं उत्तर बोलियले तुजला
शिक्षिन मी त्यांलागुनि सांग रमालीला ॥

पुत्र तुझा नव्हे म्हणवुनि गडि बोलति मजला
ऐकतांचि वचन असें जल स्त्रवलें डोळां ॥

धांवुनि हरि मिठि घाली जननीचे कंठीं
स्फुंदत अति जननीप्रति सांगत गुजगोष्टी ॥

सांतवोनि श्रीहरिसी अमित सुखवि जननी
गडि सकळहि अनृत तुज वदति चक्रपाणी ॥

सुंदर तूं श्रीमंत म्हणुनि गडि करितिल हेवा
जननि तुझी मीच सत्य जाण वासुदेवा ॥

नगा म्हणे आम्ही जातीचे नापिक (३८६)

नगा म्हणे आम्ही जातीचे नापिक।
शेत केलें देख, पिकावया ॥

भक्ती-वखरानें वाहियलें रान।
द्वैताचें अरण्य, तोडियेलें ॥

अंबर अवकाश वर्षियली बादल।
सत्रावीचें जल, वलविलें ॥

त्रिकुण-तिफण गोल्हाट पोथाळे।
परात्पर जोडे कर्णनळ्या ॥

वाचिया दोरानें बांधियले चाडे।
सोहं तें रोकडें, बीज पेरूं ॥

शेत लवलाह्या आलें हो पिकासी।
दाणा कणसासी, ब्रह्मवंड ॥

सद्‌गुरुकृपेनें केलें हो चुरण।
आनंदउन्मन, रास केली ॥

नगा म्हणे आम्हां अन्ना काय उणें
फेडियलें दैन्य सद्‌गुरूनें ॥

:१३९: नगनाथ

माझें मागणें, मागणें नसे कांहीं (३८७)

माझें मागणें, मागणें नसे कांहीं। निरंतर मम हृदयीं राहीं ॥ ध्रु० ॥

गुंतलों मायीं, मायीं भवपाशीं। जीव दुःखित बहु परदेशी ॥
कोण गत करूं, करूं गा हृषीकेशी। कठोरता नको धरूं मजशी ॥
अंतरीं दया, दया येऊं द्यावी। निरंतर मम हृदयीं राहीं ॥ १ ॥

भरंवसा तुझिया, तुझिया नामाचा। अशी गर्जली वेदवाचा ॥
शीण दूर केला, केला संतांचा। पाढेवार झाला पंताचा ॥
ब्रीदावळि साजे, साजे ऐसि पाहीं। निरंतर मम हृदयीं राहीं ॥ २ ॥

कृपासागरा, सागरा श्री अनंता। कशी तोडिलि माझी ममता ॥
काय हें झालें, झालें मम संचिता। सांग श्रीहरी रमाकांता ॥
येई बा त्वरें, त्वरें शेषशायी। निरंतर मम हृदयीं राहीं ॥ ३ ॥

नगनाथ म्हणे, म्हणे बा गोपिरमणा। शरण मी आलों जगज्जीवना ॥
भक्तवत्सला, वत्सला दीनोद्धरणा। मुरहरसुत विनवी चरणा ॥
पदीं आपुल्या, आपुल्या ठाव देईं। निरंतर मम हृदयीं राहीं ॥ ४ ॥

हरि हा आनंदाचा कंद (३८८)

हरि हा आनंदाचा कंद। आनंदाचा कंद।
उभा पुढें भक्तसखा गोविंद। हरि हा० ॥ ध्रु० ॥

सजलनीरदश्याम तनू, नवरत्नखचित-सौवर्ण मुकुट,
शिरपेंच तुरा वरि कलगि विराजित कुटिलालक
निटिलासि कस्तुरीतिलक केशरी गंध॥ हरि हा० ॥ १ ॥

श्रवणिं मनोहर मकरकुंडलें फुल्लगल्ल कर्णान्त दीर्घसु-
प्रसन्न लोचन इंदुवदन तिलपुष्पनासिका कुंदरदन-
हनु, अधरबिंबगत हास्य मंदमंद॥ हरि हा० ॥ २ ॥

कंबुकंठ कौस्तुभाभरण शुभपटरिपंकनवद्रवरूषित
पीवरांस केयूरविभूषित कनककटकसहरत्नतोडर-
प्रभानुभाषित शंखसुदर्शनगदासरोरुहलसच्चतुर्भुज
ललितांगुलिधृतरत्नमुद्रिकावृंद॥ हरि हा० ॥ ३ ॥

विशाल वक्षस्थलीं रमाकुचकुंभकुंकुमालेपलिप्तश्री-
वत्सलांछित सुवर्णयज्ञोपवीतमध्यवलित्रयबंधुर-
निम्ननाभितनुरोमराजिलुटदुत्तरीयपट पारिजातनव-
कुसुमतुलसिकामिश्रहार पादांघ्रिचुंबि नभ भरुनि
जयाचा मधुर सूटला गंध॥ हरि हा० ॥ ४ ॥

कटींतटीं जरिकांठि पीत कौशेयवास पटवाससु-
वासित विचित्रशृंखल-अगणित मणि झणिझणित
मंजुलकृणित किंकिणी विपुल तरोरुद्वंद्व विराजित
जानुजंघ सुकुमार सरलतर कनकलवययुत
रत्नतोडरें मंजुमंजुसिंजान हरिमंजीर परिष्कृत
सहजरक्त मृदु वज्रअंकुशध्वजांबुजांकित
वृत्तवृत्त उत्तुंग रक्तनखचक्रवाल सत्पुण्यचंद्रिका-
ध्वस्त महद्‌हृदयांधतमस मंदाकिनीऽ माहेरचरण युग-
धृत रणरणिक जयाच्या क्षणिक ध्यानें तुटती
झटिति सर्व भवबंध॥ हरि हा० ॥ ५ ॥

कोटिकोटि कंदर्परूप-लावण्यदर्पहर ध्यान-मनोहर
अनंत जन्ममनोमलपटलीनिर्मूलनकर भक्तिगम्यतापत्रय-
भंजन आसेचनक ध्यानिं पहातां वाटे जणुं नयनांत
भरावें हुंगावें दृढ आलिंगावें कीं चुंबावें विसरतसे
संसार सर्वही संतत याचा पंत विठ्ठला
सहज लागला छंद॥ हरि हा०॥ ६॥

अर्जुन होउनि संन्यासी, झाला द्वारावतिवासी (३८९)

अर्जुन होउनि संन्यासी, झाला द्वारावतिवासी॥ ध्रु०॥

बरवा परिकर लंगोटी, गुलाबी कडकडीत छाटी।
प्रणतोच्चारस्थिति ओठीं, स्मरणी चालतसे बोटीं।
अंगीं विभूतिची उटी, कपटी वेषकांति मोठी।
पाहुनि भुलले जन त्यासी। झाला द्वारावतिवासी॥ १॥

लोटली द्वारावति सारी, झाली खेट मढद्वारीं।
पुजाया नाना उपचारीं, वेळा साधितताति चारी।
दुर्लभ यतिदर्शन भारी, ढोंग माजविता कंसारी।
पडल्या भेटींच्या राशी। झाला द्वारावतिवासी॥ २॥

वरिवरि ज्ञानयोगमुद्रा, गडबडतसे मनिं सुभद्रा।
भरतें येत स्मरसमुद्रा, रात्रंदिवस न ये निद्रा।
हें एक ठावें यादवेंद्रा, उपजवी भक्ती बलिभद्रा।
कुतूहल पंत विठ्ठलासी। झाला द्वारावतिवासी॥ ३॥

लागला तोबा (३९०)

लागला तोबा, तोबा मज बाई!। हरिहर-विठ्ठल रखुमाई॥ ध्रु० ॥

यात्रा भरली, भरली आषाढीची। स्वारी आली श्रीमंतांची॥
दाटी झाली, झालि दुदाराची। तोबे उडति ठायिं ठायिं॥ १ ॥

दर्शन होय ना, होय ना देवाचें। देवळाभोंवता मी नाचें॥
पाय पाहिले, पाहिले रुक्मिणिचे। वदनीं नाम विठ्ठलाचें॥ २ ॥

माधव आत्मा, आत्मा सकळांचा। श्रुति गर्जती वेदवाचा॥
करुणासिंधु, सिंधु भक्तांचा। हेत पुरवी जड जीवांचा॥ ३ ॥

रामकृष्ण नरहरी! विठोबा रामकृष्ण नरहरी (३९१)

रामकृष्ण नरहरी! विठोबा, रामकृष्ण नरहरी।
कधिं रे, कधिं रे, कधिं रे, डोळां दाखविसिल पंढरी॥ ध्रु० ॥

प्रपंच पसरे कसा, विठोबा, प्रपंच पसरे कसा।
वनीं वाघुरें पसरि पारधी पिसे चिलकडे तसा॥
म्हणती कोणि न बसा, विठोबा, म्हणती कोणि न बसा।
कुटुंबपरिवाराचे साठीं कुजनीं पसरी पसा॥
वाहलों मी भवपुरीं, विठोबा, वाहलों मी भवपुरीं॥ १ ॥

भवाब्धि बुडवी मला, विठोबा, भवाब्धि बुडवी मला
तुजवाचुनियां तारक न दिसे, धांव, लौकरी चला॥
काळमगर पातला, विठोबा, काळमगर पातला।
उडि घालुनि ओढितसे मजला, बहुतचि दिसतो भला॥
पडुनि राहिलों घरीं, विठोबा, पडुनि राहिलों घरीं॥ २ ॥

माधव आत्मा खरा, विठोबा, माधव आत्मा खरा।
मी तों पतित पातकी आहें वरिवरि दिसतों बरा॥
दिसे स्वहित तें करा, विठोबा, दिसे स्वहित तें करा।
पतीतपावन ब्रीदावलि हें संतत हृदयीं धरा॥
वाहलों मी भवसरीं, विठोबा, वाहलों मी भवसरीं॥ ३ ॥

: १४२ : माणिकप्रभु

दशरथसुत राम त्यजुनि (३९२)

दशरथसुत राम त्यजुनि शरण कोणा जाऊं ॥ ध्रु० ॥

एकवचन एकबाण एक पत्नि ज्याची।
ऐसे दीनदयाळ सांडुनि शरण कोणा जाऊं ॥ १ ॥

चरणरजें उद्धरली गौतमाची भार्या।
इच्छिताती सकळ देव चरण आम्हि ध्याऊं ॥ २ ॥

नामप्रतापें पाषाण तारुनि बांधियला सेतु।
माणिक म्हणे तेंचि नाम निशिदिनिं आम्ही गाऊं ॥ ३ ॥

कृष्णा मजकडे पाहुं नको (३९३)

कृष्णा मजकडे पाहुं नको, माझि घागर गेली फुटून ॥
डोइवर घागर हातामधें झारी वेणिच गेली सुटून ॥
भिंतीआड चढुन आला माझ्याजवळी न्हाणीत नाहातें जपून ॥
श्याम हा सुंदर अति मनोहर बहार घ्यावा लुटून ॥
माणिक प्रभु म्हणे प्रीतिची राधा हरिचरणीं चाले जपून ॥

१४३ : बल्लव

मर्जी देवाची देवाची (३९४)

मर्जी देवाची देवाची। मिथ्या धांव मनाची॥ ध्रु०॥

मनांत येतें हत्तीघोडे पालखींत बैसावें
देवाजीचे मनांत याला पायीं चालवावें॥ १॥

लोड तिवाशा नरम बिछाना सुंदर कांता व्हावी
देवाजीच्या मनांत पाठीं कर्कशा लावावी॥ २॥

महाल मुलुखमे पूर्ण खजीना घरांत पैका व्हावा
देवाजीच्या मनांत याला दरिद्री ठेवावा॥ ३॥

बल्लव म्हणे मनांत येतें काही(ही) न करावें
अहोरात्र सोडुन धंदा देवा आळवावें॥ ४॥

: १४४ : चिन्मय

झालें बाइ वेडी (३९५)

झालें बाइ वेडी। दरबार गुरुचा झाडीं॥ ध्रु० ॥

देहपितांबर फाडिला। नवरत्नांचा हार काढिला।
सद्गुरूचे गळां घातला। वासना सोडीं॥ १ ॥

कल्पनाकांचोळी काढिली। त्रिगुणाचि वेणि सोडिली।
चारि देहांची मुक्ति साधिली। परी ती थोडी॥ २ ॥

वेडी झाल्यें सद्गुरुघरची। चिंता हारपली मनाची।
सोय दाखविलि स्वस्वरूपाची। लागली गोडी॥ ३ ॥

चिन्मयस्वरूप दाखविलें। अपणामध्ये मेळविलें।
पूर्णानंदगुरुने केलें। पाय ना सोडीं॥ ४ ॥

आनंदरस हा प्याला (३९६)

आनंदरस हा प्याला। भवताप शांतचि झाला॥ ध्रु० ॥

अनंतकोटी कल्मषपाश। पावे एका समयिं विनाश।
दृढ धरितां सद्गुरुची कास। निज गुण सांगुनि गेला॥ १ ॥

आतां मज हो कैंचें ध्यान। विसरुनि गेलें समुळीं भान।
श्रवण कराया नाहिं मज कान। संकल्पचि निमाला॥ २ ॥

मेली यद्यपि आहे माय। केला जिणें दृढ व्यवसाय।
रामसखा तो शोकेल काय। चिन्मय होउनि ठेला॥ ३ ॥

१९४५ : कृष्णकिंकर

भक्तजनां सांभाळीं सांवळ्या (३९७)

भक्तजनां सांभाळीं सांवळ्या येइं रे वनमाळी ॥ ध्रु० ॥

शामसुंदरा! जगदोद्धारा! कृपादृष्टि न्याहळीं ॥ १ ॥
ठाण पहुडें, मुरली अधरीं वाजविं कदंबातळीं ॥ २ ॥
मोरमुकुट शिरिं दिव्य कुंडलें शोभे टिळक भाळीं ॥ ३ ॥
कामक्रोध-मदमत्त कालिया रगडी पायातळीं ॥ ४ ॥
आशा मनशा विषयवासना मोहोजाळ समूळीं ॥ ५ ॥
गोप गोधनें वनीं चारितां दध्योदन करकमळीं ॥ ७ ॥
पापि अघासुर बकी पिंगला उद्धरिल्या व्रजबाळी ॥ ७ ॥
कृष्णकिंकरा पाहीं कृपेनें अभयहस्तें कुरवाळीं ॥ ८ ॥

: १४६ : रघुपति

अरे विठ्ठला सख्या घननीळा (३९८)

अरे विठ्ठला सख्या घननीळा, एकदां बोल रे मसीं।
काय तूं दुरुनि मौज पाहसी ॥ ध्रु० ॥

तुझ्या मनांत कैसें आहे, सांग केव्हां भेटसी।
एवढी कां निष्ठुरता धरिसी ॥
रात्रंदिवस चैन पडेना विरहव्याधि शरिराशी।
कोणती वेळ येइल रे कशी ॥
जगदिशा नको दुर्दशा
करुं माझी आशा,
कधि देवा पुरविशी।
काय तूं दुरुनि मौज पाहसी ॥ १ ॥

पोरें विऊनि होसि निराळा भीक मिळेना त्यांसी।
ही फिर्याद न्यावि कोणापाशी ॥
खावें, प्यावें, ल्यावें, नेसावें कसें कळतें तुजसी।
पार रे नाहीं माझ्या दुःखासी ॥
अहो लळा पाळावा लळा
करावि अवकळा
यांत काय तुला
वाटली खुशी।
काय तूं दुरुनि मौज पाहसी ॥ २ ॥

फार झाली संतती म्हणुनिया त्रास मनीं धरिसी।
देउनि विश्वास गळा कांपसी ॥
श्रीहरि धांव झडकरि
कृपा मजवरी
व्हा सादर समयासी।
काय तूं दुरुनि मौज पाहसी ॥ ३ ॥

माझें ऋण आहे पहिलें तुजकडे देणें आलें भागासी।
तुझ्या नामाचें खत मजपासीं।
हृदयमंदिरीं रोधिन तुजला मग तूं कोठें जासी।
बेडी प्रेमाची घालिन पायासी ॥

रघुपति म्हणे, यदुपति
होईल फजिती
बंदी करीन राधेसी।
ही गुरुकिल्लि ठाउक आम्हासी ॥ ४ ॥

: १४७ : सीताराम

भक्ति ग वेणी (३९९)

भक्ति ग वेणी। माझी गुंफा गे साजणी॥ ध्रु० ॥

चिंता चतुर चौघीजणी। एका चित्तें घाला वेणी।
सद्भावफुलें लावुनी। चौधि ग बहिणी॥ १ ॥

निष्ठा गजदंताची फणी। प्रपंचमळ काढा विंचरुनी।
मुक्तकेश रुळती चरणीं। भगवद्भजनीं॥ २ ॥

चंद्रसूर्य तो विंझवारा। मूदराखडी चंद्रकोरा।
त्रिगुण चाळा तीन पदरा। आंवळा ग वेणी॥ ३ ॥

सगुण मोत्यें भांगीं भरा। फूल मोगरा इथ फूल मोगरा।
पंचरंगी गोंडे फरा। गोफ लावूनी ॥ ४ ॥

अवघड वेणीचें गुंफणें। सद्गुरुवांचुन गुंफिल कोणे।
सीताराम हात जोडून। भगवद्भजनीं॥ ५ ॥

आइ मज कां म्हणसी वाईट (४००)

आइ मज कां म्हणसी वाईट। व्यर्थचि ऐकुनि हा बोभाट।
जे कां जाताती अडवाट। कर्म-कचाट ते भोगिती॥ ध्रु० ॥

आपण पडुनियां भ्रांतींत। माझी उगीच निंदा करित।
फेरे चवऱ्यांसीचे घेत। अधोगती जाताती॥ १ ॥

लटिका बोले माभळभट। देवें त्याची झोडुन पाठ।
पळूनि गेला मथुरावाट। तया काय म्यां केलें॥ २ ॥

पूतना मजला मारूं आली। उगीच आपण मरून गेली।
ऐसी विघ्नें मावळलीं। तया काय म्यां केलें॥ ३ ॥

अग-बग-प्रलंब धाऊं येती। मजला माराया इच्छिती।
देवें केली त्यांची शांती। तया काय म्यां केलें॥ ४ ॥

अवघ्या व्रजाच्या गौळणी। आपण खाती गोरस-लोणी।
सांगूं येती तुजलाउनी। तया काय म्यां केलें॥ ५ ॥

साधू-सुजन मजला ध्याती। शाश्वतपदीं जाउन राहाती।
तेथें अक्षयसुख भोगिती। तया काय म्यां केलें॥ ६ ॥

माते, मजला तुझी आण। किमपि असत्य नाहीं जाण।
करावें भावें नामस्मरण। जीवनसुत विनवितसे॥ ७ ॥

:१४९: धोंडी गुंडी

निर्गुण माळ्यानें हो माळ्यानें (४०१)

निर्गुण माळ्यानें हो माळ्यानें। एक बाग लाविला ज्याने॥ ध्रु०॥

औट हाताचें एक वावर। वरि धरिला नांगर।
कामक्रोधमदमत्सर। बैल जुंपिले चार।
हातीं ज्ञान-आसुड घेऊन॥ १॥

एकविस स्वर्गांवरति एक विहिर। तिला उफराटे पाझर।
माळी सत्रांवी सुंदर। वाफे बाहात्तर।
पाणि लावितसे पाटानें॥ २॥

बावन चांफे हो चौफेर। चौदांचें मूळ घर।
तीनशेंसाठ जाइ मोगरा। एकवीस आंबे थोर।
पाणि लावि नित्यानें॥ ३॥

बाग पंचरंगी फुलला। माळि दंग जाहला।
जिवाशिवाचा वर त्याला। धोंडि गुंडी बोलला।
ऐक सद्‍गुरुस्मरणें॥ ४॥

१५० : बालकवि

दत्त दत्त दत्त हाचि जप करी मना (४०२)

दत्त दत्त दत्त हाचि जप करी मना।
करुनि दिव्य षड्भुजस्वरूप चिंतना॥ ध्रु०॥

देह गेह इष्ट मित्र पुत्र वधु धना।
नाशिवंत मानुनियां न करिं कामना॥ १॥

दत्त हाचि मुख्य देव सकल त्रिभुवना।
दत्तरूप विश्व हे धरूनि भावना॥ २॥

दत्त नाम जपुनि करिसि जरि उपासना।
मुक्त होसि जिंकुनि कामादि वासना॥ ३॥

सतत जपुनि हाचि मंत्र हाचि रे मना।
बालकविसि भेटवी त्रिलोकपावना॥ ४॥

: १५१ : मुकुंदात्मज

रामा करिं माझा प्रतिपाळ (४०१)

रामा करिं माझा प्रतिपाळ ॥ ध्रु० ॥

तुजविण मातें कोण न त्राता, म्हणविसि दीनदयाळ ॥
जैंवि नदीजळ जाय पळोपळ, ने आयुर्बळ काळ ॥
या संसारीं श्रमलों भारी, डंखिति विषयव्याळ ॥
मुकुंदात्मज विनवी चरणीं, ब्रीद तूंच सांभाळ ॥

चाल चाल रे मना वना जाऊं (४०४)

चाल चाल रे मना वना जाऊं। रम्य काननीं एकटे सुखी राहूं।। ध्रु० ।।

पुण्यारण्याची महाशोभा पाहूं। शोभा पाहतां श्री हरिगुण गाऊं।।
वन्य तरूंचीं सुवर्ण फळें खाऊं। इच्छाविहारी त्या मृगांसवें धावूं।। १ ।।

दिव्य सरितांचें जळ तृष्णा हारी। मलयमारुत हा स्वयें वारा वारी।।
पर्णशय्येतें मृदु निद्रा करी। स्थिर नोहे अंतरीं धीर धरीं।। २ ।।

रात्रिं लावूं सोज्ज्वळ चंद्रदीप। विरक्तिकांतेचें पाहुं गौर रूप।।
रूप पाहतां आलिंगि आपोआप। दूर करिते स्वयें सर्व ताप।। ३ ।।

ऐशा सुखाची त्या वनीं आहे खाण। तेथें राहतां सांपडे त्याचि खूण।।
नेटें बोटें दाखवी नारायण। अंगें भेटवि तो सखा नारायण।। ४ ।।

सोऽहं चांदणी, चांदणी ग साजणी (४०५)

सोऽहं चांदणी, चांदणी ग साजणी, गुरूंनी दाखविली नयनीं।। ध्रु० ।।

हृदय सत्त्वाचे, सत्त्वाचे आकाशीं, उगवला उडुपति पुनवेशीं।
शुद्ध कैवल्य, कैवल्य सिंधुवासी, देखिला सम तेजोराशी।
लोपल्या तारा, तारा ग तेजासी, लगटल्या शीतळ किरणांशी।
शुभ्र बिंबाचे, बिंबाचे अवकाशीं, गवसला पूर्ण योगियांसी।
राजयोग्याची, योग्याची योगरजनी, गुरूंनी दाखविली नयनीं।। १ ।।

गगनीं चंद्राचे, चंद्राचे अंगिं पुरती, पसरली दश द्वारावर्ती।
द्विदळ चक्राचे, चक्राचे दळीं वसती, भ्रमर गुंफेंत राहे पुढती।
हंस पुरुषासी, पुरुषासि संग करिती, ब्रह्मरंध्रिंचें भुवन भरिती।
नाद बिंदूच्या, बिंदूच्या कळा भंवतीं, सकळ ब्रह्मांड भरुनि उरती।
पंच रंगांचे, रंगांचे शुद्ध अंगणीं, गुरूंनी दाखविली नयनीं।। २ ।।

उठवर पाहतां, पाहतां परतोन, सहज तनु गेली हरपोन।
शेज शून्याची, शून्याची मनोहरिणी, सघन आनंदकंद परणी।
सुगम एकांत, एकांत वेद वर्णी, सगुण चंद्रासि झालि मिळणी।
परमसुख झालें, झालें ब्रह्मभुवनीं, सखे बाइ वदवेना वदनीं।
नवल सद्गुरुची, सद्गुरुची करणी, गुरूंनी दाखविली नयनीं॥ ३॥

प्रकट निजवस्तू, वस्तू चांदणी, फांकल्या प्रभा ग चिद्गगनीं।
शबल मूळमाया, माया मोहिनी, सिद्ध योगींद्र चित्तरमणी।
सकळ विश्रांती, विश्रांति भोगभवनीं, त्रिगुणजडजीवतापशमनी।
गहन संसार, संसारसिंधुतरणी, दत्तगुरु, नारायणचरणीं।
जन्ममरणासी, मरणासि सोडि पाणी, गुरूंनी दाखविली नयनीं॥ ४॥

भाउजि हो बोलण्यास लांज वाटते (४०६)

भाउजि हो बोलण्यास लाज वाटते।
बोलावें तरि आमुचें वदन बाटतें॥ ध्रु०॥

बटकी ती ओंगळ हो असुनि वांकडी।
मदनलालजीस गमे फार फांकडी।
रतिपतिसहि वश करील खचित माकडी।
अमुच्या बहु अंतरंगिं नवल वाटतें॥ भाउजि०॥ १॥

मुरलीधर हाय हाय रमवि बटकिला।
खुणवि तिला वाजवुनि हळुच चुटकिला।
त्यजुनि सुधा चाखिल कां रसिक कुटकिला।
काय करूं काय वदूं हृदय फाटतें॥ भाउजि०॥ २॥

श्रीहरिनें दासिस त्या अंगिकारिलें।
आम्हाला केवळ हें गरळ चारिलें।
कीं आमुच्या हृदयिं अमित कुंत मारिले।
शिव शिव तें आठवितां रुधिर आटतें॥ भाउजि०॥ ३॥

धन्य तुम्ही तुमचा तो धन्य हो हरि।
कृति तुमची धन्य धन्य बटिक ती खरी।
कमलापति नेसवि जिस शालु भरजरी।
नारायण खेळ करी मग अचाट ते॥ भाउजि०॥ ४॥

१५३ : खाकनाथ

बहिरा मी झालों देवा (४०७)

बहिरा मी झालों देवा, तुझे गुण ना ऐकिले।
भवाचे प्रवाहीं मी पडलों ऐसें झालें॥ ध्रु०॥

तें स्थान नाही होतें, तयानें बुडविलें।
धांव बा पांडुरंगा, दावीं संतांचीं पाउलें॥ १॥

संतांसी विनवितों तुम्ही जातां पंढरीसी।
सांगा माझी विनवणी एवढी पांडुरंगासी॥ २॥

बहिरा मज ऐसें करी, नाइकें कोणाची निंदा।
दुसरें मज कांहीं नको, लावीं रामनामीं सदा॥ ३॥

याचक मी हेंचि मागें, देईं संतांची सेवा।
हेचि माझी प्रार्थना सांगा पंढरिच्या देवा॥ ४॥

(तुझे गुण ना ऐकिले, बहिरा मी झालों देवा)
खाकनाथ म्हणतसे विठ्ठलनाथा परी ध्यावा॥५॥

: १५४ : आत्मारामबुवा

सुखकर साधूसंग (४०८)

सुखकर साधूसंग, प्राण्या, सुखकर साधूसंग॥ ध्रु०॥

क्षणभंगुर तनु जाणुनि हरिगुण श्रवणकीर्तनीं रंग॥ १॥
जाइजणें हें सर्वचि जाइल रथगजधेनुतुरंग॥ २॥
वस्त्रें-भूषणें कैचीं अंतीं, कोठें छपरपलंग॥ ३॥
आत्मारामीं बोध ठसावुनि, दृढतर राहें अभंग॥ ४॥

१५५ : कृष्णभट बांदकर

वैष्णव सद्गुरु निजला माझा रे (४०९)

वैष्णव सद्गुरु निजला माझा रे॥
चिद्रत्नासनिं विराजे आपण राजा रे॥ ध्रु० ॥

लक्ष लक्ष्मण चिच्छक्ती जानकि भजा रे।
दृश्य अयोध्येचा साक्षी भक्तकाजा रे॥ १ ॥

विवेक-मारुति दीन सदा रामपदा रे।
कृष्ण जगन्नाथ घे आंगें दर्शना रे॥ २ ॥

मंद हसित रघुराय (४१०)

मंद हसित रघुराय नयनिं पाहुं, घसघसित रत्न जडित शिरीं
मुकुट प्रकट तेज निकट जानकि शोभे दिव्यचाप बाण करीं॥ ध्रु० ॥

दक्षिणेसि लक्ष्मण लक्षणयुत लक्ष विचक्षण, दक्ष पवनसुत
लक्ष कोटि रक्षःकुलनाशन, पक्षपाति निजभक्तरक्षण करी॥ १ ॥

कुंदरदन इंदीवरलोचन इंदिराकटाक्षप्रिय सुंदर इंदुवदन करि
बिंदुसदृश भवसिंधु सकल सच्चित्सुखमय हरि॥ २ ॥

सूर्यकोटि चंद्रप्रभ लखलख आठवितां मुख होय अमित सुख
गांठ घे होउनि कधिं निरखिन पदनख
पतितासि विष्णु कृष्ण जगन्नाथ उद्धरीं॥ ३ ॥

पाहुं या रे कृष्ण (४११)

पाहुं या रे कृष्ण जो मर्दि कालियाला।
जेणें बहुत पाडिले देहविषें त्याला॥ ध्रु०॥

माझें मीच हें विषोदक पाजुनि लोकां।
होता करित रात्रंदिन पात्र दुःखशोका।
मोठा शत्रुशिरोमणि बाधक सकळांला॥ १॥

करिं पुच्छ शिरावरि पाय फणा मर्दी।
करिं टाळ वाजवुनि गाति भक्त-गर्दी।
यद्‌भजन नुरवि तिळ दुःखसमुद्राला॥ २॥

विष्णु कृष्ण जगन्नाथ सच्चित्सुख फळला।
ज्यां त्यां जीवांचा देहभाव गळला।
देह मीपण नुरवुनि रमवि सज्जनाला॥ ३॥

१५६ : वासुदेवानंद स्वामी

भावभक्ती अंगीं उठे, प्रेमभरें कंठ दाटे (४१२)

भावभक्ती अंगीं उठे। प्रेमभरें कंठ दाटे॥ १॥
दाटे प्रेमाश्रु लोचनीं। रोम राहे उभारुनी॥ २॥
उठोनियां आलिंगाया। आतां जातां नये पायां॥ ३॥
पायां पडुनि स्तवूं जरी। तरी शब्द नुमटे हरि॥ ४॥
हरिलें त्वां देहभान। आतां कोणा करूं नमन॥ ५॥
जन दत्तरूप होतां। वासुदेवा ये धन्यता॥ ६॥

: १५७ : विष्णुदासबुवा

गुरुमहाराज गुरू (४१३)

गुरु महाराज गुरू। जय जय परब्रह्म सद्गुरू॥ ध्रु०॥

तूं गुरुमाउलि समर्थ माझी, मी तुझें, आई, लेकरूं।
मी जडमूढ, अपराधी, म्हणुनी नको वायलें करूं॥ १॥

तूं गुरुनाथा, दीन अनाथां दाता, कल्पतरू।
असतां, संशय कां भवसागर न तरूं किंवा तरूं॥ २॥

तूं पतितपावन, परमकृपाघन, कशास मी घाबरूं।
तव गुण लिहितों, म्हणुनी इक्षूपेक्षां सुंदर बरू॥ ३॥

जिव जावो वा राहो, परंतु नाम तुझें दृढ धरूं।
विष्णुदास म्हणे स्वयें उद्धरुनि आणिकांतें उद्धरूं॥ ४॥

बरसत घन चमकत विज गगनीं (४१४)

बरसत घन चमकत विज गगनीं – सारी रजनी।
सुटत पवन धरणीही न दिसे मजला – सखे नयनीं॥ ध्रु०॥

अंधार सारा, न दिसेचि धारा
तटथट भरले नल, पुर वाहति अवनीं॥ १॥

शालहि भिजली, मशालहि विझली
नवतनु भिजली, नार गेली दचकुन मनीं॥ २॥

म्हणे तुजकरितां, मान न धरितां
श्रमलें भ्रमलें आलें स्नेह स्मरुनि सदनीं॥ ३॥

विष्णु कवि म्हणे, जाणति शहाणे
मृगनयने, तूं नको स्वयें वदुं हें वदनीं॥ ४॥

शिकला बातबेत सारा (४१५)

शिकला बातबेत सारा। जुंपला बैल संसारा॥ ध्रु०॥

सवड गुलामा नसे सलामा सदोदीत जूं खांदीं॥
हरिभजनाच्या कधीं वांटणिस घडी न ये एखादी॥ १॥

करि नित्याचा सणवाराचा खर्च बातबेतानें।
झाडाझडती तेल मिठाची, पीठ मोजि हातानें॥ २॥

पुण्यतिथीला घे पंक्तीला व्याहि आप्त जांवाई।
अतिथी दारामधें पाहतां चढे मस्तकीं वाई॥ ३॥

स्नानसंध्या, जप, तीर्थाटण, पुराण, कीर्तन वर्जी।
धर्म वाढिना कदा मोडिना बायकोची मर्जी॥ ४॥

शिरिं बेताची पगडी, गाडी, माडी, घोडी, खिडकी।
दे धर्माला खोटा पैसा, घोटि सुपारी किडकी॥ ५॥

चिरेबंदिची उंच हवेली, बांधी बळकट पाया।
रोकड वाढीदिढी वाढवी, आपण ये अटपाया॥ ६॥

काकासाहेब, नानासाहेब, आदर करि पंतांचा।
थट्टामस्करि करूनियां अपमान करी संतांचा॥ ७॥

जों जों थकला पिकला सुकला तों तों संग्रह केला।
विष्णुदास म्हणे अखेर एकला रडत नागवा गेला॥ ८॥

: १५८ : व्यंकटसुत

भक्तीं आकळिला, कृपाघन (४१५)

भक्तीं आकळिला, कृपाघन, भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥

गोकुळिं संकटिं स्वमुखें ज्याणें
दावाग्नि गिळिला ॥ १ ॥

त्या भीमकिने तुलसिदलाने
गिरिधरप्रभु तुळिला ॥ २ ॥

अर्जुनरथिं सारथ्य करि हरि
निजपद दे बळिला ॥ ३ ॥

द्रौपदिसंकटिं धावुनि आला
भीष्मानें पाहिला ॥ ४ ॥

विदुराचे घरीं कण्या स्वयें भक्षी
त्याला तो विकला ॥ ५ ॥

व्यंकटसुत म्हणे पाहुनि डोळां
साधुचरणिं लागला ॥ ६ ॥

१५९ : बलवंत

बाळकृष्णचरणीं लक्ष लागो रे (४१७)

बाळकृष्णचरणीं लक्ष लागो रे।
कीर्तनसंगें रंगांत देह वागो रे॥ ध्रु०॥

स्वरुपिं मन हें लावितां सौख्य आम्हां
कामक्रोधादिक जाती निजधामा।

सारासार वदविता सद्गुरुराय
मंगळधाम जीवन नरहरिपाय।

सद्रूप चिन्मय नारायणरूप ध्याऊं
तन्मय होउनि बलवंत प्रेमें गाऊं॥

: १६० : चांगादास

एक नवल आहे (४१८)

एक नवल आहे, नदी उगमाकडे वाहे ॥
सृष्टी पाताळांतून, नदी खेळते आहे ॥
नाही पाणी वर्षाला, कोरड्या नदीला पूर आला ॥ १ ॥

बिन पाण्यानं, नदी भरुन जाती
इला मूळच नाही रीती ॥
केकळ ठेकळ, नदीसी राहती
केकळ ठेकळ, मच्छमगर
नदी खोल असून, उथळ दिसे अवघ्यांला
कोरड्या नदीला पूर आला ॥ २ ॥

नदींत खेळती, छपन्न भूतावळ
मुंज्या पोटीं, रडती वेताळ ॥
म्हशासुर साती, आसरांचा मेळ
नदींत खेळती खेळ ॥
नही भूपार, वेध त्यासी भेटला
कोरड्या नदीला पूर आला ॥ ३ ॥

भले भले रे, नदींत बुडाले
मोठे झेपनार, ते पाहिले
ऐसे कैक बुडुनि गेले ॥
थोराथोरांसी, गोता बसला
कोरड्या नदीला पूर आला ॥ ४ ॥

दास चांगो र, शाहीर बोले
हा नदीचा, कोट किती फुले ॥
ह्या नदीला, नाले किती मिळाले
नदीमध्ये दोन
घ्या गणि कान धरून
जो धरील तोची, गुरुचा पुरा
कोरड्या नदीस पूर रे आला ॥ ५ ॥

१६१ : नागो कन्हेर – सोनू हरचंद

निरगुन कीं निराकार (४१९)

निरगुन कीं निराकार
अही मही कीं दोघे धुंदकार ।।
अही मही कीं पाणि होतें फार
उत्पन्न झाली शक्ति नार ।।
तिने फोड (पाह्यला ?) हातावर
शक्ति करे विचार
आणून पाहूं चमत्कार
बिंदु टाकले आदि पुरसानं
गिरगुन कीं निरांजन ।। १ ।।

बाळ जन्मले फोडांतुन
पुत्र जन्मले तिघेजण ।।
विष्णु मोठा होता, जान,
ब्रह्मा होता लहान ।।
मधला संभू देतों सांगून
निरगुन कीं निरांजन ।। २ ।।

अशी अद्‌भुत माया झाली
नार शक्ति कीं गुप्त झाली ।।
ब्रह्मा म्हणतो शक्ति कोठें गेली
दक्ष राजाच्या घरीं
अवतार घेतला घरीं
गुप्तरूपीं कीं अवतार घेउन
निरगुन कीं निरांजन ।। ३ ।।

काय केलं की शंकरानं
दक्षराजाच्या घरिं गेला चालून
देव पाहिले दक्षराजानं
लग्न लाविलें त्यानं
तुम्ही घ्यावें ऐकून

नागो कन्हेर गाये
नित चरणासीं राहे
सोनू हरचंद गाये आज्ञान
निरगुन कीं निरांजन ॥ ४ ॥

१६२ : पठ्ठे बापूराव

तुम्हि जातां कुठें मनम्हवना (४२०)

तुम्हि जातां कुठें मनम्हवना। मी घरांत नाजुक दौना॥ ध्रु०॥

चाकरि कां सोडुनि द्या ना
मी एकटि बोलुं चालुं कुणा
धंद्याला गडी एक आणा। मी घरांत नाजुक दौना॥ १॥

चुकून पडलें तुमच्या घरीं
हरिणी जाळ्यांत घावली खरी
दासी मी तुमचे चरण धरीं
मज जवळ तुम्हि कां घ्या ना। मी घरांत नाजुक दौना॥ २॥

गेली गंगा, राहिलं तीर्थ
आता काय रडून होतंय व्यर्थ
राया नाही भांडणांत अर्थ
हाशिखुषींत मशि बोला ना। मी घरांत नाजुक दौना॥ ३॥

झाल्या गोष्टी माफ करा
गरीब दासीला हातीं धरा
जिवाचा माझा धनि तूं खरा
तुजवांचुनि होइल दैना। मी घरांत नाजुक दौना॥ ४॥

धरुं नको रे वाट माझी (४२१)

धरुं नको रे वाट माझी, मला जाउं दे बाजारीं॥ ध्रु०॥

साऱ्या गौळणि गेल्या निघुनी
उशिर झाला मला भारी
विक्रीला वेळ झाला
दहिदुध येइल माघारीं
मला जाउं दे बाजारीं॥ १॥

नंदनंदना कंसकंदना
करुं नको मस्करी
जावा नणंदा इळतिंदा
घरिं मला छळति बहु परी
मला जाउं दे बाजारीं ॥ २ ॥

पठ्ठे बापूराव म्हणे
गोकुळीं खेळे गिरिधारी
गौळ्याघरीं क्रीडा करी
श्रीहरि अठव्या अवतारीं
मला जाउं दे बाजारीं ॥ ३ ॥

सकाळीं उठुनी, धर्मांनि काय केलें (४२२)

सकाळीं उठुनी, धर्मांनि काय केलें, अभिमन्यूस बोलाविलें।
समसप्तक, अर्जुनास दिधलें, कौरवीं सैन्य सिद्ध झालें॥
दुर्योधनानें, द्रोणाशिं पण केला, धरुनी द्यावें धर्माला।
व्यूहभेदाची, युक्ति आहे तुजला, बाळा, जावें युद्धाला॥
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ १॥

पुसुनि धर्माला, नमस्कार केला, हांका मारी सारथ्याला।
जोड रे घोडे, आपल्या रथाला, धर्मांनिं आज्ञा दिली मला।
सूत म्हणे राजा, अपशकुन झाला, सूर्य कां दक्षिणेस आला।
जाउन रे मारीं, कौरवांच्या मूलां, नाहीतर जन्म व्यर्थ गेला॥
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ २॥

रथीं बैसला, उत्तरेचा पती, मारिले दहा सहस्त्ररथी।
हत्ति आणि घोडे, पायदळ किती, पाडिल्या लोथींच्या लोथी॥
वीर वारंवार, गदायुद्ध करिती, झाली त्रैलोक्यीं ख्याती॥
वय लहान, तया नाहिं भीती, जसा शोभला पशुपति॥
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ ३॥

रणीं मिसळला, सुभद्रेचा सुत, सैन्य पाडिलें असंख्यात।
शिराने शीर, कितीक उडवीत, राजे जाहले भयभीत॥
सोळा वर्षांचें, वय दिसे लहान, युद्ध ग केलें निर्वाण॥
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ ४॥

मग दुर्योधन, रडत रडत आला, मिठी घाली द्रोणाला।
पार्थपुत्रानें, फार प्रळय केला, हटविलें माझ्या सैन्याला।
इकडे पाहुन, सांगे कर्णाला, शकुनीमामा पळुन गेला।
घ्या, घ्या म्हणुनी, विभूमधें गेला, जयद्रथाला क्रोध आला॥
द्रोणादिक शत्रु, द्वारिं उभा केला, फितुर सैन्यामधिं झाला।
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ ५॥

तुम्ही का युद्ध, मनापासुन कराना, कसें रक्षितां पांडवांना।
ह्याच्या पाठीशीं, येउं देइना कोणा, तळमळ सुटलि भीमसेना॥

सांबप्रसादें, ते दिवशीं जय त्यांना, बळें हटविलें पांडवांना।
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी ॥ ६ ॥

प्रथम द्रोणानें, तोडिलें धनुष्य, फोडिलें अंगाचें कवच।
मोडिला रथ, मग झाला विरथ, धांवुनी आला जयद्रथ॥
बाळ घाबरलें, चोहोंकडे पाहे, म्हणे हें धर्मयुद्ध नोहे॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनी ॥ ७ ॥

इकडे किरीटी, म्हणे केशवाला, अपशकुन होती मला।
मृगांचा कळप, सव्य हातिं गेला, लवतो माझा वाम डोळा।
मला वाटतें, कोणि वीर पडला, माझा धर्म धरुन नेला।
चाल रे देवा, जाऊं शिबिराला, कळेल तईं वर्तमान मजला॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं ॥ ८ ॥

कृष्ण अर्जुन, शिबिरांत आले, राजे अधोमुखीं बसले।
पुसे भीमाला, बाळ कुठें गेला, हळुच सांगे रणीं पडला।
आहा रे दैवा, कसा घाला पडला, हिरा पदरिंचा सुटुन गेला॥
आहा रे दैवा, कसा घाला पडला, रणाचे तोंडिं बाळ दिला॥
पुत्र हा योगी, न कळे देहाला, आवरुनि पार्थाला धरिला॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं ॥ ९ ॥

देव-अर्जुन, रणामधें गेले, बाळक धरणिवरी लोळे।
करुळे केस, रक्तानें भरले, आवरुन पार्था स्तब्ध केलें॥
धरुन पोटाशीं, चुंबन दिलें त्याला, मुखचंद्र तो धुळिनें भरला।
शिरीं पाहिला, गदेचा टोला, गहिंवर देवाला आला॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं ॥ १० ॥

बोले अभिमन्यु, झाला वृत्तांत, जयद्रथाने दिली लाथ!
सूड घ्या त्याचा, करुनी पुरुषार्थ, मी पाहतों कृष्णमूर्त।
इतुकें बोलुनी, समाधिस्थ झाला, चंद्रलोकीं प्राण गेला॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं ॥ ११ ॥

देव भगवान, भगिनिकडे गेला, थोर आकांत तिने केला।
माझा अभिमन्यु, कसा रणीं पडला, काय मी पाहुं उत्तरेला॥
अहो धिक्कार, तुझ्या धनुष्याला, माझा प्राण नष्ट झाला॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं ॥ १२ ॥

कृष्णासह पार्थ, आले रणांत, पळत सुटला जयद्रथ।
अहा रे दुष्टा, पाप केलें बहुत, द्रौपदी छळिली वनांत॥

तूंच अपराधी, पुत्रास दिली लात, जवळ आला तुझा मृत्य।
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं॥ १३॥

जयद्रथ पहा, पाठीशीं दिनकर, उदयीं उडवीन शीर।
पहा अवस्था, प्रळय होइल थोर, पडेल पित्याचे मांडीवर॥
त्याणें ढकलिलें, पडले धरणीं, देह पडला तेच क्षणीं।
मृत्यु पावले, बापलेक दोन्ही, अघटित देवाची करणी॥
पडला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, शोक बहु केला पांडवांनीं॥
गेला अभिमन्यु, अभिमन्यु वीर रणीं, चक्रव्यूह रचिला द्रोणांनी॥ १४॥

द्रौपदीसि बंधू शोभे (४२३)

द्रौपदीसि बंधू शोभे नारायण॥ ध्रु०॥

कोणे एके दिवशीं, ऐका, नारद, हृषीकेशी
सुभद्रादेवी कीं, असते द्वारकेशीं
तुम्हि कुठुनि आलां? सांगा देवऋषी,
त्यासी आदरें पाट दिला बसायासी
द्रौपदी कोणाची रे कोण?
सुभद्रादेवी कीं, पाठिची बहीण
द्रौपदीसी बंधू शोभे नारायण॥ १॥

द्वारकेमधें करित होता शयन
कसा निजला होता इकडे कान देउन
तेव्हा लगबग झाली बिरडं सुटलं म्हणुन
कसे धाउनि आले ऐकुन करुणावचन
द्रौपदीसि बंधू शोभे नारायण॥ २॥

धर्मांनि हारविलें द्यूतकर्म खेळुन
त्यासि ओढित नेलें सभेसि दुर्योधनें,
धांव कृष्णा मांडियलें निर्वाण
का द्रौपदीवरि आहे याचें मन
द्रौपदीसि बंधू शोभे नारायण॥ ३॥

तिचे हात-पाय चुरितो श्रमलिस ग म्हणुन
तिचा घाम पुशितो, आपल्या पितांबरानं!

तिच्या संगें जेवितो बहु आवडिनं
उसांत दिधला गोडपणा तो देई
मिठांत दिधला खारटपणा तो देई
जैशी भक्ति तैसा मी भगवान
द्रौपदीसि बंधू शोभे नारायण ।। ४ ।।

सुभद्रादेवी कीं असते द्वारकेशीं
बोट चिरलं देव पडले धरणीशी
एक चिंधी द्यावी बोटा बांधायासी
ही काल घेतली नवीच बाभळगुजरी
हा काल घेतला पितांबर भरजरी;
आवघें दिंड पाहिलें सोडुन —
एक चिंधी नाही कृष्णा तुझी आण
द्रौपदीसि बंधू शोभे नारायण ।। ५ ।।

नारद देवऋषी म्हणती द्रौपदीसी
बोट चिरलं देव पडले धरणीशीं
एक चिंधी द्यावी बोटा बांधायासी
माझं काळिज पहिलं बांधा तें नेउन
भरजरी पितांबर पदर दिला फाडुन
द्रौपदीसी बंधू शोभे नारायण ।। ६ ।।

द्रौपदिभगिनीवरती प्रीती (४२४)

द्रौपदिभगिनीवरती प्रीती अधिक का रे
कृष्णा प्रीती अधिक का रे ।। ध्रु० ।।

तुझी ही भगिनि सुभद्रा असे,
प्रेम अधिक मग तिजवर कैसें,
कथिं कारण मज गुह्य जरी असे, नंदबाळा रे ।। १ ।।

ऐकुनि वच हें निज भगिनीचें
बोट कापलें म्हणे आमुचें
जाउनि भगिनी(पाशीं) चिंधी मागिं, नारदा रे ।। २ ।।

जाउनि सत्वरीं सुभद्रागृहीं
बोट कापलें सांगे तिजही
देईं देईं चिंधी थोडी, विलंब ना लाविं गे ॥ ३ ॥

चिंधि पाहण्या वेळ नसे मज
शालू पैठणी आणली आज
कैसी (ती) फाडून चिंधी देउं नारदा रे ॥ ४ ॥

येउनि सत्वरिं द्रौपदीगृहीं
बोट कापलें सांगे तिजही
देईं देईं चिंधी थोडी विलंब ना लाविं गे ॥ ५ ॥

ऐकताक्षणीं पदर जरीचा
फाडुनि बोले, लावूं आतां
वेगें येउनि बांधी बोटा भगिनी ती स्वकरें ॥ ६ ॥

पाहुनि प्रीती द्रौपदीची
कृष्णें म्हणियलें धन्य भगिनिची
ऐसी भक्ती तैसी प्रीती तुझि प्रभु आहे रे ॥ ७ ॥

कुंती म्हणे धांव श्रीहरी (४२५)

कुंती म्हणे धांव श्रीहरी
आतां ग गेली ववसूनिया गांधारी ॥ ध्रु० ॥

कळ नारदाची खुटी
गमन तीन तळाच्या तळवटीं ॥
राजांतरीं पडल्या तुटी
कस्तुरिंत पडली हिंगाची पिठी ॥
सोन्याची बिगाडली भटी
वडील गांधारी कुंति धाकुटी ॥
श्रीपान हातीच्या शिरीं
कळ निर्माण झाली खरी ॥ १ ॥

आज ववसा हस्तनापुरं
तिथं काय नांदं कौरव चातुर ॥

येक आगळा बंधु शंभर।
शंभराची दुष्ट नंदार।
त्यांनी बसुन केला विचार
त्यांनी काय नाई पाहिलं दुरी
कळ निर्माण झाली खरी ॥ २ ॥

केला मिरतीकेचा हात्ती
त्येला चाकं बशिवलीं सुती ॥
रंग दिला कळा-कुसरी
कळ निर्माण झाली खरी ॥ ३ ॥

अंबरीचं खांब सोन्यारी।
सोन्या कळस चमकतो वरी।
हात्ती सजविला भवता-पुरी ॥
गळ्या काय घाटसर दुहेरी
कळ निर्माण झाली खरी ॥ ४ ॥

अंबारींत बसुन ह्या मातला।
कैक वढती हात्तीला।
हात्ती काय दोससुद चालला ॥
वान दिलं नगरनारीला।
नगरीं बसवुनि हात्ती फिरविला ॥
शस्तार धरलं कुंतीवरी
कळ निर्माण झाली खरी ॥ ५ ॥

कुंती बसली हौदांत
गेली कौरवाच्या वाड्यांत
बरीच विष्णु राखिली पत
घ्या पूर्वीचें सुक्रीत ॥
हात्ती दाखल इंद्रापुरीं
कळ निर्माण झाली खरी ॥ ६ ॥

अर्जुन म्हने भिऊ बळी
चिखलाची गोष्ट नाई बरी
धाडुनी पत्र इंद्राघरीं
ह्या इंद्राचं जाणं भाईरी
पोंचले बाण इंद्रकचेरीं
त्यांनी पाहिलं वाचुनी (तरी)

हात्ती पाठुन द्या लवकरी
कळ निर्माण झाली खरी ।। ७ ।।

अर्जुन मंत्रासी जपला ।
भिऊ बाणाचा निसटला ।।
कुंतीनं वरच्यावरि झेलला ।।
भिऊ म्हने लज्जा नाई अंतरीं ।
घ्या उस्नं आपलं लौकरी
कळ निर्माण झाली खरी ।। ८ ।।

भोळा बुरूज समंद कवटाळी ।
कैक बसविल्या खविल्या तळीं ।
वाट मिळंना झाली आरुळी ।
भूल पडली हस्तनापुरीं
कळ निर्माण झाली खरी ।। ९ ।।

आज ववसा घ्या तिळगूळ
ह्या ववशापासून मातली कळ ।।
तू सागर मी झुराळ
तिथं काय दत्तात्रीचं देवळ ।।
किष्ण देव आमचं कैवारी
कळ निर्माण झाली खरी ।। १० ।।

धांव रे धांव किष्णा (४२६)

धांव रे धांव किष्णा श्रीरंगे माझे आई ।
संकटीं पडलें मी एकदा भेट मज देईं ।। ध्रु० ।।

दुष्ट दुर्योधन कुळकुळीत कसा ग जन्मला
दूत खेळुनी आरीं आणिलें पांडवाला
दुष्ट हा शकुनी दुष्ट बुद्धि शिकवी कपट्याला
सांपळां ग एका गोविलें पांची वासरांला
सोडिला बाण शब्दाशीं चढे गुणाला
पाहीं अंतरीं कळ काढी माया प्राणाला
लागली ग चिंता शरण जाऊं कोणाचे पायीं ।। १ ।।

धावोनी ये रे धावोनी दीनदयाळू वत्सला
संकट आलें मजवरी दयाळा
नको सख्या गुंतू कोठें आयुघा राहिली थोडी
धरोनी मृदुवेणी दुःशासन हासडुनी पाडी
फरफरा ओढीत नेतसे सभेंत तांतडी
डाव्या अंकावरी बस म्हणीतो जोडीं
नको ग धरुं ममता भलत्याची आशा सोडीं
वस्त्रहरणाचा कैफ, मांडिती सारि घांई ॥ २ ॥

क्षीरसागरींचा विलासी मोठा, ध्यानींमनीं
अजूनी कसा ग येईना सांवळा चक्रपाणी
रंगमहालीं नेला का ग सत्यभामानीं
वाट बघूनी शिणले नेत्र माझे दोन्ही
होईल रे हानी सख्या सोडवीं येऊनी
संकटीं पडलें मजला भेट एकदा देईं ॥ ३ ॥

न सोडी सत्त्व तो धर्मराज गंभीर
भीम अर्जुन भाकेला गुंतले शर
नकुळ सहदेव रणीं भैरव वीर अनिवार
न बोलतां म्हणती रागावला ईश्वर
न अंधी, भीष्म-द्रोण आला विदुर
सभा-लोक पाहे टकमकां थोर थोर
एकली मी आहें त्याला गत करावी काई ॥ ४ ॥

ऐकोनी इतके गहिवरले जगजीवन
कोण्या वेड्यानं गांजिली माझी हरीण
ऐकोनी धावा मनीं योग टाकोनी
ना भी, ना भी शिष्टाचा ध्वनी ऐकोनी
खवळलें प्रेम झालें स्फुरण सावरल्या जाइजुई ॥ ५ ॥

दुःशासनाने हासडितां (साडीची) निरी
फेडिली पहिली सोनेरी चकट अंजरी
फेडिली दुसरी शेलारी वैजपुरी
फेडिली तिसरी पुन्नड नागद भर्जरी
हिरवा दोरवा कंचुकी गोरु पटचावा नेसली
(पांचवी) चुन्रा खंबाईत हिरवी जाई ॥ ६ ॥

सोडिली दिंडं काडिली बोभाटाची खजोरी
डाळिंबी चंद्रकळा झळझळी, गुलाबी

हिरवी वाण पुरीची खंजुरी डाळिंबी
शेवटला म्हणोनी आपला पितांबर झाकी
भेटला मजला देव श्रीहरी द्रौपदीला हर्ष होई ॥ ७ ॥

नंदबाळक मोठा चाळक (४२७)

नंदबाळक मोठा चाळक मोठा तुफानी
भुलविल्या गौळ्याच्या नारी खातो दहीलोणी
लहानशी गौळण पाहून तिची ग जानी (ज्वानी)
एकांती नेऊन कृष्ण गुंफितो वेणी
त्या ग हरीने गोकुळ बिघडविलें बाई
नाही ग हकीम पाठी यानें फिरविली द्वाहि
मसी द्या रजा जाऊं द्या गोकुळ सोडून
नवनीत माझें बहुमोलाचें म्हणते गौळण
नखभर देइन न हरीसी बोललें पण ॥ १ ॥

अठा दिवसांचें नवनीत माझें भरल्या घागरी
उद्यां जावें मथुरेसी म्हणून ठेविल्या मंदिरीं
कवाडांना किल्ल्या कुलुपें बळकट निंभाणी
कावडीवर उसें ठेवून निजली शेजारीं
त्या ग हरीला ठाउक होती त्याची खूण
दहि दूध गोरस गेला पिऊन
विंचू ग इंगळे सर्प ठेविले भरून
होती खूण ती गेला करून
नवनीत माझें बहुमोलाचें म्हणते गौळण
नखभर देईन न हरीसी बोललें पण ॥ २ ॥

तों ती गवुळण कावड घेऊन गेली मथुरेसी
गिऱ्हाईकाची झुंड हिटकारी त्यासी
दुधाखाणी दूध माझें उन उन
पाडशा म्हशीचें दहिं खा पाहून
आणा भांडें माप घ्या मोजून
मी आपल्या देईन अठळ शेरानं ॥ ३ ॥

घागरीचें तोंड सोडून देत होती माप
विंचू इंगळे बेडूक उंदीर घुशी उडती टपटप
आंतून निघाले मोठमोठाले सर्प
दचकली गौळण कैसें झालें कवतुक
पळूं लागली गौळण शेणमार केला
पळूं लागली गौळण लुगडें गेलें सुटून ॥ ४ ॥

गर्व हरला गौळणीचा भ्रांत उडाली
चरणांवर मस्तक ठेवून शरणांगत आली
तूं करता तूं करविता तूं माझा वाली
आजपासून दान देईन कृष्णा वाजव रे मुरली ॥ ५ ॥

पान्यानं पावसानं (४२८)

पान्यानं पावसानं धंदाकू नाहीं झाला ।
प्रीतीचा श्यामी माहा वावरांतच राह्यला ॥

नंदीले आला पूर सूर्व्या बसला डोंगीत ।
चांद लपे डोंगराच्या माह्या गांवच्या कुशींत ॥

पान्यानं पावसानं कवलावर वाहे गंगा ।
जीवाचा माह्या तान्हा गोकुळांत करे दंगा ॥

मोत्याच्या शिरव्यानं हांसे तुलशी बिन्द्रावन ।
लाटा नंदीच्या झेलत धांवे देवकीनंदन ॥

पान्यानं पावसानं चव दिशा झाल्या धुंद ।
गाईच्या गोठ्यामंधी राधिका का झाली गुंग ॥

पावस फेरीवाला गांवोगांवी हिंडे भारी ।
माह्या श्यामीच्या वाहाणा झाल्याकू वल्या दारीं ॥

आज मथुरेचा बाजार (४२९)

आज मथुरेचा बाजार, झाला उशीर ॥ ध्रु० ॥

गौळणीचं न्हाणं धुणं
उद्या बाजाराला जाणं
अडविलं त्या गोविंदानं
सोड हरि पदर ॥ १ ॥

कां रे धरलिस माझी वेणी
घरीं आहे घरचा धनी
करील माझी धूळदाणी
सोड हरि पदर ॥ २ ॥

कां बा धरलिस माझी वेळ
घरीं आहे तान्हं बाळ
रडुन रडुन करिल गोंधळ
सोड हरि पदर ॥ ३ ॥

कां बा धरलिस माझी वाट
घरीं आहे सासू खाष्ट
करील कामाचा बोभाट
सोड हरि पदर ॥ ४ ॥

दही रे दुधाची गवळण चालली एकली (४३०)

दही रे दुधाची गवळण चालली एकली।
कळंबाच्या झाडाखालीं, कृष्णानें आरोळी ठोकली ॥

मथुरेच्या बाजारांत जातसे श्रीकृष्ण कोल्हाटी।
खेळ मांडिला तिथें,राई-चंद्रावळीसाठीं ॥

मथुरेच्या बाजारांत झाला श्रीकृष्ण चांभार।
बेगडी वहाणा राई-चंद्रावळ घेणार ॥

मथुरेच्या बाजारांत झाला श्रीकृष्ण कुंभार।
नाजुक नवल्या राई-चंद्रावळ घेणार ॥

मथुरेच्या बाजारांत झाला श्रीकृष्ण कासार।
राजहंसी ग बांगड्या राई-चंद्रावळ भरणार॥

मथुरेच्या बाजारांत झाला गवळणींचा गजर।
सोडा सोडा कृष्णदेव राईबाईचा पदर॥

दही रे दुधाची राई परतली एकली।
कळंबाच्या झाडाखालीं कृष्णानें कांचोळी गुंफली॥

असा कसा बिलगला उरीं (४३१)

असा कसा बिलगला उरीं
ग बाई उरीं।
माही साडीचोळी भिजली॥

मी रानांत हिंडत व्हतें
ग बाई व्हतें।
त्यानं कैचें जोडलें नातें॥

तो सांगून आला नाई
ग बाई नाई॥
पदराले हिसका देई॥

केस डोईचे मोकये केले
ग बाई केले।
बदनाले बदन देले॥

तो बनीं ग नाचत गेला
ग बाई गेला।
माही इज्जत लुटोन गेला॥

आतां जाऊं मी कयासी घरीं
ग बाई घरीं।
उभा असन् दारीं हरी॥

श्रीरंग उभा विटेवरी (४३२)

श्रीरंग उभा विटेवरी बांधता पटका।
गेला जिवासि लावुन चटका।। ध्रु० ।।

भरजरी करुन पोशाख चांदाचा तुकडा।
खूप बनला नाजूक मुखडा।।
पाहून हरीची छानी कोणी यासी हटका
गेला जिवासि लावुन चटका।। १ ।।

छबेदार दिसे ग फांकडा उभा ग ठायीं ठायीं
हरि मजसी बोलत नायी करूं गत काई
गत छंद रंग जाणिला (असा ग) नटका।
गेला जिवासि लावुन चटका।। २ ।।

वंदून हरीचे पाय मुखाकडे पाहती।
सुर मंजुळ गाणें गाती।।
गत छंद रंग जाणिला (ह्याचा ग) नटका
गेला जिवासि लावुन चटका।। ३ ।।

उडविती फुलांचे पंखे पाहती नारी।
मग विलास करि श्रीहरी।
झाली गर्दी गरुडाची पारीं, गरुडाची पारीं।
वाजंत्री कर्णा चौघडे हमिश महाद्वारीं।
टाळ विणा मृदुंग मंचकिं कडा वाजती (कटका)।
गेला जिवासि लावुन चटका।। ४ ।।

भक्तांमध्यें भक्त निवडला (४३३)

भक्तांमध्यें भक्त निवडला कबीरदास भला
त्याहुनी कमलपुत्र चांगला।। ध्रु० ।।

कबीराच्या घरीं पाहुणे आले साठजण
घरामधिं नाही तिळभर अन्न।।
कबीर म्हणतो त्या शिरियाला, पावे कुठें उसनं
घाला संताला भोजन।।

इथं तिथं बघती तर कोनी उसनं देईना
म्हणून गेली वाण्याच्या दुकाना।
वाण्याला म्हणती मीठ पीठ शिधा द्यावा मोजुनी
उद्या मी पैका देईल आणुनी॥
वानी म्हणतो, ऐक सुंदरी संगत कर घडिभरी
शिधा मी मोजुन देतों लौकरीं॥
मीठ पीठ दिलं मोजुन
वचन दिलं वान्याकारनं
संत जेवले तुरपत झाले, आल्या मार्गीं गेले
मी परवचनाला गुंतलें॥ १॥

पाऊस पडला गाळ झाला कशी जाऊं एकली
पाय माझे भरतील चिखलीं।
कबीर म्हणतो त्या शिरियासी पुरिव त्याचा हेत
नको लावूं वचनाला लत।
कबीरानें उचलुन शिरिया घेतली खांद्यावर
सोडली वाण्याच्या दुकानावर।
वानी म्हणतो, ऐक, सुंदरी, पाय भरले चिखलानं
पाय तूं टाकावे धुवून।
कबीर माझा भ्रतार जातीचा मोमीन
यानें मला आणलं खांद्यावरुन।
कबीरासे शब्द ऐकतां घाबरला वानी
धरितो बाईचे चरण दोन्ही।
साडीचोळीची बोळवण करितो पाया पडतो वानी
पुत्राचा राग धरुं नको मनीं॥ २॥

पाव्हणा आला मला (४३४)

पाव्हणा आला मला पंढरीचा एक नाथ
बसाया टाकीती चंदनाचा पिडिपाट॥

तोंड पुसायाला जरी-रुमाल बारीक
चूळ भरायाला खाली सोन्याचं तबक॥

भोजन वाढाया साळीबाई तुमचा भात
तोंडी लावायाला येळी-लवंगाची शाक॥

पांची पानांचा इडा वरी जायफळ येक
दांत कोरायला दारीं तुळशीचं रोप ॥

इट्ठल पाव्हणा माझ्या दुबळीच्या घरीं
साळीच्या तांदळाच्या दोन्ही आण्या बरोबरी ॥

सकाळीं उठोनी झाडीतें आंगणवाडा
विठ्ठलदेवाचा लोळतो धोतरजोडा ॥

सकाळीं उठोनी सडा देतें आंगणाला
विठ्ठल देवाला चौत माझ्या बामणाला ॥

सकाळीं उठोनी हात जोडीतें आंगणाला
(हात जोडितां आंगणाला) सूर्य डुलतो गगनाला ॥

कुण्या हावशाची रंगली नार (४३५)

कुण्या हावशाची रंगली नार माडीवर
पिंजऱ्यांत पाहिलं कबुतर डौलदार ॥ ध्रु० ॥

पायात वाळं, सांकळ्या, वाजे पोलार
कमरेशी माच पहा ना कुलपं चार ॥ १ ॥

गळ्यामधीं माळ पुतळ्याची न चंद्रहार
रेखिली कुंकवाची कोर आयन्याम्होरं ॥ २ ॥

अरे, आकाशीं पिकला आंबा बघूं नको वर
न्हायी यायचा तुझ्या हाताला, बघुन जा म्होरं ॥ ३ ॥

कुण्या हौशानं बाग लाविली मळा चौफेर
नारंगी आली रसाला डाळिंबीला बहार ॥ ४ ॥

एकनाथ (?)

पदर धरुं नको सोड (४३६)

पदर धरुं नको सोड,
कान्हा, पदर धरुं नको सोड॥ ध्रु०॥

मी एक राधा, तूं गुरराख्या,
तुझी माझी जमेल कैशी जोड॥ १॥

जाउन सांगिन नंदमामाजीला
मोडिल, हरि, तुझी खोड॥ २॥

(एका जनार्दनीं...)
दे हरि पायाची जोड॥ ३॥

तुकाराम (?)

घ्या मुकुंद मुरारी गोविंद (४३७)

घ्या मुकुंद मुरारी गोविंद। आनंदकंद घ्या हा छंद॥ ध्रु०॥

गोपाळकाला करुनी गोळा मांडी काला सावळा।
अंत नाही या सुखाला होय सकलां आनंद॥ १॥

वाजवि कान्हा वाद्यें नाना गाति तनाना व्रजललना।
हाल हुंबरी फुगड्या टिपरी खेळति नरनारी वृंद॥ २॥

प्राचीन गीतमंजूषा

टिपा आणि परिशिष्टे

टिपा

१ : गोरक्षनाथ

गोरखनाथ या नावानेही ओळखला जाणारा (प्रसिद्ध) नाथपंथी साधू व हा गोरक्षनाथ हे एकच की वेगळे ते सांगता येत नाही. शिवाय या गोरक्षनाथाने मराठीत रचना केली होती याला दंतकथा व परंपरा यांवाचून दुसरा भरीव पुरावा नाही. निवृत्तिनाथांचा हा आजे-गुरू मानला जातो; याचा शिष्य गहिनीनाथ (गैनीनाथ) हा निवृत्तिनाथांचा गुरू. (याचा काळ इसवी सन दहावे शतक.)

(१) छांदस-मात्रिक 'लवंगलता' छंदातील अभंगधाटणीची रचना; विषम चरणखंडात द्विमात्रक प्लुति-उदा० 'देउळेंऽऽ'

२ : गहिनीनाथ

'गैनीनाथ' असेही रूप आढळते. नाथपंथी गहिनीनाथ व हा एकच या समजुतीला दंतकथा व परंपरा एवढाच आधार आहे. याच्या नावावर असलेली मराठी रचना खरोखर याचीच यालाही दुसरा पुरावा नाही. पण हा निवृत्तीनाथाचा पंथगुरू होता याबद्दल तज्ज्ञांचे दुमत नाही. (काळ इसवी सन बारावे शतक संभवनीय.)

(२)-(३) 'देवद्वार' अभंग.

३ : महानुभाव कवि (अज्ञात)

चक्रधर-चक्रपाणी निघून 'रामयात्रे'ला गेल्यावर पत्नी कमळाइसा हिची झालेली अवस्था यात वर्णिली आहे. 'गुजरू' संज्ञा लक्षणीय आहे. कविनाम संशोधकांनाही कळलेले नाही, पण भाषासरणी प्राचीन महानुभाव काळातलीच आहे. म्हणून ही रचना तेराव्या शतकातली मानावी लागते.

(४) गेय ओवी – 'देवद्वार' धाटणीची.

४ : म्हाइंभट

'लीळाचरित्रा'चा कर्ता. इ० स० तेराव्या शतकातला महानुभाव गद्यकार. याची एक

आरती व एक गीत 'प्राचीन गीतभांडारा'त दिलेली आहेत.

(५) 'जतीचा दशकु'मधल्या पूजावसर पाठाऐवजी क्र० ८चा 'जतु' वेगळा दुसऱ्या पाठातील आहे. 'मराठी छंदोरचनेचा विकास'मध्ये पूजावसरातील पाठातल्या आरत्या दिलेल्या आहेत. अक्षर-छंदात्मक रचना. 'अवस्था'=ध्यास, वेड, उन्मनस्क वृत्ती.

(६) 'जतीचा दशकु' म्हटलेल्या आरतीसंग्रहात दोन्ही पाठभेदांत अकरा आरत्या आहेत. येथली ही रचना 'प्रार्थनेचा जतु' म्हणून आणखी वेगळीच आहे. ही खरोखर 'जतीचा दशकू'नंतर म्हटली जात असावी.

:५: महदंबा

जन्मकाळ अनिश्चित. मृत्यू इ० स० १३१२ पूर्वी. मराठीतली आद्य कवयित्री. हिच्या 'धवळे' नामक रचनांतले एक कडवे 'प्रा० गी० भांडारा'त दिलेले आहे. येथे अन्य स्फुट कवने दिली आहेत.

(७) प्रार्थना – आर्तिक्य स्वरूपाची रचना. प्रतिचरणी अक्षरछंद 'शुद्धसती'चा वाटतो.

(८) हा पाच ओव्यांचा गुच्छ अर्धवट राहिलेले अक्रुरगीत आहे. महदंबा रवा काढीत असता या ओव्या म्हणत होती. मागून श्रीचक्रधर आले व त्यांना ते आवडले. पुढे संभाषणामुळे गीत अपुरेच राहिले. येथली संहिता 'सातैरूपचरित्रा'तील 'अज्ञातलीळा'-१४४ या ग्रंथातली आहे. (संपादक: माधवराव पंजाबी.) घातली संचून गांठी=पक्की खूणगाठ बांधली. कृष्णभेटीचा 'अवस्वर' जवळ आलेला त्याला वाटला.

:६: दामोदर पंडित

प्रसिद्ध महानुभाव कवी. 'वछाहरण' काव्याची रचना इ० स० १२९८ किंवा इ० स० १३१२ मध्ये झाली. 'प्रा० गी० भांडारा'त एक 'धुवा' गीत व एक आरती दिलेली आहे.

(९) एक चौपदी – यावर 'राग चंडी' अशी नोंद प्राचीन बाडातच आहे. कवीने आपले गुरू नागदेवाचार्य यांच्या नावे रचना केल्यामुळे 'नागदेव म्हणे' अशी कविनाममुद्रा आहे. 'पतित-पावन (चंद्रकांत)' धाटणीची स्वैर रचना.

:७: केशिराज

हे प्रसिद्ध महानुभाव पंडित व ग्रंथकार. 'मूर्तिप्रकाश' हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ. त्यांची स्फुट रचना येथे दिली तेवढीच आढळते.

(१०) परमेश्वर श्रीचक्रधरांची 'अवस्था' लागल्यावर हे गीत लिहिलेले दिसते. कैसोबासाची स्त्री शृंगारसाज करून सुखासंभोगासाठी त्यांच्याजवळ गेली. ''तदीसीं हा गीतु केला'' अशी नोंद काही बाडांत सापडते. यात कृष्ण-रुक्मिणीचा शृंगार व कृतक कोपही वर्णिलेला आहे. रचना 'धवळ्या'च्या धाटणीची चतुष्पदीमय आहे.

८ : नारोबास बहाळिये

'साती ग्रंथां'पैकी 'ऋद्धिपुरवर्णन' काव्याचे लेखक म्हणून महानुभावपंथात प्रसिद्ध. यांचा काळ इ० स०चे तेरावे शतक असा आतापर्यंत मानला जाई. पण आता तो काळ चौदाव्या शतकाचा असावा असे मत दृढ होत आहे.

(११) हे एक गोपीगीत आहे. रचना स्वैर व संमिश्र आहे. 'पहातेया पाहारा'=पहाटेच्या प्रहरी गोपी घुसळण करीत असता त्यांना कृष्णाची आठवण होते व त्या विरहकातर बनतात, असे हृद्य वर्णन यात आहे.

९ : कृष्णभट काळे

नागदेवाचार्यांच्या प्रभावळीतील एक महानुभाव भक्त व कवी. त्याचे उद्धवाचे पद येथे दिले आहे.

(१२) 'स्मृतिस्थळा'त या पदरचनेचा प्रसंग सविस्तरपणे स्मृति-११४ मध्ये वर्णिलेला आहे. 'एक वेळ काळे कृष्णभटी दसांके (भागवताच्या दशमस्कंधातील) उद्धवदेवा गोकुळ पडिताळणेयाचीं (पाठविण्यासंबंधीची) पदें (पद्यरचना) केलीं. यावरी भटोबासीं म्हणितलें : कृष्णा, तेव्हळीं कांइ तूं तेथचि होतासि : म्हणौनि तोखले'.

या गीतात भूपाळीसारखी लयबद्ध रचना आहे. मात्र ती स्वैर आहे. सातव्या कडव्यातला अंत्य चरण 'धवळ्यां'तील रचनेसारखा मुक्तप्राय आहे.

१० : नाइकबाई

नौगाव येथली 'अधिकार्य' महिला. महदंबेची समकालीन. 'स्मृतिस्थळा'तला संदर्भ पुढीलप्रमाणे आहे : एकदा महदाइसा (महदंबा) नौगावाला गेली असता तेथल्या 'अधिकार्य' (अधिकारी) नाइकबाईला भेटली; महदाइसाच्या दर्शनाने नाइकबाई आनंदली. त्यावेळी महदाइसेने श्रीदेवो राउळ (गुंडम राउळ) व ईश्वरु (चक्रधर) यांच्याविषयी तिला बरेच सांगितले – 'श्रवण केले' (करविले) (स्मृति १६३) ''एकुदिसीं नाइकबाइये अप्राप्तिकरें पदें केलीं : आणि महदाइसापुढां म्हणितलीं : महदाइसें तोखली : तियें पदें यैसीं:'' (स्मृति १६५) पदें=कडवी, पद्यरचना.

(१३) प्रदीर्घ चरणांची 'धवळे'सदृश ओवीरचना; पण ती भूपाळीसारखी लयबद्ध रीतीने म्हणायची.

:११: निवृत्तिनाथ

इ० स० १२७३ – इ० स० १२९८. ज्ञानेश्वरांचे बंधू व गुरू. 'प्रा० गी० भांडारा'त यांची चार कवने आली आहेत. येथील रचनांत रूपकात्मक आध्यात्मिक संकेत, कृष्णरूपाचे निरागस दर्शन व त्याच्या विराट-लघु रूपातील विरोधाभास लक्षणीय.

(१४) ते (१६) 'देवद्वार' अभंग.

:१२: ज्ञानेश्वर

इ० स० १२७५ – इ० स० १२९६. साधारणपणे मान्य असा हा काळ. 'प्रा० गी० भांडारा'मध्ये बारा कवने दिलेली आहेत. येथे दिलेल्या रचनांत अनेक संग्राह्य पदे, रूपके, कूटमय रचना आहेत.

(१७) वैशिष्ट्यपूर्ण अंतर्गत यमके. 'कानडा-कर्नाटकु' उल्लेख लक्षणीय. द्रुतोच्चारी खंडित चरणांची 'साकी-लवंगलता'सदृश रचना.

(१८) ओवीसदृश रचना, लयबद्ध व गेय. 'वो माये' हा ज्ञानेश्वरपद्यातील वैशिष्ट्यपूर्ण शब्दसमूह, गानदर्शक.

(१९) ज्ञानदेवांच्या हरिपाठाच्या अभंगातला अतिशय प्रसिद्ध अभंग. 'देवद्वार' रचना.

(२०) भजनीमेळ्यातला अत्यंत लोकप्रिय अभंग. 'अवघाची संसार' असे प्रारंभिक पद नामदेवगाथ्यातल्या एका अभंगातही आहे. 'देवद्वार' रचना.

(२१) भजनकीर्तन किंवा गोंधळी आवाहन असलेली रचना. विठ्ठलाला स्त्री-शक्तिरूपात पाहणारे ज्ञानेश्वर यात आढळतात. 'विठाई'-'कान्हाई' वगैरे रूपे लक्षणीय. चरणमध्यावर खंडन व प्लुती; 'वो'कार गेयतेचा निदर्शक.

(२२) खेळिया पद्धतीचे, टिपरी खेळाचे गीत. अंतर्गत यमके व द्रुतोच्चारी म्हणणी लक्षणीय. 'फटक्या'च्या धर्तीची 'हरिभगिनी' जातीची रचना. येथे 'वो' हे पद पद्यरचनेचाच एक भाग बनले आहे व गेयतादर्शकही आहे. औट (साडेतीन) हात मापाची जमीन व तालबद्ध रीतीने 'तालछंदे'-'ताळकछंदे' टिपऱ्या खेळण्याची क्रिया खास उल्लेखनीय होत.

(२३) 'विराणी' किंवा विरहिणी गोपीचे वर्णन. द्रुतोच्चारी, 'फटका-हरिभगिनी'सदृश रचना. 'वो' पद पद्यरचनेचा भागच दिसते; 'माय' हे गेयतादर्शक पूरक पद.

(२४) 'वेध' लागलेल्या गोपीची आणखी एक विराणी. रचनाबंध 'देवद्वार' अभंगाचा; पण 'वो माये' ही पदे 'तालछंदे' गाण्याची निदर्शक.

(२५) बराच काळ उनाड मोकाट राहिलेली स्त्री (आत्मचेतना) आता समर्थाचे अंगी पडली, विठ्ठलाची घरवात झाली, त्यामुळे आलेला अभंग आत्मविश्वास वैशिष्ट्यदर्शक. रचनाबंध 'अभंग' 'देवद्वारा'सारखा. पण अंत्य कडव्यात यमकवैचित्र्य.

(२६) 'चवाळ्या'(पांघरुणा)ची प्रसिद्ध गीते; तात्त्विक-आध्यात्मिक रूपकोक्ती वर्णनात्मक रचनाबंध; 'गे माय' गेयत्वदर्शक पद.

(२७) प्रसिद्ध 'घोंगडी'चे रूपकात्मक पद. भक्त, बहुधा पेंद्यासारखा, देवाकडे तक्रार करीत आहे. देवाचे रूप दिव्य – 'रूप पाहता लोचनीं। सुख जालें वो साजणी' – ती देवाची 'चांगली' घोंगडी; पण मानवी शरीर म्हणजे घाण असलेली फाटकी 'वांगली' घोंगडी. 'साकी-लवंगलता' जाती; चरणमध्यावर विराम किंवा खंडन.

(२८) 'कापडी' – देवनाममुद्रांचे कापड ल्यालेला यात्री भक्त; गंगेचे पाणी कावडीत भरून रामेश्वरी नेणाऱ्या यात्राळूचे रूपक. कापडखेळी पद्धतीचे गीत. पहाले=प्रकाशले. जलद म्हणणीची देवीवर रचना. 'रे'कार गेयतादर्शक; पूरक शब्द.

(२९) 'फुगडी'चे गीत; ज्ञानेश्वरकाळीही फेराचे नृत्य असावे; अनेक संतांची अशीच फुगडी-गीते आहेत. अक्षरसंख्य छांदस रचना – 'लवंगलता' छंद.

(३०) चातक-मेघांच्या सांकेतिक उपमानाचे गीत; पण जिव्हाळा भरपूर. गुरु-देव (निवृत्तिनाथ) मेघ व भक्त-शिष्य (ज्ञानदेव) चातक. 'देवद्वार' अभंग. 'वो'कार छंदाचा भाग आहे.

(३१) 'मोगरा फुलला'सारखे 'महुरले महुरले – मोहरले' हे अर्थसूचक नादांचे शब्द. पुरुष-प्रकृतीपासून विश्ववृक्ष अंकुरला; मायेमुळे आपणही 'अपार' (अनंत) आहोत हे तो विसरला; मूळ मायेच्या देठापासून (नाळेपासून ?) ते झाड वेगळे पडले व वाढले – साक्षात्काराने मोहरले व भक्तिफळांनी लहडले! द्रुतोच्चारी धाटणीची 'साकी-लवंगलता' रचना; 'गे माये' ही पदे गेयतामूलक, तान-पूरक भागाची. संयोगे=योगायोगाने, गुज=संजोग.

(३२) शेताचे आध्यात्मिक रूपक. गुरू निवृत्तिनाथांच्या कृपेने ज्ञान-भक्तीचे बीज 'चोखडें उगवलें'. 'देवद्वार' अभंग.

(३३) ज्योतिर्लिङ्गाच्या पूजनाचे, तपश्चरणाचे रूपक. बैसका=बैठक, चौथरा. 'लिंग देखिलें' हे ध्रुवपद. बाकीची कडवी घनाक्षरी धाटणीची; भूपाळीच्या चालीवर गुणगुणायचे पद.

(३४) पदसंग्रहात आढळणारी एक रूढ लोकप्रिय रचना; अध्यात्ममूलक कूट-कोड्यांची विरोधाभासात्मक परिभाषा; तिसऱ्या कडव्यात 'बापलेकांनी आकाशात जन्मलेली नार भोगिली' या विधानातील परस्परविरोध अद्वैत वेदान्ताच्या संदर्भात पाहिल्यावर दिखाऊ ठरतो! – 'ॲपरन्ट कॉन्ट्रॅडिक्शन' हा पाश्चात्य 'मेटॅफिजिकल रिडल्स'चा पायाच होता. ज्ञानवंताला टाकलेले हे कोडे. शेवटी 'ज्ञानेश्वराला' आहे तेथे काहीतरी वेगळे पद पाहिजे. अर्थाच्या व यमकाच्या दृष्टीने अर्थ 'ज्ञानवंताला' असाच घ्यावयास पाहिजे. गेय सरणीचे पद; कडवी पादाकुलकी रचनेची; पण उच्चारण लघु-प्रयास.

(३६) कूटात्मक रूपक; आट्यापाट्यांचा खेळ; आलाडु आडु पालाडु आडु—या बाजूला आडवा बांध-आट्या; त्या बाजूला आडवा बांध-पाट्या. 'मध्ये वाहे पाणी'मधून खेळाडू वाकडा-तिकडा सरकतो; भोग्या=भोज्या; डायीं=डावीकडे; 'सुखाति'=सुखकारक.

(३७) ज्ञानेश्वरांच्या नावावर रूढ असलेले फार जुने व लोकप्रिय कूटगीत. 'अशक्य ते शक्य झाले' असे सांगण्यातला परस्परविरोध आध्यात्मिक संकल्पनांच्या आधारे 'दिखाऊ', हा वेदान्ती उलगडा गुरुमार्गदर्शनानंतर स्वानुभूतीने होतो; असा भावार्थ. जलद शब्दोच्चाराची, 'फटका-हरिभगिनी' जाती. अशीच एक रचना इ० स० पंधराव्या शतकांतील कानडी भक्त पुरंदरदासांची आहे.

: १३ : मुक्ताबाई

इ० स० १२७९ – इ० स० १२९८. ज्ञानेश्वरांच्या या बहिणीची पाच गीते 'प्रा० गी० भांडारा'त दिलेली आहेत, त्यातले तेहतिसावे गीत म्हणजे कूटात्मक अभंग होय. येथे आणखी तीन गीते दिली आहेत.

(३८) हे 'ताटीचे अभंग' प्रसिद्ध आहेत; येथे सर्वच्या सर्व बारा अभंग दिलेले आहेत. 'प्रा० गी० भांडारा'त फक्त शेवटचा अभंग दिलेला होता. ताटीआड (बाहात) अटून-तटून बसलेल्या ज्ञानोबाची धाकट्या 'लडिवाळ' बहिणीने केलेली मनधरणी. 'देवीवर' अभंगरचना.

(३९) कै० ज० र० आजगावकरांच्या परंपरानिष्ठ जवळिकीच्या साक्षीने 'महाराष्ट्र संत कवयित्री', (पृ० ४०) हे गीत मुक्ताबाईचे म्हणून दिले आहे – 'मुक्ताई म्हणजेच मुक्ताबाई असे गृहीत धरून. जरा लघु-प्रयत्न उच्चारण असलेली 'देवद्वार' अभंगधाटणी.

(४०) पारंपरिक भजनी गीत, जुन्या काळापासून रूढ. पालुपद सोडून अंतऱ्यात पादाकुलकी त्रिपदी-चौपदी; 'शिवराय' जातीला जवळची रचना.

: १४ : चांगदेव

मृत्यू बहुधा इ० स० १२९८ मध्ये. चांगदेव वटेश्वर ते हेच. 'प्रा० गी० भांडारा'त तीन रचना; येथे आणखी एक, वैशिष्ट्यपूर्ण म्हणून.

(४१) गोलाकार घुमट व पाळणा यांचे रूपक. द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटका'; अंत्य चरणात मध्ये खंडन.

: १५ : विसोबा खेचर

मृत्यू इ० स० १३०९, सुप्रसिद्ध संत व नामदेवांचे गुरू. यांची एक रचना

प्रा० गी० भांडारा'त आली आहे.

(४२) आध्यात्मिक विरोधोक्ती. वेदान्तविचाराचे सूत्र. षण्मात्रक आर्वतनी रचना, भारतीच्या 'परिलीना' जातीला जवळची. काही चरणांत मध्ये खंडन व विराम.

१६ : नामदेव

इ० स० १२७०-इ० स० १३५०. यांची बारा गीते 'प्रा० गी० भांडारा'त आहेत येथे आणखी सत्तावीस दिली आहेत. त्यांतली बहुतेक वैचित्र्यपूर्ण आहेत. 'खेळिया' गीते विशेष लक्षणीय.

(४३) 'सकल संतगाथा-नामदेवगाथा' (क्र० १५३६) मधील पाठ मुख्यत्वे घेतला आहे. पण विनोबा-संपादित 'नामदेवांची भजने (पृ० ५४)'मधील 'विटेसहित चरण०' हा चरण येथे घेतला आहे. त्यात सुरुवातीला 'भेटीचे आर्त' असा पाठ आहे. उत्कट भक्तिभाव. अभंग 'देवद्वार'.

(४४) वासनांच्या पायी उद्वेग व उबग. 'देवद्वार' अभंग.

(४५) देव-भक्तांमधील सारूप्य-अद्वैत. 'विष्णुदास' ही नाममुद्रा असूनही हा नामदेवाचाच अभंग आहे. 'देवद्वार' अभंग.

(४६) एक वैचित्र्यपूर्ण रचना. विठ्ठलच सर्वस्व असल्याची खूणगाठ. अक्षरावर्तनी पद्य. 'छंदोरचने'तील छंद 'विठ्ठल' हे नाव या पद्यावरून पडले. पण दुसरा व तिसरा चरण पूर्ण अक्षरावर्तनी नाही. शेवटच्या चरणात तर द्रुतोच्चारी म्हणणीच आवश्यक.

(४७) प्रसिद्ध अभंग. वारकरी पद्धतीच्या कीर्तनरंगाचा संदर्भ महत्त्वाचा. काही ठिकाणी 'सर्वांचे जे अधिष्ठान। तेचि माझे रूप पूर्ण' असा अधिक चरण आहे. 'प्रेम सर्वांगाचे ठायी'ऐवजी 'सर्व सांडूनी माझाई' असाही पाठ आहे. येथील पाठ 'सकलसंतगाथा-नामदेव' (क्र० १५२२)मधला आहे. अभंग 'देवीवर'.

(४९) देवाशी लटके भांडण. 'फजीती' खरी, पण ती 'वाऊगी' म्हणजे 'उगाच'.

(५१) 'वेडा नामदेव' देवाचा धावा करीत आहे. अंत्यचरणात 'त्याला' असा शब्द होता तो अनावश्यक व छंदोभंगकारक म्हणून गाळला आहे. अभंग 'देवद्वार'.

(५२) 'सकलसंतगाथा-नामदेव' (क्र० २४२)मध्ये आलेली ही रचना प्रेमाबाईच्या काही रचनांशी तुलण्यासारखी आहे. विशेषतः 'गडे हो कृष्णगडी आपुला। राजा मथुरेचा झाला।' हे पद. जाती भुवनसुंदर, पण चाल वेगळी.

(५३) लोकप्रिय भजनी पद. कृष्णाचा यशोदेशी हट्ट-विनंती. अंतरे 'भुवनसुंदर' जातीचे पण ध्रुपद+। – – – –।+ऽ – –।+अशा खंडित रचनेचे. उच्चारण खूपच लघुप्रयास.

(५४) लौकिक स्त्रीगीत म्हणून रूढ असलेली लोकप्रिय रचना. यशोदेची कृष्णाला ताकीद. रचना 'खेळिया' गीतातली. द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटक्या'ची.

(५५) अर्थानुकारी नादयोजना. 'थैथैथैथै' यांसह सर्वत्र उच्चारण लघुप्रयत्नाचे.

छंदाचा आराखडा 'हरिभगिनी-फटका' जातीचा.

(५६) वैशिष्ट्यपूर्ण रचना. भक्तिपूर्ण आत्मीयता सूचक 'कृष्णम्मा' हे रूप; 'कान्हाई'-'विठाई'सारखे. अक्षरछंदी पद्य; 'अंजनी (गीता)'चा छांदस पर्याय. काही चरणांत प्लुतींची जागा.

(५७) या अभंगाच्या सारखा एक अभंग जगमित्र नागाच्या नावावर आढळतो; पण बऱ्याच स्थळीं पाठ वेगवेगळे आहेत आणि नामदेवाच्या अभंगात दोन चरण अधिक आहेत. (पाहा, 'स० सं० गाथा नामदेव क्र. ६५८).

(५८) रंगीबेरंगी पताकांचे येथले वर्णन जुन्या मराठी कवितेत अपवादभूतच. अभंग 'देवद्वार'.

(५९) ज्ञानदेवाच्या अंतिम 'अनुभवाचे' वातावरण. 'देवद्वार'.

(६०) आर्त विनवणीचा प्रसिद्ध अभंग. 'देवद्वार'.

(६१) दृढ भक्तिभावाचा उत्कट आविष्कार.

(६२) कीर्तनसमाप्तीचा पारंपरिक अभंग. रूढ म्हणणी जरा दुगणीची असली तरी रचना 'देवद्वार' अभंगाचीच.

(६३) प्रसिद्ध आरती; लघुप्रयत्न-दीर्घप्रयत्न अशा मिश्र उच्चारणाची. जाती 'परिलीना'.

(६४) ज्ञानदेव समाधिस्थ होण्याचा प्रसंग. ज्येष्ठ व गुरू असूनही निवृत्तिनाथांच्या मनाची झालेली कालवाकालव एवढी समर्थपणे क्वचितच आविष्कार पावली असेल. 'देवद्वार' रचना.

(६५) ज्ञानदेवांच्या जिवंत समाधीनंतरचे वातावरण. यात जनमनाची कालवाकालव पडसादली आहे. 'देवद्वार' अभंग.

(६६) दोन चैतन्यांच्या भेटीचा, मुक्ताबाई-गोरोबा भेटीचा निसर्गानेही, कसा पडसाद उमटविला आहे! 'देवद्वार' अभंग.

(६७) 'खेळिया'चे कूटगीत. प्रारंभी, कूटगीतातील दिखाऊ विरोधाभासाचे रहस्य उकलून दाखविणारी गुरुकिल्लीच 'नव्हे तेंचि कैसे झालें' वगैरे विधानांत आहे. अनादि-अनंत, निर्गुण-निराकार चैतन्याचा-शून्याचा विश्वरूपाने दृश्य आविष्कार. मानवी साधक खेळिये होत; विश्वलीला-खेळ पाहत व त्यात आपापली भूमिका वठवीत; अनेक तऱ्हेच्या साधनेने अनेक मानुषी खेळिये जीवन्मुक्त झाल्याचे दृष्टांत यात आहेत.

अशा गीताची म्हणणी द्रुतगतीची लघुप्रयासी असते; धाटणी 'हरिभगिनी-फटका' जातीची. येथे नाममुद्रा 'विष्णुदासानामा' असली तरी हे गीत नामदेवाचे म्हणून स्वीकारले आहे.

(६८) आणखी एक कूटमय खेळिया गीत – चरणान्तीचा 'रे'कार नाच-खेळाचा सूचक. 'अणोरणीयान्' तोच 'महतो महीयान्' ही वेदान्ती कल्पना. जीवचैतन्य हा चिमुकला अंश-राईएवढे पांखरू! पण तोच परमहंसही आहे! जीवात्मा-परमात्मा, पिंड-ब्रह्मांड, जीव-शिव यांतील अभेदाचा साक्षात्कार शेवटी-शेवटी जवळजवळ स्पष्टपणेच उल्लेखिलेला आहे. पद्यरचना (६७) मधल्यासारखीच. मुद्रा मुक्त 'नामयाची' आहे.

(६९) प्रसिद्ध कूटगीत. यात 'लटिके-खोटे' वर्तमान नाही. अनिर्वेद्य सूक्ष्मातून विश्वनिर्मिती व अशाच प्राचीन वेदान्तनिष्ठ कल्पना यांवर आधारलेला 'विरोध-आभास – ॲपरन्ट कॉन्ट्रॅडिक्शन्'.

बहुधा सर्वत्र 'साकी-लवंगलता'चे चरण; प्रथम चरणात पर्यायाने 'पतितपावन-चंद्रकांत'. 'बाभुळीचे खोडीं'नंतर द्विमात्रक प्लुती; अनेक चरणांत त्वरितोचारी-लघुप्रयास रचना.

१७ : जनाबाई

मृत्युकाल सन १३५०. 'नामयाची दासी' जनी नामदेवानंतर लगेच मरण पावली. दमा नामक दास-शूद्राची ही मुलगी. 'प्रा० गी० भांडारा'त तेरा कवने; येथे आणखी आठ रचना.

(७०) चोरीचा आळ वर्णन करणारा 'देवद्वार' अभंग.
(७१) जनाबाईला बुद्धिबळे खेळता येत होती असे या अभंगावरून दिसते. 'देवीवर'.
(७२) 'जात्या'चे प्रसिद्ध रूपक; छांदस दीर्घोच्चारी रचना; 'बा'नंतर द्विमात्रक प्लुतीची धाटणी.
(७३) 'देवीवर' अभंगातली लोकप्रिय रचना.
(७४) ग्रामीण भाषेतील 'अ-शिष्ट' वाक्प्रचारांतूनही विरोधोक्तीने विठोबाचे मोठेपण सूचित. 'देवीवर' रचना.
(७५) लौकिक वाङ्मयात रूढ असलेली जलद द्रुतोच्चारी गौळण.
(७६) लोकप्रिय भजनी गीत-गौळण म्हणून प्रसिद्ध.
(७७) जनीच्या गरीब घरकुलाचे वर्णन असलेली जात्यावरील ओवीसारखी 'तुलसी' छंदातली रचना.

१८ : गोंदा

नामदेवाच्या मधल्या मुलांपैकी एक. (मोठा नारा.) याच्या फार रचना आढळत नाहीत.

(७८) शेजारतीचे प्रसिद्ध पद. अंत्यचरणात 'साकी-लवंगलता'ची धाटणी, बाकीच्यांत 'पतितपावन-चंद्रकांत' रचना; प्रथम चरणात 'झाली'नंतर खंडण व चार मात्रांचा विराम; पुढे छांदस दीर्घोच्चारी उच्चारण; अंत्यचरणात मात्र द्रुतोच्चारी अक्षरयोजना.

१९ : महादा

नामदेवांचा आणखी एक मधला मुलगा.

(७९) झोंड स्वजनांचाही विनाश व साधू भक्तांचा उद्धार हा विठ्ठलाचा 'जमान' येथे वर्णिलेला आहे. 'जमान' हा फारसी कुळातला शब्द चिंतनीय. अभंग-'देवद्वार'.

:२०: विठा

नामदेवांचा सर्वात धाकटा मुलगा. याची दोन कवने 'प्रा० गी० भाडारा'त आलीच आहेत.

(८०) व्यवहारातील मार्मिक दृष्टांतांनी विरोधोक्ती साधलेली आहे. 'देवीवर' अभंग.

:२१: आऊबाई

ही 'नामयाची बहिण'. हिच्या आणखी रचना उपलब्ध नाहीत.

(८१) नामदेवाच्या घरातल्या 'बायाबापड्या'ही कशा ब्रह्ममय झाल्या होत्या ते यात दिसते. मुख्य धाटणी 'देवद्वार' अभंगाची; पण कडव्याच्या अंताचा चतुरक्षरी गण भजन-कीर्तनातल्या चालीच्या अनुरोधाने यात वाढवलेलाही आढळतो. अंत्य कडवे बहुशः 'देवद्वारा'चे.

:२२: लिंबाई

ही 'नामयाची लेकी'. हिच्या आणखी फारशा रचना उपलब्ध नाहीत.

(८२) मोक्षाची आस लागल्यामुळे विठोबाची कास धरल्याचे आर्त उद्‌गार. अभंग 'देवीवर'.

:२३: सेना न्हावी

परंपरेप्रमाणे नामदेवकालीन संत-कवी. बहुधा मूळचा उत्तरेकडचा, पण पंढरपुरास राहून मराठी रचना केली असे दिसते. 'प्रा० गी० भांडारा'त याची दोन कवने आलेली आहेत. येथे आणखी तीन कवने संगृहीत.

(८४) व्यवसायावरून रूपक. आत्म्यावरील अज्ञानपटलाचे निरसन हीच 'हजामत'. 'वारीक' म्हणजेच नापित, पर्यायाने 'वारी करणारा' ज्ञानी भक्त.

(८५) प्रसिद्ध गौळण. भजनी गीत म्हणून लोकप्रिय. चाळक=चाळा करणारा किंवा चलाख.

:२४: गोरा कुंभार

जन्म सन १२६७. नामदेवकालीन वयोवृद्ध मान्यवर संत-कवी. 'प्रा० गी० भांडारा'त

एक रचना दिलेली आहे. येथे आणखी तीन रचना समाविष्ट.

(८८) गोरोबांनी मडके घडवायचे थापटणे घेऊन संतमंडळीची 'डोई' तपासली अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. थापटणे डोईवर हाणल्याने नामदेव कळवळला व 'नाम्याचे डोके कच्चे' असे मुक्ता उद्गारली असाही भाग त्यात आहे. यातले हे रूपक कुंभाराच्या व्यवसायावरून घेतलेले आहे. 'जोहरियाचे' म्हणजे जवाहिऱ्याचे, जव्हेऱ्याचे. पुढे रूपक बदलते. या कवनात मोठ्या 'देवीवर' अभंगाचा नमुना आहे. स्वरोच्चार काही जागी लघुप्रयास करायचा आहे.

१२५: सांवता माळी

मृत्यू सन १२९६. नामदेवकालीन प्रसिद्ध संत-कवी. याचे प्रसिद्ध 'कांदा-मुळा-भाजी' हे कवन 'प्रा० गी० भांडारा'त आलेले आहे.

(८९) 'जात'-व्यवसायावरून रूपक.

(९०) गवळ्यांनी स्वतंत्र निर्गुण परब्रह्माला भुलवून सगुण कृष्ण-रूपात बांधून परतंत्र केले, असा भावार्थ. षण्मात्रक ठेक्याचा 'प्राक्दिंडी' नमुना. पर्यायाने चाल अष्टमात्रक (धुमाळी) ठेक्याचीही होते. भजनी गीतगायनातली ही लकब आहे.

१२६: जगमित्र नागा

मृत्यू सन १३३०. नामदेवकालीन संत. 'प्रा० गी० भांडारा'त एक रचना दिलेली आहे. येथे आणखी एक कवन समाविष्ट.

(९१) पारंपरिक देवपूजनातील 'महाप्रसाद' वाटण्याच्या समारंभावरून आर्तोक्ती.

१२७: नरहरि सोनार

मृत्यू सन १३१३. नामदेवकालीन प्रसिद्ध संत-कवी. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना आहेत. येथे आणखी तीन रचना दिल्या आहेत.

(९२) सोनाराच्या व्यवसायावरून रूपक. दागिने घडविताना सोने 'चोरण्याची' सवय त्यावेळीही चालू होतीसे दिसते.

(९३) 'निगम' म्हणजे ब्रह्मज्ञान व तीच तेजस्वी वेल, असे रूपक. त्यावर ज्ञानी भक्तांची फुले डहुरली असा मथितार्थ. या कवनात 'झाडलोट' करण्याच्या प्रथेचा संदर्भ आहे. सोने-चांदीचे उडालेले सूक्ष्म कण झाडलोट करताना धुळीबरोबर जमवून मग धूळ धुवून सुवर्णकण मिळविण्याच्या-धूळधुण्याच्या-प्रथेचा तर येथे सूचित संदर्भ नसेल?

(९४) 'झाडलोट' करण्याचा उल्लेख या कवनातही आहे.

:२८: जोगा परमानंद

नामदेवकालीन संत. 'जोगा' स्वतःचे नाव, 'परमानंद' हे गुरूचे नाव. धंदा तेल्याचा.

(९५) गुरगुडी किंवा गुडगुडी – हुक्का. तिचे सांग रूपक येथे आहे. हे एक 'पद' असून त्यातील ध्रुवपदात मध्ये खंडन-विराम आहे. कडव्यात सोळा मात्रांचा एक असे तीन चरण व चौथा जलद उच्चारणाचा, आठ+दोन (गुरू) अशा मात्रिक नमुन्या… पहिले कडवे नमुनारूप.

:२९: वत्सरा

(९७) तीन अष्टाक्षरी सोळा-मात्रिक चरण व अंत्यचरंण सप्ताक्षरी-चौदामात्रिक, क्वचित अष्टमात्रिक-चतुरक्षरी. ध्रुवपद भजनी धून आहे; त्यात 'देवीवरा'ची मात्रावर्तनी छाया आहे. कडवी बहुशः भूपाळीसदृश चालीची.

:३०: धोंगडा

इ० स० चौदाव्या शतकातला, पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्त.

(९८) भजनी-कीर्तनी परंपरेतला प्रसिद्ध अभंग. 'देवीवर'.

:३१: कान्हो पाठक

हा ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतला असे मानले जाते, पण तो इ० स० चौदाव्या शतकातला असावा असे अभ्यासकांचे मत आहे.

(९९) गातो, नाचतो, पढतो म्हणून कोणी संत-योगी होत नाही, बाह्य अवडंबर (डंब) व्यर्थ होय; हा भावार्थ. या रचनेत 'अ'काराचा 'उ'कार झालेला आहे. तो त्या रचनेचे प्राचीनत्व सुचवितो काय? की तो केवळ ज्ञानेश्वरीय परंपरेचा परिणाम?

:३२: चांगा केशवदास

हा कवीही ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतला असे परंपरेने मानले जाते. पण याचाही काळ इ० स० चौदावे शतक होय.

:३३: बहिरा पिसा

हा प्रसिद्ध संत-कवी ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतच मोडला जातो. पण तोही इ० स०च्या

पंधराव्या शतकातलाच.

(१०१) 'देवीवर' अभंग.

: ३४ : भागु

हिची कवने 'भागु महारिणीचे अभंग' म्हणून गाथ्यात दिली गेली आहेत. ही इ० स० चौदाव्या-पंधराव्या शतकातली असावी. 'प्रा० गी० भांडारा'त हिच्या दोन रचना दिलेल्या आहेत.

(१०२) (१०३) अनुक्रमे 'देवद्वार' व 'देवीवर' अभंग.

: ३५ : चोखामेळा

मृत्यू सन १३३८. महार जमातीतील प्रसिद्ध संत-कवी. मंगळवेढ्यास गाववेशीचे कुसू बसवताना मृत्यू. अवशेष नामदेवांनी पंढरपुरास आणून समाधी बांधली अशी आख्यायिका. 'प्रा० गी० भांडारा'त चार रचना आल्या आहेत. येथे आणखी चार रचना दिल्या आहेत.

(१०४) बाजार-हाटाचे रूपक. दिन मावळण्याचा उल्लेख चोखामेळ्याला झालेल्या आपल्या अंत्य दिनाची जाणीव तर दर्शवीत नाही? माप सिगोसिग भरले म्हणजे पूर्ण आत्मज्ञान झाले.

षण्मात्रक धाटणीची प्लुतियुक्त 'परिलीना' जाती; पण चालपरत्वे चतुरक्षरी आवर्तनाची छांदस 'चंद्रकांत-पतितपावन'ही होईल; यातही अनक्षर विरामस्थाने येणारच.

(१०६) प्रसिद्ध भजनी अभंगरचना. 'देवीवर' छंद.

(१०७) चोखामेळ्याच्या पेशावरून रूपक. उष्ट्यामाष्ट्यासाठी याचना करीत 'जोहार-जोहार' म्हणत वेठ भरण्याची ही महार जमातीची तत्कालीन स्थिती. येथे मात्र तिचा उपयोग देवाच्या भक्तांचीही सेवा करण्याची उत्सुकता ध्वनित करण्यासाठी झाला आहे. अभंग 'देवीवर' छंद.

: ३६ : सोयराबाई

'चोखोबाची महारी'; पतीच्या मृत्यूनंतर लौकरच मृत्यू पावली. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना आहेत. येथे आणखी तीन समाविष्ट.

(१०८) पतिदेव गेल्यावरची देवाला घातलेली आर्त हाक.

(१०९) चोख्यावरच्या आळानंतरचा सुखसोहळा य़ात वर्णिला आहे. चमत्कारसदृश घटना.

(११०) 'महारी' असूनही सोयराबाई केवढी ज्ञानवती आहे ते पाहून आश्चर्य वाटते. 'पतिता'त स्वसामर्थ्याची (अर्थात आध्यात्मिक) जाणीव उत्पन्न करून भागवत संतांनी फार मोठी कामगिरी केलेली आहे हे यासारख्या रचनांवरून कळून येते.

: ३७ : निर्मळा

चोखोबाची बहीण; त्याच्या मृत्यूनंतर मरण पावली. 'प्रा० गी० भांडारा'त तीन कवने. येथे आणखी एक रचना.

(१११) 'कोणी गणगोत नाही' हे उद्‌गार चोखोबा-सोयरांच्या मृत्यूच्या संदर्भातही असावेत.

: ३८ : कान्होपात्रा

मृत्यू बहुधा सन १३३८ मध्ये झाला असावा; काहींच्या मते ती सन १३५३ मध्ये मृत्यू पावली असावी. इ० स०चे चौदावे शतक हा काळ परंपरानुरोधाने मानला आहे.

(११२) 'कृष्णाई-कान्हाई' अशा उद्‌गारांनी आर्तता दुणावते. यातीसंबंधी-वेश्येच्या पोटी जन्मल्यामुळे-अपवाद आल्याचा उल्लेख लक्षणीय. छांदस 'पतितपावन-चंद्रकांत'.

: ३९ : दामाजीपंत

सुप्रसिद्ध संत. बेदरच्या सुलतानाचे ठाणेदार अधिकारी. इ० स० चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेले.

(११४) 'दामाजीपंताची रसद' हे वर्णनपर काव्य ब्रह्मगिरीबुवांनी लिहिलेले प्रसिद्धच आहे. बादशहाच्या कोठारातील धान्य लुटविल्यामुळे आलेल्या आपत्तीचे निराकरण कसे झाले त्याची चमत्कारमूलक हकिकत. ध्रुवपद 'देवीवर' धाटणीचे; कडवी 'घनाक्षरी'च्या नमुन्याची.

: ४० : सुजात

इ० स० चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धातला कवी. जंगम संतकवी रामलिंगाचा हा शिष्य.

(११५) 'मिलाऊं' हे पद लक्षणीय. 'मिळाऊं'-'मिळवूं' या अर्थाने हा शब्द येथे आला असावा.

: ४१ : नयचंद्र

इ० स० चौदाव्या शतकाच्या प्रारंभीचा जैन कवी. 'रंभामंजरी' सट्टक (नाटक) ही

याची प्रसिद्ध कृती संस्कृत-प्राकृतात आहे, त्यात मध्येच 'जरि पेखिला' इत्यादी कवन आलेले आहे.

(११६) 'पेखिला' (प्रेक्षिला), 'भइला' (झाला), 'परिख्खतां' (परीक्षतां) वगैरे क्रियापदरूपे लक्षणीय. यात जैनचंद्र राजाचे वर्णन बंदीजन करीत असल्याचा प्रसंग आहे. जाति 'भूपतिवैभव' रचनेची धाटणी. 'जरि' इ० द्विमात्रक आद्यतालपूर्व.

४२ : नामा पाठक

अनेक 'नाम-देवां'पैकी हा 'पाठकनामा' आहे. इ० स० चौदाव्य शतकातील कवी.

(११७) कामवृश्चिकाच्या दंशाचे आवेग; पर्यायाने कृष्णाच्या प्रेमभक्तीचे निरूपण या गोपीगीतात आलेले आहे.

जाति 'हरिभगिनी'-फटक्याला जवळची, 'अंबा' जातीतील रचना. (पाहा, म० छन्दोरचना सूची)

४३ : एकनाथ

'एकाजनार्दनीं' या नाममुद्रेने लेखन करणारे एकनाथ बहुधा सन १५४८ मध्ये जन्मले व सन १५९९ मध्ये मृत्यू पावले असे मानतात. 'प्रा० गी० भांडारा'त यांची अठरा कवने दिली आहेत. येथे विविध प्रकारच्या रचनेची पस्तीस कवने आणखी दिली आहेत.

(१२१) या 'देवीवर' अभंगात 'उलटा अर्थ' असलेली उपमानविधाने आहेत. 'काखेत मुंडी' हे आत्मविलोपन-अहंभावनिरासाचे द्योतक व 'मेले डुकर खांदी' हे संसार नीरस-निर्जीव झाल्याचे सूचक असावे. होड=पैज, चढाओढ.

(१२२) नाथांचे सगुण-साकार भक्तीसंबंधातले प्रतीतीचे परखड बोल. आध्यात्मिक कूटगीतांच्या धर्तीची अभंगरचना. जगताचा मानीव पाया क्षणभंगुर आहे, कारण तो मायारचित आहे. मुंगी हे सूक्ष्मातिसूक्ष्म आत्मचैतन्य व त्यानेच महतो महान विश्वमंडळ झेलले आहे, सावरले आहे. मकुडा-(मुंगी?) हा असाच सूक्ष्म चेतनेचा द्योतक, जो स्थिरचर व्यापून राहिलेला आहे. मूर्तिरूप देव, बांधलेले देऊळ व त्याचा विशाल सभामंडप ही सर्व मूलचेतनेच्या तुलनेने नश्वर आहेत हा भावार्थ.

(१२३) व्यवहारात खुळ्याशा वाटणाऱ्या मागण्यांच्या साह्याने स्थूलाकडून सूक्ष्माकडे, सृष्टाकडून मूलतत्त्वाकडे गती ध्वनित केलेली आहे. यापैकी 'भिंगरी'चे रूपक नाथांनी एका भारुडात स्वतंत्रपणे योजिलेले आहे. गोंधण=चौकट (?) लाकडी कवाड (?). 'देवीवर' धाटणीचे मात्रावर्तनी त्रिचरणी गट.

(१२५) हे प्रसिद्ध गीत 'खेळिया' गीत म्हणूनही प्रातिनिधिक आहे. दिंड्यापताकांसह

वैष्णव पंढरीस नाचतनाचत जातात ते दृश्य यात वर्णिलेले आह. गाथ्यात प्रारंभ 'जनींवनीं'पासून आहे, पण रूढ लौकिक म्हणणी 'नाचत पंढरीसी जाऊ०' अशी असून येथे ती स्वीकारलेली आहे.

ध्रुपदात खंडित द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटका' रचना; दुचरणी कडव्यातही द्रुतोच्चारी धाटणी.

(१२६) प्रसिद्ध भजनी-कीर्तनी पद.

(१२७) सुप्रसिद्ध 'रामाचा धावा'. या पद्यावरूनच जाति 'दीनवत्सल' ही संज्ञा आलेली आहे. 'आरती ज्ञानराजा०' या आरतीचीही चाल 'दीनवत्सल' जातीची आहे.

(१२८) 'कृष्णाचा धावा' म्हणून प्रसिद्ध असलेले गीत. एकनाथी गाथ्यात असलेले हे पद 'उद्धवचिद्धना'च्या नाममुद्रेने रूढ असलेले आढळते. गाथ्यातील गीतात 'एका जनार्दन' ही मुद्रा आहे. यातील जातिरचनेचे तांत्रिक नाव आहे 'मृगपंक्ति'.

(१२९) हे पद लौकिक गीत म्हणूनही रूढ आहे. अंती 'एका जनार्दनी' नाममुद्रा असल्यामुळे येथे नाथांचे म्हणून दिलेले आहे. भाषा खेडवळ बोलीची आहे. कृष्णाच्या बालक्रीडेतला एक अत्यंत आवडता प्रसंग – यशोदेचे कृष्णाला रागे भरणे – यात आहे.

'उद्धवा शांतवन०'ची चाल असलेली 'उद्धव' जाती. ('रडत माझे०', स० सं० गाथा एक०, पृ० ५०३)

(१३०) लौकिक रीत्या प्रसिद्ध गौळण. कोल्हाटणीच्या फडातील गीताचा डौल व चाल.

(१३१) या कृष्णगीतात कृष्णाचा सूर्यासाठी हट्ट वर्णिलेला आहे. लौकिक गोष्टीत रामाचा चंद्रासाठी हट्ट आलेला आहे. पदातले काही शब्द लयदृष्टीने वाढवून घेतले आहेत.

(१३२) प्रसिद्ध गवळण, लोकप्रिय स्त्रीगीत; जाती 'उद्धव' अंतऱ्यात; ध्रुपदही जवळजवळ तसेच, पण चाल वेगळी; वैशिष्ट्यपूर्ण.

(१३३) लौकिक पाठातली गौळण. बाळा बहिरूची जवळजवळ अशीच रचना आहे.

(१३४) प्रसिद्ध भजनी गौळण, ध्रुपद 'साकी-लवंगलता' जातीचे; कडव्यातील दुचरणी अंतरा 'पादाकुलक' जातीचा व नंतरचा मेलापक चरण पुन्हा 'साकी-लवंगलता'मधील.

(१३५) आणखी एक लोकप्रिय गौळण. पाचही रंग एका नाथात (कृष्णात) एकरस अभंग. विविध मनोरंग एका ब्रह्मतत्त्वात एकरूप.

चाल नृत्यगानाला अनुकूल अशी, षण्मात्रक तालातून अष्टमात्रक तालात सहजी परिवर्तन पावणारी; प्राकृदिंडीचे स्वरूप चरणाचरणात.

(१३६) खेळिया गीतातील भारूड. बालकृष्णाच्या लोभसवाण्या रूपाचे स्वभावोक्त वर्णन. द्रुतोच्चारी हरिभगिनी-फटका जातीतली 'फेराच्या गाण्या'ला अनुकूल अशी रचना.

(१३७) प्रसिद्ध रूपक-भारूड. 'भोवरा' म्हणजे खेळातला लाकडी भोवरा. पण 'राधिकेचा नवरा' कोण? येथे कोणा 'अनया'चा संदर्भ गैरलागू दिसतो – केवळ

'भोवरा'-पदाशी प्रास जुळवण्यासाठी तर 'नवरा' नाही? अन्यथा अहं-जीवात्मा हाच फक्त 'निज'भक्ताचा नवरा म्हणजे स्वामी; सुमूर्तसाकार 'नवरा' (कामसुख देणारा) शंकराच्या तृतीय नेत्राने जाळून टाकला म्हणजे शिव-आदिनाथ रूप ब्रह्माच्या साक्षात्काराने सगुण-साकारात – मायेत – गुरफटलेला 'आत्मा' ब्रह्मानंदी टाळी लागून थयथय नाचू लागतो व तो हरिहरांच्या विश्वनृत्यात 'नाद' देतो, ताल देतो; बेताल सृजन तालबद्ध-आनंदमय होते.

रचना काहीशी 'भुवनसुंदर' जातीला जवळची, पण निश्चित असा नमुना नाही; भोवऱ्याच्या गिरक्यांसारखे मुरक्या-खटके येण्यास अनुकूल अशी चाल अभिप्रेत दिसते.

(१३८) अतिशय लोकप्रिय भरूड; यातही वेदांती रूपक आहेच, संसाररूपी घर मोडकळीस आलेले आहे-क्षणभंगुर (मायानिर्मित) आहे, खरे घर ब्रह्मरूप होय. त्यानंतर फाटकी लुगडे-चोळी, कोरडी भाजी-भाकर, तुटका नवारीचा बिछाना, हिणकस सोनेलेणे, इत्यादी सांसारिक गोष्टींचे रूपकात्मक वर्णन असून, पुढे म्हटले आहे की अशा संसारात मायामूढ अहंरूपी दादल्याशी मी जीवात्मकला कशी नांदू? शेवटच्या चरणात कोड्याचा उलगडा आहे : 'तो रस'-ब्रह्मरस-नसलेले जीवन व्यर्थ होय.

जलद भजनी तालातली चाल; प्रास-विरामयुक्त मोठा चरण 'साकी-लवंगलते'चा; छोटा चरण 'उद्धव' जातीचा. द्रुत स्वरोच्चाराची रचना.

(१३९) कोल्हाटी खेळाचे रूपक. मुळात कोलाट-कोल्हाट हा आंध्र-तेलंगप्रांतीय लौकिक नृत्यगानात्मक खेळ; पुढे त्यालाच डोंबाऱ्याच्या खेळाचे रूप आले. मायारूपी ठसठशीत कोल्हाटणीच्या मोहात आत्म-जाण विसरून गेलेला प्रापंचिक आत्मा योग्य गुरूवाचून शुद्धीवर येणे अशक्य. पदामधील लोकप्रिय जाती 'शिवराय'.

(१४०) लग्नसमारंभात हळदीनहाण असते त्यावेळी नवरानवरी एकत्र हळद-उटी लावून न्हातात तो प्रसंग. लोकोक्तीचा उपयोग नाट्यात्म आहे. हळदी रंगाने माखलेल्या नवरा-नवरीऐवजी येथे विरोधाभासाने विवस्त्र नवरानवरी आहेत. कृतिगतिशील नाट्य या सोंगात आहे. पुरुष-प्रकृतीवरचे साम्यारोपण ध्वनित केलेले आहे.

(१४१) डौर : डमरू वाजविणारा. तो काळमुख असतो. त्याचा डेरा ठोकलेला आहे. हा डौर अनाहत नादाचा सूचक आहे. काळमुख=काळे मुख असलेला, पक्षी काळाचे मुखच आहे असा.

(१४२) पाखरू म्हणजे सूक्ष्म आत्मतत्त्व; सगुण-साकार कृष्णरूपाने तेच गोपगोपी-जनांच्या – 'गड्यां'च्या – सभोवती वावरते आहे. बाकी कूटपसारा निर्गुण ब्रह्मवर्णनाचा, विरोधाभासमूल पसारा.

जातिरचना : द्रुतोच्चारी धाटणीची 'प्रियलोचना', 'हरिभगिनी' – फटक्याला जवळची. अंत्य त्र्यक्षरी गटात मध्याक्षर लघू आले की 'हरिभगिनी'ची 'प्रियलोचना' जाती बनते. तशी 'अंबा' नमुन्याची रचनाही आहे – अंत्य त्र्यक्षरी गटात प्रथमाक्षर लघू आले असता होणारी रचना. (पाहा – 'मराठी छंदोरचना').

(१४३) गाथ्यात नाथांचे म्हणून दिलेले हे प्रसिद्ध पद श्रीधराच्याही नावावर दिलेले आढळते. आध्यामिक कोडे म्हणजे नाथाच्या (परब्रह्माच्या) घरची (निजगुह्यज्ञानात्मक)

खूण, म्हणजे इंगित होय. पदात अनेक विरोधोक्त विधाने आहेत व त्यातील कूटाची गुरुकिल्ली म्हणजे गुह्यज्ञान – वेदांती ब्रह्मज्ञान.

आरतीच्या षण्मात्रक 'परिलीना' जातीचेच एक वैचित्र्य यात बहुशः आहे, चरणमध्यात खंडन व पुढे द्विमात्रक प्लुती अशी स्थळे अनेक आहेत.

(१४४) अत्यंत प्रसिद्ध असे कूटगीत. प्रारंभिक रूपातले असेच एक गीत ज्ञानेश्वरांचे म्हणून यापूर्वी आले आहे (क्र० ३७), ते स० सं० गाथा-ज्ञान० क्र० ७५८ चे आहे, एकनाथी गीत नाथांच्या इंदुप्रकाश प्रेसच्या गाथ्यात (पृ० ३१४ वर) आहे.

(१४५) काकडारतीचे पारंपरिक पद. जाती 'पतितपावन-चंद्रकांत'

(१४६) प्रसिद्ध गोंधळगीत. त्या रचनेतले अंत्य लयखंडाचे वैचित्र्य '⏑ --' असे आहे. ते 'मराठी छंदोरचने'त 'अंबा' जाती म्हणून, यासारख्या गोंधळगीतावरून दिलेले आहे. यातही अंत्य चरणात 'अंबा'चा उल्लेख आहेच.

(१४७) प्रसिद्ध 'जोगवा' रूपक. म्हणणीच्या चालीच्या अनुरोधाने पाहता यात षण्मात्रक आवर्तने आढळतात, खंडित 'परिलीना' – किंवा असेच काही वैचित्र्य.

(१४८) 'रोडगा' रूपक म्हणून अतिशय लोकप्रिय. यात आध्यात्मिक विरोधोक्ती आहेच. सासरा, सासू, जाऊ, नणंद वगैरेंचा जाच उपमानार्थ घेऊन अहंकार, माया, इंद्रियासक्ती, कामक्रोधादी भावना-वासना यांची उपमेये आहेत.

मुख्यत्वे त्वरित गतीची 'साकी'-'लवंगलता' कडव्यात, ध्रुपदांत खंडित अंतःप्रासी रचना.

(१४९) भवानीमातेचा गोंधळ; प्रसिद्ध 'राष्ट्रीय'-सदृशगीत; रचना संमिश्र – क्वचित पादाकुलकी चरणांचे अंतरे; 'देवीवर' चरणांची कडवी, प्रारंभी ओवी-घनाक्षरीसदृश रचनाबंध. एकंदर कवन गोंधळी लांबण असलेले प्रदीर्घ गीत.

(१५०) किल्ल्याचे मार्मिक वैशिष्ट्यपूर्ण रूपक. वीररसात्मक पोवाड्याचे पूर्वरूप. शिवकालातल्या एखाद्या किल्ल्याच्या वेढ्याचे व पतनाचे वर्णनच जणू यात आलेले आहे. पोवाडा धाटणीची 'देवीवर' चरणाची कडवी.

(१५१) हे पद नाथांचे म्हणून गाथ्यात आहे; पण तसेच एक गीत ज्ञानेश्वरांचे म्हणूनही दिलेले आढळते. जाती 'केशवकरणी' – 'लावणी' छंद.

(१५२) गुरुदत्तांची प्रसिद्ध आरती. चरणांतर्गत खंडन व प्लुती आणि लयबद्ध खटक्यांची शब्दयोजना लक्षणीय. आरतीची 'परिलीना' जाती. क्वचित खंडित चरणयोजना.

:४४: जनी जनार्दन

नाथपंचकातले एक प्रसिद्ध कवी. आईचे नाव 'जनी' व गुरू जनार्दनस्वामी यामुळे 'जनी' आणि स्वतःचे नावही जनार्दन; त्यामुळे जनीजनार्दन हे जोडनाव रूढ झाले.

(१५३) नीटस शब्दरचनेचा ध्रुपदनिष्ठ पदप्रकार.

:४५: रामा जनार्दन

जन्म-मृत्युकाल अनिर्णीत. एकनाथकालीन संत. नाथपंचकातील एक कवी. येथे दिलेल्या ज्ञानेश्वर-आरतीमुळे भक्तिसाहित्यात अमर.

(१५४) ज्ञानेश्वरांची आरती. वारकरी पंथात अतिशय प्रसिद्ध. जाती 'दीनवत्सल'.

:४६: विठा रेणुकानंदन

एकनाथकालीन कवी. 'नाथपंचका'त समाविष्ट.

(१५५) यात अभंगाचे एक वैचित्र्य आहे. 'देवद्वार' रचनेत अंत्य दिडका चरण चतुरक्षरी असतो; येथे तो अष्टाक्षरी आहे.

:४७: त्र्यंबक

एकनाथकालीन कवी. अन्य माहिती विशेष उपलब्ध नाही.

(१५६) लोकप्रिय गीत. स्त्रीगीत म्हणूनही ज्ञात. रचना काही ठिकाणी द्रुतोच्चारी. जाती षण्मात्रकावर्तनी 'धवलचंद्रिका'.

:४८: कृष्णदास मुद्गल

एकनाथकालीन कवी. ओवीबद्ध ग्रंथ, तसेच काही स्फुट कविता.

(१५७) यातली शब्दरूपे बोलीभाषेतली आहेत. जाती 'समुदितमदना'.

:४९: फादर स्टीफन्स

जन्म १५४९; मृत्यू १६१९. गोव्याच्या किनाऱ्यावर इ० स० १५७९ मध्ये उतरला. पोर्तुगीज 'Discurso-de Jesu Christo' प्रथम रचले व मग इ० स० १६१४ मध्ये त्याचा मराठी अनुवाद स्वतःच केला. या ख्रिस्त-वृत्तांताला 'पुराण' नाव इ० स० १६४९ त फादर गास्पर मायगेल याने दिले. दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी. या 'पुराणा'तला एक उतारा येथे दिला आहे.

(१५८) मराठीच्या प्रशस्तिपर ओव्या. यातला मराठमोळा घरगुतीपणा मनोवेधक आहे. आदिपुरुष-पहिला पुरुष-आदम (आदाओ). ज्ञानेश्वरी ओवी-एकनाथी ओवी यात दिसते.

:५०: फादर मानुएल ज्याकिस द नोरोंज

फादर स्टीफन्सनंतरचा हा जेसुइट कवी. जन्मस्थान गोव्यातले सांखवाळ व रहिवासी आरोसी गांवचा. ख्रिस्ताचे क्रूसारोहण व माता मेरीचा पुत्रशोक वर्णन करणारे 'क्रिस्ताचे यातनागीत' याने लिहिलेले प्रसिद्ध झाले आहे.

(१५९) "क्रिस्तु क्रुसा होउनी उतरुनि निखेपिला : (ते अवस्वरी) दुखस्त मातेचे आणि येरांचे विलाप" अशी टीप या शोकगीताच्या आरंभी दिलेली आहे. क्रिस्ती संप्रदायाप्रमाणे हे 'पॅशन्' म्हणजे ख्रिस्ताच्या यातनांचे वर्णन करणारे गीत आहे. यातली भाषा तत्कालीन गोव्यातली बोलीभाषा आहे. येथे दिलेल्या उताऱ्यात बहात्तरपैकी बावीस कडवी घेतली आहेत. पहिल्या भागात कवी प्रसंग वर्णन करतो व पुढे दुःखी मातेने पुत्राला तशा स्थितीत पाहून डोळ्यांतून अश्रू ढाळीत केलेला विलाप आहे.

रचनाशैली महदंबेचे 'धवळे' किंवा पारंपरिक वटसावित्रीगीत म्हणताना आढळते तशी आहे. खंडित अंतर्गत प्रास असलेल्या चरणांच्या सयमक द्विपद्या. चरणान्त्य अक्षर सभार-सताल. आराखडा जलद गतीच्या 'पतितपावन'-'चंद्रकांता'चा.

:५१: मुक्तेश्वर

प्रसिद्ध 'महाभारत'कार कवी. एकनाथाच्या मुलीचा मुलगा. जन्म बहुधा सन १६०९. याची बरीच स्फुट रचना उपलब्ध आहे.

(१६०) भजनी-कीर्तनी धाटणीचे, सुबद्ध रचनेचे पद. जाती 'यजमान'. 'तू माझा यजमान' या प्रसिद्ध पदाची चाल.

(१६१) संसारातली कटकट व्यक्त करणारी रचना. अनेक शब्द लक्षणीय : 'बघारेली'=फोडणी दिली; ढोकळे=प्रसिद्ध गुजराती तिक्त पदार्थ; 'रायपुरी'=साखर; सातरी=सात दिवसांचा गट; भोरण्या=अंगावर हळूहळू बुक्के मारणे. आंग हळुवार चिमटून काढणे. रचना अत्यंत द्रुत गतीची, लघुप्रयत्न उच्चारणाची 'साकी-लवंगलता'.

:५२: मेघराज

मेघराज व कामराजु दोघेही गुरुबंधू. इ० स० पंधराव्या शतकातले गुजरात-मारवाडचे जैन कवी.

(१६३) हे गमतीचे गुजराती-मऱ्हाटी गीत आहे. भाषा जुनी गुजराती व जुनी मराठी संमिश्र आहे. त्या काळातही मराठी नाचन पोरी नऊवारी लुगडे नेसत असे दिसते. इतर उखाळ्या-पाखाळ्याही गमतीच्या आहेत. गिरनारयात्रेला निघालेल्या दोन जैन 'संघा'तील स्त्रियांचा हा संवाद आहे.

५३ : कामराजु

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धातला गुजराती-राजस्थानी जैन कवी. 'फल्गु'-'फागु' म्हणजे वसंतवर्णनाचे गीत. जैन अपभ्रंश व जुनी गुर्जर-राजस्थानी भाषा यांत 'फागु'-काव्ये खूप आहेत. जैन 'फागु'काव्यात जिन किंवा त्याचे पूर्वावतार यांचे वर्णन असते, म्हणजे येथे 'फागु' याचा मथितार्थ स्तुतिपर काव्य किंवा धर्मवर्णनपर कवन एवढाच होतो. कामराजूची दोन 'फागु'काव्ये मराठीत आहेत. दुसरे 'धर्मफागु' ही प्रदीर्घ पोवाडेवजा रचना आहे.

(१६४) प्रस्तुत जैन धर्मीय आध्यात्मिक रूपकात पिंजऱ्यात अडकून पडलेल्या राघो-(जीवा)चे वर्णन आहे. पांजरा=पिंजरा; दारोठे=दारवंठे, दरवाजे; निरन्ती=गुजराती 'निरांत', निवांतपणा; अनाथ=हे 'अनाहत'चे लौकिक रूप होय; गाथला=गाठला, प्राप्त करून घेता झाला.

यात चारँ चार् चरणांची चौदा कडवी आहेत; चरणबंध लवचिक उच्चारणांच्या 'पतितपावन'-'चंद्रकांत' जातीचा.

(१६५) जिनेश्वराचा जीवदयाधर्म वर्णन करणारे पोवाडेवजा 'फागु'गीत. प्रथमतः जिनेश्वराबरोबरच गणधरालाही नमन आहे.

५४ : ब्रह्मगुणदास

ब्रह्मजिनदासांचे शिष्य. गुणकीर्ती कवीचे समकालीन -- जरा नंतरचे; म्हणजे इ० स० पंधराव्या शतकाचा मध्य काल.

(१६६) भगवान जिनदेवांचा धावा.

५५ : गुणकीर्ति

ब्रह्मचर्यकाळात जे 'ब्रह्म'गुणदास होते तेच पुढे आचार्य गुणकीर्ती झाले असे डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे 'प्राचीन मराठी जैन साहित्य'मध्ये सांगतात. 'पत्रपुराण', 'धर्मामृत' ही यांची इतर गीते.

(१६७) व्यवहार-धंद्याचे पापरूप.

५६ : मन्मथ शिवलिंग

जन्म सन १५६० साली बीड जिल्ह्यातील नेकनूर-निन्नवूर गावी; जिवंत समाधी सन १६१३ साली कपिलधार येथे. कर्मभूमी बार्शी-बारसी व त्यानजीकचा

मराठवाड्याचा प्रदेश. गुरूचे नाव नागेश-नागनाथ. 'मन्मथस्वामी' असा नामोल्लेख आहे. बहुशः 'मन्मथ शिवलिंग' ही नाममुद्रा. लिंगायतपंथी शैव भक्त. याची बरीच रचना मराठीत आहे, पण 'लावणी' म्हणून दिलेली ही एकच कृती.

(१६८) 'धने धने ऐसी कराडे नगरी' हे कवन बाडात 'लावणी' म्हणून दिलेले आहे. ती सन १६०० च्या पूर्वीची असल्यामुळे हीच सर्वात प्राचीन 'लावणी' होय. यात प्राचीन कराडे (कऱ्हाट) नगरीतील राजा वासुदेवाची कहाणी आहे.

रचना शाहिरी धाटणीची; लौकिक बोली कायम आहे. सर्वसाधारण पद्य-नमुना 'भूपती'-जातीचा द्रुतोच्चारी म्हणणीचा आहे.

(१६९) एक वैशिष्ट्यपूर्ण आरती. चाल पुढे प्रसिद्धीस आलेल्या 'भुवनसुंदर' आरती-जातीची.

(१७०) यात चौरंगाचे रूपक आहे. देहाचा चौरंग करून त्याला नानाविध कलाकुसरीचा जडाव केलेला आहे. यातील 'केव्हांची' या पदाऐवजी काही वेगळा पाठभेद असला पाहिजे-'केव्हां ये', 'केव्हा यई' असे असावे. 'नामाचा प्याला' पिण्याचा संदर्भ चौरंगाशी जुळण्यास तत्कालीन खानपानाच्या रीती-सवयी, माहीत व्हावयास हव्यात. नाममुद्रा फक्त 'शिवलिंग' अशी आहे; तरीही ते पारंपरिक पद मन्मथ शिवलिंगाचे आहे असे समजले जाते. मराठीतील खास जुनी 'अभिमन्यु' गीताची चाल व जातिरचना.

:५७: चिमणा पंडित

जन्ममृत्युकाळ अज्ञात. सन १६०० नंतर लेखन. धर्माने जैन. लातूरच्या भट्टारकपीठाचे अधिपति अजितकीर्ति हे चिमणाकवीचे गुरू. 'अनंतव्रत कथा' हे आख्यानकाव्य व इतर स्फुट रचना.

(१७१) 'खेळिया' गीतपरंपरेत केलेली रचना. मुगति=मुकति-मुक्ति; 'स्याद्वाद' हा जैनमताचा वैशिष्ट्यपूर्ण असा तत्त्वविचार आहे. 'जिनवर' हा अंत्य तीर्थंकर जिनाचा उल्लेख आहे. खेळिया गीताची द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटका' जाती.

:५८: तुकाराम

जन्म सन १५९८ किंवा १६०८; मृत्यू सन १६४९. याची बेचाळीस कवने 'प्रा० गी० भांडारा'त दिली असून आणखी चोवीस रचना येथे दिल्या आहेत.

(१७२) 'शब्द' या साधनाचे महत्त्व व कार्य सांगणारा अभंग.

(१७४) 'तुझें आहे तुजपाशीं'अशी तुकारामोक्ती रूढ आहे. पण संपूर्ण अभंग 'तुझा देव तुजपाशीं' अशा पाठांतराचा उपलब्ध झाला आहे.

(१७८) गायकी-भजनातला लोकप्रिय अभंग.

(१८०) यात आनंदसंप्रदायाची सूचक 'आनंदाचा डोह'-'आनंदतरंग' वगैरे शब्दसंहती आहे की काय? चालू काळात गायकांनी पुन्हा प्रसिद्धीस आणलेली मधुर रचना.

(१८२) भानुदासाच्या एका कृतीत तारू-जहाज उपमान आहे. येथे तसेच आहे. वाणी-उदीम करीत असल्यामुळे जहाज-तारवांची विशेष माहिती असेल काय?

(१८३) यापासून पुढे (१८८) पर्यंतची कवने सामाजिक व्याजोक्ती-विरोधोक्तीची आहेत.

(१८३) यामधला 'मोलें घातलें रडाया' हा सामाजिक अनुभव तत्कालीन गुर्जर व्यापारी मंडळींच्या सामाजिक रूढीचे चित्रण करणारा तर नसेल?

(१८४) प्राण्यांच्या संवादातून व्यावहारिक ज्ञानाचे दर्शन या अभंगात मार्मिकपणे साधलेले आहे. बलिष्ठांच्या सिद्ध-साधकपणाला कनिष्ठांनी खूणगाठ पटवून देणारा जबाब दिल्यासच तरणोपाय होईल. बुवांनी येथे दोन ठकांना परस्परसंमुख उभे करून बहार साधली आहे.

(१८५)-(१८६) मध्ये 'मूळ स्वभाव जाईना' हे व्यावहारिक सत्य प्रथम गाढवाच्या व नंतर वाघ्या (कुत्र्या) च्या दृष्टान्ताने स्पष्ट केले आहे.

(१८६) हे कवन तर मराठीतले एक कलदार चलनी नाणेच बनलेले आहे.

(१८७) बाहेरून विधिपुरस्सर वर्णन पण अंतरी पापाची वासना असा व्यवहारातला ढोंगीपणा बुवांनी पडखर शब्दांत वर्णिला आहे.

(१८८) व्यावहारिक संभाषणात 'बोलाचीच कढी, बोलाचाचि भात' कसा असतो हे प्रथम वांझेने आणलेल्या गर्भारपणाच्या ढोंगाच्या वर्णनाने दर्शवून मग 'साखर' असा नुसता शब्द कागदावर लिहिला तरी त्यात मधुर गोडी आणता येत नाही या उदाहरणाने खोट्या मोठेपणाच्या सोंगाचा धिक्कार केला आहे. 'जळो जळो ते महंती'!

(१८९) या अभंगात गर्भारपणाच्या ढोंगाचे रूपक समग्र आहे.

(१९०) या गीतातले 'कोडे' तसे उलगडण्यास फारसे कठीण नसताही तुकोबांनी ग्रामीण बोलीतून आपली घृणा व्यक्त केली आहे. याचे या काळात तरी नवल वाटते. पण 'नुगवे तो झवे आपुली आई' या उद्‌गारात केवळ शपथोद्‌गार आहे असे मानल्यास हे वचन अकारण कडक वाटणार नाही. 'उगवणे' म्हणजे रुजणे-फुलणे व समजणे, आणि 'गुंफोनि राहणे' म्हणजे गुंफले जाणे व गुंतून पडणे, व 'अंगावर कळी येऊ देणे' म्हणजे अभिमानाने फुलून-फुगून जाणे असे पर्यायी अर्थ येथे संभवतात. यात श्लेषमूलक उपदेश आहे. मूळ उपमान वेल फुलून कळी येणे व माळेत गुंफले जाणे हे आहे. रचना 'साकी'-'लवंगलता' जातीची. 'कोडें रे कोडें' हा चरण खंडित, विरामयुक्त.

(१९१) या गीताची धाटणी खेळिया-कूटगीताची आहे. अनेक विरोधोक्तींनी प्रपंचाची आसक्ती कशी व्यर्थ आहे ते सुचविलेले आहे. ध्रुवपदातला 'राघो' म्हणजे 'प्राण, आत्मा'. 'डोंगरीं दिवा लागो' म्हणजे 'मायामोहांनी अंधारलेल्या वैराण डोंगरमाथ्यावर आत्मज्ञानाची दीपिका उजळत ठेव' असा भावार्थ. अंत्य चरणात 'म्हणा' क्रियापदाचे कर्म अनुक्त ठेवले आहे असे वाटत नाही. ते अलिखित राहिले असावे. म्हणून

'विठ्ठल'-पद सुचविले आहे, तेथे 'राम' ही अतिशय चपखल बसते.

(१९२) या पदातली गाय मायही आहे – दूध देऊन वाढवणारी म्हणून. ही गाय-माय कृष्णाई-विठाई होय – वान-वर्ण सांवळा, नाव श्रीधरा! जोगविते – जगविते. अभंग 'देवद्वार'. पण पर्यायी म्हणणी खेळिया गीतासारखी असावी. तेव्हा रचना द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटक्या'ची होईल.

(१९३) एकनाथाच्या 'नाचत पंढरीसी जाऊं रे खेळिया' या खेळिया गीताशी तुकारामाच्या प्रस्तुत खेळिया गीताचे जवळचे नाते आहे. पंढरपूर गावचा मोकाशी म्हणजे कान्हा-निळोबा. चवथ्या चरणात 'विधांव' असा पाठ रूढ दिसतो. पण त्याऐवजी 'निधाय' असा पाठही आढळतो. दोन्ही पाठांचा भावार्थ 'मोक्ष पावले' हा आहे. तुकारामाच्या नावावर दुसरे गीत आहे, 'बाराही सोळा गडियांचा मेळ', व त्याचे पालुपद एकनाथी पदासारखे आहे. या संग्रहात फक्त एकनाथांचे पद दिले आहे. रचना 'खेळिया' गीताची, जाती 'हरिभगिनी-फटका', उच्चारण लघुप्रयास.

(१९४) लौकिकरीत्या रूढ रचना. 'केशवकरणी' या लावणीच्यासारखी.

(१९५) विरहिणी गोपीच्या मनातला भाव भक्त तुकोबाला बरोबर पटला. येरांना त्याचे काही वाटले नाही. जाती छांदस-मात्रिक मिश्र 'पतितपावन-चंद्रकांत.'

:५९: कान्होबा

तुकारामाचा धाकटा भाऊ. 'तुकया बंधु' अशी नाममुद्रा. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना. येथे आणखी एक.

(१९६) मनुराजा=मन, पदाच्या उत्तरार्धात रूपकाचा बराचसा उलगडा आहे. रचना जलद उच्चारणाची. षण्मात्रक प्राकृदिंडी.

:६०: बहिणाबाई

जन्म सन १६२८, मृत्यू सन १७००. तुकारामाची संत शिष्या. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना. येथे आणखी चार.

(१९७) मराठीतल्या या प्रसिद्ध अभंगाच्या कर्तृत्वाबद्दल दुमत आहे. 'बहिणी म्हणे' वगैरे अंत्यचरण सोडून उरलेला भाग, त्यांतला 'तुका झालासे कळस' हा उल्लेख मुद्रा वाटल्यामुळे, तुकारामाचा म्हणून गाथ्यात आला आहे. पण तुकाराम स्वतःचा गौरव करणे जरा अवास्तव वाटते व 'बहिणी म्हणे' अशा मुद्रेचा पाठ उपलब्ध आहे, म्हणून तो बहिणाबाईचा म्हणून अनेक अभ्यासकांनी स्वीकारलेला आहे. तुकारामी पाठात व येथल्या पाठात आणखी काही किरकोळ पाठभेद आहेत.

(१९८) सौरी ही मुळात निलाजरी, पण काजळकुंकू लावून गरतीचा आव आणते व माणूस भुलतो. लटक्या आसक्तीच्या भरीस मन पडते, पण ते त्याला उमगत नाही. 'धुमस=धुमकुस; धुमाळी, नाच, गोंधळ.

(१९९)-(२००) ही दोन्ही कवने तंजावर सरस्वतीमहालामधील वह्यांतली आहेत. अशुद्ध पाठ जुळवून घेतले आहेत.

:६१: निळोबा

सन १६५८ च्या सुमारास विद्यमान होता. तुकारामाचा प्रमुख शिष्य व शेवटचा वारकरी संत. तुकारामाच्या गादीचा मान, म्हणूनच, याच्याकडे आला. 'प्रा० गी० भांडारा'त चार रचना; येथे आणखी तीन.

(२०१) एक अप्रसिद्ध अभंग. एकनाथाच्या घरी दत्त चंदन उगाळतो व पहारेकऱ्याचेही काम करतो. 'दत्त' म्हणजे नेमलेली; हे 'द्रस्त' असेल काय?

(२०२) 'अंबुला'=नवरा. एक कूटगीत.

(२०३) मृदंगपाट्या नावाच्या खेळावर कूटमय रूपक. 'कोडिया'त पडू नको हा उल्लेख लक्षणीय.

:६२: प्रेमाबाई

जन्ममृत्युकाळ अज्ञात. बहुधा वारकरी संप्रदायातली असावी. हिची गीते दक्षिण कोकणात व गोव्यात विशेषत प्रचलित आहेत व तिचे नावही त्या प्रदेशाचे सूचक आहे, म्हणून ती कोकणी-कारवारी असावी असा ग्रह होतो. 'प्रा० गी० भांडारा'त हिला 'बहिणाबाईची शिष्या' म्हटले आहे ते चुकीचे. नामदेवाच्या काही रचना व हिच्या रचना यांत शब्दसंहती व बांधणी यांचे खूप साम्य आहे. 'प्रा० गी० भांडारा'त हिची दोन पदे व एक संभाव्य पद अशा तीन रचना आल्या आहेत. येथे आणखी दोन रचना दिल्या आहेत. महीपतिबुवांनी 'भक्तलीलामृता'मध्ये हिला संसारी, पुत्रवती, पण कृष्णभक्तीने आर्त झालेली दाखविली आहे. (अ० ४२).

(२०४) ही एक प्रसिद्ध रचना आहे. भजनी मंडळात खूप लोकप्रिय. 'नीज भारजा'=निजभार्या; याचा 'नीर भारजा' असा पाठभेद आहे, पण तो निरर्थक म्हणून चुकीचा मानावा लागतो. (पण 'भारजा' हे 'भार्या'चे रूप संभवनीय आहे.) 'पाव'बद्दल 'पाय' पाठभेद असाच अग्राह्य आहे. जाती 'भुवनसुंदर'.

(२०५) ही अतिशय लोकप्रिय रचना लौकिकरीत्या रूढ आहे व भजनांतून म्हटली जाणारी आवडती 'गौळण' आहे.

"भक्ताच्या काजासाठी, सोडिली मी लाज रे" या प्रसिद्ध पदाची चाल, मिश्र अष्टमात्रक-आवर्तनी रचना.

:६३: शेख महंमद

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. याचा प्रसिद्ध ग्रंथ 'योगसंग्राम' सन १६४५ च्या

सुमाराचा. ''ज्ञानाचा एका, नाम्याचा तुका नि कबिराचा शेका'' अशी म्हणच झाली आहे. 'प्रा० गी० भांडारा'त एक रचना; येथे आणखी चार रचना दिल्या आहेत.

(२०७) मोह, ढोंग वगैरेचे रूपकात्मक वर्णन. कांत=सापाच्या अंगावरचे काढून टाकता येणारे चामडे.

या 'देवीवर' (लहान) अभंगात द्रुतोच्चारी स्थळेही आहेत – विशेषतः अंत्य चरणात 'वचन ऐकुन' वगैरे शब्द तसे आहेत; कदाचित 'वचन' अध्याहृतही असेल.

(२०८) शेख महंमदाचा धंदा मुलाण्याचा. बकरी कापताना किळस येऊन विरक्ती उत्पन्न झाली. अशी आख्यायिका आहे. येथे या घरच्या धंद्याचा संदर्भ आहे. 'विज्ञान' म्हणजे विशेष ज्ञान, ब्रह्मज्ञान.

(२०९) या लौकिक व लोकप्रिय भजनी रचनेत बाह्य मूर्तिपूजेचे व्यर्थत्व दर्शविले आहे. 'खुळखुळा' हे खेळणे बालपणीचे; जाणतेपणी ही 'प्रतिमाभक्ती' माणसाने सोडावी असा भावार्थ. काहडून=काढून; यात बोलीतील 'ह'कार स्पष्ट उच्चारण्याची लकब आहे.

काहीशी मात्रिक द्रुतोच्चारी 'देवद्वार' रचना. अंत्य चरणात 'टाका प्रतिमाभक्ती' असा मौखिक पाठ असावा. यमकानुरोधाने तसे वाटते.

:६४: मृत्युंजयस्वामी (मुंतोजी)

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. सन १६५० पर्यंत असावा. 'मृत्युंजय' हे लेखननाम आहे. 'शांत बामणी' असाही उल्लेख. 'मृत्युंजय'चे 'मुंतोजी-मुंताजी' असे रूप झालेले दिसते. हा बिदरच्या सल्तनतीतला असावा. 'शहा' नाम त्यावरून.

(२१०) 'खेळिया' धाटणीचे कृष्णगीत.

:६५: अलमखान

काळ अनिश्चित. पण भाषेच्या स्वरूपावरून इसवी सनाच्या सतराव्या शतकातला तो असावा. मात्र तो वडवाळसिद्ध नागेशाचा शिष्य प्रत्यक्षपणे असला तर काळ अगोदरचा ठरेल.

(२११) पदपद्धतीची रचना. मनाच्या 'चाळक'=तरंगी रूपाचे वर्णन. अंतरे द्रुतोच्चारी 'साकी'-'लवंगलता' जातीचे. अंत्य चरणात लघुप्रयास उच्चारण अत्यधिकच आहे. कदाचित 'विनंती' शब्द मागाहून घुसडला गेला असावा.

(२१२) 'खेळिया' धाटणीचे गीत. विरोधोक्तींचा विनियोग. द्रुतोच्चारी 'हरिभगिनी-फटका' जाती.

:६६: सय्यद महंमद

काळ अनिश्चित. शेख महंमदही 'सय्यद महंमद' म्हणून ओळखला जातो. पण पदात 'सय्यद महंमद' स्पष्टपणे नमूद केलेले असल्यामुळे हा कवी वेगळाच मानणे बरे. या नाममुद्रेची आणखी पदे उपलब्ध नाहीत.

(२१३) हे एक गोपीगीत आहे. ''जैं त्वां वेणुवाचा नाद०' इत्यादी चरणांत क्रियापद अध्याहृत आहे. 'चित्र' असा शब्द पाचव्या चरणात आहे, तो 'चित्त' असावा. रचना 'साकी-लवंगलता' जातीतली आहे.

:६७: शेख सलीमहंमद

कालादी माहिती अनुपलब्ध. पण सनाच्या सतराव्या शतकातलाच असावा. वंश मूळचा ब्राह्मण जातीचा असावा.

(२१४) कूट प्रश्नात्मक अभंगरचना. आघातकारी विरोधोक्तींचा वापर. जवळच्या रक्तसंबंधी नातेवाइकांतला 'इन्सेस्ट'सारखा शरीरसंबंध विरोधाभासासाठी वापरलेला आहे.

:६८: लतीफशाह

इ० स०च्या सतराव्या शतकातला कवी असावा. सतराव्या-अठराव्या शतकात संत-साधू म्हणून नामोल्लेख आढळतात. बहुधा रंगनाथस्वामींचा परिचय असावा.

(२१५) अप्रत्यक्षपणे मूर्तिपूजा-सगुणभक्तीचा परिहार. 'अत्र' पदाने 'अत्तर' असा अर्थ संभवतो. कवीच्या मुस्लीम वातावरणाचा हा परिणाम? की 'अत्र हे 'पत्र'-पर्ण-वाचक आहे? अभंग 'देवीवर'; पण मात्रिक-आवर्तनी रचनाही मिश्रित आहे.

:६९: शहा हुसेन

काळ अनिर्णीत. इ० स०च्या सतराव्या-अठराव्या शतकात संत-साधू म्हणून नामोल्लेख.

(२१६) बालकृष्णाचे वर्णन. ह्या पदाची रचना 'मुक्त' आहे असे श्री० रा० चिं० ढेरे म्हणतात (पाहा : 'मुसलमान मराठी संतकवि', पृ० १४६-१४७), ते तितकेसे खरे नाही. या पदाचा थाट कटावाचा आहे. अंतऱ्यात अष्टमात्रक पादाकुलकी चरणांच्या अंती अष्टमात्रकाला जोडून गुरू अक्षर. ही धाटणी कटावाची आहे. पण त्याच्या काळाच्या संदर्भात रचना काहीशी वेगळी म्हणून 'मुक्त' म्हणता येईल. कटावकर अमृतराय पुढच्या काळातले आहेत.

:७०: शेख सुलतान

इ० स०च्या १७६९ साली याचा समाधिकाळ. गोपाळनाथ हे गुरू. त्यांच्या उपदेशाने व प्रेरणेने उत्तम कीर्तनकार बनला.

(२१७) ही रचना शेख महंमदाच्या नावावर त्याच्या मुद्रित कवितासंग्रहात दिलेली असली तरी ती या शाहिराची म्हणून हस्तलिखितात आढळते. 'साहेबनाथ'=गोपाळनाथ. फारसी-उर्दूत देव, गुरू वगैरे पूज्य विभूतींना 'साहेब' म्हणून संबोधतात. पदधर्तीची, पण 'देवीवर' अभंगाला जवळची मात्रिक रचना यात आहे.

:७१: गरीब अबदुल

काळ अनिश्चित. इ० स० अठराव्या शतकातला कवी असावा. मुसलमानी धर्माच्या व इतिहासाच्या संदर्भामुळे याचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे.

(२१८) 'रिवायत' या फारसी गीतप्रकाराचा मराठी अवतार. मोहरमच्या 'करबल'मध्ये अशा रिवायती म्हटल्या जातात. हसन-हुसेन या बालशहीदांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मातेने केलेला पुत्रशोक यात असतो. 'हसन हुसेन दोघे भाया, एकटा कासिम करतो काय?' हे गीत मध्य कोकणात या शतकाच्या प्रारंभी मोहरममध्ये म्हटले जात होते, पण त्यात त्यांच्या मर्दुमकीचे वर्णन आहे.

रचना लोकगीतातल्या धर्तीची षण्मात्रक 'परिलीना' (आरतीचा छंद) आहे. काही ठिकाणी मध्यविरामी वैचित्र्ये चरणात आहेत.

:७२: माणकोजी बोधले

काळ अनिश्चित-अनिर्णीत. पण तुकारामाच्या वेळचे असावेत असा काही अभ्यासकांचा तर्क आहे. हे धामणगावचे पाटील.

(२१९) प्रसिद्ध भजनी पद. एका पाठभेदात 'नरहरी बोधला' असे आहे. पाळण्याची सारंग रागातली चाल. जाती 'मृगपंक्ति'.

(२२०) कूटात्मक रचना. विचित्र, आघातकारी कौटुंबिक संबंधांचा विरोधोक्ती म्हणून वापर. सासू=माया, सून=अहंता. अनपेक्षित घडत गेल्यामुळे विस्मय. द्रुतोच्चारी रचना; बहुशः 'हरिभगिनी' जाती.

(२२१) बोधले बुवांच्या पाटीलकीच्या धंद्याचा संदर्भ 'सारा-दोरा तूंचि देसी' यात आढळतो. भजनी परंपरेत रूढ म्हणून येथे दिला आहे. अभंग 'देवीवर'.

:७३: रामदास

जन्म सन १६०८; मृत्यू सन १६८१. प्रसिद्ध भागवतधर्मी रामोपासक संत;

शिवाजीमहाराजांचे स्फूर्तिदाते म्हणूनही बहुतेक मानतात. 'प्रा० गी० भांडारा'त सव्वीस कवने; येथे आणखी तेवीस रचना.

(२२२) आत्यंतिक तळमळीचे गीत. लवचीक रचनेची, क्वचित द्रुतोच्चारी 'उद्धव'-सदृश जाती; उच्चारपरत्वे मात्रिक 'देवीवर'ही होईल.

(२२३) गोदातटी निवास केलेले रामदास पोहण्यात तरबेज दिसतात. येथे धारेला पडलेला पोहणारा उगमाकडून मुखाकडे – मुळाकडून शेवटाकडे – वाहत जातो या घटनेचा विरोधोक्तीसाठी उपयोग.

(२२४) एक अत्यंत प्रेमळ जवळिकीचे पद. या चालीचे वामनाचे पद प्रसिद्ध आहे. चाल त्या काळी फार लोकप्रिय होतीसे दिसते.

(२२५) लोकप्रिय भजनी पद. ध्रुपद 'उद्धव'सदृश. अंतऱ्यात मात्रिक 'घनाक्षरी'-सारखे – किंवा 'ओवी'-'घनाक्षरी'चे वैचित्र्य.

(२२६) निसरड्या व्यंजनांची प्रासशृंखला. नादावरचा ताबा यात दिसतो. 'पाय-पाय-पाय' वगैरे शब्दसंहती उच्चारतः 'पाय्-पाय्-पाय्' अशी होत असावी. अंतऱ्यात चरणांती सर्वत्र असेच. भजनी धाटणीच्या म्हणणीत वैशिष्ट्य आहे. ध्रुपद खंडित चरणाचे; अंतरा-चरण उच्चारतः खेळियासदृश 'हरिभगिनी'चे.

(२२७) म्हणीवजा झालेल्या उक्तींचा 'देवीवर' अभंग.

(२२९) भजनी मंडळीतले लोकप्रिय गीत. रोखठोक सवाल दैनंदिन बोलीभाषेत मांडल्याने त्यातला जोष अधिकच वाढला आहे.

षण्मात्रक आवर्तनाची रचना; पर्यायाने धुमाळी-केहरव्याची अष्टमात्रक रचना शक्य. पण तसे होताना उच्चारण ध्रुपदात लघुप्रचुर व अंतऱ्यात निसरडे उच्चार व प्लुती अशा उभय क्लृप्तींचा वापर आढळतो -- तालाला धरून म्हणणी करणे अशक्य असल्यामुळे.

(२३०) हरिदास-परंपरेचे शाहीर एकमेकावर फडात चढ करीत असता अकस्मात येऊन पोचलेल्या रामदासांनी चढ टाकून परीक्षा पाहण्यासाठी म्हटलेले डफगाणे असे वर्णन आख्यायिकेच्या आधारे दिलेले आढळते. निरुत्तर करणारे सवाल टाकून समर्थांनी शाहिरांना चकित केले. हा 'रामदासाचा विनोद' होय.

यात ललकारून म्हणायची स्वैर ओवी आहे. प्रत्येक कडव्याच्या अंती डफावर थाप पडत असली पाहिजे. अन्यथा नियमित ताल-ठेका अपेक्षित नाही – नव्हे, द्यायचाच नसतो.

(२३१) लोकांच्या तोंडी बसलेले गीत. यात दादऱ्याची तालगती असल्यामुळे ती षण्मात्रकावर्तनी 'परिलीना (वैचित्र्य)' होईल. पण जरा ठाय गतीत दीपचंदीचा ठेकाही दिला जात असावा; तसे केल्यावर त्र्यक्षरी गटात प्लुतिस्थाने येऊन या मात्रावलीची 'कालगंगा' जातीसदृश रचना.

(२३२) यात हरिनामकीर्तनाचे वर्णन आहे; पण 'हरिदास' म्हणजे नारदीय कीर्तनकार दिसत नाही; तो भजनी फडच असावा.

(२३३) या कवनात 'कथे'चा संदर्भ आहे, कथानिरूपण आहे, त्यामुळे यात 'वोळलेला रंग' पूर्वरंग-उत्तररंगयुक्त कीर्तनाचा असेल काय? रामदास तालबद्धतेचे भोक्ते

आहेत. त्यांना 'बेतालाचा लेश' पसंत नाही. ध्रुपदात खंडित षण्मात्रक रचना; कडव्यात गेय 'घनाक्षरी' ओवी दिसते.

(२३४) स्फूर्तीसाठी रामदासांची प्रार्थना; अनेक रूपकांनी अभिप्राय व्यक्त केला आहे.

(२३५) निसर्गवर्णनाची दुसरी रामदासी रचना. 'गिरीचे मस्तकी'च्या मानाने अधिक पारंपरिक व साचेबंद वर्णन.

(२३६) या अत्यंत नादबहुल वैशिष्ट्यपूर्ण गीताचे चार भाग दिसतात. प्रथम भूप जनक त्र्यंबक धनुष्य ओढीत आणवितो तेव्हा फरफर आवाज, हा 'पण' (अट, शर्त) अति दुष्कर म्हणून 'हर-हर' शब्द, रामाने धनुष्य उचलले तेव्हा 'वर-वर' असे वर्णन, बाण लावताना 'कर-कर' असा घसटीचा आवाज, भूमी कंप पावल्याने 'थर-थर' असा कंपजन्य नाद; हे सर्व तुलनेने मृदु असे नादशब्द, मग रामाने धनुष्य सज्ज करताना प्रत्यंचेबरोबरच सीतेचे 'तनुमनु' कसे ओढले याचे सूचन; यात अर्थानुकारी नादसंहती नाही, आणि पुढच्या मोठ्या भागात तीक्ष्णकठोर वर्णांचा कड-कड, सड-खड इत्यादिक बारा नादध्वनी, शेवटी जय-जय, धिम-धिम, तर-तर, रस-रस असे सापेक्षतः मृदू – अशा राम-सीता स्वयंवरसूचक नादसंहती.

यातील मात्रिक संहतीत 'पतितपावन', 'लवंगलता' व 'प्रियलोचना'-'अंबा' अशा जाती संभवतात; या संकीर्ण स्वरूपावरून असे दिसते की तालठेक्याला धरून असलेल्या रचनेत अक्षरमात्रांची वैचित्र्ये असू शकतात. यातल्या लघुप्रचुर अक्षरवर्तनांच्या वेळी ढोलके-टिमकी-खंजरीवर तशाच गतीने बोटे पडत असली पाहिजेत.

(२३७) या पदातही नादसंहतीं " खेळ आहे. राजा रामचंद्राच्या राजसभेतील नृत्य-गानाचा सोहळा व त्याचे सगुण-सावळे स्वरूप पाहून भक्ताला देवाचा वेध लागतो व त्या वातावरणाशी एकरूप होऊन भक्तकवी अन्वर्थक नादध्वनींनी मनोभाव व्यक्त करतो.

मात्रिक आवर्तनें 'साकी-लवंगलता' व त्याचे वैचित्र्य अशी 'समुदितमदना' जातीची संभवतात. लघुप्रचुरतेला धरून तालबोलही द्रुत-आघातमय असले पाहिजेत.

(२३८) प्रसिद्ध भूपाळी. सावळ्या रामाच्या अंगावरील पिवळ्या सुवर्ण-शोभनाचे वर्णन विरोधी रंगांची संमुखता साधते. या वर्णनामुळे ह्या भूपाळीला 'पिवळी भूपाळी' असे लौकिक नाव आहे. रचनेत गेय 'ओवी'-'घनक्षरी'च्या कडव्यांची मालिका आहे.

(२३९) रामाची 'पिवळी भूपाळी', तशी ही शंकराची 'धवळी भूपाळी'. तेवढीच लोकप्रिय. गौरवर्ण शंकर, भुरकट रंगाचे शरीरावरील विभूति-भस्म व त्यावर धवळ्या रंगाच्या विविध वस्तू यांमुळे यात रंगसंगती साधली जाते. रचना गेय 'घनाक्षरी'-'ओवी'सदृश.

(२४०) रुद्र-भीषण हनुमंताच्या स्वरूपाचे तशाच तोलाच्या नाद-शब्दसंहतीने केलेले वर्णन. पण भक्ताला तेच रूप कसे मृदुकोमलही भासते ते २, ३, ४ या कडव्यांत आढळते. 'प्रभंजन', 'सुंदर-जगदंतर' ही आहे. 'आ'कार, 'ओ'कार, 'इ'कार (महाप्राण) 'रु'कार, 'ण'कार, 'ठ-ड-ळ' आदी अन्वर्थक मृदु-कठोर व्यंजने व जोडाक्षरे व विशेषतः

'लोटला' (गतिदर्शक) 'झेपावे' (उंच उड्डाण), 'उत्पाटिला' (उखडला), 'मुर्डिले' (वळविले) अशासारखे अर्थव्यंजक नादांचे शब्द यांमुळे अचूक प्रतिमा उभी होते; मारुतीच्या गतीप्रमाणेच दासांच्या या शब्दशैलीतल्या 'गतीसी'ही 'तुळणा नसे' आणि याचा अगदी स्वाभाविक असा शेवट 'ग्रासिले सूर्यमंडळा'-'भेदिले शून्यमंडळा' यात सूचक शक्ती वाढता-वाढता झालेला आहे. बोलीभाषेला धरून उच्चारण असल्याची स्थळे अनेक आहेत, जशी 'मुर्डिले', 'तुळणा', 'मंडणू' वगैरे. पण एकंदरीने यातल्या अनुष्टुभ् श्लोकात 'अपभ्रष्ट (?) रूपे कमी आहेत; छंदात ओढाताणही बहुशः नाही.

(२४१) या सुप्रसिद्ध आरतीतही रामदासांचे शब्दकौशल्य प्रकट होते. 'लावण्यसुंदर' यासारखी वेधक विशेषणे, 'उमावेल्हाळ' हे शंकराचे वर्णन, क्वचित 'उधळण' यासारखा एखादा शब्द कच्चा वाटावा, तोच 'देवी दैत्यी'पासून 'नाम प्रसिद्ध झाले'पर्यंतचे दोन लयबद्ध गतीचे बोलके कडक चरण पुढे येतात. 'व्याघ्रांबर' वगैरे कडव्यातला मनोहर सानुनासिक अंतर्गत प्रास लगेच त्याला संमुख होतो. रचना, अर्थातच, बहुरूढ आरती छंद 'परिलीना' या मात्रावर्तनी जातीची आहे.

(२४२) या मारुतीच्या लोकरूढ आरतीतही मारुतीच्या स्तोत्रासारखीच शब्दयोजना आहे – 'सत्राणे', 'उड्डाणे' 'कडाडिले ब्रह्मांड' इत्यादी अर्थानुसार नादवाही शब्दांबरोबरच 'पळणी', 'पडशब्द' असे बोलीतले शब्दही लक्षणीय आहेत. पण आरतीच्या एकंदर आवाक्याप्रमाणे सर्व काही आहे. आरतीची 'परिलीना' जातीच यात आहे.

(२४३) समर्थांनी शिवाजी राजे यांना शके १५७१ (सन १६४९) मध्ये लिहिलेल्या ओवीबद्ध पत्रातील सात ओव्या. यात खऱ्या 'श्रीमंत योगी' राजांचे वर्णन आहे. 'श्रीमान योगी' हे ललित शिवचरित्राचे सूचक शीर्षक येथून घेतलेले आहे. 'महाराष्ट्र धर्म' संज्ञाही यातच आहे, 'राजकारण'ही आहे! वयाने तसा लहानच असलेला हा 'श्रीमंत योगी' राजा, पण दासांनी त्याचे खरे मोठेपण हेरलेले आहे. तो 'शिवकल्याण राजा' आहे. म्हणून शेवटच्या ओवीतली क्षमायाचना! यात खरे समर्थ प्रत्ययाला येतात. रचना लयबद्ध ग्रांथिक ओवीत आहे.

(२४४) हे संभाजीला लिहिलेले ओवीबद्ध पत्र तर मराठी मनाला अखंडपणे रुचत राहील व बोचतही राहील असे सर्वज्ञात काव्य आहे. संभाजी हा केवढा मर्द; तेवढेच त्याने कर्तबगार व्हावे, म्हणून स्वामींचा जीव तिळतिळ तुटतो आहे. 'शिवकल्याण राजा'चा हा पुत्र, पुरुषसिंहाचा छावा! पण त्याच्या कारकीर्दीत सज्जन लोकांच्या मनाच्या पाटवण्याला (पाटाच्या पाण्याला) गती नाही, मोकळीक नाही, तुंबा बसलेला आहे – आणि पर्यायाने विघातक दुर्जनांचे प्राबल्य झाले आहे! या हितचिंतक जनांचा प्रवाह प्रतिपक्षाकडे जाऊ लागल्याचे समर्थांना दिसत आहे. म्हणून ते म्हणतात, 'म्हणजे कार्यभाग आटोपला'! या सावधगिरीच्या सूचनेनंतर येतात मराठीतल्या अमर ओव्या – 'शिवराजास आठवावे', 'शिवरायाचे आठवावे रूप', 'शिवरायाचे कैसे चालणे' वगैरे. सुखोपभोग, राज्यग्रहण यांपेक्षा काही विशेष करावे अशी विनंती करून ''याउपरी आता विशेष काय लिहावे'' असे म्हणून समर्थ पत्र पुरे करतात! मनाला केवढा ताण आहे,

केवढी दारुण स्थिती आहे – पण अतीव शांत, समाहित वृत्तीने संभाजी राजांना हे अनमोल पत्र समर्थांनी लिहिले आहे. मूळ एकवीस ओव्यांपैकी येथे दहा ओव्या दिल्या आहेत. ओवीक्रम मात्र मुळातला ठेवला आहे.

:७४: रंगनाथस्वामी

जन्म सन १६१२; मृत्यू सन १६८४. यांच्या पदातील नाममुद्रेत 'निजानंद-रंग' असे जोडनाव असते. वडील निजानंद हे यांचे गुरू; पूर्णानंद हे आजेगुरू. निजानंदांच्या नावावरची पदसंग्रहातली जी पदे 'निजनंदरंग' मुद्रेची आढळतात ती रंगनाथस्वामींचीच आहेत. 'प्रा० गी० भांडारा'तील क्र० २७५ चे पद निजानंद-रंगयुक्त म्हणून याच स्वामींचे ठरते. शिवाय तेथे यांची तीन पदे आहेत. येथे आणखी सात रचना दिल्या आहेत.

(२४५) प्रसिद्ध भजनी पद.

(२४७) कीर्तनकारांचे प्रिय गीत. अमृतरायांच्या एका पदाचे पालुपद 'स्मरतां नित्य हरी' वगैरे असले तरी अंतरे अगदी वेगळे आहेत.

(२४८) अत्यंत मधुर लयबद्ध पद. वैशिष्ट्यपूर्ण पंचमात्रक 'मोहमाया' जातीचे नाव या पदातल्या 'मोहमाया नदी' या पदावरून आलेले आहे. 'दाथरी'=उकडहंडीत तोंडाशी घालावयाचे गवतपाल्याचे बोळवजा आच्छादन.

(२४९) पंचमात्रक लयीतले आणखी एक हृदयंगम पद. निजानंदाचे म्हणून म्हटले गेले असले तरी ते 'रंग'युक्त असल्यामुळे रंगनाथस्वामींचे असले पाहिजे. हे पद आतल्या 'अनंत' पदावरूनच बहुधा अनंत कवीचे म्हणूनही त्याच्या कवितासंग्रहात दिलेले आहे. जाती 'मोहमाया'.

(२५०) संभवतः आई यशोदा ''विश्वाचे मूळ कारण काय'' असे कृष्णाला विचारते व कृष्ण त्याचा खुलासा करतो. बहुधा विश्वरूपदर्शनाच्या संदर्भात ही प्रश्नोत्तरे असावीत. अंत्य कडव्यातला गळलेला चरणांश अंदाजाने कंसात दिलेला आहे; पालुपदात 'निजनयना' आहे तो अर्थहीन असल्यामुळे 'निजतनया' असा पाठभेद सुचविला आहे व प्रासानुरोधाने 'कान्हा'चे 'कान्हया' केले आहे. सर्वत्र चरण 'देवीवरा'च्या मात्रिक रूपाचे (---|---|---) आहेत. कडवी २-३ 'घनाक्षरी'-'ओवी'सदृशही मानता येतील.

(२५१) 'नाट' नामक प्राचीन नाट्यप्रकारात आरंभी गणपती येत असे. त्याच्या नर्तनाचे वर्णन कवी करतात. रामदासांचे असेच एक पद आहे. एकनाथादिक 'नाटारंभी' गणेशस्तवन करताना आढळतात. पण रंगनाथस्वामींचे हे पद सविस्तर वर्णनाचे आहे. 'थिरकिटी' वगैरे नृत्याच्या बोलांबरोबरच नूपुराचा 'रुमझुम' व मृदंगाचा 'धुमधुम' नादही येथे आहे. 'त्र्यंबकक्षेत्र' हा तत्कालीन प्रादेशिक उल्लेख आहे. रामदास-रंगनाथांनी वर्णन केलेले हे गणेशनृत्य त्यांनी प्रत्यक्षात नाट-ललितामध्ये पाहिले असावे. प्रसंगी मठातही याचा प्रयोग होत असावा.

द्रुतोच्चारी गतीचे दीर्घ चरण 'साकी-लवगलता' व त्याचे वैचित्र्य 'समुदितमदना' या जातीचे आहेत. चाल बदलते तेथुले चरण खंडित प्लुतियुक्त रचनेचे अष्टमात्रकावर्तनी आहेत. जलद त्रितालाचा ठेका, लघुप्रचुर बांधणीवरून अपेक्षित आहे.

: ७५ : केशवस्वामी

मृत्यू सन १६८२. उपनाम भागानगरकर. 'प्रा० गी० भांडारा'त यांच्या पाच कृती आल्या असून येथे आणखी चार दिल्या आहेत.

(२५२) गुरुभक्तीचे-द्योतक रसाळ पद.

(२५३) आराध्यदेवतेचे रूपकात्मक देवीस्वरूप. 'दिंडी'चा उपयोग यात आढळतो.

(२५४) गुरु-गोडी=गुरगुडी. गुरूची गोडी गुरगुडी(हुक्का)च आहे. रूपकाश्रयाने वेदान्तनिरूपण. केशवस्वामींना गुरगुडी आवडत होतीसे दिसते.

(२५५) असेच एक पद शिवदिनकेसरीचेही आहे. पण केशवस्वामींच्या पदात विस्तार अधिक आहे व त्यांचा काळही अगोदरचा आहे. हे पद भजनी परंपरेत फार लोकप्रिय आहे. पालुपद खंडित, पुनरुक्तिपूर्ण आहे; अंत्य चरण 'हेंचि मागणें मागे। भावें केशव चरणां लागे' असाही आढळतो. अंतऱ्यात अभंग 'देवीवर' आढळतो.

: ७६ : दिनकरस्वामी

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. रामदासांच्या चौदा महंतांपैकी एक. सन १६९४ मध्ये ''स्वानुभव-दिनकर'' ग्रंथ समाप्त झाला. 'प्रा० गी० भांडारा'त सहा रचना; येथे आणखी एक रचना.

(२५६) परमेश्वरभेटीची आर्त तळमळ.

'दिंडी'चे वैचित्र्य बहुशः आढळते. पण जास्त लांब चरणांत 'शुभगंगा'ची छटाही दिसते. एकंदरीत दादरा-धुमाळी तालातली रचना.

: ७७ : शिवरामस्वामी

जन्मसन १६३२, मृत्यू बहुधा सन १६८९. पूर्णानंद या आनंदसंप्रदायी स्वामीचा हा मुलगा व शिष्य. रामदासस्वामींच्या परंपरेतीलच हे स्वामी. हा व उद्धवस्वामी दोघे एकच असावेत. 'प्राचीन गीतभांडारा'त एक व येथे दोन रचना.

(२५७) लोकप्रिय भजनी पद.

(२५८) मांजरावरील रूपक. 'मी येऊं='म्याऊं' असा मांजराचा शब्द. निज-शेष=दूधदुभत्याचा शेवटचा भाग; खरवड वगैरे. 'सीर' हे 'क्षीर'चे प्राकृत रूप असावे.

निदान बोलीभाषेत रूढ असावे. अंतऱ्यात 'साकी-लवंगलता' जाती; द्रुतोच्चारी, लघुप्रयास उच्चारण.

:७८: वेणाबाई

जन्म सन १६२८; मृत्यू सन १६७८. समर्थांची प्रसिद्ध शिष्या. हिचाही 'वेणीसंप्रदाय' रूढ झाला. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना; येथे आणखी चार रचना दिल्या आहेत.

(२५९) शेजारतीचे पद. पालुपदात 'उद्धव' जातीतील चरणखंडाची पुनरुक्ती, अंतऱ्यात लघुप्राय चरणांच्या गेय ओव्या.

(२६०) व (२६१) ही पदे श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे येथल्या हस्तलिखित बाडातली आहेत.

(२६२) वेणाबाईचे जीवन व्यावहारिक-लौकिक दृष्ट्या वेगळे होते. ती बालविधवा होती व तरी तिने रामदासस्वामींची दीक्षा घेतली होती. म्हणून ती म्हणते, 'आम्ही... न हों लौकिकासारिखे'. तिला 'वेणीस्वामी' असे लोक म्हणू लागले व मग ते तिचेच नाव झाले.

:७९: अंबाबाई

रामदासांची भक्तिमार्गी उपासनापंथी दुसरी शिष्या.

(२६३) सैरी-सौरी=भोगदासी; वेदान्ती रूपक.

:८०: गिरिधर

जन्म सन १६५५; मृत्यू सन १७२९. वेणाबाईचे प्रशिष्य, बयाबाई-बाइयाबाईचे शिष्य. 'प्रा० गी० भांडारा'त दोन कवने; येथे आणखी एक.

(२६४) प्रसिद्ध भजनी-कीर्तनी पद. हे पद थोडच्या पाठभेदाने व्यंकटसुत कवीच्या नावावरही आढळते.

:८१: वामन पंडित

जन्म सन १६३६, मृत्यू सन १६९५. सुप्रसिद्ध आख्यानकार कवी.

(२६५) वामनपंडिताची म्हणून ही 'लावणी' प्रसिद्ध झाली आहे. त्यात ठराविक वेदान्ती निर्वेद आहे. 'तमाशा'पूर्वीची लावणी रचना उल्लेखनीय खरीच.

:८२: विठ्ठल बीडकर

सन १६३० ते सन १६९० या काळातली कारकीर्द असावी. अमाप रचना. छंदःशास्त्रावर प्रभुत्व. 'प्रा० गी० भांडारा'त एक पद; येथे आणखी दोन रचना.

(२६६) भजनी परंपरेतले लोकप्रिय पद. कीर्तनातही तसेच.

(२६७) रामजन्मप्रसंगी म्हटला जाणारा अत्यंत लोकप्रिय पाळणा. दुपारच्या सारंग रागात म्हटला जातो. जाती 'मृगपंक्ती'.

:८३: अनंतकवि

जन्ममृत्युकाळ अनिर्णीत. रामदासांचा शिष्य, त्यांच्या हयातीत कविता करू लागला. सन १७२३ मध्ये 'सुलोचना-आख्यान' पुरे केले. यावरून तो जवळजवळ पन्नास वर्षे काव्यरचना करीत होतासे दिसते. तंजावरकडील समर्थशिष्य अनंत व हा अनंत कवी भिन्न होत. 'सये कैं मनोरथ जगन्नाथ पुरवी' हे पद याच्या नावावरही आहे, पण ते रंगनाथस्वामींचे आहे.

(२६८) गुरुभक्तीचे पद. दरबार=बैठकीची शिष्यांनी भरलेली जागा. (जनाबाईच्या पदात असा प्रयोग आहे.) कदीमखाना=रहिवासाचे स्थान; मोठा वाडा; नफर=नोकर. पुढील काळात चिन्मयकवींनी "झालें बाई वेडी। दरबार गुरूचा झाडीं" हे पद याच धर्तीवर लिहिले.

ध्रुपदात खंडित 'साकी-लवंगलता' किंवा म्हणणीपरत्वे 'उद्धव' जातीचे दोन छोटे चरण; अंतऱ्यातील चरण 'साकी-लवंगलते'चा.

(२६९) आणखी एक लोकप्रिय भजनी गीत. पद्यरचना मागल्या गीतासारखी, पण चाल फार वेगळी.

(२७०) सुमधुर संस्कृत स्तोत्राचा तितकाच रसाळ अनुवाद. हे 'गोपीगीत' म्हणून दिलेले पद्य मुळात इ० स०च्या चौदाव्या-पंधराव्या शतकाच्या संधिकाळातल्या बिल्वमंगल या महान वैष्णव आचार्यांनी संस्कृतात रचले. हे 'श्रीकृष्णकर्णामृत' किंवा 'गोविंदमाधव' स्तोत्र होय. संस्कृतातल्या एकाहत्तर श्लोकांपैकी पंचवीस श्लोकांचा सरस सुबोध अनुवाद अनंतकवींनी केलेला उपलब्ध आहे. त्यांपैकी बारा श्लोक नीट मांडणी करून येथे दिले आहेत.

ही खरोखर एक भूपाळी (प्रभातगीत)च आहे. यात 'इंद्रमाला'-'उपजाती' बहुशः व क्वचित एकटी 'इंद्रवज्रा' असलेले श्लोक आहेत.

:८४: रंगबोधस्वामी

हे पहिले रंगबोधस्वामी. जन्मकाळ अनिर्णीत. सन १६५९ मध्ये इहलोक सोडला.

उत्तर कर्नाटकातल्या मुडलगी मठाचे स्वामी. मूळ परंपरा टाकळीची, रंगबोधही टाकळीचे. गुरू सहजबोधांच्या पादुका घेऊन यात्रा करीत असता मुडलगीजवळ साक्षात्कार झाला व तेथे पादुका आणि मठ स्थापला. केशवस्वामींच्या पदात रंगनाथस्वामींबरोबरच यांचाही 'रंग'मूलक नामोल्लेख आहे. इतर स्फुटरचना व कानडी कवनेही उपलब्ध झाली आहेत. रंगबोधिनी गीताटीका व निर्याणपत्र ओवीबद्ध आहेत.

(२७१) वैशिष्ट्यपूर्ण रचनेचे मुरलीगीत. ध्रुपद 'पादाकुलका'चे. अंतरा-चरण आद्यतालपूर्व गुरूनंतर चार पादाकुलकांचा म्हणजे 'वनहरिणी'चा.

(२७२) चार कडवी पुनरुक्त 'अचलगती'ची. पाचवे कडवे उच्चारपरत्वे 'हरिभगिनी-फटका' जातीचे.

'बहळ'=कानडी 'भाळ', खूप, बहुल.

:८५: अद्वयबोधस्वामी

पहिल्या रंगबोधांचे चिरंजीव व शिष्य. इ० स० १६७५-८० पर्यंत असावेत. मराठी ओवीबद्ध व श्लोकबद्ध रचनांबरोबरच कानडी पदेही थोडी उपलब्ध झाली आहेत.

(२७३) अद्वयबोध आपणाकडे स्त्रीत्व घेऊन गुरू रंगबोधांना पति=स्वामी (गुरू) म्हणत आहेत. यात विरोधोक्ती आहेच. माय=माया; माउसी. चिच्छक्ती. गुरु=पती दांडगा, हांडगा, कठोर; पण तोच व्यापून राहिला आहे.

(२७४) 'सुपरित', 'जेगनाथ' ही शब्दरूपे चिंतनीय.. ज्ञानप्राप्तीनंतर दृष्टीच पार कशी बदलली त्याचे वर्णन यात आहे. खंडित व सलग रचना 'पतितपावन'-'चंद्रकांत' जातीसदृश.

(२७५) अद्वय ब्रह्माच्या साक्षात्कारावेळची मनःस्थिती.

:८६: अनंतबोध

जन्ममृत्युकाळ अनिर्णीत. अद्वयबोध व त्यांचे पुत्र शिष्य शिवबोध हे अनंतबोधांना गुरुस्थानी आहेत. हेही मुडलगी मठाशी संबद्ध दिसतात.

(२७६) पाव्याचे रूपक, समग्र गोपाळकाल्याच्या पार्श्वभूमीवर रचलेले आहे. आप्ती=ब्रह्मानंदसुखाची जवळीक. गेय ओवी 'तुळशी'-नमुन्याची.

:८७: राधाबाई

अद्वयबोधस्वामी मुडलगीकर यांच्या या पत्नी. राधाबाईंच्या काही थोड्याच रचना उपलब्ध झालेल्या आहेत.

(२७७) अद्वय हा रंगबोधांचा-श्रीरंगाचा भक्त. तोच राधाबाईंचा गुरु-देव झाला. 'देवच आपण भक्त झाला' व भक्तच देवरूप बनला. अभंग 'देवद्वार'.

:८८: उद्धवचिद्घन

सन १६८९ च्या सुमारास गुरूपदेश. 'उद्धव' हे कवीचे नाव, 'चिद्घन' हे गुरूचे नाव. उपनाव 'कोकिळ'. 'प्रा० गी० भांडारा'त तीन रचना; येथे आणखी एक.

(२७८) कृष्णलीलेचे वर्णन करणारे पद.

:८९: ब्रह्मानंद

जन्मकाळ अनिश्चित. पण याचे वडील दत्तानंद सन १६६८ मध्ये समाधिस्थ. स्वतः सन १६८१ मध्ये 'आत्मप्रकाश' लिहिला. १६९३ मध्ये पंढरपुरास समाधी. श्रीधर कवी हा यांचा मुलगा.

(२७९) नगराचे रूपक. बिदी=रस्ते, केणे=माल; हातोफळी=हातातले फळकूट (संन्यासावस्थेतले).

:९०: रुक्मांगद

जन्म सन १६१०, मृत्यू सन १७१०. विजापुरात वास्तव्य. पांडुरंगाचा भक्त. 'अभिनव बारामास'-कर्ता. 'रुक्मा' अशीही नाममुद्रा आढळते.

(२८०) पाहणा=देखणा, पाहणारा; आगळा=पुढला (गुजरातीत या अर्थाने रूढ); निगुति=मागाहून; अभंग 'देवीवर'.

(२८१) गोपीचा व भक्ताचा आर्त धावा. हरीच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावरचे तृण वा पाषाणही मी होईन. उत्तरार्धात मनाची काढलेली समजूत. जाती द्रुतोच्चारी 'पतितपावन'-'चंद्रकांत'.

:९१: कृष्णदयार्णव

जन्म सन १६७४; समाधिकाल सन १७४०. मूळ नाव नरहरी. पण भक्त गोविंदस्वामींनी 'कृष्णदयार्णव' म्हणून भिक्षा मागण्याची दीक्षा दिली व तेच नाव रूढ झाले. 'हरिवरदा' ग्रंथ प्रसिद्ध.

(२८२) आर्त विनवणीचे करुण बोल. एक सुरस अभंग. उत्तम विरोधाभासाचे गीत. अद्वैताचे उत्तम शब्दरूप आविष्करण. 'देवद्वार'.

:९२: गुप्तनाथ (गंगाबाई)

जन्ममृत्युकाल अज्ञात. गंगाबाई ही विरक्त स्त्री इ० स०च्या सतराव्या शतकाच्या मध्यकाळातली असावी, कारण हिचा शिष्य उद्बोधनाथ याने इ० स० १६८७ मध्ये समाधी घेतली. हिचे गुरू गैबीनाथ (गैनीनाथ नव्हे). ती काशीयात्रेस जात असता वाटेत तिला उपदेशदीक्षा मिळाली, व नाव 'गुप्तनाथ' ठेवले गेले.

(२८५) गुरू गैबीनाथांची ब्रह्मतत्त्वाची 'साम्या' आलेली विभूती या 'देवद्वार' अभंगात वर्णिली आहे.

:९३: उद्बोधनाथ

जन्मकाळ अनिर्णीत. समाधी इ० स० १६८७ मध्ये. मूळ नाव उद्धव नाईक ठिपसे. हा गुप्तनाथाबरोबर काशीयात्रेस गेला व त्यावेळी गुप्तनाथाने त्यास उपदेश मंत्र देऊन 'उद्बोधनाथ' नाव ठेवले.

(२८६) दिव्य रूपदर्शनानंतरची दैहिक-भौतिक विस्मयकारी अनुभूती. अभंग 'देवीवर'.

:९४: शिवदिनकेसरी

जन्म सन १६९८, मृत्यू सन १७७४. मूळ नाव शिवनाथ. पण अवलिया फकीराचे स्मरण म्हणून 'दिन' हे पद नावामध्ये घातले. गुरू केसरीनाथ, म्हणून 'केसरी'पदही नावापुढे लावले. नाथसंप्रदायाची परंपरा असूनही भागवतपंथात समरस झाले. 'प्रा० गी० भांडारा'त दोन रचना; येथे आणखी सहा पदे.

(२८७) (२८८) (२८९) ही सर्व भजनी व कीर्तनी परंपरेतली लोकप्रिय पदे.

(२९०) असेच पद केशवस्वामींचे म्हणूनही दिलेले आढळते. काही पाठ वेगळे आहेत.

(२९१) प्रसिद्ध 'विंचू' रूपकपद्य. लोकगीतातही अशा रचना आढळतात. येथला विंचू कामादी वासना होत. विषबाधा, त्याचे आवेग व मग मांत्रिकाकडून उतारा ही सर्व येथे उपमाने आहेत. मांत्रिक, अर्थात सद्गुरू. हेच पद 'नारायणकेसरी' नाममुद्रेचेही उपलब्ध आहे.

(२९२) देशस्थितिदर्शक पदाचा काही भाग. चरण विविध रचनांचे.

:९५: मध्वमुनीश्वर

जन्मकाळ अनिश्चित; समाधिकाल, काही अभ्यासकांच्या मते सन १७३१ किंवा

१७३४. प्रमुख गीतकार संत व अमृतरायाचे गुरू. 'प्रा० गी० भांडारा'त अकरा रचना; येथे आणखी पाच कवने.

(२९३) प्रसिद्ध भजनी पद.

(२९५) गोपीगीताच्या मध्ये आध्यात्मिक रूपक. उच्चारणवशात् षण्मात्रक वा अष्टमात्रक मात्रिक रचना – म्हणजेच प्राक्‌दिंडी किंवा मात्रिक 'देवीवर' रचना.

(२९६) अत्यंत लोकविश्रुत भजनी पद. जाति 'यजमान' ही आधुनिक संज्ञा या पदावरून आली.

(२९७) अध्यात्माचा 'कैफ' आणणारी ब्रह्मज्ञानरूप तंबाकू. त्याकाळी स्त्रियाही तंबाकू खात असत असा अंदाज, येथल्या स्त्रीलिंगी शब्दप्रयोगावरून करता येईल काय?

: ९६ : नरहरि तुकाविप्र

हा इ० स० च्या अठराव्या शतकातला कवी. तुकाविप्र हा याचा गुरू; गुरूचा काळ सन १७२० ते १७९०-९१. तेव्हा नरहरि तुकाविप्र शिष्य सन १७३० पासून सन १८०० पर्यंत असावा. याच्या रचनांत 'अभंग', 'धुमाळी', 'धिंग' वगैरे गान-नृत्यवाचक पदे अनेक वेळा आली आहेत.

(२९८) या देवद्वार अभंगात आलेले कीर्तन 'रंगणी' चाललेले आहे; त्यात अभंगांची धुमाळी धून आहे.

(२९९) आत्मरूप स्त्रीचे उद्‌गार. मायेच्या-संसाराच्या बंधनातून सोडविण्यासाठी विठ्ठलाची विनवणी.

: ९७ : उद्धवलिंग

महाराष्ट्रातील वीरशैवपंथी शांतलिंग यांच्या परंपरेतील कवी. बहुधा जयरामस्वामी निगडीकर यांचा गुरुबंधू असावा. रामदासशिष्य उद्धवस्वामीहून वेगळा.

(३००) एक वेगळीच हृदयंगम आरती. हरि-हर समन्वय लक्षणीय.

: ९८ : अमृतराय

जन्म सन १६९८; मृत्यू सन १७५३. मध्वमुनीश्वरांचा शिष्य. 'कटाव-कटिबंध' रचनेचा प्रसिद्ध पुरस्कर्ता. गझल मराठीत आला तो याच्या 'मुलतानी' बोलीच्या परिचयामुळे होय. 'प्रा० गी० भांडारा'मध्ये सात रचना; येथे आणखी दहा कवने दिली आहेत.

(३०२) कीर्तनकर्त्यांचे अत्यंत आवडते पद. लयबद्ध तालबोलांच्या संगतीत म्हटले

जात असे. यात 'श्रीधरगुरू' हे पद आले आहे ते चिंतनीय होय.

(३०३) आणखी एक भजन-कीर्तन संप्रदायातले लोकप्रिय पद – त्यातल्या निवृत्तिपर विरक्तीच्या वातावरणामुळे?

(३०४) निवृत्तिपर लोकप्रिय पद.

(३०५) स्वार्थी स्वकेंद्रित व्यवहारी जगाचे वेदान्ती दृष्टीतून वर्णन. भजनातले लोकप्रिय पद.

(३०६) धीम्या लयीतले अतिशय लोकप्रिय कीर्तनीय पद.

(३०७) लघुप्रचुर लयदार म्हणणीचे अत्यंत मनोवेधक पद. 'म्यां'चे आधुनिक पाठात 'मी' झालेले आढळते. यातील प्रदीर्घ चरणातली खंडनस्थळे, खटके व अंतर्गत प्रास यांमुळे हे पद अत्यंत बहारदार झाले आहे. भजन-कीर्तनात म्हणूनच ते एवढे लोकप्रिय आहे.

(३०८) हे पदताललयीशी स्पर्धा करणारे, जुगलबंदी करणारे आहे. तो रे, हो रे, पोरे, दोरे, कोरे वगैरे पदाची आवृत्ती व ध्रुपदात 'तोरे'-'परतो रे' हे मध्यान्त यमक यामुळे म्हणणीतील वैशिष्ट्ये व तालगतीचे स्वरूप सूचित होते.

(३०९) एक गोड पदावलीचे 'मुरली-गीत'. अमृतरायाने भागवत 'पाहिले' असल्याचा उल्लेख शेवटच्या कडव्यात आहे.

(३१०) धावत्या पादाकुलकी चरणांच्या 'कटीं'चा (कडी-कडव्यांचा) 'बंध'-रचना यात आहे. 'कृष्णवर्णन' आख्यानातून.

:९९: शंकर

जन्म-मृत्युकाल अनिर्णीत. अमृतरायांचा शिष्य. हा गोसावी झाला असावा.

(३११) रामाला गोसावी रूपात वर्णन करण्यात या कवीने 'जातीचे महिमान' साधलेले दिसते. तत्कालीन पेहेर-वेषाचे वर्णन रामाला लावले आहे. ते कालदोषाचे असले तरी गंमतीचे आहे.

चाल कटावासारखी; पण आकारबंध पदाचा आहे; शेवटचे दोन अंतरे तर गेय ओवीचेच भासतात. इतरत्र अष्टमात्रक आवर्तनी रचना.

:१००: जिनसागर

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. सन १७२४ ते १७४४ मध्ये ग्रंथरचना केली. 'आदित्यव्रत कथा' व 'जीवंधर पुराण' हे ओवीबद्ध ग्रंथ. जिनाब्धी, जिनसिंधू, जिनपंडित इत्यादी अन्य नामांनीही स्वतःचा उल्लेख करतात.

(३१२) ही जिनेश्वराची आरती आहे. षण्मात्रक 'परिलीना' जातीतली रचना; शैली लघुप्रचुर आहे.

(३१३) हा उतारा सुप्रसिद्ध 'कैको'-'कयको' गीतातला आहे. हुंमचपूरची पद्मावतीदेवी कैकाडणीच्या रूपात भाविकांना भविष्यकाळच्या घटनांची कल्पना देते; म्हणजे हे एक 'भारूड'च म्हणावयाचे.

: १०१ : कवीन्द्र सेवक

इ० स०च्या अठराव्या शतकातल्या अंत्यभागात (इ० स० १८१० च्या पूर्वीच) हा होऊन गेला. याने चिमणा पंडिताची अभंगमाला पुरी केली.

(३१४) जैनमताच्या व वेदांतमताच्या अनुसार देहाचे जुगुप्सावर्धक वर्णन. मुळातच 'अभंग चाल-यमक' अशी टीप आहे. अभंग 'देवीवर'.

(३१५) लोभाच्या परीस तप चांगले असे प्रतिपादणारा अभंग. 'देवीवर'.

: १०२ : श्रीधर

जन्म संभवतः सन १६५८; सन १६७८ संभवनीय नाही. समाधिकाल सन १७२९. याला 'स्वामी' म्हणतात, पण त्याने प्रत्यक्षात संन्यासदीक्षा घेतली नव्हतीसे दिसते. 'रामविजय', 'पंढरिमाहात्म्य', 'शिवलीलामृत' इत्यादी अत्यंत लोकप्रिय ग्रंथांचा कर्ता. याची काही स्फुटरचना उपलब्ध आहे. पण 'नाथाच्या घरची उलटीच खूण' हे प्रसिद्ध कूटगीत मात्र त्याच्या नावावर असले तरी ते एकनाथी पारंपरिक गाथ्यात आढळते.

(३१६) एक चांगले पद. ध्रुपद 'पादाकुलक' रचनेचे, अंतरे 'अचलगति-बालवृंद' जातीचे.

(३१७) एक प्रसिद्ध पद. वामन पंडिताच्या रचनेत या तऱ्हेच्या मात्रिक चरणांची पदे आहेत. अंतरे 'खंडद्य' अथवा 'अचलगती' व दीर्घचरण 'प्रियलोचना' किंवा 'हरिभगिनी' यांच्या संयोगाचे. २ 'अचलगती'+१ 'हरिभगिनी' मिळून होणारी रचना 'छंदोरचने'त 'रामरसायन' नावाने आली आहे. 'खंडद्य प्रियलोचना' हे एक वैचित्र्य होय.

: १०३ : देवीदास

जन्ममृत्युकाळ अनिर्णीत. रामदासशिष्य देवदास व हा देवीदास (पर्यायें देवदास) वेगळे होत. येथल्या दोन्ही उताऱ्यांत 'देवीदास' नाममुद्रा असल्यामुळे या रचना दुसऱ्या देवीदासाच्या मानून दिल्या आहेत. इ० स० अठरावे शतक हा याचा काळ गृहीत धरला आहे.

(३१८) सर्वसमदर्शी वेदान्ताचा प्रत्यय या अभंग-'देवीवर' रचनेत येतो. 'सांडा'=

सोडा (क्रियापद); किंवा 'सांढ'=माजलेला वळू (?).

(३१९) देवदास (देवीदास) याचे 'व्यंकटेशस्तोत्र' अत्यंत रसाळ व लोकप्रिय आहे. अनेक ओव्या मराठी भाषेतली चलनी नाणीच आहेत. एकूण एकशेसहा ओव्यांपैकी चौतीस ओव्या नीट निवडून येथे दिल्या आहेत. या संक्षेपामुळे मूळ स्तोत्रातली आर्तता अधिकच सघन बनली आहेसे वाटते.

यातली ग्रांथिक ओवी एकनाथी वळणाची लोकप्रिय 'घनाक्षरी-ओवी' नमुन्याची आहे; अंत्य चरणातले मध्ययमक मात्र वैकल्पिक आहे.

: १०४ : महीपतिनाथ

जन्मकाळ अनिर्णीत; मृत्यू सन १८२२. हा नाथसंप्रदायी नरहरिनाथांचा शिष्य. कवनात तो प्रथम गुरूचे व नंतर आपले नाव देतो. 'प्रा० गी० भांडारा'त एक रचना आहे; येथे आणखी नऊ कवने.

(३२०) स्त्रीगीत म्हणून प्रसिद्ध असलेले गीत. मठातील प्रतीमध्ये 'बहु शिणले' वगैरे चरण ध्रुवपदाचा आहे; पण लोकप्रिय लौकिक पाठात 'दोन प्रहर'पासून गाणे सुरू होते व 'स्त्री गायन संग्रहा'त तसेच दिलेले आढळते आणि म्हणून ते तसे ठेवले आहे. लौकिक पाठात 'महीपति' नाव गाळले आहे; म्हणून येथे अधिकृत पाठ स्वीकारला आहे.

(३२१) यातली अर्थानुकारी नादयोजना रामदासांच्या रचनांची आठवण करून देणारी आहे. 'भूपाळी' गीतच म्हटले पाहिजे. पदात 'नरहरि'-पद नाही. पण परंपरेने महीपतिनाथाचे मानले जाते. या पदाच्या चालीच्या लावण्या शाहिरांनी रचलेल्या आहेत.

(३२२) अधिकृत पदसंग्रहात दिलेला याचा पाठ जरा निराळा आहे. 'लज्जा सर्व०' इत्यादी चरण ध्रुवपदाचा म्हणून प्रारंभी आहे. येथे लौकिक पाठ रूढ म्हणून कायम ठेवला आहे. 'लज्जा सर्व' या चरणात 'घरनिधी' पाठ देऊन अर्थ लागत नाही असे मुद्रित पदसंग्रहात म्हटले आहे. 'रंगी-अंगी' यांच्याबरोबर प्रास असल्यामुळे तो पाठ 'घरनिघी' असा पहिजे-'पतीचे घर सोडून निघालेली' असा अर्थही चपखल बसतो. अंत्य चरणही पदसंग्रहात 'कविराज महीपति त्याचे नाव अभंग' असा आहे. पण येथे, मात्रादृष्ट्या अधिक निर्दोष असा लौकिक पाठ दिला आहे. महीपतिनाथ स्वतःचा 'कविराय' म्हणून एवढ्या एकाच पदात का उल्लेख करतात ते समजणे कठीण! तेथे 'नरहरिराय' किंवा 'गुरुराय' असेल काय? रचना बहुशः 'पतितपावन'-'चंद्रकांत' जातीच्या चरणांची, द्रुतोच्चारी जलद गतीची.

(३२३) प्रसिद्ध रूपकगीत. त्या काळच्या पद्धतीची रंगीबेरंगी तुकडे शिवून केलेली चोळी, आध्यात्मिक रूपकासाठी उपमान बनली आहे. यातल्या तिसऱ्या कडव्यात चोळी घालून पिंपळाच्या पूजनाला जाण्याचा संदर्भ आहे. 'बिरडे सुटले' म्हणजे चोळीचे बंद सुटे झाले – पक्षी, मोहमायेची पकड ढिली झाली; आता परत गाठ द्यायची ती चित्स्वरूपात द्यायची आहे, कारण ही चोळी 'अनुभव'-(आत्मानुभव) चोळी आहे. 'माधवकरणी' ही लावणीमुळे रूढ झालेली मिश्र-संयुक्त जाती बहुशः.

(३२४) तत्कालीन धाटणीचे पद. 'अशांत' हे 'अ+शान्त' आहे, पण 'अशामध्ये' याअर्थी सप्तम्यन्त पद दिसते. 'अशांत'=अशावरून, एवढ्याने असा अर्थ योग्य वाटतो. 'कांट्याचे अणिवर' वगैरे कूटगीताचा संदर्भ स्पष्टच आहे. 'यजमान' या प्रसिद्ध पदात्मक जातीची रचना.

(३२५) भजनी संप्रदायातले लोकप्रिय पद. येथे लौकिक पाठ कायम ठेवला आहे. 'रामरसायन' जातीचे पद; 'अचलगती' द्विरुक्त+'हरिभगिनी' मिळून ही संयुक्त जाती होते.

(३२६) शिमग्याच्या सणात तमाशा पाहण्याची वहिवाट असते, त्याला उद्देशून रूपक. 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथात दिलेली व भजनी गायनसंग्रहात मिळालेली संहिता येथे घेतली आहे. पदसंग्रहातील पाठात 'साक्षी माना' वगैरे चरण अधिक आहे; तो येथे वाढवला आहे. संग्रहातल्या पाठात ध्रुवपदाचा प्रथम चरण 'सावध व्हा रे गडे हो उमगा' असा आहे; पण येथे रूढ म्हणणीच कायम ठेवली आहे. 'महाराष्ट्र सारस्वत'मध्ये तसाच पाठ आहे. जाती 'हरिभगिनी-फटका'.

(३२७) गुरूशी भक्त कसा लडिवाळपणा करतो हे यात दिसते. गुरू ही माउलीच आहे म्हणून भक्त-मूल न चालण्याबद्दल कुरकूर करीत आहे. ज्ञानदृष्टीत दृष्टी मिळविणे, बाह्य कमलातली अंतर्गत कर्णिका पाहणे, मोहतमाच्या अवसेतून गुरूच्या मदतीने चालून मग ब्रह्मसाक्षात्काराचे पुनवेचे चांदणे अनुभवणे वगैरे रूपके लक्षणीय आहेत.

रचना अंतऱ्यात जलद गतीची, लघुप्रयास द्रुत उच्चारणाची 'हरिभगिनी'. ध्रुपदात द्विरुक्त 'कर्णफुल्ल'-'अचल गती'चे वर्धित रूप आहे.

(३२८) एक वेगळ्या प्रकारचे पद. त्यावेळची समाजनीती कोणत्या 'दशेला' पोचली होती त्याचा प्रत्यय या पदात येतो. अनंतफंदीच्या फटक्याचेच हे पूर्वरूप आहे. जाती 'हरिभगिनी-फटका'; म्हणणी जलद, लघुप्रचुर द्रुतोच्चारी.

: १०५ : गोपाळनाथ

जन्मकाळ अनिर्णीत. सन १७१० च्या सुमारास हा जन्मला असावा. समाधिकाळ सन १७६६. हा पहिला गोपाळनाथ. हा गोपाळनाथ याच्या गुरुपरंपरेतला दहावा पुरुष; दुसरा गोपाळनाथ चौदावा. 'प्रा० गी० भांडारा'त दिलेली दोन पदे याचीच असावीत. येथे दिलेले एक पदही याच गोपाळनाथाचे मानून दिले आहे.

(३२९) गुणकारी औषध देणाऱ्या वैद्याचे रूपक. भजनी संप्रदायात हे पद अतिशय लोकप्रिय. ध्रुपद 'सांगड बांधा रे' वगैरे पदाच्या धर्तीचे 'मृगपंक्ती' जातीतले; अंतऱ्यात 'देवीवर' रचनेचे मात्रिक रूप.

: १०६ : देवनाथ

नव्याने उपलब्ध माहितीअनुसार जन्म सन १७५४; मृत्यू सन १८२१ मध्ये

रामनवमीच्या दिनी सभामंडप जळला त्यात. वऱ्हाडकडील या प्रसिद्ध संतकवीची दोन हृदयंगम पदे 'प्रा० गी० भांडारा'त आली आहेत. येथे आणखी दोन पदे दिली आहेत. याचे गुरू गोविंदनाथ हे पहिल्या गोपाळनाथाचे शिष्य.

(३३०) पुत्रविरहामुळे देवकीने केलेला शोक यात उत्तम व्यक्त झाला आहे. जुन्या काळी स्त्रियांच्या तोंडी असलेल्या "देवकि विनवी वसुदेवा। बालक नेता परगावा" या अत्यंत हृदयस्पर्शी गीताची प्रस्तुत गीत वाचताना पदोपदी आठवण व्हावी! 'अमा या' – अमावास्येला या.

(३३१) या पदात देव ही प्रेयसी आहे व भक्त हा आषिक आहे. हा सुफी संप्रदायाचा परिणाम असावा. लावणीच्या ढंगाची 'तलवार' जातीतली रचना.

: १०७ : सोहिरोबानाथ

जन्म सन १७१४; मृत्यू सन १७९२; आयुष्याच्या पूर्वार्धात बांद्यास कुलकर्ण केले. मग गैबीनाथांचा (साक्षात्कार ?) अनुग्रह. सन १७७४ च्या सुमारास तीर्थयात्रेस निघाले ते ग्वाल्हेरास आले. उज्जैनला मठ स्थापला. सन १७८९ मध्ये मठातून अदृश्य झाले. अंत संभवतः त्यानंतर तीन वर्षांनी. 'प्रा० गी० भांडारा'त पाच कवने; येथे दोन.

(३३२) प्रसिद्ध भजनी-कीर्तनी पद. षण्मात्रक 'परिलीना'मधली लयदार रचना.

(३३३) एक लक्षणीय धाटणीचे पद. प्रत्यक्ष वेदान्ती संज्ञा-संकेतांपेक्षाही 'आतले' हे पद अधिक सूचक व रसवर्धक आहे.

: १०८ : जोतिराम

जन्ममृत्युकाळ अनिर्णीत. माणकोजी बोधले याचा हा शिष्य. याचा काळ इ० स०चे अठरावे शतक (मध्य भाग) हा असावा.

(३३४) देवाला जवळिकीच्या नात्याने दोष लावण्याची क्लृप्ती संतवाङ्मयात अनेकदा आढळते. जाती 'पतितपावन'-'चंद्रकांत', द्रुतोच्चारी जलदगतीची.

: १०९ : संतुदास

काळ इ० स० अठरावे शतक. गुरू सुभाननाथ. संतुदासाने 'सुबोध' ग्रंथ सन १७८२ मध्ये १५ ऑगस्टला समाप्त केला. दुसरे गोपाळनाथ यांचा हा गुरुबंधू.

(३३५) सद्गुरुब्रह्माच्या दिव्य शरीरातील 'शेडचक्रां'च्या स्थानी विविध देवांची स्थापना कल्पनेने केली आहे. शब्दरूपे बोलीतली मराठमोळी आहेत. शेड=षट्, सहा. 'ब्रह्मरंध्रु'मधील अंत्य 'उ'-कार चिंतनीय आहे. 'गुह्यस्थानी'बद्दल लौकिक पाठ

'गुदस्थानी' असा आहे. रचना अभंग 'देवद्वारा'तली आहे.

(३३६) पेशाच्या संदर्भातली रचना. अभंग 'देवीवर'.

: ११० : विठ्ठल केरीकर

काळ अनिर्णीत. सोहिरोबांच्या काळचा आहे असे मानतात; म्हणजे इ० स० अठरावे शतक, मध्य भाग-उत्तर भाग. पूर्ण नाव विठ्ठल नरसिंह नाईक, सांखोळकर. आसनास दोन पाट लागत म्हणून 'दुपाटी' व विद्वत्तेमुळे 'विठ्ठलाचार्य' अशी टोपणनावे. शांतादुर्गा व राधाकृष्ण यांविषयीची पदे या विठ्ठलाची असे 'विठ्ठलकविकृत पदसंग्रह'-कारांनी 'विठ्ठल केरीकरांची पदे' देताना स्पष्ट केले आहे.

(३३७) मंगीशनाम सांब-शंकरासंबंधीचे लक्षणीय पद. ध्रुपद खंडित, प्लुतियुक्त. अंतऱ्यात 'समुदितमदना'.

(३३८) हे पद 'राधिकेचा रंग पाहुनि' या गीताचा कर्ता विठ्ठल आजरेकराचे तर नसेल? एकंदर ढंग समान आहे. हे पद अंत्य चरणातील 'अनंत' या पदामुळे अनंतकविकृत कवितासंग्रहात समाविष्ट केले गेले, पण संपादकांनी शेवटी खुलासा करून ते विठ्ठल कवीचे आहे असे म्हटले आहे. कृष्णगोपींची गीते रचणारा म्हणून विठ्ठल केरीकरच प्रसिद्ध आहे.

षण्मात्रक लयीतली जाती 'दासी' अंतऱ्यातील प्रदीर्घ चरणात; त्याआधी 'जीवनलहरी'च्या द्विपद्या; ध्रुपद आरतीच्या 'परिलीना' जातीतले – पण उच्चारण प्लुतीने होत असावे व मग चरण 'दासी' जातीतला होईल.

: १११ : रामानंद

हा रामदासपंथी कवी इ० स० अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला असावा. 'संपादण्यां'चा कर्ता हाच काय?

(३३९) एक सुप्रसिद्ध भूपाळी.

: ११२ : मोरोपंत

जन्म सन १७२९; मृत्यू सन १७९४. यांची चार कवने 'प्रा० गी० भांडारा'त आली असून येथे आणखी चार रचना दिल्या आहेत.

(३४०) प्रसिद्ध धावा. 'आरती ज्ञानराजा'ची धाटणी.

(३४१) वैशिष्ट्यपूर्ण रचनेचा 'अभंग' – खरे म्हणजे मात्रिक छांदस रचना. खंडित, प्रासयुक्त चरण, छांदस मात्रिक 'पादाकुलक-अचलगती' मिळून छांदस 'हरिभगिनी'चा.

(३४२) एक विराणी. 'अचलगती'चे वैचित्र्य 'खंडय-प्लवंगम' ध्रुपदात व अंतराचरणात 'प्रियलोचना' हे' हरिभगिनी' वैचित्र्य.

(३४३) दुसरा प्रसिद्ध गझल. पहिला 'रसने न राधवाच्या' हा 'प्रा० गी० भांडारा'त दिलेला आहे.

: ११३ : कोकिळ

इ० स० अठराव्या शतकाच्या अंत्यभागातला कवी. मूळ नाव गंगाधर. समाधी सन १७३८ किंवा सन १७५३.

(३४४) प्रसिद्ध भजनी पद.

: ११४ : दयाराम

इ० स० अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेला सुप्रसिद्ध गुजराती वैष्णव कवी. गीतकार म्हणून याची श्रेष्ठता संशयातीत आहे. त्याच्या प्रचंड गीतसंभारात चार पदे मराठीत रचलेली आहेत. ही 'गरबी' गीते होत. त्याचा काळ मोरोपंतांचा व शाहिरांचा होय. त्यावेळी बडोद्यास कीर्तनकार पुण्याहून येत; शाहीरही येत. त्यामुळे त्यांच्या 'मरेठी' चालीची पदे करण्याची ऊर्मि दयारामाला आली असणे स्वाभाविक होते. सोनार ज्ञातीतला महान् भक्तकवी.

(३४५) हे पद 'मरेठीमां' अशी नोंद प्रारंभी आहे. सुप्रसिद्ध गुर्जर संत नरसी मेहेता यांच्याविषयीचे हे पद आहे. चाल 'अभिमन्यू' गीतासारखी आहे. नरसिंह महेताच्या आयुष्यातले चमत्कारसदृश प्रसंग त्यात वर्णिलेले आहेत.

(३४६) हे गीत मुळातच 'प्रबंध' म्हणून उल्लेखिलेले आहे. त्यामुळे ते तालगतीच्या अंगाने म्हणण्याचे खटकेदार गतीचे आहे. हे त्याच्या 'संगीत'-प्रबंधत्वाला धरूनच आहे.

ध्रुपद भजनी धुनीचे आहे. 'उद्धव' जातीची द्विरुक्त मात्रावली, पुढे 'भुवनसुंदरा'चा अंतरा आणि नंतर 'पादाकुलकी' कटावाची प्रवाही धाटणी.

: ११५ : गोविंद वणीकर

काळ अनिर्णीत. हा गोविंदबुवा नरहरिनाथ-शिष्य असल्यास जन्म सन १७२१ मध्ये. हा वणीचा राहणारा म्हणून 'वणीकर' उपनाव. याशिवाय इतर 'गोविंद' अनेक आहेत, पण या कवीची म्हणून मानली गेलेली पदे 'प्रा० गी० भांडारा'त पाच दिली असून येथे तीन दिली आहेत.

(३४७) प्रसिद्ध भजनी पद. नेहमीची पदसरणी.

(३४८) भक्तिगीत. 'पादाकुलक'-आवर्तनांची 'वनहरिणी' जाती अंतऱ्यात; ध्रुपदात खंडित रचना. पदसरणीची.

(३४९) तत्कालीन धाटणीचे हृदयंगम पद. 'अभिमन्यू' पदाची सरणी.

: ११६ : गोविंद (मुक्तिनाथशिष्य)

काळ अनिश्चित. मुक्तिनाथ नामक नाथपंथी साधू हे याचे गुरू. बहुधा इ० स० अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातला असावा.

(३५०) कूटात्मक धाटणीची रूपकशैली. अभंग 'देवीवर'.

: ११७ : गंगानाथ

जन्म इ० स० १७४९ च्या सुमारास धनगर कुळात. आडनाव कोथमिरे. गुरू गोपाळनाथ हे पहिल्या गोपाळनाथाच्या परंपरेतले. 'गंगा'युक्त अनेक नामांबरोबरच 'टीका' अशीही नाममुद्रा. अंत इ० स० १८०० नंतर झाला असावा.

(३५१) एक प्रसिद्ध लोकोक्तियुक्त रूपकगीत. पदसरणी नेहमीची.

: ११८ : महीपतिबुवा

जन्म सन १७१५. मृत्यू सन १७९०. प्रसिद्ध भक्तचरित्रकार. हा महीपतिनाथाहून भिन्न ताहराबादकर महीपति होय. हे उत्तम कीर्तनकार होते.

(३५२) नेहमीचेच संकेत. पण तळमळ स्पष्ट पारदर्शक. अभंग 'देवद्वार'.

(३५३) कीर्तनाच्या आरंभी महीपतिबुवा हा अभंग म्हणत.

(३५४) एक प्रसिद्ध भूपाळी. चरण 'पतितपावन' जातीत काही, पण मुख्यत्वे 'समुदितमदना' या 'साकी'-वैचित्र्याचे चरण अनेक.

: ११९ : काशीकवि

पेशवाईअखेरचा कवी. याचे एक कवन 'प्रा० गी० भांडारा'त आले आहे. येथे आणखी दोन रचना.

(३५५) प्रसिद्ध कथाकाव्य-जाती 'हरिभगिनी-फटका'.

(३५६) 'काशि' म्हणजेच 'काशिकवि' मानून हा लोकप्रिय भजनी अभंग येथे दिला आहे. म० अबदुल करीमखांनी गायलेल्या एका भजनात यातले शब्द आहेत.

: १२० : रामजोशी

जन्म बहुधा सन १७५७-५८ मध्ये; मृत्यू सन १८०८ किंवा १८१२; प्रसिद्ध लावणीकार. मोरोपंतामुळे उपरती होऊन शृंगारिक लावण्यांकडून आध्यात्मिकाकडे वळला, अशी आख्यायिका. 'प्रा० गी० भांडारा'त याच्या दोन रचना आहेत. येथे आणखी तीन कवने.

(३५७) प्रसिद्ध भजनी पद. वैशिष्ट्यपूर्ण षण्मात्रक लयीतली रचना.

(३५८) यातल्या 'हटातटाने' वगैरे ओळी सुबरावबाबांना उद्देशून आहेत अशी आख्यायिका आहे. जाती 'केशवकरणी'.

(३५९) आध्यात्मिक लावण्यांपैकी एक. जाती 'केशवकरणी'.

: १२१ : अनंतफंदी

याच्या रचना 'प्रा० गी० भांडारा'त आलेल्या नाहीत. जन्म सन १७४४; मृत्यू सन १८२१. उपनाव घोलप. संगमनेरचे रहिवासी. सराफीचा धंदा न करता कवने करू लागले. 'माधवनिधन' ग्रंथ महत्त्वाचा. अहिल्याबाईच्या उपदेशामुळे तमाशा सोडून कीर्तनाकडे वळला.

(३६०) एक गोपीगीत.

(३६१) प्रसिद्ध फटका. नीतीच्या उपदेशाचे चाबूक-फटके मारणारी कवने 'फटके' होत. जाती 'हरिभगिनी-फटका'.

(३६२) शब्दकळेचा सुंदर आविष्कार या लावणीत झालेला आहे. जाती 'हरिभगिनी' व तिचे वैचित्र्य 'अंबा'.

: १२२ : प्रभाकर

जन्मकाळ बहुधा सन १७६९ मध्ये. मृत्यू सन १८४३. पेशवाईकाळात शाहिरी भरभराटली, पण पुढे अत्यंत वाईट दशा आली. 'प्रा० गी० भांडारा'त याची एक रचना आहे. येथे आणखी एक आहे.

(३६३) लक्ष्मी-पार्वतीचा चढाओढीचा संवाद. रचना फार लोकप्रिय. यात जाती 'समुदितमदना'. चरणान्तीचा खटका लक्षणीय.

: १२३ : सगनभाऊ

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. इ० स० अठराव्या शतकाच्या अंत्यचरणात व एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम चरणात वावरला. जेजुरीचा राहणारा. पेशाने

शिकलगार-मुसलमान असूनही हिंदू संस्कृतीशी एकरूप झालेला प्रभावी शाहीर. 'प्रा० गी० भांडारा'त एक रचना; येथे दोन दिल्या आहेत.

(३६४) पोवाड्याचा एक नमुना. पेशवाई राज्याचा नाश यात वर्णिलेला आहे. जाती 'पतितपावन-चंद्रकांत'मधील रचना.

(३६५) पिवळ्या रंगाची लावणी. एक लोकगीत काहीसे असेच आहे. ते 'प्रा० गी० भांडारा'त दिले आहे. छापील आवृत्तीत ही लावणी आढळत नाही.

:१२४: परशुराम

जन्ममृत्युकाळ अनिश्चित. इ० स० च्या अठराव्या शतकाचा अंतभाग व इ० स० च्या एकोणिसाव्या शतकाचा प्रारंभकाळ हा याचा कार्यकाळ. पेशाने शिंपी. देवपूरकरबावांच्या अनुग्रहाने विठ्ठलभक्त झाला. याच्या रचना फक्त प्रस्तुत संकलनात दिल्या आहेत.

(३६६) एक प्रातिनिधिक लावणी. पौराणिक संदर्भ स्पष्टच आहे.

(३६७) नादाची कारागिरी या लावणीतल्या शैलीत विशेष आहे. मात्र 'टुमदार' हे नवतीचे विशेषण परशुरामाची खासियत की रूढ प्रयोग?

(३६८) ही लावणी तर ठसकेबाज, खटकेबाज म्हणून नमुनेदार आहे.

:१२५: धोंडी बापू

जन्ममृत्युकाळ अनिर्णीत. इ० स० अठराव्या शतकाच्या अंतभागात होऊन गेलेला शाहीर लावणीकार.

(३६९) एक लक्षात ठेवण्यासारखी लावणी. रचनाशैलीची करामत वेधक आहे.

:१२६: वीरक्षेत्री शाहीर

इ० स० च्या एकोणिसाव्या शतकात बडोद्यास होनाजी, सगन यांच्या अनुयायांचे फड होते. यांपैकी अनेकांनी होनाजी, सगन यांच्या लावण्यांसारख्या लावण्या लिहिल्या, पण कवनकर्त्याचे नाव व्यक्तिशः न देता 'वीरक्षेत्री' नाममुद्रेने रचना केल्या जात. या लावण्या 'वीरक्षेत्री' लावण्या, त्या बडोद्यास इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या अंत्य चरणात शिळाछापावर छापलेल्या उपलब्ध आहेत. परंपरेच्या संदर्भामुळे त्यांच्यापैकी काही लावण्या इतर शाहिरांबरोबरच दिल्या आहेत.

(३७०) गुर्जर वणिक युवतीचे वर्णन व बडोद्याच्या जुन्या खाणाखुणा यात आहेत.

(३७१) गुजरातची एके काळची दंतकथा म्हणजे छेलबेटाऊ-मोहनाराणी यांची कथा होय. त्यावर मराठीत नाटकही पूर्वी झालेले आहे. बडोद्याच्या शाहिरांना स्वाभाविकच

या अद्‌भुतरम्य प्रणयकथेची आठवण लावणीसाठी झाली असणार. शाहिराने ध्रुपदाच्या कडव्यातच विरोधाभास आणून सुरुवातीलाच पकड बसवली. वार्ता=कथा, गोष्ट; पर्या=परी, तऱ्हा; झाली=पकडी, घाली ('झालवुं' या गुजराती धातूचे मराठीकरण); आवडावती=ही मोहनाची सखी असेल काय?

:१२७: बहेरू

जन्ममृत्युकाळ अज्ञात. पेशवाईअखेरच्या काळातला कवी. कर्ता मुलगा याच्या वृद्धपणी वारला. त्यामुळे सैरभैर झालेला हा बाप आहे.

(३७२) पुत्रशोकाने सैरभैर झालेल्या भक्त बापाचे देवाला उद्देशून खडे बोल. अभंग 'देवद्वार'.

(३७३) देवाला दूषण दिल्याचा पश्चात्ताप. अभंग 'देवद्वार'.

:१२८: श्यामसुंदर

इ० स० अठराव्या शतकाच्या अंत्य चरणातला कवी.

(३७४) एक प्रातिनिधिक रामभक्तिपर गीत.

:१२९: गुरुदास

इ० स० अठराव्या शतकाच्या अंत्य भागातला कवी.

(३७५)ताललयीला धरून केलेले पद. लावणी धाटणीला जवळची रचना.

:१३०: राजाराम प्रासादी

इ० स० अठराव्या व एकोणिसाव्या शतकांच्या संधिकालातला कवी. रामदास संप्रदायातील श्रीसिद्धेश्वरमहाराजांचा शिष्य. 'भक्तमंजरी' ग्रंथ इ० स० १८३४ मध्ये लिहिला. 'प्रा० गी० भांडारा'त याची पाच कवने असून येथे आणखी एक दिले आहे.

(३७६) भक्तीच्या तळमळीचे व आत्मानंदाचे पद. जाती 'भुवनसुंदर'.

:१३१: कृष्णदास जयराज

इ० स० अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातला महानुभावी कवी. 'महाराष्ट्र सारस्वता'मध्ये (आ० ५, पृ० ६२३) 'कृष्णदास जयराम' असा याचा उल्लेख आहे. पण तेथेच उल्लेखिलेल्या पदाच्या महानुभावी पाठात ('मूर्तिवर्णन वगैरे पारंपरिक गीते')

'जयराज' असा पाठ नाममुद्रेत आहे.

(३७७) हे पद रूढ गीत म्हणून दोन पिढ्यांपूर्वी कोकणातही स्त्रियांच्या तोंडी होते. लावणी ढंगाची रचना यात आहे.

(३७८) हे दोन्ही कृष्णदास एकच मानून हे वैशिष्ट्यपूर्ण कवन येथे दिले आहे.

:१३२: कृष्णकवि

इ० स० अठराव्या शतकाच्या अंतभागातला कवी असावा. महानुभाव संप्रदायातला कृष्णकवी व भूपाळीकार कृष्ण एकच मानून एकत्र दिले आहेत.

(३७९) सुप्रसिद्ध आरती. यावरून जाती 'भुवनसुंदर' संज्ञा. 'आरती कुंजविहारीकी' यासारख्या चालीची पद्ये महानुभावी गीतांत आहेत.

(३८०) महानुभावी परंपरेतले सुंदर मुरलीगीत.

:१३३: गोविंद महानुभाव

इ० स० अठराव्या-एकोणिसाव्या शतकाच्या संधिकाळात हा झाला असावा. अनेक गोविंदकवींपैकी हा कवी महानुभाव परंपरेतला आहे.

(३८१) प्रौढ संस्कृतप्रचुर शैलीतले पद्य.

:१३४: वाकुवर्धन

अठराव्या-एकोणिसाव्या शतकाच्या संधिकालातला महानुभावपंथी कवी.

(३८२) कृष्णाच्या जळक्रीडेचे वर्णन. या पदातील पहिल्या कडव्यात 'यशोदे'ऐवजी 'कौसल्या' पाठ होता, तो उघडउघड अयोग्य म्हणून त्याजागी 'यशोदे' पाठ घातला आहे. लावणी ढंगाची रचना.

:१३५: मुरारी

इ० स० अठराव्या-एकोणिसाव्या शतकांच्या संधिकालातला महानुभाव कवी. 'बाईदेशचा राहणारा, मुनी मयंकाचा शिष्य' असा उल्लेख पदातच आहे.

(३८३) लावणी ढंगातले कृष्णगीत.

:१३६: आबाकुमार

इ० स० अठराव्या-एकोणिसाव्या शतकांच्या संधिकालातला महानुभाव कवी.

(३८४) चक्रधरस्वामींची आरती. 'गुर्जरा' हा उल्लेख चक्रधरांच्या पूर्वपरंपरेशी निगडित आहे.

: १३७ : मीनाक्षी अम्मा

जन्म इ० स० १८००, मृत्यू इ० स० १८५०. प्रसिद्ध रामदासपंथी माधवस्वामी यांची नातसून. कुंभकोणमधील तिम्मगुडी गावी निवास. सदा भक्तिगानमग्न असे, म्हणून हिला 'मंत्रवादीण' म्हणत.

(३८५) यशोदा-कृष्ण संवाद. अनेक ठिकाणी 'ए'-'ओ' यांचा लघुप्रयास उच्चार. हा द्रविड भाषासंगाचा परिणाम असेलही. पण इतर अनेक मऱ्हाठवासी कवींच्या कवनातही हा विशेष आढळतो.

: १३८ : नगाजी

जन्म सन १७५४; मृत्यू सन १८४४. वऱ्हाडात विशेष प्रसिद्ध. धंद्याने न्हावी.

(३८६) नगाजी हा 'शेतकरी नापिक' दिसतो. शेतीचे रूपक व त्यातले शेतीविषयक उल्लेख लक्षणीय आहेत. नापिक=नापित-न्हावी; तसेच न पिकणारे.

: १३९ : नगनाथ

काळ अनिश्चित. भजनी गीतसंग्रहात याची रचना आढळते. हा 'मुरहरसुत' असा आपला उल्लेख करतो. नगाजीहून हा भिन्न दिसतो.

(३८७) भजनातले ढंगदार पद. 'अभिमन्यू' गीताची चाल यावेळी फार लोकप्रिय होतीसे दिसते.

: १४० : विठोबाअण्णा

इ० स० १८१३ ते इ० स० १८७३ या कालखंडातले प्रसिद्ध पंडित व भक्तकवी. 'विठ्ठलपंत' अशी नाममुद्रा. आडनाव दप्तरदार. कीर्तनसंप्रदायात यांच्या कवनांना अत्यंत मानाचे स्थान आहे.

(३८८) भजन-कीर्तनातले प्रसिद्ध पद. कीर्तनातल्या पूर्वोत्तर रंगाच्या मध्यंतरात हे खटकेदार तालगतीतले कटाव ढंगाचे पद अतिशय खुलवून म्हटले जाई. पादाकुलकी कटावाची धाटणी.

(३८९) या लोकप्रिय आख्यानपद्याच्या चालीवर, नंतरच्या मराठी नाटकात पदरचना झाली. जाती 'भुवनसुंदर'सदृश.

: १४१ : माधव

इ० स० १८०० नंतरच्या काळातला हा कवी बहुधा शतकमध्यावेरी कवने करीत असावा. गीतकार या दृष्टीने याची शक्ती फार मोठी आहे. अनेक कवने मराठीतली नमुनेदार गीते ठरली आहेत. 'प्रा० गी० भांडारा'त याची चार गीते आली असून येथे आणखी दोन दिली आहेत.

(३९०) लोकप्रिय भजनी पद.
(३९१) कीर्तनात म्हटलें जाणारे वेदान्तपर पद.

: १४२ : माणिकप्रभु

इ० स० १८५० नंतरच्या काळातला प्रसिद्ध संतकवी. सूफीवाद व मधुराभक्ती यांचे पडसाद याच्या काव्यात विशेष आढळतात.

(३९२) श्रीरामभक्तीचा हळुवार आविष्कार. षण्मात्रक 'परिलीना' जाती.
(३९३) प्रसिद्ध गौळण. 'फुटून' या पाठाऐवजी 'बुडून' असा पाठ तोंडी म्हणणीत ऐकल्याचे आठवते.

: १४३ : बल्लव

इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागातला कवी. बाकी माहिती मिळत नाही.

(३९४) प्रसिद्ध भजनी पद. तिवाशा=उशा.

: १४४ : चिन्मय

इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या मध्यविभागातले प्रसिद्ध कवी. सखारामबोवा कोवाडकर.

(३९५) प्रसिद्ध भजनी पद.

: १४५ : कृष्णकिंकर

इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या द्वितीय चरणातला कवी. अन्य माहिती उपलब्ध नाही.

(३९७) भजनी धून असलेले खटकेदार पद.

: १४६ : रघुपति

जन्म सन १७६९. समाधी सन १८४५. मूळचे पुणतांब्याचे. बडोद्यास मुक्काम व नारायणमहाराजांचा अनुग्रह. तेथेच मंदिरस्थापना. विष्णुदास हा त्यांचा शिष्य. हा विष्णुदास कोण ?

(३९८) लावणी ढंगाची रचना.

: १४७ : सीताराम

हा कवी समर्थशिष्य सीताराम मानल्यास इ० स० अठरावे शतक. अन्यथा एकोणिसाव्या शतकातला लोकप्रिय कथाकार.

(३९९) लोकप्रिय भजनी पद.

: १४८ : जीवनतनय

हाही एक इ० स० एकोणिसाव्या शतकातला कवी असावा. अन्य माहिती उपलब्ध नाही.

(४००) कृष्णाची आईला कैफियत.

: १४९ : धोंडी गुंडी

इ० स० एकोणिसाव्या शतकातला कवी असावा. थाट शाहिरी आहे.

(४०१) फुलबागेचे रूपक. नानारूपधर जगत् ही बाग; निर्गुण ब्रह्म माळी.

: १५० : बालकवि

इ० स० एकोणिसाव्या शतकातला दत्तभक्त कवी असावा.

(४०२) दत्तवर्णनाचे लोकप्रिय पद.

: १५१ : मुकुंदात्मज

जन्म सन १७९१, मृत्यू सन १८५१. समग्र नाव गोविंद श्रीनिवास सरदेशपांडे. अन्य नाममुद्रा 'कमलाकर'. संन्यासानंतर नित्यानंदस्वामी.

(४०३) संसारतापाने नाडलेल्या मनाचे आर्त उद्‌गार.

: १५२ : नारायणबोवा

जन्म सन १७९३, मृत्यू सन १८६८. उपनाव जालवणकर. मोठे अधिकारी पुरुष. 'सप्तसागर' हा प्रचंड ओवीबद्ध ग्रंथ यांचाच.

(४०४) भक्तीच्या निमित्ताने सुंदर निसर्गवर्णन करणारी रचना.
(४०५) आध्यात्मिक कूटात्मक रूपकांची माला. 'अभिमन्यू' जाती.
(४०६) हे वैशिष्ट्यपूर्ण पद नारायणबोवांचेच असावे म्हणून दिले आहे. नंदजी हे मोठे दीर-भाऊजी. त्यांजकडे कृष्णाच्या कुब्जाप्रेमाविरुद्ध गोपींची तक्रार.

: १५३ : खाकनाथ

इ० स० एकोणिसाव्या शतकातला कवी दिसतो. विठ्ठलनाथ हा याचा गुरू असावा. कीर्तनी परंपरेत याला फार मान आहेसे दिसते.

(४०७) कान असूनही प्रभुनामाचे श्रवण न करणे म्हणजे बहिरेपण होय. अशाच तऱ्हेचे 'मुका मी झालो देवा' असेही याचे पद आहे.

: १५४ : आत्मारामबुवा

इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागातला कवी. चोरेगाव मठाचा अधिपती. ओवीबद्ध समर्थचरित्र सन १८६७ मध्ये लिहिले. रामदास-संप्रदायात मानमान्यता.

(४०८) कीर्तनसंप्रदायातले लोकप्रिय पद. ध्रुपद 'सुखकर कर साधूचा संग' असेही आढळते. लौकिक पाठ येथे दिला आहे.

: १५५ : कृष्णभट बांदकर

जन्म सन १८४४, मृत्यू सन १९०२. मूळ गाव बांदे. म्हणून 'बांदकर-बांदेकर' उपनाव. वास्तव्य डोंगरी (अचली) येथे. वडील वै० जगन्नाथभटजी बांदकर. 'प्रा० गी० भांडारा'त यांची दोन गीते दिलेली आहेत. येथे तीन.

(४०९) राम-सीता-मारुतींचे भक्तिगीत, पण त्यात कूटात्मक रूपकही पुसटसे आहे – 'विवेक मारुती'.
(४१०) कटाव-कडाकाच्या धर्तीवरचे पद.
(४११) या पदात कृष्णाचे कालियामर्दन-उपमान आहे.

: १५६ : वासुदेवानंदस्वामी

इ० स० एकोणिसाव्या शतकाच्या अंतभागातले सावंतवाडीकडचे साक्षात्कारी महंत.

'टेंबे' हे संन्यासापूर्वीचे नाव; त्यावरून 'टेंबेस्वामी' म्हणूनही प्रसिद्ध. नर्मदातटावर अनेक स्थळी गुरुमाहात्म्याचा प्रसार.

(४१२) दत्तमाहात्म्याचा प्रसिद्ध अभंग.

: १५७ : विष्णुदासबुवा

जन्म सन १८४४, मृत्यू सन १९१७. वऱ्हाडप्रांती वास्तव्य. प्रसिद्ध संत पुरुष व कवी.

(४१३) गुरुभक्तीच्या संप्रदायात अत्यंत लोकप्रिय झालेली रचना व भजनी धून.

(४१४) तालबोलाला धरून केलेली रचना. लघुप्रयास म्हणणी तालगतीला पोषक. आत्मसुंदरी प्रियकर कृष्णाला भेटायला अभिसारिका बनून जात असल्याचे वर्णन.

(४१५) लोकोक्तीने युक्त असे लोकप्रिय पद. विरोधाभास लक्षणीय.

: १५८ : व्यंकटसुत

पेशवाईअखेरचा हा कवी येथे दिलेल्या पदामुळेच लोकांना माहीत आहे.

(४१६) हे पद गिरिधराच्या पदाची संवर्धित आवृत्ती दिसते. गिरिधराचे पद मागे दिलेले आहेच.

: १५९ : बलवंत

(४१७) हे प्रसिद्ध पद सुप्रसिद्ध नाटककार कै० बळवंतराव किर्लोस्कर (अण्णासाहेब) यांचे असावे. हे कीर्तनकारांच्या एका परंपरेत कीर्तनारंभी म्हटले जाते. 'बाळकृष्णचरणीं'चे 'रामकृष्ण-चरणीं'ही होते. कै० अण्णासाहेब हे प्रारंभी कीर्तन करीत व इतर कीर्तनकारांसाठी पदरचना करून देत असत असे एका कीर्तनकार-परंपरेकडून कळले आहे.

: १६० : चांगादास

हा लोककवी खानदेशकडचा. पण त्याचा काळ अज्ञात आहे.

(४१८) रचना संतांच्या कूटगीताच्या परंपरेतली आहे.

: १६१ : नागो कन्हेर – सोनू हरचंद

हे दोन्ही लोककवी जुने दिसतात.

(४१९) निर्गुण-परंपरेची रचना या गीतात आहे. चालीचा ठसका शाहिरी परंपरेचा दिसतो.

:१६२: पठ्ठे बापूराव

जुन्या शाहिरी परंपरेतील शेवटचा प्रतिनिधी म्हणून पठ्ठे बापूराव ओळखले जातात. त्यांचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला व मृत्यू तर सन १९३० च्या नंतर झाला.

(४२०, ४२१) दोन सुप्रसिद्ध लावण्या.

:१६३: कांहीं अनाम कवि

लोकांच्या तोंडी असलेली गाणी कोणी रचली ते काही वेळा नक्की सांगता येते. महीपतिनाथ, गंगू हैबती हे चांगले ज्ञात कवी, चांगादास, नागो सोनू हे केवळ नाव माहीत असलेले कवी; पण बहुसंख्य स्त्रीगीते-लोकगीते यांचे कर्तृत्व अज्ञातच राहते. अशा गीतांपैकी सहा गीते 'प्रा० गी० भांडारा'त दिली आहेत, येथे आणखी चौदा दिली आहेत.

(४२२) सुप्रसिद्ध अभिमन्युगीत. पार्श्वभूमी म्हणून या गीताच्या संदर्भाचा उपयोग गडकऱ्यांनी 'पुण्यप्रभावा'त केला आहे. या प्रदीर्घ गीताच्या रचनेवरून नवे नाव जाती 'अभिमन्यू' रूढ झाले आहे.

(४२३) प्रसिद्ध 'चिंधी' गीत. पाचव्या कडव्यात 'सुभद्रा-देवकि' असे म्हटले जाते, तेथे 'सुभद्रा-देवी की' असे असावे म्हणून सुधारणा केली आहे. अंत्य कडव्यातला प्रथम चरण संदर्भावरून वाढविला आहे. 'भूपती' जातीची ही रचना म्हणताना सावित्री गीतासारखी निस्ताल म्हटली जाते.

(४२४) 'चिंधी'चे दुसरे लहान गाणे. तुलनेसाठी बरे म्हणून दिले आहे.

(४२५) गजगौरीव्रताचे हे प्रसिद्ध गीत वृद्ध स्त्रियांच्या तोंडी दोन पिढ्यांपूर्वी नक्कीच होते. ववसणे=वसा देऊन जाणे; भिऊ=भिमा; सुती=सुतासारखा सरळ. रचनेची धाटणी 'मदनमंजरी' लावणीची आहे; पण स्त्रियांच्या गळ्यातून काही वेगळ्याच खटक्यांनी ते ऐकावयास मिळे. विशेषतः 'आता ग गेलि' यातली लघुप्रचुर जलद गती आणि 'ववृसुनिया' यातला 'ववृ'वरचा आघात लयीत साम्यविरोध तत्त्व आणतात. येथला पाठ स्वसंगृहित गीतातला आहे; 'मराठीतील स्त्रीधन'पेक्षा वेगळे ध्रुपद येथे दिसेल.

(४२६) 'द्रौपदीचा धावा' या नावाने हे गाणे प्रसिद्ध आहे. या साध्याभोळ्या गाण्याची तुलना होनाजीच्या 'द्रौपदीवस्त्रहरण' नामक प्रदीर्घ रचनेशी केल्यास या गाण्याचे वैशिष्ट्य लक्षात येते. घरगुती सरळ रचनेतून आतली आर्तता कशी उत्कटपणे मनाला भिडते! 'बायका हे गाणे नेहमी सांगतात' असा सन १८९७ सालच्या एका स्त्रीगीतसंग्राहक वहीत शेरा आहे. 'मराठीतील स्त्रीधन'मध्ये संहिता अपरिष्कृत आहे. येथे

ती नीट करून दिली आहे. अंधी=धृतराष्ट्र-गांधारी ही दोन्ही अंध माणसे. रचना : खंडित-प्लुतियुक्त म्हणणीच्या 'पतितपावन' वा 'साकी'-'लवंगलता' मात्रावलीचे चरण भासतात.

(४२७) स्त्रीगीत म्हणून रूढ. यात हकीम म्हणजे नवरा-मालक.

(४२८) खानदेशी-विदर्भी बोलीतले हे लोकगीत. पाऊस धो धो पडतोय, शेतातली कामं अडलीयत आणि माझा श्याम तर अजून वावरातच राह्यलाय! म्हणून राधिकेच्या मनात चाललेले विचार यात आले आहेत.

(४२९) ही गौळण अतिशय लोकप्रिय आहे. थाट तर माणिकप्रभूच्या रचनेचा आहे. पण तसा नक्की पुरावा नसल्यामुळे ते येथे अनामकवीचे म्हणून दिले आहे.

(४३०) कृष्ण-गोपींचा लटका झगडा यात आहे. हे पण असेच एक लौकिक गोपीगीत आहे. कृष्ण बाजाराच्या दिवशी गोपींचे दहीदूध लुटतो, गोपींचा पदर धरून ओढतो, वगैरे लीला यात आहेत. कोल्हाटी=सोंगाड्या, नाना परीने खेळ करणारा कन्हैया. राई-चंद्रावळ=राधा-चंद्रावली नावाच्या गोपी. नवल्या=सानुली रंगवलेली मडकी. गोपी वहाणा, मडकी, बांगड्या घ्यायला जातात को समोर कृष्ण चांभार, कुंभार, कासार बनून आलेला! यातला प्रत्येक चरण खंडित आहे; त्याचा प्रथमार्ध विलंबित-प्लुत उच्चारणाचा; त्याउलट पुढचा भाग द्रुत-लघुप्रयास म्हणणीचा.

(४३१) हेही एक कृष्णलीला-गीत. विदर्भी बोलीतली घरगुती तऱ्हेची रचना आहे. 'बनीं'-च्या जागी मौखिक पाठात 'बदनीं' झाले आहे, ते परिष्कृत करून 'बनीं' ठेवले आहे; त्याआधीचे 'बदनाले बदन दिले' येथे 'बदन' पाठ योग्यच आहे.

(४३२) श्रीरंग पांडुरंगाचे गावठी रूप पटका बांधलेले आहे! अंत्य कडव्यातील उपान्त्य चरणात 'वाजती कटका' हे शब्द अर्थ-व-छंदानुकूल म्हणून वाढवले आहेत; अन्यत्र कंसातले उद्‌गारही प्रत्यक्ष म्हणणीला धरून योग्य वाटले, ते छंदोलयीच्या तोलासाठी वाढविले आहेत. 'अक्रुरा'ला जवळची 'यशोदा' जातीची म्हणणी.

(४३३) कबीराच्या कसोटीचा प्रसंग. कबीराची बिबी शिरिया. तिच्या तोंडून वाण्याजवळ बोलताना 'कबीर माझा भ्रतार' हे शब्द ऐकून वाण्याने तिचे पाय धरले. त्यावर '' 'कबिरा'चे शब्द'' असा पाठ मुद्रित संग्रहात आढळतो, पण तेथे ' ''कबीर'' असे' – ' ''कबिरा''-से' असा पाठ अन्वर्थक् म्हणून योजिला आहे. ही रचना खरोखर कोणातरी उत्तम कवनकर्त्याची दिसते; पण आज तिचा समावेश 'वासुदेवाची गाणी' यात केला जातो.

(४३४) व (४३५) खास प्रातिनिधिक अशा अज्ञात कवींच्या दोन रचना.

पुरवणी

: १६४ : एकनाथ (?)

(४३६) ही सुप्रसिद्ध गवळण एकनाथांची म्हणून म्हणतात. पण काही पाठांत 'मीरा कहे प्रभु' अशी नाममुद्रा आढळते. पण ते कोणीतरी मागाहून घुसडलेले असावे.

: १६५ : तुकाराम (?)

(४३७) हे सुप्रसिद्ध गीत स्त्रियांच्या गीतांत रूढ आहे. पण शेवटची द्विपदी हिंदी पदातली असावी व कोणीतरी याला जोडून दिली असावी. ती अशी : "नामभजन सबसरा मिठाई सुधारसोंकी सिंधु। तुका (कहे) और छंद छोडके भज रे माइ गोविंदा।"

परिशिष्टे

१. पहिल्या ओळींची सूची

प्रथम चरण	पृष्ठ
अकल्पित द्रुम आजि संयोगें०.	२३
अक्रुरा गोपि आक्रंदती०	२४५
अखंड सावधान असावें०	१५८
अग्नी जाळी तरी न जळती०	३९
अजि अजी अहीवर शयन०	२७०
अजि म्यां ब्रह्म पाहिलें	२००
अडखळूनी पडसी घालूं नको०	३५
अनंत लीला रूप सांवळा तो०	१२८
अनादि निर्गुण प्रगटली०	९०
अनुभवचोळी उंच अमोली०	२१४
अपराधी आहें मोठा, मारणें०	१४८
अमरगण गगनीं पाहाति०	६
अमृताहुनी गोड नाम तुझें०	४०
अरे विठ्ठला सख्या घननीळा०	२९४
अर्जुन होउनि संन्यासी, झाला०	२८८
अल्याड पल्याड पताकांचे भार	३९
अवघाची संसार सुखाचा०	१८
अवघा रंग एक झाला, रंगीं०	६९
अशांत समजा रे, गुरुखुण०	२१५
अशाश्वत संग्रह कोण करी	१९७
असा कसा बिलगला उरीं	३२८
असा धरिं छंद, जाय तुटोनियां०	२३३
आइ मज कां म्हणसी वाईट	२९७
आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा	३४
आकाश तडतडीं मेरु हा०	२
आकृरा मंगळे, लवती पिंगळे	६
आज मथुरेचा बाजार, झाला०	३२७
आजवरी होतें मी मोकाट	२०
आणि आदिपुरुष होता रचिला	१०२
आतां काय पुजूं देवा, माझी मज०	७६
आता तरि जाय जाय जाय	१४८
आतां पूजा कोठें वाहूं, पाहतां०	१४२
आतां मी सांगों काय गे	१७९
आतां रामपायीं मना लाग वेगें	१६१
आत्मरूपीं रूप रंगलें सहज०	२३
आधीं तूं मुक्तचि होतासि रे०	२९
आधीं होता वाघ्या, दैवयोगें झाला०	१२४
आनंदरस हा प्याला, भवताप०	२९२
आनंदाचे डोहीं आनंद तरंग	१२२
आपुल्या सुखाचा देईन मी वांटा०	३४
आमची तों दशा विपरीत झाली०	६९
आमुची माळियाची जात, शेत०	५७
आमुच्या वाटे नका जाऊं, नये तें०	१६९
आम्हां घरीं एक गाय दुभताहे	१२७
आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें	१२०
आम्ही काय कुणाचें खातों रे	१४९
आम्ही चकोर हरि चंद्रमा०	१५
आम्ही जातीचे कुणबट	२२४
आम्ही जातीचे ब्राह्मण, आमचे०	१४१
आम्ही न हों हो पांचांतले	२२१
आम्ही वारीक वारीक, करूं०	५५
आरती ज्ञानराजा०	९८
आरती भुवनसुंदराची	२७५
आरेवरी आर रे, पिंपळावरी०	२४

प्रथम चरण	पृष्ठ
आलाडु आडु पालाडु आडु०	२५
आली रे आली, आली गुरुमाऊली	१६४
आली सिंहस्थ पर्वणी, न्हाव्यां भटां०	१२५
आलों तुझ्या दर्शनासी, भेट द्यावी०	६६
आल्या पांच गौळणी, पांच रंगांचे०	८४
इतुकें दे मजला० (केशव०)	१६५
इतुकें दे मजला० (शिवदिन०)	१९१
उगमापासुनी गंगा सागरासी०	४०
उगवला दिनकरु विश्व देखे०	९९
उठ चतुरा नाटकी हरि	२११
उठा पांडुरंगा प्रभातसमयो०	२३७
उठा प्रातःकाळ जाला, आत्माराम०	२२६
उठोनियां प्रातःकाळीं, मूर्ती०	१५४
उदारा पांडुरंगा धांवें, लवकरी	७१
एक तत्त्व नाम दृढ धरीं मना०	१८
एक नवल आहे, नदी०	३१२
एकी सांघे एकीप्रति, आइक वो०	१३
ऐक बा रामराया, तुझ्या वंदितों०	२२७
ऐका गाये साधुसज्जन हो०	८६
करितों प्रार्थना येतों लोटांगणीं	२६५
काजळकुंका भुलसी वेड्या०	१३१
कांट्याच्या अणीवर वसति०	२५
कांती सांडवला रे भुजंग, परि०	१३६
कान्होबाची संगती ब्रह्मादिक०	३७
कान्होबा तुझी घोंगडी चांगली	२१
कां मज लखलख दिसतें, किंवा०	१८९
काल पाहिला हरी, यमुनेच्या०	४८
कासयाची चाड मज नाहीं वो०	२०
किती पृथ्वीचें वजन, किती०	१५०
कीटक-भृंगी न्यायें लागली०	१६९
कुण्या हावशाची रंगली	३३१
कुंति म्हणे धांव श्रीहरी	३२१
कृष्णा एक पांखरूं आहे०	८८
कृष्णा तुला मी ताकीद करितें	३७
कृष्णा धांव रे लवकरी, संकट०	८०
कृष्णा मजकडे पाहुं नको, माझि०	२९०
कृष्णें वेधिली विरहिणी बोले	१९
केला राम धणी राम धणी	२२९
कैंचा हा हाट कवणाची गोणी	६७
कोण मी मज कळतचि नाहीं	१५१
कोणें गांजियलें सांग०	२८४
खडतरलें आसन, त्यावर०	४९
खुळखुळा देउनी बाळ०	१३७
खेळे भोंवरा गे बाई भोंवरा	८५
गगनग्रास घोटीं ब्रह्मांड हें०	१५
गड्यांनों राजा कीं रे झाला०	३५
गप्पाटप्पा करितिल लोक०	२०४
गरुडटके ज्याचे भारी, कुंचे०	६२
गाढव शृंगारिलें कोडें, कांहीं०	१२४
गाये तो गाणु नाचे तो नाचणु	६३
गुरुगोडी घेतली आम्ही, नित्य०	१६५
गुरु निःशब्दाचीं बीजें, आम्हां०	१६८
गुरुनें नवल केलें ग, माझें०	२१५
गुरु महाराज गुरू, जय जय०	३०८
गुरुमाय मला नको चालउं गे	२१६
गुरुवाक्याचे निजशेष चाखाया०	१६७
गुह्यस्थानीं प्रभा असक्त०	२२४
गोपिका वेल्हाळा, अवघ्या०	५५
गोमटस्वामी उद्धरीं मजला	१०७
गोविंद गाणें गाईच्या गोठणिं०	२०१
गोविंदा तूं जळ मी तेथें कल्लोळ	१८६
घडीघडीचे रंग करितो०	२१३
घालीन लोटांगण वंदीन०	४१
घेउनि ये हरि मंदिरीं, चैन०	२२७
घ्या मुकुंद मुरारी गोविंद	३३२
चवाळ्याची सांगेन मातु	२१
चहूंकडे देवा दाटला वणवा०	७०
चाड नसे मज आणिक कोणाची	१८६

प्रथम चरण	पृष्ठ
चातकाची तृषा मेघें पुरविली०	२२
चाल चाल रे मना वना जाऊं	३०१
चाल माझ्या राघो, डोंगरीं दिवा०	१२६
चिंचेच्या पानावर देउळ रचिलें	८९
चित्त देउनी ऐका रे	१४७
चित्तीं धरिली वासना, सिद्धी न्यावी०	२३७
चिरगुटें घालूनि वाढविलें पोट	१२५
छेलबटाऊ-मोहनाराणी	२६३
जयजयाजी व्यंकटरमणा०	२०८
जयाची अवस्था तो पैं भेटला	५
जरि पेखिला मस्तकावरी०	७४
जळक्रीडा खेळे श्रीहरि	२८०
जाउनि सांगा श्रीहरिला, एकदां०	१३५
जात होतें मथुरेच्या हाटा, तेथें०	१९३
जात होतें माधवें पाचारिलें वो	७५
जीव तूं प्राण तूं, आम्हां तूं गा०	३३
जीवींचे जिवलगे माझे कृष्णाई०	७१
जैसे तरंग सागरा रे०	७
जो जो जो जो रे, कुळभुषणा०	१७४
जोहरियाचे पुढें ठेवियलें रत्न	५६
जोहार मायबाप जोहार०	६८
झालें बाइ वेडी, दरबार०	२९२
टुमदार कुणाची छान, नवति०	२५६
ठुमकत चालती गोड किति०	२६२
तारीं तारीं गुरुराया, गेला गेला०	२४१
तारीं मज आतां रखुमाईच्या०	५४
तारूं लागलें बंदरीं०	१२३
ताळ वाजे मंद मंद, मुखीं०	१५१
तिचें वदनकमळ पहा डोळां०	१६४
तुज्या चरणकमळीं होवू अळी०	२२७
तुझा देव तुजपाशीं, परि तूं०	१२०
तुझा मुखडा अजब हिरकणी	२१९
तुझिया पाउलां शरण, जें सर्व०	६१
तुझ्या वेणुवाच्या नादें, मी०	१४०
तुम्हि जातां कुठें मनम्हवना०	३१५
तूं किती गैला, बिनसिंगाच्या बैला	२३६
तूं माझा यजमान रामा, तूं माझा०	१९४
तेतीस वरुसां, भरोनी तिनी०	१०३
तें मन निष्ठुर कां केलें०	७९
तो तुम्हि आणा झडकरि०	१९३
तो हरि असतां कां करुं चिंता	२०७
त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा०	९६
त्रिजटेप्रति जानकी म्हणे, म्यां०	१०१
त्रिलोकांमाजिं पाहें हा जीव०	११९
त्रिलोकीं भवनिं राघो होई०	११०
दक्षणच्या पेशव्याशीं घाला०	२५२
दत्त दत्त दत्त हाचि जप करी०	२९९
दयानिधि हे करुणालय राम	९७
दशरथसुत राम त्यजुनि०	२९०
दही रे दुधाची, गवळण०	३२७
दाखवा दाखवा राम कैसा वो	१६६
दिन सोनियाचा धन्य उगवला	१९५
दिवस आज धन्य आनंदाचा०	२६९
दिवाळखोर विठोबा पंढरपुरीं०	२२२
दुर्योधन दुर्बुद्धि पुसे नित	२५५
दृष्टीचें जें आगर, शून्याचें जें०	२
देंऊळ बांधिलें कळस साधिले	७७
देव तो रे तो रे तो रे, पाहुनि०	२००
देव-निवृत्ति यांनी धरिले दोन्ही०	४२
देवा तुझा मी कुंभार, नासीं०	५६
देवा तुझा मी सोनार, तुझे०	५९
देवा संसारसागरीं पडलुं०	११३
देह जावो अथवा राहो०	४१
देह मांसाचा पिंजरा, जीव-पक्षी०	२०५
दोन प्रहर रात्र झाली, ऋषि०	२११
ज्ञानपांवा मोहरी, वाजवितो०	१८१
द्रौपदिभगिनीवरती प्रीती०	३२०
द्रौपदीसि बंधू शोभे नारायण	३१९

प्रथम चरण	पृष्ठ
द्वारकेची मूर्ति एकनाथाघरीं	१३३
धने धने ऐसी कराडे (हो)०	११५
धन्य तुझें लावण्य प्रीतिचे बाण०	२४७
धरुं नको रे वाट माझी, मला०	३१५
धवळे भोळे चक्रवर्ती, धवळे०	१५५
धांव रे धांव आतां दीनवत्सला०	७९
धांव रे धांव किष्णा श्रीरंगे०	३२३
धांवूनी जाईन श्रीमुख पाहीन	३२
धिग् धिग् धिग् धिग् जिणें तुझें०	१७२
धुतांच मोतीं जळीं हरपलें०	९५
धुमधुम बार उडविला, ऐसा०	९४
नको वाजवुं कान्हा मुरली	८३
नगा म्हणे आम्ही जातीचे नापिक	२८५
नटवर नट नागर अति०	२६७
नंदबाळक मोठा चाळक, मोठा०	३२५
नमो आदिमाया भगवती	९१
नरजन्मामधिं नरा करुनि घे०	२४३
नवल नवल मोठें, कैसें०	१७९
नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया०	४३
नष्ट नारायणा दुष्ट कर्म केलें	२६५
नाचत पंढरीसी जाऊं रे०	७९
नाजुक रुपडें दिपडें ठिकडें०	२५७
नाथाच्या घरची उलटी(च) खूण	८८
नामयाचें प्रेम केशवचि जाणे	३३
निगम हा वेल प्रकाशमान०	५९
निजलिस काय गे, होय जागि०	१९४
नित्य नवा कीर्तनीं कैसा०	७६
निरगुन कीं निराकार	३१३
निरत हो मंगीशपदीं मना०	२२५
निर्गुण माळ्यानें हो माळ्यानें०	२९८
निर्गुण रूपडें सगुणाचे बुंथीं	५६
निवांत श्रीमुख पहावें०	७६
निवृत्ति म्हणे करितां समाधान	४२
निश्चयाचा महामेरू, बहुत०	१५७
निळी कांचभूमी खेळे वनमाळी	८२
पडताळुनी सुऱ्या पशु०	१३६
पंढरीचे ब्राह्मणें चोख्यासी०	६९
पति(त) मी देवा, तुमचे पदरीं	१९५
पदक विठ्ठलाचें गेलें०	४६
पद गातों मी नेणता	२४
पदर धरुं नको सोड	३३२
पसरले सरले गिरि साजरे	१५२
पहातेया पाहाराः विरहें०	१०
पहालें रे आजीं पहालें रे०	२२
पहिलें नमन देवा जिनेश्वरा०	११२
पांडुरंगकांती दिव्य तेज०	१७
पांडुरंगा कोठें जासी, ओढुन०	१४६
पाणियासी कैसी आतां एकली०	८३
पान्यानं पावसानं धंदाक् नाहीं०	३२६
पाव्हणा आला मला पंढरीचा०	३३०
पाषाणाचीं देउळें, पाषाणाचा०	१
पाहतां पाहतां धर्म बुडाला	२१७
पाहतां पाहतां वेधलेंसे मन०	५९
पाहावें भाग्य नरसिंह०	२३०
पाहुं या रे कृष्ण जो मर्दि०	३०६
पाळांती जंव नारी०	११
पीतांबरधर विष्णु, चर्मांबर०	१९६
पुरुष म्हणे मज करकर न०	१०५
पुसतसें सांगा मी हें, माझें०	१२६
पूर्ण ब्रह्म होय गे, वर्णूं मी आतां०	१४७
पूर्णब्रह्म होय रे, वर्णूं आतां०	२०७
पैल पाहा हो परब्रह्म भुललें०	५७
प्यालों मी प्याला, प्याला नामाचा	११८
प्रभातकाळीं जननी यशोदा०	१७७
फर फर फर फर वोढिति०	१५३
फार कासया बोलावें	२३५
फुगडी फू बाई फुगडी फू०	२२
बरसत घन चमकत विज०	३०८

प्रथम चरण	पृष्ठ
बहिरा मी झालों देवा, तुझे गुण०	३०३
बहु भुलवणा बहु भुलवणा	६७
बाइल पैशाची बा पैशाची	१९०
बाजिराव महाराज अर्जि०	२७३
बा तुझा चालता काळ, खायाला०	१९८
बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी	१२२
बाळकृष्णचरणीं लक्ष लागो रे	३११
बोल रे बोल कान्हा, काय बोलसी०	१६२
बोलूं ऐसें बोलें, जेणें बोलें०	३३
ब्रह्मपुरी पेठ तेथें चला जाऊं	१८४
ब्रह्म सनातन रे, तो हा०	१६०
ब्रह्मांड-गोलकीं पवनाच्या०	३०
भक्तजनां सांभाळीं, सांवळ्या येइं०	२९३
भक्तांचिया काजासाठीं, साधूंचिया०	१९९
भक्तांमध्यें भक्त निवडला०	३२९
भक्ति ग वेणी, माझी गुंफा गे०	२९६
भक्तीं आकळिला, कृपाघन०	३१०
भक्तीं आकळिला दयाघन०	१७१
भज भज भवजलधिमाजि०	२४२
भला जन्म हा तुला लाधला०	२४२
भंवर मंचकीं सेज फुलांची०	२८३
भवाब्धिसागरिं मांडिली टिपरी०	१९
भाउजि हो बोलण्यास लाज०	३०२
भाग्यहीन मी, देवकि वदली०	२१९
भाव धरा रे, आपुलासा देव०	१९०
भावभक्ती अंगीं उठे, प्रेमभरें०	३०७
भासे जगदाकार तरंग	१६०
भिंगाचें भिंगुलें, खांद्यावरी०	८४
भीमकबाळा म्हणे नृपाळा०	२३९
भीमरूपी महारुद्रा०	१५५
भीमातीरीं एक वसविलें०	१२७
भुलविल्या सानुराग, म्हणती०	२८२
भेटीची आवडी, उत्कंठित चित्त	३२
मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास	१२१

प्रथम चरण	पृष्ठ
मंगळनिधानु कृष्ण देवकिया०	५
मंद हसित रघुराय नयनिं०	३०५
मन माझें रामपदीं जडलें	२६६
मनमोहन मुरलीवाला०	२०१
मन हा बहुरंगी, चाळक०	१३९
मनुजा राम भजावा रे, मूर्खा०	१७६
मनुराजा एक देहपुरीं, असे०	१३०
मर्जी देवाची देवाची, मिथ्या०	२९१
मसिं बोलु नको गोविंदा, मजला०	८२
महाप्रसाद ताटींचा, विडा०	५८
मागें शून्य पुढें शून्य, तेथें कैचें०	१३६
मांजराचे डोळे गेले, उंदिर०	५२
माझा जीवींचा सोयरा, कां बा०	१८५
माझी देवपूजा, देवपूजा, पाय०	१९०
माझें मागणें, मागणें नसे कांहीं	२८६
मांडियेला खेळ, बुद्धिरंगाचें०	४६
माता पिता त्राता अरि पुत्र भ्राता०	१८८
मी झाडविणार गुरूचा०	१७६
मी पिवळि पाकळी पिवळा०	२५३
मी रे अपराधी मोठी, मज०	६६
मी सद्‌गुरुघरची सैरि०	१७०
मी सद्‌गुरुची लेक, भाव एक	२९
मुक्ताफळ नथ नाकीं, चरणीं०	३८
मुक्तीचा तोडर भक्तीपाईं रुळे	१८२
मुंगी व्याली शिंगी झाली, तिचें दूध०	४५
मुरलि तुझी गोड कान्हा०	१३५
मुळींच मी जाणें तुझा ठेंगेपणा	३४
मूर्ति येकली मीं देखिली	१४४
मोडकेंसें घर तुटकेंसें छप्पर०	८५
मोतीयांचा चूरा फेंकिला अंबरीं	४३
मोलें घातलें रडाया, नाहीं आसूं०	१२३
यशोदे घराकडे चाल, मला०	३६
यश्वदा म्हनती कृष्णाला, नको०	८१
याजसाठीं केला होता अट्टाहास	१२३

प्रथम चरण	पृष्ठ
यादवांचे कुळीं झोंड जें जन्मलें	५१
युगें अठ्ठावीस विटेवरी ऊभा	४१
येका लोभासाठीं नाहीं तें करीती	२०५
येथोनि तेथवरी धांवोनियां०	३१
योगी पावन मनाचा, साहे०	२७
रंगा येईं वो, रंगा येईं वो	१८
रंगीत पाळना हौसेनं केला	१४५
रघुवर मुक्तमनीं, प्रकटे०	१०५
रडत माझें बाळ तान्हें०	८२
रमारंग हृदयसंग घडवी०	२२५
रम्य मुरली मुरारी वाहतो	१७८
राईयेवढें पांखरुं, त्रिभुवनिं०	४४
राज्य आलें रघुनाथाचें, भाग्य०	१४९
रांड तेची खरी मुखीं नाहीं हरी	१३१
रात्री-दिवस आम्हां युद्धाचा०	१२१
राधे तुला पुसतो घोंगडिवाला	४८
रामकृष्ण नरहरी, विठोबा०	२८९
राम गोसावी कीं झाला, अवघे०	२०२
रामदर्शनासि चला लाभ हा०	१००
रामा करिं माझा प्रतिपाळ	३००
रुमझुम धुमधुम थिरिकिटि०	१६३
रूपीं जडले लोचन, पायीं०	१२२
लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि०	२४९
लंडेगुंडे हिरसे तट्टू यांची०	२४६
लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं०	१५६
लागला चटका, हा प्रपंच अवघा०	१७४
लागला तोबा, तोबा मज बाई०	२८९
लेइने सजाइ सेज वालिये०	१०७
लोभ हरीचा लटका गे बाई	१९३
वटपत्र गळे फिरतां आकाशीं	२३७
वरिवरि हृदयीं लिहिला राम०	६५
वसोनि संतांघरीं हो, घेतली०	६०
वाघें उपदेशिला कोल्हा, सुखें०	१२४
वाजे पाऊल आपुलें, म्हणे मागें०	१४९
वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण	१२५
वाराणसी तीर्थ थोर, तेथें लोक०	२०८
विंचू झोंबला साजणी, धांवा०	१९१
विठाबाइ माय, माय पंढरीची	२३४
विठो माझा लेंकुरवाळा, संगें०	४७
विठ्ठल विठ्ठल गजरीं, अवघी	६७
विठ्या विठ्या विठ्या, मूळ०	४७
विरहतापें फुंदें छंद करीत०	१२९
विश्वंभर मूर्ति विश्वाची पाळक	१५
वेगें रामयात्रे : गेला वो गुजरू	३
वेडें वांकुडें गाईन, परी०	१२१
वेणुनादाचिया किळा, पान्हा०	७८
वेद अनंत बोलिला, अर्थ०	१२०
वेध लागला रामाचा, सुरवर०	१५४
वैद्यें गुण केला बा गुण केला	२१८
वैष्णव सद्गुरु निजला माझा०	३०५
वोळला रे रंग वोळला रे०	१५१
शरीर विनटलें सेवे तुझें०	६१
शिकला बातबेत सारा, जुंपला०	३०९
शुभ्र सिंधू वरती वरेला	१३२
शून्य साकारलें साध्यांत दिसे	५३
श्रीकृष्ण खिल्लारी गोधनें चारी	१३८
श्रीरंग उभा विटेवरी, बांधतो०	३२९
श्रीरामकृष्ण गोविंदे, म्हणा०	२३१
श्रीहरि माझा नंदाचे घरिं०	१४३
सकाळीं उठुनी, धर्मानिं काय०	३१७
सखिये सांगेन जिविंची०	१८०
सख्या हरि चोरी चाल करूं	१८३
सगुण गुणमाया, आली०	८६
संत आले वरले दिंडी, हातीं०	७७
संतकृपा झाली, इमारत फळा०	१३१
संत दयाळ कसे, राजा रंक०	१६७
संतपदाची जोड दे रे हरी०	१९७
संतांची खूण संतचि जाणति०	१३९

प्रथम चरण	पृष्ठ
सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं	१५७
सत्वर पाव गे मला, भवानी०	९१
सदाचा हा धाला, सदाचा भुकेला	१३३
समान नीट दोहीं आंगें, पोरा०	१३४
सये ! कैं मनोरथ जगन्नाथ०	१६२
सर्व साहित्य पूजेसी आणिलें	११७
संसारिंचा धंदा आसा वो०	११४
सहस्र दीपें दीप कैसी०	८९
सांगड बांधा रे भक्तीची०	१४६
सावध व्हा गडे हो नीट०	२१६
सासूची सून एक पानिया गेली	१४६
सुखकर साधूसंग, प्राण्या०	३०४
सुखसंभोगीं वेल्हाळी : कृष्ण०	८
सुंदर माझें जातें गे, फिरे०	४६
सुंदर सुरेख ओतिलें०	१७
सुंदर सुस्वर मंजुळ मंजुळ०	२७६
सुंदरा म्हणे दिलभरा०	२५९
सुरगणईशा मानववेशा०	२७८
सुवेळ सुदिन तुझा गोंधळ०	९०
सेज सिद्ध झाली, निजा श्रीधरा	५०
सोळा शतें चौऱ्यांशींत झाली०	१९२
सोऽहं चांदणी, चांदणी ग०	३०१

प्रथम चरण	पृष्ठ
स्मरतां नित्य हरी, मग ते०	१६०
स्वर्ग जयाचीं साळोंखा, समुद्र०	२३
स्वामि चालावें निज मंदिरा, हो०	१६८
हंबरोनी येती, वत्सा धेनु पान्हा०	५५
हरहर विठ्ठल जगदुद्धार०	७२
हरिभजनावीण काळ घालवूं०	२२१
हरि मज कसा करिल०	१९७
हरिमय सर्व जग मज गे०	१७८
हरि माझे जीवींचें जीवन, हरि०	१४७
हरिविण कोणि न दिसे०	२३३
हरि हा अपणचि जग झाला	१८७
हरि हा आनंदाचा कंद	२८७
हरि हा बहुसाल नाहीं देखिला०	१८५
हवाया नळे बाण भांडीं अनंतें	१५२
हळदुली वाटुनी वाटिला पाटा	८६
हाटकभाजनमध्ये कर्पुर०	२०३
हातीं राख पायीं राख, मातें राख०	६४
हुंडगी निघाली बाजारा०	७७
हृदया बरें विचारीं, नाम स्मरें०	२२८
हें तुज कसें दाऊं, कसें दाऊं	७३
होउनि गोसावी, गोसावी०	१९८

२. रचनाप्रकार-विश्लेषण

१. अभंग-ओवी : सुमारे १०५ (यातली काही कवने कृष्णवर्णनपर, काही उपरोधोक्तीचे व थोडे कूटात्मक अशा सदरातही समाविष्ट होतात.)
२. आरती : (१) काकडारती १, (२) धूपारत्या २, (३) विभूतिवर्णनपर ७, (४) शेजारत्या ३
३. उपरोधोक्ती : सुमारे १० कवने; यात तुकारामाचे व्याजोक्तीचे अभंग विशेष महत्त्वाचे.
४. कथनात्मक कवने : सुमारे ११
५. कटाव : ३ नमुने
६. कूटात्मक रचना : (भारुडे वगळून) सुमारे २०
७. कृष्णगीते : (गोपीगीते वगळून व काही अभंगपदे धरून) सुमारे ४०
८. खेळियागीते : सुमारे ८ (यातली काही कूटगीतांत मोडतात; टिपरीगीते यातच आहेत.)
९. गझल : १ नमुना
१०. गोपीगीते : (विराण्यांसह) सुमारे २२
११. चूर्णक : २ नमुने
१२. तत्त्वचर्चापर : सुमारे २५ (तत्त्व-धर्मविचार सरळपणे वर्णिणारी कवने)
१३. पदे : सुमारे ९२ (यात कृष्णगीते थोडीफार समाविष्ट आहेत.)
१४. पाळणा : १ नमुना
१५. पोवाडा : १ नमुना (हा कथनपर गीतांत समाविष्ट नाही.)
१६. प्रार्थनागीते : सुमारे ३८ (यात धावे-स्तोत्रे समाविष्ट.)
१७. फटका : १ नमुना
१८. भारुडे : (यातील काही कूटात्म रूपकेही आहेत.) सुमारे २६ (एकनाथी भारुडे सुमारे १० समाविष्ट)
१९. भूपाळ्या : ४ नमुने
२०. लावण्या : भक्तिपर-आध्यात्मिक : ४ नमुने; शृंगारिक : ८ नमुने
२१. वर्णनात्मक रचना : विभूतिवर्णन : सुमारे १६ रचना; सृष्टिवर्णनपर : २ नमुने

(जैन, लिंगायत, महानुभाव, मुसलमान, खिस्ती, वारकरी, रामदासी, दत्तसंप्रदायी अशा विविध धर्मपंथ मताची कवने यात अंतर्भूत झालेली आहेत.)

३. संदर्भ-ग्रंथांची यादी

अनंतफंदीकृत कवितासंग्रह : (चित्रशाळा, पुणे)

अनंतबोधाची कविता (लेख) : रा० चिं० ढेरे ('इंद्रायणी', मे, १९६३)

अनंतकविकृत कवितासंग्रह : (काव्यसंग्रह आवृत्ती)

अंधारातील लावण्या : संपादक – य० न० केळकर

अमृतरायकृत कवितासंग्रह : संपादक – मोडक-ओक (निर्णयसागर)

आद्य मराठी कवयित्री (महदंबा) : (प्रस्तावना-संहिता) संपादक – वा० ना० देशपांडे

आनंदतनयकृत कवितासंग्रह : संपादक – मोडक-ओक (निर्णयसागर)

आमचीं गाणीं (स्त्रीगीते) : संग्राहक – कुसाबाई द० दामले

इंद्रायणी मासिक : ऑक्टोबर (दीपावली) १९६२, मार्च, मे, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर १९६३

उद्धवचिद्धन कवितासंग्रह : (काव्यसंग्रह – ३७)

एकनाथादींची गाथा : (सकलसंतगाथा – ४)

एकनाथाची भजनें : संग्राहक – विनोबा

एकनाथपंथीय बाड व अज्ञात कवि (लेख) : सुरेश जोशी ('इंद्रायणी', जुलै ६३)

एकनाथस्वामींची गाथा : (इंदुप्रकाश प्रेस)

एक होता राजा (लोकसाहित्य) : संपादक – डॉ० सरोजिनी बाबर

कमळाइसाचा धावा (लेख) : डॉ० यु० म० पठाण ('मराठी संशोधन पत्रिका', जानेवारी ७३)

कीर्तनतरंगिणी : भाग १-२-३-४ (नवी आवृत्ती, सन १९३७) संपादक – मोघे-जोशी-पुराणिक-केमकर, अनु० – देवस्थळी, प्रकाशक – के० भि० ढवळे, मुंबई-४

कीर्तनसुधाधारा : संपादक – श्री० वि० परांजपे

क्रिस्ताचे यातनागीत (लेख) : अ० का० प्रियोळकर (म० सं० प०, ऑक्टोबर ६२)

खिस्तपुराण : फादर स्टीफन्स (रोमन लिपीतील आवृत्ती)

गीतपंचक (जैन) (लेख) : डॉ० सुभाषचंद्र अक्कोळे, 'सन्मति' मासिक, डिसेंबर १९७७

गंगाजळी : रा० चिं० ढेरे

गुजराती कविओना मराठी पद्यो (लेख-गुजराती) : अगरचंद नाहटा, 'स्वाध्याय' त्रैमासिक, ऑगस्ट ६५

गुजराती कवींची मराठी पद्ये (लेख) : ना० ग० जोशी, म० सं० प०, १९६६

गोरक्षविरचित अमरनाथ संवाद (लेख) : भा० इ० स० मं० इतिवृत्त १९१५
छंद द्वैमासिक : अंक १, सन १९५६
छंदोरचना : मा० त्रिं० पटवर्धन
जनाबाईचे अभंग : (स० सं० गाथा-२ मध्ये समाविष्ट)
जिनसागराची समग्र कविता : संपादक – प्रो० जोहरापूरकर
तुकारामाची गाथा : संपादक – पु० मं० लाड, (मुंबई शासन प्रकाशन)
तुकारामादिकांचा गाथा : (स० सं० गाथा ४ व ५)
दमयंती स्वयंवर (रघुनाथपंडितकृत) : संपादक – अ० का० प्रियोळकर
दामाजीपंत व विठ्यामहार (लेख) : वि० का० राजवाडे (भा० इ० सं० मं० संमे० वृत्त, १९१६)
(श्री) **दामोदरपंडितविरचित चौपद्या** (लेख) : डॉ० म० प० पेठे, श्री० दि० ग० पोंक्षे, म० सं. प०, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९७४, वर्ष २१/४
(श्री) **दिनकराची स्फुट कविता** : समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे
देवनाथ महाराजांचा कवितासंग्रह : संपादक – वा० दा० ओक (काव्यसंग्रह)
ज्ञानदेवांचे (?) एक कूट पद्य (लेख) : पंडित आवळीकर, म० सा० पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर १९७७
ज्ञानदेवादींचा गाथा : (स० सं० गाथा-१)
ज्ञानेश्वरांची प्रभावळ (संतमंडळींचे अभंग, परिशिष्ट) : संपादक – ल० रा० पांगारकर
ज्ञानेश्वरांचीं भजनें : संपादक – विनोबा
ज्ञानेश्वरी : महाराष्ट्र (मुंबई) शासन प्रकाशन
नरहरि तुकाविप्र याचे अभंग (लेख) : ज० बा० कुलकर्णी, म० सं० प०, जुलै, ७३
नवे नवनीत : संपादक – ज० शा० देशपांडे
नामदेव चरित्र (संतमडळींचे अभंग) : ज० र० आजगावकर
(श्री) **नामदेव दर्शन** : संपादक – रेळेकर, इनामदार, मिरजकर
नामदेवादिकांचा गाथा : (स० सं० गाथा-२)
नामदेवाचीं भजनें : संग्राहक – विनोबा
नामदेवाची सार्थ गाथा : संपादक – सुबंध (भा० १-२-३)
निळोबांची गाथा : (आवटे, इंदिरा प्रेस)
निळोबांचे अप्रकाशित अभंग (लेख) : भा० पं० बहिरट (म० सं० प०, जून ६३)
पठ्ठे बापूरावकृत लावण्या व गवळणी : संपादक – गो० गो० अधिकारी
परशुरामकृत लावण्या : संपादक – शाळिग्राम (चित्रशाळा, पुणे)
पुरुषार्थ मासिक : संत विशेषांक, ऑक्टोबर, १९६५
पैंजण (लावणीसंग्रह) : संपादक – म० ना० अदवंत
प्रभाकरकवीच्या कविता : संपादक – शाळिग्राम (चित्रशाळा)
प्राचीन मराठी कविता (भाग १ ते४) : संपादक – ज० शा० देशपांडे
प्राचीन मराठी जैन साहित्य : डॉ० सुभाषचंद्र अक्कोळे

प्राचीन मराठी पदें (लेख) : वा० ना० देशपांडे (मौज, दिवाळी १९४६)
प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (भाग १, पूर्वार्ध) : डॉ० अ० ना० देशपांडे
प्राचीन मराठी संतकवी : ज० र० आजगावकर
प्राचीन संगीतातील मराठी (लेख) : चैतन्य देसाई ('छंद', अंक १, १९५६)
बहिणाबाईचा गाथा : संपादक – वि० ना० कोल्हारकर
बहिणाबाईचा गाथा : संपादक – सौ० शालिनीबाई जावडेकर.
भक्तिमार्गदीप : संपादक – गो० नी० दाण्डेकर
भक्तिमार्गप्रदीप : संपादक – ल० रा० पांगारकर
भजनसुधासार : संपादक – श्रीमंत संपतराव गायकवाड (बडोदे)
भजनी गौळण मेळा : (नवीन आवृत्ती)
भजनी भारुड संग्रह : (११ वी आवृत्ती)
भजनी भारुडे : भाग १-२-३
भारत इतिहास संशोधक मंडळ : इतिवृत्ते, सन १९१५, १९१६
भूपाळ्यांची वही (प्रथम भाग) : गणपत कृष्णाजी, शके १७६५ (शिळाछाप पुस्तिका, सन १८४३)
मध्ययुगीन चरित्रकोश : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
मध्वमुनीश्वरांची कविता : संपादक – गुब्बी (भा० इ० सं० मंडळ, पुणे)
मराठी आरती (प्रबंध) : डॉ० म० वि० गोखले
मराठी छंदोरचना (प्रबंध) : ना० ग० जोशी
मराठी छंदोरचनेचा विकास : ना० ग० जोशी
मराठीतील स्त्रीधन (स्त्रीगीतसंग्रह) : संपादक – डॉ० सरोजिनी बाबर
मराठी लावणी वाङ्मय (प्रबंध) : डॉ० गं० ना० मोरजे
मराठी शाहिरी परंपरा (लेख) : म० वा० धोंड, लोकराज्य, १ मे, ६५
मराठी संशोधन पत्रिका (त्रैमासिक) : एप्रिल ५९, ऑक्टोबर ६२, ऑक्टोबर ६८, जानेवारी ६९, ऑक्टोबर ६९, जानेवारी ७१, ऑक्टोबर ७१, जुलै ७३
मऱ्हाटी लावणी : संपादक – म० वा० धोंड
महतीसागराचे व कवींद्रसेवकाचे अभंग : संपादक – हि० न० दोशी
महानुभावीय मराठी वाङ्मय (आवृत्ती १) य० खु० देशपांडे
महाराष्ट्र कविचरित्र (भाग १-२) : ज० र० आजगावकर
महाराष्ट्र लोकसाहित्यमाला (भाग १, २, ५) : संपादक – डॉ० सरोजिनी बाबर
महाराष्ट्र संत कवयित्री : ज० र० आजगावकर
महाराष्ट्र सारस्वत (आवृत्ती ५ वी) : वि० ल० भावे
महाराष्ट्र सारस्वत – पुरवणी : डॉ० शं० गो० तुळपुळे
(श्री) महीपतिनाथ ढोलीबुवा यांची पदे : संपादक – बा० ना० मुंडी (प्रकाशक – म० सं० मंडळ, मुंबई)

महीपति(बुवां)ची स्फुट रचना (लेख) : रा० चिं० ढेरे, (इंद्रायणी', मार्च ६३)
माणकोजी बोधला (लेख) : डॉ० गं० ना० मोरजे (म० सं० प० जुलै ६७)
माणकोजी बोधलांचे अभंग : (स० सं० गाथा नवी आवृत्ती भाग १)
माणिकप्रभु कविता : (संग्रह)
मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें (पदसंग्रह) : संपादक – ओक-भिडे (काव्यसंग्रहमाला)
मुडलगीचे स्वामी – परिचय व स्फुटरचना : डॉ० पंडित आवळीकर
मुसलमान मराठी संतकवि : रा० चिं० ढेरे
मूर्तिवर्णने – स्तोत्रसंग्रह : (श्री कृष्णराज महानुभाव – संगृहीत महानुभावीय पारंपरिक गीते)
मोरोपंत समग्र ग्रंथ (स्फुट काव्यें) : भाग ११-१२; संपादक – अ० का० प्रियोळकर
मौज : दिवाळी १९४६
रंगनाथस्वामी निगडीकरकृत पदसंग्रह : संपादक – वि० ल० भावे
रमणीय पुष्पगुंफा : (पदसंग्रह)
रंभामंजरीतील मराठी पद्य (लेख) : के० वा० आपटे (म० सं० प०, एप्रिल ५९)
रामजोशी यांची कविता : संपादक – शाळिग्राम (चित्रशाळा)
रुक्मांगदाची स्फुट पदे (लेख) : ना० ब० जोशी ('इंद्रायणी', ऑक्टोबर ६२)
लावणी संसाराचि – वामनाचि (लेख) : रा० म० आठवले, लोकसत्ता, ११-५-६९
लावणीकार जोतिराम (लेख) : डॉ० गं० ना० मोरजे(म० सं० प० जानेवारी ६७)
विठोबाअण्णा (दप्तरदार) पदसंग्रह : संपादक – र० रा० भागवत
विठ्ठलकवि (बीडकर) कृत कवितासंग्रह : (काव्यसंग्रहमाला)
विठ्ठल (केरीकर) कृत पदसंग्रह : परिशिष्ट
(श्री) विष्णुदासांची कविता
वीरक्षेत्री लावण्या : शिळाछाप आवृत्ती, बडोदे
व्यंकटेशस्तोत्र : देवीदास (भ० मा० प्रदीप)
शेखमहंमदाची कविता : म० सं० पत्रिका, वर्ष १०, अंक १
श्रीमत्साधुवर्य रघुपति महाराज (लेख) : शंकरराव सुपेकर ('पुरुषार्थ', ऑक्टोबर ६५)
श्रीसंत गंगानाथ-कविता (लेख) : रा० चिं० ढेरे ('इंद्रायणी', सप्टेंबर-ऑक्टोबर ६३)
श्रीसंतगाथा (स० सं० गाथा-३) : गोरोबा, सेना, चोखा, सांवता वगैरेंचे अभंग
श्रीसमर्थवाग्देवता मंदिर : हस्त० बाडांक ६०८
सकलसंतगाथा (गाथापंचक) : संपादक – आवटे
संगीत गौळण मेळा : नवी आवृत्ती १९६८
सगनभाऊकृत लावण्या : संपादक – शाळिग्राम (चित्रशाळा)
सगन-लावण्या : शिळाछाप आवृत्ती, बडोदे
(श्री) सद्गुरु बांदकर (कृष्णभट) कृत कवितासंग्रह : संपादक – कृ० ज० थुळी
सरस्वतीमहाल (तंजावर) वह्या : डी० एन० २२१३
(श्री) समर्थ ग्रंथभांडार (उत्तरार्ध) : ल० रा० पांगारकर

(श्री) समर्थ वाग्देवता मंदिर : बाड क्रमांक ७१२ (धुळे)

समर्थप्रताप : गिरिधरकृत; (प्रस्तावना) संपादक – शं० श्री० देव

(श्री) सीतास्वयंवर : वेणाबाईकृत; (प्रस्तावना) संपादक – शं० श्री० देव

सुबोध पदें (भाग १) प्रकाशक – आबाजी रामचंद्र सावंत, सावंत बुक डेपो, रामतत्त्व प्रेस, बेळगाव

सुविचारमाला (भजनसंग्रह) : संपादक – कर्नल नानासाहेब शिंदे, बडोदे

सोहिरोबानाथ – चरित्र व वाङ्मय : बा० भ० बोरकर

सोहिरोबानाथ आंबिये यांची कविता

स्त्रियांकरिता गाण्यांचे पुस्तक : संपादक – सोहनी

स्त्रीगीतसंग्रह अथवा बायकांची गाणी : संपादक – पंडित

स्वाध्याय (त्रैमासिक, गुजराती) : ऑगस्ट, १९६५

ज्ञानेश्वरपूर्वकालीन गोरक्षनाथांपासून अलीकडच्या पट्ठे बापूरावांपर्यंतच्या सुमारे एकशे सत्तर कवींची एकूण चारशे सदतीस गीते प्रस्तुत 'प्राचीन गीतमंजूषे'मध्ये डॉ० ना० ग० जोशी यांनी संकलित-संपादित केली आहेत. प्रत्येक कवीचे व बहुतेक सर्व गीतांचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या टिपा, पहिल्या ओळींची सूची वगैरे परिशिष्टे आणि 'मध्ययुगीन मराठी काव्य : एक (वेगळे) विश्लेषण' हा पन्नास पृष्ठांचा प्रदीर्घ प्रास्ताविक लेख यांमुळे ही प्राचीन गीते वाचकांना आकलनसुलभ झाली आहेत.

वारकरी, नाथ, रामदासी इत्यादी पंथांतील कवींची व शाहिरांची गीते येथे आहेतच, पण महानुभाव, जैन, लिंगायत, गुजरातीभाषी, मुसलमान, ख्रिस्ती, स्त्रिया, अनाम कवी इत्यादींच्या गीतांना मराठी संकलनात येथे प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने स्थान मिळाले आहे.

डॉ. जोशी यांनी संपादिलेल्या व १९५९ साली 'मौज'तर्फे प्रकाशित झालेल्या 'प्राचीन गीतभांडारा'पेक्षा हा संग्रह अधिक मोठा असून संतांच्या कूटगीतांना दिलेले भरघोस प्रतिनिधित्व हे या 'मंजूषे'चे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

डॉ. ना.ग. जोशी (जन्म इ.स. १९११-मृत्यू १९८६) यांनी आयुष्याच्या प्रारंभीच्या वर्षांमध्ये कोकणात आंजर्ले व महाड परिसरात लोकगीते, स्त्रीगीते, भजने, कीर्तने, तमाशे इत्यादींमधून प्राचीन मराठी गीतांचे संस्कार घेतले. कॉलेजशिक्षण, राष्ट्रीय विद्यालयात आठ वर्षे अध्यापन आणि कॉलेजात पंचवीसहून अधिक वर्षे मराठीचे अध्यापन ही त्यांची कारकीर्द गुजरातमध्ये भावनगर-अमदाबाद-बडोदे येथे घडलेली; त्यामुळे त्यांच्या वाङ्मयविषयक दृष्टिकोणात व्यापकता आणि उदारता आली. 'मराठी छंदोरचना (लयदृष्ट्या पुनर्विचार)', 'मराठी छंदोरचनेचा विकास' व 'तुलनात्मक छंदोरचना' हे – महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेते व 'मौज'ने प्रकाशित केलेले – ग्रंथ ही मराठी काव्यसमीक्षेतली त्यांची नजरेत भरणारी कामगिरी. 'कविता' (स्फुट कवितांचा संग्रह) व 'जीवनयोग' (खंडकाव्य) ही त्यांच्या गंभीर काव्यप्रतिभेची साक्ष देणारी पुस्तकेही ध्यानात घेतली म्हणजे 'प्राचीन गीतभांडार' व प्रस्तुत 'प्राचीन गीतमंजूषा' यांमध्ये दिसणाऱ्या विचक्षण काव्य-जाणिवेचे नवल रसिकांना वाटणार नाही.